**महाराष्ट्र विधानसभा**

**पत्रक भाग – दोन**

**गुरुवार, दिनांक १२ जून, २०२५ / ज्येष्ठ २२, शके १९४७**

**६४. लक्षवेधी सूचनांवरील प्रलंबित निवेदनांच्या प्रतींचे वितरण :-**

विधानसभेचे सन २०२५ चे प्रथम (अर्थसंकल्पीय) अधिवेशन सोमवार, दिनांक ३ मार्च, २०२५ रोजी विधान भवन, मुंबई येथे सुरु होऊन बुधवार, दिनांक २६ मार्च, २०२५ रोजी संस्थगित झाले.

संस्थगित झालेल्या प्रथम (अर्थसंकल्पीय) अधिवेशनात एकूण २९३ स्वीकृत लक्षवेधी सूचनांचे जोडपत्र दिनांक २६ मार्च, २०२५ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले होते. २९३ निवेदनांपैकी २५ निवेदने मा. सदस्यांना टपालखणाव्दारे त्याचदिवशी वितरीत करण्यात आलेली होती व एकूण २६८ लक्षवेधी सूचनांची निवेदने प्रलंबित होती. आता ९४ निवेदने कक्षात प्राप्त झाली असून ती या सोबत वितरीत करण्यात येत आहेत. उर्वरित प्रलंबित १७४ निवेदनांचा संबंधित मंत्रालयीन विभागाकडे पाठपुरावा करण्यात येत आहे.

तसेच एम.के.सी.एल. तर्फे विकसित करण्यात आलेल्या MOIS या संगणकीय प्रणालीद्वारे सन्मा. विधानसभा सदस्यांनी संपूर्णत: ऑनलाईन (Online) पध्दतीने लक्षवेधी सूचना दिलेल्या असल्यामुळे विधानसभा सदस्यांना ऑनलाईन (Online) पध्दतीने निवेदने प्राप्त होणार असून उर्वरित प्रलंबित निवेदने प्राप्त झाल्यानंतर सर्व विधानसभा सदस्यांना पत्रक भाग -२ द्वारे अवगत करण्यात येईल.

**विधान भवन,**
**मुंबई**
**दिनांक : १२ जून, २०२५**

**जितेंद्र भोळे**
**सचिव-१ ,**
**महाराष्ट्र विधानसभा**

**याची प्रत :-**

१. महाराष्ट्र विधानसभेचे सर्व सन्माननीय सदस्य
२. महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व पक्ष कार्यालये
३. संगणक कक्ष (Website)
४. अनुवाद कक्ष
५. प्रतिवेदन कक्ष

# महाराष्ट्र विधानसभा

## सन २०२५ चे पहिले (अर्थसंकल्पीय) अधिवेशन

**मा. श्री. भास्कर जाधव, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्र.४२३ पुढील प्रमाणे आहे.**

"नॅशनल स्मार्ट ग्रीड मिशन या मोहिमेंतर्गत संपूर्ण राज्यातील २.२५ कोटी वीज ग्राहकांना प्रिपेड मिटर लावण्यासाठी २७,००० कोटी रुपये खर्च केले जाणार असून प्रतिमिटर १२,०००/- रुपये खर्च केला जाणार असणे, त्यापैकी केवळ २००० कोटी म्हणजेच प्रतिमिटर ९००/- रुपये एवढेच अनुदान केंद्र शासनाकडून देण्यात येणार असणे, उर्वरीत रक्कम महावितरणला कर्जरुपाने उभारावी लागणार असून याबाबतची भरपाई सर्व वीजग्राहकांना दरवाढीच्या रुपाने भरावी लागणार असणे, त्यामुळे ०१ एप्रिल, २०२५ पासून प्रत्येक युनिटमध्ये ३० पैसे होणारी वाढ, स्मार्ट मिटरचे टेंडर मंजुर करतांना ग्राहकांना मोफत मिटर बसवणार अशी केलेली फसवी जाहिरात, २५ ऑगस्ट, २०२२ च्या शासन निर्णयामध्ये मिटरची किंमत रु.७०४८/- दाखविणे, तथापी टेंडर्स मंजूर करतांना ११,९८७/- म्हणजेच दुप्पट दराने दाखविलेली किंमत, उत्तर प्रदेश, हरियाना, बिहार, राजस्थान यांनी नाकारलेली सेवा, तथापी राज्यातील वीज ग्राहकांना शासनाने केलेली सक्ती, त्यामुळे बेकायदेशीरपणे ग्राहकांची होणारी लूट, वीज कायदा २००३ मधील कलम ४७ (५) अन्वये आपला मिटर कोणता असावा हे ठरविण्याचे दिलेले स्वातंत्र्य, त्यावर शासन करीत असलेली सक्ती, परिणामी सर्वसामान्य नागरीकांमध्ये शासनाविरुध्द निर्माण झालेला संताप आणि तीव्र असंतोष, त्यामुळे स्मार्ट मिटर लावण्याबाबत केलेली सक्ती रद्द करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाचे कार्यवाही वा शासनाची प्रतिक्रिया."

### मा. मुख्यमंत्री तथा मंत्री (ऊर्जा) यांचे निवेदन

केंद्रीय ऊर्जा मंत्रालयाने जूलै, २०२० मध्ये सुधारित वितरण क्षेत्र योजना (RDSS) जाहीर केली आहे. या योजनेमुळे वीज वितरण कंपन्यांची गुणवत्ता व विश्वासार्हतेचे निर्देशांक वाढून आर्थिक दृष्टीने सक्षम होण्यास मदत होईल. या प्रणालीमुळे एकुण तांत्रिक व व्यावसायिक हानी कमी होऊन वीज पुरवठयाची सरासरी किंमत व वीज दर कमी होण्यास मदत होणार आहे.

स्मार्ट मीटरचे विविध फायदे विचारात घेऊन केंद्रीय ऊर्जा मंत्रालयाने दि. २६.०२.२०२१ रोजी सर्व वीज वितरण कंपन्यांना स्मार्ट मीटर लावण्याचे आदेश दिलेले आहेत. केंद्र शासनाच्या दि.१७.०८.२०२१ रोजीच्या राजपत्रानुसार डिसेंबर, २०२३ ते मार्च, २०२५ या कालावधीत सर्व वीज वितरण कंपन्यांना स्मार्ट मीटर बसविणे सुचित करण्यात आले आहे.

केंद्र शासनाने महाराष्ट्र राज्याला पॉवर फायनान्स कॉर्पोरेशन लिमिटेड च्या दि.२२.०९.२०२२ च्या आदेशाद्वारे स्मार्ट मीटर प्रकल्पाकरिता मंजूरी दिलेली आहे. सुधारित वितरण क्षेत्र (RDSS) योजनेअंतर्गत स्मार्ट मीटर बसविण्यासाठी रुरल इलेक्ट्रिफिकेशन कॉर्पोरेशन लिमिटेड (RECL) द्वारे दिलेल्या सुधारीत Standard Bidding Document प्रमाणे महावितरण मार्फत ई-निविदा प्रकाशित करण्यात आल्या होत्या. ०६ निविदाधारकांनी यामध्ये भाग घेतला. त्यापैकी निविदेतील अटी व शर्तीनुसार पात्र ०४ निविदाधारकांना कार्यादेश देण्यात आले आहेत. निविदेतील तरतुदीनुसार पारदर्शकरित्या कार्यवाही करून स्पर्धात्मक पद्धतीने निविदा निश्चित करण्यात आल्या आहेत. सुधारित वितरण क्षेत्र योजनेअंतर्गत (RDSS) सर्व कामांच्या निविदा प्रक्रियेपासून ते अंमलबजावणीपर्यंत केंद्र शासनाची RECPDCL ही त्रयस्थ संस्था Project Management Agency म्हणून काम पाहत आहे.

स्मार्ट मीटर बसविण्यासाठी लागणारा खर्च केंद्र सरकार व महावितरण यांच्यामार्फत संयुक्तपणे केला जाणार आहे. यासाठी केंद्र शासनाकडून महावितरणला ग्राहक मीटरसाठी रु.९००

प्रति मीटर, रोहित्र मीटरसाठी रु. ३,४५० प्रति मीटर व वाहिनी मीटरसाठी रु. ६,३०० प्रति मीटर इतके अनुदान देण्यात येणार आहे. स्मार्ट मीटर बसविल्यामुळे वाणिज्यिक हानी कमी होऊन, प्राप्त होणाऱ्या अतिरिक्त महसूलातून स्मार्ट मीटर बसविण्यासाठी लागणारा खर्च भागविण्यात येणार आहे.

स्मार्ट मीटरचा दर केवळ स्मार्ट मीटरची किंमत नसून, यामध्ये स्मार्ट मीटर प्रणाली यशस्वी होण्यासाठी लागणाऱ्या हेड एन्ड सिस्टम, मीटर बसविण्यासाठी लागणारे इतर साहित्य, ९३ महिने मीटर रिंडीग व देखभालीचा खर्च तसेच यासाठी लागणाऱ्या तांत्रिक प्रणालीची किंमत यामध्ये समाविष्ट आहे. यामध्ये निविदाधारकांना कोणतेही आगाऊ भुगतान होणार नाही. सदर निविदा Totex Model (Capital Expenditure + Operation and Maintenance) वर आधारित असून, मीटर लावुन पुढील १० वर्षापर्यंत दुरूस्ती देखभालीची जबाबदारी निविदाधारकाची आहे. दर महिन्याला प्रति मीटर देयक Service Level Agreement प्रमाणे महावितरण तर्फे निविदाधारकाला देण्यात येणार आहे. यासाठी महावितरणला कर्ज घ्यावे लागणार नाही.

स्मार्ट मीटर ग्राहकाला मोफतच लावण्यात येणार असून, त्यामध्ये बिघाड झाल्यास तो दुरुस्त करुन पूर्ववत करण्याची जबाबदारी ही पुढील १० वर्षांसाठी संबंधीत कंत्राटदाराची असणार आहे. स्मार्ट मीटर बसविण्याकरीता ग्राहकांकडून कोणत्याही प्रकारचे अतिरिक्त शुल्क आकारण्यात येत नाही. तसेच सद्य:स्थितीत स्मार्ट मीटरमुळे घरगुती/व्यावसायिक वीज दरामध्ये बदल होणार नाहीत.

उत्तरप्रदेश,बिहार आणि राजस्थान या राज्यांमध्ये देखील महाराष्ट्राप्रमाणेच मीटर बसविण्याचे काम सुधारित वितरण क्षेत्र योजना (RDSS) अंतर्गत सुरु असून, मे. अदानी, मे.एनसीसी व मे.जिनस यासारख्या विविध कंपन्यांना कंत्राट दिलेले आहे. स्मार्ट मीटरसाठी महावितरणद्वारे दिलेल्या निविदांचे दर इतर राज्याच्या तुलनेत वाजवी आहेत.

सदर योजनेद्वारे स्मार्ट मीटर प्रथम महावितरणच्या सिस्टीम मीटरिंग अंतर्गत सबस्टेशनमधील सर्व फीडरवर तसेच वितरण रोहित्रांवर (Distribution Transformer) बसविण्यात येत आहेत. तद्नंतर, स्मार्ट मीटर हे प्राधान्यतः शासकीय कार्यालये, शासकीय वसाहती तसेच उच्चदाब व लघुदाब औद्योगिक, वाणिज्यिक ग्राहकांना व नवीन वीज जोडणीकरिता बसविण्यात येत आहेत. स्मार्ट मीटर पोस्टपेड पद्धतीनेच बसविण्यात येणार असल्यामुळे, वीज कायदा,२००३ मधील कलम ४७(५) मध्ये अंतर्भूत सुरक्षाठेवीची तरतुद लागू होत नाही.

स्मार्ट मीटरद्वारे स्वयंचलित रिडींग यंत्रणेमार्फत नोंदविलेल्या रिडींगमुळे मानवी चूका कमी होऊन ग्राहकांना योग्य वीज बील मिळेल व वितरण कंपनीकडून जलद ग्राहक सेवा प्राप्त होण्यास मदत होईल. स्मार्ट मीटरद्वारे अधिक अचूक रिडींग उपलब्ध झाल्यामुळे बिलिंग संबधीत तक्रारींचे प्रमाण नगण्य होण्यास मदत होणार आहे. तसेच, स्मार्ट मीटर ग्राहकांना त्यांच्या विजेच्या वास्तविक (Real Time) वापराची माहिती २४ X ७ उपलब्ध होईल. यासाठी मोबाईल ॲप विकसित करण्यात आले असुन त्यामुळे ग्राहकांस इष्टतम वापर करुन बिलात बचत करण्यास मदत होणार आहे. स्मार्ट मीटरमुळे ग्राहकांचे सक्षमीकरण होणार आहे.

**********************************************

लक्षवेधी सूचना क्र.१८३७

महाराष्ट्र विधानसभा,
सन २०२५ चे पहिले (अर्थसंकल्पीय) अधिवेशन
महाराष्ट्र विधानसभा नियम-१०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना

सर्वश्री. विनोद अग्रवाल, संजय पुराम, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम-१०५ अन्वये उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना खालीप्रमाणे आहे:-

"गोंदिया जिल्ह्यातील बिरसी विमानतळाचे विस्तारीकरणाकरीता सन २००९-१० मध्ये बिरसी गावातील १०६ घरे तथा शेत जमिन अधिग्रहीत करण्यात येणे, अधिग्रहीत करण्यात आलेल्या १०६ घरांचा पुनर्वसन करण्याचे यादीमध्ये ८ कुटूंबाचा समावेश करण्यात आलेला नसणे, पुनर्वसीत १०६ घरांचा सन २०१३ मध्ये रु. ५.०० लक्ष प्रमाणे मंजुर करण्यात आलेला मोबदला सन २०२३ मध्ये देण्यात येत असणे, पुनर्वसीत प्रकल्पग्रस्तांची आजच्या वाढीव बाजार भावानुसार दरवाढीसह जिल्हापरिषद शाळा, पाण्याची टाकी यांचे सुध्दा बांधकाम करण्याची मागणी असणे, बिरसी गावाला प्रकल्पग्रस्त गाव म्हणुन घोषीत करण्यात आले नसणे, प्रकल्पग्रस्तांच्या शेतकऱ्यांचे बेरोजगार पाल्यांना विमानतळ प्राधिकरणाचे अधिकारी नोकरी नाकारुण बाहेरील व्यक्तींना नोकरीवर समावुन घेण्यात येणे, बिरसी विमानतळ विस्तारीकरणाअंतर्गत नियोजीत रस्ता कामठा-बिरसी-खातीया बांधकामामुळे बाधीत होणारी पाणी पुरवठा लाईनचे आधि बांधकामासह उक्त रस्त्यामुळे बाधीत पांदन रस्त्याचे बांधकाम करणे, परसवाडा-कामठा रस्ता सुध्दा बाधीत होत असल्याने सदर रस्त्याचे बांधकाम करण्यात येणे, पुनर्वसीत गावामध्ये अद्यापही मुलभूत सुविधा पुरविण्यात आलेल्या नसणे, भारतीय विमानतन प्राधिकरण बिरसी यांचेकडे मोकळ्या जागेच्या कराची सन २०१६ पासुन थकीत असेलली रु. २.०० कोटींपेक्षा जास्त असलेली रक्कम थकीत असणे, त्यामुळे सदर बिरसी गावातील नागरिकांमध्ये असलेले असंतोषाचे वातावरण यावर शासनाने करावयाची तातडीची कार्यवाही व उपाय योजना."

मा. मुख्यमंत्री यांनी करावयाचे निवेदन

गोंदिया विमानतळ हा भारतीय विमानपत्तन प्राधिकरण गोंदिया यांच्या अधिपत्याखाली आहे, या विमानतळाचा "उडे देश का आम नागरिक" या योजनेंतर्गत शासन निर्णय दि.१०-११-२०१७ अन्वये समावेश करण्यात आला आहे.

बिरसी विमानतळाच्या विस्तारीकरणाकरीता मौजा बिरसी, झिलमीली, कामठा व परसवाडा ता.जि.गोंदिया येथील एकूण १४२.११ हे. आर. खासगी जमीन सन २००७ ते २०१० या कालावधीत भुसंपादन कायदा, १८९४ अन्वये संपादित करण्यात आलेली आहे. महाराष्ट्र राज्य पुनर्वसन प्राधिकरणाच्या दि.१९.६.२०१३ रोजीच्या तत्कालीन मा.मंत्री (मदत व पुनर्वसन) यांचे अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत बिरसी विमानतळ विकास/ विस्तारीकरण प्रकल्प, गोंदिया या प्रकल्पाकरीता

पुनर्वसन योजना मंजूर करण्यात आली आहे. त्यानुसार बाधित कुटुंबियांना वित्तिय लाभ व इतर अनुषंगिक लाभ देणेबाबतचा अहवाल सन २०१४ मध्ये तयार करण्यात आला. पुनर्वसन प्रस्तावास भारतीय विमानपत्तन प्राधिकरणाकडून सन २०१७ मध्ये मंजूरी देण्यात आली आहे.

गोंदिया जिल्ह्यातील बिरसी विमानतळाच्या विस्तारीकरणाकरिता सन २००९-१० मध्ये बिरसी गावातील १०६ घरे आणि शेतजमीन अधिग्रहीत करण्यात आली आहे. सदर १०६ घरांच्या पुनर्वसन यादीमध्ये ७ घरांची नावे सुटल्याबाबत ग्रामपंचायत, बिरसी यांचा दि.३१.०३.२०२२ रोजी ग्रामसभेत ठराव प्राप्त झाला होता. परंतू पुनर्वसन यादीमध्ये ८ कुटुंबाच्या नावाचा समावेश करण्याबाबत संयुक्त चौकशी अहवाल दि.१०.०३.२०२५ रोजी प्राप्त झाला आहे आणि सदर अहवाल जिल्हाधिकारी गोंदिया यांचेकडे सादर करण्यात येत आहे.

ज्या ठिकाणी घरबाधितांचे पुनर्वसन होणार होते, ती जागा समतल नव्हती तसेच त्याठिकाणी काही अतिक्रमण झाले होते. सदर जागा समतल करण्यात आली. अतिक्रमणाची जागा भारतीय विमानपत्तन प्राधिकरणाची होती. त्यांनी सन २०१९ मध्ये अतिक्रमण काढण्याची कार्यवाही सुरु केली. त्यानंतर सन २०२० मध्ये कोविड-१९ विषाणूंच्या प्रादुर्भाव झाला. त्यानंतर सन २०२२ मध्ये भूखंड वाटपाचे आदेश झाले. सद्यस्थितीत १०६ घरबाधितांपैकी ९५ घरांचे बांधकाम झाले आहे आणि ११ घरांचे बांधकाम शिल्लक आहे.

बाधित कुटुंबियांचे पुनर्वसन व त्यांना इतर अनुषंगिक लाभ वाढीव बाजार भावानुसार देण्याबाबतची पुनर्वसन योजनेमध्ये तरतूद नाही. पुनर्वसन योजनेतील तरतुदीनुसार कार्यवाही करण्यात येत आहे. बिरसी गावात शाळा टोली येथे माध्यमिक शाळा उपलब्ध आहे तसेच बिरसी गावात ओव्हरहेड टँक उपलब्ध आहे. ओव्हरहेड टँकपासून पुनर्वसन केलेल्या जागेपर्यंत पाणीपुरवठा पाईप लाईन टाकण्याबाबत कार्यवाही सुरु आहे.

पुनर्वसन योजनेमध्ये बिरसी गावाला प्रकल्पग्रस्त गाव म्हणून घोषित करण्याबाबत कोणतीही बाब अंतर्भूत नाही. तसेच नोकरी व शेत जमीनी ऐवजी एक वेळचे अर्थसहाय्य देण्याबाबत नमूद आहे. त्यानुसार संबंधितांना एकवेळचे अर्थसहाय्य देण्यात आले आहे.

परसवाडा-कामठा बाधीत रस्ता, पुनर्वसीत गावामध्ये मुलभूत सुविधा पुरविणे याबाबत पुनर्वसन योजनेनुसार कार्यवाही सुरू आहे. पुनर्वसन योजनेमध्ये दि.१.४.२०१३ पासून बिरसी विमानतळाच्या बांधकाम केलेल्या क्षेत्रावर (इमारतीच्या ) मालमत्ताकर भारतीय विमानपत्तन प्राधिकरण ( AAI ) ने बिरसी ग्रामपंचायतीला अदा करील अशी तरतूद आहे. त्यानुसार भारतीय विमानपत्तन प्राधिकरण (AAI) यांनी विमानतळाच्या बांधकाम केलेल्या क्षेत्रावर (इमारतीच्या ) मालमत्ताकर अदा केला आहे.

***

## महाराष्ट्र विधानसभा
## सन २०२५ चे प्रथम अधिवेशन

श्री.सुनिल प्रभू वि.स.स.यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सुचना क्र.४२४ पुढीलप्रमाणे आहे

"मुंबईतील "इंडियाज गॉट लेटेंट" या विनोदवीर समय रैना यांच्या युट्युबवरील प्रसिद्ध विनोदी रिअलिटी शो मध्ये युट्युबर रणवीर अलाहाबादीया यांनी स्पर्धक अपूर्वा मखिजा यांना आईवडीलांबाबत अश्लिल प्रश्न विचारून आक्षेपार्ह विधान केल्याचा व्हिडोओ समाजमाध्यमांवर वायरल झाल्यानंतर या शो विरुद्ध सर्वसामान्य नागरिकांनी प्रचंड संताप व्यक्त करुन अश्लाघ्य भाषेचा वापर करणाऱ्याविरुद्ध दि.१२.०२.२०२५ रोजी खार पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केल्याची घटना घडणे, देश व राज्यातील नागरिकांचा रोष लक्षात घेता, सदरहू प्रकरणी मुंबई पोलीसांसह महाराष्ट्र सायबर पोलीसांनीही गंभीर दखल घेऊन सदर प्रकरणात ३० जणांविरुद्ध माहिती तंत्रज्ञान कायदा व भारतीय न्याय संहिता अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात येणे, त्यांतर या वादग्रस्त कार्यक्रमाचे सर्व १८ भाग हटविणेबाबत महाराष्ट्र सायबर विभागाने युट्युबला पत्र लिहून मागणी केल्यानंतर कार्यक्रमाचे आयोजक समर रैनाकडून सर्व व्हिडीओ युट्युबवरून काढून टाकणे, विनोदी शोच्या नावाखाली युट्युबर तरुण युवापिढीला अश्लिल प्रश्न विचारून व व्हिडीओ वायरल करुन युट्युबवर कोट्यवधी रुपयाची नफेखोरी करीत असणे, परंतु या अश्लिल व्हिडीओचा भारतीय संस्कृतीचा ऱ्हास होऊन समाज मनावर त्याचा विपरीत परिणाम होणे, याबाबत शासनाने अशा युट्युबरवर कारवाई करुन प्रसंगी असे अश्लिल प्रकार रोखण्यासाठी शासनाने कठोर कायदा करणेबाबत देखील कार्यवाही करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया"

---

## मा.मुख्यमंत्री यांचे निवेदन

युट्युबर समय रैना यांच्या युट्युब चॅनेल वरील "India's Got Latent show" या शो मध्ये भारतीय संस्कृती व कुटूंब व्यवस्थेवर परिणाम करणारे, स्रियांचा विनयभंग करण्याच्या उद्देशाने शब्दोच्चार, हावभाव करून अश्लील भाष्य व कृती केल्याचे आढळून आले. तसेच धार्मिक श्रद्धांचा अपमान करून धार्मिक भावना दुखविण्याच्या उद्देशाने बुद्धीपुरस्पर व दृष्ट कृती केली आहे. तसेच अरुणाचल प्रदेश येथील समाजामध्ये सार्वजनिक शांतता तसेच एकोपा टिकण्यास बाधक अशी कृती केली आहे.

सबब, सदर शो चे ज्युरी, शो तयार करणारे व युट्युबवर पोस्ट करणा-यांविरूद्ध नोडल सायबर पोलीस ठाणे,महाराष्ट्र सायबर, मुंबई कार्यालयात गु.र.क्र. ०५/२०२५ भारतीय न्याय संहिता कलम ७९, १९६, २९४, २९६, २९९, ३(५) सह माहिती तंत्रज्ञान अधिनियम कलम ६७ तसेच महिलांचे अश्लील प्रतिनिधीत्व प्रतिबंध कायदा १९८६ कलम ४, ६ व ७ अन्वये दिनांक १०.२.२०२५ रोजी गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

सदर कार्यक्रमाचे व्हिडीओ ओटीटी प्लॅटफॉर्म वरून काढण्यात आलेले आहेत. तसेच सदर प्रकरणातील आरोपी रणवीर अलहाबादिया यांस मा. सर्वोच्च न्यायालयाने अटकपूर्व जामीन मंजूर केला आहे. तसेच इतर आरोपींचा मा. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेश व मार्गदर्शक तत्त्वांचे पालन करून पुढील तपास सुरू आहे.

..........

## महाराष्ट्र विधानसभा
## सन २०२५ चे पहिले (अर्थसंकल्पीय) अधिवेशन

श्री.बाबाजी काळे, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्र.२२८१ पुढील प्रमाणे आहे :-

"राज्यामध्ये होमगार्ड सैनिकांची संख्या ४८००० असून ते राज्यात पोलिसांसोबत कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी अत्यंत महत्वाची भूमिका बजावत असणे, परंतु त्यांना अद्यापही नियमित सेवेचा लाभ न मिळता केवळ ४ ते ५ महिनेच सेवा मिळणे, होमगार्ड संघटनांनी आपल्या विविध मागण्याकरिता वारंवार लेखी निवेदन, आंदोलन करुनही त्यांना अद्याप नियमित सेवेचा लाभ न मिळणे, सध्या राज्यात महिलांवर अत्याचाराची अनेक प्रकरणे घडत असून त्या सर्वच ठिकाणी पोलिस वेळेवर पोहचू शकत नसल्याने सर्व शासकीय शाळा, दवाखाने, शासकीय कार्यालय येथे सुरक्षा रक्षक म्हणून नेमणूक करावी, ट्राफिकची समस्या सोडविण्याकरिता या होमगार्डची मदत घेणे, अशा प्रकारे होमगार्डना ३६५ दिवस काम मिळणे शक्य होणे, तसेच महाराष्ट्र होमगार्ड संघटनेने विविध मागण्या केल्या असून त्यावर शासनाने अद्याप निर्णय न घेणे, तसेच पुणे जिल्ह्यातील खेड-राजगुरुनगर येथे होमगार्ड कार्यालयाची १९८४ मध्ये प्रशस्त वास्तू निर्माण झाली असून सन २००५ मध्ये सदरील कार्यालय वाहतुकीस अडथळा येत असल्याकारणाने हे कार्यालय पाडण्यात येणे, परिणामी होमगार्डमध्ये निर्माण झालेली असंतोष व संतापाची भावना, याबाबत शासनाने तातडीने निर्णय घेण्याची आवश्यकता, याबाबत शासनाची प्रतिक्रिया व भूमिका."

### मा. मुख्यमंत्री (गृह) यांचे निवेदन

होमगार्ड ही पुर्णतः ऐच्छीक स्वरुपाची एक मानसेवी संघटना आहे. होमगार्ड संघटनेतील स्वयंसेवक हे स्वतःची नोकरी, व्यवसाय सांभाळून संघटनेत देशसेवा करण्यासाठी नोंदणी करुन घेतात. त्यामुळे त्यांना वर्षभर रोजगार देता येत नाही. राज्यातील होमगार्डच्या कामकाजाबाबत व विविध समस्यांच्या अनुषंगाने दि.१३.१२.२०२१ रोजी मा.मंत्री (गृह) यांच्या अध्यक्षतेखाली बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकी अन्वये राज्यातील होमगार्डसना वर्षातून किमान १८० दिवस काम देण्यात यावे याबाबत

शक्यता पडताळून पहावे असे सूचित करण्यात आले होते. होमगार्डसना वर्षातून किमान १८० दिवस कर्तव्य देण्यासंदर्भात नियोजन करण्यात येत असून, शासनाच्या विविध विभागांना व संस्थांना होमगार्डस उपलब्ध करुन देण्याबाबत महासमादेशक कार्यालयामार्फत पत्रव्यवहार करण्यात येत आहे. तसेच विविध विभागांच्या मागणीनुसार व होमगार्ड उपलब्धतेनुसार होमगार्ड सेवा उपलब्ध करून देण्यात येत आहे.

मा.मंत्रीमंडळ उपसमितीच्या दि.०१.०३.२०१९ रोजी मा.मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झालेल्या बैठकीत होमगार्डची दर तीन वर्षांनी होणारी पुन:र्नोंदणी पुर्ननियुक्ती प्रणाली पध्दत कायमस्वरुपी बंद करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. होमगार्ड संघटनेत मानसेवी होमगार्ड स्वयंसेवकांना त्यांच्या संघटनेतील सेवेच्या ज्येष्ठतेनुसार रँक व पदोन्नती देण्यात येते. होमगार्ड स्वयंसेवकांना ३ वर्ष सेवा पूर्ण केल्यावर पोलीस/वन विभाग/ अग्निशमन येथे भरतीमध्ये ५ टक्के आरक्षण शासनाने मंजूर केलेले आहे. तसेच, मा.मंत्री (गृह) यांच्या अध्यक्षतेखाली दि.१३.१२.२०२१ रोजी झालेल्या बैठकीत होमगार्डसच्या विविध मागण्यांबाबत सकारात्मक निर्णय घेण्यात आलेले आहेत. तसेच, बॉम्बे होमगार्ड ॲक्ट, १९४७ मध्ये सुधारणा अथवा बदल करणेबाबत प्रस्ताव दि.०३.०४.२०२३ अन्वये केंद्र शासनाकडे सादर करण्यात आलेला आहे.

सन २०२३-२४ या वर्षात होमगार्डसना सरासरी १२०-१४० दिवस कर्तव्य उपलब्ध करुन देण्यात आलेले आहे. तसेच, दि.०९.१०.२०२४ च्या शासन निर्णयान्वये होमगार्डसच्या विविध भत्त्यांमध्ये दि.०१.१०.२०२४ पासून भरीव वाढ करण्यात आलेली असून त्यांचा कर्तव्य भत्ता रु.५७०/- वरुन रु.१०८३/- याप्रमाणे सुधारित करण्यात आलेला आहे.

सन १९८४ च्या कालावधीत पुणे जिल्ह्यातील खेड-राजगुरुनगर येथे तत्कालिन ग्रामपंचायतीच्या जागेतील इमारतीत होमगार्ड पथक कार्यालय कार्यरत होते. तथापि, सदर इमारत वाहतुकीस अडथळा येत असल्याने तत्कालिन ग्रामपंचायतीने पाडलेली असून त्या ठिकाणी खेड-राजगुरुनगर नगरपरिषदेने शासकीय दवाखाना बांधला आहे. खेड-राजगुरुनगर नगरपरिषदेच्या इमारतीमध्ये होमगार्ड पथक कार्यालयासाठी जागा उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.

---------***************---------

**महाराष्ट्र विधानसभा**

**सन २०२५ चे पहिले अर्थसंल्पिय अधिवेशन**

**मा. श्रीम. देवयानी फरांदे, वि.स.स यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली** लक्षवेधी सूचना क्र. २३१८ पुढीलप्रमाणे आहे :-

"देशासह राज्यात सक्तीने धर्मातर केले जात असणे, पुणे जिल्ह्यातील धानोरी तालुक्यातील कळवड येथे ३२ वर्षीय महिलेला घरात डांबून ठेवून बलात्कार केल्याची धक्कादायक घटना समोर येणे, धर्मातरासाठी यापूर्वी देखील अनेक हिंदू महिलांवर बलात्कार झाल्याची बाब देखील समोर येणे, तसेच याच लोकांवर २०१७ साली बाल तस्करीचा गुन्हा देखील दाखल झालेला असणे, राज्यात सुरू असणारे सक्तीने धर्मांतराचे प्रमाण कमी करण्यासाठी राज्य सरकारने तत्काळ कारवाई करण्याचे असणारे आवश्यकता, राज्यात प्रभावी धर्मातर बंदी कायदा लागू करण्याची असणारी गरज, याबाबत विविध संघटनांकडून वारंवार आंदोलन करण्यात येऊन देखील राज्य शासनाचे होत असणारे दुर्लक्ष, राज्यात पसरलेले अवैध्य व बेकायदेशीर प्रार्थना स्थळांचे जाळे, सदर बेकायदेशीर प्रार्थना स्थळांना उध्वस्त करण्यासाठी करावयाची कार्यवाही, शासनाचे सदर बेकायदेशीर प्रार्थना स्थळांकडे होत असणारे दुर्लक्ष त्यामुळे हिंदू समाजामध्ये निर्माण झालेली असुरक्षिततेची भावना, याबाबत शासनाने तत्काळ करावयाची कार्यवाही व उपाययोजना. "

---

**मा. मुख्यमंत्री (गृह) यांचे निवेदन**

राज्यात सक्तीने/फसवणूक करुन बलात्कार व धर्मातर केलेबाबत विविध ठिकाणी गुन्हे दाखल झालेले आहे. पोलीस आयुक्त, पुणे शहर यांचे कार्यक्षेत्रातील पुणे जिल्हा धानोरी गांव, कलवड वस्ती येथे माहे एप्रिल २०२४ ते दि.०२/०१/२०२५ या दरम्यान फिर्यादी यांना आरोपी १ ते ३ यांनी संगणमत करुन ख्रिश्चन धर्मात धर्मातंर करण्यासाठी प्रोत्साहित करुन घरामध्ये डांबुन ठेवुन डोक्यात बंदुक लावून मारण्याची धमकी देऊन बलात्कार केला व देव्हा-यातील देवांची तोडफोड केली म्हणुन विमानतळ पोलीस स्टे. गु.र.नं. ५१/२०२५ भारतीय न्याय संहिता २०२३ कलम ७० (१),६४ (२) (m), १२६(२), १२७ (३), २९९, ११५ (२) (३)३ (५) आर्म ॲक्ट कलम ३/२५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुणे शहर पोलीस आयुक्तालच्या सन २०१७ ते आजपर्यंतचा आरोपींचा अभिलेख तपासला असता, त्यामध्ये विमानतळ पो.स्टे. येथे गु.र.नं.५१/२०२५ मधील आरोपींवर बाल तस्करीचा गुन्हा दाखल नसल्याचे आढळून आले आहे. राज्य सरकारने लव्ह जिहाद व फसवणूक करुन किंवा बलपूर्वक केलेले धर्मातरण रोखण्याच्या अनुषंगाने कायदेशीर बाबीचा अभ्यास करण्यासाठी दि.१४/०२/२०२५ रोजीच्या शासन निर्णयान्वये पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य यांच्या अध्यक्षतेखाली ७ सदस्यांची विशेष समिती गठीत करण्यात आली आहे.

स्थानिक स्वराज्य संस्था, सार्वजनिक बांधकाम विभाग, पुरातत्व खाते कार्यालयाकडून अवैध व बेकायदेशीर स्थळांचे निष्कासन करण्याकरिता पोलीस बंदोबस्ताची मागणी करताच पुरेसा बंदोबस्त संबंधीत घटक कार्यालयाकडून पुरविण्यात येतो. राज्य शासनाकडून अनाधिकृत प्रार्थनास्थळाबाबत नियमानुसार वेळोवेळी आवश्यक ती कार्यवाही केली जाते.

******************************

## सन २०२५ चे अर्थसंकल्पिय अधिवेशन

**श्री.मंगेश कुडाळकर, मा.विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम-१०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्र.१८१८ पुढीलप्रमाणे आहे :-**

"कुर्ला (पूर्व) नेहरूनगर म्हाडा वसाहतीमध्ये पोलीस कर्मचाऱ्यांच्या १९ इमारती जीर्ण अवस्थेत असणे, सदर इमारतींच्या पुनर्विकासाबाबत तत्कालीन मुख्यमंत्री व गृहनिर्माण मंत्री यांना वारंवार पत्रव्यवहार होत असणे, पोलीस कर्मचाऱ्यांना त्यांच्या हक्काची घरे मिळण्याची पोलीस पत्नींकडून मागणी होत असणे, सदर पत्र व्यवहाराच्या अनुषंगाने शासनाने गृहनिर्माण विभागाला तसेच म्हाडा प्राधिकरणास पुनर्विकासाबाबतचा प्रस्ताव सादर करण्यास सांगणे, माननीय उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्यामार्फत पुनर्विकासाबाबतचा प्रस्ताव शासनाकडे सादर होणे, परंतु या प्रस्तावास गृह विभाग तसेच गृहनिर्माण विभाग यांची संयुक्त बैठक होऊन निर्णयाच्या प्रतीक्षेत असणे, पोलीस कर्मचाऱ्यांना माफक दरात स्वतःच्या हक्काची घरे उपलब्ध होण्याच्या दृष्टीने विचार करण्याची गरज असणे, यावर शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

---

### मा. उप मुख्यमंत्री (गृहनिर्माण) यांचे निवेदन

बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील म्हाडाच्या १७ वसाहतींमध्ये पोलीस विभागास एकूण ४७२५ सदनिका वितरीत करण्यात आल्या आहेत. सदर १७ वसाहतींमध्ये नेहरू नगर, कुर्ला येथील म्हाडा वसाहतीतील १९ इमारतींमधील एकूण ५८० सदनिकांचा समावेश आहे. सदर सदनिका ह्या २२५ चौ. फूट ते ४२० चौ. फूट चटई क्षेत्रफळाच्या आहेत.

म्हाडा अभिन्यासातील १७ पोलिस वसाहतींच्या पुनर्विकास प्रकल्पाची पार्श्वभूमी व अद्यापपर्यंतची कार्यवाही खालीलप्रमाणे आहे:-

उपाध्यक्ष म्हाडा यांचे समवेत पोलीस सहआयुक्त, मुंबई यांची दि.२७.१०.२०२३ रोजी संयुक्त बैठक घेण्यात आली. सदर बैठकीत पुनर्विकासानंतर पोलिसांची निवासस्थाने एकत्रितरीत्या काही वसाहतींमध्ये पुरविणे, प्रस्तावित सदनिकांची संख्या व चटई क्षेत्रफळ, पोलीस विभागाकडून म्हाडास देय असलेल्या प्रलंबित शूल्कांबद्दल प्रस्ताव शासनास सादर करणे या ठळक मुद्यांवर चर्चा करण्यात आली. सदर बैठकीत झालेल्या चर्चेच्या अनुषंगाने उपाध्यक्ष म्हाडा यांनी दि.०१.१२.२०२३ च्या पत्रान्वये गृह विभागास प्रस्ताव सादर केला.

तद्नंतर पोलीस सेवानिवासस्थानांच्या पुनर्विकासासंदर्भात दि.२८.१२.२०२३ रोजी तत्का. मा. उप मुख्यमंत्री (गृह) यांच्या अध्यक्षतेखालील बैठक पार पडली व सदर बैठकीच्या अनुषंगाने गृह विभागाच्या दि.०२.०१.२०२४ रोजीच्या पत्रान्वये खालील बाबींना गृह विभागाची सहमती दर्शविण्यात आली आहे:-

१) बृहन्मुंबई म्हाडाच्या वसाहतीमधील २७ पोलीस वसाहतीपैकी १७ वसाहतीचा प्रारंभिक तत्वावर पुनर्विकास म्हाडामार्फत वि.नि. व प्रो.नि. २०३४ मधील विनियम ३३ (५) च्या तरतुदीनुसार करण्यात येईल.

[पुढे]

२)  सदर १७ वसाहतीमधील अस्तित्वातील एकूण ४७२५ सेवा निवास्थानाच्या बदल्यात पुनर्विकास इमारतीमध्ये पोलीस विभागाला ४५ चौ.मी. चटई क्षेत्रफळाच्या ४२२५ सदनिका तर ६० चौ.मी. चटई क्षेत्रफळाच्या ५०० सदनिका म्हाडामार्फत उपलब्ध करून दिल्या जातील.

३)  सदर प्रकल्पाची तांत्रिक व आर्थिक व्यवहार्यता तपासण्यासाठी नियोजन समंत्रकाची (PMC) नेमणूक करण्याबाबतची कार्यवाही म्हाडा स्तरावर सुरु आहे.

४)  पुनर्विकासानंतर तयार होणाऱ्या नवीन इमारतींचा भाडेपट्टा करारनामा / विक्री करारनामा पोलीस विभागासोबत करताना मुद्रांक व नोंदणी शुल्काची रक्कम पोलीस विभागामार्फत भरणा होणे अपेक्षित आहे.

५)  तथापि, पोलीस विभागाकडून म्हाडास देय असलेले पाणी वापर शुल्क, मालमता कर, भूभाडे, प्रशासकीय खर्च, अकृषी कर, इत्यादि शुल्क व तसेच पंतनगर येथील पोलीस विभागाकरीता राखीव असलेल्या भूखंडाच्या किंमतीपोटीची रक्कम माफ करणेबाबत मा. उप मुख्यमंत्री (गृह) यांनी दि.२८.१२.२०२३ रोजीच्या बैठकीमध्ये निर्देश दिले आहेत. त्यानुसार कार्यवाही करण्यात यावी.

सदर प्रकल्पाअंतर्गत म्हाडामार्फत ४५ चौ.मी. (सुमारे ४८४ चौ.फुट) क्षेत्रफळाच्या ४२२५ तसेच ६० चौ.मी. (सुमारे ६४६ चौ.फुट) क्षेत्रफळाच्या ५०० सदनिका अशा एकूण ४७२५ सदनिका पोलिस विभागास विनामूल्य बांधून देण्याचे प्रस्तावित आहे. पोलिस विभागाच्या विनंतीनुसार सदर सदनिका ह्या काही वसाहतींमध्ये एकत्रितपणे मोठ्या वसाहतींच्या स्वरूपात हस्तांतरीत करण्याचे प्रस्तावित आहे. सदर पुनर्वसन सदनिकांसाठी लागणाऱ्या खर्चाचे समायोजन उर्वरीत भूखंडांवरील विक्री घटकातून करण्याचे नियोजित आहे. प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार (PMC) नेमणूक करण्यासाठी निविदा प्रक्रिया राबविण्यात आली असून प्रकल्प व्यवस्थापन सल्लागाराची नेमणूक करण्याची कार्यवाही म्हाडा स्तरावर सुरु आहे. सद्यस्थितीत सदर प्रकल्पाची व्यवहार्यता तपासणे, अंदाजपत्रके, आराखडे, निविदा प्रपत्र तयार करणे इत्यादी बाबींविषयी म्हाडामार्फत कार्यवाही प्रगतीपथावर आहे.

म्हाडाच्या नेहरू नगर कुर्ला येथील पोलिस विभागाच्या इमारतींच्या पुनर्विकासाबद्दल स्थानिक लोकप्रतिनिधी यांचेमार्फत दि.०६.०८.२०२४ रोजी तत्का. मा. मुख्यमंत्री महोदय यांना पत्रव्यवहार करण्यात आला आहे. सदर पत्रात स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी, नेहरू नगर कुर्ला येथील इमारतींचा पुनर्विकास झाल्यानंतर त्यामधून पोलिस वसाहतीकरिता राखीव असलेल्या सदनिका सोडून नव्याने उपलब्ध होणाऱ्या सदनिका पोलिस कर्मचाऱ्यांना माफक दराने मिळाव्यात अशी स्थानिक पोलिस रहिवाश्यांची मागणी असल्याचे नमूद केले आहे. सदर पत्राच्या अनुषंगाने तपासून प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश तत्का. मा. मुख्यमंत्री यांनी म्हाडास दिले आहेत.

म्हाडा अभिन्यासातील पोलीस विभागास वितरीत करण्यात आलेल्या सेवा निवासस्थानांचा पुनर्विकास झाल्यानंतर पुनर्विकासाअंतर्गत म्हाडामार्फत पोलिस विभागास देण्यात येणाऱ्या सदनिका या पोलिसांना मालकी तत्वावर अथवा भाडेतत्वावर वितरीत करणे अथवा माफक दरात पोलिस कर्मचाऱ्यांना विक्री करणे याबाबतचा निर्णय हा गृह विभाग (पोलिस विभाग) यांच्या स्तरावर होणे अपेक्षित आहे.

*-*-*-*-*-*

H-0006-1A

# महाराष्ट्र विधानसभा

<u>सन २०२५ चे अर्थसंकल्पीय अधिवेशन</u> <u>लक्षवेधी सूचना क्र. ७५६</u>

## <u>लक्षवेधी सूचना</u>

**श्री.हेमंत रासने, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम-१०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्रमांक ७५६ पुढीलप्रमाणे आहे :-**

"कसबा मतदारसंघ हा पुणे शहराच्या मध्यवर्ती भागात असून, ऐतिहासिक आणि सांस्कृतिक दृष्टिकोनातून अत्यंत महत्त्वाचा असून येथे अनेक जुने वाडे व झोपडपट्ट्या आहेत, जे सध्या पुनर्विकासाच्या प्रतीक्षेत असणे, मात्र, सध्याच्या धोरणांमधील अडथळयांमुळे हे प्रकल्प रखडलेले असून, नागरिक मूलभूत नागरी सुविधांपासून वंचित असणे, वाड्यांचे बांधकाम अत्यंत जीर्ण अवस्थेत असून रहिवाशांचे जीवित धोक्यात असणे,विद्यमान नियमांतील तांत्रिक अडथळयांमुळे पुनर्विकास प्रक्रियेत विलंब होत असणे, ठाणे व मुंबईतील धोरणांच्या धर्तीवर पुण्यासाठी स्वतंत्र व सुधारित धोरणाची तातडीने आवश्यकता असणे, झोपडपट्टी पुनर्विकासाची प्रक्रिया अत्यंत संथ आहे, ज्यामुळे नागरिक मूलभूत सुविधांपासून वंचित असणे, प्रशासकीय मंजुरी प्रक्रिया सुलभ करून प्रकल्पांच्या अंमलबजावणीत गती आणणे आवश्यक असणे,पुनर्विकास प्रक्रियेत पारदर्शकता व गतीसाठी धोरणात्मक सुधारणा करणे आवश्यक असणे, रहिवाशांच्या हितासाठी विशेष सवलती व प्रोत्साहनपर तरतुदी करण्याची गरज, पुण्यासाठी स्वतंत्र गृहनिर्माण व पुनर्विकास धोरण ठरवण्यासाठी तज्ज्ञ समिती गठीत करणे आवश्यक असणे,पुण्यातील वाडे पुनर्विकास धोरणावर चर्चा करण्यासाठी उच्चस्तरीय बैठक बोलविण्याची आवश्यकता,सध्याच्या नियमांमधील अडथळे दूर करून पुनर्विकास प्रकल्पांना गती देण्यासाठी आवश्यक सुधारणा त्वरीत मंजूर कराव्यात तसेच पुण्यासाठी स्वतंत्र गृहनिर्माण व पुनर्विकास धोरण ठरवण्यासाठी तज्ज्ञ समिती स्थापन करण्यात यावी, याबाबत शासनाची प्रतिक्रिया."

---

## <u>मा. उप मुख्यमंत्री (गृहनिर्माण) यांचे निवेदन</u>

महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ चे कलम ३ (१) (२) अन्वये पुणे व पिंपरी-चिंचवड महानगरपालिका क्षेत्राकरिता दिनांक ३०/०६/२००५ च्या अधिसूचनेद्वारे झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे व पिंपरी - चिंचवड क्षेत्र, पुणेची नियुक्ती करण्यात आली आहे.

उपरोक्त अधिनियमाच्या कलम ४ (१) व कलम ३ (क) नुसार अनुक्रमे गलीच्छ वस्ती घोषित करणे व झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र घोषित करणे या संदर्भात विहित कार्यवाही करण्यात येते.

झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे व पिंपरी-चिंचवड क्षेत्र, पुणे यांच्या अंतर्गत पुणे महानगरपालिकेतील एकूण २८१ योजना असून, कसबा विश्रामबाग क्षेत्रात एकूण ४४ योजना राबविण्यात येत आहे.

झोपडपट्टी पुनर्वसन योजनांच्या गतीवर खालील कारणांमुळे सामान्यत: परिणाम होतो :

a) योजना राबवतेवेळी झोपडीधारकांचा सर्व सहमतीने विकसक निश्चित करणे व संक्रमण व्यवस्था मान्य करणे या बाबीवर एकमत नसते.

b) योजनेतील अपात्र होणाऱ्या आणि दुमजली पक्क्या घरात राहणाऱ्या झोपडीधारकांचा योजनेस विरोध होतो.

c) खाजगी मालकीच्या झोपडीव्याप्त जमिनीच्या विक्रीबाबत जमीनमालक व विकासक यांचेमध्ये सहमती होण्यास विलंब होतो. अशा प्रकरणी भूसंपादन करणेसाठीची प्रक्रिया अतिशय दीर्घकालीन आहे.

d) जुन्या झोपडीव्याप्त जागांबाबत अत्यल्प प्रमाणात खरेदी-विक्री व्यवहार होत असल्याने, तेथील वार्षिक मूल्य तक्त्यामधील जमिनीचे दर कमी आहेत व त्यामुळे तेथील योजनांची व्यवहार्यता कमी असल्याने विकसक जमीन मालकांशी व्यवहार करण्यास उत्सूक राहत नाही.

e) पुण्यातील योजना या खुल्या विक्री घटकाऐवजी हस्तांतरणीय विकास हक्कावर अवलंबून आहेत व टि.डी.आर. दरामध्ये बाजारात वेळोवेळी होणारे बदल होत असल्याने विकासकामार्फत योजना मुदतीत पुर्ण करण्यास विलंब होतो.

झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविताना येणाऱ्या अडचणी दूर होण्याच्या दृष्टीने आणि त्यांच्या कार्यक्षेत्रातील झोपडपट्टी क्षेत्रांचा विकास व्हावा आणि भविष्यात झोपडपट्टी पुनर्विकासाला चालना मिळण्याच्या दृष्टीने शासनाने विकास नियंत्रण नियमावलीत सुधारणा करुन झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण (पुणे व पिंपरी-चिंचवड क्षेत्र) पुणेसाठी शासनाने नविन "विकास नियंत्रण नियमावली, २०२२" काही बदलांसह दि. ०५/१२/२०२३ च्या अधिसुचने अन्वये मंजूर केली आहे. सदर नियमावलीचा समावेश "यूडीसीपीआर" मधील विनियम क्र.१४.६ मध्ये केला आहे.

नविन विकास नियंत्रण नियमावली लागू केली असल्यामळे विकसकांच्या बहुतांश मागण्या पुर्ण झाल्या आहेत व योजनेसाठी चालना मिळाली आहे.

झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणामार्फत आजपर्यंत ७२ योजनांमधील पुनर्वसन पुर्ण झाले असून, १२२०९ झोपडीधारकांना सदनिकांचे वाटप झाले आहे व योजनांना गती मिळालेली आहे.

**********

## महाराष्ट्र विधानसभा

सन २०२५ चे पहिले (अर्थसंकल्पिय) अधिवेशन

श्री.किसन कथोरे, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम-१०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्र.३८५ पुढीलप्रमाणे आहे:-

"कुळगाव बदलापूर नगरपरिषदेच्या प्रशासकीय प्रमुखांनी प्रशासकीय राजवटीत आपल्या प्रशासकीय अधिकाराचा गैरवापर अमर्यादितपणे करून सन २०२० ते २०२४ या कालावधीत नगरपरिषद अधिनियमांचे पालन न करता व जिल्हाधिकारी यांची प्रशासकीय मान्यता न घेता १० लक्ष रुपयांची २००० पेक्षा जास्त प्रशासकीय ठराव, स्थापत्य कामे, विद्युत कामे मंजूर करून नगर परिषदेच्या निधीतून २०० कोटी रुपयांचा भ्रष्टाचार केलेला असणे, हीच कामे पुन्हा शासनाच्या वेगवेगळया योजनांमधून केल्याचे निदर्शनास येणे, नगरोथान, दलित वस्ती, वैशिट्य पूर्ण योजना, रस्ते अनुदान व एम एम आर डी ए च्या बाह्य रस्ते विकास निधीतून दाखवून डुप्लिकेट कामे दाखवून दोन दोन वेळेला बिले काढून नगर परिषदेच्या व राज्य शासनाच्या करोडो रुपयांची लूट केलेली असणे, या सर्व कामांची सक्षम तांत्रिक व लेखा यंत्रणेमार्फत चौकशी करण्यासाठी एसआयटीची स्थापना करून सखोल चौकशी करण्याची गरज व अत्यावश्यकता असणे, याबाबत शासनाने करावयाची व करण्यात येणारी तातडीची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

### मा.उप मुख्यमंत्री (नगर विकास) यांचे निवेदन

कुळगांव बदलापुर नगरपरिषद हद्दीत सन २०२० ते २०२४ या कालावधीत महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान, वैशिष्ट्यपुर्ण योजना, एम.एम.आर.डी.ए.च्या बाह्य रस्ते विकास, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी वस्ती सुधार योजना, रस्ते विकास योजना अशा विविध योजनांमधून स्थानिक लोकप्रतिनिधी व नागरीकांनी विविध विकास कामे करुन मिळणेबाबत मागणी केली होती. त्यानुसार कामांची स्थळ पाहणी करण्यात आली. कामांची निकड व अधिनियमातील तरतुदीनुसार नगरपरिषदेचे तांत्रिक सल्लागार यांचेमार्फत अंदाजपत्रके/ नकाशे तयार करुन त्यास सक्षम प्राधिकरणाची तांत्रिक/ प्रशासकीय मंजुरी प्राप्त झाल्यानंतर विहित निविदा प्रक्रिया राबवून कामांचे कार्यादेश देण्यात आले. ज्या कामांना जिल्हाधिकारी यांची प्रशासकीय मंजुरी घेणे आवश्यक होते, अशा कामांना प्रशासकीय मंजुरी घेऊन कामे करण्यात आली आहेत.

कार्यादेश दिलेली कामे पूर्ण झाली असून सदर कामांकरीता वापरण्यात आलेल्या बांधकाम साहित्याची गुणवत्ता चाचणी देखील करण्यात आली आहे. रु.२५ लक्ष पेक्षा अधिक रकमेच्या कामांचे त्रयस्थ तांत्रिक लेखापरीक्षण करण्यात आले असून रु.१० लक्ष पेक्षा कमी किंमतीच्या कोणत्याही कामांची दुबार देयके अदा करण्यात आलेली नाहीत.

******

# महाराष्ट्र विधानसभा

सन २०२५ चे पहिले (अर्थसंकल्पिय) अधिवेशन

डॉ.विश्वजित कदम, सर्वश्री.नानाभाऊ पटोले, अमिन पटेल, अस्लम शेख, अमित झनक, डॉ.नितिन राऊत, सर्वश्री विकास ठाकरे, संजय मेश्राम, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम-१०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्र.१८७५ पुढीलप्रमाणे आहे:-

"सांगली, मिरज, कुपवाड महापालिकांनी नवीन वाढीव घरपट्टीच्या मागणी नोटीसा नागरीकांना बजावल्या असून ही बिले अवास्तव आणि अन्यायकारक असल्याचे माहे फेब्रुवारी, २०२५ च्या शेवटच्या आठवडयात निदर्शनास येणे, याबाबत नागरीकांमध्ये रोष असणे, येथे घरपट्टीचे दरपत्रक २००३-०४ मध्ये लागू करण्यात आले असून ते मान्य करताना महासभेची मान्यता घेतलेली नसणे, अशा दरपत्रकानुसार आजपर्यंत घरपट्टी अकारली जाणे, ही अन्यायकारक असणे, त्यामुळे यातील संपूर्ण टक्केवारी, कर हिस्सा आणि त्यानुषंगाने धोरण याबाबत सर्वकष विचार व्हावा व त्यानुसार नवे कर धोरण अंमलात आणावे, अशी मागणी होत असणे, तसेच सांगली येथील ड्रेनेज योजना २०१२ मध्ये मंजूर होऊन दि.३१ डिसेंबर, २०२५ पर्यंत पूर्ण करण्याची हमी शासनाने घेणे, पण २०२५ वर्ष उजाडले तरी अद्याप ड्रेनेज योजना कार्यान्वित झालेली नसणे, याशिवाय सांगली महापालिका क्षेत्रातील १५ रस्ते मुदतपूर्वीच खराब होणे, येथे रस्ते डांबरीकरणावर मोठा खर्च होणे, मात्र दीड-दोन वर्षातच रस्ते खराब होण्याचे मोठे प्रमाण दिसून येणे, त्यामुळे नागरीकांच्या तक्रारी वाढणे, येथील महापालिका क्षेत्रात अनेक समस्या असतानाही शासन करीत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी राज्यातील जनतेत पसरलेले असंतोषाचे वातावरण व नाराजीची भावना, सबब शासनाने याबाबत करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

## मा.उप मुख्यमंत्री (नगर विकास) यांचे निवेदन

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका हद्दीतील सर्व मालमत्तांना (सर्व खुल्या जागा व इमारती) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतूदीनुसार मालमत्ता कर आकारणी केली जाते. नव्याने निर्माण झालेल्या मालमत्ता तसेच वाढीव बांधकाम किंवा वापर बदल झालेल्या मालमत्ता यांचे सर्वेक्षण करणे आवश्यक असल्याने, तसेच महानगरपालिकेला मुलभूत सेवा सुविधा देण्यासाठी महसुली उत्पन्नात वाढ होणे गरजेचे असल्याने महानगरपालिका हद्दीतील सर्व मालमत्तांचे सर्वेक्षण हाती घेण्यात आले आहे. महानगरपालिकेकडील अपुरे मनुष्यबळ विचारात घेता हे काम खाजगी यंत्रणेमार्फत पूर्ण करण्यात आले आहे. ज्या मालमत्तांचे सर्वेक्षण पूर्ण झालेले आहे अशा मालमत्तांना अधिनियमातील तरतूदीनुसार नोटीसा बजावण्यात आल्या असून मालमत्ताधारकांना आक्षेप नोंदविणे, सुनावणी घेणे आणि सुनावणीअंती करयोग्य मुल्य निश्चित करणे यासाठी कराधान नियमातील तरतूदीनुसार वैधानिक कार्यवाही करण्यात येत आहे.

मालमत्ता करांचे दर ठरविण्याचे अधिकार महानगरपालिकेस आहेत. यापूर्वी मालमत्ता करांचे दर सन २००३-०४ या आर्थिक वर्षामध्ये लागू केले असून त्यानंतर महानगरपालिकेने कोणतीही दरवाढ केलेली नाही. कराधान नियमानुसार कर आकारणी सुधारणा करणे आवश्यक असल्याने मोजमापांची खातरजमा व सुधारणा करण्यात आली आहे. मोजमापात तफावत आढळलेल्या मालमत्तांच्या बाबतीत करयोग्य मूल्यांत वाढ झाली असून असे करयोग्य मूल्य बांधकामात बदल, वापरात बदल किंवा नियम २० मध्ये नमूद केलेल्या इतर बाबींमुळे झाली आहे. उक्त कार्यवाही अधिनियमातील तरतूदीनुसार करण्यात आली असून असे करतांना करांचे दर किंवा करयोग्य मूल्य निश्चित करण्यासाठी तयार करण्यात आलेल्या निकषात कोणतेही बदल करण्यात आलेले नाहीत.

महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान योजनेअंतर्गत मंजूर असलेली सांगली भुयारी गटार योजना टप्पा क्र.२, भाग-२ व मिरज भुयारी गटार योजनेचे काम विहित कार्यपध्दतीनुसार नियुक्त केलेल्या मे.एस.एम.सी इन्फ्रा.प्रा.लि., ठाणे यांच्याकडून सुरु असून महाराष्ट्र जीवन प्राधिकरण हे प्रकल्प व्यवस्थापक सेवा सल्लागार म्हणून काम करत आहेत. सदर योजनेंतर्गत सांगली येथील अंकली रोड व पद्माळे रोड पंपींग स्टेशनची जागा, तसेच मिरज येथील वखारभाग पंपींग स्टेशनची जागा मिळण्यास विलंब झाल्याने, त्याचप्रमाणे सन २०१९ व २०२१ चा महापूर, कोव्हीड कालावधी, नागरीकांचा लाईन टाकण्यासाठी झालेला विरोध, रेल्वे व सार्वजनिक बांधकाम विभाग यांच्याकडून परवानगी मिळण्यास लागलेला कालावधी यामुळे कामास विलंब झालेला आहे. सद्यस्थितीत सांगली शहरातील ८५% काम पूर्ण झाले असून २३ एमएलडी क्षमतेचे मलशुध्दीकरण केंद्र प्रकल्प कार्यान्वित करण्यात आले आहे. तसेच मिरज शहरातील ९५% काम पूर्ण झाले असून मिरज वड्डी येथील २२.५ एमएलडी क्षमतेचे मलशुध्दीकरण केंद्र प्रकल्प कार्यान्वित करण्याच्या दृष्टीने चाचणी सुरु आहे. उर्वरित कामे निधी प्राप्त होताच पूर्ण करण्याचे महानगरपालिकेचे नियोजन आहे.

सांगली मिरज आणि कुपवाड महानगरपालिकेअंतर्गत ४ प्रभाग समिती आहेत. मोठ्या प्रमाणात झालेल्या पर्जन्यवृष्टी, पुरपरिस्थिती यासोबतच अनेक ठिकाणी जल निस्सारण व्यवस्था नसल्याने काही प्रमाणात रस्ते खराब झाले होते. दोषदायित्व कालावधीत खराब झालेले १५ डांबरी रस्ते पावसाळा संपल्यानंतर संबंधित कंत्राटदाराकडून त्यांच्या स्वखर्चाने दुरूस्त करून घेण्यात आले आहेत.

******

## महाराष्ट्र विधानसभा

## सन २०२५ चे पहिले (अर्थसंकल्पीय) अधिवेशन

मा.श्री.महेश बालदी, श्री.प्रशांत ठाकूर, श्री.अमित साटम, श्रीमती मनिषा चौधरी, श्री.समीर कुणावार, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम-१०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्र.२१०३ पुढीलप्रमाणे आहे :-

"नवी मुंबई प्रकल्पाकरिता सिडको प्रशासनाने ९५ गावातील शेतक-यांच्या हजारो एकर जमिनी १९८० साली संपादित केल्या असणे, सिडकोने विकसित केलेल्या क्षेत्रात संपादित जमिनीच्या १२.५ टक्के जमिन देण्याचा शासनाचा निर्णय झाला असणे, सदर निर्णय होवून जवळपास ४० ते ४५ वर्षाचा कालावधी होवून सुध्दा करंजाडे, द्रोणागिरी नोड येथील सिडकोने अद्याप पर्यंत बहुतांशी प्रकल्पग्रस्त शेतक-यांना १२.५० टक्के योजनांअंतर्गत भूखंडाचे वाटप केले नसणे, प्रकल्पग्रस्त शेतक-यांना देण्यासाठी भूखंड शिल्लक नसल्याचे कारण सिडको प्रशासन देत असणे, दुसरीकडे चाणजे, मातिवली, बेलोंडाखार येथील अविकसित क्षेत्र खरेदी केलेल्या नवी मुंबई येथील बिल्डरांना व व्यावसायिक यांना आर्थिक लाभासाठी उलवे येथे तातडीने शासनाच्या नवीन परिपत्रकाप्रमाणे २२.५० टक्के भूखंडाचे वाटप करत असणे, उक्त प्रकल्पासाठी शेतक-यांनी आपल्या शेतजमिनी देऊन आपले रोजगाराचे साधन कायमस्वरूपी गमावले असणे, प्रकल्पग्रस्त शेतक-यांना न्याय देण्याच्या दृष्टीने सहा महिन्यात १२.५० टक्के भूखंड वाटप करण्याचे आश्वासन सिडको किंवा जेएनपीटीकडून देण्यात आले असणे, परंतु आजतागायत प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनासाठी सिडको व जेएनपीटी प्रशासनाने आजतागायत कोणतीच ठोस कार्यवाही न केल्यामुळे शेतकरी व नागरिकांमध्ये सिडको व जेएनपीटी प्रशासनाच्या विरोधात प्रचंड चिड निर्माण झाली असणे, याबाबत शासनाने सिडको व जेएनपीटी प्रकल्पग्रस्त शेतक-यांना १०० टक्के १२.५० टक्के भूखंड वाटप तातडीने करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना"

---

## मा.उपमुख्यमंत्री (नगर विकास) यांचे निवेदन

नवी मुंबई प्रकल्पासाठी सिडको महामंडळाची "विशेष नियोजन प्राधिकरण" म्हणून तसेच महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ च्या कलम ११३(१) नुसार दि.२०.०३.१९७१ रोजीच्या अधिसूचनेन्वये "नवनगर विकास प्राधिकरण" म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. नवी मुंबई प्रकल्पासाठी ठाणे व रायगड जिल्ह्यातील एकूण ९५ गावे अधिसूचित करण्यात आली आहेत. सदर जमिनीपैकी खाजगी जमिनी भूसंपादन अधिनियम, १८९४ अंतर्गत संपादित करण्यात आल्या आहेत. दरम्यान, शासन निर्णय दि.०६.०३.१९९० व दि.२८.१०.१९९४ अन्वये नवी मुंबई प्रकल्पासाठी संपादित जमिनीच्या बदल्यात जमीन मालकांना १२.५% विकसित भूखंड वाटप योजना लागू करण्यात आली आहे. तसेच दि.०१.०३.२०१४ व दि.२८.०२.२०१८ रोजीच्या शासन निर्णयानुसार नवी मुंबई प्रकल्पांतर्गत राबविण्यात येणाऱ्या विविध विकास प्रकल्पांसाठी खाजगी जमिनीच्या संपादनासाठी २२.५ % विकसित भूखंड योजना लागू करण्यात आली आहे.

उरण तालुक्यातील (द्रोणागिरी नोड) एकूण १६१८ संचिकाधारकांच्या संपादित जमिनीच्या बदल्यात अंदाजित १३५.३५ हे.आर. क्षेत्राचे भूखंड वाटप करणे आवश्यक आहे. त्यापैकी एकूण १०२.९३ हे.आर. क्षेत्रफळाचे भूखंड १२.५% योजनेअंतर्गत संबंधित प्रकल्पग्रस्तांना वाटप करण्यात आले आहेत.

उर्वरित ३२.४२ हे.आर. क्षेत्राच्या भूखंड वाटपांतर्गत एकूण ४७३ भूखंड वाटपासाठी प्रस्तावित असून ३१८ भूखंड नवीन पात्रता धारकांसाठी व १५५ भूखंड हे पुनर्वाटपासाठी (विकासनास अयोग्य असल्याने बदलून देणे) आहेत व त्यासाठी सिडकोकडे उपलब्ध भूखंड व आरेखित केलेल्या भूखंडाचे क्षेत्र विचारात घेऊन संगणकीय सोडत घेण्याचे प्रस्तावित आहे. तसेच करंजाडे नोडमधील एकूण ६४५ संचिकाधारकांचे संपादित जमिनीच्या बदल्यात अंदाजित ५७.९६ हे.आर. क्षेत्राचे भूखंड वाटप करणे आवश्यक असून त्यापैकी एकूण ५६.५८ हे.आर. क्षेत्रफळाचे भूखंड १२.५% योजनेअंतर्गत वाटप करण्यात आले आहेत. उर्वरीत १.३८ हे. आर क्षेत्रापैकी ९५०० चौ.मी. क्षेत्राकरीता सद्यस्थितीत भूखंड वाटपाअंतर्गत १६ भूखंड वाटप करण्याचे प्रस्तावित आहे.

दरम्यान, १२.५ % योजनेअंतर्गत विकसित भूखंडाचे वाटप करण्यासाठी आवश्यक असणा-या जमिनीसाठी नव्याने संपादनासाठी सुमारे ३६४.२३ हे.आर. क्षेत्रासाठी मौजे- चाणजे, रानवड, बोकडविरा, पागोटे, नागांव, नवघर, फुंडे या गावांतील खाजगी जमिनीचे महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम १२६ अन्वये अधिसूचना दि.१२.१०.२०२२ रोजी प्रसिध्द करण्यात आली आहे. त्यानुसार सिडकोमार्फत जमीन उपलब्ध करण्याची कार्यवाही सुरु आहे. तथापि, भूसंपादनास असणारा स्थानिक ग्रामस्थांचा विरोध, भूसंपादनास सलग क्षेत्र न मिळणे, भूसंपादनास शेतकऱ्यांची संमती न मिळणे, कौटुंबिक न्यायालयीन प्रकरणे, १२.५% योजनेसाठी आरेखित भूखंडावर प्रकल्पग्रस्तांनी गरजेपोटी केलेली बांधकामे, कांदळवने व सीआरझेडमुळे प्रतिबंधित क्षेत्र, पायाभूत सुविधा उपलब्ध नसणे इ. कारणांमुळे भूसंपादन प्रक्रियेस विलंब होत आहे.

माहे एप्रिल २०२३ अखेरपर्यंत २२.५% विकसित भूखंड योजनेअंतर्गत संगणकीय सोडतीद्वारे पुष्पक नोड येथे एकूण २०७ भूखंड (क्षेत्र ३४.७३ हे.आर.) इरादित करण्यात आले आहेत. प्रलंबित भूखंडासाठी खाजगी जमिनीच्या संपादनासाठी जमीनधारकांची संमती प्राप्त करण्यात येत असून त्यानुसार संमती निवाडे घोषित करणे, संगणकीय सोडतीद्वारे भूखंड वाटप करणे व तद्नुषंगिक कामे सिडको महामंडळ स्तरावर सुरु आहेत.

याव्यतिरिक्त जेएनपीए प्रकल्पासाठी सिडकोने हस्तांतरित केलेल्या जमिनीच्या भूधारकांना १२.५% जमीन वाटप करण्याचा धोरणात्मक निर्णय शासन निर्णय दि.१४.८.२०१४ अन्वये घेण्यात आला आहे. सन २०१६ ते २०१९ या कालावधीत जेएनपीएकडून प्रकल्पग्रस्तांच्या सिडकोस आजतागायत प्राप्त २१२ संचिकापैकी १९० संचिकामध्ये ५ संगणकीय सोडतीद्वारे एकूण १९३ भूखंड इरादीत करण्यात आले आहेत. उर्वरित २२ संचिकांच्या अनुषंगाने संगणकीय सोडतीद्वारे भूखंड इरादित करण्याचे सिडकोमार्फत प्रस्तावित आहे. सदर इरादित केलेल्या भूखंडांबाबत कागदपत्रांची पुर्तता करणेसाठी ग्रामपंचायतींमध्ये जाहिर प्रसिध्दी करुन दि.३.१०.२०२३ ते दि.५.१२.२०२३ या कालावधीत प्रकल्पग्रस्तांसाठी शिबीरे करण्यात आली आहे. १२.५% योजनेंतर्गत जेएनपीए प्रकल्पग्रस्तांस २००० चौ.मी. पात्रतेकरीता (२.० चटई क्षेत्र निर्देशांक) इतक्या क्षेत्राच्या भूखंडाचे वाटप करण्याच्या वेगवेगळ्या कुटुंबातील निवाडाधारक सामंजस्याने एकत्रित येत नसल्याने तसेच कागदपत्रांची पुर्तता जसे न्यायालयीन वारस दाखले, प्रतिज्ञापत्रे, रहिवाशी दाखले, जाबजबाब इत्यादी पुर्तता होत नसल्याने विलंब होत आहे.

***

3e.

२५०९

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२५ चे प्रथम (अर्थसंकल्पीय) अधिवेशन

श्रीमती देवयानी फरांदे, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम-१०५ अन्वये दिलेली

लक्षवेधी सूचना क्रमांक २५०९ पुढीलप्रमाणे आहे :-

"हिंदू हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे समृध्दी महामार्ग हा ७०१ कि. मी. महामार्ग लवकरच पूर्णत्वास येणार असणे, समृध्दी महामार्गाच्या माध्यमातून उत्तर महाराष्ट्रसह विदर्भ मराठवाडा विभागाचा मुंबईकडे येण्याचा मार्ग सुलभ होणे, समृध्दी महामार्ग आमणे (भिवंडी) येथे नाशिक मुंबई महामार्गाला जोडला जाणार असणे, वाढवण बंदर समृध्दी महामार्गाशी जोडण्यासाठी इगतपुरी ते वाढवण बंदर असा द्रुतगती महामार्ग बांधण्यात येणार असणे, वाढवण बंदराच्या इथून देखील वाहतूक नाशिक मुंबई महामार्गाला संलग्न होणे, आमणे ते नरिमन पॉईंट या मार्गावर आजच मोठया प्रमाणावर वाहतूक कोंडी असणे, इगतपुरी ते आमणे (भिवंडी) या समृध्दी महामार्गाच्या टप्प्याचे काम पूर्ण झाल्यानंतर व वाढवण बंदर समृध्दी मार्गाला जोडल्या गेल्यानंतर येणाऱ्या वाहतुकीचा विचार केल्यास नाशिक मुंबई महामार्गावर मोठ्या प्रमाणावर वाहतूक कोंडी निर्माण होण्याचा निर्माण झालेला धोका, यासाठी भविष्यातील वाहतूक समस्या लक्षात घेऊन आमणे येथून फ्रीवेला जोडण्यासाठी रस्ता तयार करण्याची असणारी आवश्यकता, सदर बाबीकडे दुर्लक्ष केल्यामुळे नाशिक मुंबई महामार्गावर वाहतूक खोळंबा होऊन प्रवाशांचे आर्थिक नुकसान होऊन इंधन देखील वाया जाण्याचा निर्माण झालेला धोका, यासाठी तत्काळ अभ्यासगट स्थापन करुन नाशिक मुंबई वाहतूक समस्या दूर करण्यासाठी उपाय-योजना तयार करण्याची असणारी आवश्यकता, शासनाचे सदर बाबीकडे होत असणारे दुर्लक्ष, त्यामुळे नागरिकांमध्ये निर्माण होत असणारी असंतोषाची भावना, याबाबत शासनाने तत्काळ दखल घेऊन करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया"

---

मा.उपमुख्यमंत्री, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) यांचे निवेदन

हिंदू हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे महाराष्ट्र समृध्दी महामार्गाच्या एकूण ७०१ कि.मी. लांबी पैकी नागपूर ते इगतपूरी या ६२५ कि.मी. लांबीचा रस्ता दि.११.१२.२०२२ पासून वाहतुकीसाठी खुला करण्यात आलेला आहे. उर्वरित लांबीतील इगतपुरी ते आमणे (ता.भिवंडी, जि.ठाणे) हा रस्ता माहे मार्च, २०२५ अखेर पुर्ण करण्याचे नियोजन आहे. सदर लांबीतील रस्ता वाहतुकीस खुला झाल्यानंतर, तसेच भविष्यात वाढवण बंदर (जि. पालघर) समृध्दी महामार्गास जोडल्यानंतर आमणे ते वडपे व पुढे वडपे ते ठाणे या रस्त्याने मुंबईकडे जाता येणार आहे.

नाशिक–मुंबई राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ०३ ची ठाणेपर्यंतची एकुण लांबी १४२ कि.मी. असून ती केंद्र शासनाचे भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण यांच्या अखत्यारीत आहे. ठाणे ते नरीमन पॉईंट (मुंबई) हे अंतर ४१ कि.मी. आहे. आमणे ते वडपे ही ४.८० कि.मी. लांबी प्रगतीपथावरील वडोदरा-जेनपीटी महामार्गाचा भाग असून तो ३+३ मार्गिकेचा आहे. वडपे टेकडी पासून पुढे १ कि.मी. चा भाग राष्ट्रीय महामार्गाअंतर्गत येतो. त्यापुढे वडपे ते ठाणे ही एकुण २३.८० कि.मी. लांबीसाठी (मुख्य रस्ता ४+४ मार्गिका व सेवा रस्ते २+२ मार्गिका) दर्जोन्नतीचे काम प्रगतीपथावर असून माहे मे, २०२५ अखेर सदर काम पुर्ण करण्याचे नियोजन आहे.

MMRDA मार्फत "ठाणे ते पडघा दरम्यान राष्ट्रीय महामार्ग ०३ वरील ३० कि.मी.लांबीच्या उन्नत मार्गासाठी तांत्रिक सल्लागारामार्फत व्यवहार्यता अभ्यास व सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्यासाठी दिनांक २३.०७.२०२४ रोजी सल्लागाराची नियुक्ती करण्यात आली आहे. सदर उन्नत मार्ग हा समृध्दी द्रुतगती महामार्ग (आमणे) व मुंबई / ठाणेमधील जोडणीचा महत्वाचा भाग असेल. सद्य:स्थितीत सल्लागारामार्फत अंतिम सविस्तर अहवाल तयार करण्याचे काम प्रगतीपथावर आहे.

रोटा म/०७७५(750-4-25)

८कु.मा.प्र.

पूर्व द्रुतगती महामार्गाचा सुमारे ८.२ कि.मी.लांबीचा भाग (खारेगाव ते आनंदनगर) ठाणे महानगरपालिका क्षेत्रातून जात असून या रस्त्यांवर प्रामुख्याने शहराबाहेरील वाहतूकीसोबतच ठाणे शहरातील अंतर्गत वाहतूक देखील मिसळून जात आहे. त्यामुळे महामार्गावरील भागात मोठया प्रमाणात वाहतूक कोंडी होत आहे. या समस्येवर उपाययोजना करण्यासाठी MMRDA मार्फत खारेगांव ते आनंदनगर, ठाणे या भागात महामार्गावर ३+३ मार्गिकांचा व सुमारे ८.२ कि.मी.लांबीचा उन्नत मार्ग उभारण्याचे काम हाती घेण्यात आले आहे. सदर उन्नत मार्ग आनंद नगर येथे पूर्व मुक्त मार्गाच्या छेडानगर ते आनंदनगर विस्तारीकरण या प्रकल्पास जोडण्यात येणार आहे. सदर काम दिनांक ११.१०.२०२४ रोजी सुरु झालेले असून दिनांक १०.१०.२०२८ पर्यंत पुर्ण करण्याचे नियोजन आहे. सदर प्रकल्प पुर्ण झाल्यानंतर पूर्व द्रुतगती महामार्गावरील वाहतूक खारेगाव ते आनंदनगर या भागात विनाअडथळा होईल.

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत दक्षिण मुंबईतील ऑरेंज गेट ते छेडानगर, घाटकोपर पर्यंत पूर्व मुक्त मार्गाचे काम सन २०१२ मध्ये पूर्ण करण्यात आलेले असून या मुक्त मार्गामुळे दक्षिण मुंबईतील नरिमन पॉईंट, फोर्ट, क्रॉफर्ड मार्केट व अन्य भागांतील वाहतूक विनाअडथळा घाटकोपर पर्यंत येत आहे. सदर वाहतूक घाटकोपर येथे पूर्व द्रुतगती महामार्गास मिळत आहे. पूर्व मुक्त मार्गावरुन आलेल्या वाहतुकीस ठाण्यापर्यंत अशाचप्रकारे विना अडथळा प्रवास करण्याची सुविधा उपलब्ध होण्याच्या उद्देशाने मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत पूर्व मुक्त मार्गाचा छेडानगर, घाटकोपर ते आनंद नगर, ठाणे पर्यंत विस्तार करण्याचा प्रकल्प हाती घेण्यात आला आहे. या प्रकल्पाची लांबी १३.४० कि.मी. इतकी असून या अंतर्गत ३+३ मार्गिकांचा संपूर्ण लांबीमध्ये उन्नत मार्ग बांधण्यात येणार आहे. सदर प्रकल्प दिनांक १७.१२.२०२८ रोजीपर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन आहे. सदर तीन्ही टप्प्यांच्या प्रकल्प पूर्णत्वानंतर दक्षिण मुंबईतील नरिमन पॉईंट व अन्य भागातून समृध्दी महामार्गापर्यंत विना अडथळा वाहतूकीचा मार्ग उपलब्ध होईल.

*********************

३८.

२२१५

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२५ चे प्रथम (अर्थसंकल्पीय) अधिवेशन

महाराष्ट्र विधानसभा नियम-१०५ अन्वये लक्षवेधी सूचना क्रमांक २२१५

३७.

२१९८

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२५ चे प्रथम (अर्थसंकल्पीय) अधिवेशन

महाराष्ट्र विधानसभा नियम-१०५ अन्वये लक्षवेधी सूचना क्र. २१९८

मा. श्रीमती देवयानी फरांदे, वि.स.स. यांनी उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना क्र. २१९८ पुढीलप्रमाणे आहे:-

"नाशिक शहरात बारा वर्षानंतर २०२७ मध्ये सिंहस्थ कुंभमेळा होणार असणे, सिंहस्थ कुंभमेळ्याला अनन्य साधारण महत्त्व असणे, मोठ्या प्रमाणावर भाविक व पर्यटक सिंहस्थ कुंभमेळ्यासाठी येत असणे, नुकत्याच झालेल्या प्रयागराज येथील कुंभमेळ्याला मोठ्या प्रमाणावर भाविकांनी उपस्थित राहणे, नाशिक येथे कुंभमेळ्यासाठी उपस्थित राहणाऱ्या नागरिकांची संख्या लक्षात घेता आत्तापासून सुविधा देण्यासाठी कार्य करणे गरजेचे असणे, मुंबई पुणे गुजरात येथून नाशिक मार्गे जाणारी वाहतूक बाहेरच्या बाहेर जाण्यासाठी नाशिक शहराला बाह्यवळण रस्ता करण्याची असणारी आवश्यकता, याबाबत वारंवार मागणी करून देखील राज्य शासनाचे सदर बाबीकडे होत असणारे दुर्लक्ष, सिंहस्थ कुंभमेळा लक्षात घेऊन सदर काम दोन महिन्यात सुरू करण्याची असणारी आवश्यकता, लोकप्रतिनिधींनी मागणी याबाबत लोकप्रतिनिधींनी बैठका घेऊन व लेखी पत्राद्वारे विनंती करून देखील एमएसआरटीसी व एमएसआरडीसी यांच्याकडून होत असणारे दुर्लक्ष राज्य शासनाने नाशिक शहरात सिंहस्थकालावधीत दुर्घटना होऊ नये म्हणून या मागणीकडे प्राधान्याने लक्ष देऊन निधी उपलब्ध करून देण्याची असणारी आवश्यकता, शासनाचे सदर बाबीकडे होत असणारे दुर्लक्ष, त्यामुळे सिंहस्थ कालावधीत भाविकांना सुविधा पुरवण्यात निर्माण होणाऱ्या अडचणी, याबाबत शासनाने तत्काळ करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया"

---

**मा.उपमुख्यमंत्री, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) यांचे निवेदन**

नाशिक हे भारतातील सर्वात वेगवान विकसित होणाऱ्या शहरांपैकी एक महत्वाचे शहर असून महत्वाचे हिंदु तीर्थक्षेत्र देखील आहे. सद्य:स्थितीत नाशिक शहरातील वाहतुक वर्दळ, शहरातील रस्त्यांचे जाळे त्यावर तेथील राज्यमार्ग व राष्ट्रीय महामार्गावरुन येणारी वाहतूक व सन २०२७ मधील नियोजित कुंभमेळा इत्यादींचा वाहतुकीवर होणारा संभाव्य परिणाम व त्यासाठी आवश्यक पर्यायी मार्ग व्यवस्था याबाबत अभ्यास केला असता, नाशिक शहरात येणारी सर्व प्रकारची अवजड वाहतूक शहराबाहेरुन नाशिक परिक्रमा (Ring Road) मार्गाने वा जलद मार्गाने वळवणे आवश्यक झालेले आहे. स्थानिक लोकप्रतिनिधींनी नाशिक शहराकरीता बाह्यवळण मार्गाची केलेल्या मागणीच्या अनुषंगाने महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळामार्फत सदर कामाच्या प्रस्तावित नाशिक परिक्रमा महामार्गासाठी व्यवहार्यता अभ्यास व सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्यासाठी सल्लागाराची नियुक्ती करण्यात आली.

महामंडळाकडून नाशिक परिक्रमा मार्गासाठी मुंबई आग्रा राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ६० आडगाव येथे सुरु होऊन छत्रपती संभाजी नगर रोड राज्य मार्ग क्रमांक ३० वरील लाखलगाव येथे मिळणाऱ्या ६०.७१ कि.मी. लांबीच्या आखणीचा प्रस्ताव माहे नोव्हेंबर, २०२३ मध्ये तयार करण्यात आला. तद्नंतर स्थानिक विकास प्राधिकरणांनी उपरोक्त आखणीत सुचविलेले बदल समाविष्ट करुन ६९.७०५ कि.मी.लांबीचा सुधारीत आखणीचा प्रस्ताव माहे सप्टेंबर, २०२४ मध्ये तयार करण्यात आला. त्यामध्ये प्रस्तावित नाशिक परिक्रमा मार्गापासून ओझर विमानतळाकरीता ६.६४ कि.मी.लांबीचा जोडरस्ता व महाराष्ट्र समृध्दी महामार्गासाठी १३.०१ कि.मी.लांबीचा जोडरस्ता नव्याने समाविष्ट करण्यात आला आहे.

सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने पुढील कार्यवाही प्रगतीत आहे.

शेटा H/1529 (750-3-25)

*************************

प्रकल्पाच्या भूसंपादनाकरिता महाराष्ट्र महामार्ग अधिनियम, १९५५ च्या कलम ३ ची अधिसूचना दि.२८.०२.२०२४ रोजी व कलम १५(२) ची अधिसूचना दि.०७.०३.२०२४ रोजी राजपत्रामध्ये प्रसिध्द करण्यात आली आहे. प्रकल्पाची प्रस्तावित आखणी पूर्णतः ग्रीनफिल्ड अलाईनमेंट असून यामुळे कुठलाही महामार्ग अथवा राज्य मार्ग बाधित होत नाही. प्रकल्पाकरिता भुसंपादन करताना महाराष्ट्र महामार्ग अधिनियम १९५५ व भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ च्या तरतुदी प्रमाणे कार्यवाही करण्यात येत आहे. कमीत कमी पिकाऊ जमीन बाधित होईल याची दक्षता घेण्यात आली आहे. सदरील प्रकल्पास सांगली व कोल्हापूर जिल्हयामधून विरोध असल्याची निवेदने प्राप्त झाली असल्यामुळे कोल्हापूर जिल्ह्यातील भुदरगड, करवीर, आजरा, हातकणंगले, शिरोळ व कागल तालुक्यातील भूसंपादनाची प्रारंभीक अधिसूचना दि.१५.१०.२०२४ रोजी रद्द करण्यात आली. शेतकऱ्यांना विश्वासात घेऊनच सदरच प्रकल्प राबविण्याची शासनाची भूमिका आहे.

गडहिंग्लज येथील प्रसिध्द कालभैरव देवस्थान हे राज्यमार्ग क्र.१३० वर असून ते प्रस्तावित शक्तीपीठ महामार्गावरील गारगोटी येथील इंटरचेंज द्वारे महामार्गास जोडले जाईल. तसेच चंदगड येथील प्रसिध्द रवळनाथ मंदिर हे राष्ट्रीय महामार्ग क्र. ५४८ एच वर असून प्रस्तावित शक्तीपीठ महामार्गापासुन ६५ कि.मी. अंतरावर आहे. सदर राष्ट्रीय महामार्ग पात्रादेवी येथील इंटरचेंजच्या प्रस्तावित शक्तीपीठ महामार्गाला जोडला जाईल. तसेच गारगोटी इंटरचेंज पासून आजरामार्गे चंदगड हे गाव ७८ कि.मी. अंतरावर आहे. सद्यस्थितीत गारगोटी व पात्रादेवी दरम्यानच्या प्रस्तावित लांबीतील भौगोलिक परिस्थितीमुळे पश्चिम घाटामध्ये इंटरचेंज प्रस्तावित करण्यात आलेला नाही. तथापि साखळी क्र. कि.मी. ७६२ वर प्रस्तावीत शक्तीपीठ महामार्गावर नव्याने घाटकरवाडी येथे इंटरचेंज प्रस्तावित केल्यास चंदगड हे गाव २८ किमी अंतराने राज्यमार्ग क्र.१८० द्वारे जोडणे शक्य आहे. त्यानुसार तांत्रिक तपासणीअंती कार्यवाही करण्यात येईल.

राज्यातील हिंदू हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे महाराष्ट्र समृद्धी महामार्ग, प्रस्तावित कोकण द्रुतगती महामार्ग व महाराष्ट्र शक्तीपीठ महामार्ग या द्रुतगती महामार्गांचा सुवर्ण त्रिकोण राज्यातील एकूण ३६ जिल्ह्यांपैकी २३ जिल्ह्यामधून जात असून राज्यातील बहूतांश जिल्हे द्रुतगतीने महामार्गाने जोडले जाऊन कृषी व अन्य माल वाहतूकीवरील प्रवास खर्च व पर्यटनावरील प्रवास खर्च व वेळ या मध्ये मोठ्याप्रमाणात बचत होणार आहे. तसेच सुवर्ण त्रिकोण द्रुतगती महामार्गामुळे उद्योगधंदयांच्या वाढीस चालना मिळून महाराष्ट्रातील सर्व जिल्ह्यांचा समान विकास साधला जाईल व स्थानिक लोकांना मोठ्याप्रमाणात रोजगार उपलब्ध होऊन त्यांचे जीवनमान उंचावेल. शिवाय, विदर्भ व मराठवाडा या भागातून येणाऱ्या वाहतूकीला थेट जोडणी मिळाल्यामुळे कोकणातील पर्यटन व बंदर व्यवसायाच्या विकासात मदत होणार आहे. सदरील महामार्ग महाराष्ट्रातील विदर्भ, मराठवाडा, पश्चिम महाराष्ट्र व कोकण या चार भागातून जात असल्यामुळे या भागांचा सर्वांगिण विकास होऊन या भागातील बहुतांशी वाहतूक प्रस्तावित शक्तीपीठ महामार्गावरुन धावणार आहे.

***********

२२१५

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२५ चे प्रथम (अर्थसंकल्पीय) अधिवेशन

महाराष्ट्र विधानसभा नियम-१०५ अन्वये लक्षवेधी सूचना क्रमांक २२१५

मा. श्री.शिवाजी पाटील, वि.स.स. यांनी उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना क्र.२२१५ पुढीलप्रमाणे आहे:-

"नागपूर-गोवा शक्तिपीठ द्रुतगती मार्ग हा कोल्हापूर जिल्ह्यातून जाणार असून सदरचा शक्तिपीठ द्रुतगती मार्ग पुढे गोवा राज्याला जोडला जाणार असणे, हा द्रुतगती मार्ग संकेश्वर मार्गे गडहिंग्लज आणि चंदगड तालुक्यातून गेल्यास गडहिंग्लज येथील प्रसिद्ध कालभैरव देवस्थान आणि चंदगड येथील प्रसिद्ध रवळनाथ मंदिर हे देखील जोडले जाणे, तसेच आसपास असणारी अनेक देवस्थाने या शक्तिपीठ मार्गामुळे जोडली जाणार असणे, पुढे हा द्रुतगती मार्ग गोवा राज्यास जोडला जाणार असल्याने या भागातील नागरिकांना याचा मोठ्या प्रमाणावर फायदा होणार असून या द्रुतगती मार्गामुळे येथील पर्यटन वाढीस मोठी चालना मिळणार असून पर्यटन वाढल्याने येथील स्थानिकांना मोठ्या प्रमाणात रोजगार देखील मिळणार असणे, हा भाग या द्रुतगती मार्गामुळे गोवा राज्याशी जोडल्याने प्रवासाच्या वेळेत बचत होणार तसेच या भागातील आर्थिक विकासाला देखील चालना मिळणार असणे, हा शक्तिपीठ द्रुतगती मार्ग गडहिंग्लज, चंदगड, आजरा तसेच आसपासच्या तालुक्यांसाठी आणि सीमावर्ती भागातील मराठी बांधवांसाठी व संपूर्ण सीमावर्ती भागासाठी वरदान ठरणार असणे, सदरचा नागपूर- गोवा शक्तिपीठ द्रुतगती मार्ग संकेश्वर मार्गे गडहिंग्लज आणि चंदगड तालुक्यातून करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची उपाययोजना."

---

मा.उपमुख्यमंत्री, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) यांचे निवेदन

हिंदु हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे समृद्धी महामार्गाच्या धर्तीवर धार्मिक स्थळांच्या सर्वांगीण विकासासाठी तसेच पर्यटनांच्या दृष्टीने महाराष्ट्र राज्यात्तील पवनार, जि. वर्धा ते पात्रादेवी, जि. सिंधुदुर्ग महाराष्ट्र गोवा सरहद्द पर्यंतच्या प्रवेश नियंत्रित शिघ्रसंचार द्रुतगती महामार्गाचे (महाराष्ट्र शक्तीपीठ महामार्ग) बांधकाम करण्याची घोषणा मार्च, २०२३ च्या अर्थसंकल्पीय अधिवेशनामध्ये करण्यात आली.

प्रस्तावित महामार्ग हा वर्धा, यवतमाळ, हिंगोली, नांदेड, परभणी, बीड, लातूर, धाराशिव, सोलापूर, सांगली, कोल्हापूर व सिंधुदूर्ग या १२ जिल्हयातून पुढे गोवा महाराष्ट्र सरहद्दीवर जोडणे प्रस्तावित आहे. सदर द्रुतगती महामार्गामुळे महाराष्ट्रातील प्रमुख शक्तीपीठे माहुर, तुळजापूर व कोल्हापूर, तसेच अंबाजोगाई ही तिर्थक्षेत्र जोडली जाणार असून संताची कर्मभूमी असलेले मराठीचे आद्यकवी अंबेजोगाई स्थित मुकूंदराज स्वामी, औंढानागनाथ व परळी वैद्यनाथ येथील १२ ज्योतिर्लिंग पैकी दोन ज्योतिर्लिंग व महाराष्ट्राचे आराध्यदैवत पंढरपूर येथील विठ्ठल-रखुमाईचे मंदीर ही जोडले जाणार आहे. तसेच कारंजा (लाड), माहुर, अक्कलकोट, गाणगापूर, नरसोबाची वाडी, औंदूंबर ही दत्त गुरुची धार्मिक स्थळेही जोडली जातील. शक्तीपीठ महामार्गामुळे नागपूर ते पात्रादेवी हा १८ तासांचा प्रवास साधारणत: ८ तास होणार आहे.

सदर महामार्गाच्या अंतिम आखणीस दि.०७.०२.२०२४ रोजीच्या शासन निर्णयान्वये मान्यता प्रदान करण्यात आली आहे. प्रस्तावित महाराष्ट्र शक्तीपीठ महामार्गाची अंदाजित लांबी ८०२.५९२ कि.मी. आहे. तसेच प्रकल्पाचा भूसंपादनासह अपेक्षित खर्च रु.८६३५८.९० कोटी असून प्रकल्पाचे काम ३ वर्षे कालावधीत पुर्ण करण्याचे नियोजित आहे. त्यासाठी साधारणत: ८६१५.४० हेक्टर जमीन संपादित करावी लागेल.

प्रकल्पाच्या भूसंपादनाकरिता महाराष्ट्र महामार्ग अधिनियम, १९५५ च्या कलम ३ ची अधिसूचना दि.२८.०२.२०२४ रोजी व कलम १५(२) ची अधिसूचना दि.०७.०३.२०२४ रोजी राजपत्रामध्ये प्रसिध्द करण्यात आली आहे. प्रकल्पाची प्रस्तावित आखणी पूर्णतः ग्रीनफिल्ड अलाईनमेंट असून यामुळे कुठलाही महामार्ग अथवा राज्य मार्ग बाधित होत नाही. प्रकल्पाकरिता भुसंपादन करताना महाराष्ट्र महामार्ग अधिनियम १९५५ व भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ च्या तरतुदी प्रमाणे कार्यवाही करण्यात येत आहे. कमीत कमी पिकाऊ जमीन बाधित होईल याची दक्षता घेण्यात आली आहे. सदरील प्रकल्पास सांगली व कोल्हापूर जिल्हयामधून विरोध असल्याची निवेदने प्राप्त झाली असल्यामुळे कोल्हापूर जिल्ह्यातील भुदरगड, करवीर, आजरा, हातकणंगले, शिरोळ व कागल तालुक्यातील भूसंपादनाची प्रारंभीक अधिसूचना दि.१५.१०.२०२४ रोजी रद्द करण्यात आली. शेतकऱ्यांना विश्वासात घेऊनच सदरच प्रकल्प राबविण्याची शासनाची भूमिका आहे.

गडहिंग्लज येथील प्रसिध्द कालभैरव देवस्थान हे राज्यमार्ग क्र.१३० वर असून ते प्रस्तावित शक्तीपीठ महामार्गावरील गारगोटी येथील इंटरचेंज द्वारे महामार्गास जोडले जाईल. तसेच चंदगड येथील प्रसिध्द रवळनाथ मंदिर हे राष्ट्रीय महामार्ग क्र. ५४८ एच वर असून प्रस्तावित शक्तीपीठ महामार्गापासुन ६५ कि.मी. अंतरावर आहे. सदर राष्ट्रीय महामार्ग पात्रादेवी येथील इंटरचेंजच्या प्रस्तावित शक्तीपीठ महामार्गाला जोडला जाईल. तसेच गारगोटी इंटरचेंज पासून आजरामार्गे चंदगड हे गाव ७८ कि.मी. अंतरावर आहे. सद्यस्थितीत गारगोटी व पात्रादेवी दरम्यानच्या प्रस्तावित लांबीतील भौगोलिक परिस्थितीमुळे पश्चिम घाटामध्ये इंटरचेंज प्रस्तावित करण्यात आलेला नाही. तथापि साखळी क्र. कि.मी. ७६२ वर प्रस्तावीत शक्तीपीठ महामार्गावर नव्याने घाटकरवाडी येथे इंटरचेंज प्रस्तावित केल्यास चंदगड हे गाव २८ किमी अंतराने राज्यमार्ग क्र.१८० द्वारे जोडणे शक्य आहे. त्यानुसार तांत्रिक तपासणीअंती कार्यवाही करण्यात येईल.

राज्यातील हिंदू हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे महाराष्ट्र समृद्धी महामार्ग, प्रस्तावित कोकण द्रुतगती महामार्ग व महाराष्ट्र शक्तीपीठ महामार्ग या द्रुतगती महामार्गांचा सुवर्ण त्रिकोण राज्यातील एकूण ३६ जिल्ह्यांपैकी २३ जिल्ह्यामधून जात असून राज्यातील बहूतांश जिल्हे द्रुतगतीने महामार्गाने जोडले जाऊन कृषी व अन्य माल वाहतूकीवरील प्रवास खर्च व पर्यटनावरील प्रवास खर्च व वेळ या मध्ये मोठ्याप्रमाणात बचत होणार आहे. तसेच सुवर्ण त्रिकोण द्रुतगती महामार्गामुळे उद्योगधंदयांच्या वाढीस चालना मिळून महाराष्ट्रातील सर्व जिल्ह्यांचा समान विकास साधला जाईल व स्थानिक लोकांना मोठ्याप्रमाणात रोजगार उपलब्ध होऊन त्यांचे जीवनमान उंचावेल. शिवाय, विदर्भ व मराठवाडा या भागातून येणाऱ्या वाहतूकीला थेट जोडणी मिळाल्यामुळे कोकणातील पर्यटन व बंदर व्यवसायाच्या विकासात मदत होणार आहे. सदरील महामार्ग महाराष्ट्रातील विदर्भ, मराठवाडा, पश्चिम महाराष्ट्र व कोकण या चार भागातून जात असल्यामुळे या भागांचा सर्वांगिण विकास होऊन या भागातील बहुतांशी वाहतूक प्रस्तावित शक्तीपीठ महामार्गावरुन धावणार आहे.

***********

# महाराष्ट्र विधानसभा

## सन २०२५ चे पहिले (अर्थसंकल्पीय) अधिवेशन

### मा. श्री. रईस शेख, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्र.५१४ पुढील प्रमाणे आहे.

"भिवंडी शहरातील ग्राहकांना विद्युत देयके भरण्याकरीता अनेक आर्थिक अडचणीचा सामना करावा लागत असल्याने सन २०२३ च्या पावसाळी अधिवेशनात उपस्थित केलेल्या लक्षवेधी चर्चेच्या अनुषंगाने तत्का.मा.उपमुख्यमंत्री यांनी आश्वासन दिल्यानुसार भिवंडी शहराकरीता महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लिमिटेड (MSDCL)च्या बोर्ड ठराव क्र.२२७७, दिनांक २६/१०/२०२३ च्या अनुषंगाने भिवंडी शहरातील कायमस्वरुपी खंडीत(PD) ग्राहक "विशेष अमृत योजना-२०२३" लागू करण्यात आलेली असणे, तसेच शहरात अंदाजे १२ लाख यंत्रमाग असून त्याची वार्षिक उलाढाल सुमारे दहा हजार कोटींची असणे,वस्त्रोद्योग धोरणात कोणतीही दुरुस्ती न करणे, राज्यातील २७ हॉर्स पॉवरचे वरील यंत्रमागधारकांना ७५ पैसे प्रति युनिट अतिरिक्त वीजदर सवलत व २७ हॉर्सपॉवरचे खालील यंत्रमागधारकांना १ रुपया प्रति युनिट अतिरिक्त वीजदर सवलत देण्याच्या राज्य सरकारच्या घोषणेची अद्यापपर्यंत अंमलबजावणी न होणे, विदर्भ आणि मराठवाड्यात विद्युतशुल्क माफ असणे,भिवंडीमध्ये तयार मालाचा पुरवठा देशातील विविध भागांत तसेच परदेशात केला जात असणे, भिवंडी येथील मुख्य व्यवसाय असलेला पावरलूम उद्योगास वाढीव वीजदर, घटते सरकारी अनुदान,उत्पादित मालाला योगय दर न मिळणे आणि कामगारांचे विविध प्रश्न अशा विविध कारणांनी वस्त्रोद्योगास अनेक अडचणींचा सामना करावा लागत असल्याने सदर व्यवसाय तोटयात जात असणे, वीज बिलाची रक्कम टप्प्या-टप्प्यात भरण्याची सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबतची मोठया प्रमाणात छोटया मोठया उद्योजकांची असणे, त्यानुषंगाने मूळ थकबाकी रक्कम अधिक व्याज १०% रक्कम भरल्यास उर्वरित थकबाकी माफ अशा प्रकारची योजना MSDCLमाध्यमातून भिवंडी क्षेत्रातील यंत्रमाग(पावरलूम) उद्योगास तसेच त्यावरील अवलंबून असलेले इतर व्यवसायास चालना मिळण्यासाठी वर्तमान चालू मिटर देयकांसाठी "विशेष अमृत योजना" लवकरात लवकर सुरु करण्याबाबत मा.मुख्यमंत्री यांना भिवंडीचे लोकप्रतिनिधी यांच्याकडून दि.२५ जानेवारी,२०२५ रोजी निवदेन देण्यात आलेले असणे,राज्य सरकारने करावयाच्या कायमस्वरूपी उपाययोजना आणि स्थिर धोरण निश्चित करण्यासाठी याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

### मा.मुख्यमंत्री तथा मंत्री (ऊर्जा) यांचे निवेदन

महावितरणच्या भिवंडी मंडळाअंतर्गत वीज वितरण व्यवस्था मे. टोरंट पॉवर कंपनी लि. ही दि.२६.०१.२००७ च्या फ्रॅन्चायजी कराराप्रमाणे महावितरण व महाराष्ट्र राज्य वीज नियामक आयोगाच्या मार्गदर्शक सूचनेनुसार करत आहे.

भिवंडी क्षेत्रातील यंत्रभाग (पावरलूम) उद्योगास निर्माण झालेल्या समस्यांचे निराकरण करण्यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा. मुख्यमंत्री महोदयांना दि. २५.०१.२०२५ रोजी निवेदन सादर केले आहे. महाराष्ट्र विधानमंडळाच्या सन २०२३ च्या पावसाळी अधिवेशनात उपस्थित केलेल्या लक्षवेधी सूचनेच्या अनुषंगाने झालेल्या चर्चेमध्ये उत्तर देतांना तत्कालीन मा.उपमुख्यमंत्री तथा मंत्री (उर्जा) यांनी भिवंडी वितरण फ्रॅन्चायजी विभागातील कायमस्वरुपी वीजपुरवठा खंडीत असलेल्या ग्राहकांसाठी एकूण मुद्दल रक्कमेच्या ११०% रक्कम भरुन थकबाकी मुक्त होण्याकरीता नविन योजना अंमलात आणण्याचे आश्वासन दिले होते. त्यानुसार महावितरणने दि.१०.११.२०२३ रोजी विशेष सवलत योजना-२०२३ (DF Special Amnesty Scheme-२०२३ for PD Consumers) नोव्हेंबर-२०२३ पासून

सुरु केली असून त्यास दि. ३१.०३.२०२५ पर्यंत मुदतवाढ देण्यात आलेली आहे. सदर योजनेमध्ये एकूण ७३९ वीज ग्राहकांनी लाभ घेतला असून, त्यापैकी यंत्रमागधारक वीजग्राहकांची संख्या ३१८ इतकी आहे. सदर योजनेमध्ये एकूण रु. ४.०० कोटी इतकी थकबाकी जमा झाली असून त्यापैकी रु. ३.०० कोटी इतकी थकबाकी रक्कम यंत्रमागधारक ग्राहकांकडून जमा करण्यात आली आहे.

वीज ग्राहकांच्या चालु वीज देयकांवरील व्याज हे मा. महाराष्ट्र राज्य वीज नियामक आयोग यांनी दिलेल्या निर्देशानुसार आकारले जाते. दि.२८.०२.२०२५ पर्यंत महावितरणच्या एकूण थकबाकीदार यंत्रमागधारक वीज ग्राहकांची संख्या १०२६११ इतकी असून रक्कम मुद्दल व व्याजासह थकबाकी रु. ११२५.३८ कोटी इतकी आहे. त्यापैकी भिवंडी वितरण फ्रॅन्चायजी विभागात एकूण २१,५४१ यंत्रमाग थकबाकीदार असून त्यांची मुद्दल व व्याजासह एकूण थकबाकी रु. ३३८.८८ कोटी इतकी आहे. महाविरण कंपनी ही महानिर्मिती व इतर वीज निर्मिती प्रकल्पांमधून रोखीने वीज खरेदी करुन सर्व वितरण फ्रॅन्चायजी व महावितरण ग्राहकांना वीज पुरवठा करत असते. सदर वीज खरेदी देयके अदा करण्यासाठी महावितरणकडे वीजग्राहकांनी विहित वेळेत केलेला भरणा हा एकमेव मुख्य स्रोत आहे. याप्रमाणे महावितरणकडे भरणा न केल्यास महावितरण कंपनीस बऱ्याचदा कर्ज काढावे लागते. सद्यस्थितीत विविध वर्गवारीतील वीज ग्राहकांकडून चालू थकबाकी वाढत असल्याने महावितरणची आर्थिक परिस्थिती बिकट झाली आहे.

विद्युत अधिनियम २००३ मधील तरतुदींनुसार मा. महाराष्ट्र वीज नियामक आयोगास राज्यातील वितरण परवानाधारकांच्या ग्राहकांचे वीजदर निश्चित करण्याचे अधिकार प्रदान करण्यात आलेले आहेत. संपूर्ण नियामक प्रक्रियेचा अवलंब करुन महाराष्ट्र वीज नियामक आयोगाच्या बहुवार्षिक वीजदर याचिका आदेशानुसार (MYT Tariff Order) राज्यात वीजदर निश्चित केले जातात. महावितरण कंपनीच्या ग्राहकास लागू असलेल्या दराप्रमाणेच भिवंडी वितरण फ्रॅन्चायजी विभागातील सर्व ग्राहकांना वीज देयके दिली जातात. वस्त्रोद्योग विभागाच्या दि.१५.०३.२०२४ रोजीच्या शासन निर्णयानुसार यंत्रमाग उद्योग धारकांना शासनाने खालील प्रमाणे अतिरिक्त वीज सवलत देण्यात येते. सदरची वीज सवलत सदर शासन निर्णय निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून एकात्मिक व शाश्वत वस्त्रोद्योग धोरण, २०२३ - २०२८ या कालावधीपर्यंत लागू आहे.

| वस्त्रोद्योग वर्गवारी | महाराष्ट्र वीज नियामक आयोगामार्फत निश्चित करण्यात आलेले दर | शासनाची वीज सवलत | यंत्रमाग ग्राहकांना शासनाची अतिरिक्त वीज सवलत | ग्राहकाने भरावयाचा प्रत्यक्ष सवलतीचा वीज दर |
|---|---|---|---|---|
| | रु./युनीट | रु./युनीट | रु./युनीट | रु./युनीट |
| २७ अश्वशक्ती पर्यंत | ७.१८ | ३.७७ | १.०० | २.४१ |
| २७ अश्वशक्ती पेक्षा जास्त | ८.२९ | ३.४० | ०.७५ | ४.१४ |

उपरोक्त अतिरिक्त रु. १.०० सवलतीप्रमाणे भिवंडी वितरण फ्रॅन्चायजी विभागातील यंत्रमागधारकांना सन २०२४-२५ या वर्षात डिसेंबर-२०२४ पर्यंत रु. ५१९.५९ कोटी इतकी वीज सवलत व वस्त्रोद्योग धोरणांतर्गत रु. ५८.१८ कोटी इतकी अतिरिक्त सवलत देण्यात आलेली आहे.

**********

# महाराष्ट्र विधानसभा

## सन २०२५ चे पहिले (अर्थसंकल्पीय) अधिवेशन

**मा. श्री. रवी राणा, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्र.१६११ पुढील प्रमाणे आहे.**

"विद्यमान मुख्यमंत्री म. रा.व उर्जा मंत्री यांना दिलेल्या निवेदनाचा संदर्भ घेत विभागीय कार्यालय अमरावती येथील उपायुक्त नियोजन यांनी त्यांचे पत्र क्र.५७/२०२५ दि.२१/०२/२०२५रोजी अधीक्षक अभियंता राज्य विद्युत मंडळ कंपनी अमरावती यांना पत्र पाठवून त्या पत्रामध्ये मेळघाट क्षेत्रातील २२ गावांमध्ये वीज पुरवठा पुरविणे या कामासाठी ५६ कोटी रुपये मंजूर करणे व अमरावती जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या कृषी पंपा करिता नागरिकांच्या सोयीकरिता सुरळीत वीज पुरवठा व्हावा यासाठी ६७२ नवीन ट्रान्सफॉर्मर बसविणे याकरिता ६५ कोटी रुपये मंजूर करणेबाबत उक्त पत्रात महत्त्वाची मागणी केली असणे. हा विषय आदिवासी बहुंल नागरिकांशी संबंधित असणे व शेतकऱ्यांच्या हिताचा असणे. याबाबत शासनाने गंभीर दखल घेऊन दोन्ही कामे मंजूर करण्याची आवश्यकता व करावयाची कार्यवाही व उपायोजना"

### मा.मुख्यमंत्री तथा मंत्री (ऊर्जा) यांचे निवेदन

अमरावती जिल्हयातील मेळघाट परीसरात धारणी व चिखलदारा या २ तालुक्यांचा समावेश आहे. सदर २ तालुक्यात ३२६ गावे असून, त्यापैकी ३०४ गावांना पारंपारिक पध्दतीने वीज पुरवठा देण्यात आलेला आहे. धारणी तालुक्यातील ७ व चिखलदारा तालुक्यातील १५ अशी एकूण २२ गावामध्ये सन २०१९-२० मध्ये महाऊर्जा (MEDA) मार्फत ३५४६ सौर घरगुती दिवा प्रणाली कार्यान्वित करण्यात आली आहे. मेळघाट क्षेत्रातील २२ गावांमध्ये वीज पुरवठा पुरविण्याबाबत, माजी लोकसभा सदस्य, अमरावती व विधानसभा सदस्य यांनी शासनास दिलेले निवेदन विभागीय कार्यालय, अमरावती यांच्या दि. २१.०२.२०२५ पत्रान्वये महावितरण कंपनीच्या कार्यालयास प्राप्त झाले आहे.

सदरची २२ गावे ही मेळघाट व्याघ्र राखीव वन्यजीव अभयारण्याच्या सीमावर्ती (Buffer) व गाभा (Core) क्षेत्रात स्थापित असल्यामुळे तेथे पारंपारिक पध्दतीने वीज पुरवठा करण्यासाठी यंत्रणा उभारणीबाबत वन्यजीव संवर्धन कायदा, १९७२ व वन संवर्धन कायदा , १९८० अंतर्गत वन विभागाची परवानगी अनिवार्य आहे. त्याप्रमाणे महावितरण कंपनीच्या कार्यालयाकडून उप वनसंरक्षक, मेळघाट व्याघ्र प्रकल्प, सिपना वन्यजीव विभाग, परतवाडा यांचेकडे प्रस्ताव पाठविण्यात आला आहे. सदर प्रस्तावामध्ये वन विभागाकडून सुचविण्यात येत असलेल्या त्रुटींची पूर्तता महावितरण कंपनीमार्फत करण्याची कार्यवाही सुरु आहे.

मेळघाट मधील २४ गावांना पारंपारिक पध्दतीने वीज पुरवठा करण्यासाठी आदिवासी उपयोजने (TSP) अंतर्गत रु. ३६.९२ कोटी इतक्या निधीची मागणी आदिवासी विकास विभागास करण्यात आली आहे. त्यापैकी पिपल्या व टेंभ्रु या २ गावांकरिता वनविभागाची परवानगी प्राप्त झाल्यावर व आदिवासी विकास विभागाकडून निधी प्राप्त झाल्यानंतर सदर दोन्ही गावांचे ऑगस्ट-२०२३ मध्ये पारंपारीक पध्दतीने विद्युतीकरण करण्यात आलेले आहे.

तसेच, उर्वरित २२ गावांमध्ये पारंपारिक पध्दतीने विद्युतीकरण करण्यासाठी वन विभागाची परवानगी प्राप्त झाल्यावर व निधी उपलब्धतेनुसार सदर गावांचे पारंपारिक पद्धतीने विद्युतीकरण करण्यात येईल. सदर २२ गावांमध्ये पारंपारिक पध्दतीने विद्युतीकरण करण्यासाठी सुधारीत

दरसूची सन २०२४-२५ नुसार ५४.९७ कोटी इतका निधीची मागणी दि.१०.०३.२०२५ अन्वये आदिवासी विभागास करण्यात आली आहे. उपरोक्तप्रमाणे, वन विभागाची परवानगी व निधी प्राप्त झाल्यानंतर मेळघाट परिसरातील २२ गावांमध्ये पारंपारिक पध्दतीने विद्युतीकरण करण्यात येणार आहे.

अमरावती जिल्हयामध्ये सन २०२२-२३, २०२३-२४ व २०२४-२५ मध्ये जिल्हा नियोजन समितीद्वारे १४६५ नविन ट्रान्सफॉर्मर (डी.पी.) मंजूर झालेले आहेत. त्याकरीता रु. १०३.६४ कोटी इतका निधी मंजूर झालेला आहे. यामधील, सन २०२२-२३ व २०२३-२४ मध्ये मंजूर झालेल्या ११६८ नविन ट्रान्सफॉर्मरची (डी.पी.) रु.८१.७१ कोटी इतक्या रक्कमेची कामे पूर्ण झालेली आहेत. तसेच, सन २०२४-२५ मध्ये प्रस्तावित नविन २९७ ट्रान्सफार्मरसाठी रू. २१.९३ कोटी इतका निधी मंजुर झालेला असून, यामध्ये कृषी वीज पुरवठा यंत्रणेचे सक्षमीकरण व गावठाण ट्रान्सफॉर्मर इत्यादी कामे महावितरणमार्फत प्रगतीपथावर आहेत.

**********

## महाराष्ट्र विधानसभा

## सन २०२५ चे पहिले (अर्थसंकल्पीय) अधिवेशन

मा. श्री. सुनिल प्रभु, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम-१०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्र.२२३ पुढीलप्रमाणे आहे :-

"ता.जि.पालघरमधील मौजे नेटाळी (मनोर) गावातील उदय कर्णिक यांचेसह शेकडो शेतकऱ्यांच्या जमिनीवर अतिक्रमण करुन व सदर जमीनीचे क्षेत्र स्वत:च्या नावे असलेल्या जमिनीच्या सातबारावर बेकायदा दाखल करुन कोट्यवधीचा घोटाळा केल्याचा प्रकार दि.११-२-२०१४ रोजी निदर्शनास येणे,कर्णिक यांचे जमीन गट क्र.७६-१/ब या जमीनीच्या पुर्व, पश्चिम, व उत्तर हद्दीत ७६ गट क्रंमाक नसणे, त्यांच्या जमीनीच्यां दक्षिणेकडील बाजुस असलेले सामंतांनी ५ गुंठे तर रेणु अग्रवालकडुन जमीन घेतलेल्या कुणालने १७ गुंठे जमीन मिळुन एकुण २२ गुंठे जमीन तहसिलदार, उप भूलेखा अधिक्षक,आदी बरोबर आर्थिक सगंनमत करुन सदर जमीनीचे क्षेत्र सातबारावर बेकायदा नोंदवून कर्णिक कुंटुबियाची फसवणुक करुन अन्याय करणे,याबाबत कर्णिक यांनी उप भूलेखाधिकारी अधिक्षक यांचेकडे तक्रार केली असता,सदर जमीनीचा गट क्र.७६ हा एकच गट असुन यामध्ये गट क्र.७६-१/ब आणि गट क्रमांक ७६-१/अ अशी जमिनीची पोटफाड करता येत नसल्याचे कारण सांगून प्रकरण आर्थिक संगनमताने दडपून टाकण्याचा घडलेला धक्कादायक प्रकार, यामुळे कर्णिक कुंटुबियांची २२ गुंठे जमीन हडप करणाऱ्या सामंत व कुणाल यांना सरकारी अधिकारी यांनी सयकार्य केल्याची बाब उघडकीस येणे,यामुळे २२ गुंठे जमीन गमावण्याची कर्णिकांवर ओढवलेले सकंट,पालघरमध्ये कायदेविषयक अज्ञान असणाऱ्या शेतकऱ्यांची मोठ्या प्रमाणात, उद्योजक, भूमाफियांकडून फसवणूक होऊन त्यांचेवर झालेला व होत असलेला अन्याय, याबाबत शासनाने हस्तक्षेप करुन तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना "

---

## मा.मंत्री (महसूल) यांचे निवेदन

मौजे नेटाळी, ता.जि.पालघर येथील स.क्र.७६ (जूना स.क्र. १८,२२ व ३६), क्षेत्र ७.२९.९० हे.आर ही जमीन श्री. वल्लभदास लालजी पोरेचा यांच्या नावे होती. तद्नंतर सन १९८९ साली श्री. वल्लभदास पोरेचा यांनी उक्त स.क्र.७६ मधील ३.६४.७० हे. आर क्षेत्राची श्री. मोहम्मद हूसेन पी मर्चंट यांना फे.क्र.१०८ नुसार विक्री केली. श्री. मर्चंट यांनी सन १९८९ साली उक्त ३.६४.७० हे. आर क्षेत्राची श्री. शशिकांत दामोदर पाटील यांना फे.क्र.३५ नुसार विक्री केली. तद्नंतर सन २००३ साली फे.क्र.५६ नुसार स.क्र.७६ चे विभाजन होऊन स.क्र.७६/१ व ७६/२ असे दोन हिस्से पडले.

उपरोक्तप्रमाणे मौजे नेटाळी, ता.जि.पालघर येथील स.क्र.७६ चे विभाजन झाल्यानंतर, सदर मिळकतीची खालीलप्रमाणे खरेदी-विक्री झालेली असून, सदर मिळकतीची ७/१२ नुसार सद्यस्थिती पुढीलप्रमाणे आहे:-

| अ.क्र. | सर्व्हे क्रमांक | फेरफार क्रमांक व वर्ष | खातेदाराचे नाव | क्षेत्र (हे.आर) |
|---|---|---|---|---|
| १ | ७६/१/अ | फे.क्र. १७७, २०२० | मे. कुणाल हाऊसवेअर प्रा.लि तर्फे डायरेक्टर केवूर एम नागदा | १.५७.७० पो.ख.०.२२.८० |
| | | फे.क्र. ५८, २००४ | संजय सुरेश अग्रवाल व रेणू संजय अग्रवाल | ०.६४.२० |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २ | ७६/१/ब | फे.क्र. ५७, २००३ | उदय गोपिनाथ कर्णिक व भारती उदय कर्णिक | १.२०.०० |
| ३ | ७६/२ | फे.क्र. १८३, २०२१ | मे. कुणाल हाऊसवेअर प्रा.लि तर्फे डायरेक्टर केवूर एम नागदा | ०.३०.०० |
| | | मूळ जमिनमालकाचे वारस | मुकुंद सुरेश पोरेचा | २.१५.२० |
| ४ | ७६/२/ब | फे.क्र.१२६, २०१३ | मे. एरिस्ट्रो स्टील प्रा.लि. तर्फे संचालक मोहन मुरजी गडा | ०.५०.०० |
| | | फे.क्र.१२० २०१३ | मे. कुणाल हाऊसवेअर प्रा.लि तर्फे डायरेक्टर केवूर एम नागदा | ०.७०.०० |
| | | | **एकूण क्षेत्र** | **७.२९.९०** |

उपरोक्त तक्त्यामधील तपशीलाचे अवलोकन केले असता, सन २००३ साली श्री. शशिकांत पाटील यांनी स.क्र.७६/१ मधील १.२०.०० हे.आर जमीन फे.क्र.५७ नुसार श्री. उदय गोपिनाथ कर्णिक व श्रीम. भारती उदय कर्णिक यांना विक्री केली. त्यानुसार श्री.उदय गोपिनाथ कर्णिक व श्रीम. भारती उदय कर्णिक यांचे नावे स.क्र.७६/१/ब क्षेत्र १.२०.०० हे.आर असल्याचे दिसून येते. तथापि, श्री. उदय कर्णिक यांनी केलेल्या विनंतीच्या अनुषंगाने भूमि अभिलेख, पालघर कार्यालयाने त्यांचे मालकीचे स.क्र.७६/१/ब ची प्रत्यक्षात मोजणी केली असता, श्री. उदय कर्णिक व श्रीम. भारती कर्णिक यांच्या वहिवाटीत स.क्र.७६/१/ब चे क्षेत्र ०.९७.५५ हे. आर इतके येत असल्याचे दिसून आले आहे. त्याअनुषंगाने मौजे नेटाळी, ता.जि.पालघर येथील संपूर्ण स.क्र.७६ क्षेत्र ७.२९.९० हे.आर मधील इतर हिश्याचे तसेच सहधारकांच्या कब्जेवहिवाटीतील क्षेत्र व ७/१२ उता-यावरील क्षेत्र यांचा ताळमेळ घेवून, ७/१२ नुसार नकाशा पुरविण्याची दक्षता भूमि अभिलेख, पालघर कार्यालयाकडून घेण्यात येत आहे.

******

## महाराष्ट्र विधानसभा

## सन २०२५ चे पहिले (अर्थसंकल्पीय) अधिवेशन

सर्वश्री. राजन नाईक, ॲड. पराग अळवणी, कॅप्टन आर. सेल्वन, मा. वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम-१०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्र.१५३६ पुढीलप्रमाणे आहे :-

"नालासोपारा विधानसभा क्षेत्रातील मौजे आचोळे येथील सर्वे नं.०६ मध्ये मल्टीस्पेशालिटी रुग्णालयाच्या बांधकामाकरिता महाराष्ट्र शासनाने सन २०२४ मध्ये मंजुरी दिली असल्याचे निदर्शनास येणे, याकरिता महाराष्ट्र शासनाने २५० कोटी इतका निधी मंजूर केला असून त्यामधून रू.२५ कोटी जिल्हाधिकारी पालघर यांना वितरीत करण्यास शासनाकडून मंजूरी प्रदान करण्यात येणे, सदरहू रूग्णालय बांधण्यासाठी निश्चित केलेली जागा ही न्यायालय व न्यायाधिश निवासस्थान यासाठी आरक्षित करण्यात आल्याची बाब निदर्शनास येणे, परंतु याकरिता ही जागा उपयुक्त नसल्याने सार्वजनिक बांधकाम विभाग, पालघर यांच्या ताब्यात असलेली वसई येथील जागा प्रत्यार्पित करण्यासाठी महाराष्ट्र शासन ज्ञापन क्र.साबांज/२०२४/प्रकरण क्र.४९/मी.व्य.१/दि.२४/०९/२०२४ अन्वये महसूल विभागास निर्देश प्राप्त झाल्याची बाब समोर येणे, परंतु उपरोक्त आदेशात आचोळे येथील सर्वे नं.६ मधील जागा सार्वजनिक बांधकाम विभागाच्या विश्रामगृह व निवासस्थान बांधकाम करण्याच्या प्रयोजनार्थ असल्याची बाब निदर्शनास आली असणे, वास्तविक शासनाच्या या महत्वकांक्षी प्रकल्पासाठी दि.०८/०७/२०२४ च्या शासन निर्णयात शुद्धीपत्रकाद्वारे सदर मल्टीस्पेशालिटी रूग्णालयासाठी सर्वे नं.६ मध्ये ९८०८ चौ.मी. इतकी रहिवास क्षेत्रातील जागा देण्याबाबत सुधारीत शासन निर्णय निर्गमित करण्याची नितांत आवश्यकता, वसई-विरार महानगरपालिका कार्यक्षेत्रातील वाढती लोकसंख्या विचारात घेता आरोग्य विषयक अत्यावश्यक सेवा पुरविणे महापालिकेला सोईचे होण्यासाठी सदरहु विश्रामगृह व शासकीय निवासस्थाने व प्रांत कार्यालयासाठी अन्यत्र जागा उपलब्ध करून देण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची भूमिका. "

---

## मा.मंत्री (महसूल) यांचे निवेदन

महानगरपालिका क्षेत्रास मुलभूत सोई सुविधांच्या विकासासाठी विशेष तरतूद या योजनेअंतर्गत वसई-विरार महानगरपालिका क्षेत्रात आचोळे येथे मल्टीस्पेशॅलिटी हॉस्पिटल बांधणे या कामासाठी नगर विकास विभागाने दि.०८.०७.२०२४ रोजीच्या शासन निर्णयान्वये रू.२५०.०० कोटी निधी मंजूर करून, विहित अटी व शर्तीच्या अधीनतेने प्रथम टप्प्यात रू.२५.०० कोटी इतका निधी जिल्हाधिकारी, पालघर यांना नगरपरिषद प्रशासन संचालनालयाकडील आहरीत केलेल्या निधीमधून वितरीत करण्यास मंजूरी दिलेली आहे.

मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, ठाणे यांनी दि.१३.१२.२०१६ च्या पत्रान्वये जिल्हाधिकारी, पालघर यांना केलेल्या विनंतीच्या अनुषंगाने मौजे आचोळे, ता.वसई, जि.पालघर येथील स.नं.६ एकूण क्षेत्र ६.०८.० हे.आर. पैकी ९०३७.८८ चौ.मी. शासकिय जमीन मा. अपर जिल्हा व सत्र न्यायाधीश, वसई यांना न्यायालय व निवासस्थानासाठी कब्जेहक्काने तसेच महसूल मुक्त किमतीने व सारामाफीने प्रदान करण्यास जिल्हाधिकारी, पालघर यांचेकडून दि.२५.०१.२०१७ रोजीच्या आदेशान्वये मंजूरी देण्यात आली होती. त्यानुसार ७/१२ अभिलेखात अंमल देण्यात आला असून, आजरोजी उक्त जमीन मा. न्यायालयाच्या ताब्यात आहे. तथापि, मा.उच्च न्यायालयाच्या दि.०४.०१.२०२४ रोजीच्या विनंतीनुसार विधी व न्याय विभागाने मौजे-आचोळे येथील शासकीय जमिनीऐवजी मौजे-वसई येथील न.भु.क्र.३७६/स.क्र.२७ ही सार्वजनिक बांधकाम विभाग, पालघर यांच्या ताब्यात असलेली जमीन मा. जिल्हा सत्र न्यायाधीश, वसई, जि.ठाणे यांना प्रदान करण्याबाबत सार्वजनिक बांधकाम

विभागास विनंती केली. त्यानुसार सार्वजनिक बांधकाम विभागाने मौजे-वसई येथील न.भु.क्र.३७६/ स.क्र.२७ मधील सार्वजनिक बांधकाम विभाग, पालघर यांच्या ताब्यात असलेली जमीन विहित अटी व शर्तींच्या अधीनतेने मा.जिल्हा सत्र न्यायाधीश, वसई, जि.ठाणे यांना प्रत्यार्पित करण्यास दि.२४.०९.२०२४ रोजीच्या शासन ज्ञापनान्वये ना-हरकत दिलेली आहे. सदर शासन ज्ञापनातील अट क्र.२ मध्ये उक्त जमीन सार्वजनिक बांधकाम विभागाकडून मा. न्यायालयाला हस्तांतरीत करण्यासाठी मान्यता देण्याच्या अनुषंगाने शासन परिपत्रक दि.०८.०९.२००८ मधील तरतूदीनुसार महसूल व वन विभागाने कार्यवाही करणेबाबत नमुद आहे. तसेच अट क्र.४ मध्ये आचोळे येथे सार्वजनिक बांधकाम विभागाचे विश्रामगृह, शासकिय निवासस्थाने व प्रांत कार्यालयासाठी होणा-या रू.४६.०० कोटी अपेक्षित खर्चास शासनाची मंजूरी घेणेबाबत नमुद आहे.

मौजे वसई, ता.वसई, जि.पालघर येथील न.भु.क्र.३७६/स.क्र.२७, क्षेत्र १०,६८३.४० चौ.मी. ही सार्वजनिक बांधकाम विभागाच्या ताब्यात असलेली जमीन न्यायालयीन इमारत व न्यायाधिशांचे निवासस्थान बांधण्यासाठी मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधिश, ठाणे यांना भोगाधिकार मुल्यरहित महसूल मुक्त किंमतीने व कब्जेहक्काने विहित अटींच्या अधीन राहून हस्तांतरीत करण्यास दि.०६.०३.२०२५ रोजीच्या शासन ज्ञापनान्वये मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे.

कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, पालघर व उपविभागीय अधिकारी, वसई यांनी त्यांचेकडील दि.०६.०३.२०२५ रोजीच्या पत्रान्वये मौजे आचोळे, ता. वसई जि. पालघर येथील जमीन वसई विरार शहर महानगरपालिकेला मल्टीस्पेशलिटी हॉस्पिटल बांधण्याकरिता आवश्यक असल्यास, सार्वजनिक बांधकाम विभाग व उपविभागीय अधिकारी कार्यालय, वसई यासाठी अन्य शासकीय जागा हस्तांतर करण्याचा निर्णय शासन स्तरावर घेण्याबाबत कळविले आहे.

मौजे आचोळे, ता.वसई, जि.पालघर येथील स.नं.६ मधील ९०३७.८८ चौ.मी. ही शासकिय जमीन मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल इमारतीसाठी वसई-विरार शहर महानगरपालिकेस वर्ग करणेबाबतचा प्रस्ताव शासनास प्राप्त झाल्यानंतर जमीन हस्तांतरणाबाबत नियोमोचित कार्यवाही करण्यात येईल. तसेच सार्वजनिक बांधकाम विभागाकडून अन्य पर्यायी जमीन देण्याची मागणी प्राप्त झाल्यास त्याप्रमाणे नियमोचित कार्यवाही करण्यात येईल.

*****

सन २०२५ चे अर्थसंकल्पिय (पहिले) अधिवेशन

**श्री.उत्तमराव जानकर, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम-१०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्र.१५५३ पुढीलप्रमाणे आहे:-**

"पंढरपूर, सांगोला, मंगळवेढा, माळशिरस, करमाळा, माढा तसेच सांगली जिल्ह्यातील आटपाडी आणि जतचा काही भाग जोडून पंढरपूर या नवीन जिल्ह्याची निर्मिती करावी, अशी मागणी गेल्या चाळीस वर्षापासून स्थानिक लोकप्रतिनिधी व नागरिकांची असणे, राज्यात धुळे जिल्ह्याचे विभाजन करुन धुळे आणि नंदुरबार जिल्हा, ठाणे जिल्ह्याचे विभाजन करुन ठाणे आणि पालघर जिल्हा असे नवीन जिल्हे तयार करण्यात आले असून, मात्र पंढरपूर जिल्हा निर्मातीची मागणी अद्यापही कागदवरच असल्याचे निदर्शनास आले असणे, पंढरपूर हे ठिकाण सोलापूर जिल्ह्याच्या मध्यवर्ती ठिकाणी असून माळशिरस, सांगोला, करमाळा तालुक्यातील नागरिकांना सोलापूरला जाण्यासाठी १००-१२५ किलोमीटरचा प्रवास करावा लागत असणे, त्याचप्रमाणे सांगली जिल्ह्यातील आटपाडी तालुक्यातील नागरिकांना सांगलीला जाण्यासाठी १००-१२५ किलोमीटरचा प्रवास करावा लागत असणे, त्यामुळे उपरोक्त तालुक्यातील नागरिकांना जिल्हाधिकारी कार्यालय, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा पोलीस अधीक्षक यांच्या कार्यालयात जाणे त्रासाचे होत असणे, पंढरपूर जिल्ह्याची निर्मिती झाल्यास प्रस्तुत तालुक्यातील नागरिकांना प्रशासकीय कामकाजाकरिता कमी अंतरात प्रवास करणे सोयीचे होणार असणे, त्यामुळे पंढरपूर जिल्ह्याची निर्मिती करण्याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना"

---

**मा.श्री.चंद्रशेखर बावनकुळे,मंत्री (महसूल) यांचे निवेदन**

राज्यातील अस्तित्वातील जिल्ह्यांचे विभाजन/पुनर्रचना करण्यासाठी राज्यस्तरावर विचारात घ्यावयांच्या निकषांबाबत शिफारशी करण्यासाठी दि.२४.०६.२०१४ रोजीच्या शासन निर्णयान्वये मा.अपर मुख्य सचिव (महसूल) यांच्या अध्यक्षतेखाली समिती नियुक्त करण्यात आली होती.

०२. सदर समितीने सादर केलेल्या अहवालाच्या अनुषंगाने जिल्हा विभाजन/पुनर्रचनेबाबत निकष ठरविण्यासाठी धोरणात्मक निर्णय घेण्याकरीता मंत्रीमंडळाची मान्यता घेणेबाबत प्रस्तावित करुन याबाबत सहमती वजा अभिप्राय देण्याची वित्त विभागास विनंती करण्यात आली होती.

०३. याबाबत वित्त विभागाने " नवीन जिल्हा निर्मितीचे निकषांनुसार धोरण ठरविल्यास व ते जाहिर केल्यास समाज घटकांकडून मोठ्या प्रमाणात मागण्या प्राप्त होतील. तसेच हे धोरण न्यायालयाकडून आदेश मिळवून कार्यान्वित करण्यासाठी जनहित याचिकाही दाखल होण्याचीही शक्यता संभवते. अशा परिस्थितीत काही हजार कोटीचा आर्थिक भार येऊ शकतो. त्यामुळे सद्य:स्थितीत धोरण न ठरविता सन २०२१ च्या जनगणनेच्या आधारे नवीन निकष निश्चित करणे योग्य ठरेल " असे अभिप्राय कळविले आहेत.

०४. नवीन जिल्हा निर्मिती प्रशासकीय प्रक्रिया आहे. त्याकरीता आर्थिक भार असून त्याअनुषंगाने विविध पैलू तपासून त्यासंदर्भात मंत्रीमंडळाच्या मान्यतेने धोरण निश्चित झाल्यानंतर प्रकरणपरत्वे नवीन जिल्हा निर्मिती संदर्भात उचित निर्णय घेण्याचे संकल्पित आहे.

**************

लक्षवेधी सूचना क्र.१९६३

महाराष्ट्र विधानसभा, सन २०२५ चे अर्थसंकल्पिय अधिवेशन

**मा.श्री.सुभाष देखमुख, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे :**

**लक्षवेधी सूचना क्र. ०४**

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२५ चे प्रथम (अर्थसंकल्पीय) अधिवेशन

**श्री. अतुल भातखळकर, ॲड. पराग अळवणी, वि.स.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे महसूल मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-

"महाराष्ट्र स्थावर संपदा प्राधिकरणाकडून (महारेरा) जिल्हाधिकाऱ्यांना सामान्य घर खरेदीदारांच्या थकबाकी वसुलीचे आदेश दिल्याचे माहे फेब्रुवारी २०२५ मध्ये निदर्शनास येणे, परंतु, आदेश देऊनही विकासकांवर कठोर कारवाई होत नसल्याचे निदर्शनास येणे, तसेच जिल्हाधिकाऱ्यांनी नोटीस पाठवली असता विकासक त्याला दाद देत नसणे, तसेच विकासक दाद देत नसूनही जिल्हाधिकारी स्तरावरून योग्य ती कारवाई होत नसणे, त्यामुळे, घर खरेदीदारांना दिलासा देण्यासाठी शासनाने ठोस पाऊले उचलण्याची गरज असणे, तसेच विकासकांवर कठोर कारवाई करण्याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया ".

---

श्री. चंद्रशेखर बावनकुळे, मा. मंत्री (महसूल) यांचे निवेदन

महारेरा यांचे कार्यालयाकडून वसुलीसाठी एकूण १६१६ प्रकरणे संबंधित जिल्हाधिकारी कार्यालयांकडे प्राप्त झाली असून त्यासंदर्भात एकूण वसूल करावयाची जवळपास रक्कम रु.१०९४.६ कोटी आहे. त्यापैकी २६३ प्रकरणांत जवळपास रक्कम रुपये २५२.५ कोटी वसूल करण्यात आले असून यासंदर्भातील जिल्हानिहाय तपशील पुढीलप्रमाणे आहे :-

(रक्कम कोटीत)

| अ.क्र | जिल्ह्याचे नाव | महारेरा कार्यालयाकडून प्राप्त महसूल वसूली प्रमाणपत्रांच्या (RRC) प्रकरणांची संख्या | गुंतलेली एकूण रक्कम | वसूल झालेल्या प्रकरणांची संख्या | वसूल केलेली रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १ | मुंबई शहर | ४२ | ९५.७१ | २३ | ५१.८० |
| २ | मुंबई उपनगर | ५४६ | ४०७.१७ | ९१ | ८०.३१ |
| ३ | ठाणे | ३५१ | १८०.१३ | ३५ | ४५.६७ |
| ४ | पालघर | ९३ | ३७.३९ | १० | ६.३१ |
| ५ | रायगड | १५७ | ४९.४२ | ३ | ०.४७ |
| ६ | सिंधुदुर्ग | ४ | ०.६१ | २ | ०.३१ |
| ७ | नाशिक | १२ | ५.७६ | ५ | १.०७ |
| ८ | पुणे | ३७७ | ३००.८५ | ८५ | ६३.८८ |
| ९ | छत्रपती संभाजीनगर | १३ | ४.६८ | ७ | ०.६९ |
| १० | नागपूर | ५ | १०.९७ | १ | २.६४ |
| ११ | चंद्रपूर | १ | ०.०९ | १ | ०.०९ |
| १२ | सातारा | ३ | ०.२४ | ० | ०.०० |
| १३ | कोल्हापूर | २ | ०.१३ | ० | ०.०० |
| १४ | रत्नागिरी | १० | १.४९ | ० | ०.०० |
| | एकूण | १६१६ | १०९४.६४ | २६३ | २५२.५५ |

राज्यातील शहरी व ग्रामीण भागामधील दुय्यम निबंधक कार्यालयांमध्ये उपरोक्त सर्व प्रकारच्या दस्तांची संख्या कमी-अधिक प्रमाणात आहे. शहरी भागातील नोंदणी कार्यालयांमध्ये फीजीकल दस्त नोंदणी सोबतच्या eRegistration प्रणालीवरील लिव्ह ॲण्ड लायसन्स व Notice of intimation फाईलिंगचे प्रमाण जास्त असल्याचे निदर्शनास येत आहे. तसेच भविष्यात प्रथम विक्री करारनामा दस्त Online नोंदणीसाठी सादर होण्याचे प्रमाणही वाढतच जाणार असल्याने, राज्यातील विविध जिल्ह्यांतील दुय्यम निबंधक कार्यालयातील कामाचा आढावा घेऊन त्या भागातील जनतेला योग्य सेवा मिळणे सोयीस्कर व्हावे या सर्व बाबींचा विचार करुन, राज्यातील सर्व महानगरपालिका कार्यक्षेत्रातील तसेच जिल्हा मुख्यालयाच्या ठिकाणी असलेल्या दुय्यम निबंधक कार्यालयामध्ये एकत्रितपणे वार्षिक १२००० दस्तसंख्या (isarita, eRegistration, efilling हे सर्व प्रकार मिळून) तसेच उर्वरित ग्रामीण भागातील दुय्यम निबंधक कार्यालयामध्ये ८००० वार्षिक दस्तसंख्या झाल्यास त्या कार्यक्षेत्रात नवीन दुय्यम निबंधक कार्यालयाची निर्मिती करीता दिनांक २०.०९.२०२४ रोजीच्या शासन निर्णयान्वये मानक निश्चित करण्यात आलेली आहेत.

उक्त मानक निश्चितीनुसार नवीन दुय्यम निबंधक कार्यालयाची निर्मिती करुन कर्मचारी उपलब्ध करुन दिला जाणार असल्याने, सध्या कार्यरत असलेल्या कर्मचा-यांवर कामकाजाचा ताण न येता दुय्यम निबंधक कार्यालय बंद करण्याचा प्रश्नच उद्भवणार नाही.

***************************

H/0011-19

पसुलीच्या अनुषंगाने येत आहेत.

असे असले तरी, महारेराकडील प्रलंबित सर्व महसूल वसुली प्रमाणपत्रांबाबत सामान्य नागरीकांची बुडालेली रक्कम ६ महिन्यात पूर्णतः वसूल करण्याचे निर्देश संबंधित जिल्हाधिकारी यांना देण्यात येत आहेत.

------------------*********************------------------

महाराष्ट्र विधानसभा
सन - २०२५ चे प्रथम (अर्थसंकल्पिय अधिवेशन)

**श्री. प्रकाश सुंदरराव सोळंके, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सुचना क्र. २०७२ पुढीलप्रमाणे आहे:-**

" महाराष्ट्र शेत जमीन (जमीन धारणेची कमाल मर्यादा) (सुधारणा) अधिनियम २०२३ दि. १९.०१.२०२४ हा कायदा राज्य शासनाने करणे, या कायद्यातील कलम २९ (अ) अन्वये भूमिहीन, माजी सैनिक व इतर यांना जमिनीचे वाटप धारणाधिकार भोगवटादार वर्ग २ वरून वर्ग १ करण्याची तरतुद असणे, या अधिनियमातील सुधारणेनुसार नियम तयार करण्याच्या अनुषंगाने दि.१६ मार्च, २०२४ च्या शासन निर्णयान्वये समितीची नियुक्ती करणे, परंतु अद्यापपर्यंत शासनाकडुन अधिनियमातील सुधारणे संदर्भात नियम तयार करण्यात आले नसणे,त्यामुळे राज्यातील माजी सैनिक व इतर जमिनीचे वाटप भोगवटादार वर्ग २ मधिल नागरिकांमध्ये पसरलेली तिव्र चिंता, याबाबत शासनाने केलेली कार्यवाही व करावयाची उपाययोजना"

---

**मा. मंत्री ( महसूल ) यांचे निवेदन**

महाराष्ट्र शेत जमीन ( जमीन धारणेची कमाल मर्यादा ) अधिनियम, १९६१ च्या कलम २१ अन्वये अतिरिक्त जमीन म्हणून घोषित केलेल्या जमिनीपैकी अधिनियमातील कलम २७ अन्वये भूमिहीन, माजी सैनिक व इतर यांना भोगवटादार वर्ग-२ या धारणाधिकाराने जमिनीचे वाटप करण्यात आलेले आहे. प्रस्तुत जमिनींचे भोगवटादार वर्ग-२ या धारणाधिकारातुन भोगवटादार वर्ग-१ या धारणाधिकारात रुपांतरीत करण्याबाबत उक्त अधिनियमामध्ये सुधारणा करण्यात येऊन कलम २९ (अ) अंतर्भुत करण्यात आले आहे. त्याबाबतची अधिसुचना दिनांक १९ जानेवारी, २०२४ रोजी राजपत्रात प्रसिद्ध करण्यात आलेली आहे. उक्त सुधारणेमध्ये कलम २९ (अ) अन्वये भोगवटादार वर्ग-२ या धारणाधिकारातुन भोगवटादार वर्ग-१ या धारणाधिकारात रुपांतरीत करण्याबाबतचे रुपांतरण अधिमुल्य, रुपातंरणासाठीची कार्यपद्धती आणि अटी व शर्ती विहित करण्याची तरतूद उक्त अधिनियमाच्या कलम ४६ (२) (इ -१) मध्ये करण्यात आली आहे.

त्यानुषंगाने उक्त अधिनियमातील कलम २७ अन्वये भूमिहीन, माजी सैनिक व इतर यांना वाटप करण्यात आलेल्या जमिनीचे भोगवटादार वर्ग-२ या धारणाधिकारातुन भोगवटादार वर्ग-१ या धारणाधिकारात रुपांतरीत करण्याबाबतचे रुपांतरण अधिमुल्य, रुपातंरणासाठीची कार्यपद्धती आणि अटी व शर्ती विहित करण्याकरिता नियम तयार करण्याच्या अनुषंगाने शिफ़ारशी करण्याची जबाबदारी श्री. उमाकांत दांगट, भा.प्र.से ( सेवानिवृत्त ) यांच्या अध्यक्षतेखालील महसूल कायदा सुधारणा समितीला शासन निर्णय दिनांक १६ मार्च, २०२४ अन्वये देण्यात आलेली होती. सदरहू समितीने दिनांक १० जुन, २०२४ रोजी शिफ़ारशी शासनास सादर केलेल्या आहेत. समितीच्या शिफारशींवर सर्वंकष विचारविनिमय करून शिफारशी सुधारणेसह शासनाने दिनांक १० फेब्रुवारी, २०२५ रोजी स्विकृत केल्या आहेत. शासनाने सुधारणेसह स्विकृत केलेल्या शिफारशींच्या अनुषंगाने प्रसिध्द करावयाच्या नियमांचे प्रारूप तपासून देण्याची विनंती विधी व न्याय विभागास करण्यात आली आहे. विधी व न्याय विभागाने नियमांचे प्रारूप तपासून दिल्यानंतर विहित कार्यपद्धती अनुसरून नियम अंतिम करण्याचे संकल्पित आहे.

*******

लक्षवेधी सूचना क्र. २०८६

## महाराष्ट्र विधानसभा
## सन २०२५ चे पहिले (अर्थसंकल्पीय अधिवेशन

**सर्वश्री. संजय पुराम, विजय रहांगडाले, विनोद अग्रवाल, वि.स.स. यांच्या लक्षवेधी सूचना क्रमांक २०८६ वरील निवेदन महसूल मंत्री सभागृहासमोर ठेवतील:-**

" गोंदिया जिल्हा हा अतिदुर्गम, आदिवासीबहुल आणि नक्षलप्रभावीत असून या जिल्हयात पारंपारीक वननिवासी गरीब आदिवासीचे वास्तव्य मोठ्या प्रमाणात असणे, त्यांना सन २०१० ला जिल्हास्तरीय वनहक्क समितीकडून वनजमिनीचे मालकी हक्काचे दस्तऐवज (पट्टा) प्राप्त झाले असणे, असे आदिवासी कुटुंब आजही वनजमिनीवर धान किंवा इतर पिकाचे उत्पादन घेऊन आपल्या कुटुंबाचे उदारनिर्वाह करीत असणे, परंतु त्यांना मिळालेल्या जमीनीचा पट्टा वनविभागाच्या रेकॉर्डवर असल्यामुळे त्या जमीनीवर घेतलेल्या पीकांची विक्री करता येत नसणे, तसेच त्यांच्या जमीनी वनविभागाच्या रेकॉर्डवर असल्यामुळे त्यांना बँकेतून पीककर्ज सुध्दा घेता येत नसणे, त्यामुळे अशा गरीब आदिवासी शेतक-यांच्या ताब्यात असलेल्या जमीनीचा पट्टा वनविभागाच्या रेकॉर्डवरुन वेगळा करुन त्यांना मालकी हक्काचा सातबारा, नमुना-८ व नकाशा आदी दस्तऐवज मिळण्यासाठी शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

---

### श्री. चंद्रशेखर बावनकुळे, मा. मंत्री, महसूल यांचे निवेदन.

गोंदिया जिल्हयात अनुसूचित जमाती व इतर पारंपारीक वन निवासी (वन हक्कांची मान्यता) अधिनियम व नियम, २००८ आणि सुधारीत नियम, २०१२ अंतर्गत ९,६४६ लाभार्थ्यांना वैयक्तिक दावे मंजुर करण्यात आले आहे.

अनुसूचित जमाती व इतर पारंपारिक वन निवासी (वन हक्कांची मान्यता) अधिनियम,२००६ व नियम,२००८ नुसार पात्र दावेदारांची सदर मिळकतीच्या ७/१२ सदरी नोंद घेताना अनुसरावयाची कार्यपद्धती बाबत महसूल व वन विभागाने (वन विभाग) परिपत्रक क्रमांक एस-10/2011/प्र.क्र.175/फ-3, दि.02/01/2012 निर्गमित केले आहे. त्यानुसार, केंद्र शासनाच्या सूचनांच्या अनुषंगाने हक्क प्राप्त दाव्यांच्या नोंदी ७/१२ अभिलेख्यातील इतर हक्क या रकान्यात करण्यात यावेत असे नमुद करण्यात आले आहे. त्यानुसार लाभार्थ्यांना मंजुर करण्यात आलेल्या पट्टा वन विभागाच्या जमिनीचा असल्याने अशा लाभार्थ्यांची नावांची नोंद ७/१२ उतारा वर इतर अधिकार मध्ये घेण्यात आली आहे.

तसेच, अनुसूचित जमाती व इतर पारंपारिक वन निवासी (वन हक्कांची मान्यता) अधिनियम, २००६ अंतर्गत वैयक्तिक वन हक्क प्राप्त धारकास बँकांकडून कर्ज तसेच इतर शासकीय सवलतींचा फायदा मिळणेकरीता महसूल व वन विभागाचे, शासन परिपत्रक क्रमांक एस-10/2016/प्र.क्र.417/फ-3, दि.02/11/2016 निर्गमित करण्यात आले आहे. त्यानुसार गोंदिया जिल्हयातील सर्व सबंधितांना उदा. व्यवस्थापक, अग्रणी बँक, बँक ऑफ इंडिया, सर्व उपविभागीय अधिकारी व तहसिलदार यांना जिल्हाधिकारी, गोंदिया कार्यालयातुन कळविण्यात आले आहे.

जमीनीचा पट्टा वनविभागाच्या रेकॉर्डवरुन वेगळा करुन त्यांना मालकी हक्काचा सातबारा देणे ही कायदेशीर सुधारणेची व आदिवासी विकास विभाग अथवा वन विभाग यांच्या अखत्यारितील बाब आहे. अनुसूचित जमाती व इतर पारंपारिक वन निवासी (वन हक्कांची मान्यता) अधिनियम, २००६ नियम, २००८ व सुधारणा नियम, २०१२ ची अंमलबजावणी अन्वये वैयक्तिक वनहक्क धारकांची गा.न.नं. ७/१२ सदरी भोगवटदार वर्ग-2 (नवीन व अविभाज्य शर्तीने धारण केलेल्या जमिनी) अशी नोंद घेणेबाबत मा. मंत्री (महसूल) यांच्या अध्यक्षतेखाली दि. २४/०३/२०२३ च्या शासन निर्णयान्वये अभ्यास समिती नियुक्ती करण्यात आली आहे. सदर समितीच्या कार्यवाहीच्या अनुषंगाने उक्त नमूद अधिनियमानुसार वनहक्क दावेदारांची नोंद ७/१२ वर भेगवटादार वर्ग-२ सदरी घेता येईल किंवा कसे याबाबत केंद्र शासनाकडून मार्गदर्शन घेण्याकरीता वन विभागास कळविण्यात येत आहे. याबाबत वन विभागाने असा निर्णय घेतल्यास त्याची अंमलबजावणी महसूल यंत्रणेकडून करण्यात येईल.

---

**महाराष्ट्र विधानसभा**

**सन २०२५ चे पहिले (अर्थसंकल्पीय) अधिवेशन**

**लक्षवेधी सूचना क्रमांक - २१३४**

**श्री. मोहन मते, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम-१०५ अन्वये उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे :-**

"मागील तीन महानगरपालिका आयुक्तांच्या कालावधीत भिवंडी महानगरपालिका भूयारी गटार योजनेत झालेला तब्बल ४२७ करोड रुपयांचा घोटाळा, भिवंडी महानगरपालिकेने भूयारी गटार योजनेसाठी ४२८ कोटी रुपयांची निविदा काढलेली असणे, त्यामध्ये एकूण १५९ किमी लांबीच्या वेगवेगळ्या मलवाहिन्यांचा, ४ मलशुध्दीकरण केंद्रांच्या, ०९ ठिकाणी मल: उद्यंन केंद्रे (पंपीग स्टेशन), सुमारे ११०९ मीटर लांबीचे आऊटर फॉल सिव्हर वाहिनी टाकन्याच्या कामांचा समावेश असणे, या भूयारी गटार योजनेचे काम पुर्ण होण्यापुर्वीच ९८ टक्के रक्कम ठेकेदाराला अदा केली असणे, महानगरपालिकेने लोकआयुक्त अहवालामध्ये केवळ ४० टक्के स्थापत्य काम पुर्ण झाल्याचे नमूद असणे,

या प्रकरणामध्ये भिवंडी महापालिकेचे अधिकारी आणि ठेकेदारांची झालेली अभद्र युती, शहराच्या भौगोलिक स्थितीनुसार प्राप्त हायड्रॉलिक डिझायनप्रमाणे वेगवेगळ्या व्यासाच्या भूमिगत मलवाहिन्या आवरणेचे १३० किमी लांबीचे काम अजुनही २५ टक्के अपुर्ण असणे, या कामाचीसुध्दा ठेकेदाराला १०० टक्के बिल अदायगी झालेली असणे, मलवाहिन्यांची सरासरी ३००० मॅनहोलचेंबरची कामे स्पेसीफिकेशनप्रमाणे करण्यात आलेली नसणे,

भुयारो गटार योजना अमलात आणताना निकृष्ट दर्जाच्या कामामुळे २००० अपघात झालेले असुन ३० ते ४० लोक मलवाहिनोच्या खोदकाम केलेल्या खडडुचात पडुन मृत्युमुखी पडले असणे, यास्तव भिवंडी महानगरपालिकेची भुयारी गटार योजनेच्या भ्रष्टाचाराची सखोल चौकशी करुन भ्रष्टाचारी अधिकारी आणि ठेकेदारांवर शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना"

**-: मा. उप मुख्यमंत्री महोदयांचे निवेदन :-**

भिवंडी निजामपूर महानगरपालिकेच्या महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियानांतर्गत रुपये ४२७.९८ कोटी किंमतीच्या भुयारी गटार (टप्पा-२) प्रकल्पाची अंमबजावणी करण्यात येत असून सदर प्रकल्पात १५९ किमी लांबीच्या वेगवेगळ्या व्यासाच्या मलनि:स्सारण वाहिन्या टाकणे, एकूण ९९ द.ल.लि. क्षमतेचे ४ मलशुद्धीकरण केंद्र (एस.टी.पी.) बांधणे, ७ ठिकाणी पंपिंग स्टेशन बांधणे, सुमारे १.१ किमी लांबीचे आऊटफॉल सिव्हर टाकणे व इतर अनुषंगिक कामांचा समावेश आहे. सदर प्रकल्पाचे प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार महाराष्ट्र जीवन प्राधिकरण असून योजनेंतर्गत कामांची त्यांच्याकडून नियमित गुणवत्ता तपासली जात असून त्यांच्या देखरेखीखाली प्रकल्पाचे काम सुरू आहे.

प्रस्तुत प्रकल्पातील ३० द.ल.लि. क्षमतेच्या मलशुद्धीकरण केंद्राचे काम पूर्ण झाले असून ते कार्यान्वित आहे. २९ द.ल.लि. क्षमतेच्या मलशुद्धीकरण केंद्राचे काम पूर्ण झाले असून सद्यस्थितीस अंशतः कार्यान्वित करण्यात आलेले आहे. ३१ द.ल.लि. क्षमतेच्या मलशुद्धीकरण केंद्राचे स्थापत्य कामे पूर्ण झाले असून इलेक्ट्रो मेकॅनिकलची कामे प्रगतीपथावर आहेत व ९ द.ल.लि. क्षमतेच्या मलशुद्धीकरण केंद्राचे काम पूर्ण झाले असून रायजिंग मेन पाईप लाईनचे काम अंतिम टप्प्यात आहे. तसेच, प्रकल्पातील सर्व सात पंपिंग स्टेशनची कामे १०० % पूर्ण झालेली आहेत. सदर प्रकल्पांतर्गत ६४१३ चेंबर (मॅनहोल) बांधणेचे काम पूर्ण झालेले आहे. तसेच, सदर प्रकल्पातील १३८ किमी लांबीच्या मलवाहिन्या अंथरण्यात आलेल्या असुन त्यापैकी १३२ किमी लांबीचे खोदण्यात आलेले रस्ते पुर्ववत करण्यात आले आहेत व उर्वरीत मलवाहिन्या मुख्य नाले व खाडी लगत अंथरण्यात आलेल्या असल्यामुळे त्यासाठी रस्ता दुरुस्तीची आवश्यकता नाही.

पु.शा.प

ROTA-H-0071-1 (7SB-5-2025)

मा. लोक आयुक्तांकडे सदर प्रकल्पाच्या अनुषंगाने तक्रारीबाबत भिवंडी निजामपूर महानगरपालिकेने दिनांक २८ नोव्हेंबर, २०२३ रोजी सादर केलेल्या अहवालात सदर प्रकल्पातील चार मलशुद्धीकरण केंद्राच्या त्यावेळेस झालेल्या कामाच्या प्रगतीनुसार अहवाल मा. लोक आयुक्त कार्यालयास सादर करण्यात आला होता. त्यामध्ये प्रस्तुत प्रकल्पातील भादवड मलशुद्धीकरण केंद्राच्या कामाची प्रगती त्यावेळेस ४० % असल्याबाबत महानगरपालिकेने नमूद केले होते. तथापि, सद्यस्थितीस भादवड मलशुद्धीकरण केंद्राचे काम १०० % पूर्ण झाले असून सदर मलशुद्धीकरण केंद्रांतर्गत उर्वरित रायजिंग मेन पाईप लाईनचे काम अंतिम टप्प्यात आहे.

सदर प्रकल्पांतर्गत दुरुस्ती केलेल्या रस्त्यांवर कोणत्याही प्रकारचे अपघात वा जीवितहानी झाली असल्याची तक्रार महानगरपालिकेस प्राप्त नाही तसेच, मलवाहिन्यांसाठी खोदलेल्या खड्ड्यांमध्ये ३० ते ४० लोक मृत्युमुखी पडले असल्याची बाब वस्तुस्थितीस धरून नाही.

भुयारी गटार प्रकल्पातील कामांचे आय.आय.टी., मुंबई व शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, पुणे या नामांकित संस्थेमार्फत त्रयस्थ तांत्रिक लेखापरीक्षण झालेले आहे. तसेच, त्रयस्थ तांत्रिक लेखापरीक्षणांतर्गत काम गुणवत्तापूर्वक झाले असल्याबाबतचा अहवाल प्राप्त झाल्यानंतरच कंत्राटदारास वेळोवेळी देयके प्रदान करण्यात आलेली आहेत. सद्यस्थितीत, सदर योजनेची आर्थिक प्रगती ९७.१९ % व भौतिक प्रगती ९८.८३ % झालेली आहे.

-----*****-----

## महाराष्ट्र विधानसभा

सन २०२५ चे पहिले (अर्थसंकल्पिय) अधिवेशन

श्री.राजेश क्षिरसागर, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम-१०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्र.२४७९ पुढीलप्रमाणे आहे:-

"राज्यात लोकसंख्या वाढीप्रमाणे शहरांचा विकास देखील झपाटयाने होत असणे, शहरांचा विस्तार होताना त्याठिकाणी नगरपालिका, महानगरपालिका यांच्यामार्फत सोयीसुविधा पुरविल्या जाणे. करवीर नगरी कोल्हापूर मनपा सन १९७२ नंतर अस्तित्वात आलेली असणे. आज शहरे विकसित होण्याच्या दृष्टीने विविध महानगरपालिकांची हद्दवाढ केलेली असणे. परंतु कोल्हापूर मनपाची हद्दवाढ आजवर करण्यात आलेली नसणे, स्थानिकांकडून या मनपा हद्दवाढीबाबतची मागणी स्थानिक प्रशासनाकडे वारंवार होत असणे, याबाबतचे निवेदन मा.मुख्यमंत्री यांचेकडे माहे जानेवारी,२०२५ मध्ये देण्यात आलेले असणे, सध्या शहरानजीक असलेल्या गावांमध्ये नागरी वस्ती वाढलेली असणे, या गावांना मनपाकडून पाणीपुरवठा, केएमटी बससेवा, स्मशान, आरोग्य सुविधा या सेवा पुरवल्या जातात. कळंबा, मोरेवाडी, पाचगाव, गांधीनगर, वळीवडे, उचगाव, गडमुडशिंगी, सरनोबतवाडी, उजळाईवाडी, कंदलगाव, बालिंगा, शिंगणापूर अशी प्रमुख गावे आहेत. या गावांना कोल्हापूर मनपा उत्तम सुविधा देऊ शकते. परंतु हद्दवाढ झाली नसल्याने कोल्हापूर मनपाला प्रशासनिक अडचणींना सामोरे जावे लागत असणे, कोल्हापूर महानगरपालिकेच्या हद्दवाढ करण्याविषयी शासनाची असलेली उदासीनता, त्यामुळे त्याचा परिणाम नागरिकांना पुरविण्यात येणाऱ्या सोयीसुविधांवर होत असणे, रस्ते, वीज, पाणी यांसारख्या मूलभूत गरजा पूर्ण होत नसणे, याबाबत स्थानिकांच्या मागणीवर प्रशासनाने तात्काळ लक्ष देण्याची आवश्यकता तसेच प्रशासनाने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

### मा.उप मुख्यमंत्री (नगर विकास) यांचे निवेदन

कोल्हापूर महानगरपालिकेची स्थापना सन १९७२ मध्ये झाली असून एकुण क्षेत्र ६६.८२ चौ.कि.मी इतकी आहे. सन २०११ च्या जनगणनेनुसार कोल्हापूर शहराची लोकसंख्या ५,४९,२३६ इतकी आहे. महानगरपालिकेच्या हद्दीबाहेरील क्षेत्रासाठी सक्षम यंत्रणा नसल्यामुळे बहुतांश ठिकाणी बससेवा व पाणी पुरवठा महानगरपालिकेमार्फत करण्यात येत असून त्याचा अतिरीक्त ताण महानगरपालिकेवर पडतो.

कोल्हापूर महानगरपालिका हद्दीबाहेर औद्योगिक व व्यापारी केंद्रामध्ये काम करणारे कामगार व कर्मचारी बहुतांश कोल्हापूर शहरातील रहिवाशी आहेत. हद्दीबाहेर होणाऱ्या विकासासाठी आवश्यक असणाऱ्या सर्व प्रकारच्या नागरी सुविधा व त्यांच्या प्रत्यक्ष गरजा भागविण्याची जबाबदारी महानगरपालिकेस उचलावी लागते. त्यासाठी महानगरपालिकेवर आर्थिक ताण पडतो. तथापि, एवढया सुविधा पुरविल्याच्या बदल्यात महानगरपालिकेस त्यांचेकडून कोणतेच महसुली उत्पन्न मिळत नाही किंवा वसुल करता येत नाही, ही वस्तूस्थिती आहे.

कोल्हापुर महानगरपालिकेने लगतच्या ४२ गावांचा समावेश करुन हद्दवाढीचा प्रस्ताव प्रथमत: सन १९९० मध्ये शासनास सादर केला होता. सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने हद्दवाढीबाबतची प्राथमिक उदघोषणा दिनांक २०/०४/१९९२ रोजी निर्गमित करण्यात आली होती. परंतू सदर प्रस्तावित हद्दवाढीस त्यामध्ये समाविष्ट केलेल्या सर्व गावांनी, तसेच लोकप्रतिनिधींनी विरोध दर्शविल्यामुळे हद्दवाढीचा निर्णय घेण्यात आलेला नव्हता. तदनंतर शहर हद्दवाढीबाबत विविध संघटनेमार्फत प्राप्त झालेली निवेदने, यापूर्वी सन १९९२ मध्ये निर्गमित केलेल्या प्राथमिक उदघोषणेस जवळपास २० वर्षाचा झालेला कालावधी तसेच हद्दवाढीत समाविष्ट होणाऱ्या गावांच्या लोकसंख्येत, उत्पन्नात, भौगोलिक परिस्थितीमध्ये झालेला बदल विचारात घेऊन महानगरपालिकेस सुधारीत प्रस्ताव सादर करण्याचे सूचित करुन दिनांक १७ नोव्हेंबर, २०१२ रोजीच्या अधिसूचनेद्वारे यापूर्वीची प्राथमिक उद्घोषणा विखंडीत करण्यात आली.

दिनांक १७ नोव्हेंबर, २०१२ रोजीच्या अधिसूचनेला मा.उच्च न्यायालयात जनहित याचिकेव्दारे आव्हान देण्यात आले. सदर जनहित याचिकेची सुनावणी दिनांक ११/१२/२०१३ रोजी होऊन त्यात "कोल्हापूर महानगरपालिकेने दिनांक ३१/०१/२०१४ पर्यंत हद्दवाढीचा प्रस्ताव शासनास सादर करावा व शासनाने सहा महिनेच्या आत याबाबत निर्णय घ्यावा"असे मा.उच्च न्यायालयाने आदेश पारित केले होते. त्यानुसार आयुक्त, कोल्हापूर महानगरपालिका यांनी दिनांक २३/०६/२०१४ रोजीच्या पत्रान्वये प्रस्ताव सादर केला. सदर प्रस्तावावर महानगरपालिका हद्दवाढीबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी व हद्दवाढीमध्ये समाविष्ट होणाऱ्या गावांचा हद्दवाढीस होणारा विरोध विचारात घेता सदर हद्दवाढ करणे उचित होणार नाही, असा निर्णय तत्कालिन शासनाकडून घेण्यात आला.

तदनंतर कोल्हापूर महानगरपालिकेने शहरालगतच्या १ ते २ किलोमीटर परिसरातील १८ गावांचा व २ एम.आय.डी.सी. यांचे क्षेत्रांचा समावेश असलेला हद्दवाढीचा नवीन प्रस्ताव दिनांक १२/०६/२०१५ रोजी सादर केला. त्यावर निर्णय घेण्याच्या दृष्टीने तत्कालिन पालकमंत्री, कोल्हापूर यांच्या निर्देशानुसार नगर विकास विभागातील दोन अधिकाऱ्यांची द्वि-सदस्यीय समिती नियुक्त करण्यात आली.

नियुक्त करण्यात आलेल्या द्विसदस्य समितीमार्फत सन २०१६ मध्ये हद्दवाढ विरोधक व समर्थक यांच्या बैठका घेऊन, तसेच तोंडी सूचना व लेखी निवेदने स्विकारुन समितीने कोल्हापूर महानगरपालिकेची हद्दवाढ करण्यासंबंधी शिफारस केली. सदर शिफारशीच्या अनुषंगाने प्रशासकीय कार्यवाही सुरु असताना कोल्हापूर हद्दवाढ विरोधी समिती व हद्दवाढ कृती समितीने तत्कालिन मा.मुख्यमंत्री महोदयांकडे बैठकीची विनंती केली असून त्यानुसार मा.मुख्यमंत्री महोदयांनी दिनांक ३०/०८/२०१६ रोजी सर्व संबंधितांची बैठक घेतली. सदर बैठकीत पुणे येथे स्थापन केलेले पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (PMRDA) व मुंबई महानगर येथे स्थापन केलेले मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (MMRDA) या धर्तीवर कोल्हापूर महानगरपालिका क्षेत्रात स्वतंत्र प्राधिकरण स्थापन करण्याबाबत दोन्ही बाजूच्या सदस्यांनी आपली भूमिका चार आठवडयात जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांना सादर करावी. तदनंतर जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांनी याबाबतचा प्रस्ताव त्यापुढील दोन आठवडयात नगर विकास विभागाकडे सादर करावा, असे निर्देश दिले.

सदर निर्देशानुसार जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांनी कार्यवाही करुन कोल्हापूर महानगरपालिका क्षेत्रात पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (PMRDA) व मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (MMRDA) यांचे धर्तीवर क्षेत्र विकास प्राधिकरण स्थापन करणे योग्य असल्याचे स्पष्ट अभिप्राय दिले. त्यानुसार दिनांक १६/०८/२०१७ रोजीच्या अधिसूचनेद्वारे "कोल्हापूर नागरीक्षेत्र विकास प्राधिकरण" गठीत करण्यात आले आहे. दरम्यानच्या कालावधीत कोल्हापूर महानगरपालिका सभागृहाची मुदत दिनांक १५/११/२०२० रोजी संपुष्टात आली आहे.

मा.राज्य निवडणूक आयोगाने ५ महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणूक, २०२० करीता प्रभाग रचना करण्याबाबतचे सुधारीत आदेश दिनांक ०३/०१/२०२० रोजी निर्गमित केले असून त्यानुसार "स्थानिक स्वराज्य संस्थेची मुदत ज्या महिन्यात संपत असेल त्याच्या ६ महिने अगोदरच्या कालावधीमध्ये, तिच्या क्षेत्रात व हद्दीमध्ये निवडणूक प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत बदल करता येणार नाहीत" असे निर्देश दिले. त्याचप्रमाणे सामान्य प्रशासन विभागाने दि.२७/०२/२०२४ रोजीच्या अधिसूचनेन्वये सर्व जिल्हे/ तहसिल/ शहरे/ गावे यांच्या प्रशासकीय सीमा जनगणनेकरीता गोठविण्यात आल्याचे कळविले आहे. उक्त निर्देश विचारात घेता हद्दवाढीसंदर्भातील कार्यवाही करता आलेली नाही.

******

**महाराष्ट्र विधानसभा नियम-१०५ अन्वये सर्वश्री. भास्कर जाधव, रोहित पवार, विजय वडेट्टीवार, विधानसभा सदस्य यांनी दिलेली लक्षवेधी सूचना क्र.६४१ खालीलप्रमाणे आहे :-**

"माहे जानेवारी २०२५ मध्ये निती आयोगाने प्रकाशित केलेल्या राज्यांच्या वित्तीय आरोग्य निर्देशक अहवालात ५०.३ गुणांसह महाराष्ट्र सहाव्या क्रमांकावर घसरला असणे, सदर अहवालात महाराष्ट्राला खर्चाची गुणवत्ता (Quality of Expenditure) आणि कर्ज शाश्वतता (Debt Sustainability) या निकषांवर कमी गुण मिळाले असल्याचे देखील निदर्शनास आले असणे, पंतप्रधानांच्या आर्थिक सल्लागार परिषदेने सादर केलेल्या १९६०-६१ ते २०२३-२४ या कालावधीत राज्याच्या आर्थिक कामगिरीच्या अहवालानुसार मागील दहा वर्षांच्या काळात महाराष्ट्राची आर्थिक आघाडीवर पीछेहाट झाल्याची होऊन देशाच्या एकूण सकल उत्पन्नात महाराष्ट्र राज्याचा वाटा १५% वरून १३% पर्यंत घसरणे, निती आयोगाने घेतलेल्या राज्याच्या निर्यातीबाबतच्या कामगिरीच्या आढाव्यात देखील तामिळनाडू राज्यांने महाराष्ट्राला मागे टाकत प्रथम स्थान मिळवणे, देशातील एकूण निर्यातीत महाराष्ट्राचा वाटा घसरला असून याबाबतीत गुजरातने महाराष्ट्राला मागे टाकले असणे, देशातील एकूण व्यापारी निर्यातीत मागील सलग तीन वर्षात महाराष्ट्राची पीछेहाट होत असणे, राज्यावरील कर्जाचा बोजा दिवसेंदिवस वाढत असून रिझर्व्ह बँकेने दिलेल्या आकडेवारीनुसार मार्च २०२५ पर्यंत राज्यावरील एकूण कर्ज ७.८२ लाख कोटीपर्यंत वाढून महाराष्ट्र देशातील दुसऱ्या क्रमांकाचे कर्जबाजारी राज्य बनण्याची शक्यता वर्तवली जाणे, एकंदरीतच केंद्र सरकार तसेच केंद्रीय संस्थांच्या अनेक निदेशांकात महाराष्ट्राचे स्थान घसरले असणे याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया"

---

## मा. उप मुख्यमंत्री (वित्त) यांचे निवेदन

निती आयोगाच्या वित्तीय आरोग्य निर्देशांक अहवालानुसार राज्यांच्या वित्तीय आरोग्य निर्देशांकात महाराष्ट्र सहाव्या क्रमांकावर दर्शविण्यात आले असल्याचे निती आयोगाचे अहवालात नमूद करण्यात आले आहे. त्याबाबत वस्तुनिष्ठ स्थिती खालीलप्रमाणे नमूद करण्यात येत आहे.

राज्याचा सामाजिक व आर्थिक सेवावरील खर्च हा एकूण खर्चाशी सन २०१८-१९ ते २०२२-२३ या कालावधीत स्थिर आहे. राज्याचा शिक्षणावरील खर्च हा एकूण खर्चाच्या प्रमाणात सन २०१८-१९ ते २०२२-२३ या कालावधीत १६.९ टक्केवरुन १७.२ टक्के इतका वाढला आहे. तसेच वैद्यकीय सेवांवरील खर्च हा

एकूण खर्चाच्या प्रमाणात सन २०१८-१९ ते २०२२-२३ या कालावधीत ४.३ टक्केवरुन ५.७ टक्के इतकी वाढ झाली आहे.

राज्यनिहाय कर्ज निर्देशांक स्कोअर पहाता राज्य ३ऱ्या क्रमांकावर असून राज्यावरील दायित्वाबाबत निश्चित केलेल्या वित्तीय निर्देशकांच्या आत राज्य शासनाचे दायित्व ठेवण्याचे उद्दिष्टांची पूर्तता राज्य शासनाने केली आहे. परिणामकारक कर संकलन संरचना, साधनसंपत्तीच्या परिचालनासाठी केलेले प्रयत्न आणि खर्चाबाबतचा संतुलित विचार यामुळे महाराष्ट्र राज्याची वित्तीय स्थिती कायम चांगली राहिली आहे.

पंतप्रधान आर्थिक सल्लागार परिषदेच्या अहवालानुसार सन १९६०-६१ मध्ये उत्तर प्रदेश (अखंड) हे प्रथम क्रमांकावर (१४.४%) व महाराष्ट्र हे द्वितीय क्रमांकावर (१२.५%) होते. मात्र सन २०२३-२४ मध्ये उत्तर प्रदेश (अखंड) हे द्वितीय क्रमांकावर (९.५%) असून महाराष्ट्र हे प्रथम क्रमांकावर (१३.३%) होते. राष्ट्रीय सकल उत्पन्नात सर्वात जास्त वाटा असलेले महाराष्ट्र हेच राज्य आहे. सन २०२३-२४ मध्ये राष्ट्रीय सकल उत्पन्नामध्ये राज्याचा वाटा १३.३% इतका असून राज्याने हाती घेतलेल्या विविध पायाभूत सुविधा प्रकल्पांमुळे राष्ट्रीय सकल उत्पन्नामध्ये राज्याची सातत्याने वाढ होत राहणार आहे.

राज्याच्या विकास कामांसाठी कर्ज उभारणी करणे आवश्यक आहे. वित्त आयोगाच्या निकषानुसार राज्यावरील एकूण संचित दायित्व स्थूल राज्य उत्पन्नाच्या सरासरी २५ टक्के ठेवणे बंधनकारक आहे. सन २०२५-२६ च्या अर्थसंकल्पीय अंदाजानुसार राज्यावरील संचित दायित्व १८.८७ टक्के इतक्या मर्यादेत आहे. सदर दायित्व वित्त आयोगाच्या निकषानुसार आहे. कर्ज उभारणी करतांना "महाराष्ट्र राजकोषीय उत्तरदायित्व व अर्थसंकल्पीय व्यवस्थापन अधिनियम, २००५" मधील तरतुदींचे राज्य शासनाकडून पालन करण्यात येत आहे. वित्त आयोगाचे निकष विचारात घेता राज्य कोणत्याही दृष्टिकोनातून कर्जबाजारी होणार नाही.

## महाराष्ट्र विधानसभा

## सन २०२५ चे प्रथम (अर्थसंकल्पिय) अधिवेशन

**महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये श्री. नारायण पाटील, विधानसभा सदस्य यांनी उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना क्र.१९०१ पुढीलप्रमाणे:-**

"करमाळा मतदारसंघातील सीना माढा उपसा सिंचन योजनेतील मौजे पिंपळखुटे, कुर्डू, अंबाड यासह अन्य गावांतील स्थानिक शेतकरी व ग्रामस्थांनी वारंवार मागणी केल्यानंतर शासनाने सदर गावांना सीना माढा उपसासिंचन योजनेतून पिण्याच्या पाणी आरक्षणाला गेल्या काही वर्षापूर्वी कृष्णा खोरे विकास महामंडळाने परवानगी दिलेली असणे, परंतु सदर गावांना सिंचनासाठी पाणी उपलब्ध करून देण्यात आलेले नसणे. त्यामुळे स्थानिक शेतकऱ्यांकडून बंद नलिकामुळे बचत झालेले पाणी शेती सिंचनासाठी उपलब्ध करून देण्याची तसेच सीना माढा उपसा सिंचन योजनेच्या सदर गावे उंचीवर असल्याने लिफ्टद्वारे पाणी उचलून गावांच्या या भागातील विकेंद्रित जलसाठे भरून देण्याची होत आलेली मागणी, याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनीही दि.१०.०२.२०२५ रोजी मा.जलसंपदा मंत्री यांचेकडे लेखी निवेदनाद्वारे केलेली मागणी, तथापि अद्याप उक्त प्रकरणी कोणतीच निर्णयात्मक कार्यवाही न होणे, परिणामी उक्त गावातील शेतकऱ्यांमध्ये वाढते नैराश्याचे वातावरण, शासनाने उक्त प्रकरणी चौकशी करून पिंपळखुटे, कुर्डू, अंबाडसह बेंद ओढ्यावरील १३ गावांना दुष्काळमुक्त करण्यासाठी सीना माढा उपसा सिंचन प्रकल्पामधून शेतीसाठी पाणी आरक्षित करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

---

## डॉ. राधाकृष्ण विखे पाटील, मा. मंत्री, जलसंपदा (गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) यांचे निवेदन

मौजे- पिंपळखुटे, कुर्डूगांव व अंबाड ता.माढा या गावांकरीता पिण्यासाठी एकंदर ०.२७६३ दलघमी इतके पाणी महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे यांनी दि.१९.०९.२०१९ रोजीच्या पत्रान्वये आरक्षित केले आहे.

जलसंपदा विभाग, शासन परिपत्रक दि.२८.०२.२०२४ अन्वये नलिकेद्वारे वितरण प्रणाली धोरणाबाबत सुधारीत मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत. त्यानुसार बचतीच्या पाण्यासाठीचे प्राधान्यक्रम निश्चित केले आहेत. सदर प्राधान्यक्रमानुसार अवर्षण प्रवण क्षेत्रातील प्रकल्पांसाठी बचतीचे पाणी लाभक्षेत्राबाहेर देण्यासाठी CCA व ICA मधील तफावतीचा मर्यादाही २५% इतकी आहे. सीना माढा उपसा सिंचन प्रकल्प हा अवर्षण प्रवण क्षेत्रात येत असून प्रकल्पाचा CCA – २४,५५० हे. असून ICA – १६,१५१ हे. इतका आहे. त्यानुसार CCA व ICA मधील तफावत ८,३९९ हे. इतकी आहे. जलसंपदा विभाग, शासन परिपत्रक दि.२८.०२.२०२४ नुसार ७५ % म्हणजेच ६,२९९ हे. पर्यंतची तफावत भरून काढणे आवश्यक आहे. सद्यस्थितीत योजनेच्या उजवा कालवा, वितरीका क्र.२ व उजवा कालवा पुच्छ लघुवितरीका बंद नलिका वितरण प्रणालीद्वारे ३७२ हे. इतकी तफावत कमी झाली असून उर्वरीत ५९२७ हे.इतकी तफावत कमी करणे आवश्यक आहे.

मौजे बावी, तुळशी, परितेवाडी, पिंपळखुटे या लाभक्षेत्राबाहेरील गावांना व मौजे अंबाड, कुर्डू व अंजनगांव या लाभक्षेत्रातील गावांना पाणी उपलब्ध करून देण्याची मागणी आहे. जलसंपदा विभाग, शासन परिपत्रक दि.२८.०२.२०२४ अन्वये प्राधान्यक्रमानुसार बचतीचे पाणी प्रथमत: पिण्याच्या मागणीसाठी वापरावे, असे निर्देश आहेत. त्यानुषंगाने सादर प्रस्तावास महामंडळाने दि.२६.०६.२०२४ रोजीच्या पत्रान्वये सदर गावांमधील पिण्याच्या पाण्याच्या मागणी (Drinking Water Demand) कामाचा समावेश प्रस्तावित तृतीय सुप्रमामध्ये करणेस तत्वत: मान्यता प्रदान केली आहे. तसेच दि.२८.०२.२०२४ चे शासन परिपत्रकातील परि.१(iv) मधील तरतुदीनुसार नमुद गावातील विकेंद्रित जलसाठे भरून अप्रत्यक्ष सिंचनाचा लाभ देणेसाठी प्रकल्पाचे प्रस्तावित तृतीय सुप्रमामध्ये अंतर्भुत करणेचे अनुषंगाने अंदाजपत्रके तयार करणेबाबतची कार्यवाही प्रगतीत आहेत.

सीना माढा प्रकल्पाचा रू.११२८.२८ कोटी किंमतीचा तृतीय सुप्रमा राज्य तांत्रिक सल्लागार समिती-२ पुणे यांना सादर करण्यात आला असून, उपस्थित मुद्यांच्या अनुषंगाने पुढील कार्यवाही क्षेत्रिय स्तरावर सुरु आहे. प्रस्तुत सुप्रमामध्ये विषयांकित कामासाठी रू.५८ कोटी इतकी तरतुद प्रस्तावित करण्यात आली आहे.

अधिसूचित लाभक्षेत्राबाहेरील मौजे बावी, तुळशी, परितवाडी, अंजनगांव, कुर्डू, अंबाड व पिंपळखुंटे या गावांतील विकेंद्रित जलसाठे भरून बचतीतून पाणी देण्यासाठी तृतीय सुप्रमा मंजुरीची कार्यवाही प्रगतीपथावर आहे.

****

लक्षवेधी सूचना क्र.४२७०

**महाराष्ट्र विधानसभा**

**सन २०२५ चे प्रथम (अर्थसंकल्पिय)अधिवेशन**

मा.श्री.समाधान आवताडे, विधान सभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम- १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना:-

"माहे फेब्रुवारी २०२५ मध्ये सुमारास सोलापूर जिल्ह्यातील विशेषत: पंढरपूर व मंगळवेढा तालुक्यातील पाणथळ व क्षारपड जमिनीचा प्रश्न ऐरणीवर येणे, विहिरींच्या पाणीपातळीच्या नियमकालिक निरीक्षणाद्वारे ठरविले जाणे त्यासाठी पावसाळयात व पावसाळा पूर्व ह्या हंगामात दर वर्षी नियतकालिक निरीक्षणे घेण्यात येणे, नुकत्याच झालेल्या निरीक्षणानुसार क्षारपड जमिनीमध्ये मोठ्या प्रमाणावर वाढ होणे, पंढरपूर व मंगळवेढा तालुक्यातील १ हजार हेक्टर जास्त जमिनी पाणथळ व क्षारपड होण्याची मुख्य कारण कालव्याद्वारे सिंचन होणाऱ्या पाण्याचा निचरा न होणे, पावसाच्या पाण्याचा मंदगतीने होणारा निचरा, रासायनिक खतांचा अति प्रमाणात वापर आणि सर्वात महत्वाचे कारण म्हणजे जिल्ह्यातून वाहत असणाऱ्या भीमा नदीमध्ये मोठया प्रमाणावर पाणी प्रदूषण दूषित होऊन क्षारता वाढणे, जमिनी क्षारपड झाल्यामुळे शेती उत्पादनामध्ये घट होऊन पीक उत्पादन कमी होणे, जमिनीचा पोत खराब होऊन पीक हंगामात घट होणे, याचा परिणाम शेतकऱ्यांची आर्थिक हाणी होत असणे, याच्यावर उपाय म्हणजे मोठया प्रमाणावर परिणामी अशी भूमिगत चर योजना राबविण्याची मागणी शेतकऱ्यां मार्फत होत असणे, सदरची योजना ही अत्यन्त प्रभावी असून दीर्घकाळ परिणाम करणारी असणे, क्षारपड जमिनींचे भविष्यात मोठे संकट उभे राहून अल्प भूधारक शेतकरी भूमिहीन होण्याची भीती निर्माण होणे, यावर शासनाने करावयाची उपाययोजना व कार्यवाही ."

---

**मा.मंत्री (जलसंपदा)(गोदावरी व कृष्णा खोरे पाटबंधारे विकास महामंडळ) यांचे निवेदन**

मोठ्या व मध्यम प्रकल्पांच्या लाभक्षेत्रात उद्भवणा-या पाणथळ व क्षारयुक्त जमीनींच्या समस्या सोडविण्यासाठी व क्षेत्राच्या सुधारणासाठी जलनिस्सारण चर योजना तयार करुन कार्यान्वित करणेकरीता जलसंपदा विभागाच्या अख्यातरीत सन १९६९ पासून "पाटबंधारे संशोधन व विकास संचालनालय, पुणे" हे कार्यालय कार्यान्वित आहे.

संचालनालयांतर्गत प्रकल्पांच्या लाभक्षेत्रात पाणथळ व क्षारयुक्त जमिनीचे क्षेत्र निश्चित करण्यासाठी पावसाळापुर्व व पावसाळ्यानंतर विहीरीची पाणी पातळी घेवून, तसेच जमिनीचे मातीपरीक्षण करून पाणथळ व क्षारपड जमिन निश्चित करण्यात येते. त्यानुसार क्षारपड/पाणथळ क्षेत्र निर्मुलनासाठी चर योजना प्रस्तावित केल्या जातात. कालव्याद्वारे सिंचनाकरीता देण्यात आलेल्या पाण्याचा अतिवापर होणे व पाण्याचा योग्य प्रमाणात निचरा न होणे, पावसाच्या पाण्याचाही मंदगतीने निचरा होणे तसेच रासायनिक खतांचा अति प्रमाणात वापर व प्रदुषित पाणी इत्यादी ही जमीन पाणथळ व क्षारपड होण्याची प्रमुख कारणे आहेत.

आज अखेरपर्यंत महाराष्ट्रातील विविध प्रकल्पांचे लाभक्षेत्रामध्ये एकूण ७९९ (२८८२.५४ कि.मी.च्या) खुल्या चर योजनांची बांधकामे पुर्ण करण्यात आली आहेत व यामुळे २,२३,१०५ हेक्टर क्षेत्र संरक्षित झाले आहे. पंढरपुर तालुक्यात ४० चर योजना पुर्ण झालेल्या असून त्या कार्यान्वित आहेत. सदर ४० खुल्या चर योजनांमुळे पंढरपुर तालुक्यातील ६५६२.८० हे. क्षेत्र संरक्षित झाले आहे.

सन २०२२-२३ चे बाधित क्षेत्र अहवालानुसार पंढरपुर तालुक्यामध्ये पाणथळ क्षेत्र ८४.०० हे. व क्षारपड क्षेत्र ५५६-.४० हे. असे मिळून तालुक्यातील एकूण बाधित क्षेत्र ६४०.४० हे. इतके आहे. मंगळवेढा तालुक्यामध्ये पाणथळ क्षेत्र ६.५० हे. व क्षारपड क्षेत्र १७५.२० हे. असे मिळून तालुक्यातील एकूण बाधित क्षेत्र १८१.७० हे. इतके आहे.

मागील काही वर्षांच्या बाधित क्षेत्र अहवालानुसार उजनी प्रकल्पाच्या लाभक्षेत्रामध्ये एकुण १९ नवीन चर (अंदाजित २५.५१ किमी लांबी) योजनांचे सर्वेक्षण पुर्ण झाले असून या प्रस्तावित १९ चर योजनांमुळे अंदाजित ११३६.८० हे. क्षेत्र संरक्षित होणार आहे. तसेच सद्यस्थितीत लाभधारकांचे मागणीनुसार पंढरपुर तालुक्यातील मोजे कोठाळी गावातील ५५ हे. बाधित क्षेत्राकरीता सर्वेक्षणांच्या कामांना सन २०२४-२५ चे प्रापणसूचीमध्ये मान्यता देण्यात आली आहे. उजनी प्रकल्पाच्या लाभक्षेत्रामध्ये घेण्यात आलेल्या नियतकालीक निरीक्षणानुसार पंढरपूर व मंगळवेढा तालुक्यामधील ८२२.१० हे इतके बाधित क्षेत्र आढळुन आले आहे.

शासन निर्णय दि.२०.०९.१९९१ नुसार मध्यम मातीतील खुल्या चरांसाठी रु.३१०० प्रति हेक्टर व खोल मातीतील खुल्या चरांसाठी रु.४००० प्रति हेक्टर इतके मापदंड निश्चित आहेत. तथापी, हा मापदंड अद्यावत झाला नसल्याने नविन चर योजना या मापदंडात बसत नाहीत. या अनुषंगाने महाराष्ट्र राज्याचे चर योजना मापदंड व कार्यपध्दती धोरण ठरविण्याकरिता शासन निर्णय दि.२५/०५/२०२२ अन्वये अपर मुख्य सचिव (जलसंपदा) यांचे अध्यक्षतेखाली आंतरविभागीय अभ्यासगटाची स्थापना करण्यात आली आहे. दि.२०/०८/२०२४ रोजी अभ्यासगटाची अंतिम बैठक पार पडली. सदर बैठकीत मध्यम मातीतील उघड्या चरांकरीता रु.२६३४९ प्रति हेक्टर व खोल काळ्या मातीतील उघड्या चरांकरीता रु.६२६२९ प्रति हेक्टर इतका मापदंड मंजूरीकरीता प्रस्तावित करणेत आला आहे. त्यानुसार राज्याच्या खुल्या चर योजनांचे मापदंड सुधारित करणे व कार्यपध्दतीचे धोरण निश्चित करण्याची कार्यवाही शासनस्तरावर प्रगतीपथावर आहे.

भूमीगत चर योजना संदर्भात पथदर्शी प्रकल्प हाती घेण्यात येत आहे. या योजनांच्या अनुभवावरुन उर्वरीत योजना हाती घेण्याचे नियोजित आहे. तसेच भूमीगत चर योजना राबविणेबाबत शेतक-यांच्या मागणीप्रमाणे बिगर प्रकल्प लाभक्षेत्र म्हणजेच उपसा योजनांचे लाभक्षेत्रामध्ये संबंधित गावाच्या क्षेत्रामध्ये नियतकालीक निरीक्षणे घेवून सर्वेक्षणही करण्यात येत आहे.

*********

## महाराष्ट्र विधानसभा
## सन २०२५ चे अर्थसंकल्पीय अधिवेशन

**मा. श्री. रवी राणा, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र. १६०८ पुढीलप्रमाणे:-**

"विद्यमान मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य यांनी दिनांक ०९ फेब्रुवारी २०२५ रोजी चे वॉर बैठकितून दिलेले निर्देशाप्रमाणे अमरावती जिल्ह्यातील निम्न पेढी प्रकल्पांतर्गत बाधित गावठाण मौजा सावरखेड व ततारपुर गावाचे पुनर्वसना करिता मौजा वलगावं येथील कृषी विभागाच्या ताब्यात असलेली जमीन उपलब्ध करून देणेबाबत जिल्हाधिकारी अमरावती यांनी त्यांचे पत्र क्रमांक ४२/२०२५ दिनांक १४ फेब्रुवारी २०२५ रोजी शासनाचे प्रधान सचिव जलसंपदा विभाग मंत्रालय मुंबई यांना प्रस्ताव पाठविला असणे, याच संबंधाने वरील संदर्भ घेत वी. स. स.लोकप्रतिनिधी यांनी विभागीय आयुक्त अमरावती यांना शासनासोबत पाठपुरावा करण्यासाठी माहे फेब्रुवारी महिन्याचे अखेरीस लेखी पत्र दिले असणे. वरील प्रकरणी शासनाचे कडे प्रस्तावित प्रस्तावातील जमीन मंजूर करण्याची आवश्यकता या संबंधाने शासनाने करावयाची कार्यवाही व उपायोजना."

## मा. मंत्री, जलसंपदा (विदर्भ,तापी व कोकण खोरे विकास महामंडळ) यांचे निवेदन

निम्न पेढी प्रकल्पाच्या बुडीत क्षेत्रात मौजा अळणगाव, गोपगव्हाण, हातुर्णा, कुंडखुर्द, कुंडसर्जापूर, सावरखेड, ततारपूर अशा एकूण ७ गावांचा समावेश आहे. त्यापैकी मौजा अळणगाव, गोपगव्हाण, हातुर्णा, कुंडखुर्द, कुंडसर्जापूर असे एकूण ५ गावांच्या नागरी सुविधांची कामे पूर्ण करण्यात आली असून जिल्हा परिषद, अमरावती यांना हस्तांतरीत करण्यात आलेले आहेत. बुडीत क्षेत्रातील उर्वरीत दोन गावठाणे सावरखेड व ततारपूर १०० टक्के पुनर्वसनास दिनांक २०/१०/२०२३ रोजी शासन स्तरावर मान्यता प्राप्त असून सदर गावठाणाचा भूसंपादन प्रस्ताव जिल्हाधिकारी कार्यालय, अमरावती यांचेकडून भूसंपादन प्रक्रिया कार्यवाहीत आहे.

सदर गावांच्या पुनर्वसनाकरीता द्यावयाचे भूखंड व नागरी सुविधांकरिता २५ हे. आर जमिनीची आवश्यकता आहे. त्यानुषंगाने ग्रामपंचायत कार्यालय कुंडखुर्द यांचे दिनांक ११/०७/२०२४ रोजीच्या ठरावानुसार महाराष्ट्र शासन, कृषी विभाग गट क्रमांक ११९ मौजा वलगाव, ता. जि. अमरावती व भाग-२ गट क्र. १३६ मागणी केली. सदर मागणीच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी कार्यालयाकडून दिनांक ०२/०८/२०२४ रोजीच्या पत्रान्वये प्रधान सचिव (मदत व पुनर्वसन) महसुल व वन विभागास प्रस्ताव सादर करण्यात आला. तद्नंतर पत्राच्या अनुषंगाने अपर मुख्य सचिव, जलसंपदा यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक २०/०८/२०२४ रोजी बैठक झाली. बैठकीत झालेल्या चर्चेनुसार मौजा सावरखेड व ततारपूर या गावांच्या पुनर्वसनाकरिता मौजा वलगांव येथील कृषी विभागाची गट क्र. ११९ मधील क्षेत्रफळ १३.५३ हे. आर. व गट क्र. १३६

क्षेत्रफळ १३.५६ हे. आर जमीन उपलब्ध करुन देण्याबाबत प्रस्ताव कृषी व पदुम विभागाला सादर करण्यात आला. सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने कृषी व पदुम विभागाने दिनांक ०३/१२/२०२४ रोजीच्या पत्रान्वये प्रस्तुत मागणी अमान्य करित असल्याचे जिल्हाधिकारी, अमरावती यांना कळविले.

जिल्हाधिकारी, अमरावती यांनी दिनांक ०२/०१/२०२५ रोजीच्या पत्रान्वये उक्त जमीन पुनर्वसनाकरिता उपलब्ध करुन देणेबाबत पुनर्विचार व्हावा असे (मदत व पुनर्वसन), महसुल व वन विभाग व जलसंपदा विभागास कळविले. तसेच विभागीय आयुक्त कार्यालय, अमरावती यांनी दिनांक ०९/०१/२०२५ रोजीच्या पत्रान्वये प्रधान सचिव (मदत व पुनर्वसन), महसुल व वन विभाग व अपर मुख्य सचिव, जलसंपदा यांना कृषी विभागाची उक्त जमीन जलसंपदा विभागास उपलब्ध करुन देण्याबाबत उचित आदेश होण्याची पुनश्चः विनंती केली.

मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे अध्यक्षतेखाली दिनांक ०९/०१/२०२५ रोजीच्या झालेल्या CM WAR ROOM MEETING मध्ये सदर कृषी विभागाची जागा मौजा सावरखेड व ततारपूर गावांच्या पुनर्वसनाकरिता देण्याबाबत निर्देश देण्यात आलेले आहेत. तसेच सदर जागेची पर्यायी जमीन कृषी विभागाला देण्याबाबत जिल्हाधिकारी. अमरावती यांना निर्देश देण्यात आलेले आहेत.

विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, नागपूर यांनी दिनांक १४/०२/२०२५ रोजीच्या पत्रान्वये, निम्न पेढी प्रकल्पांतर्गत बाधित गावठाण व मौजा सावरखेड व मौजा ततारपूर गावांचे पुनर्वसनाकरिता जमीन उपलब्ध करुन देण्याबाबत शासन स्तरावरुन पुढील कार्यवाही करण्यासाठी प्रस्ताव जलसंपदा विभागाला सादर केला आहे. याबाबत पुढील प्रक्रिया गतीने करण्यात येत आहे.

*************

लक्षवेधी सूचना क्र.१८३८

महाराष्ट्र विधानसभा

सन-२०२५ चे प्रथम (अर्थसंकल्पीय) अधिवेशन

सर्वश्री.विनोद अग्रवाल, संजय पुराम, विजय रहांगडाले, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम-१०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र.१८३८ खालीलप्रमाणे

**"गोंदिया जिल्ह्यातील गोंदिया व गोरेगाव या तालुक्यांमध्ये पांगोली नदीचा प्रवाह वाहत असणे, पांगोली नदीवर गोंदिया व गोरेगाव तालुक्यांमध्ये मृद व जलसंधारण विभागामार्फत विविध ठिकाणी कोल्हापुरी बंधाऱ्यांचे बांधकाम करण्यात आले असणे, उक्त बंधाऱ्यातील पाण्याचा दोन्ही गावातील शेतकरीवर्ग सिंचनाकरीता नियमित वापर करत असणे, पांगोली नदीतील पात्रांमध्ये मोठ्याप्रमाणात गाळ साचलेला असल्याने पाण्याचा प्रवाह उथळ झालेला असणे, दरवर्षी पावसाळयामध्ये पुराचे पाणी नदी पात्राचे लगतच्या गावांतील घरांमध्ये शिरुन अन्न/धान्याचे नुकसानासह पिकांचेसुध्दा मोठ्याप्रमाणात नुकसान होत असणे, त्यामुळे नागरिकांमध्ये असंतोषाचे वातावरण निर्माण झालेले असणे, सन २०२२ मध्ये मृद व जलसंधारण विभागाने नदीचे सर्वेक्षण करुन डिपीआर तयार करणे, जिल्ह्यातील नद्यांचे यादीमध्ये पांगोली नदीचा समावेश करण्यात येणे, शासनाच्या नव्या धोरणानुसार नदीचे पुनरुज्जीवन जलसंपदा विभागाकडे वर्ग करण्यात आल्यावर विभागाने उक्त डिपीआरमध्ये त्रुटी काढुन नव्याने डिपीआर तयार करण्याचा प्रस्ताव वरीष्ठांना पाठविण्यात येणे, परंतु अद्यापही सर्वेक्षण करण्यात आले नसणे, पुरामुळे होत असलेले नुकसान व सर्वेक्षण करण्यास होत असलेल्या दिरंगाईमुळे नागरिकांमध्ये असलेले असंतोषाचे वातावरण त्यावर शासनाचे करावयाची तातडीची कार्यवाही व उपाययोजना."**

---

**मा.मंत्री(जलसंपदा)(विदर्भ, तापी व कोकण पाटबंधारे विकास महामंडळ) यांचे निवेदन**

कार्यकारी अभियंता, गोंदिया पाटबंधारे विभाग, गोंदिया अंतर्गत ७ मध्यम प्रकल्प, २० लघु प्रकल्प, व ३८ जुने मालगुजारी तलाव तसेच १ उपसा सिंचन योजना व २ कोल्हापुरी बंधारे असे एकून ६८ प्रकल्पांचे सिंचन व्यवस्थापनाचे कामे केली जातात, एकून ६८ प्रकल्पाची सिंचन क्षमता ४६१४० हेक्टर असून निर्मित सिंचन क्षमता ४५३०७ हेक्टर आहे. या प्रकल्पाद्वारे मागील ५ वर्षात सरासरी २५७२३ हेक्टर प्रत्यक्ष सिंचन झाले आहे.

शासन निर्णय, जलसंपदा विभाग, दि.२५.०७.२०२३ आणि दि.२१.०९.२०२३ रोजीच्या शुध्दीपत्रकान्वये महाराष्ट्र राज्यातील नागरी व शहरी क्षेत्राच्या लगत वाहणाऱ्या अधिसूचित नद्यांची वहन क्षमता पुन:स्थापित करण्याचे धोरण व कार्यपध्दती निश्चित करण्यात आली आहे. तसेच, "वहन मार्गातील अडथळा" काढण्याची कार्यवाही जलसंपदा विभागाने अधिसूचित केलेल्या उपरोक्त दि.२५.०७.२०२३ रोजीच्या शासन निर्णयासोबतच्या परिशिष्ट-१ मध्ये दर्शविण्यात आलेल्या राज्यातील एकूण १४२ नद्यांमधील एकूण १६०८.८३ कि.मी. लांबीपैकी ज्या लांबीमध्ये गाळ साठवून नद्यांच्या प्रवाहामध्ये मोठया प्रमाणात अडथळे निर्माण झालेले आहेत त्या लांबीमध्येच प्रथम टप्प्यात करण्यात यावी, अशी तरतूद करण्यात आली आहे. सदर दि.२५.०७.२०२३ रोजीच्या शासन निर्णयासोबतच्या परिशिष्ट-१ मध्ये दर्शविण्यात आलेल्या एकूण १४२ नद्यांमध्ये लक्षवेधी सूचनेमध्ये नमूद पांगोली नदीचा समावेश नाही. त्यामुळे पांगोली नदीतील गाळ काढण्याची कार्यवाही उपरोक्त शासन निर्णयातील तरतुदीनुसार करता येत नाही.

महसूल व वन विभागाच्या दि.१६.०२.२०२४ रोजीच्या शासन निर्णयान्वये शासनामार्फत वाळू / रेतीचे उत्खनन साठवणूक व ऑनलाईन प्रणालीदवारे विक्री याबाबतचे सर्वकष सुधारीत धोरण निश्चित करण्यात आलेले आहे. तरी, पांगोली नदीचे खोलीकरण करणे आवश्यक असल्यास महसूल व वन विभागाच्या दि.१६.०२.२०२४ रोजीच्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखालील जिल्हास्तरीय समितीमार्फत उचित निर्णय घेवून करण्याचे नियोजित आहे.

******

लक्षवेधी सूचना क्र. ८६६

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२५ चे प्रथम अर्थसंकल्पीय अधिवेशन

श्री. भास्कर जाधव, मा. विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र. ८६६ पुढीलप्रमाणे आहे :-

"रत्नागिरी येथे कांदळवन व वनविभागामार्फत माहे फेब्रुवारी २०२५ मध्ये एका अलिशान हॉटेलमध्ये कांदळवन प्रशिक्षण कार्यशाळेचे करण्यात आलेले आयोजन. कांदळवनाचे संरक्षण कसे करावे, त्याचे फायदे-तोटे, समुद्रात जाळयामध्ये प्राणी अडकला तर त्याची सुटका कशी करावी, नुकसान झाले तर त्याची भरपाई कशी मिळवावी, किनाऱ्यावर अडकलेल्या डॉल्फिन माशाला कसे रेस्क्यू करावे आदींबाबत माहिती देण्यासाठी सदर कार्यशाळेचे आयोजन करण्यात येणे, पोलिसदल, कस्टम, कोस्टगार्ड, मत्स्यविभाग, मच्छीमार सोसायटी, सुरक्षादल कर्मचारी अशा केवळ १३० जणांच्या उपस्थितीत चार तासांसाठी झालेल्या कार्यशाळेसाठी तब्बल ७.५० लाख रुपये खर्च करण्यात आल्याची धक्कादायक बाब समोर येणे, वास्तविक शासकीय विश्रामगृहासह शासनाच्या विविध हॉलमध्ये हा कार्यक्रम घेता आला असता, यातून शासनाच्या पैशाची बचत झाली असती. परंतु, या प्रशिक्षणामध्ये मोठया प्रमाणात पैशांचा चुराडा आणि गैरव्यवहार झाल्याचे स्पष्ट होणे, या प्रकरणाची चौकशी करण्याचे आदेश मा.पालकमंत्री, रत्नागिरी यांनी दिले असले तरी त्यावर अद्याप कोणतीही कार्यवाही न होणे, त्यामुळे संबंधित अधिकाऱ्यांना पाठीशी घातले जात असल्याची झालेली भावना, निर्माण झालेला संशय, या संपूर्ण प्रकाराची सखोल चौकशी होवून संबंधितांवर कठोर कारवाईची होत असलेली मागणी, यावर शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना"

---

मा.मंत्री (वने) श्री. गणेश नाईक

निवेदन

कांदळवनांच्या संरक्षणाबाबत जनजागृती, कांदळवन व त्यावर अवलंबून परिसंस्थेचे फायदे-तोटे, मच्छिमारांच्या जाळयात अडकलेल्या दुर्मीळ प्रजातींची सुटका व त्यापोटी मासेमारी जाळयाच्या झालेल्या नुकसानीची भरपाई बाबतच्या अटी व शर्ती, जखमी वा मृत डॉल्फीन / शार्क मासा इत्यादी समुद्रजीवांवर उपचार करणे, त्यांना पुन्हा समुद्रात सोडणे इत्यादी विषयांवर सखोल माहिती देणे व साधकबाधक चर्चा करणे व त्याबाबतचे प्रात्यक्षिक दाखवणे याककरिता "Marine Animal Stranding Response" या विषयावर कांदळवन प्रतिष्ठान व मे. बॉम्बे नॅचरल हिस्ट्री सोसायटी यांच्या संयुक्त विद्यमाने दि. ११/०२/२०२५ रोजी रत्नागिरी येथे एकदिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.

सदर कार्यशाळेस विविध क्षेत्रातील तज्ञ, वन विभाग चिपळूण (प्रादेशीक) अधिकारी/कर्मचारी, मत्स्यविभाग रत्नागिरी, महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड, स्थानिक मच्छीमार, मासेमारी सहकारी संस्था, स्वयंसेवी संस्था (वाईल्ड लाईफ कंझर्वेशन सोसायटी), सह्याद्री निसर्ग मित्र, सृष्टीज्ञान फाउंडेशन, निसर्ग सोबती, सृष्टी कंझर्व्हेशन फाऊंडेशन, कोस्टल

गार्ड, नेव्ही, पोलीस विभाग, कस्टम विभाग, पत्रकार, कांदळवन कक्ष, मुंबई, रत्नागिरी, रायगड, सिंधुदूर्ग, मे. बॉम्बे नॅचरल हिस्ट्री सोसायटीचे पदाधिकारी, कर्मचारी असे विविध क्षेत्रातील एकूण १३५ जण उपस्थित होते.

सदरची कार्यशाळा सकाळी १०.३० ते सायंकाळी ६.०० पावेतो कार्यान्वित होती व त्यास उक्त नमूद लोकांचा उत्तम प्रतिसाद प्राप्त झाला.

रत्नागिरी येथे वन विभागाचे विश्रामगृह नाही तसेच शासकीय विश्रामगृहात एकूण १२ कक्ष असून त्यापैकी सर्व कक्ष दि. १०/०२/२०२५ व दि. ११/०२/२०२५ रोजी उपलब्ध नव्हते. त्याचप्रमाणे एकूण १२० ते १५० प्रशिक्षणार्थी बसू शकतील अशा क्षमतेचे सभागृह उपलब्ध नव्हते. प्रस्तूत कार्यशाळेकरिता रत्नागिरी येथे इतर जिल्हयातून येणारे तज्ञ/ शासकीय /अशासकीय १५ सदस्यांकरिता निवासाची सोय, वाहतूकीकरिता वाहन व्यवस्था व साधारण १२० ते १५० लोकांची बैठक व्यवस्था असलेले सुसज्ज सभागृह व इतर अत्याधुनिक सुविधा जसे LED Screen, माइक्रोफोन इ. व्यवस्थेचे नियोजन आवश्यक होते.

यास्तव, वनक्षेत्रपाल रत्नागिरी (कांदळवन) यांनी त्यांचे कार्यालयातील नोटीस बोर्डवर जाहिरात प्रसिध्द करुन याबाबतची दरपत्रके मागविलेली होती. त्यानुसार "सावंत पॅलेस, रत्नागिरी" यांचे दरपत्रक कमीतकमी दराचे असल्याने त्यांना मंजूरी देऊन निवड करण्यात आली. प्रस्तूत प्रकरणी कोणताही गैरव्यवहार झालेला नाही.

---

लक्षवेधी सूचना क्र.२२१४

**महाराष्ट्र विधानसभा**

**श्रीमती देवयानी फरांदे, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम-१०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्र. २२१४ खालीलप्रमाणे आहे:-**

"गरीब शेतकरी व नागरिकांना न्याय देता यावा यासाठी तहसीलदार यांना विशेष अधिकार दिले असणे, श्री अजित पाटील तहसीलदार खंडाळा यांनी मात्र त्यांच्या अधिकाराचा गैरवापर करून शेतकऱ्यांवर अन्याय करणे, महाराष्ट्र महसूल अधिनियम कलम १५५ हे टंकलेखित चूक दूर करण्यासाठी तयार केलेले असताना सदर कलमाचा गैरवापर करू सातबारा बंद करण्याचा बेकायदेशी निर्णय घेणे, मौजे लोणंद गट नंबर ३८२/१/अ/१/ब हे क्षेत्र शेती क्षेत्र असताना देखील व याबाबत पंचनामा झालेल्या असताना देखील तसेच भूमी अभिलेख विभागाने सुनावणी घेऊन सदर क्षेत्र कृषी क्षेत्र असल्याने सातबारा सुरू ठेवणे गरजेचे असल्याचा निकाल देणे, याबाबत तहसीलदारांनी दिलेल्या आदेशान्वये पाहणी पंचनामा करून सदर क्षेत्रावर शेती सुरू असल्याचे महसुली अधिकाऱ्यांनी नमूद करणे, महसूल अधिनियम कलम १२२ प्रमाणे एखाद्या जमिनीचा वापर शेतीसाठी सुरू असताना सदर ठिकाणचा सातबारा बंद करण्यात येऊ नये असे आदेश असताना महसूल अधिनियमाचा भंग करून सातबारा बंद करण्याचा आदेश देणे, या संपूर्ण प्रक्रियेत मोठ्या प्रमाणावर आर्थिक गैरव्यवहार करून सदर बेकायदेशीर निर्णय दिला असल्याच्या तक्रारी प्राप्त होणे, याप्रकरणी वरिष्ठ पातळीवरून सखोल चौकशी करण्याची असणारी आवश्यकता, शासनाचे सदर बाबीकडे होत असणारे दुर्लक्ष, त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये निर्माण झालेली असंतोषची भावना, याबाबत शासनाने करावयाची तत्काळ कार्यवाही व प्रतिक्रिया."

---

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे, मा.मंत्री (महसूल) यांचे निवेदन**

श्री.गणेश सुदाम क्षीरसागर, रा.लोणंद, ता.खंडाळा, जि.सातारा यांनी दि.२२/११/२०२३ रोजीचे अर्जान्वये मौजे लोणंद, ता.खंडाळा येथील सर्व्हे नं./गट नं.३८२/१/अ/१/ब चा न.भु.क्रं. ४८/३८२/१अ/१ब सुरु आहे. त्यामुळे दुहेरी नोंद पध्दती मुळे ७/१२ सदरी बेकायदेशीर वारस नोंदी, बँक बोजे व बेकायदेशीर फेरफार नोंदविले जात असुन पुढेही नोंदविले जाण्याची शक्यता असल्याने मौजे लोणंद, ता.खंडाळा येथील सर्व्हे नं./गट नं.३८२/१/अ/१/ब चा ७/१२ बंद करणेबाबत तहसिलदार, खंडाळा यांना विनंती केलेली होती.

सदर विनंती अर्जानुसार तहसिलदार, खंडाळा यांनी दोन्ही पक्षकारांची वेळोवेळी सुनावणी घेतली. मौजे लोणंद येथील प्रस्तुत मिळकतीमध्ये मालमत्ता पत्रक व ७/१२ हे दोन्ही दस्तऐवज सुरु असून, त्यापैकी एक दस्तऐवज बंद करणे आवश्यक आहे. मौजे लोणंद येथे सिटी सर्व्हे योजना लागू असल्याने ज्या भागात सदर योजना लागू आहे, त्याठिकाणचे ७/१२ उत्तारे बंद करुन मालमत्ता पत्रक चालु ठेवण्याबाबत शासन परिपत्रकामध्ये नमूद आहे. त्यामुळे मौजे लोणंद येथील गट नं.३८२/१/अ/१/ब चा ७/१२ बंद करुन मालमत्ता पत्रक सुरु ठेवणे आवश्यक आहे, असा निष्कर्ष नोंदवून तहसिलदार, खंडाळा यांनी महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ चे कलम १५५ व जमाबंदी आयुक्त आणि संचालक भुमि अभिलेख, पुणे यांचे परिपत्रक दि.३०/०८/२०१८ मधील तरतुदीन्वये मौजे लोणंद येथील गट नं.३८२/१/अ/१/ब चा ७/१२ बंद करण्याचे आदेश दि.२४/०९/२०२४ रोजी पारीत केले.

सदर आदेशावर नाराज होऊन श्री.भरत रामचंद्र जमदाडे व इतर १० यांनी उपविभागीय अधिकारी, वाई उपविभाग, वाई यांचेकडे महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ मधील कलम २४७ अंतर्गत अनुक्रमे दि.०९/१०/२०२४ व दि.२९/११/२०२४ रोजी अपिल व स्थगिती अर्ज दाखल केला होता. त्यानुषंगाने उपविभागीय अधिकारी, वाई उपविभाग, वाई यांच्या दि.०३/१२/२०२४ अन्वये सदरचे प्रकरण अपर जिल्हाधिकारी, सातारा यांचेकडे दाखल करेपर्यंत "जैसे थे" परिस्थिती कायम ठेवणेबाबतचे आदेश दिले व सदर प्रकरण इतर उपविभागीय अधिकारी यांचेकडे वर्ग करण्याची विनंती केली. त्यानुसार सदर अपिल उपविभागीय अधिकारी, फलटण उपविभाग, फलटण यांचेकडे दि.१३/०३/२०२५ रोजी वर्ग करण्यात आले आहे.

सदर अपिल अर्जावर उपविभागीय अधिकारी, फलटण उपविभाग, फलटण यांचे न्यायालयात महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ मधील कलम २४७ अन्वये अपिल अर्जाचे अर्धन्यायिक कामकाज सुरु असून

अध्यक्षतखाली समिती नियुक्त करण्यात आलेली आहे.

*****************************************

सुनावणीदरम्यान "जैसे थे" परिस्थिती कायम ठेवण्यात आली आहे. अपिल अर्जाबाबत अद्याप पर्यंत अंतिम निर्णय पारीत करण्यात आलेला नाही.

मौजे लोणंद, ता.खंडाळा येथील न.भु.क्रं. ४८/३८२/१अ/१ब या मालमत्ता पत्रकावर ८२९६०.३० चौ.मी. [illegible]

9587651793 - [illegible] - [illegible]

clerk

## सन २०२५ चे पहिले (अर्थसंकल्पीय) अधिवेशन

कॅप्टन आर. सेल्वन,मा.विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे:-

"सायन कोळीवाडा मतदारसंघात महाराष्ट्र शासनाच्या महसूल विभागाचा १९ एकर भूखंड असून हा भूखंड एका केमिकल कंपनीला विभागातील रहिवाशी यांना रोजगार उपलब्ध होईल या अनुषंगाने जिल्हाधिकारी कार्यालय, मुंबई शहर यांनी मनापातर्फे अँटॉपहिल वेअर हाउस बांधण्याकरिता भाडेतत्वावर देण्यात आला असणे, सदर भूखंड ज्या मुख्य कारणाने नमूद कंपनीला देण्यात आला होता त्याकरिता वापर होत नसणे, सदर भूखंडावर जी इमारत बांधली आहे ती नियमबाह्य पद्धतीने बांधण्यात आली असणे, सदर जागेचा व्यावसायिक पद्धतीने स्व-फायद्यासाठी वापर होत असणे, नियमबाह्य पद्धतीने गाड्या पार्क करण्याकरिता पे अँड पार्क सुरू असल्याचे निदर्शनात येणे, मा. उच्च न्यायालयाने याविषयी निर्णय घेण्याचा अधिकार महसूल विभागाकडे असल्याचे आपल्या आदेशात मध्ये नमूद केले असणे, सायन कोळीवाडा विभागात ५०००० पेक्षा जास्त युवक रहात असून त्यांना खेळण्याकरिता जवळपास योग्य खेळाचे मैदान उपलब्ध नाही म्हणून सदर भूखंड शासनाने ताब्यात घेऊन आंतरराष्ट्रीय दर्जाचे खेळाचे मैदान उभारावे या करिता मागील कित्येक वर्षापासून स्थानिक लोकप्रतिनिधी प्रयत्न करीत असणे, मात्र आजतागायत विभागात खेळाचे मैदान उपलब्ध न होणे, यामुळे स्थानिक युवकांमध्ये शासनाप्रती निर्माण झालेली असंतोषाची भावना, सदर ठिकाणी आंतरराष्ट्रीय दर्जाचे खेळाचे मैदान बांधून खेळाडूंना प्रोत्साहित करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

---

## श्री.चंद्रशेखर बावनकुळे, मा.मंत्री (महसूल) यांचे निवेदन

मुंबई शहर जिल्ह्यातील सॉल्ट पॅन मधील १९.०७ एकर इतकी जमीन शासन निर्णय दि.१२.११.१९७५ अन्वये बृहन्मुंबई महानगरपालिका यांना ९९ वर्षाच्या भाडेपट्टयाने दिलेली होती. प्रस्तूत जमीन ही आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांना प्रदान करणेत आलेली होती. सदर जागेपैकी कृष्णा स्टिल कंपनी व बेस्ट यांना मंजूर केलेले २ एकर क्षेत्र वगळून उर्वरीत १७.२६ एकर जमीन बृहन्मुंबई महानगरपालिका यांच्या प्रत्यक्ष ताब्यात दि.१४.०१.१९७६ रोजी दिले. सदर भाडेपट्टयाने देण्यात आलेल्या मिळकतीचे प्रयोजन रासायनिक गोदाम बांधकाम करणे असा होता.

बृहन्मुंबई महानगरपालिका यांनी दि.२२.०४.१९८० रोजी संयुक्त मोजणी प्रमाणे येणारे क्षेत्र १७.२५ एकर (७०६९५.९६ चौ.मी.) इतक्या क्षेत्राचा ताबा मे.इंडीयन मर्चंट चेंबर्स यांना दिला. सदर जमीन इंडीयन मर्चंट चेंबर्स यांना केवळ रासायनिक गोदाम साठी उपभाडेपट्टयाने दिलेली असल्याने बृहन्मुंबई महानगरपालिका यांनी सदर उपभाडेपट्टयाच्या प्रस्तावास मान्यता देण्याची शासनास विनंती केल्याने सदर प्रस्तावास दि.१७.१०.१९८३ अन्वये मान्यता दिलेली आहे. तद्नंतर दि.१८.०४.१९८४ अन्वये मुळ आदेशातील शर्त क्र.४ मध्ये बदल करून मे.ॲन्टॉप हिल वेअर हाऊसिंग कंपनी लि. यांना उपभाडेपट्टयाने देण्यास मंजूरी देण्यात आलेली आहे.

जिल्हाधिकारी, मुंबई शहर यांनी दि.१७.०८.२०१० रोजी मिळकतीवर अतिक्रमण होवू देणे, ज्या प्रयोजनासाठी जमीन प्रदान करणेत आलेली आहे, त्या प्रयोजनासाठी वापर न करता व्यापारी प्रयोजनाकरीता वापर करणे, या शर्तभंगाबाबतचा अहवाल जिल्हाधिकारी, मुंबई शहर यांनी शासनास सादर केला. त्यानुषंगाने, मा.मंत्री (महसूल) यांचेकडे सदर प्रकरणी सुनावणी घेण्यात आलेली असून दि.२०.०९.२०१२ रोजी भाडेपट्टयाने देण्यात आलेल्या १९.०७ एकर क्षेत्र जमिनीबाबत भाडेपट्टाधारकाने व उपभाडेपट्टाधारकाने भाडेपट्टा मंजूरी आदेशातील अटी व शर्तीचा भंग केल्याप्रकरणी शर्तभंगाची कार्यवाही करण्यात येवून कंपनीने बांधलेल्या ६२४ गाळयांनी व्यापलेल्या क्षेत्राव्यतिरिक्त उर्वरीत झोपडपट्टीने अतिक्रमीत असलेल्या क्षेत्रासह मोकळे क्षेत्र शासन जमा करण्याबाबत व ६२४ गाळयानी व्यापलेल्या क्षेत्राबाबत जिल्हाधिकारी, मुंबई शहर यांनी गाळे धारकांचा तपशील प्राप्त करून घेऊन शर्तभंगाबाबत स्वयंस्पष्ट व बोलके आदेश पारित करण्याचे निर्देश दिले. सदर आदेशाला ॲन्टॉप हिल वेअर हाऊसिंग कंपनी यांनी मा.उच्च न्यायालय रिट पिटीशन क्र.२६१७/२०१२ नुसार आव्हानीत केले. मा.उच्च न्यायालयाने याप्रकरणी मा.मंत्री (महसूल) यांचे आदेश रद्द करून शासनाने नव्याने सुनावणी घेवून आदेश पारित करणेचे निर्देश दिले.

मा.उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार सदर प्रकरण अपिल अर्ज प्रधान सचिव व विशेष कार्य अधिकारी (अपिल व रिव्हीजन) यांच्याकडे सुनावणीसाठी वर्ग करण्यात आले. सदर प्रकरणात सुनावणी घेवून प्रधान सचिव तथा विशेष कार्य अधिकारी (अ.व रि.), यांनी दि.२७.०८.२०१९ रोजी आदेश पारित केले. सदर आदेशात प्रस्तुत मिळकतीचा भाडेपट्टा बृहन्मुंबई महानगरपालिका सोबत करावा व बृहन्मुंबई महानगरपालिकाने सदर मिळकतीचा उपभाडेपट्टा ॲन्टॉप हिल वेअर हाउसिंग कंपनी लि. सोबत करावा आणि सदर मिळकतीचे आरक्षण रासायनिक गोदाम बदल करून I- ३ झोन मध्ये रूपांतरीत करण्यास अनुमती द्यावी, असे नमूद केले आहे. प्रधान सचिव व विशेष कार्य अधिकारी (अ.व रि.) यांच्या सदर आदेशावर जिल्हाधिकारी, मुंबई शहर यांनी पुनर्विलोकन करण्याची विनंती केली. यानुसार मा. मंत्री (महसूल) यांनी पुनर्विलोकन अर्ज महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ चे कलम २५८ अन्वये दाखल केले. तद्नंतर सदर प्रकरणी वेळोवेळी सुनावणी घेऊन दि.२३.०९.२०२४ रोजी आदेश पारित केले. सदर आदेशात ॲन्टॉप हिल वेअर हाऊसिंग कंपनी लि. यांच्यासोबत भाडेपट्टा करार करावा, भाडेपट्टयाचा दस्त ३ महिन्याच्या आत निष्पादीत करावा व ॲन्टॉप हिल यांनी वादमिळकतीचा वापर बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या विकास नियंत्रण नियमावलीतील तरतूदीनुसार करावा, असे निर्देश दिले. त्यानुसार जिल्हाधिकारी, मुंबई शहर यांनी भाडेपट्टा निष्पादनाची कार्यवाही केली आहे. त्यामुळे सद्यस्थितीत ही जमीन खेळाच्या मैदानासाठी उपलब्ध करुन देता येत नाही.

सदर मिळकतीवर पैसे घेऊन पार्किंगचा वापर होत असल्याबाबतच्या अनुषंगाने स्थळपहाणी केली असता, सदर मिळकतीवर पार्किंगचा वापर होत असून याबाबत जिल्हाधिकारी, मुंबई शहर यांची कोणतीही परवानगी घेण्यात आलेली नाही. त्यामुळे संबंधितांना कारणे दाखवा नोटीस देऊन आवश्यक ती कार्यवाही करण्याबाबतची तजवीज ठेवण्यात आली आहे.

***************

महाराष्ट्र विधानसभा
सन २०२५ चे प्रथम (अर्थसंकल्पिय) अधिवेशन

**महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये श्री. नारायण पाटील, ॲड राहूल कुल, विधानसभा सदस्य यांनी उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना क्र.४३५ पुढीलप्रमाणे:-**

"सोलापूर जिल्ह्यातील उजनी धरण पूर्ण होऊन आता ४५ वर्षे पूर्ण झालेली असणे, उजनी धरणासाठी करमाळा तालुक्यातील २९ व इंदापूर तालुक्यातील ३२ वाडी वस्त्यांनी आपल्या जमिनी कवडीमोल दरात शासनास देणे, धरणं पूर्ण होऊन पुणे, सोलापूर व अहिल्यानगर जिल्ह्यातील काही तालुक्यांना वरदान ठरणे, त्यामुळे बागायतदार शेतकरी, शेतीपूरक व्यवसाय, सहकारी व खाजगी साखर कारखानदारी, दुग्धव्यवसाय वाढणे, त्यामुळे अनेकांना रोजगार मिळणे, परंतु धरणासाठी त्याग केलेल्या भूमिपुत्रांचे प्रश्न अद्यापही सुटलेले नसणे, उजनी धरण पुनर्वसित गावांमध्ये रस्ते स्मशानभूमीस शासनाने १४ आश्वासने दिलेली असणे परंतु त्याची अंमलबजावणी व्यवस्थित झाली किंवा नाही ते पुन्हा तपासण्यात न नये, पंढरपूर तालुक्यात ज्या शेतकऱ्यांना पर्यायी जमिनी मिळाल्या त्या जमिनी ताब्यात घेताना स्थानिकांची दहशत निर्माण होणे, त्यामुळे अनेकांनी मिळालेल्या पर्यायी जमीनी मिळेल त्या किमतीत वहीवाटधारकांना विकणे, या सर्व प्रकाराकडे शासनाचे दुर्लक्ष होत असल्यामुळे धरण प्रकल्पग्रस्तांमध्ये शासनाप्रती वाढता तीव्र असंतोष, तसेच उजनी धरणग्रस्त व पुनर्वसित गावांचे प्रश्न प्राधान्याने सोडविण्यासाठी उजनी धरण प्रकल्पग्रस्त लाभविकास प्राधिकरणाची स्थापना करावी अशी मागणी धरणग्रस्त नागरिकांकडून होत असणे, शासनाने उक्त प्रकरणी तातडीने चौकशी करून उजनी धरण प्रकल्पग्रस्तांना न्याय मिळावा याकरिता निर्णयात्मक कार्यवाही करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने केलेली कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

---

**डॉ. राधाकृष्ण विखे पाटील, मा. मंत्री, जलसंपदा (गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) यांचे निवेदन**

सोलापूर जिल्ह्यातील उजनी धरणामुळे सोलापूर जिल्ह्यातील करमाळा तालुक्यातील २२, माढा तालुक्यातील ११ व पुणे जिल्ह्यातील इंदापूर तालुक्यातील २२ गावठाणे विस्थापित झालेली आहेत. या गावठाणातील बाधित लोकांचे सोलापूर जिल्ह्यातील करमाळा तालुक्यातील ३०, माढा तालुक्यातील ११, पंढरपूर तालुक्यातील २३, मोहोळ तालुक्यातील ३ तसेच पुणे जिल्ह्यातील इंदापूर तालुक्यातील ३३ गावाठाणात व आहिल्यानगर जिल्ह्यातील कर्जत तालुक्यातील ३ गावठाणात पुनर्वसन करण्यात आलेले आहे.

उजनी प्रकल्प हा सन १९७६ पूर्वीचा प्रकल्प असून पुनर्वसन अधिनियम सन १९७६ नुसार १८ नागरी सुविधांची कामे करण्यात येत आहेत. सद्य:स्थितीत करमाळा व इंदापुर तालुक्यातील पुनर्वसित गावठाणात पुरविण्यात आलेल्या नागरी सुविधांची सद्य:स्थिती खालीलप्रमाणे आहे:-

उजनी प्रकल्पांतर्गत सोलापूर जिल्ह्यातील करमाळा, पंढरपूर, माढा, मोहोळ व पुणे जिल्ह्यातील इंदापूर आणि अहिल्यानगर जिल्ह्यातील कर्जत या तालूक्यांतर्गत प्रकल्पग्रस्त राहत असलेल्या गावठाणांची संख्या ९४ असून त्यांना देय नागरी सुविधा १६९२ इतक्या आहेत. त्यापैकी १४२० इतक्या नागरी सुविधा पुरविण्यात आल्या आहेत. एकुण शिल्लक २७२ नागरी सुविधांपैकी प्रगतीपथावरील नागरी

सुविधा १३९ असून त्यांची कामे मार्च २०२६ अखेर पुर्ण करुन जिल्हा परिषदेकडे हस्तांतरीत करण्याचे नियोजन आहे. तसेच अंदाजपत्रके सादर करण्यात आलेल्या नागरी सुविधांची संख्या ६४ असून, सदर अंदाजपत्रकांना प्रशासकीय मान्यतेनंतर कामे करण्याचे नियोजन आहे. एकुण शिल्लक ६९ नागरी सुविधांमध्ये प्रामुख्याने शेती पोहोच रस्ते या सुविधा असून याबाबत महाराष्ट्र राज्य पुनर्वसन प्राधिकरण तथा राज्य पुनर्वसन व पुनर्स्थापना सनियंत्रण समितीच्या दिनांक १३/०७/२०२१ रोजीच्या बैठकीत शेती पोहोच रस्ता ही नागरी सुविधा देण्यासंदर्भात धोरण निश्चित करण्याबाबतच्या प्रस्तावास मान्यता नसल्याने सादर सुविधेची कामे हाती घेण्यात आलेली नाहीत.

प्रस्तुत प्रकरणी धरणग्रस्तांच्या मुलभूत समस्या सोडविण्यासाठी धरण प्रकल्पग्रस्त लाभ विकास प्राधिकरण स्थापन करण्याची मागणी जिल्हाधिकारी कार्यालयास व विभागास प्राप्त झालेली नाही. सदरील प्राधिकरण स्थापन करण्याची बाब धोरणात्मक आहे. पंढरपूर तालूक्यामध्ये हद्द निश्चित करणे व रस्ता मिळणेसाठी एकुण ९ अर्ज जिल्हाधिकारी कार्यालयांतर्गत प्राप्त झाले. तहसिलदार पंढरपूर यांनी सदर प्रकरणी उपविभागीय अधिकारी, पंढरपूर यांना अहवाल सादर केला असून पुढील कार्यवाही सुरु आहे. वहिवाट अडथळ्यासंदर्भात तहसिलदार पंढरपूर, यांचेकडे एकुण ९ प्रकरणे प्राप्त झाली आहेत. त्यापैकी ७ प्रकरणांवर कार्यवाही सुरु असून २ प्रकरणे निकाली काढण्यात आली आहेत.

****

**लक्षवेधी सूचना क्रमांक ६९२.**

**महाराष्ट्र विधानसभा**

**सन २०२५ चे प्रथम (अर्थसंकल्पीय) अधिवेशन**

**श्री.शंकर जगताप व श्री.महेश लांडगे, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम-१०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे :-**

"उद्योगनगरी पिंपरी चिंचवड शहराला भीषण पाणीटंचाई भासत असणे. सद्यस्थितीत शहराला पवना धरणातून ६.५५ टीएमसी पाणी व आंध्रा धरणातून १.३३ पाणीपुरवठा करण्यात येणे व २०२५ साली भामा आसखेड धरणातून २.१४ टीमसी पाणी मिळण्याची शक्यता असणे. शहरला दररोज पाणी टंचाई अभावी एक दिवसाआड पाणीपुरवठा केला जाणे. शहराची वाढती लोकसंख्या व वाढते नागरीकरण व पिण्याच्या पाण्याची वाढती मागणी लक्षात घेता अनेक गृहरचना संस्थांना दरवर्षी सुमारे १०० कोटी रुपयांचे पाणी टँकरने विकत घ्यावे लागणे, शहरातील सुमारे ४०% पाण्याची गळती लक्षात घेता व उद्योगनगराची २०४१ साली जवळपास ९६ लाखाची वाढत्या लोकसंख्येचा अनुमान पाहता १९.८७ टीएमसी पाणी वापर गरज असणे, टाटा कंपनीच्या मालकीच्या मुळशी धरणाचे पाणी वीजनिर्मिती प्रकल्पासाठी वापरले जाणे. धरणाच्या आजूबाजूच्या काही भागांनाच येथून पुरवठा होणे. परिणामी टाटा धरणातून ९.८८ टीएमसी अतिरिक्त पाणीसाठा उद्योगनगरीकरता राखीव ठेवण्याबाबत मनपाने पत्रव्यवहाराद्वारे वारंवार जलसंपदा विभागाकडे मागणी करूनही पाण्याचा वाढीव कोटा अद्यापही मंजूर न होणे. शहराची पाण्याची वाढती निकड लक्षात घेता सदर प्रस्ताव मंजुरी अभावी प्रलंबित असणे, शासनाचे होत असलेले दुर्लक्ष, नागरिकांच्या मनामध्ये पसरलेला असंतोषाचे वातावरण, टाटाच्या मुळशी धरणाचा उद्योगनगरीकरता पिण्याकरता पाण्याचा कोठा राखीव ठेवण्याकरता शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही तातडीची उपाययोजना."

---

**मा. मंत्री, जलसंपदा (गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) यांचे निवेदन.**

पिंपरी चिंचवड शहरास पवना प्रकल्पातून मंजूर पाणी आरक्षणाच्या अनुषंगाने पाणी पुरवठा करण्यात येत आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेस पवना, आंद्रा व भामा आसखेड धरणातून खालीलप्रमाणे एकूण पाणी आरक्षण मंजूर आहे.

| अ. क्र. | मंजुरी तपशील | परिमाण (दलघमी) | परिमाण (टीएमसी) |
|---|---|---|---|
| **अ)** | **पवना प्रकल्प** | | |
| १ | शासन पत्र दि.३०/१०/८५ | ४९.९३२ | १.७६ |
| २ | म.कृ.खो.वि.म. ज्ञापन दि.१३/१२/१९९६ | ४९.९३२ | १.७६ |
| ३ | शासन पत्र दि.५/९/२००१ | ४३.८० | १.५५ |
| ४ | १.शासन पत्र, दि.१३/५/२००८.<br>२. शासन निर्णय क्र. बिसिंआ-२०१८/ (३९१/१८)/ सिं.व्य(धो), दि.२४.१०.२०१८ | ४८.५७६ | १.७२ |
| ५ | मुख्य अभियंता यांचे पत्र दि.१९/१०/२००४ नुसार म.औ.वि.मं. चिंचवड कडे वर्ग | (-) ६.५७ | (-) ०.२३ |
| | **एकूण पवना प्रकल्प** | **१८५.६७** | **६.५६** |
| **ब)** | **आंद्रा प्रकल्प** | | |
| १ | शासन निर्णय क्रं. बिसिंआ-२०१८/ (३९१/१८)/ सिं.व्य(धो), दि.२४.१०.२०१८ | ३६.८७ | १.३० |
| | **एकूण** आंद्रा प्रकल्प | **३६.८७** | **१.३०** |

| क) | भामा आसखेड प्रकल्प | | |
|---|---|---|---|
| १ | शासन निर्णय क्रं. बिसिंआ-२०१८/ (३९१/१८)/ सिं.व्य(धो)/दि.२४.१०.२०१८ | ६०.७९ | २.१५ |
| | **एकुण** भामा आसखेड प्रकल्प | **६०.७९** | **२.१५** |
| | **एकूण अ+ब+क** | **२८३.३३** | **१०.०१** |

२. पिंपरी चिंचवड शहराची वाढती लोकसंख्या विचारात घेता सन २०३१ च्या ५२.७४ लक्ष लोकसंख्येस शासनाने १०.०१ टीएमसी पाणी आरक्षण मंजूर केलेले आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने सन २०२४-२५ च्या वार्षिक पाण्याच्या अंदाजपत्रकासाठी (Water Budget) ३७.३८ लक्ष लोकसंख्येकरिता महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण, मुंबई यांचेकडील निर्धारीत मापदंडानुसार (१३५ लि/दि/मा प्रमाणे व १३% वहनव्ययासह) वार्षिक ७.६१ टीएमसी (५९०.२६ एमएलडी ) पाणीवापर अनुज्ञेय आहे. त्याप्रमाणे पिंपरी चिंचवड महानगरपालिकेस सन २०२४-२५ साठी ७.६१ टीएमसी पाण्याचे अंदाजपत्रक मंजूर केलेले आहे.

३. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने २०४१ च्या ९६ लक्ष लोकसंख्येकरिता मुळशी धरणातुन अतिरिक्त ९.८१ टीमसी पाण्याची मागणी केली आहे. परंतु मुळशी धरण हे टाटा कंपनीच्या मालकीचे असुन मुळशी मध्यम प्रकल्पामधुन जलसंपदा विभागास १.२३ टीएमसी सिंचन व बिगर सिंचनाकरिता देणेची तरतुद आहे. सदर पाणी सिंचनाकरिता ०.००९ टीएमसी व बिगर सिंचनासाठी १.२२ आरक्षित असल्यामुळे या तरतुदीतील पाणी शिल्लक नाही.

४. टाटा पॉवर कंपनीने मुळशी व मावळ तालुक्यात स्वातंत्र्यपूर्व काळात एकुण सहा धरणे बांधलली आहेत. या सर्व धरणातील पाणीसाठा पश्चिमेकडे वळवून त्याद्वारे विद्युत निर्मिती करण्यात येत आहे. टाटा पॉवर कंपनीच्या या धरणापैकी मुळशी मध्यम प्रकल्पाचा पाणीसाठा व त्याद्वारे होणारी विद्युत निर्मितीचा तपशिल खालीलप्रमाणे आहे :-

| अ. क्रं. | धरणाचे नाव | बांधकाम झालेले वर्ष | उपयुक्त पाणीसाठा | | विद्युत निर्मिती मेगावॅट | विद्युत निर्मिती केंद्र |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | दलघमी | टीएमसी | | |
| १ | मुळशी | १९२७ | ५७१.५६ | २०.१८ | ३००.०० | भीरा |

राज्य जलनितीनुसार पिण्याचे पाणी व सिंचनाबाबत पाणीवापराचा प्राधान्यक्रम जलविद्युतच्या वरचा आहे. तसेच अन्य विविध पर्यायांद्वारे वीज उपलब्ध करणे शक्य असल्याने कृष्णा खोऱ्यातील पाण्याची वाढती मागणी विचारात घेता विपुलतेचे खोरे असलेल्या कोकण प्रदेशात विद्युतनिर्मितीनंतर पश्चिमेकडे वळविण्यात येणारे पाणी टप्प्याटप्प्याने कमी करण्याकरिता अभ्यास करण्यासाठी दि.०२ ऑगस्ट २०१९ च्या शासन निर्णयान्वये अभ्यासगट (भावे समिती) गठीत करण्यात आला आहे.

५. उपरोक्त भावे समितीच्या अहवालाच्या अनुषंगाने पुढील धोरण व कार्यवाहीची दिशा निश्चित करण्यासाठी श्री.अविनाश सुर्वे, निवृत्त सचिव (लाक्षेवि), जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई यांच्या अध्यक्षतेखाली शासन निर्णय दि.०२.०८.२०१९ अन्वये तज्ञ समितीची स्थापना करण्यात आली आहे. सदर समितीच्या दि.१.१२.२०२० रोजी झालेल्या तिसऱ्या बैठकीत पुढीलप्रमाणे निर्णय घेण्यात आलेला आहे.

"कृष्णा पाणी तंटा लवाद संदर्भात इतर राज्यानी मा. सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या विविध याचिकेवर सुनावणी प्रगतीत असुन पुढील वर्षी यावर अंतिम निर्णय अपेक्षित आहे. त्यापूर्वी समितीने अहवाल दिल्यास त्याचा विपरीत परिणाम उपरोक्त सुनावणीवर होण्याची शक्यता नाकारता येत नाही. मा. सर्वोच्च न्यायालयाच्या अंतिम निर्णयानंतर समितीचा अहवाल जाहीर करावा असे सूचित केले आहे."

६. सदर गठित समितीच्या दि. ०२ जून, २०२२ व दि. ०३ जून, २०२२ रोजीच्या बैठकीत अहवाल अंतिम करण्यात आला आहे. शासन पत्र दि.१०/०३/२०२३ अन्वये मा. सर्वोच्च न्यायालयाच्या अंतिम निर्णयानंतर व शासनाचे पुढील आदेश होईपर्यंत तज्ञ समितीचा अहवाल गोपनीय स्वरुपात जतन करून ठेवण्याबाबत सूचना दिल्या आहेत. मा. सर्वोच्च न्यायालयाचा अंतिम निर्णय अद्याप प्राप्त नाही.

********

11/0078-1ca

महाराष्ट्र विधानसभा
सन २०२५ चे प्रथम (अर्थसंकल्पीय) अधिवेशन

लक्षवेधी सूचना क्र. १९५५

**मा. श्री. सुभाष देशमुख, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये, उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना क्र. १९५५ पुढील प्रमाणे आहे-**

"सन २०१९ देशभर जलजीवन मिशन योजना राबविण्यास सुरुवात झाली मात्र अद्यापी ४०% योजनांची कामे राज्यात अपूर्ण असल्याने नागरिकांना पाण्यासाठी वणवण करावी लागत असल्याची बाब माहे फेब्रुवारी २०२५ च्या दुसऱ्या आठवड्यात वा त्यासुमारास निदर्शनास येणे, जलजीवन मिशन अंतर्गत सार्वजनिक पाणीपुरवठा योजनांच्या कामापैकी ४५% कामे प्रगतीपथावर असून त्यामुळे राज्यातील सर्व जिल्हा परिषदा अंतर्गत जलजीवन मिशन योजनेअंतर्गत मागेल त्याला नळ जोडणी योजनेपासून नागरिकांना पासून वंचित रहावे लागत असणे, त्यामुळे राज्यभरातील वाढीवस्त्यांवर व गावात राहणाऱ्या नागरिकांना पाण्यासाठी भटकंती करावी लागत असणे, त्यासाठी राज्यभरातील जलजीवन कामांचा तात्काळ आढावा घेऊन उन्हाळा चालू होण्याच्या अगोदर ही सर्व अपूर्ण कामे पूर्ण करून घरोघरी नळ जोडणीची योजना प्रभावीपणे राबवण्याची मागणी सामान्य जनतेतून होत असणे, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना "

---

**श्री. गुलाबराव पाटील, मा. मंत्री पाणी पुरवठा व स्वच्छता यांचे निवेदन**

केंद्र शासन पुरस्कृत महत्वाकांक्षी जल जीवन मिशन कार्यक्रमाची सन २०१९ मध्ये सुरवात करण्यात आली. राज्यात ४ सप्टेंबर, २०२० पासून सदर योजनची अंमलबजावणी करण्यात येत आहे. त्याद्वारे सन २०२४ पर्यत सर्व १०० टक्के ग्रामीण कुटुंबांना "हर घर जल" या तत्वाने कार्यात्मक घरगुती नळ जोडणी (FHTC-Functional Household Tap Connection) द्वारे शुध्द पेयजल उपलब्ध करुन देण्यास शासन कटीबद्ध आहे. सन २०२४ पर्यंत राज्यातील ग्रामीण भागातील प्रत्येक घरात वैयक्तिक नळ जोडणीद्वारे दरडोई किमान ५५ लिटर प्रती दिन, गुणवत्तापूर्ण व शाश्वत पाणी पुरवठा करणे हे जल जीवन मिशनचे प्रमुख उद्दिष्ट आहे. जल जीवन मिशन कार्यक्रमाची घोषणा करण्यात आली त्यावेळी (दिनांक १५ ऑगस्ट, २०१९) ४० LPCD प्रमाणे नळ जोडणी असलेल्या कुटुंबांची संख्या ४८.४४ लक्ष इतकी होती. सदर योजना देखील रेट्रो फिटींग अंतर्गत घेण्यात येवून त्यांना देखील ५५ LPCD प्रमाणे पाणी देण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले.

सद्यस्थितीमध्ये राज्यातील ग्रामीण भागातील एकुण १,४६,७९,७७४ घरे/कुटुंबांपैकी १,३१,००३६७ (८९.२४%) इतक्या धरांना/कुटुंबांना कार्यात्मक घरगुती नळ जोडणी (FHTC-Functional Household Tap Connection) (५५ LPCD) देण्यात आलेल्या आहेत. तसेच १५.७९ लाख घरे/कुटुंब यांना घरगुती नळ जोडणी देण्याची कार्यवाही प्रगतीपथावर आहे. राज्यात जल जीवन मिशन कार्यक्रमांतर्गत एकूण ५१५५८ योजना हाती घेण्यात आल्या असून, आजतागायत २३,०५४ योजना पूर्ण झालेल्या आहेत. तर उर्वरित २८,५०४ योजना प्रगतीपथावर आहेत. तसेच

सद्यस्थितीत जल जीवन मिशन अंतर्गत घेण्यात आलेल्या अंदाजे १८,८८४ योजना विविध कारणांमुळे सुधारीत होत आहेत. तसेच योजना राबवितांना स्थानिक पातळीवर येणाऱ्या अडचणी जसे जल जीवन मिशन कार्यक्रमांतर्गत योजनेच्या उपांगांकरीता जागा घेण्याकरीता भूसंपादनासाठी निधीची तरतुद नसणे, खाजगी जागा मिळवण्यासाठी अडचणी निर्माण होणे, ग्रामपंचायतीकडून जागा वेळेत उपलब्ध न होणे, पाणी पुरवठा योजनांच्या उपांगाकरिता वन हद्दीतील जागा, राष्ट्रीय महामार्ग जागा, रेल्वे क्रॉसिंग या करिता लागणाऱ्या परवानग्या संबंधित विभागाकडून मिळण्यास विलंब होणे, MSEB विद्युत जोडणी घेताना ग्रामपंचायतीमार्फत पूर्वीच्या देयकांची थकबाकी अदा केली नसल्याने नवीन कनेक्शन मिळण्यास अडचणी येणे, लोकवर्गणीची रक्कम विहित प्रमाणात जमा न होणे, इत्यादी अडचणीमुळे योजना कामांना अडथळे येत आहेत. त्याअनुषंगाने अंमलबजावणी यंत्रणांमार्फत क्षेत्रियस्तरावर आवश्यक त्या उपाययोजना करण्याची कार्यवाही सुरु आहे.

राज्यात जल जीवन मिशन कार्यक्रमांतर्गत रु. ५.०० कोटी खालील कामांची प्रशासकीय मान्यता व अंमलबजावणीचे अधिकार संबंधीत जिल्हा परिषदांना देण्यात आले आहेत, त्यानुसार निविदा कार्यवाही करण्यात आलेली असुन पाणी पूरवठा योजनांची कामे विविध स्तरावर सुरु आहेत. कामातील गैरव्यवहाराबाबत प्राप्त तक्रारीवर अंमलबजावणी यंत्रणेकडून उचित कार्यवाही करण्यात येते. झालेल्या कामांच्या टप्प्यानुसार व वेळापत्रकाप्रमाणे त्रयस्थ तांत्रिक तपासणी यंत्रणेकडून (Third Party Inspection) योजनेमध्ये त्रुटी आढळून आल्यावर त्यावर उपाय सुचविले जातात व ते स्वखर्चाने कंत्राटदाराकडून करुन घेण्यात येतात. तसेच कंत्राटदारास त्यांच्याकडील त्रुटींच्या अनुषंगाने दंड आकारला जातो किंवा काळ्या यादीमध्ये टाकले जाते. वस्तु व सेवा करातील वाढ (जी.एस. टी), ज्यादा दर निविदा, स्रोत कोरडा पडणे, त्याअनुषंगाने इतर तांत्रिक बदल व ग्रामपंचायतीच्या मागणी नुसार सुधारीत अंदाजपत्रक शासनाकडे संबंधीत अंमलबजावणी यंत्रणेकडून प्राप्त झाल्यानंतर त्यांना मान्यता देण्यात येते. प्रस्ताव परिपुर्ण नसल्यास संबंधीत अंमलबजावणी यंत्रणेकडून त्रुटी पुर्तता अहवाल मागविण्यात येतो व तो प्राप्त झाल्यानंतर सुधारित प्रशासकीय मान्यतेची कार्यवाही पार पाडली जाते.

तसेच सद्यस्थितीत केंद्र शासनाकडून माहे ऑक्टोबर २०२४ पासून निधी उपलब्ध न झाल्याने योजनांची कामे मंदावलेली आहेत. त्याअनुषंगाने केंद्र हिस्सा अप्राप्त असतांनाही, राज्य शासनाने विशेष बाब म्हणून आवश्यक तो राज्य हिस्सा वितरीत केलेला आहे. त्याचबरोबर अंमलबजावणी यंत्रणांनी केलेल्या मागणीनुसार निधी वितरणाबाबतची कार्यवाही सद्यस्थितीत शासन स्तरावर सुरु आहे. त्यानुसार सन २०२४-२५ या आर्थिक वर्षामध्ये आतापर्यंत एकूण रु. ३९५८.४९५ कोटी इतका निधी वितरीत करण्यात आला आहे. तसेच केंद्र शासनाकडे शासनस्तरावरुन निधी उपलब्ध करुन देण्याबाबत पाठपुरावा सुरु असून सदर निधी उपलब्ध होताच अंमलबजावणी यंत्रणांना तात्काळ उपलब्ध करुन देण्याबाबतची कार्यवाही करण्यात येईल.

---

**लक्षवेधी सूचना**

१९६०

**सन २०२५ चे प्रथम अर्थसंकल्पीय अधिवेशन**

**मा. श्री.सुभाष देशमुख, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्र.१९६० पुढीलप्रमाणे आहे :-**

"सोलापूर जिल्ह्यातील शिरभावी प्रादेशिक नळ पाणीपुरवठा योजनेच्या शिरभावी येथील जलशुद्धीकरण केंद्र व पंढरपूर येथील पंप हाऊससाठी वापरणारे विजेचेबिल कोट्यावधी रुपयाचे असल्याने महावितरण कंपनीकडून या योजनेचा वीजपुरवठा खंडित केल्याने मागील तीन महिन्यापासून ही योजना बंद झाल्याने ८१ गावांवर जलसंकट निर्माण झाले असल्याची बाब माहे फेब्रुवारी २०२५ च्या दुसऱ्या आठवड्यात निदर्शनास येणे,सन २००५ पासूनते डिसेंबर २४ पर्यंत शिरभावीयोजनेच्या खर्चात झालेली तूट शासनाकडून ४१ कोटी २३ लाख रुपये प्राप्त न झाल्याने महाराष्ट्र जीवन प्राधिकरण कडून सदरची योजना चालवणे बंद केलेली असणे,शिरभावी प्रादेशिक नळ पाणीपुरवठा योजनेअंतर्गत पाईपलाईन दुरुस्ती देखभाल गळती काढणे कामगार पुरवठा आधीची सुमारे १ कोटी ८५ लाख रुपयांची बिले अद्याप मिळाली नाहीत म्हणून ठेकेदाराने २९ जुलै २०२४ पासून योजना चालवणे बंद केलेली असणे,त्यामुळे शिरभावी प्रादेशिक नळपाणीपुरवठा योजना आर्थिक अडचणीत आल्याने उन्हाळ्यापूर्वी ही योजना पूर्ववत न चालू केल्यास ८१ हून अधिक गावांवर मोठे जलसंकट कोसळणार असल्याने नागरिकांना पाण्यासाठी मोठ्या प्रमाणात भटकंती करावी लागणार असणे, एकीकडे राज्य शासन घरोघरी पाणी देण्याची योजना राबवत असताना सदर चालू असलेली प्रादेशिक नळ पाणीपुरवठा योजना ही सौरऊर्जेवर चालू करून कायमस्वरूपी वीजबिल या योजने मधूनच मिळण्यासाठी प्रयत्न करण्याची आवश्यकता असणे,शिरभावी प्रादेशिक नळ पाणीपुरवठा योजनेतील थकबाकी तात्काळ भरून ही योजना पूर्ववत चालू करण्याची मागणी सर्वसामान्य जनताव लोकप्रतिनिधींकडून होत असणे, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**मा. मंत्री ( पाणी पुरवठा व स्वच्छता ) यांचे निवेदन**

सांगोला तालुक्यातील शिरभावी व ८१ गावांसाठी प्रादेशिक योजनेमधून एप्रिल-२००३ व मार्च-२००५ पासून टप्याटप्याने पाणी पुरवठा सुरु करण्यात आला आहे.

एप्रिल, २००६ मध्ये महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने संचालक मंडळाच्या सर्वसाधारण सभा १०४/२००६ अन्वये सदरची योजना प्रथम १५ वर्ष कालावधी करिता चालविण्यासाठी ताब्यात घेऊन येणा-या आर्थिक तुटीची भरपाई प्रस्ताव शासनाकडे सादर करण्यास व त्याची प्रतिपुर्ती शासनाकडून मागण्यास मान्यता दिलेली आहे. सदर योजना १५ वर्ष चालविण्याची मुदत सन २०२० मध्ये संपलेली आहे.

तद्नंतर संचालक मंडळाच्या दि.१२ मे २०२१ च्या १४८ व्या बैठकीत योजना जिल्हा परिषदेकडे हस्तांतरीत करण्याबाबत ठराव पारीत झाला. तथापि जिल्हा परिषदेने योजना हस्तांतरीत करुन घेण्यास असमर्थता दर्शविली. त्यामुळे १८ ऑक्टोबर २०२२ रोजी संचालक मंडळाच्या १५३ व्या बैठकीत महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मार्फत योजना चालविणे करीता जी आर्थिक तूट येईल त्याची भरपाई शासनाकडून होणे बाबत हमी / मान्यता ३ महिन्यात प्राप्त करावी व तोपर्यंत योजना महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने चालवावी, शासनाने मान्यता न दिल्यास योजनेची देखभाल व दुरुस्ती महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडून बंद करण्यात यावी, असा ठराव पारीत केला.

परंतु तत्कालीन विधानसभा सदस्य मा. शहाजी बापू पाटील यांनी योजनेकरिता निधी वितरीत होत नसल्यामुळे व योजना बंद पडण्याची शक्यता असल्यामुळे सांगोला तालुक्यातील दुष्काळी परिस्थितीमुळे सर्व गावांना सदर योजनेतून पाणी पुरवठा सुरु ठेवणे बाबत शासनास विनंती केली.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या संचालक मंडळाच्या दि.९ जानेवारी २०२४ च्या १५५ व्या बैठकीत व दि. ३०.०९.२०२४ रोजीच्या १५७ व्या बैठकीत सदर योजना महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत चालू ठेवण्यासाठी मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, पुणे यांनी शासन स्तरावर आर्थिक तुटीची प्रतिपुर्ती बाबत पाठपुरावा करावा व आर्थिक तुटीची प्रतिपुर्ती पुढील ३ महिन्याच्या कालावधीत शासनाकडून प्राप्त झाल्यास योजनेची देखभाल व दुरुस्ती महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत चालु ठेवावी अन्यथा ३ महिन्यानंतर योजनेची देखभाल दुरुस्ती महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत बंद करण्यात यावी असा ठराव पारीत केला. शिरभावी व ८१ गावे प्रादेशिक नळ पाणी पुरवठा योजनेच्या संदर्भात शासन स्तरावर दि.०४/०९/२०२४ रोजी झालेल्या बैठकीत सदर योजनेच्या निधी प्रतिपुर्तीच्या प्रस्तावावर विशेष बाब म्हणून मान्यता देणेबाबत आवश्यक कार्यवाही करावी, असे निर्देश दिलेले आहेत.

सद्यःस्थितीत महाराष्ट्र राज्य विज वितरण कंपनीची थकबाकी, कंत्राटदाराची प्रलंबित देयके व रसायने इत्यादींची एकूण रु.७६२.९५ लक्ष इतक्या किंमतीची देयके प्रलंबित आहेत. योजना प्रतिपुर्तीसाठी मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण पुणे यांनी दि. २४/०२/२०२५ च्या पत्रान्वये रु.४११९.०४ लक्ष रक्कमेच्या प्रतिपुर्तीचा प्रस्ताव शासनास सादर केलेला आहे. तथापि जल जीवन मिशन कार्यक्रमांतर्गत देखभाल-दुरुस्तीकरिता निधीची कोणतीही तरतूद नाही. योजनांच्या देखभाल- दुरुस्तीकरिता शासन स्तरावर नवीन धोरण निश्चित करण्याची कार्यवाही सुरु आहे. तसेच याबाबत मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांना दि. १९/०३/२०२५ रोजी अवगत करण्यात आलेले आहे.

वीज देयक न भरल्यामुळे महाराष्ट्र राज्य विज वितरण कंपनीने दि.२१/११/२०२४ रोजी वीज पुरवठा खंडीत केलेला आहे. तसेच ठेकेदाराने प्रलंबित देयके न मिळाल्यामुळे दि. २९/०७/२०२४ पासून योजना चालविणे बंद केलेले आहे.

योजनेमध्ये विद्युत देयकांचा खर्च जास्त असल्यामुळे सौर ऊर्जेवर योजना चालू करण्यासाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या यांत्रिकी विभागामार्फत सर्वेक्षणाचे काम सुरु आहे.

शासनाने जल जीवन मिशन अंतर्गत रु. २९९.६० कोटी किंमतीच्या शिरभावी व ८१ गावे प्रादेशिक पाणी पुरवठा योजनेस दि.३०/०८/२०२२ रोजी प्रशासकीय मान्यता प्रदान केलेली आहे. या योजनेची भौतिक प्रगती ८४.३९% असून योजनेवर आतापर्यंत रु.२५६.५० कोटी इतका खर्च झालेला आहे. सदरची योजना कार्यान्वित करण्यासाठी महाराष्ट्र राज्य विज वितरण कंपनीकडे वाढीव वीज भाराची मागणी करण्यात आलेली आहे. महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीने अद्याप विद्युत कोटेशन दिलेले नाही, याबाबत मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, पुणे यांनी पत्र क्र. ५३३ दि.०४ मार्च २०२५ अन्वये मुख्य अभियंता, महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी, बारामती यांना कळविलेले आहे.

*******************************************

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२५ चे प्रथम (अर्थसंकल्पीय) अधिवेशन

श्री.नारायण कुचे, सन्माननीय विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये खालीलप्रमाणे लक्षवेधी सुचना उपस्थित केलेली आहे -

"बदनापुर-अंबड विधानसभा मतदार संघातील बदनापुर, अंबड आणि भोकरदन तालुक्यामधील जल जीवन मिशन योजने अंतर्गत पाणी पुरवठयाची कामे मंजुर झाली असणे, यातील बहुतांश कामे ही संभाजी सिरसाठ या एजन्सीने घेतलेली असणे, तसेच या कामांचा कालावधी संपत आलेला असुन अद्यापही ही कामे अपुर्ण आहेत ही वस्तुस्थिती असणे, या एजन्सीने घेतलेली सर्व कामे ही अत्यंत संथगतीने सुरु असून ही सर्व कामे निकृष्ठ दर्जाची झालेली असल्याचे निदर्शनास आले असणे, त्यामुळे त्यांच्या सर्व कामांची चौकशी करण्यात यावी अशी मागणी जनतेतून करण्यात आली असणे, त्यामुळे संभाजी सिरसाठ या एजन्सीने केलेल्या सर्व कामांची तात्काळ चौकशी करुन सदर एजन्सी काळया यादीत टाकण्याची आवश्यकता, परिणामी शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना"

मा.मंत्री (पाणी पुरवठा व स्वच्छता) यांचे निवेदन

जालना जिल्हयातील बदनापूर विधानसभा मतदारसंघातील बदनापुर मध्ये ८१ , अंबड मध्ये ८१ आणि भोकरदन मध्ये ५६ अशा एकूण २१८ इतक्या योजना सदर ३ तालुक्यातील २२६ गावांकरीता मंजुर आहेत. सदर कामांची अंदाजित किंमत ही रुपये ५ कोटीच्या मर्यादेत असल्याने सदर कामांकरीता जिल्हा परिषद, जालना मार्फत ई निविदा प्रक्रिया राबविण्यात आली असून न्युनतम निविदाधारकास कामे देण्यात आली आहेत. सदर कामे विविध टप्प्यांवर प्रगतीपथावर आहेत.

उपरोक्त नमुद निविदा प्रक्रियेनंतर श्री.संभाजी सिरसाठ यांना १५ योजनांच्या कामांसंदर्भात कार्यारंभ आदेश देण्यात आलेले आहेत. सदर कामांपैकी ८ कामांची प्रगती ७५ ते ९९ टक्के, ५ कामांची प्रगती ५० ते ७५ टक्के व २ कामांची प्रगती २५ ते ५० टक्के आहे. सदर कंत्राटदाराकडे असणाऱ्या कामांपैकी ४ योजनांमधून गावात पाणी पुरवठा सुरु झाला आहे. सदर सर्व १५ कामांचे कार्यारंभ आदेशाचे दिनांक वेगवेगळे असून त्यांची मुळ मुदत संपलेली आहे व जिल्हा परिषद, जालना मार्फत सदर कामांची प्रगती तपासुन दि.३१.०३.२०२५ पर्यत मुदतवाढ देण्यात आली आहे.

जल जीवन मिशन अंतर्गत सर्व पाणी पुरवठा योजनांच्या कामांची त्रयस्थ संस्थांकडून तपासणी करण्यात येते. त्यांनी केलेल्या तपासणीमध्ये त्रुटी आढळून आल्यास त्याची पुर्तता संबंधित ठेकेदाराच्या खर्चाने करण्यात येते. त्यानंतरच सदर कामांची देयके पारित करण्यात येतात. सदर १५ योजनांच्या कामांवर Tata Consultancy Services (TCS) या त्रयस्थ यंत्रणेद्वारे सर्व कामांची मिळून एकुण २२ वेळा पाहणी करण्यात आली असून त्रयस्थ यंत्रणेच्या पाहणीमध्ये किरकोळ व मध्यम स्वरुपांच्या त्रुटी आढळून आल्या असून यापैकी १२ योजनांच्या त्रुटींची पुर्तता संबंधित ठेकेदाराकडून करुन घेण्यात आली आहे व उर्वरीत ३ योजनांची त्रुटी पुर्तता करण्याची कार्यवाही सुरु आहे. तथापि, सदर कंत्राटदारांच्या कामांबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांची तक्रार असल्याने त्याअनुषंगाने मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, जालना यांना दि.३१.०१.२०२५ रोजीच्या पत्रान्वये वस्तुस्थितीदर्शक अहवाल सादर करण्याबाबत निर्देश देण्यात आले आहेत. त्याअनुषंगाने उपरोक्त १५ कामांची पाहणी करुन चौकशी अहवाल देण्याबाबत जालना जिल्हा परिषदेमार्फत दि.१३.०२.२०२५ रोजीच्या पत्रान्वये श्री.मुकुंद एस. मालेराव, अभियांत्रिकी तज्ञ जल जीवन मिशन (सेवा निवृत्त कार्यकारी अभियंता) यांच्या अध्यक्षतेखाली चौकशी समिती नियुक्त करण्यात आली आहे. सदर चौकशी समितीचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर पुढील योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.

*****************

**लक्षवेधी सूचना क्रमांक २१८३**

## महाराष्ट्र विधानसभा,
## सन २०२५ चे प्रथम (अर्थसंकल्पीय) अधिवेशन

श्री. हिरामण खोसकर, विधानसभा सदस्य, यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना क्रमांक २१८३ पुढीलप्रमाणे आहे :-

**"नाशिक जिल्हयातील जलजीवन च्या सुमारे ५०० हून अधिक योजना अद्यापही अपूर्ण असून त्यात १०२ योजनांसाठी विद्युत पुरवठा उपलब्ध नसल्याने व ९ योजनांना वन विभागाकडील विविध दाखल्यांच्या अपूर्ततेमुळे योजना कार्यान्वित झाल्या नसल्याची बाब माहे जानेवारी, २०२५ रोजी च्या सुमारास निदर्शनास येणे, त्र्यंबकेश्वर तालुक्यात कोटयवधी रुपयांचा खर्च करुन राबवले जाणारे जलजीवन मिशन ग्रामीण भागात शुध्द पाणीपुरवठा करण्यास अपयशी ठरणे, मागील चार वर्षापासून सुरु असलेल्या पाणीपुरवठा योजनांची कामे अद्यापही अपूर्ण असणे, कागदोपत्री चुकीची व खोटी माहिती संबधित अधिकारी देऊन ठेकेदाराला पाठीशी घालणे, परिणामी सर्वसामान्य नागरिकांमध्ये निर्माण झालेले असंतोषाचे व संतापाचे वातावरण, याबाबत शासनाने तातडीने चौकशी करुन कठोर कारवाई करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाची प्रतिक्रिया व भूमिका."**

---

मा. मंत्री, (पाणी पुरवठा व स्वच्छता) यांचे निवेदन

नाशिक जिल्ह्यात जल जीवन मिशन अंतर्गत एकूण १२२२ नळ पाणी पुरवठा योजनेची कामे जिल्हा परिषदेमार्फत घेण्यात आली आहेत. सदर १२२२ योजनांपैकी एकूण ८०४ योजनांची कामे १००% भौतिकदृष्ट्या पूर्ण झालेली असून उर्वरित ४१८ योजनांची प्रगती- ९९ योजना ७६-९९%, १८५ योजना ५१-७५%, ८७ योजना २६-५०%, ४७ योजना ०-२५% एवढी आहे.

जिल्हा परिषदेकडील १०२ योजनांना विद्युत पुरवठा उपलब्ध होण्याच्या दृष्टीने जानेवारी २०२५ मध्ये कार्यवाही करण्यात येऊन ५२ योजनांची कार्यवाही पूर्ण झाली आहे. उर्वरित ५० योजनांना विद्युत पुरवठा उपलब्ध होण्यासाठी कार्यवाही करण्यात येत आहे. जिल्हा परिषदेकडील योजनांकरिता वन विभागाकडे पाठविण्यात आलेल्या २६ प्रस्तावांपैकी १४ प्रस्ताव मंजूर झाले असून उर्वरित १२ प्रस्ताव उद्भव विहीर जागा बदलल्यामुळे अलीकडेच सादर करण्यात आले आहेत व त्यावर वन विभागाकडून कार्यवाही करण्यात येत आहे.

त्र्यंबकेश्वर तालुक्यात जिल्हा परिषदेच्या एकूण ८५ योजना जल जीवन मिशन अंतर्गत मंजूर असून या ८५ योजनांची भौतिक प्रगती -४० योजना १००% पूर्ण, १० योजना ७६-९९%, १७ योजना ५१-७५%, १४ योजना २६-५०%, ४ योजना ०-२५% एवढी आहे. भौतिकदृष्ट्या १००% पूर्ण झालेल्या ४० योजनांपैकी २५ योजनांचा पाणीपुरवठा सुरु करण्यात आला आहे व पाणी पुरवठा सुरु केलेल्या या २५ योजनांपैकी ५ योजना ग्रामपंचायतीकडे हस्तांतरित करण्यात आलेल्या आहेत. या तालुक्यातील उर्वरित १५ योजनांचे काम प्रगतीपथावर आहे. भौतिक प्रगती ७६-९९% असलेल्या १० योजनांची कामे मार्च २०२५ पर्यंत तसेच उर्वरित सर्व योजना डिसेंबर २०२५ पर्यंत पूर्ण

करण्याचे नियोजन आहे. त्र्यंबकेश्वर तालुक्यातील विद्युत जोडणीसाठी ९ योजनांचे प्रस्ताव MSEB कडे व ८ योजनांचे प्रस्ताव वनविभागास सादर करण्यात आले आहेत.

नाशिक जिल्ह्यात जिल्हा परिषदेकडील जल जीवन मिशन अंतर्गत सुरु असलेली कामे मुदतीत पूर्ण न केल्याने १०४ ठेकेदारांवर एकूण २३१ योजनांच्या अनुषंगाने रु.२४.७३ लक्ष दंडात्मक कारवाई करण्यात आलेली आहे. ज्या ठेकेदारांनी मुदतीत कामे केलेली नाहीत अशा ५ ठेकेदारांवर निविदा अटी व शर्तीनुसार काळ्या यादीत टाकण्याची कार्यवाही करण्यात आलेली आहे. त्र्यंबकेश्वर तालुक्यात ७ योजनाच्या कामावर रु.०.८७ लक्ष इतकी दंडात्मक कारवाई करण्यात आलेली आहे.

नाशिक जिल्ह्यात महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत जल जीवन मिशन कार्यक्रमांतर्गत ३८ योजनांची कामे प्रगतीपथावर असून योजनांची सरासरी भौतिक प्रगती ६८% आहे. या योजनांपैकी २ योजनांना ग्रामपंचायतीच्या थकबाकीमुळे विद्युत पुरवठा मिळणेबाबतचा प्रश्न सोडविण्याची कार्यवाही करण्यात येत आहे. वन विभागाच्या परवानगी अभावी एकही काम बंद नाही. त्र्यंबकेश्वर तालुक्यातील एकूण ३ प्रादेशिक पाणी पुरवठा योजना ( एकूण किंमत रु.६२.१० कोटी) कामे प्रगतीपथावर असून त्र्यंबकेश्वर तालुक्यातील या ३ योजनांची एकत्रित सरासरी भैातिक प्रगती ७० % इतकी आहे व कामे प्रगतीत आहे. ज्या योजनांची प्रगती संथ आहे अशा ३ योजनांपैकी १ योजनेस दंडात्मक कारवाई करण्यात आलेली असून तीनही योजनांचे ठेकेदारांना कामे मुदतीत पूर्ण करणे व दंडात्मक कारवाईबाबत नोटीसा बजावण्यात आलेल्या आहेत.

***********

लक्षवेधी सूचना क्र.१९६६

**महाराष्ट्र विधानसभा**

**सन २०२५ चे प्रथम (अर्थसंकल्पीय) अधिवेशन**

मा.श्री. सुभाष देशमुख, विधानसभा सदस्य यांनी विधानसभेमध्ये नियम १०५ अन्वये खालीलप्रमाणे लक्षवेधी सूचना क्र.१९६६ उपस्थित केली आहे.

"राज्यात सोलापूर जिल्ह्यातील पहिली ते आठवीपर्यंत मुलांना केंद्र पुरस्कृत शालेय पोषण आहार योजनेअंतर्गत काम करणाऱ्या महिला कर्मचाऱ्यांना मागील सहा महिन्यांपासूनचे मानधन मिळाले नसल्याने त्यांची आर्थिक अडचण होऊन उपासमार होऊ लागल्याने या महिला कर्मचाऱ्यांनी आंदोलन करण्याचा इशारा दिला असल्याची बाब माहे जानेवारी २०२५ च्या तिसऱ्या आठवड्यात निदर्शनास येणे, शालेय पोषण आहार वाटप करणाऱ्या महिला कर्मचाऱ्यांना मागील वर्षभरापासून मानधन वेळेवर मिळत नसणे, शाळेत सहीचे रजिस्टर ठेवावे, महिना किमान २०००० रुपये मानधन द्यावे, दिवाळीला बोनस द्यावा, दोन साड्या गणवेश म्हणून दरवर्षी द्याव्यात या व इतर मागण्या या महिलांनी शासनाकडे करणे, शालेय पोषण आहार कर्मचाऱ्यांना थकीत मानधन देण्यासाठी शासनाने उपाययोजना करणे, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना"

**निवेदन**

**(श्री. दादाजी भुसे, शालेय शिक्षण मंत्री)**

केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण योजनेंतर्गत राज्य व केंद्र शासनाच्या, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या, खाजगी अनुदानित व अंशत: अनुदानित या शाळांमधील इ.१ ली ते इ.८ वी मधील विद्यार्थ्यांना केंद्र शासनाच्या निर्देशाप्रमाणे पोषण आहाराचा लाभ देण्यात येतो. सदर योजनेंतर्गत निधी खर्चाचे प्रमाण केंद्र व राज्य ६०::४० असे आहे.

सदर योजनेंतर्गत पोषण आहाराच्या कामकाजाबाबत कंत्राटी तत्वावर स्वयंपाकी तथा मदतनीस यांची शाळा व्यवस्थापन समितीद्वारे नियुक्ती करण्यात येते. सद्यस्थितीत राज्यामध्ये १,६४,५५८ स्वयंपाकी तथा मदतनीस कार्यरत असून त्यांना रु.२५००/- प्रति महा असे मानधन वर्षातील १० महिन्यांसाठी देण्यात येते. सदर मानधनामध्ये केंद्र हिस्सा रु.६००/- व समप्रमाण

राज्य हिस्सा रु.४००/- आहे. तथापि, राज्य हिस्स्यातून अतिरिक्त रु.१५००/- मानधन देण्यात येत आहे.

स्वयंपाकी तथा मदतनीस यांच्या केंद्र हिस्सा मानधनामध्ये वाढ करण्याची विनंती केंद्र शासनास करण्यात आली आहे. तसेच, स्वयंपाकी तथा मदतनीस यांच्या रु.२५००/- इतक्या मानधनातील राज्य हिस्स्यामध्ये रु.१०००/- वाढ करण्याचा निर्णय दि.०५ जुलै, २०२४ रोजीच्या मंत्रीमंडळ बैठकीत घेण्यात आला आहे. सदर बाबीकरिता अतिरिक्त निधी उपलब्ध करुन देण्याचा प्रस्ताव वित्त विभागास सादर करण्यात आला आहे.

स्वयंपाकी तथा मदतनीस यांच्या कामकाजामध्ये शासन निर्णय दि.१८ डिसेंबर, २०२३ अन्वये सुधारणा करण्यात येवून शाळा व शाळेचा परिसर स्वच्छ करण्याचे कामकाज कमी करण्यात आले आहे. तसेच, याबाबत सर्व संबंधितांना सूचना देण्यात आल्या आहेत. तसेच, सर्व संबंधित स्वयंपाकी तथा मदतनीस यांचे माहे फेब्रुवारी, २०२५ अखेरपर्यंतचे मानधन अदा करण्यात आले आहे.

*******************

## महाराष्ट्र विधानसभा,
## सन २०२५ चे प्रथम (अर्थसंकल्पीय) अधिवेशन

सर्वश्री. काशिनाथ दाते, अस्लम शेख, नानाभाऊ पटोले, संजय मेश्राम, सिद्धार्थ खरात, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना क्रमांक ३२ पुढीलप्रमाणे आहे :-

"केंद्र राज्य शासनाने जलजीवन मिशन ही महात्त्वाकांक्षी योजना आणून प्रत्येक घरात नळाने पाणी देण्याचा निर्णय घेणे, परंतु या योजनेमध्ये भ्रष्टाचार व अनियमितता आढळूणे, अहिल्यानगर जिल्ह्यात जलजीवन योजनेतून ९३० कामे असून कोट्यावधी रुपये खर्च करूनही कामे अपूर्ण असणे, निविदा प्रक्रियेपासूनच योजना वादात सापडणे, बोगस वर्कडन, कार्यकारी अभियंत्यांच्या खोट्या सह्या वापरून कामे मिळवणे, योजनेच्या जलस्रोतासाठी अगोदर बोअर घेण्याच्या सूचना असताना प्रशासन व ठेकेदारांनी 'भूजल' ची परवानगी घेतलेली नसतानाही विहिरी खोदुन पैसा वाया घालवणे, पुन्हा दुसऱ्या ठिकाणी विहिरी घेऊन खर्च वाढवणे, ठेकेदारांना ॲडव्हान्स रकमा देणे, कामांपेक्षा जास्त बिले काढणे, ज्या ठिकाणी योजना पूर्ण झाल्या, तिथे पाणीपुरवठा सुरू नसणे, अनेक वाड्यावस्त्यांवर पाणी पोहचलेले नसणे, पाईप जमिनीत पुरल्यापासून ते टाकी बांधण्यापर्यंतच्या कामात ठेकेदारांनी कुचराई करणे, निकृष्ट कामे असतानाही बिले अदा करणे, कामे केली किती आणि बिले दिली किती, या योजनांचा सर्व कुटुंबाला लाभ मिळतो का, अशा तक्रारी असणे, अहिल्यानगर जिल्हापरिषदेत पाणीपुरवठ्याच्या बैठकीदरम्यान पारनेर तालुक्यातील पाणीपुरवठा योजनेवरून ठेकेदार व माजी सरपंच यांच्यात हाणामारी झाल्याचे २५/१/२५ रोजी उघडकीस येणे, अशाप्रकारे जलजीवन योजनेत प्रशासन व ठेकेदार यांनी केलेला भ्रष्टाचार व केलेली शासनाची लूट, त्यामुळे शासनाने जल जीवन योजनेतील दोषी असणाऱ्या विरोधात करावयाची कारवाई व शासनाची प्रतिक्रिया"

---

### मा. मंत्री, (पाणी पुरवठा व स्वच्छता) यांचे निवेदन

अहिल्यानगर जिल्हा परिषद अंतर्गत एकूण ८३० नळ पाणी पुरवठा योजना मंजूर आहेत. त्यापैकी २५९ योजना भौतिकदृष्टया पूर्ण आहेत. उर्वरीत कामे वेगवेगळ्या टप्प्यात असून योजनांची भौतिक प्रगती ४१३ योजना ७५ ते ९९ टक्के, १२२ योजना ५० ते ७५ टक्के, ३२ योजना २५ ते ५० टक्के, ४ योजना ० ते २५ टक्के एवढी आहे.

राज्यात जल जीवन मिशन कार्यक्रमांतर्गत रु.५.०० कोटी पर्यंत कामांची प्रशासकीय मान्यता व अंमलबजावणीचे तसेच निधी वितरणाचे अधिकार संबंधित जिल्हा परिषदांना देण्यात आलेले आहेत. जल जीवन मिशन योजनेच्या निविदा प्रक्रीया शासन निर्णय व मार्गदर्शक तत्वे याचा अवलंब करुन पूर्ण करणेत आलेल्या आहेत. भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा यांची परवानगी घेऊनच विहीरींची कामे करण्यात आलेली आहेत.

मौजे शिरसगाव ता. श्रीरामपूर या कामाच्या निविदेमध्ये एका निविदाकाराने बोगस वर्कडन आढळून आल्याने त्यांना एक वर्ष निविदेतून अपात्र करण्यात आलेले आहे. तसेच कार्यकारी अभियंत्यांच्या खोट्या सह्या वापरुन कामे मिळविण्याचा कुठलाही प्रकार जिल्हा परिषदेत आढळून आला नाही. कोणत्याही योजनेच्या कंत्राटदारास ॲडव्हान्स रक्कमा देण्यात आलेल्या नाहीत. तसेच योजनेच्या कामाच्या मूल्यांकनानुसारच योजनेचे देयके संबंधीत कंत्राटदारास अदा करणेत आलेले आहेत.

जल जीवन मिशन अंतर्गत ज्या ठिकाणी पाणी पुरवठा योजना पूर्ण झालेल्या आहेत तेथील सर्व ठिकाणी पाणी पुरवठा चाचणी सुरु आहे. जल जीवन मिशन अंतर्गत विविध वाड्या वस्त्यांचा मुळ अंदाजपत्रकात समावेश नसलेबाबत अथवा इतर तांत्रिक कारणांमुळे ५६६ ग्रामपंचायतींचे मागणी प्रस्ताव जिल्हा परिषदेकडे प्राप्त आहेत. सदर प्रस्तावाची सर्व्हेक्षण करुन सुधारीत अंदाजपत्रक तयार करणेची कार्यवाही सुरु आहे. त्यापैकी २७९ अंदाजपत्रकांना तांत्रिक मान्यता देण्यात आली आहे. या २७९ पैकी २३९ प्रस्ताव शासनास सादर करण्यात आले असून १०७ प्रस्तावांस शासन स्तरावरुन मंजूरी प्राप्त झाली आहे. जिल्हा परिषदेकडे असलेल्या उर्वरित प्रस्तावांबाबत जिल्हा परिषदेकडून कार्यवाही सुरु आहे.

जल जीवन मिशन कार्यक्रमांतर्गत कामातील गैरव्यवहाराबाबत प्राप्त तक्रारीवर अंमलबजावणी यंत्रणेकडून उचित कार्यवाही करण्यात येते. योजनांच्या झालेल्या कामांची टप्प्यानुसार व वेळापत्रकाप्रमाणे तपासणी करण्यासाठी त्रयस्थ तांत्रिक तपासणी यंत्रणा (Third Party Inspection) नियुक्त आहे. कामाच्या गुणवत्ता तपासणी बाबत शासना मार्फत नियुक्त केलेल्या त्रयस्थ यंत्रणा टाटा कन्सल्टींग इंजिनीअर्स लि. यांचे मार्फत ८३० योजनांचे कामांना पहिले स्तरावर ७८२, दुसरे स्तरावर ४९४, तिसरे स्तरावर ६७, चौथे स्तरावर २ असे एकूण १३४५ वेळी योजनांना भेटी दिलेल्या आहेत. सदर तपासण्यांमध्ये वेळोवेळी १६७ योजनांमध्ये मुद्दे उपस्थित करणेत आलेले होते त्यापैकी १४१ मुद्यांची पूर्तता करणेत आलेली आहे. २६ मुद्यांची पूर्तता करणेची कार्यवाही प्रगतीत आहे. तपासणी करताना योजनेमध्ये त्रुटी आढळून आल्यावर स्वखर्चाने कंत्राटदाराकडून कामे करुन घेण्यात येतात. तसेच कंत्राटादारास त्यांच्याकडील त्रुटींच्या अनुषंगाने दंड आकारला जातो किंवा काळ्या यादीत टाकले जाते. कामाच्या आदेशानुसार विहीत मुदतीत काम पूर्ण न करणाऱ्या एकूण १६० कामांच्या कंत्राटदारांना रु.३७.७८ लक्ष दंड लावण्यात आला आहे. तसेच एका अधिकाऱ्याची विभागीय चौकशी प्रस्तावित करण्यात आली आहे.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मार्फत अहिल्यानगर जिल्ह्यातील एकुण ११२ योजनांची कामे प्रगती पथावर असुन ११ योजनांची कामे पूर्ण झाली आहेत. या ११ योजनेतील समाविष्ट सर्व वाड्या वस्त्यांना पाणी पुरवठा करण्यात आला आहे. उर्वरित १०१ योजनांची भौतिक प्रगती १७ योजना ७५ ते १०० टक्के, ७२ योजना ५० ते ७५ टक्के, १२ योजना २५ ते ५० टक्के एवढी आहे. सदर ११२ योजनांची निविदा प्रक्रिया शासनाच्या प्रचलित धोरणांनुसार परिपूर्ण करण्यात आलेली आहे. महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत घेण्यात आलेल्या योजनांचे उद्भव हे धरणांमध्ये Jackwell, Canal Intake आधारीत साठवण तलाव इ. प्रमाणे घेण्यात आलेले असुन सदरचे स्रोत हे शाश्वत स्रोत आहेत. निविदेच्या ठेकेदारांना अटी व शर्तीनुसार देयके अदा करण्यात आलेली असून काम झाल्यापेक्षा जास्त देयके अदा करण्यात आलेली नाहीत.

जिल्हा परिषदेच्या पाणी पुरवठा योजनांच्या कालबध्द प्रगतीसाठी जिल्हास्तरावरुन व राज्यस्तरावरुन वेळोवेळी तपशीलवार आढावा घेण्यात येतो. दिनांक २४.०१.२०२५ रोजी पारनेर तालूक्या मधील योजनांचा आढावा बैठकीसाठी उप अभियंता, सरपंच, कंत्राटदार व प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार यांचे प्रतिनिधी यांना निमंत्रीत करणेत आलेले होते. बैठकीचे दरम्यान कुठलाही अनुचीत प्रकार घडलेला नाही.

************************

**लक्षवेधी सूचना क्र. २९०**

महाराष्ट्र विधानसभा, सन २०२५ चे प्रथम (अर्थसंकल्पीय) अधिवेशन

**श्री. भास्कर जाधव, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना क्र. २९० पुढीलप्रमाणे आहे.**

"जलजीवन मिशन योजनेंतर्गत रत्नागिरी जिल्ह्यातील पाणी योजनांची कामे हा केवळ दिखावा असून २५ टक्केसुध्दा कामे झालेली नसल्याची गंभीर बाब दिनांक ६ फेब्रुवारी २०२४ रोजी मा. मंत्री, ग्रामीण पाणीपुरवठा विभाग यांच्या उपस्थितीत मंत्रालयात झालेल्या बैठकीत समोर येणे, एकेका ठेकेदाराने शंभर - शंभर कोटींची कामे घेऊन ठेवलेली असणे, अनेक ठिकाणची कामे अर्धवट स्थितीत असणे, पूर्णत्वास गेलेली कामे दर्जाहीन असणे, यासंदर्भात मा. जिल्हाधिकारी, रत्नागिरी तसेच वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे वारंवार लेखी तक्रार करूनही कोणतीही कार्यवाही न होणे, पीएमसी नेमलेली असताना बहुतांशी योजना जिल्हा परिषदेने स्वतःकडे घेऊन ठेवलेल्या असणे, लागतील तेवढे इंजिनियर, कर्मचारी घ्या, अशा सूचना असतानाही जिल्हा परिषदेने ते घेतले नसल्याचे, परिणामी योजनेचा अक्षरशः बोजवारा उडाल्याची धक्कादायक बाब समोर येणे, ही बाब खरी असल्याचे व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांनी मान्य केल्यानंतर स्पेशल स्कॉड तात्काळ पाठवून गुहागरसह जिल्ह्यातील सर्व कामांची तपासणी, सखोल चौकशी आणि कारवाईचे आदेश मा. मंत्री, ग्रामीण पाणीपुरवठा विभाग यांनी दिलेले असणे, तसेच काम न करणाऱ्या ठेकेदेदारांना तात्काळ टर्मीनेट करण्याचेही आदेश दिलेले असणे, तथापि वर्ष होऊन गेले तरी यावर कोणतीही कार्यवाही न होणे, परिणामी नागरीकांत वाढता तीव्र असंतोष, शासनाने उक्त प्रकरणी करावयाची निर्णयात्मक कार्यवाही वा शासनाची प्रतिक्रिया."

---

**मा. मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता यांचे निवेदन**

रत्नागिरी जिल्ह्यात जल जीवन मिशन अंतर्गत जिल्हा परिषदेमार्फत एकुण १४३२ नळ पाणी पुरवठा योजना तर महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत एकूण १२ नळ पाणी पुरवठा योजना राबविण्यात येत आहेत.

जिल्हा परिषदेमार्फत राबविण्यात येत असलेल्या एकूण १४३२ योजनांपैकी ४५२ नळ पाणी पुरवठा योजनांची कामे पूर्ण झाली असून, ९७६ नळ पाणी पुरवठा योजनांची कामे प्रगतीपथावर आहेत. महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत राबविण्यात येत असलेल्या १२ नळ पाणी पुरवठा योजनांची कामे प्रगतीपथावर आहेत.

रत्नागिरी जिल्ह्यात जल जीवन मिशनअंतर्गत जिल्हा परिषदेकडील योजनांची कामे एकूण ३३७ कंत्राटदारांना देण्यात आली आहेत. काही कामांकरीता निविदाकारांचा प्रतिसाद मिळत नसल्याने निविदा वारंवार प्रसिध्द करण्यात आल्या. ई-निविदा प्रणालीच्या प्रक्रीयेनंतरच ३३७ कंत्राटदारांपैकी २१ कंत्राटदारांकडेच एकापेक्षा जास्त कामांचे कार्यादेश दिल्याचे निदर्शनास आले आहे.

जल जीवन मिशन अंतर्गत नळ पाणी पुरवठा योजनांचा नियतकालीक आढावा शासनस्तरावरून तसेच महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, जिल्हा परिषद यांच्याकडून घेतला जात असून आवश्यक संनियंत्रण ठेवण्यात येत आहे.

योजनेतील कामाचा दर्जा राखण्याकरता योजनेची त्रयस्थ तपासणी यंत्रणामार्फत पाहणी केली जाते. त्यावर त्रयस्थ तपासणी यंत्रणामार्फत निरीक्षणे नोंदविली जातात. तदनंतर नोंदविलेल्या सदर निरीक्षणांच्या अनुषंगाने पूर्तता संबंधित ठेकेदाराच्या खर्चात करण्यात येते. जिल्हा परिषदेकडील योजनांचे त्रयस्थ तपासणी संस्थेकडून वेळोवेळी तपासणी करण्यात येत असून त्यातुन एकूण ६९७ निरीक्षणे करण्यात आली आहेत. त्यापैकी ४९८ निरीक्षणांची पूर्तता करण्यात आली आहे, उर्वरीत निरिक्षणांची पूर्तता करुन घेण्यात येत आहे. महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडील योजनांचे त्रयस्थ तपासणी संस्थेकडून एकूण २८ निरीक्षणे करण्यात आली असून त्यांची पूर्तता करण्यात आली आहे.

जल जीवन मिशन अंतर्गत जिल्हा परिषदेच्या १४३२ योजनांपैकी २९३ योजनांकरिता कार्यान्वयन यंत्रणा जिल्हा परिषद होती. त्यापैकी २१५ योजनांची कामे भौतिकदृष्ट्या पूर्ण असून उर्वरीत योजना विविध टप्प्यावर प्रगतिपथावर आहेत. माहे ऑगस्ट, २०२४ ते माहे ऑक्टोबर, २०२४ या कालावधीत जिल्हा परिषदेंतर्गत सरळसेवा भरतीद्वारे एकूण ११ नवीन कनिष्ठ अभियंता ग्रामीण पाणी पुरवठा विभागात रुजू झाले आहेत. रत्नागिरी जिल्ह्यातील ९ तालुक्यापैकी गुहागर तालूका वगळता ८ तालुक्यांमध्ये नियमित उप अभियंता कार्यरत आहेत.

महाराष्ट्र विधानमंडळाच्या सन २०२३ च्या पहिल्या (अर्थसंकल्पीय) अधिवेशनात विधानसभेत देण्यात आलेले आश्वासन क्र. ३५६ च्या पूर्ततेच्या अनुषंगाने मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता यांच्यास्तरावर दि. ०६.०२.२०२४ रोजी बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीमध्ये रत्नागिरी जिल्ह्यातील जल जीवन मिशन अंतर्गत योजनांच्या कामाच्या गुणवत्तेच्या अनुषंगाने निवडक योजनांची पाहणी करण्याकरीता शासनस्तरावरून पथक पाठविण्याचे निर्देश देण्यात आले. त्यानुसार राज्य पाणी व स्वच्छता मिशन स्तरावरील पथकामार्फत दि.०३.०४.२०२४ ते दि.०४.०४.२०२४ या कालावधीमध्ये रत्नागिरी जिल्ह्यातील रत्नागिरी तालुक्यातील १) फणसोप, २) हातखंबा तारवेवाडी व गुहागर तालुक्यातील १) कौंढर काळसुर, २) साखरी आगर, ३) पालपेणे अशा एकूण ५ योजनांची पाहणी करण्यात आली. सदर पाहणीदरम्यान आढळलेल्या ३१ त्रुटी/निरीक्षणे नोंदविली आहेत. याबाबत पूर्तता अहवाल सादर करण्याचे जिल्हा परिषदेस निर्देश दिले आहेत.

रत्नागिरी जिल्ह्यातील जिल्हा परिषदेंतर्गत योजनेच्या मुदतवाढ प्रस्तावामध्ये एकूण ३०६ कंत्राटदारांना रु.४७.५१ लक्ष इतका दंड आकारण्यात आला आहे. तसेच महाराष्ट्र जीवन प्राधिकरणांतर्गत योजनेची कामे पूर्ण करण्यास विलंब होत असल्याने ५ ठेकेदारांना रु.४१.७० लक्ष इतका दंड आकारण्यात आला आहे.

---

**लक्षवेधी सूचना क्रमांक ४८३**

**महाराष्ट्र विधानसभा**

**सन २०२५ चे प्रथम (अर्थसंकल्पीय) अधिवेशन**

**सर्वश्री. राजेंद्र गावित, अस्लम शेख, विजय वडेट्टीवार, नानाभाऊ पटोले, अमिन पटेल, विकास ठाकरे, संजय मेश्राम, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्रमांक ४८३ पुढीलप्रमाणे आहे:-**

"राज्यात पालघर जिल्ह्यात जलजीवन योजनेची अनेक कामे अर्धवट असल्याची बाब आहे जानेवारी २०२५ च्या सुमारास निदर्शनास येणे, राज्यातील पाणीटंचाई दूर करण्याकरिता शासनाने जलजीवन मिशन योजनेच्या सुरुवात केली असणे, पालघर जवळ तालुक्यातील सध्या एकूण १०७ गावांपैकी ७९ गाव जिल्हा परिषद कामे चालू असणे, परंतु आतापर्यंत फक्त बारा गावांना कामे पूर्ण झालेली असणे, मात्र अद्यापही ६७ गावांना जलजीवन पाईपलाईन कामे अपूर्ण असल्याचे निदर्शनास येणे, तसेच उक्त कामाकरिता साधनसमग्री पाईपलाईन पाईप फिटींग ही कामे निकृष्ट दर्जाची असल्याचे गावकऱ्यांचा आरोप होणे, जल जीवन योजनेचा कामांवर नियमित देखरेख व्यवस्थापन तपासणी अभाव असणे, पालघर जवळ तालुक्यातील सारसून, दादर, कोपरा, हतेरी, जांभूळ, माता वावर, बेहेड पाडा, साखर शेत, असे अनेक गावांना ठेकेदारांनी तर जलवाहिनीचे काम थांबवण्याची बाब निदर्शनास येणे, त्या अनुषंगाने उन्हाळ्याच्या आधी गावकऱ्यांना पाणीपुरवठा सुरू होण्याच्या दृष्टीने शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना"

---

**मा. मंत्री (पाणी पुरवठा व स्वच्छता) यांचे निवेदन**

पालघर जिल्ह्यात जल जीवन मिशन अंतर्गत एकूण ८९९ गावांपैकी ६१३ गावांकरीता ५६२ नळ पाणी पुरवठा योजनेची कामे जिल्हा परिषदेमार्फत घेण्यात आली आहेत. जिल्हा परिषदेकडील एकूण ५६२ योजनांपैकी पालघर तालुक्यात ५५ योजना, डहाणू तालुक्यात १०७ योजना, वसई तालुक्यात १७ योजना, तलासरी तालुक्यात ३२ योजना, वाडा तालुक्यात १३९ योजना, जव्हार तालुक्यात ७८ योजना, मोखाडा तालुक्यात एकूण ५५ योजना व विक्रमगड तालुक्यात ७९ योजना घेण्यात आलेल्या आहेत. तसेच सदर ५६२ योजनांपैकी एकूण १५२ योजनांची कामे १००% भौतिकदृष्ट्या पूर्ण झालेली असून २२९ योजनांची प्रगती ७६-९९%, १२५ योजना ५१-७५%, ३६ योजना २६-५०%, २० योजनांची प्रगती ०-२५% एवढी आहे.

पालघर जिल्ह्यात महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत जल जीवन मिशन कार्यक्रमांतर्गत एकूण २६ योजनांची कामे प्रगतीपथावर असून त्यामध्ये ३२२ गावांचा समावेश आहे. या २६ योजनांपैकी १० योजनांची प्रगती ७६-१००%, १४ योजना ५१-७५%, ०२ योजना २६-५०% एवढी आहे. पूर्ण झालेली ०१ योजना (दापचरी) व अंशतः कार्यान्वित ०२ योजनासह (मोखाडा तालुका ५८ गावे प्रादेशिक पाणी पुरवठा योजना ता. मोखाडा, जि. पालघर आणि अर्नाळा व १६ गावे प्रादेशिक पाणी पुरवठा योजना ता. वसई, जि. पालघर) उर्वरित योजनापैकी १२ योजनांची कामे माहे मार्च २०२५ अखेरपर्यंत पूर्ण करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आलेले आहे. तसेच ११ योजनांची कामे माहे डिसेंबर, २०२५ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजित आहे.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत राबविण्यात येणाऱ्या सर्व २६ योजनांची कामे प्रगतीपथावर असून योजनेच्या कोणत्याही ठेकेदारामार्फत योजनेचे काम थांबविण्यात आलेले नाही.

जव्हार तालुक्यामधील जल जीवन मिशनअंतर्गत १०७ गावांपैकी ७९ गावांकरीता ७८ नळ पाणी पुरवठा योजना जिल्हा परिषदेमार्फत घेण्यात आल्या आहेत. तसेच उर्वरीत २८ गावांकरीता ३ प्रादेशिक नळ पाणी पुरवठा योजना महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत राबविण्यात येत आहेत.

सद्यस्थितीमध्ये जव्हार तालुक्यातील जल जीवन मिशनअंतर्गत ७८ योजनांपैकी १३ कामे भौतिकदृष्ट्या पूर्ण असून ६५ कामे प्रगतीपथावर आहेत. सदर ६५ कामांपैकी २७ योजनांची प्रगती ७६-९९%, ३५ योजना ५१-७५%, ०३ योजना २६-५०% एवढी आहे.

जव्हार तालुक्यात जल जीवन मिशनअंतर्गत १००% घरगुती नळ जोडणी देऊन तालुक्यातील एकूण ०६ गावे "हर घर जल" घोषित करण्यात आली आहेत.

पालघर जिल्ह्यातील जिल्हा परिषदेमार्फत राबविण्यात येणाऱ्या योजनांसाठी M/s NJS India Pvt. Ltd. या संस्थेस प्रकल्प व्यवस्थापक सल्लागार (PMC) म्हणून नियुक्त केले आहे. या संस्थेमार्फत एकूण ११ स्थापत्य अभियंता व १ डाटा एंट्री ऑपरेटर यांची जव्हार तालुक्यात जल जीवन मिशनअंतर्गत सुरु असलेल्या कामांची पाहणी व डाटा एंट्री करणेकरीता नेमणूक करण्यात आली आहे. तसेच जल जीवन मिशनअंतर्गत सुरु असलेली कामांची गुणवत्ता व दर्जा राखणेकरीता पालघर जिल्ह्याकरिता दि.०७/०६/२०२२ रोजी मे. TUV SUD South Asia Pvt. Ltd. या संस्थेस त्रयस्थ तांत्रिक परिक्षण संस्था म्हणून नेमणूक केली आहे. त्रयस्थ यंत्रणेकडून उपस्थित केलेल्या निरिक्षणांची पूर्तता ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद, प्रकल्प व्यवस्थापक सल्लागार (PMC) व ठेकेदार यांच्याकडून करण्यात येते.

जल जीवन मिशनअंतर्गत कामे करतेवेळी सिमेंट, स्टील, वाळू, खडी, कॉंक्रीट, इ. साहित्याची मान्यताप्राप्त प्रयोगशाळेकडून तपासणी करण्यात येते. तसेच योजनेची तपासणी विविध टप्प्यांवर शासनामार्फत नियुक्त त्रयस्थ तांत्रिक परिक्षण संस्थेमार्फत करण्यात येते. जव्हार तालुक्यात निकृष्ट दर्जाची कामे झाली असल्याची बाब निदर्शनास आलेली नाही.

जल जीवन मिशनअंतर्गत सुरु असलेल्या नळ पाणी पुरवठा योजनेच्या कामांमध्ये महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडे नोंदणीकृत असलेल्या पाईप, व्हॉल्व्स, इ. साहित्य पुरवठादार यांचेकडून कंत्राटदारामार्फत खरेदी करण्यात येते. सदर खरेदी करण्यात आलेले पाईप, व्हॉल्व्स, इ. महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडील मान्यता प्राप्त त्रयस्थ तांत्रिक संस्थेमार्फत परिक्षण करुन घेण्यात आलेनंतरच पाईप पुरवठा करणेबाबतची दक्षता घेण्यात येत आहे.

जव्हार तालुक्यातील मौजे सारसून, दादरकोपरा, जांभुळ माथा, हातेरी, वावर, बेहेडपाडा, राखरशेत येथील कामे सुरु असून काही योजनांची कामे माहे एप्रिल/जून, २०२५ तर काही योजनांची कामे माहे सप्टेंबर, २०२५ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

******

## महाराष्ट्र विधानसभा,
## सन २०२५ चे प्रथम (अर्थसंकल्पीय) अधिवेशन

श्रीमती मंजुळा गावित, मा. विधानसभा सदस्य, यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना क्रमांक १६१३ पुढीलप्रमाणे आहे :-

**"जलजीवन मिशन अंतर्गत साक्री तालुक्यातील (जि.धुळे) २०७ गावांना नळाव्दारे पाणीपुरवठा योजनेची कामे गेल्या वर्षभरापासुन सुरू असणे, त्यापैकी २०३ गावांची कामे ग्रामीण पाणीपुरवठा विभागामार्फत तर ४ कामे महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यंत्रणेद्वारे करण्यात येणे, उक्त कामे अतिशय निकृष्ट दर्जाची होत असल्याचे ग्रामस्थांकडून वारंवार संबंधित ठेकेदार व अधिकारी यांचे लक्षात आणून देण्यात येणे, तथापि त्याकडे संबंधित अधिकाऱ्यांचे होत असलेले दुर्लक्ष, परिणामी शासनाचे कोट्यवधी रूपये वाया जाण्याची शक्यता, परिणामी नागरिकांमध्ये वाढता तीव्र असंतोष, शासनाने उक्त कामाची तातडीने चौकशी करुन निकृष्ट दर्जाचे काम करणा-या ठेकेदारावर व त्याला पाठीशी घालणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने केलेली कार्यवाही."**

---

मा. मंत्री, (पाणी पुरवठा व स्वच्छता) यांचे निवेदन

धुळे जिल्ह्यातील साक्री तालुक्यात जल जीवन मिशन अंतर्गत एकूण २०३ नळ पाणी पुरवठा योजनेची कामे जिल्हा परिषदेमार्फत मंजूर आहेत. या २०३ योजनांपैकी २०२ योजना प्रगतीत असून एक योजना वन जागेच्या परवानगीसाठी सादर करण्यात आलेली आहे.

जलजीवन मिशन कार्यक्रमांतर्गत साक्री तालुक्यातील २०३ पैकी १२० योजनांची कामे आदिवासी जागा, वन विभागाची जागा , खाजगी जागा , शासकीय जागा व सिंचन जागा यांच्या परवानगी नसल्याने कामास विलंब लागला. तसेच सदर योजनेमध्ये भूमी अधिग्रहण करण्यासाठी निधीचा समावेश नसल्याने स्थानिक स्वराज्य संस्था अथवा खाजगी व्यक्तींकडून दान पत्राद्वारे जमीन प्राप्त करुन घेण्याची गरज भासते. तसेच, योजनांची कामे सुरु करण्यात आल्यानंतर उद्भव अयशस्वी झाल्याने व अन्य तांत्रिक बदलामुळे एकूण ६९ योजना सुधारीत करण्याची कार्यवाही सुरु आहे.

जल जीवन मिशन कार्यक्रमांतर्गत ठेकेदारांच्या दिरंगाईमुळे कामांना विलंब झालेला आहे अशा एकूण २५ ठेकेदारांवर रु.२१.२५ लक्ष रकमेची दंडात्मक कारवाई करण्यात आलेली आहे. तसेच उर्वरित ठेकेदारांना यासंदर्भात नोटीसीद्वारे व आढावा बैठकीत सूचना देण्यात आलेल्या आहेत. जल जीवन मिशन कार्यक्रमांतर्गत कामातील गैरव्यवहाराबाबत प्राप्त तक्रारीवर

अंमलबजावणी यंत्रणेकडून उचित कार्यवाही करण्यात येते. योजनांच्या झालेल्या कामांची टप्प्यानुसार व वेळापत्रकाप्रमाणे तपासणी करण्यासाठी त्रयस्थ तांत्रिक तपासणी यंत्रणा (Third Party Inspection) नियुक्त आहे. तपासणी करताना योजनेमध्ये गंभीर त्रुटी आढळून आल्यावर स्वखर्चाने कंत्राटदाराकडून कामे करुन घेण्यात येतात. तसेच कंत्राटादारास त्यांच्याकडील त्रुटींच्या अनुषंगाने दंड आकारला जातो किंवा काळ्या यादीत टाकले जाते. जल जीवन मिशन कार्यक्रमांतर्गत योजनेमध्ये महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांचेकडून प्रमाणित पाईपचा वापर करण्यात येतो. तसेच पाईपांच्या गुणवत्तेबाबत त्रयस्थ संस्थेमार्फत तपासणी करण्यात येते. जलकुंभासाठी लागणारे साहित्य उदा. वाळू, स्टिल, खडी , सिमेंट या तपासणी शासन मान्य अभियांत्रिकी महाविद्यालय यांच्या मार्फत केली जाते. योजनांच्या गुणवत्तेबाबत शासनामार्फत नियुक्त नाबार्ड कन्सल्टन्सी व जेजेएमपीडीएमसी यांच्यामार्फतही कामांच्या विविध टप्प्यांवर खात्री करण्यात येते.

धुळे जिल्ह्यातील साक्री तालुक्यात महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत जल जीवन मिशन कार्यक्रमांतर्गत ४ योजनांची कामे प्रगतीपथावर आहेत. सदर योजनांच्या कामांची शासनाने नेमलेल्या त्रयस्थ यंत्रणेमार्फत वेळोवेळी तपासणी करण्यात येते. तपासणी अहवालात सुचविण्यात येणाऱ्या दुरुस्त्या वेळीच कंत्राटदारामार्फत करण्यात आलेल्या आहेत.

************

लक्षवेधी सूचना क्र.२२२१

## महाराष्ट्र विधानसभा

## श्री.शिवाजी पाटील, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम-१०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्र.२२२१ खालीलप्रमाणे आहे:-

"कोल्हापूर जिल्ह्यातील चंदगड विधानसभा मतदारसंघामध्ये हेरे सरंजाम प्रश्न १९७२ पासून प्रलंबित असून यामध्ये मूळ गावे-४७, वाडी विभाजना नंतरची एकूण गावे ५४ आहेत. हेरेसरंजाम एकूण क्षेत्र २२०९२ हेक्टर आहे. दिनांक ३१/०५/२००१ चे शासन निर्णयापूर्वी वाटप करावयाचे क्षेत्र १६००१ हेक्टर असून शासन निर्णयानंतर वाटप झालेले क्षेत्र ६०९१ हेक्टर त्यापैकी वाटप केलेले क्षेत्र ३७२१.३७ हेक्टर आहे. वाटप करावयाचे क्षेत्र २३६९.६३ हेक्टर पैकी कॅम्प मध्ये वाटप केलेले क्षेत्र ९२५.६६ हेक्टर, सध्या वाटपाचे शिल्लक क्षेत्र १४४३.९७ हेक्टर बाकी असणे. १) हा प्रश्न सोडविण्यासाठी अनेक स्तरावरून प्रयत्न करण्यात आले. परंतु, मुख्यमंत्री साहेबांच्या मार्गदर्शनाने गेल्या मंत्रीमंडळातील महसूलमंत्री महोदय यांनी या प्रश्नाकडे गांभीर्याने लक्ष घातले. त्यामुळे या कामाला सुरुवात झाली. परंतु, हे काम करत असताना प्रशासकीय पातळीवर अनेक अडचणी निर्माण होत असल्याचे नाकारता येत नसणे. २) यामध्ये असणाऱ्या काही जाचक अटी शिथिल करण्याची गरज आहे. जमा कराव्या लागणाऱ्या कागदपत्रांबाबतच्या अटी शिथिल केल्या जावेत. तसेच शासकीय पट जी २०० पट आहे. ती कमी करण्यात यावी हा प्रश्न सुटल्यास कसणाऱ्या शेतकऱ्यांच्या नावे जमीन होईल. अनेक वर्षे प्रलंबित असणारा प्रश्न निकाली काढण्याची आवश्यकता, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

---

### श्री.चंद्रशेखर बावनकुळे, मा.मंत्री (महसूल) यांचे निवेदन

कोल्हापूर जिल्ह्यामध्ये सरंजामदार श्री. संभाजीराव हणमंतराव सावंत भोसले यांची राजकीय स्वरुपाचे सरंजाम अस्तित्वात होते. सरंजामदार श्री. संभाजीराव हणमंतराव सावंत भोसले हेरे या गावी राहत असल्याने सदर इनामास हेरे सरंजाम असे संबोधले जाते. या इनामामध्ये ४७ गावे (वाडी विभाजनानंतरची ८ असे एकूण ५५ गावे) आहेत.

जिल्हाधिकारी,कोल्हापूर यांच्या दिनांक ०९/०६/२०२४ च्या आदेशान्वये हेरे सरंजाम जमीनींचा धारणाधिकार भोगवटदार वर्ग-२ मधुन भोगवटदार वर्ग-१ करण्यासाठी ०८ उपजिल्हाधिकारी व १०८ तलाठी यांच्या पथकाची नियुक्ती करण्यात आली होती. सदर नियुक्त करण्यात आलेल्या पथकाद्वारे २३२८ इतक्या गटांबाबत आदेश निर्गमित करण्यात आलेले आहेत. त्यापैकी ८५२ गटांवरील आदेशांमध्ये शेतकऱ्यांद्वारे आकाराच्या २०० पट चलनाची रक्कम शासन जमा करण्यात आल्याने, संबंधित जमिनींचा धारणाधिकार भोगवटदार वर्ग-२ मधून भोगवटदार वर्ग-१ करण्यात आलेल्या आहेत. उर्वरित १४७६ गटांवरील आदेशांमध्ये शेतकऱ्यांकडून आकाराच्या २०० पट रक्कम शासन जमा केल्यानंतर जमिनींचा धारणाधिकार भोगवटदार वर्ग-२ मधून भोगवटदार वर्ग-१ करण्यात येतील. सदरची कार्यवाही शेतक-यांकडून आवश्यक कागदपत्रे न घेता तहसिल कार्यालयातील अभिलेख कक्षामधून अभिलेखे उपलब्ध करुन घेऊन करण्यात येत आहे. हेरे सरंजाम इनाम मुंबई सरंजाम जहागिर ॲन्ड अदर इनाम्स ऑफ पोलीटिकल नेचर रिझम्प्शन रुल, १९५२ नुसार खालसा करण्यात आले. याबाबत फेरफार क्र ६ (१) अन्वये नोंद होवून त्या अन्वये हेरे सरंजाम इनाम जमिनी पुनर्प्रदान करण्यात आलेल्या आहेत. हेरे सरंजाम इनाम जमीन असणा-या काही गावांमधील काही गटांवर ६ (१) चा मुळ वाटप फेरफार आढळून येत नाही. तसेच काही गावांमधील काही गटांवर वारसा नोंद व हस्तांतरणाचे फेरफार तसेच इतर आवश्यक कागदपत्रे आढळून येत नसल्याने हेरे सरंजाम इनाम जमीनींचा धारणाधिकार भोगवटदार वर्ग-२ मधून भोगवटदार वर्ग-१ करत असताना अडचणी येत आहेत.

तरी, हेरे सरंजाम जमिनी बाबत उपलब्ध असणारे गाव निहाय अभिलेखे तसेच विविध शासन निर्णय यांचा अभ्यास करून प्रलंबित क्षेत्राचे वाटप तसेच वाटप केलेल्या क्षेत्राचा धारणाधिकार भोगवटदार वर्ग-१ करणे ही प्रकिया सुलभ करण्यासाठी जिल्हाधिकारी, कोल्हापुर यांच्या स्तरावर उपविभागीय अधिकारी,करवीर यांचे अध्यक्षतेखाली समिती नियुक्त करण्यात आलेली आहे.

*****************************************

~~[illegible]~~

~~9587651793 - [illegible] - [illegible]~~

clerk

**पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग.** **लक्षवेधी सूचना क्र.२२०९**

**महाराष्ट्र विधानसभा**

**सन २०२५ चे पहिले (अर्थसंकल्प) अधिवेशन**

श्री. संजय देरकर, वि.स. स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सुचना क्र. २२०९ पढोलप्रमाणे आहे:-

**पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग.** **लक्षवेधी सूचना क्र.२४७**

**महाराष्ट्र विधानसभा**

**सन २०२५ चे पहिले (अर्थसंकल्प) अधिवेशन**

श्री. प्रशांत ठाकूर, श्रीमती मनिषा चौधरी, श्री. अमित साटम, वि.स.स., यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सुचना क्र. २४७ पुढीलप्रमाणे आहे:-

"रायगड जिल्ह्यातील तळोजा (ता.पनवेल) औद्योगिक वसाहतीतील अनेक कंपन्यांमार्फत रात्री अपरात्री तसेच पहाटेच्या वेळीत सोडण्यात येणाऱ्या रासायनिक दुषित वायुमुळे पनवेल, नविन पनवेल, खांदा कॉलनी, कळंबोली, कामोठे, खारघर परिसरातील नागरिकांच्या आरोग्याला धोका निर्माण झाला असल्याचे माहे फेब्रुवारी २०२५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास येणे, उक्त बाब सभागृहात वारंवार शासनाच्या निदर्शनास आणुनसुद्धा शासनाच्या अक्षम्य होणाऱ्या दुर्लक्षामुळे संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांकडून ठोस कारवाई होत नसणे. पर्यावरणाला धोका निर्माण करणाऱ्या उक्त औद्योगिक वसाहतीतील रासायनिक कारखान्यांवर कोणतीच कारवाई होत नसल्यामुळे नागरिकांच्या मनात संबंधित विभागाबाबत चिड निर्माण होत असणे, या औद्योगिक वसाहतीच्या परिसरातील खारघर, कळंबोली, तळोजा आणि पनवेल परिसरातील अनेक नागरिक आपली घरे सोडून अन्यत्र स्थलांतरीत होणे, प्रदुषण नियंत्रण मंडळाच्या अधिकाऱ्यांची सदर प्रदुषण करणाऱ्या कारखान्यांच्या बरोबर साटेलोट असल्याची भावना बनणे, दुषित वायु सोडणाऱ्या कारखान्यांवर तसेच उक्त परिसरातील संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांवर तातडीने कारवाई करण्याची नितांत गरज, त्यादृष्टीने शासनाने त्वरीत करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

.............................................................................................................................................

**मा. मंत्री (पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग) यांचे निवेदन.**

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाची वसाहत तळोजा, ता. पनवेल, जि. रायगड येथे १९६७ पासुन वसलेली आहे. या औद्योगिक वसाहतीमध्ये प्रामुख्याने रासायनिक, औषध निर्मिती, खत निर्मिती, काच व रंग निर्मिती, अन्न प्रक्रिया, मत्स्य प्रक्रिया, अभियांत्रिकी, किटक नाशक, बॅटरी उत्पादक इ. जवळपास ४०५ उद्योग कार्यरत आहेत. या उद्योगांना महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत उद्योग स्थापन व चालवण्यासाठी हवा व जल प्रदुषण रोखण्यासाठी आवश्यक ती सयंत्रणा बसविण्याच्या अधिन राहून ठराविक कालमर्यादेसाठी संमती पत्र दिले जाते.

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळास माहे जानेवारी-२०२५ व फेब्रुवारी -२०२५ या महिन्यामध्ये नागरिकांकडून रात्रीच्या वेळेस वासाच्या तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. यानुषंगाने केलेल्या तपासणीमध्ये पनवेल महानगरपालिका हद्दीत बसविण्यात आलेल्या सतत वातावरणीय हवा गुणवत्ता तपासणी केंद्र तोंडारे, तळोजा (CAAQMS) व कळंबोली येथील अहवालावरून हवेची गुणवत्ता मध्यम श्रेणीमध्ये आढळून आल्याचे निदर्शनास आले आहे. (हवा गुणवत्ता निर्देशांक १०० ते २००). तळोजा औद्योगिक वसाहतीमधील उद्योगांमधील वायुची गळती झाल्यास त्याची नोंद हवा गुणवत्ता तपासणी केंद्र तोंडारे येथे होते. तसेच, वासाच्या तक्रारीच्या अनुषंगाने वेळोवेळी मोबाईल एअर मॉनिटरींग व्हॅन व्दारे हवेची गुणवत्ता मोजली जाते व या अहवालावरून हवेच्या गुणवत्तेमध्ये केमिकल घटकांचे प्रमाण विहित मर्यादेत असल्याचे तसेच हवा गुणवत्ता निर्देशांक हा "मध्यम" स्वरुपाचा असल्याचे निदर्शनास आले आहे.

श्री. राजीव सिन्हा यांनी माननीय लोकआयुक्त यांच्याकडे दि.०२/०५/२०२२ रोजी हवा प्रदुषण विषयक केलेल्या तक्रारीबाबत मा. लोकआयुक्त यांच्या दि.१७/०२/२०२३ रोजीच्या आदेशान्वये विशेष तपास पथक (SIT) ची स्थापना केली. याबाबतचा अंतीम अहवाल मा. लोकआयुक्त यांचेकडे सादर केला आहे. SIT अहवालामध्ये नमुद केल्याप्रमाणे तळोजा औद्योगिक वसाहतीतील उद्योगांनी या संदर्भातील उपाययोजना पूर्ण केल्या आहेत. मा. लोकायुक्त यांच्या दि.१०/०८/२०२३ रोजीच्या आदेशान्वये, तळोजा हवा प्रदूषणाबाबत व वास प्रतिबंध उपाययोजना या संदर्भात प्रगती आढावा अहवाल तपासण्यासाठी देखरेख समिती गठीत केली आहे. समितीची बैठक नियमितपणे घेतली जाते व उपाययोजनांची अंमलबजावणी केली जाते.

वातावरणीय हवा गुणवत्ता खालावल्याने व संमतीपत्रातील अटी व शर्तीची पूर्तता न केल्यामुळे सदर उदयोगाची रु.१०.००लक्षची बँक हमी जप्त करण्यात आली आहे. तसेच, खाणीच्या पाहणीदरम्यान वातावरणातील धुलीकणांचे प्रमाण जास्त आढळणे, पाण्याच्या बी.ओ.डी. व सी.ओ.डी. चे जास्त असणे, पाण्याचा सामू Acidic असणे इ. कारणास्तव आढळून आलेल्या त्रुटींच्या अनुषंगाने दि.०३/०३/२०२५ रोजी उद्योगास प्रस्तावित निर्देश देण्यात आले आहेत.

३) मुंगोली निर्गुडा खुली खाण:- सन १९९५ पासून कार्यरत सदर खाणीतून ५.२५ दशलक्ष टन प्रतिवर्ष कोळशाचे उत्खनन करण्यात येते. सद्यस्थितीत सदर खाणीचा संमतीपत्राच्या नुतनीकरणाचा अर्ज मंडळाच्या विचाराधीन आहे. वातावरणीय हवा गुणवत्ता खालावल्याने व संमतीपत्रातील अटी व शर्तीची पूर्तता न केल्यामुळे या उदयोगाची दि. २९/११/२०२२ रोजी रू.१०.० लक्षची बँक हमी जप्त करण्यात आली आहे. सदर खाणीच्या पाहणीदरम्यान आढळून आलेल्या त्रुटींच्या अनुषंगाने दि.०४/१२/२०२४ रोजी प्रस्तावित निर्देश देण्यात आले असून खाण उद्योगाने प्रस्तावित निर्देशांच्या अनुषंगाने अनुपालन अहवाल सादर केला आहे.

४) कोलारपिंपरी कोळसा खाण:- सदर खाणीचा संमतीपत्राच्या नुतनीकरणाचा अर्ज सद्यस्थितीत मंडळाच्या विचाराधीन आहे. या कोळसा खाणीची रू.१०.०० लक्षची बँक हमी दि.०९/०३/२०२२ रोजीच्या पत्रान्वये जप्त करण्यात आली आहे.

५) घोन्सा खुली खाण :- सदर खाणीचा संमतीपत्राच्या नुतनीकरणाचा अर्ज सद्यस्थितीत मंडळाच्या विचाराधीन आहे. या कोळसा खाणीची रु.५.०० लक्षची बँक हमी जप्त करण्यात आली आहे.

६) उकणी खुली खाण :-सदर खाणीचा संमतीपत्राच्या नुतनीकरणाचा अर्ज सद्यस्थितीत मंडळाच्या विचाराधीन आहे. मे. वेस्टर्न कोलफिल्ड लिमीटेड या कोळसा खाणीची रु.१०.०० लक्षची बँक हमी दि.०९/०३/२०२२ रोजीच्या पत्रान्वये जप्त करण्यात आली आहे.

७) कोलगांव खुली खाण:- या खाणीस म.प्र.नि. मंडळामार्फत दि.३१/१२/२०२५ पर्यंत संमतीपत्र देण्यात आले आहे. सदर कोळसा खाणीने संमतीपत्रातील अटी व शर्तीचे उल्लंघन केल्यामुळे व वातावरणीय हवेची गुणवत्ता खालावल्यामुळे या खाणीची रु.२.०० लक्षची बँक हमी दि.१०/०३/२०२५ रोजीच्या पत्रान्वये जप्त करण्यात आली आहे.

वणी तालुक्यात- (१)ग्रामपंचायत चिखलगांव (२) तहसिल कार्यालय, वणी(३) एमाआयडीसी वणी या ०३ ठिकाणी वातावरणातील हवेची गुणवत्ता तपासण्याकरिता रेस्पेरेबल डस्ट सॅम्पलर बसविण्यात आले आहेत. सदर ठिकाणच्या पृथ:करण अहवालावरून सल्फर डॉय ऑक्साईड व नायट्रोजन ऑक्साईड या घटकांचे सरासरी प्रमाण विहीत मर्यादेत तर, श्वसनीय धुलीकणांचे प्रमाण विहीत मर्यादेपेक्षा जास्त आढळले. वणी परिसरातील प्रदूषणाला सामान्य वाहतूक, जड वाहतूक, कोळशाचा इंधन म्हणून होणारा व्यावसायिक व घरगुती वापर इत्यादी घटक देखील कारणीभूत आहेत. वणी तालुक्यामध्ये एकूण ०६ कोल वॉशरी उद्योग असून, त्यापैकी ०१-उद्योग कार्यरत व ०५-उद्योग बंद अवस्थेत आहेत. मे. कार्तिकेय कोल वॉशरीज प्रा. लि. या उद्योगाची संमतीपत्राची वैधता दि.३१/०३/२०२६ पर्यंत असून सदर उद्योगाच्या पाहणीदरम्यान आढळलेल्या त्रुटींच्या अनुषंगाने दि.०६/१०/२०२३ रोजी कारणे दाखवा नोटीस बजाविण्यात आली होती. तथापि, त्रुटींची पुर्तता पुर्णपणे न केल्याबद्दल सदर उद्योगास दि.१३/०२/२०२४ रोजी अंतरिम निर्देश देण्यात आले असून रू.२.५० लक्षची बँक हमी जप्त करण्यात आली आहे.

वणी तालुक्यात राजूर परिसरात एकुण ४२९(२६-कार्यरत व १६-बंद) चुनाभट्ट्या अस्तित्वात आहेत. मंडळामार्फत राजूरा परिसरातील चुनाभट्ट्यांच्या करण्यात आलेल्या पाहणीदरम्यान ०६ चुना भट्ट्यांनी संमतीपत्रातील अटी व शर्तीचे उल्लंघन केल्यामुळे ६ चुनाभट्ट्यांना दि.१३/०३/२०२५ रोजी अंतरिम निर्देश देण्यात आले आहेत.

जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, यवतमाळ यांचेकडून प्राप्त अहवालानुसार नागरिकांमध्ये श्वसन विकार, दमा, दृष्टिदोष, इ. आजारचे रुग्ण आढळून आलेले नाहीत. जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी, यांचेकडुन प्राप्त अहवालानुसार कोळसा वाहतुकीमुळे धुळीमुळे कापूस, सोयाबीन, तूर, इ. पिकांचे नुकसान झाले असल्याचे नमूद केले आहे. तथापि, याबाबत नुकसान भरपाईचे धोरण शासनस्तरावर ठरविणे आवश्यक असल्याचे नमूद केले आहे.

***************

लक्षवेधी सुचना क्र. २४६२

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२५ चे पहिले (अर्थसंकल्पीय) अधिवेशन

सर्वश्री प्रतापराव पाटील चिखलीकर, वि. स. स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम, १०५ अन्वये उपस्थित केलेली लक्षवेधी सुचना पुढीलप्रमाणे आहे.:-

"कंधार जि. नांदेड तालुक्यातील शेतकरी पशुपालन यांचा गोपालन महत्वाचा उत्पन्नाचा मुख्य स्रोत असून येथील शेतकरी लालकंधारी गोवंश वळू व गाईचे संवर्धन करुन आपली उपजिविका करीत असणे, अतिशय डोंगराळ भाग असलेल्या शेतकऱ्यांचे गोवंश संवर्धन महत्त्वाचे उत्पन्नाचे साधन असल्याने, दक्षिण भारतातील सर्वात मोठी यात्रा म्हणून ओळखली जाणारी माळेगाव हे ठिकाण या यात्रेस महाराष्ट्रासह तेलंगणा, आंध्रप्रदेश, कर्नाटक येथील पशुपालन मोठया संख्येने पशुधनाचे खरेदी विक्री करीत असणे, असे असतांना राज्य शासनाने कंधार तालुक्यातील गोवंशाच्या पैदासी व संवर्धनासाठी कोणतीही योजना मंजूर न करणे, याकरिता या परिसरातील नागरिकांनी व लोकप्रतिनिधींनी शासनाकडे कंधार येथे शासकीय पशु पैदास व संवर्धन केंद्र निर्माण करण्यासाठी वेळोवेळी केलेली मागणी, याकडे शासनाने केलेले दुर्लक्ष, परिणामी शेतकऱ्यांमध्ये पसरलेला असंतोष व त्याचे आर्थिक नुकसान टाळण्यासाठी आणि लालकंधारी गोवंशाचे संवर्धन करण्यासाठी कंधार जि.नांदेड येथे तात्काळ लालकंधार गोवंश संर्वधन केंद्र उभारण्याबाबत शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया, "

---

मा. मंत्री (पशुसंवर्धन) यांचे निवेदन

नांदेड जिल्हयातील कंधार तालुका हा लाल कंधारी या देशी गोवशांच्या मुळ पैदास क्षेत्र / स्थान (Home Track) असून मराठवाड्यातील लातूर, बीड, धाराशिव, परभणी, छत्रपती संभाजीनगर या जिल्ह्यातही लाल कंधारी या देशी गोवंशाचे अस्तित्व आहे. याशिवाय लातूर जिल्हयातील देवणी तालुका हा देवणी या देशी गोवशांच्या मुळ पैदास क्षेत्र / स्थान (Home Track) आहे. सदर गोवंशाचे अस्तित्व लातूर, बीड, धाराशिव, परभणी या जिल्ह्यात आहे.

सन २०१३ मध्ये केलेल्या सर्वेक्षणानुसार लाल कंधारी व देवणी गोवंशीय पशुधनाची संख्या अनुक्रमे १,२६,६०९ व ४,५६,७६८ इतकी होती. २० व्या पशुगणनेत लाल कंधारी व देवणी गोवंशीय पशुधनाची संख्या

(क्र.मा.प.

रोटा/ एच १२०२-१ (७५०-०३-२०२५)

अनुक्रमे १,२३,९४३ व १,४९,१५९ इतकी कमी झाली आहे. लाल कंधारी व देवणी या जातीचे वैशिष्ट्य म्हणजे सदर जात ही दुध उत्पादन व नर पशुधन हे शेती कामासाठी उपयुक्त आहे. याशिवाय सदर गायींचे दुध हे संकरित गायींच्या दुधापेक्षा पौष्टिक असल्याने सदर दुधास चांगली मागणी व दरही जास्त मिळतो.

लाल कंधारी व देवणी गोवंशीय पशुधनाच्या संख्येत होणारी घट विचारात घेऊन कालौघात सदर प्रजाती नामशेष होण्याची शक्यता विचारात घेऊन सदर प्रजातीचे जतन व संवर्धन करण्यासाठी शासन निर्णय दिनांक ११.१०.२०२३ अन्वये मौजे साकुड, ता. अंबेजोगाई, जि. बीड येथे लाल कंधारी व देवणी गोवंशीय पशुधनाचे जतन व संवर्धन करण्यासाठी पशुसंवर्धन विभागाच्या नावे असलेल्या ८१ हे. आर. जागेत पशुपैदास प्रक्षेत्र स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. यासाठी रु. २३.२० कोटी इतका खर्च येणार आहे.

मौजे साकुड, ता. अंबेजोगाई, जि. बीड येथे सदर पशुपैदास प्रक्षेत्र स्थापन करण्यामागे पशुसंवर्धन विभागाकडे असलेली जागेची उपलब्धता व लाल कंधारी व देवणी या दोन्हीही गोवंशाचे एकत्रित जतन व संवर्धन करणे हा मुख्य हेतू आहे.

---

**लक्षवेधी सूचना क्र. १०४०**

## महाराष्ट्र विधानसभा
## सन २०२५ चे पहिले (अर्थसंकल्पीय) अधिवेशन

श्री.किसन कथोरे, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०१ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र.१०४० पुढीलप्रमाणे आहे.

" ठाणे जिल्ह्यातील मुरबाड तालुक्यातील अनुदानित आश्रमशाळा वालीव्हरे येथे माहे जानेवारी २०२५ मध्ये इयत्ता दहावीच्या वर्गात शिक्षण घेणाऱ्या विद्याध्यनि शाळेच्या मागील बाजूस गळफास लावून घेऊन आत्महत्या करण्यात येणे, सदर अनुदानित आश्रम शाळेतील विद्यार्थ्यांचा सातत्याने छळ होत असून विद्यार्थ्यांना दैनंदिन आहारात दूध, अंडी, केळी महिन्यातून चुकून कधीतरी एकदाच मिळत असणे परंतु दररोज दूध, अंडी, केळी देत असल्याचा अहवाल सादर करून अनुदान लाटण्यात येणे, त्याचप्रमाणे विद्यार्थ्यांना गणवेश दिला जातो परंतु त्यांचे पैसे सुद्धा पालकांकडून वसूल करण्यात येणे, शाळेत पूर्णतः चोरीची वीज वापरण्यात येणे, या अनुदानित आश्रम शाळेत पटसंख्या कमी असताना बोगस पटसंख्या दाखवून शासनाचे अनुदान लाटण्याचे काम संस्था करीत असणे, मेनू कार्ड प्रमाणे दुपारचे व संध्याकाळचे जेवण सुद्धा मिळत नसणे, त्यामुळे ठाणे व पालघर जिल्ह्यातील पालकांकडून तसेच सर्वसामान्य आदिवासी नागरिकांकडून वालीव्हरे येथील अनुदानित आश्रम शाळेत गळफास घेऊन आत्महत्या केलेल्या विद्यार्थ्यांच्या गंभीर घटनेची दखल घेऊन या संस्थेची त्रयस्थ समिती नेमून सखोल चौकशी करून या शाळेची मान्यता रद्द करणेबाबत मागणी जोर धरू लागली असणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना".

---

### मा.मंत्री (आदिवासी विकास) यांचे निवेदन

ठाणे जिल्ह्यातील मुरबाड तालुक्यामध्ये अनुदानित आश्रमशाळा वाल्हिवरे, ता.मुरबाड, जि.ठाणे या आश्रमशाळेस प्राथमिक मान्यता दि.२२/०४/२००३ अन्वये तसेच माध्यमिक मान्यता दि.३१/१२/२०११ अन्वये मिळाली आहे. सदर आश्रमशाळेतील इ.१० वी मध्ये शिक्षण घेत असलेला निवासी विद्यार्थी कु. सुभाष तुळजी रावते याने दि.०१/०२/२०२५ रोजी दुपारनंतर सुमारे ५.३० वाजता शाळेच्या मागील जंगलात जाऊन नायलॉन दोरीच्या सहायाने आंब्याच्या झाडाला गळफास घेतल्याची दुर्दैवी घटना घडली आहे. सदर घटनेच्या अनुषंगाने प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, शहापूर, जि. ठाणे यांनी दि. ०२.०२.२०२५ रोजी आश्रमशाळेस भेट दिली व संबंधित घटनेबाबत चौकशी केली. कु. सुभाष तुळजी रावते याच्या मृत्यूबाबत श्री. संदिप जयवंत देशमुख, माध्यमिक मुख्याध्यापक, श्री. दिलीप पवार, अधिक्षक व श्री. किरण उत्तम मोहपे, माध्यमिक शिक्षक (वर्गशिक्षक) यांनी कर्तव्यात कसूर व हलगर्जीपणा केल्यामुळे त्यांच्यावर तात्काळ निलंबनाची कारवाई करुन विभागीय चौकशी करण्याबाबत संस्थेला निर्देश देण्यात आले. त्यानुसार संस्थेने उपरोक्त नमूद संबंधित कर्मचारी यांना दि. ०५.०२.२०२५ रोजी निलंबित केले आहे. तसेच सदर घटनेबाबत टोकावडे पोलीस स्टेशन येथे अप्राकृतिक मृत्यूची (Unnatural Death) नोंद झालेली आहे.

मागील तीन वर्षात सन २०२१-२२ , सन २०२२-२३ व सन २०२३-२४ मध्ये अनुक्रमे एकूण पटसंख्या-३६१ व एकूण प्रत्यक्ष उपस्थिती २५८, एकूण पटसंख्या-३९७ व एकूण प्रत्यक्ष उपस्थिती ३७० व एकूण पटसंख्या-३९४ व एकूण प्रत्यक्ष उपस्थिती ३२८ या उपस्थितीच्या अनुषंगाने आश्रमशाळेस अनुक्रमे रु. १०,२४,७६२/-, रु. २६,३३,१३३/- व रु. १९,५७,९८३/- इतके परिपोषण अनुदान वितरीत करण्यात आले आहे. सदर अनुदान विद्यार्थ्यांच्या उपस्थितीनुसार अदा करण्यात आले आहे.

सदर शाळेमध्ये विद्यार्थ्यांचा छळ होत असल्याची तक्रार क्षेत्रीय कार्यालयात आढळून आली नाही. तसेच निवासी विद्यार्थ्यांना दैनंदिन आहारात अंडी व केळी एक दिवस आड देण्यात येतात व दुध आठवडयातून दोन-तीन दिवस देण्यात येत असल्याचे चव रजिस्टरच्या नोंदी वरुन दिसून आले आहे. विद्यार्थ्यांना वाटप करण्यात आलेल्या गणवेशासाठी पालकांकडून पैसे घेतल्याबाबत कोणतीही तक्रार प्राप्त झालेली नाही.

महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, मुरबाड यांच्याकडून प्राप्त माहिती नुसार अनुदानित आश्रमशाळा वाल्हिवरे या शाळेत एक वीजेचा मिटर कार्यरत असून या वीजेच्या मीटरवर सदर आश्रमशाळेचा पूर्ण वीजवापर होत आहे. तसेच शाळेत सौर उर्जेचा वापर केला जातो.

उपरोक्त घटनेच्या अनुषंगाने संस्थेवर कारवाई करण्याबाबत/ शाळेची मान्यता रद्द करण्याबाबत आदिवासी संघटनेचे निवेदन प्रकल्प कार्यालयास प्राप्त झाले आहे. प्रकल्प कार्यालयाकडून प्राप्त अहवालाच्या अनुषंगाने या प्रकरणाची नि:पक्षपातीपणे चौकशी होण्याकरीता सदर आश्रमशाळेवर प्रशासकाची नियुक्ती करण्याची शिफारस आयुक्त, आदिवासी विकास यांनी शासनास केली आहे. त्यानुषंगाने आवश्यक कार्यवाही करण्यात येत आहे.

---

लक्षवेधी सूचना क्र.१९११

## महाराष्ट्र विधानसभा
## सन २०२५ चे अर्थसंकल्पिय अधिवेशन

श्री.नितीन अर्जुन ( ए.टी.) पवार, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्रमांक १९११ पुढीलप्रमाणे आहे:-

"आदिवासी विकास विभागांतर्गत एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कळवण अंतर्गत येणारी आंबुपाडा (बे) ता.सुरगाणा येथील शासकीय आश्रमशाळेत मुख्याध्यापकाकडून महिला कर्मचा-याचे विनयभंग झाल्याची घटना दिनांक ३/३/२०२५ रोजी उघडकीस येणे, सदर आश्रमशाळेतील मुख्याध्यापाक माणिक बच्छाव हा आश्रमशाळेतील महिला कर्मचारी यांच्यासोबत रात्री अवेळी असभ्य व लज्जास्पद भाषेत बोलून शरीर सुखाची या महिला कर्मचा-यांकडून मागणी करणे, सदर मुख्याध्यापक याच्याबाबतीत वारंवार प्रकल्प कार्यालयाकडे तक्रार होवून देखिल प्रकल्प कार्यालयाचे याकडे होत असलेले दुर्लक्ष, महिला कर्मचा-यांचे सदर शिक्षकाकडून होत असलेला मानसिक छळ व विनयभंग, सदर घटनेची पत्रकार माहिती घेण्यासाठी गेले असता पत्रकारांना पोलीसांकडून होत असलेली अडवणूक त्यामुळे सदर घटना दडपण्याचा होत असलेला प्रकार, महिलांच्या सुरक्षिततेकडे होत असलेले दुर्लक्ष त्यामुळे वाढत चाललेले असंतोषाचे वातावरण व असुरक्षिततेची भावना, याबाबत शासनाने तात्काळ करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

---

### मा. मंत्री, आदिवासी विकास यांचे निवेदन.

शासकीय माध्यमिक व उच्च माध्यमिक आश्रमशाळा आंबुपाडा (बे) ता.सुरगाणा जि.नाशिक येथील श्रीम.वैशाली विश्वनाथ भोये, रोजंदारी स्त्री अधिक्षिका यांनी मुख्याध्यापक श्री.माणिक पंडित बच्छाव, यांचेविरूध्द दिनांक २५.०२.२०२५ रोजीचा तक्रार अर्ज प्रकल्प अधिकारी कळवण जि. नाशिक यांचेकडे दिनांक २७.०२.२०२५ रोजी सादर केला. तसेच ग्रामस्त बेडसे, आंबोडे, झगडपाडा,खोकरविहीर यांनी देखील प्रकल्प अधिकारी कळवण यांचेकडे दिनांक ०३.०३.२०२५ रोजी तक्रार दाखल केली.

सदर तक्रार अर्जाच्या अनुषंगाने प्रकल्प अधिकारी कळवण जि. नाशिक यांनी दिनांक ०३.०३.२०२५ रोजी चौकशी करुन अहवाल सादर करण्याचे महिला समितीस निर्देश दिले. त्यानुसार महिला समितीने दिनांक ०४.०३.२०२५ रोजी शासकीय माध्यमिक व उच्च माध्यमिक आश्रमशाळा आंबुपाडा (बे) ता.सुरगाणा जि.नाशिक येथे भेट देवून महिला कर्मचाऱ्यांचे लेखी जबाब

घेतले. कर्मचाऱ्यांनी दिलेल्या लेखी जबाबानुसार महिला समितीने सविस्तर चौकशी अहवाल प्रकल्प अधिकारी कळवण यांना सादर केला.

सदर महिला समितीने सादर केलेल्या चौकशी अहवालानुसार मुख्याध्यापक हे प्रथम दर्शनी दोषी असल्याचे निदर्शनास येत असल्याने श्री. माणिक पंडित बच्छाव, माध्यमिक मुख्याध्यापक, शासकीय माध्यमिक व उच्च माध्यमिक आश्रमशाळा आंबुपाडा (बे) ता.सुरगाणा जि.नाशिक यांचेवर शिस्तभंगाची कार्यवाही करणेची प्रकल्प अधिकारी कळवण यांनी दिनांक ०५.०३.२०२५ रोजीच्या पत्रान्वये अन्वये शिफारस केली.

प्रकल्प अधिकारी कळवण यांनी केलेल्या शिफारशीनुसार श्री.माणिक पंडित बच्छाव, माध्यमिक मुख्याध्यापक हे प्रथमदर्शनी दोषी असल्याचे निदर्शनास आल्यामुळे अपर आयुक्त, आदिवासी विकास नाशिक यांचे दिनांक ०६ .०३. २०२५ रोजीच्या आदेशान्वये श्री.माणिक पंडित बच्छाव, माध्यमिक मुख्याध्यापक यांना निलंबीत करण्यात आले आहे.

श्री. माणिक पंडित बच्छाव, माध्यमिक मुख्याध्यापक यांचेवर पोलिस स्टेशन बाऱ्हे ता. सुरगाणा जि. नाशिक येथे गुन्हा दाखल करण्यात आला असुन आरोपी नामे श्री. माणिक पंडीत बच्छाव यांना दिनांक ०५.०३.२०२५ रोजी २०.०० वाजता अटक केली असुन दि. ०६.०३.२०२५ रोजी मा. विशेष जिल्हा सत्र न्यायाधिश, सत्र न्यायालय नाशिक यांचे न्यायालयात दिनांक ०८.०३.२०२५ रोजी पावेतो पोलिस कोठडी मंजुर करण्यात आली होती. सद्यस्थितीत आरोपी श्री. माणिक पंडीत बच्छाव हे न्यायालयीन कोठडीत आहेत.

आदिवासी विकास विभागांतर्गत असलेल्या सर्व शाळांमधील विद्यार्थी / विद्यार्थीनी यांच्या सुरक्षाविषयक उपाययोजनांची काटेकोरपणे अंमलबजावणी करणेबाबत दिनांक ९ सप्टेंबर, २०२४ रोजी मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात आलेल्या आहेत.

********************************

## महाराष्ट्र विधानसभा

सन- २०२५ चे प्रथम (अर्थसंकल्प) अधिवेशन

**लक्षवेधी सूचना क्र.१६१५**

श्रीमती मंजुळा गावित, मा. विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना क्र. १६१५ पुढील प्रमाणे आहे.

**"साक्री विधानसभा मतदारसंघात एमआयडीसी निर्मिती करण्यात यावी अशी मागणे गेल्या अनेक वर्षांपासून स्थानिक नागरिक, उद्योजक व लोकप्रतिनिधी यांचेकडून होत असणे, साक्री तालुक्यात साखर कारखाना व सुत गिरणी प्रकल्प बंद अवस्थेत असल्याने तालुक्यातुन दरवर्षी हजारो मजुर हे धुळे जिल्ह्याबाहेर कामासाठी जात असणे, पिंपळनेर भागात औद्योगिक विकासाकरिता अनुकूल भौगौलिक स्थिती असून शासकीय जमीन, मुबलक पाणी, विज, स्थानिक कुशल-अकुशल कामगार इत्यादी प्राथमिक स्वरूपाच्या गरजा उपलब्ध असणे, पिंपळनेर येथील व्यापारी संघटनानी पिंपळनेर येथे एम.आय.डी.सी. उभारण्यात यावी अशी २०१८ सालापासून होत असलेली मागणी, पिंपळनेर परिसरात एम.आय.डी.सी. उभारण्याकरिता सन २००५ मध्ये सर्वे करण्यात येणे, परंतु अद्यापही एमआयडीसीचा प्रस्ताव कार्यवाही विना धुळखात पडून असणे, नविन एमआयडीसी उभारणे कामी पिंपळनेर येथे वन विभागाची गट नं. ११९४ मध्ये २९९.४६ हेक्टर जमीन उपलब्ध असून या जमीनीवर कोठल्याही प्रकारचे वन (जंगल) नसणे, त्यामुळे शासनाने पिंपळनेर येथे औद्योगिक वसाहत निर्मीतीसाठी गट नं. १९९४ फॉरेस्ट पड म्हणून असलेली जमीन एमआयडीसीकडे विनामुल्य हस्तांतरीत करून पिंपळनेर येथे औद्योगिक वसाहत निर्मीती करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने केलेली कार्यवाही व उपाययोजना."**

**मा. मंत्री (उद्योग) यांचे निवेदन**

सद्य:स्थितीत धुळे जिल्हयात धुळे वसाहत, अति. धुळे, नरडाणा टप्पा क्र. १ करीता २२४.१७ हे.आर क्षेत्र व टप्पा क्र. २ करीता ४३१.०९ हे.आर औद्योगिक क्षेत्र विकसित करण्यात आलेले आहे. सदर ठिकाणी मोठया प्रमाणात गुंतवणूक होऊन मोठया प्रमाणात रोजगार उपलब्ध झालेले आहेत. साक्री तालुक्यामध्ये ब्राह्मणवेल येथे ४८२.२८ हे. आर क्षेत्रावर औद्योगिक क्षेत्र स्थापन करण्यात आले आहे. सदर क्षेत्रापैकी मे. के. पी पावर प्रा.लि. यांना २४३.४१ हे. आर. क्षेत्र व मे. दिसान पॉवर यांना ४४.२८ हे. आर. क्षेत्र वाटप करण्यात आलेले आहे.

मौजे-पिंपळनेर मधील गट क्र.११९४ एकूण क्षेत्र २५९.४१ हे.आर असून त्यापैकी १००.०० हे.आर क्षेत्राची दिनांक २२.१२.२०२२ रोजी प्रादेशिक कार्यालयामार्फत प्राथमिक पाहणी करण्यात आली आहे. परंतु उपवनसरक्षंक धुळे वनविभाग धुळे यांच्या दिनांक ११.०१.२०२३ रोजीच्या पत्रानुसार सदर क्षेत्र हे वनविभागाचे आहे. त्यामुळे सदर क्षेत्राचा औद्योगिक प्रयोजनासाठी वापर करता येणार नाही. सदर विषयाबाबत दिनांक ०८.०२.२०२३ रोजी झालेल्या शासन स्तरावरील बैठकीत "पिंपळनेर ता.साक्री येथील गट नं. ११९४ पैकी सुमारे १०० हे.आर क्षेत्र हे वन विभागाचे असल्याने सदर क्षेत्र औद्योगिक वसाहत करीता उपलब्ध होणार नसल्याने नविन जागेची पाहणी करुन प्रस्ताव सादर करावा" असे निर्देश देण्यात आले. उक्त निर्देशानुषंगाने प्रादेशिक कार्यालयामार्फत औद्योगिक क्षेत्र स्थापन करण्यासाठी खालील जागांची पाहणी करण्यात आली आहे.

अ) मौजे-टिटाणे येथील गट नं.४८५ पैकी १४७.३४ हे. आर. पैकी सुमारे १०० हे. आर. क्षेत्राची पाहणी करण्यात आली असता, सदर क्षेत्र सरकारी असून, बहुतांशी वाटप झालेले आहे व मोठ्या प्रमाणात खोल दरी असल्याने ते औद्योगिक क्षेत्रासाठी सुसाध्य नाही.

ब) तद्नंतर मौजे-शेवाळी(दा.), ता.साक्री, जि.धुळे येथिल सरकारी गट नं. ३२१ चे एकुण क्षेत्र १६७.९६ हे.आर क्षेत्राची पाहणी करण्यात आली. सदर पाहणीनुसार सदर क्षेत्रापैकी मऔवि महामंडळास उपलब्ध होऊ

शकणारे शिल्लक ६३.८४ हे.आर क्षेत्र नेमके कुठे आहे त्याचा बोध होत नाही. त्यामुळे प्रादेशिक कार्यालयाने दि.२४.१२.२०२४ रोजीच्या पत्रान्वये तहसिलदार, साक्री यांना मौजे शेवाळी (दा.) येथील गट नं. ३२१ ची मोजणी करुन हस्तांतर योग्य क्षेत्राची सीमा निश्चिती करुन हस्तांतर योग्य क्षेत्राच्या मुल्यांकनासह, मोजणी नकाशासोबत अहवाल देणेबाबत कळविण्यात आले आहे. सदर अहवाल प्राप्त झालेनंतर उक्त क्षेत्र महसुल विभागाकडून हस्तांतर व संपादन करण्याकरीता म.औ.वि.अधिनियम १९६१ नुसार व महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या प्रचलीत कार्यपध्दतीनुसार भुसंपादनाची पुढील कार्यवाही करणेची तजवीज ठेवण्यात आली आहे.

************************

महाराष्ट्र विधानसभा

सन- २०२५ चे प्रथम (अर्थसंकल्प) अधिवेशन

**लक्षवेधी सूचना क्र.२१६७**

**श्रीमती सीमा महेश हिरे (सीमाताई),मा. विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना क्र. २१६७ पुढील प्रमाणे आहे.**

**"राजुर बहुला नाशिक एमआयडीसीसाठी भूसंपादन प्रक्रिया चालू असून ३२ (२) नोटीस १७ ते २३ डिसेंबर पासून लागू असून ३२ (१) ची नोटीस दि. २५-०१-२०२४ रोजी लागू झालेली असताना सदर ठिकाणी काही विकासक व एजंट यांनी शेतकऱ्यांकडून व जिल्हाधिकाऱ्यांची परवानगी व एनओसी न घेता खरेदी विक्री व्यवहार केलेले सांगून भूसंपादन मोबदला त्यांच्या नावावर घेण्याचा प्रकार केलेला असणे, शासकीय अधिकारी कर्मचारी एमआयडीसी ऑफीसचे तात्कालीन प्रादेशिक अधिकारी दुय्यम निबंधक-५ कार्यालयातील निबंधक/ उपजिल्हाधिकारी भुसंपादन क्र- २ नाशिक यांनी खरेदी घेणाऱ्यांबरोबर संगनमत करुन स्वतःच्या नावावर एमआयडीसी कडून भुसंपादन मिळावा याकरिता बेकायदेशीर दस्त केले असणे, गट क्र. ६६ ६९ ७७/५ ७८/१ ७९/१/बी ८१/१३, ८१/३, ८२/१ या जमिनीची खरेदी विक्री झालेली असून जमिनीचे तुकडेपाडणे वत्याचे एकत्रीकरण करणेबाबत अधिनियम १९४७ दि. १-१-२०१६ शासन निर्णय शासन सुधारणेनुसार महाराष्ट्र धोरण जमीनचे तुकडे पाडण्यास प्रतिबंध करण्याबाबतचा अधिनियम कलमांमध्ये ८ ब नावाने समाविष्ट करण्यात आलेला असणे कलम ८ ब नुसार नमूद केल्याप्रमाणे मंजूर केलेला पोट विभाग किंवा रेखांकन दस्त न जोडता दस्त स्वीकारता येणार नसणे, दुय्यम निबंधक-५ कार्यालयाने नोंदणी केली असून कार्यालयात मौजेराजुरबहुला ता.नाशिक येथील काही मिळकतीसाठी एकाच घरातील निरनिराळे व्यक्तींनी प्रमाणीभूत क्षेत्रापेक्षा कमी म्हणजे जिरायती क्षेत्र २० आर पेक्षा कमी करुन नोंदणी केलेले असणे, दुय्यम निबंधक कार्यालयातील अधिकारी भूसंपादन अधिकारी यांनी संगनमत करुन स्वतःचे नावे एमआयडीसी कडून भूसंपादन मोबदला मिळावा म्हणून सदर प्रकार करणे, त्यामुळे नाशिक एमआयडीसी मधील सर्व प्रकरणाची सखोल चौकशी करण्याची आवश्यकता निर्माण झालेली असणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही."**

**मा.मंत्री (उद्योग) यांचे निवेदन**

मौजे राजुरबहुला, ता. जि. नाशिक येथीलखाजगी क्षेत्र १४४.४३ हे. आर क्षेत्रास म.औ.वि. अधिनियम १९६१ चे प्रकरण ६ च्या तरतुदी दि. २५/११/२०२० रोजी लागू झालेल्या असून कलम ३२ (२) ची अधिसुचना दि. १७ ते २३/१२/२०२० रोजी प्रसिध्द झालेली आहे.कलम ३२ (१) ची अधिसुचना १३६.३०९० हे. आर क्षेत्रास दि. २५/०१/२०२४ रोजी निर्गमित झालेली आहे.

राजूरबहुला औद्योगिक क्षेत्रातील मौजे राजूर बहुला ता.जि. नाशिक येथील गट नं.६६, ६९,७७/५, ७८/१, ७९/१/ब, ८१/१/३, ८१/३, ८२/१ संदर्भात जमिन मालक यांनी सदर गटांची खरेदी विक्री करणेसाठी माहे डिसेंबर-२०२३ व जानेवारी-२०२४ मध्ये प्रादेशिक अधिकारी, नाशिक यांचेकडे अर्ज केल्याचे निर्दशनास येते. मा. उच्च न्यायालय औरंगाबाद खंडपीठ यांचेकडील याचिका क्रमांक ३८००/२००८ मधील दि.११/०७/२००८ रोजीच्या निकालात मा. उच्च न्यायालयाने "However, in the instant case, the notification as required u/s 32 (1) has not yet been published. In view of that, there is no bar on the registration of the document" असे आदेश दिलेले आहेत. त्यानुसार मऔवि महामंडळाच्यादि.०१/०२/२०१० रोजीच्या परिपत्रकानुसार मा. उच्च न्यायालयाच्या निर्देशांचा अवमान होणार नाही, असे निर्देश सर्व प्रादेशिक अधिकारी व इतर संबंधित अधिकारी यांना देण्यात आले आहेत. सदर न्यायनिर्णयाच्या अनुषंगाने व जमिन मालक यांनी केलेल्या अर्जांच्या अनुषंगाने प्रादेशिक अधिकारी यांनी

जमिन मालक यांना दिलेल्या पत्रात/नाहरकत दाखल्यात राजूरबहूला औद्योगिक क्षेत्रासाठी मऔवि अधिनियम १९६१ अंतर्गत प्रसिध्द करण्यात आलेल्या प्रकरण ६, कलम ३२(२) अधिसुचनेच्या दिनांकाबाबत माहिती दिली असून, सदर औद्योगिक क्षेत्रासाठी महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम, १९६१ चे कलम ३२(१) ची अधिसुचना निर्गमित झालेली नसल्याचे कळविले आहे.प्रस्तावित औद्योगिक क्षेत्राकरीता मऔवि अधिनियम, १९६१ चे कलम ३२(१) ची अधिसुचना दि.२५/०१/२०२४ रोजी प्रसिध्द झालेली असून अधिसुचनेच्या प्रसिध्दीनंतर जमिन खरेदी विक्री संदर्भात कोणतेही पत्र / नाहरकत दाखले देण्यात आलेले नाहीत.

उपरोक्त गटांपैकी गट नं. ६९, ७८/१, ७९/१/ब,८१/१/३, ८२/१ या गटांची खरेदी विक्री ही कलम ३२(१) ची अधिसुचना प्रसिध्द होणेपूर्वी झाली असून गट नं. ६६ व गट नं. ७७/५ ची खरेदी विक्री ही कलम ३२(१) ची अधिसुचना प्रसिध्द झालेनंतर दि.०८/०२/२०२४ रोजी झाल्याचे दिसून येते. तसेच गट नं.८१/३ ची खरेदी विक्री जमिन मालक यांना पत्र/नाहरकत दाखला दिल्यानंतर झालेली नसल्याचे उपविभागीय अधिकारी तथा सहायक जिल्हाधिकारी, उपविभाग नाशिक व सह जिल्हा निबंधक,वर्ग-१, नाशिक यांचे दि.१९/०३/२०२५ च्या अहवालावरून दिसून येत आहे.

उपविभागीय अधिकारी तथा सहायक जिल्हाधिकारी, उपविभाग नाशिक यांचे व तहसिलदार, नाशिक यांचेकडील दि.१९/०३/२०२५ रोजीच्या अहवालानुसार उपरोक्त गट नं. ६६, ६९,७७/५ व ७८/१ चे खरेदी विक्री क्षेत्र हे प्रमाणभुत क्षेत्रापेक्षा जास्त असून, ८१/१/३चे खरेदी विक्री क्षेत्र प्रमाणभुत क्षेत्रा इतके आहे व इतर गट नंबर ७९/१/ब व ८२/१ चे खरेदी विक्री क्षेत्र प्रमाणभुत क्षेत्रापेक्षा कमी आहे. परंतु त्यात सिंचनाचे साधन विहीर असल्याने सदर क्षेत्र हे हंगामी बागायती मध्ये समाविष्ट होत असून, सदरच्या नोंदी ह्या SRO(दुय्यमनिबंधक) यांच्याकडुन प्राप्त झालेल्या असल्याने वसदर दस्त नोंदणीकृत असल्याने मंडळ अधिकारी यांनीफेरफार प्रमाणित केलेले आहेत. मौजेराजुरबहुला, ता. जि. नाशिक येथीलउपरोक्त गटांमध्ये तुकडे जोड, तुकडेबंदी या कायद्याचा भंग झाल्याचे दिसुन येत नाही, असे उपविभागीय अधिकारी तथा सहायक जिल्हाधिकारी, उपविभाग नाशिक व तहसिलदार, नाशिक यांनी त्यांचे अहवालात नमूद आहे.

सह जिल्हा निबंधक वर्ग-१, नाशिक यांचेकडील दि.१९/०३/२०२५ रोजीचे अहवालानुसार सदर प्रकरणी मौजे-राजुरबहुला, ता. जि. नाशिक येथील काही क्षेत्रास म.औ.वि. अधिनियम १९६१ च्या कलम ३२ (१) अन्वये प्रसिध्द केलेल्या अधिसुचनेबाबत उपजिल्हाधिकारी (भुसंपादन), लघु पाटबंधारे, नाशिक यांचेकडील दि. १२/०२/२०२४ रोजीचे पत्र सह दुय्यम निबंधक वर्ग-२, नाशिक क्र. ५ यांना प्राप्त होण्यापुर्वीच उपरोक्त दस्तऐवजाची नोंदणी करण्यात आली आहे. त्यानंतर उपरोक्त मिळकतीच्या कोणत्याही दस्त ऐवजाची नोंदणी करण्यात आलेली नाही. तसेच,उपरोक्त नमुद दस्तऐवजातील मिळकतीचे हस्तांतरण करतांना महाराष्ट्र धारण जमिनीचे तुकडे पाडण्यास प्रतिबंध करण्याबाबत व त्याचे एकत्रिकरण करण्याबाबत अधिनियम, १९४७ (सुधारीत२०२३) अन्वये निर्धारित केलेल्या प्रमाणभुत क्षेत्रापेक्षा कमी क्षेत्राचे हस्तांतरण झाल्याचे दिसुन येत नाही. त्यामुळे सदर व्यवहारास कलम ८-ब च्या तरतुदी लागु होत नाहीत.

***********************

## महाराष्ट्र विधानसभा

सन- २०२५ चे प्रथम (अर्थसंकल्प) अधिवेशन

**लक्षवेधी सूचना क्र. ८९९**

श्री .शंकर मांडेकर, मा .विधानसभा सदस्य यांनी उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना क्र .८९९ पुढील प्रमाणे आहे.

**"पुणे जिल्ह्यामध्ये भोर तालुक्यातील उत्रोली वडगांव येथील महाराष्ट्र राज्य औद्योगिक विभागाअंतर्गत MIDC साठी १९९२ साली जमीन संपादन प्रक्रिया राबविण्यात आलेली असून सातबारा उताऱ्यावर देखील गेली ३२ वर्षांपासून नोंद असल्याचे निदर्शनास येणे, उत्रोली-वडगांव या ठिकाणी औद्योगिक विकास महामंडळाचा (MIDC) होण्यासाठी या जागेची पाहणी तत्कालीन सह आयुक्त, म.रा.औ. महामंडळ (Joint MD, MIDC) तसेच (चीफ इंजिनियर) व इतर (MIDC) अधिकारी यांनी यापूर्वी पाहणी देखील केलेली असणे, त्यानंतर यासंदर्भात तत्कालीन प्रादेशिक अधिकारी (Regional Officer, MIDC) तसेच भोर तालुक्याचे प्रांत व तहसीलदार, भोर यांनी, गावामध्ये दोनदा बैठकी घेतल्या असून बहुतांशी शेतकऱ्यांनी त्याबाबत आपली सहमती दर्शविण्यात आलेली असणे, तसेच गेल्या १७-१८ वर्षांपासून भोर तालुक्यातील उत्रोली-वडगांव येथे औद्योगिक प्रकल्प (MIDC) व्हावी, अशी जनतेची व मा. स्थानिक लोकप्रतिनिधी यांची आग्रही मागणी असणे, त्यानुसार उत्रोली-वडगाव येथे औद्योगिक प्रकल्प (MIDC) स्थापन करण्याबाबत शासनाने करावयांची कार्यवाही व उपाययोजना",**

### मा. मंत्री (उद्योग) यांचे निवेदन

भोर औद्योगिक क्षेत्र स्थापन करण्याकरिता मौजे उत्रोली येथील खाजगी क्षेत्र १२६.८४ हेआर., व मौजे-वडगांव (डाळ (येथील ८४.४९ हे.आर.अशी एकुण खाजगी क्षेत्र २११.३३ हेआर.क्षेत्र व २.०० हेआर.सरकारी क्षेत्र असे एकुण २१३.३३ हे.आर ता.भोर, येथील जमीन संपादन करण्यासाठी शासन अधिसुचना दि.२१/१०/१९९२ अन्वये मऔवि. अधिनियम १९६१ मधील प्रकरण ६ च्या तरतुदी लागु केलेल्या आहेत.

महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियमाच्या अंतर्गत कलम ३२(२) ची नोटीस दिनांक १/४/१९९३ रोजी राजपत्रात प्रसिद्ध केलेली आहे.त्याअनुषंगाने संबंधितांना व्यक्तिगत भूसंपादनाच्या नोटीसा बजावण्यात आलेल्या होत्या. या हरकतींवरील अभिप्राय दि. २८/४/१९९५ रोजी मऔवि महामंडळास प्राप्त झाले होते.परंतु प्रस्तुत भुसंपादन कामी ग्रामस्थांनी मोठया प्रमाणात विरोध केल्यामुळे संयुक्त मोजणीचे काम बंद करण्यात आले होते. त्यामुळे प्रकरणी अद्यापपर्यंत पुढील भूसंपादन कार्यवाही झालेली नाही.

सबब, सदर औद्योगिक क्षेत्र स्थापन करण्यास स्थानिक ग्रामस्थांचा विरोध असल्याने व सलगता नसल्याने सदर क्षेत्र वगळण्यासाठी भूनिवड समितीची पाहणी उप मुख्य कार्यकारी अधिकारी-२ मऔविम, मुंबई यांचे अध्यक्षतेखाली दिनांक २४/०२/२०२२ रोजी झाली असून, त्याचा अहवाल मऔवि महामंडळास प्राप्त झाला आहे. त्याअनुषंगाने उच्चाधिकार समितीच्या दिनांक ०१/०४/२०२२ रोजीच्या १४० व्या बैठकीमध्ये सदर संपुर्ण क्षेत्र विना अधिसुचित करण्यास मान्यता प्रदान करण्यात आली आहे. सदर क्षेत्र विनाअधिसूचित करण्याबाबत पुढील कार्यवाही सुरु आहे.

************************

/३

# महाराष्ट्र विधानसभा

सन- २०२५ चे प्रथम (अर्थसंकल्प) अधिवेशन

**<u>लक्षवेधी सूचना क्र.१५४७</u>**

श्री. प्रविण तायडे, मा. विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना क्र. १५४७ पुढील प्रमाणे आहे.

**"अचलपूर विधानसभा क्षेत्र मध्ये प्रमुख उदरनिर्वाहाचे साधन म्हणजे शेती आहे ८५% जनता ही शेतीवर अवलंबून असणे, या विभागात संत्रा, कापूस, तूर, सोयाबीन, हरभरा ही पिके मोठ्या प्रमाणात घेतली जातात परंतु माझ्या अचलपूर मतदार संघात यावर आधारित उद्योग व फळ प्रक्रिया उद्योग नसल्यामुळे विकासाला बाधा निर्माण होत असणे, तसेच रोजगार संधी पण यामुळे उपलब्ध नाही आहे कारण MIDC २० ते २५ वर्षापासून बंद पडलेली आहे. यावर मागील २० वर्षात माजी लोकप्रतिनिधी अजिबात लक्ष न दिल्यामुळे बेरोजगारी मोठ्या प्रमाणात वाढलेली असणे, तसेच बंद पडलेला दूध प्रक्रिया प्रकल्प व MIDC पुनर्जीवित करणे अतिशय आवश्यक आहे रोजगाराच एकमेव साधन असेलेली फिनले मिल ती सुधा बंद पडलेली आहे त्या कर्मचाऱ्यांचे पगार गेल्या एक-दोन वर्षापासून न झाल्यामुळे त्यातील काही कर्मचाऱ्यांनी आत्महत्या केलेल्या असणे, त्यामुळे शेतकऱ्यांची हित जोपासले जाईल व रोजगाराच्या संधी उपलब्ध होऊन बेरोजगारी दूर होईल याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही"**

## <u>मा. मंत्री (उद्योग) यांचे निवेदन</u>

अचलपूर विकास केंद्र करीता मौजे तोंडगांव, तालुका चांदूर बाजार, जिल्हा अमरावती येथील ११६.६२ हे.आर व मौजे- जवर्डी तालुका अचलपूर येथील ४७.९१ हे. आर. व खाजगी १४.६६ हे. आर. सरकरी अशी एकूण १७८.८९ हे. आर. जमीन संपादन करण्यात आली आहे. सध्यस्थितीत अचलपूर विकास केंद्राकरीता संपादन केलेल्या १७८.८९ हे. आर. जमीनीपैकी ६१.०० हे. आर जमीनीवर महामंडळातर्फे आराखडा मंजूर करून विकासकामे पुर्ण केलेली आहेत. सदर जमीनीवर एकूण १०७ भूखंडाचे आरेखन करण्यात आलेले असून, त्यापैकी १०१ भूखंडाचे वाटप करण्यात आले आहे. त्यापैकी ८ भूखंडावर उत्पादन सुरू आहे व एकूण ६ भूखंड (क्षेत्रफळ ३.२० हे.आर) वाटपास उपलब्ध आहे. सदर औद्योगिक क्षेत्रात १.७१ कि. मी. लांबीचे डांबरी रस्ते व १.६४ कि. मी. जलवाहीनी टाकण्यात आलेली आहे. तसेच विद्युत पुरवठा करण्याकरीता ३३ के. व्ही. क्षमतेचे उपकेंद्र कार्यान्वित आहे.

अचलपूर विधानसभा मतदार संघातील, तालुका चांदूर बाजार, जिल्हा अमरावती येथे नविन औद्योगिक क्षेत्र स्थापन करण्याकरीता मौजे. ईमामपूर, मौजे-भानगाव, मौजे-शर्यतपूस येथिल ३८.७० हे.आर. संपादित करण्याकरीता म.औ.वि. अधिनियम १९६१ अन्वये प्रकरण ६, कलम २, खंड (ग) ची अधिसूचना लागू करण्यास उच्चाधिकार समितीने मान्यता दिली आहे. त्याअनुषंगाने सदरची अधिसूचना दि.०५.०७.२०२४ रोजी प्रसिद्ध करण्यात आली असून संपादनाची पुढील कार्यवाही करीता. दि.०५.०८.२०२४ रोजीच्या शासन पत्रान्वये, जिल्हाधिकारी, अमरावती यांना कळविण्यात आले आहे. त्यानुषंगाने उपविभागिय अधिकारी तथा भूसंपादन अधिकारी, अचलपूर यांची भूसंपादन कामासाठी नेमणूक करण्यात आली आहे.

मौजे-कारंजा बहिरम ता. चांदूर बाजार, जिल्हा अमरावती येथे सुद्धा नविन औद्योगिक क्षेत्र स्थापन करण्याकरीता एकून १८.२७ हे.आर. जमिन Pass Through पद्धतीने संपादन करण्याकरीता प्रस्तावित आहे.

अचलपूर विधानसभा क्षेत्र अमरावती जिल्ह्यात येत असून अमरावती जिल्ह्यात अमरावती (गोपाल नगर), अति. अमरावती (नांदगाव पेठ), अति.अमरावती (नांदगाव पेठ वस्त्रसंकुल), अचलपूर, धामनगाव, अंजनगाव, चांदुर रेल्वे, दर्यापूर, धारणी, मोर्शी, तिवसा, वरुड, भातकुली, नांदगाव खंडेश्वर येथे सुद्धा औद्योगिक क्षेत्र स्थापन करण्यात आली आहेत. अमरावती जिल्ह्यात ३३८६.९१ हे. आर जमिनीवर एकून १४ औद्योगिक क्षेत्र विकसित करण्यात आलेली आहेत. तसेच अचलपूर येथे शेतीवर आधारीत उद्योग तसेच फळ प्रक्रिया उद्योगाकरीता **उद्योजकांकडून भूखंडाची मागणी आल्यास रिक्त भूखंडामधून जागा वाटप करणे शक्य होईल.**

*************************

## महाराष्ट्र विधानसभा- सन २०२५ चे प्रथम (अर्थसंकल्पीय) अधिवेशन

मा.श्री.बापूसाहेब पठारे, डॉ.जितेंद्र आव्हाड, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये लक्षवेधी सूचना क्र.५९७ पुढीलप्रमाणे आहे :-

"वडगावशेरी मतदारसंघाची लोकसंख्या सुमारे ७ लाख इतकी असणे, मात्र मतदारसंघातील परिमंडळ-ई विभागात प्राधान्य कुटुंब लाभार्थी योजनेचा इष्टांक फक्त १,०८,००० एवढाच असून सदर इष्टांक १०० टक्के पूर्ण झालेला असणे, तथापी मतदारसंघात लक्ष्मीनगर, गांधीनगर, भाटवस्ती, वडारवस्ती, भीमनगर, येरवडा, यमुनानगर या भागात मोठ्या प्रमाणात झोपडपट्टी वसाहत असून सदर भागामध्ये हातावर पोट असणारे, मजुरी करणारे गोरगरीब नागरिक वास्तव्यास असणे, तसेच मतदारसंघात विश्रांतवाडी, लोहगाव, खराडी हे नव्याने विकसित होत असलेले भाग असून सदर भागामध्ये स्थलांतरीत मजुराचे प्रमाण अधिक असणे, परिमंडळ-ई विभागात प्राधान्य कुटुंब लाभार्थी योजनेचे १,०८,००० इतके लाभार्थी असून. उर्वरित पात्र असूनही योजनेचा लाभ मिळत नसलेल्या लाभार्थ्यांची संख्या मोठ्या प्रमाणात असणे, परंतु इष्टांक पूर्ण झालेला असल्याने वाढीव लाभार्थ्यांना या योजनेचा लाभ दिला न जाणे, पर्यायाने पात्र गोर-गरीब लाभार्थी सदर योजनेपासून वंचित राहणे, सबब मतदारसंघातील परिमंडळ-ई विभागास प्राधान्य कुटुंब लाभार्थी योजनेचा किमान ५०,००० इतका वाढीव इष्टांक मंजूर करून मिळणेसाठी मा. मंत्री अन्न, नागरी पुरवठा व प्रधान सचिव अ.ना.पु. यांना दिनांक ९ जानेवारी २०२५ रोजीचा पत्रव्यवहार, याबाबत - शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

---

### मा. उपमुख्यमंत्री तथा मंत्री (अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण) यांचे निवेदन.

राज्यात दि.१ फेब्रुवारी, २०१४ पासून राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियम, २०१३ ची अंमलबजावणी सुरु करण्यात आली आहे. त्यानुसार अंत्योदय अन्न योजना (AAY) व प्राधान्य कुटुंब लाभार्थी (PHH) या योजनांसाठी पात्र लाभार्थ्यांची निवड करण्याकरिता केंद्र शासनाकडून महाराष्ट्र राज्याकरिता ७,००,१६,६८४ लाभार्थी इतका इष्टांक देण्यात आला आहे. त्यामध्ये अंत्योदय योजनेसाठी केंद्र शासनाने २५,०५,३०० शिधापत्रिका आणि प्राधान्य कुटुंब लाभार्थी योजनेसाठी ५,९२,१६,०३१ लाभार्थी इतका इष्टांक मंजूर केलेला आहे.

राज्यात दि.१ फेब्रुवारी, २०१४ पासून राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियम, २०१३ ची अंमलबजावणी सुरु करण्यात आली आहे. सदर अधिनियमातील कलम ३(२) मधील तरतुदीनुसार देशाच्या ग्रामीण भागातील ७५% व शहरी भागातील ५०% लोकसंख्येएवढ्या जनतेचा समावेश या योजनेंतर्गत पात्र लाभार्थी म्हणून करण्याची तरतूद आहे. त्या आधारे केंद्र शासनाने त्यांच्या दि.२६.०७.२०१३ च्या पत्रान्वये जनगणना २०११ मधील लोकसंख्येनुसार महाराष्ट्र राज्यातील ग्रामीण भागातील ७६.३२ टक्के व शहरी भागातील ४५.३४ टक्के एवढ्या लोकसंख्येस राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियमातंर्गत पात्र ठरविले असून त्यानुसार ७,००,१६,६८४ (ग्रामीण-४,६९,७१,४८१ व शहरी- २,३०,४५,२०३) एवढी लाभार्थ्यांची संख्या निश्चित केली आहे. सदर लाभार्थ्यांचा इष्टांक देताना अधिनियमातील तरतूदीनुसार वरीलप्रमाणे ग्रामीण व शहरी भागासाठी स्वतंत्र आकडेवारी दर्शविण्यात आली होती. त्यानुषंगाने प्रथमतः दि.१७.१२.२०१३ च्या शासन निर्णयान्वये ग्रामीण व शहरी भागाकरिता लाभार्थ्यांचा जिल्हानिहाय इष्टांक देण्यात आला होता.

तद्नंतर तहसिलदार, श्रीगोंदा यांनी मौजे घुगलवडगाव, ता. श्रीगोंदा येथील स्वस्त धान्य दुकान परवानाधारक यांची ८० टक्के लाभार्थीचे यांचे जबाब घेऊन अहवाल जिल्हा पुरवठा अधिकारी, अहिल्यानगर यांना सादर केला. त्यानुषंगाने जिल्हा पुरवठा अधिकारी, अहिल्यानगर यांनी सदर स्वस्त धान्य दुकान गुणवत्तेवर निर्णय घेऊन दि.१९/०३/२०२४ रोजी महाराष्ट्र अनुसूचित वस्तू (वितरणाचे विनियमन) आदेश १९७५ अन्वये पुवर्वत केले.

सदर दि. १९/०३/२०२४ रोजीच्या आदेशाविरुध्द श्री. रोहिदास हरिशचंद्र दांगडे व इतर ६ यांनी उप आयुक्त (पुरवठा) नाशिक यांचेकडेस पुर्नरिक्षण अर्ज दाखल केला. दि. १५/०१/२०२५ रोजीचे आदेशान्वये उप आयुक्त (पुरवठा), नाशिक यांनी पुर्नरिक्षण अर्ज अंशतः मंजुर करून जिल्हा पुरवठा अधिकारी अहिल्यानगर यांचा दि.१९/०३/२०२४ रोजीचा आदेश रद्द करुन सदर स्वस्त धान्य दुकानास जोडलेल्या ८० टक्के हून अधिक कार्डधारकांची एक महिन्याच्या आत फेर चौकशी करुन गुणवत्तेवर अंतिम निर्णय घेणेबाबत आदेशित केले आहे.

सदरचे दुकान निलंबित झाल्यामुळे व उप आयुक्त (पुरवठा), नाशिक यांनी दिलेल्या दि. १५/०१/२०२५ आदेशाच्या अंमलबजावणी करीता तहसिलदार, श्रीगोंदा यांना कार्ड धारकांची फेर चौकशी करणेसाठी दि.०३/०२/२०२५ रोजीच्या पत्रान्वये जिल्हा पुरवठा अधिकारी, अहिल्यानगर यांनी कळविले आहे. तसेच तहसिलदार, श्रीगोंदा यांचा अहवाल अदयाप अप्राप्त आहे. त्यामुळे लाभार्थ्याचे गैरसोय होऊ नये म्हणून सदरचे स्वस्त धान्य दुकान शेजारील देऊळगांव या गावांतील स्वस्तधान्य दुकानास तात्पुरते स्वरुपात जोडण्यात आले आहे.

रास्तभाव दुकानदार यांना महाराष्ट्र अनुसूचित वस्तू (वितरणाचे विनियमन) १९७५ चे कलम २४ अन्वये उप आयुक्त (पुरवठा), नाशिक विभाग, नाशिक यांच्या दि. १५/०१/२०२५ आदेशाविरुध्द मा. मंत्री, अन्न नागरी पुरवठा व ग्राहक सरंक्षण, मंत्रालय, मुंबई यांचेकडे पुर्नरिक्षण अपील अर्ज दाखल करु शकतात.

**********

# महाराष्ट्र विधानसभा

सन- २०२५ चे प्रथम (अर्थसंकल्प) अधिवेशन

**लक्षवेधी सूचना क्र.१६०६**

श्री.रवी राणा, मा. विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना क्र. १६०६ पुढील प्रमाणे आहे.

**"विद्यमान मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य त्यांना स्थानिक लोकप्रतिनिधी यांचे दिनांक १०/०२/२०२५ रोजी च्या पत्रातील प्रमाणे विक्रमी १५.७५ कोटींची गुंतवणूक करारानुसार गोपाल नगर एमआयडीसी आणि नांदगाव पेठ एमआयडीसी भागात मोठे उद्योग कारखाने स्थानापन्न होण्याबाबत विनंती केली असता जिल्हा प्रशासनाने वरील मागणीची दखल घेत असे पत्र विद्यमान मुख्यमंत्री कार्यालय महाराष्ट्र ज्यांना अप्पर जिल्हाधिकारी अमरावती यांनी त्यांच्या कार्यालयाचे पत्र क्रमांक २४५ / २०२५ दिनांक १२/०२/२०२५ रोजी पाठविले असणे वरील मागण्या शासनाकडून मंजूर झाली तर अमरावतीच्या श्री प्रवीण शेठ मुंबई व पुणे येथे रोजगाराच्या शोधात भटकत असतात त्यांच्या हाताला अमरावती एकच काम मिळणार आहे त्यासाठी नाचे उद्योग विभागाने निर्णय घेण्याची आवश्यकता असणे त्यासंबंधाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."**

## मा. मंत्री (उद्योग) यांचे निवेदन

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळामार्फत अमरावती जिल्हयात विकसित करण्यात आलेल्या औद्योगिक क्षेत्रांबाबतची माहिती खालीलप्रमाणे आहे:-

१. गोपाल नगर, जि. अमरावती येथे मऔवि महामंडळामार्फत् सन १९७७ मध्ये एकूण १७८.९५ हे. आर.जमीनीवर औद्योगिक क्षेत्र विकसित करण्यात आले आहे. त्यामध्ये ६०६ भूखंडाचे आरेखन करण्यात आलेले असून, सर्व भूखंडाना वीज, पाणी रस्ते इ. मुलभूत सुविधा पुरविण्यात आलेल्या आहेत.

२. सन २००० मध्ये अतिरिक्त नांदगाव पेठ, अमरावती येथे एकूण २८०९.७८ हे. आर. जमिनीवर औद्योगिक क्षेत्र व वस्त्रोद्योग संकुल विकसित करण्यात आले आहे. त्यामध्ये एकूण १२२९ भूखंडाचे आरेखन करण्यात आले असून, त्यापैकी १०६५ भूखंडाचे वाटप करण्यात आले आहे. अतिरिक्त अमरावती (नांदगाव पेठ) औद्योगिक क्षेत्रात मोठे उद्योग सुरु असून, अंदाजे ४५०० रोजगार उपलब्ध झालेले आहेत. सदर औद्योगिक क्षेत्रात मे. रतन इंडिया पावर लि., बालेश्वर सिंथेटीक टेक्सटाईल्स, रेमंड लक्झरी लि., दामोदर इंडस्ट्रीड, प्रताप इंडस्ट्रीज, सुदर्शन इंडस्ट्रीज इ. मोठे उद्योग सुरु आहेत. तसेच सदर औद्योगिक क्षेत्रात लहान मोठे आकाराचे १६४ भूखंड (क्षेत्रफळ २५३.८७ हे. आर.) वाटपास उपलब्ध आहेत. त्यापैकी, औद्योगिक वापराकरीता ८५ व वस्त्रोद्योग वापराकरीता राखीव ७९ भूखंड राखीव ठेवण्यात आले आहेत.

३. केंद्र सरकारच्या योजने अंतर्गत अमरावती येथे PM MITRA टेक्सटाईल पार्क हे अतिरिक्त अमरावती औद्योगिक क्षेत्राला लागुन ४१०.०२ हेक्टर क्षेत्रफळावर मार्च २०२३ मध्ये मंजूर करण्यात आले आहे. सदर टेक्सटाईल पार्क करीता भारत सरकारचे पर्यावरण मंत्रालयाकडून (MoEF&CC)

दि.१९/०९/२०२४ रोजी पर्यावरण विषयक मंजूरी प्राप्त झाली आहे. सद्यस्थितीत सदर पार्क मध्ये प्रथम टप्प्यातील विकासकामे जसे रस्ते (९.६९कि.मी.), जलवितरीका (८.७७ कि.मी.), सांडपाणी वाहीनी (२१.७२कि.मी.) आणि पथदिवे यासारख्या पायाभूत सोई-सुविधांची विकासकामे सुरु आहेत. प्रथम टप्प्यातील कामे प्रगतीपथावर असून, सदर कामे माहे सप्टेंबर २०२५ अखेर पूर्ण होतील. सदर ठिकाणी अत्याधुनिक सुविधा जसे चौपदरी रस्ते, भुमीगत विद्युत वाहिन्या, शून्य विसर्ग सांडपाणी प्रक्रिया (ZLD) व सांडपाणी पुर्नवापर सुविधा, ३३% हरित क्षेत्र इत्यादी सुविधा सुद्धा उपलब्ध करुन देण्यात येणार आहेत.

४. अमरावती औद्योगिक क्षेत्रात (गोपाल नगर), अति. अमरावती (नांदगाव पेठ) या व्यतिरिक्त अमरावती जिल्ह्यात अचलपूर, धामनगाव, अंजनगाव, चांदुर रेल्वे, दर्यापूर, धारणी, मोर्शी, तिवसा, वरुड, भातकुली, नांदगाव खंडेश्वर येथे सुद्धा औद्योगिक क्षेत्र स्थापन करण्यात आलेली आहेत. एकंदरीत अमरावती जिल्ह्यात ३३८६.९१ हे. आर जमिनीवर एकून १४ औद्योगिक क्षेत्र विकसित करण्यात आलेली असून, मोठ्या प्रमाणात उद्योग सुरु असून रोजगार निर्मिती झाली आहे.

************************

# महाराष्ट्र विधानसभा

सन- २०२५ चे प्रथम (अर्थसंकल्प) अधिवेशन

## लक्षवेधी सूचना क्र.२२८२

श्री.बाबाजी काळे, मा. विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना क्र. २२८२ पुढील प्रमाणे आहे.

**"पुणे जिल्ह्यातील चाकण औद्योगिक क्षेत्र टप्पा क्र.५ करिता शेतक-यांच्या जमिनी संपादीत करणे, सदर जमिनी संपादीत करताना शेतक-यांना प्राधान्य देण्यात येईल, १५ टक्के परतावा, घरांचे प्लॉट वाटप याबाबत अद्यापही कोणताच विचार न करणे, आज तीन वर्षाचा कालावधी होऊनही अद्याप परतावा न मिळणे, या बाधित शेतक-यांना १५ टक्के परतावा, भूखंडाचे योग्य वाटप व शेतक-यांच्या जमीनी वगळणे, बदली जमीन व रस्त्याविषयक अनेक मागण्या असून संदर्भात दि.२५.०२.२०२५ रोजीच्या सुमारास जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत कोणताच तोडगा न निघणे, परिणामी या बाधित शेतक-यांमध्ये निर्माण झालेले असंतोषाचे व संतापाचे वातावरण, याबाबत शासनाने तातडीने निर्णय घेण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने केलेली व करावयाची कार्यवाही, तसेच शासनाची प्रतिक्रया व भूमिका."**

### मा. मंत्री (उद्योग) यांचे निवेदन

महाराष्ट्र प्रकल्पबाधीत व्यक्तीचे पुनर्वसन अधिनियम १९९९ व राष्ट्रीय पुनर्वसन धोरण २००९ याचा समन्वय साधुन महामंडळाने प्रकल्पग्रस्तांसाठी पुनर्वसन व पुनर्बहाली धोरण २००९ जाहीर केले आहे. सदरील धोरण हे दि. २०/७/२००९ नंतर ज्यांचे जमिनींचे संपादन करण्यात आले अशा प्रकल्पग्रस्तांकरीता लागू राहील. या धोरणांतर्गत ज्यांच्याकडून संपादन झाले. त्यांना संपादित जमिनीच्या क्षेत्राच्या १५% अविकसीत औद्योगिक वापराकरीता भरपाई रकमेच्या दराने देण्यात येईल. अथवा २.२५% क्षेत्र वाणिज्यिक प्रयोजनासाठी भरपाई रक्कमेच्या दराने देण्यात येईल. देय असणारा औद्योगिक प्रयोजनासाठीचा कमीतकमी ५०० चौ.मी. व वाणिज्यिक प्रयोजनासाठीचा भूखंड कमीतकमी १०० चौ.मी. असेल. जर देय परतावा क्षेत्र हे ५०० चौ.मी पेक्षा कमी येत असेल तर १०० चौ.मी. वाणिज्यिक भूखंड संपादनाच्या दराने ९५ वर्षाच्या भाडेपट्ट्याने देण्यात येतो.

चाकण औद्योगिक क्षेत्र टप्पा क्र.५ मधील सद्यस्थितीत संपादीत होणा-या क्षेत्रात २६६१ प्रकल्प्रगस्त खातेदार आहेत. त्यापैकी ४२८खातेदारांचे अर्ज प्राप्त झालेले आहेत , त्यापैकी ११० भुखंड वाटप करण्यात आलेले असून अपुर्ण कागदपत्रे असलेल्या खातेदारांची संख्या १६५ आहे. देकार पत्र देण्यात आलेल्या खातेदारांची संख्या १५३ आहे. वरील धोरणानुसार पात्र अर्ज अप्राप्त असलेल्या खातेदारांची संख्या ७३९ आहे. चाकण औद्योगिक क्षेत्र टप्पा क्र.५ मधील प्रकल्प्रगस्त खातेदारांना १५ टक्के परतावा वाटप करण्याकामी दिनांक १७/०२/२०२५ पासून प्रकल्पग्रस्त खातेदारांना अर्ज सादर करण्यासाठी १ वर्ष मुदतवाढ देण्यात आली असून त्यानुसार खातेदारांना कळविण्यात आलेले आहे. तसेच उर्वरीत अर्ज न केलेल्या खातेदारांना १५ टक्के परतावा क्षेत्राकरीता अर्ज करण्याकरीता ग्रामपंचायत, तलाठी व प्रकल्पग्रस्त खातेदार यांना कळविण्यात आले आहे.

म. औ. वि. महामंडळाच्या दिनांक १३.२.२०१९ रोजी महामंडळाच्या पुर्नवसन व पुर्नबहाली धोरण २००९ नुसार ज्या खातेदारांना देऊ केलेल्या १५% भूखंडाच्या ३३% इतक्या भूखंडाचा वापर वैयक्तीक व्यापारी अथवा वैयक्तीक निवासी प्रयोजनाकरीता करणे अनुज्ञेय आहे. त्याकरीता त्यांना विकल्प देता येईल. कोणत्याही परिस्थितीत प्रकल्पग्रस्तांनी ज्या स्वरूपाचा भूखंड मिळणेसाठी (औद्योगिक, व्यापारी

अथवा निवासी) प्रथमतः जो अर्ज केला आहे त्या प्रयोजनात काही काळाने बदल करण्याची मुभा प्रकल्पग्रस्तास असणार नाही. महामंडळ औद्योगिक विकास महामंडळ औद्योगिक किंवा व्यापारी कारणासाठी आवश्यक क्षेत्राचे भूखंडाचे वाटप करण्याचा प्रयत्न करील. तथापि, नियोजनच्या दृष्टीने तसे करणे शक्य नसल्यास महामंडळ उपलब्धतेनुसार नजिकचा किमान क्षेत्राचे भूखंडाचे वाटप करेल. तसेच प्रकल्पगस्त कुटूंबाचे घर संपादन झाल्यास त्यांना विकसीत औद्योगिक क्षेत्रातील निवासी विभागात कमीतकमी २५० चौ.मी. चा भूखंड नुकसान भरपाईच्या दराने देण्यात येतो. मऔविम ने संपादीत केलेल्या क्षेत्रामध्ये प्रकल्पग्रस्तांचे रहाते घर येत असल्यास सदर प्रकल्पग्रस्ताला स्थलांतरासाठी रू. १०,०००/- अर्थसहाय्य देण्यात येते.

चाकण औद्योगिक क्षेत्र टप्पा क्र.५ मधील प्रकल्प्रगस्त खातेदारांना १५ टक्के, पुरतावा वाटप करेणकामी १ वर्ष मुदतवाढीचा प्रस्ताव दि.१६.१२.२०२४ रोजी म.औ.वि.महामंडळाने मान्यता दिली असून दिनांक १७.०२.२०२५ पासून प्रकल्पग्रस्त खातेदारांना अर्ज सादर करण्यास १ वर्ष मुदतवाढ देण्यात आली आहे. त्यानुसार खातेदारांना कळविण्यात आलेले आहे

चाकण औद्योगिक क्षेत्र टप्पा क्र. ५ करीता मौजे आंबेठाण, बिरदवडी, गोनवडी व रोहकल या चार गावातील ७३९.८६ है. आर.क्षेत्राची म ची १९६१ अधिनियम .वि .औ .प्रकरण ६ ची अधिसूचना दिनांक २/१०/२००३ रोजी निर्गमित केली आहे या अधिसूचित क्षेत्रापैकी .५४७.९१ हे. आर +चाकण येथील ४.०७ हे. आर + १३.२१ सरकारी क्षेत्र असे एकूण क्षेत्र ५६५.१९ हे. आर क्षेत्राचे भूसंपादन सुरु आहे. खाजगी क्षेत्राची कलम ३२ (२ ची अधिसूचना (दिनांक ०३२००७.०५. रोजी ,कलम ३२ (१) ची अधिसूचना दिनांक ०८.०७.२०१७ क्षेत्र ६३७.२७ हे. आर दिनांक १८.१२.२०१९ रोजी क्षेत्र १७.१८ हे.आर दिनांक २०.०१.२०२१ रोजी क्षेत्र ३९.५४ हे. आर रोजी अशी एकूण (१)३२ आर क्षेत्राची कलम.हे ६९३.९९ची अधिसूचना निर्गमित केली आहे .भूसंपादन दर (१५ टक्के परतावासह) मौजे आंबेठाण, रोहकल, बिरदवडी करीता १,३७,५०००० प्रति हेक्टरी व गोनवडी, वाकी खुर्द व चाकण करीता १,६२,५०००० प्रति हेक्टरी दर निश्चित करण्यात आलेला आहे .संपादीत क्षेत्रापैकी ४४४.९९ हे. आर क्षेत्राचा ताबा महामंडळास प्राप्त झालेला आहे. अदलाबदलीने मंजुरी प्राप्त क्षेत्र २६.८० हे. आर आहे. उर्वरीत २७.७२ हे. आर क्षेत्राची भूसंपादनाची कार्यवाही उपविभागीय अधिकारी, खेड यांचे मार्फत सुरु आहे. असे एकूण ५२.४६८ + २६.८० + २७.७२ = १०६.९९ हे. आर क्षेत्राचा ताबा प्राप्त नाही. चाकण टप्पा क्र. ५ मधील मौजे आंबेठाण, रोहकल, बिदरवडी व गोनवडी येथील ५२.४६ हे. आर क्षेत्र महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम १९६१ चे कलम ३३(३) नुसार संपादन करण्यास प्रारुप निवाड्यास मान्यतेची कार्यवाही सुरु आहे.

चाकण औद्योगिक क्षेत्र टप्पा क्र.२ ते चाकण टप्पा क्र.५ जोड रस्त्यासाठी मौजे आंबेठाण, ता. खेड, जि. पुणे येथील ३.७३१२ हे. आर क्षेत्रास म.औ.वि. अधिनियम, १९६१ च्या कलम ३२ (१) ची अधिसूचना दि. २७.०६.२०२४ रोजीचे शासन राजपत्रात प्रसिध्द झालेली आहे.या क्षेत्राकरीता उच्चाधिकार समितीच्या बैठकीत दर निश्चिती करुन पुढील भूसंपादनाची कार्यवाही प्रस्तावित आहे .

अदलाबदलीने वाटप करावयाच्या २६.८० हे.आर क्षेत्रास भूखंड वाटपाची कार्यवाही सुरु आहे. मौजे चाकण व वाकी खुर्द येथील ८८.७३ हे. आर क्षेत्रातील शेतक-यांच्या तीव्र विरोधामुळे व नगर परिषदेच्या हद्दीबाबतच्या अधिसुचनेनुसार सदर क्षेत्र नगरपरिषदेच्या हद्दीत येत असल्याने स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी सदरचे क्षेत्र विनाअधिसुचित करण्याची मागणी केली आहे. त्यामुळे सदर क्षेत्र वगळण्यासाठी प्रस्तावित केले आहे. सदर क्षेत्र विनाअधिसुचित करण्याबाबत महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम, १९६१ व महामंडळाच्या प्रचलित कार्यपध्दतीनुसार पुढील उचित कार्यवाही करण्यात येत आहे.

************************

लक्षवेधी सूचना क्र.२२१३

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२५ चे प्रथम (अर्थसंकल्पीय) अधिवेशन

मा.श्रीम. देवयानी फरांदे, विधानसभा सदस्य यांनी विधानसभेमध्ये नियम १०५ अन्वये खालीलप्रमाणे लक्षवेधी सूचना क्र.२२१३ उपस्थित केली आहे.

"गेल्या अनेक वर्षापासून काही ठराविकच मक्तेदारांना काम मिळावे म्हणून शालेय शिक्षण विभागाकडून निविदा प्रक्रिया केली जाणे, धान्य व तांदूळ पुरवण्याच्या ठेकेंच्या अटी-शर्ती तयार करताना अनुभवाची अट अशा पद्धतीने तयार करणे की, नवीन ठेकेदाराला त्यात सहभाग होता येणार नाही, त्यामुळे खुली स्पर्धा न होता शासनाचे करोडो रुपयांचे नुकसान होणे, वर्षानुवर्ष तेच ठेकेदार धान्य पुरवठा करीत असल्याने विद्यार्थ्यांना पुरवठा होणारे धान्य निकृष्ट दर्जाचे असणे धान्यामध्ये किडे पाली, उंदराच्या लेंड्या निघत असल्याच्या अनेक तक्रारी होणे, परंतु तेच ते ठेकेदार असल्यामुळे प्रशासनाकडून योग्य ती कारवाई न होणे, महिला बचत गटांना जास्तीत जास्त काम मिळावे म्हणून शासनाने १४ ऑक्टोबर २०२४ रोजी सेंट्रल किचन योजना बंद करण्याचा निर्णय घेणे, परंतु धान्य पुरवठा करताना मात्र जिल्ह्याचे काम एकाच ठेकेदाराला दिले जाणे, त्यामुळे या निविदा प्रक्रियेबाबत संभ्रम निर्माण होऊन या निविदा प्रक्रियेत मोठ्या प्रमाणावर आर्थिक गैरव्यवहार होण्याचा धोका असणे, त्यामुळे निविदा प्रक्रिया तत्काळ रद्द करून तालुकास्तरावर धान्य पुरवठा करण्यासाठी निविदा प्रक्रिया करण्याची असणारी आवश्यकता, विकेंद्रीकरणाच्या माध्यमातून जास्तीत जास्त लोकांना सहभागी होता येईल अशी टेंडर प्रक्रिया करण्याची असणारी आवश्यकता, याबाबीकडे शासनाचे होत असणारे जाणीवपूर्वक दुर्लक्ष, त्यामुळे विद्यार्थ्यांच्या आरोग्यास निर्माण झालेला गंभीर धोका, याबाबत शासनाने तत्काळ करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया"

निवेदन

(श्री. दादाजी भुसे, शालेय शिक्षण मंत्री)

केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण योजनेंतर्गत राज्य व केंद्र शासनाच्या, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या, खाजगी अनुदानित व अंशत: अनुदानित या शाळांमधील इ. १ ली ते इ. ८ वी मधील विद्यार्थ्यांना केंद्र शासनाच्या निर्देशाप्रमाणे लाभ देण्यात येतो. योजनेंतर्गत केंद्र शासनामार्फत निश्चित केलेल्या प्रति दिन प्रति विद्यार्थी आहार खर्चानुसार निधी मंजूर करण्यात येतो.

सदर योजनेअंतर्गत शाळांना तांदूळ वाहतूक व धान्यादी मालाच्या पुरवठयासाठी ई-निविदा प्रक्रियेव्दारे जिल्हानिहाय स्वतंत्र निविदा प्रकाशित करुन जिल्हानिहाय पुरवठेदार नियुक्त करण्यात येतात. प्रस्तुत निविदा प्रक्रिया शासन खरेदी धोरण दि.०१ डिसेंबर, २०१६ मधील तरतुदीनुसार राबविण्यात येते. निविदा प्रक्रिया शिक्षण संचालक (प्राथ.) यांच्या अध्यक्षतेखालील राज्यस्तरीय खरेदी समितीमार्फत पार पाडण्यात येते.

प्रस्तुत निविदा प्रक्रिया संदर्भातील निविदा अर्ज, निविदेतील दर अंतिम करण्यासाठी शासन स्तरावर प्रधान सचिव (शालेय शिक्षण विभाग) यांच्या अध्यक्षतेखाली प्रकल्प अंमलबजावणी समिती गठित करण्यात आली आहे. सदर समितीमध्ये वित्त विभाग, महिला व बालकल्याण विभाग, परिवहन विभाग या विभागांचे सचिव तसेच, आयुक्त अन्न व औषध प्रशासन, उद्योग सहसंचालक यांचा समावेश आहे. सदर समितीने निविदा प्रक्रियेस मान्यता दिल्यानंतर निविदा प्रक्रिया अंतिम करण्यात येते.

निविदा प्रक्रियेतील अटी व शर्ती तसेच, अनियमिततेबाबत मा. उच्च न्यायालय खंडपीठ, औरंगाबाद येथे दाखल झालेल्या रिट याचिका क्र.१२८६३/२०१८ मधील न्यायनिर्णयानुसार सन २०११ पासून पार पडलेल्या निविदा प्रक्रियेबाबतचा उच्चस्तरीय समितीचा अहवाल मा. उच्च न्यायालयास सन २०१९ मध्ये सादर केलेला आहे.

सदर योजनेंतर्गत संबंधित पुरवठेदाराकडून निकृष्ठ दर्जाचा धान्यादी माल पुरवठा केल्यास सदर धान्यादी माल बदलून देण्याची तसेच, निकृष्ठ दर्जाचा धान्यादी मालाबाबत दंडात्मक कारवाई करण्याची तरतूद करारनाम्यामध्ये करण्यात आली आहे.

नागरी भागातील शाळांना केंद्रीय स्वयंपाकगृह प्रणालीद्वारे तयार आहाराचा पुरवठा करण्यात येतो. नागरी भागातील शाळांना केंद्रीय स्वयंपाकगृह प्रणालीव्दारे तयार आहाराचा पुरवठा करण्यासाठी बचत गट / संस्था निवडीचे अधिकार महानगरपालिका / नगरपालिका यांच्याऐवजी संबंधित शाळांना देण्याचा निर्णय दि.१४ ऑक्टोंबर, २०२४ रोजीच्या शासन निर्णयाव्दारे घेण्यात आला आहे. सदर निर्णयामुळे जास्तीत जास्त महिला बचत गटांना योजनेंतर्गत कामकाज करण्याची संधी मिळणार आहे.

******************

लक्षवेधी सूचना क्र.२३१०

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२५ चे प्रथम (अर्थसंकल्पीय) अधिवेशन

मा.श्री. करण देवतळे, श्री. सुधीर मुनगंटीवार, श्री. संजय केळकर, श्री. राजु तोडसाम, डॉ. आशिषराव देशमुख, श्री. अस्लम शेख, श्री. विजय वडेट्टीवार, श्री. नानाभाऊ पटोले, श्री. अमिन पटेल, श्री. विकास ठाकरे, श्री. अमित विलासराव देशमुख, श्री. अमित झनक, श्री. विश्वजित कदम, श्रीमती ज्योती गायकवाड, श्रीमती सीमा महेश हिरे (सीमाताई), श्री. संजय मेश्राम, विधानसभा सदस्य यांनी विधानसभेमध्ये नियम १०५ अन्वये खालीलप्रमाणे लक्षवेधी सूचना क्र.२३१० उपस्थित केली आहे.

"पोषण शक्ती निर्माण योजनेअंतर्गत गेल्या २० ते २५ वर्षापासून संपूर्ण महाराष्ट्रात १७५०० शालेय पोषण आहार स्वयंपाकी तथा मदतनीस कार्यरत असणे, यांना फक्त २५०० रुपये मासिक वेतन दिले जाणे, त्याच वेतनात पोषण आहार तयार करणे बरोबरच शाळेची देखभाल, स्वच्छता राखणे, जेवल्यानंतर विद्यार्थ्यांचे ताट धुण्यापासून ते अनेक वेळेला शौचालय देखील साफ करावे लागणे, वेतन देखील वेळेवर न मिळणे, तर राज्यांमध्ये अशा मदतीस आणि स्वयंपाक यांना जास्त मानधन देण्यात येणे, जसे की पांडिचेरी राज्यात १४ हजार रुपये, तामिळनाडू राज्यात ७८०० दर महा वेतन देण्यात येणे, आपल्या महाराष्ट्र राज्यात देखील मानधनात वाढ करण्यात येणे अशी मागणी कर्मचाऱ्यांकडून वारंवार करण्यात येणे, यावर शासनाने तत्काळ निर्णय घेऊन कर्मचाऱ्यांचे वेतन वाढ करण्याबाबत करावयाची कार्यवाही व उपायोजना"

निवेदन

(श्री. दादाजी भुसे, शालेय शिक्षण मंत्री)

केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण योजनेंतर्गत राज्य व केंद्र शासनाच्या, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या, खाजगी अनुदानित व अंशत: अनुदानित या शाळांमधील इ.१ ली ते इ.८ वी मधील विद्यार्थ्यांना केंद्र शासनाच्या निर्देशाप्रमाणे पोषण आहाराचा लाभ देण्यात येतो. सदर योजनेंतर्गत निधी खर्चाचे प्रमाण केंद्र व राज्य ६०::४० असे आहे.

सदर योजनेंतर्गत पोषण आहाराच्या कामकाजाबाबत कंत्राटी तत्वावर स्वयंपाकी तथा मदतनीस यांची शाळा व्यवस्थापन समितीद्वारे नियुक्ती करण्यात येते. सद्यस्थितीत राज्यामध्ये

१,६४,५५८ स्वयंपाकी तथा मदतनीस कार्यरत असून त्यांना रु.२५००/- प्रति महा असे मानधन वर्षातील १० महिन्यांसाठी देण्यात येते. सदर मानधनामध्ये केंद्र हिस्सा रु.६००/- व समप्रमाण राज्य हिस्सा रु.४००/- आहे. तथापि, राज्य हिस्स्यातून अतिरिक्त रु.१५००/- मानधन देण्यात येत आहे.

स्वयंपाकी तथा मदतनीस यांच्या केंद्र हिस्सा मानधनामध्ये वाढ करण्याची विनंती केंद्र शासनास करण्यात आली आहे. तसेच, स्वयंपाकी तथा मदतनीस यांच्या रु.२५००/- इतक्या मानधनातील राज्य हिस्स्यामध्ये रु.१०००/- वाढ करण्याचा निर्णय दि.०५ जुलै, २०२४ रोजीच्या मंत्रीमंडळ बैठकीत घेण्यात आला आहे. सदर बाबीकरिता अतिरिक्त निधी उपलब्ध करुन देण्याचा प्रस्ताव वित्त विभागास सादर करण्यात आला आहे.

स्वयंपाकी तथा मदतनीस यांच्या कामकाजामध्ये शासन निर्णय दि.१८ डिसेंबर, २०२३ अन्वये सुधारणा करण्यात येवून शाळा व शाळेचा परिसर स्वच्छ करण्याचे कामकाज कमी करण्यात आले आहे. तसेच, याबाबत सर्व संबंधितांना सूचना देण्यात आल्या आहेत.

******************

<u>लक्षवेधी सूचना क्रमांक : २१४१</u>

## महाराष्ट्र विधानसभा

## सन २०२५ चे पहिले (अर्थसंकल्पीय ) अधिवेशन

**श्री. राजु तोडसाम, विधान सभा सदस्य यांनी विचारलेली महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे** :- "परभणी जिल्हयातील सेलु, जिंतुर तालुक्यात जलसंधारण महामंडळाची करोडे रुपयाची कामे झाली असणे, त्यामध्ये संबंधित विभागाने मोठया प्रमाणात आर्थिक व्यवहार करुन ई- टेंडरमध्ये फेरबदल करुन कमी दरपत्रक असलेल्या एजन्सीला संस्थेला कामे न देता जास्त दरपत्रक असलेल्या एजन्सी – संस्थेला कामे देणे, तसेच काही कामामध्ये त्रुटी अर्थातच निकृष्ठ दर्जाचे तर काही कामे झालीच नाही व देयके काढण्यात आली येणे, अशा प्रकारचे प्राप्त झाले असणे, सदरच्या निविदा या ५ कोटीपेक्षा जास्त असल्याने निविदा मान्य करणे उचित होणार नसणे, त्यामध्ये मा. व्यवस्थापकीय संचालक, जलसंधारण महामंडळ यांनी दि. ०५.१२.२०२३ च्या पत्रामध्ये सदर निविदा करोडो रुपयाच्या रद्द केल्या व नव्याने ई टेंडर प्रक्रिया केली, परंतु यामध्ये श्री. सुनिल कुशिरे, व्यवस्थापकीय संचालक यांनी मोठया प्रमाणावर आर्थिक व्यवहार केल्याचे निदर्शनास आले असणे, सदर प्रकरणाची तात्काळ चौकशी करुन संबंधित विभागामध्ये करोडो रुपयाचा भ्रष्टाचार झाल्याचे निदर्शनास येत असल्यास संबंधित अधिका-याचे निलंबन करुन त्यांच्यावर चौकशी लावून शासनाचा निधी परत करण्याबाबत करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

************************************

### मा. मंत्री (मृद व जलसंधारण ) यांचे निवेदन

परभणी जिल्हयातील सेलू , जिंतुर तालुक्यातील ० ते १०० हेक्टर सिंचन प्रकल्पाच्या ०२ निविदेतील कामांची ई निविदा सूचना क्र. ६ असून सन २०२३-२४ अन्वये जिल्हा जलसंधारण अधिकारी, परभणी यांनी प्रसिध्दीस निविदांची कार्यवाही ऑनलाईन करण्यात आलेली असून दोन्ही निविदांमध्ये एकूण ६ कंत्राटदारांनी निविदा भरलेल्या होत्या, सहा कंत्राटदारांपैकी दोन कंत्राटदारांना सक्षमस्तरावरुन तांत्रिक तपासणी अंती अपात्र करण्यात आले होते. पात्र असलेल्या दोन्ही निविदेतील ४ कंत्राटदारांचे **आर्थिक लिफाफा** उघडण्यात आल्यानंतर निविदेत दिलेल्या दरानुसार एल-१ , एल-२ , एल-३ व एल-४ असे चार निविदाधारक निश्चित झालेले होते. एल-१ व एल-२ या कंत्राटदारांनी निविदा वैधता कालावधी संपल्यामुळे ते आता निविदेत भरलेल्या दरात काम करण्यास तयार नाही असे कळविले व दुसऱ्या कंत्राटदारास काम मिळाल्यास आमची हरकत राहणार नाही असे लेखी पत्राव्दारे कळविण्यात आले असल्यामुळे सक्षम प्राधिकारी यांनी एल-३, याना वाटाघाटीस्तव बोलविण्यात आले होते त्यानंतर झालेल्या वाटाघाटी अंती कंत्राटदाराने ६.२०% कमी दराने (एल-१ कंत्राटदाराने भरलेला ६.२०% कमी दर) काम करण्यास लेखी सहमती दर्शविली असल्याने एल-१ कंत्राटदाराच्या दरातच निविदा मंजुर झालेली असल्याने शासनाची कमी दरामुळे निविदा बचत (रु.८७,६६,७३८.००) झालेली असुन सदर निविदा सक्षम प्राधिकारी यांचे कडून मंजुर करण्यात आलेल्या आहे व त्यामुळे शासनाचे कोणतेही आर्थिक नुकसान झालेले नाही.

सदरील योजनांची कामे निविदा मानांकनानुसार पुर्ण झालेली असून निविदा अटी व शर्ती नुसार केलेल्या कामाच्या गुणवत्ता चाचण्या घेण्यात आलेल्या आहेत. योजनांची देयके जिल्हा जलसंधारण अधिकारी, परभणी यांनी पारित करुन प्रदानास्तव व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र जलसंधारण महामंडळ, छत्रपती संभाजीनगर यांना सादर केले असून मोजमापाची सक्षमस्तरावर नियमानुसार तपासणी केलेली आहे. तथापि, महामंडळाकडून कामांचे कोणतेही देयक अदा करण्यात आलेले नाही.

(कृ.मा.प

रोटा/एच १४०५-१ (७५०-०३-२०२५)

महामंडळाच्या दिनांक ०५.१२.२०२३ रोजीच्या पत्रान्वये दोन्ही निविदा रद्द करण्यात आलेल्या होत्या परंतु, क्षेत्रिय विभागाच्या फेरप्रस्तावानुसार व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र जलसंधारण महामंडळ, छत्रपती संभाजीनगर यांच्या दिनांक ०६.०९.२०२४ च्या पत्रान्वये मा. मंत्री, मृद व जलसंधारण यांनी निविदा कार्यवाही रद्द न करता एकत्रित (Clubbing) ला कार्योत्तर मान्यतेनुसार परभणी जिल्हयातील ता. जिंतुर व सेलू मधील एकण १२ को.प. बंधारे / व्दा. सि. बंधारे योजनांच्या सी मुख्य कामे व इतर बांधकामाच्या एकूण रु. १७.६६ कोटी अंदाजित किंमतीच्या २ एकत्रित (Clubbing) निविदांना, निविदा कार्यवाही रद्द न करता एकत्रिकरणाला कार्योत्तर मान्यता देण्यात आली असून त्यानुसार सदर योजनांच्या ०२ निविदांना मंजुरी देण्यात आलेली आहे. त्यानुसार जिल्हा जलसंधारण अधिकारी, परभणी यांनी ०२ निविदांचे कार्यारंभ आदेश दिलेले असून निविदेतील कामे प्रगतीपथावर असून पुर्ण झाल्यास येत्या पावसाळयात सिंचन निर्मिती होवून स्थानिक शेतक-यांना व गावक-यांना योजनांचा फायदा होणार आहे.

महामंडळातंर्गत योजनांची निविदा कार्यवाही संपूर्णपणे क्षेत्रिय स्तरावर करण्यात आली आहे. निविदा कार्यवाही पूर्ण करुन निविदा स्विकृतीसाठी प्रस्ताव महामंडळास सादर करण्यात आला होता. सदर निविदा मान्यता प्रस्तावास महामंडळाच्या कार्यकारी समितीच्या दि. ०७.१०.२०२४ रोजी संपन्न झालेल्या बैठकीत विषय क्र. ०२ अन्वये कार्योत्तर मान्यता देण्यात आलेली आहे. सबब या निविदा प्रक्रिया शासकीय प्रचलित नियमानुसार करण्यात आलेली आहे.

परभणी जिल्हयातील रु. ५.०० कोटी वरील ०२ निविदिंबाबत मा. उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ छत्रपती संभाजीनगर येथे जनहित याचिका (Public Interest Litigation) १/ २०२५ अन्वये प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.

**************************************************************

एचा १४०५-१ अ

## महाराष्ट्र विधानसभा
## सन २०२५ चे पहिले (अर्थसंकल्प) अधिवेशन

श्री. संजय देरकर, वि.स. स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सुचना क्र. २२०९ पुढीलप्रमाणे आहे:-

" यवतमाळ जिल्ह्यातील वणी तालुक्यात मोठ्या प्रमाणात कोळसा खाणी असणे, सदर खाणीतून निघणारा कोळसा वणी येथेच वॉशिंग करण्यात येणे, वॉशिंग करतेवेळी आणि वाहतुकीमुळे वणी परिसरात मोठ्या प्रमाणात धुळ आणि धूर पसरुन प्रदुषणात झालेली वाढ, कोळसा वॉशिंगसाठी राज्याबाहेरील कामगार काम करीत असणे, त्यामुळे स्थानिकांना रोजगार निर्माण न होणे, सदर कोळसा वॉशिंगच्या निविदा काढतांना स्थानिक कामगारांना प्राधान्य देण्याची अट घालण्याची आवश्यकता, तसेच या भागात असलेल्या ५० पेक्षा अधिक चुना भट्ट्या असणे. सदर चुना भट्टयांच्या धुरांड्यातून निघणा-या विषारी धुरामुळे मानवी जीवासह पशुधन आणि शेती व्यवसाय धोक्यात आलेला असणे, वणी तालुक्यातील जवळपास १०२ गावे कोळसा खाणी व अन्य उद्योगांमुळे बाधीत असणे. सदर गावातील ग्रामस्थ, शेतकरी यांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागत असणे, खाणी बाधित क्षेत्रातील नागरीकांना प्रदुषीत हवेमुळे दमा, त्वचारोग, पोटाचे विकास, दृष्टीदोष, बहिरेपणा इत्यादी आजार होणे, धूळ प्रदुषणामुळे कोळसा वाहतुकीच्या रस्त्यावरील हजारो हेक्टर शेतजमीन बंजर झालेली असणे, या जमिनीची उत्पादन क्षमताघटणे, यासर्व प्रकरणी शेतक-यांकडून वारंवार तक्रारी करुनही संबंधित विभागाकडून कोणतोच कार्यवाही करण्यात न येणे, परिणामी ग्रामस्थांमध्ये वाढता तीव्र असंतोष, शासनाने उक्त प्रकरणी तातडीने चौकशी करुन वणी तालुक्यातील धूळ व धूद प्रदूषणाला आळा घालण्याच्या अनुषंगाने करावयाची उपाययोजना, तसेच नुकसानग्रस्त शेतक-यांना भरपाई देण्याची आवश्यकता."

..................................................................................................................................

### मा. मंत्री (पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग) यांचे निवेदन.

यवतमाळ जिल्ह्यात लाईम स्टोन, कोळसा व डोलोमाईट इ. खनिजे विपुल प्रमाणात उपलब्ध असल्यामुळे औद्योगिकीकरणास चालना मिळाली आहे.यवतमाळ जिल्ह्यातील वणी तालुक्यात ०२-भूमिगत व ०९-खुल्या पद्धतीच्या एकूण ११ कोळसा खाणी कार्यरत आहेत. यापैकी ०८- खुल्या पद्धतीच्या कोळसा खाणी व ०१- भूमिगत कोळसा खाण कार्यरत आहे. या कोळसा खाणी मधुन काढण्यात येणाऱ्या कोळशाची वाहतुक करतांना, कोळसा वाहनामधुन उतरवितांना व भरतांना वातावरणामध्ये उत्सर्जित होणाऱ्या धूळीच्या नियंत्रणासाठी खाणींमध्ये स्थिर पाण्याचे फवारे बसविले आहेत. जिल्हा उद्योग केंद्र, यवतमाळ यांचेकडून दि.१८/०३/२०२५रोजीच्या प्राप्त माहितीनुसार सद्यस्थितीत जिल्ह्यातील कोलवॉशरीज घटकांमध्ये पर्यवेक्षकीय श्रेणी, पर्यवेक्षकीयसह इतर श्रेणींमध्ये १००% स्थानिक लोकांना रोजगार देण्यात आलेला आहे.

सदर खाण उद्योगांना महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत कोळसा वाहतुक करताना आच्छादन वापरणे, सिलबंद वाहतुकीचा पर्याय शोधणे, कन्वेअर बेल्टने कोळशाची वाहतुक करणे, पाण्याची पुरेशी फवारणी करणे, वृक्षारोपण करणे, खाणी मधून निघणाऱ्या पाण्याचा खाण परिसरातच योग्य प्रकारे वापर करणे, इ. अटी व शर्तीसह संमतीपत्र देण्यात येते. मंडळामार्फत सदर खाण उद्योगांची वेळोवेळी करण्यात येणाऱ्या पाहणीदरम्यान आढळणाऱ्या त्रुटींच्या अनुषंगाने संबंधीत उद्योगावर नियमाप्रमाणे कारवाई करण्यात येते.

वणी तालुक्यातील कोळसा खाणींची माहिती खालीलप्रमाणे आहे:-

१) बेलोरा नायगांव खुली खाण:- सन १९९६ पासून कार्यरत सदर खाणीतून १.२५ दशलक्ष टन प्रतिवर्ष कोळशाचे उत्खनन करण्यात येते. सद्यस्थितीत सदर खाणीचा संमतीपत्राच्या नुतनीकरणाचा अर्ज मंडळाच्या विचाराधीन आहे. सदर उद्योगाची दि.०९/०३/२०२२ रोजी रु.१०.०० लक्ष बँक हमी जप्त करण्यात आली आहे. सदर खाणीच्या करण्यात आलेल्या पाहणीदरम्यान आढळून आलेल्या त्रुटीच्या अनुषंगाने उद्योगास दि.०३/१२/२०२४ रोजी प्रस्तावित निर्देश देण्यात आले असून, उद्योगाने प्रस्तावित निर्देशांच्या अनुषंगाने अनुपालन अहवाल सादर केला. प्रस्तावित निर्देशांचे पालन न केल्यामुळे उद्योगास दि.१३/०३/२०२५ रोजी उपरोक्त त्रुटींबाबत प्रदुषण नियंत्रणाकरता व रु.१५.०० लक्ष इतकी बँक हमी जप्त करण्याबाबत अंतरिम निर्देश देण्यात आले आहेत.

२) निलजय खुली खाण:- सन १९९१ पासून कार्यरत सदर खाणीतून ४.५ दशलक्ष टन प्रतिवर्ष कोळशाचे उत्खनन करण्यात येते. सद्यस्थितीत सदर खाणीचा संमतीपत्राच्या नुतनीकरणाचा अर्ज मंडळाच्या विचाराधीन आहे.

वातावरणीय हवा गुणवत्ता खालावल्याने व संमतीपत्रातील अटी व शर्तींची पूर्तता न केल्यामुळे सदर उदयोगाची रु.१०.००लक्षची बँक हमी जप्त करण्यात आली आहे. तसेच, खाणीच्या पाहणीदरम्यान वातावरणातील धुलीकणांचे प्रमाण जास्त आढळणे, पाण्याच्या बी.ओ.डी. व सी.ओ.डी. चे जास्त असणे, पाण्याचा सामू Acidic असणे इ. कारणास्तव आढळून आलेल्या त्रुटींच्या अनुषंगाने दि.०३/०३/२०२५ रोजी उद्योगास प्रस्तावित निर्देश देण्यात आले आहेत.

३) मुंगोली निर्गुडा खुली खाण:- सन १९९५ पासून कार्यरत सदर खाणीतून ५.२५ दशलक्ष टन प्रतिवर्ष कोळशाचे उत्खनन करण्यात येते. सद्यस्थितीत सदर खाणीचा संमतीपत्राच्या नुतनीकरणाचा अर्ज मंडळाच्या विचाराधीन आहे. वातावरणीय हवा गुणवत्ता खालावल्याने व संमतीपत्रातील अटी व शर्तींची पूर्तता न केल्यामुळे या उदयोगाची दि. २९/११/२०२२ रोजी रू.१०.० लक्षची बँक हमी जप्त करण्यात आली आहे. सदर खाणीच्या पाहणीदरम्यान आढळून आलेल्या त्रुटींच्या अनुषंगाने दि.०४/१२/२०२४ रोजी प्रस्तावित निर्देश देण्यात आले असून खाण उद्योगाने प्रस्तावित निर्देशांच्या अनुषंगाने अनुपालन अहवाल सादर केला आहे.

४) कोलारपिंपरी कोळसा खाण:- सदर खाणीचा संमतीपत्राच्या नुतनीकरणाचा अर्ज सद्यस्थितीत मंडळाच्या विचाराधीन आहे. या कोळसा खाणीची रू.१०.०० लक्षची बँक हमी दि.०९/०३/२०२२ रोजीच्या पत्रान्वये जप्त करण्यात आली आहे.

५) घोन्सा खुली खाण :- सदर खाणीचा संमतीपत्राच्या नुतनीकरणाचा अर्ज सद्यस्थितीत मंडळाच्या विचाराधीन आहे. या कोळसा खाणीची रु.५.०० लक्षची बँक हमी जप्त करण्यात आली आहे.

६) उकणी खुली खाण :-सदर खाणीचा संमतीपत्राच्या नुतनीकरणाचा अर्ज सद्यस्थितीत मंडळाच्या विचाराधीन आहे. मे. वेस्टर्न कोलफिल्ड लिमीटेड या कोळसा खाणीची रु.१०.०० लक्षची बँक हमी दि.०९/०३/२०२२ रोजीच्या पत्रान्वये जप्त करण्यात आली आहे.

७) कोलगांव खुली खाण:- या खाणीस म.प्र.नि. मंडळामार्फत दि.३१/१२/२०२५ पर्यंत संमतीपत्र देण्यात आले आहे. सदर कोळसा खाणीने संमतीपत्रातील अटी व शर्तीचे उल्लंघन केल्यामुळे व वातावरणीय हवेची गुणवत्ता खालावल्यामुळे या खाणीची रु.२.०० लक्षची बँक हमी दि.१०/०३/२०२५ रोजीच्या पत्रान्वये जप्त करण्यात आली आहे.

वणी तालुक्यात- (१)ग्रामपंचायत चिखलगांव (२) तहसिल कार्यालय, वणी(३) एमआयडीसी वणी या ०३ ठिकाणी वातावरणातील हवेची गुणवत्ता तपासण्याकरिता रेस्पेरेबल डस्ट सॅम्पलर बसविण्यात आले आहेत. सदर ठिकाणच्या पृथ:करण अहवालावरून सल्फर डॉय ऑक्साईड व नायट्रोजन ऑक्साईड या घटकांचे सरासरी प्रमाण विहीत मर्यादेत तर, श्वसनीय धुलीकणांचे प्रमाण विहीत मर्यादेपेक्षा जास्त आढळले. वणी परिसरातील प्रदूषणाला सामान्य वाहतूक, जड वाहतूक, कोळशाचा इंधन म्हणून होणारा व्यावसायिक व घरगुती वापर इत्यादी घटक देखील कारणीभूत आहेत. वणी तालुक्यामध्ये एकूण ०६ कोल वॉशरी उद्योग असून, त्यापैकी ०१-उद्योग कार्यरत व ०५-उद्योग बंद अवस्थेत आहेत. मे. कार्तिकेय कोल वॉशरीज प्रा. लि. या उद्योगाची संमतीपत्राची वैधता दि.३१/०३/२०२६ पर्यंत असून सदर उद्योगाच्या पाहणीदरम्यान आढळलेल्या त्रुटींच्या अनुषंगाने दि.०६/१०/२०२३ रोजी कारणे दाखवा नोटीस बजाविण्यात आली होती. तथापि, त्रुटींची पुर्तता पुर्णपणे न केल्याबद्दल सदर उद्योगास दि.१३/०२/२०२४ रोजी अंतरिम निर्देश देण्यात आले असून रू.२.५० लक्षची बँक हमी जप्त करण्यात आली आहे.

वणी तालुक्यात राजूर परिसरात एकूण ४२९(२६-कार्यरत व १६-बंद) चुनाभट्ट्या अस्तित्वात आहेत. मंडळामार्फत राजूरा परिसरातील चुनाभट्ट्यांच्या करण्यात आलेल्या पाहणीदरम्यान ०६ चुना भट्ट्यांनी संमतीपत्रातील अटी व शर्तीचे उल्लंघन केल्यामुळे ६ चुनाभट्ट्यांना दि.१३/०३/२०२५ रोजी अंतरिम निर्देश देण्यात आले आहेत.

जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, यवतमाळ यांचेकडून प्राप्त अहवालानुसार नागरिकांमध्ये श्वसन विकार, दमा, दृष्टिदोष, इ. आजारचे रुग्ण आढ़ळून आलेले नाहीत. जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी, यांचेकडुन प्राप्त अहवालानुसार कोळसा वाहतुकीमुळे धुळीमुळे कापूस, सोयाबीन, तूर, इ. पिकांचे नुकसान झाले असल्याचे नमूद केले आहे. तथापि, याबाबत नुकसान भरपाईचे धोरण शासनस्तरावर ठरविणे आवश्यक असल्याचे नमूद केले आहे.

***************

## महाराष्ट्र विधानसभा
## सन २०२५ चे पहिले (अर्थसंकल्प) अधिवेशन

श्री. प्रशांत ठाकूर, श्रीमती मनिषा चौधरी, श्री. अमित साटम, वि.स.स., यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सुचना क्र. २४७ पुढीलप्रमाणे आहे:-

"रायगड जिल्ह्यातील तळोजा (ता.पनवेल) औद्योगिक वसाहतीतील अनेक कंपन्यांमार्फत रात्री अपरात्री तसेच पहाटेच्या वेळीत सोडण्यात येणाऱ्या रासायनिक दुषित वायुमुळे पनवेल, नविन पनवेल, खांदा कॉलनी, कळंबोली, कामोठे, खारघर परिसरातील नागरिकांच्या आरोग्याला धोका निर्माण झाला असल्याचे माहे फेब्रुवारी २०२५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास येणे, उक्त बाब सभागृहात वारंवार शासनाच्या निदर्शनास आणुनसुद्धा शासनाच्या अक्षम्य होणाऱ्या दुर्लक्षामुळे संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांकडून ठोस कारवाई होत नसणे, पर्यावरणाला धोका निर्माण करणाऱ्या उक्त औद्योगिक वसाहतीतील रासायनिक कारखान्यांवर कोणतीच कारवाई होत नसल्यामुळे नागरिकांच्या मनात संबंधित विभागाबाबत चिड निर्माण होत असणे, या औद्योगिक वसाहतीच्या परिसरातील खारघर, कळंबोली, तळोजा आणि पनवेल परिसरातील अनेक नागरिक आपली घरे सोडून अन्यत्र स्थलांतरीत होणे, प्रदुषण नियंत्रण मंडळाच्या अधिकाऱ्यांची सदर प्रदुषण करणाऱ्या कारखान्यांच्या बरोबर साटेलोट असल्याची भावना बनणे, दुषित वायु सोडणाऱ्या कारखान्यांवर तसेच उक्त परिसरातील संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांवर तातडीने कारवाई करण्याची नितांत गरज, त्यादृष्टीने शासनाने त्वरीत करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

..............................................................................................................................................

### मा. मंत्री (पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग) यांचे निवेदन.

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाची वसाहत तळोजा, ता. पनवेल, जि. रायगड येथे १९६७ पासुन वसलेली आहे. या औद्योगिक वसाहतीमध्ये प्रामुख्याने रासायनिक, औषध निर्मिती, खत निर्मिती, काच व रंग निर्मिती, अन्न प्रक्रिया, मत्स्य प्रक्रिया, अभियांत्रिकी, किटक नाशक, बॅटरी उत्पादक इ. जवळपास ४०५ उद्योग कार्यरत आहेत. या उद्योगांना महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत उद्योग स्थापन व चालवण्यासाठी हवा व जल प्रदुषण रोखण्यासाठी आवश्यक ती सयंत्रणा बसविण्याच्या अधिन राहून ठराविक कालमर्यादेसाठी संमती पत्र दिले जाते.

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळास माहे जानेवारी-२०२५ व फेब्रुवारी -२०२५ या महिन्यामध्ये नागरिकांकडून रात्रीच्या वेळेस वासाच्या तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. यानुषंगाने केलेल्या तपासणीमध्ये पनवेल महानगरपालिका हद्दीत बसविण्यात आलेल्या सतत वातावरणीय हवा गुणवत्ता तपासणी केंद्र तोंडारे, तळोजा (CAAQMS) व कळंबोली येथील अहवालावरून हवेची गुणवत्ता मध्यम श्रेणीमध्ये आढळून आल्याचे निदर्शनास आले आहे. (हवा गुणवत्ता निर्देशांक १०० ते २००). तळोजा औद्योगिक वसाहतीमधील उद्योगांमधील वायुची गळती झाल्यास त्याची नोंद हवा गुणवत्ता तपासणी केंद्र तोंडारे येथे होते. तसेच, वासाच्या तक्रारीच्या अनुषंगाने वेळोवेळी मोबाईल एअर मॉनिटरींग व्हॅन व्दारे हवेची गुणवत्ता मोजली जाते व या अहवालावरून हवेच्या गुणवत्तेमध्ये केमिकल घटकांचे प्रमाण विहित मर्यादेत असल्याचे तसेच हवा गुणवत्ता निर्देशांक हा "मध्यम" स्वरुपाचा असल्याचे निदर्शनास आले आहे.

श्री. राजीव सिन्हा यांनी माननीय लोकआयुक्त यांच्याकडे दि.०२/०५/२०२२ रोजी हवा प्रदुषण विषयक केलेल्या तक्रारीबाबत मा. लोकआयुक्त यांच्या दि.१७/०२/२०२३ रोजीच्या आदेशान्वये विशेष तपास पथक (SIT) ची स्थापना केली. याबाबतचा अंतीम अहवाल मा. लोकआयुक्त यांचेकडे सादर केला आहे. SIT अहवालामध्ये नमुद केल्याप्रमाणे तळोजा औद्योगिक वसाहतीतील उद्योगांनी या संदर्भातील उपाययोजना पूर्ण केल्या आहेत. मा. लोकायुक्त यांच्या दि.१०/०८/२०२३ रोजीच्या आदेशान्वये, तळोजा हवा प्रदूषणाबाबत व वास प्रतिबंध उपाययोजना या संदर्भात प्रगती आढावा अहवाल तपासण्यासाठी देखरेख समिती गठीत केली आहे. समितीची बैठक नियमितपणे घेतली जाते व उपाययोजनांची अंमलबजावणी केली जाते.

पनवेल महानगरपालिका, आरोग्य विभाग यांचेकडून प्राप्त अहवालानुसार दुषित वायुमुळे पनवेल, नवीन पनवेल, खांदा कॉलनी, कळंबोली, कामोठे, खारघर परिसरातील नागरिकांच्या आरोग्याला धोका निर्माण झाल्या असल्याबाबत या कार्यालयाकडे कोणतीही तक्रार प्राप्त झालेली नाही.

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळास रसायनांच्या येणारा वासाबाबत प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने मंडळाकडून पुढीलप्रमाणे उपाययोजना करण्यात आल्या आहेत:- सामाईक औद्योगिक सांडपाणी प्रक्रिया यंत्रणेतून वाघवली खाडीत सांडण्यात येणाऱ्या प्रक्रियायुक्त सांडपाण्याच्या विल्हेवाटीची वेळ बदलून ती फक्त भरतीच्या वेळेत सोडण्याबाबत महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाला सुचित केले आहे. ब्रोमीन हाताळणी दोन उद्योग व सहा फिश मील उद्योगांना उत्पादनाची वेळ सकाळी ६.०० ते सायंकाळी ६.०० निश्चित करून संमतीपत्र प्रदान करण्यात आले आहे. सॉलवंट डिस्लेशन व हाताळणी, औषध निर्मिती उद्योग, किटकनाशक, रासायनिक खते निर्माण करणारे उद्योग यांना हवा प्रदूषणासंदर्भात उपाययोजना करण्यासंदर्भात निर्देशित केले आहे. मत्स्य प्रक्रिया उद्योगांना प्रक्रियाकृत औद्योगिक सांडपाण्याला हायड्रोजन पेरॉक्साईडची मात्रा देण्याविषयी आदेशित केले आहे. मत्स्य प्रक्रिया उद्योगांना उद्योगातून निर्माण होणारे सांडपाण्यावर सम्प-२ परिसरात अनएरोबीक बायोडायजेस्टर (UASB) उभारण्याबाबत कार्यवाही सुरू आहे. महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने सामाईक औद्योगिक सांडपाणी प्रक्रिया यंत्रणेच्या विल्हेवाटीचे ठिकाण हे ३.३ किलोमीटर पुढे वाढविण्याचे काम सुरू केले असून प्रगतीपथावर आहे.

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून उद्योगांना हवा व जल प्रदूषण नियंत्रण संयंत्रणा बसविण्याच्या अटी व शर्तीसह संमतीपत्र प्रदान केले जाते. मंडळाकडून उद्योगांना वेळोवेळी दिलेल्या भेटी दरम्यान हवा प्रदूषण व जल प्रदूषण नियंत्रण संयंत्रणा कार्यन्वीत असल्याची खातरजमा केली जाते व आढळून आलेल्या त्रुटींच्या अनुषंगाने कारवाई केली जाते. सामुहिक घातक घनकचरा व्यवस्थापन केंद्र (मे. मुंबई वेस्ट मॅनजमेन्ट लि.) यांना महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने दि.२८/११/२०२४ रोजीच्या पत्रान्वये दिलेल्या निर्देशाच्या अनुषंगाने संबंधित केंद्राने संबंधित निर्देशाची पुर्तता केली आहे. सिडको व पनवेल महानगरपालिकेच्या चाळ, तळोजा येथील घनकचरा व्यवस्थापन केंद्राने प्रस्तावित निर्देशांच्या अनुषंगाने अंमलबजावणी चालू आहे. सिडको व पनवेल महानगरपालिकेच्या चाळ, तळोजा येथील घनकचरा व्यवस्थापन केंद्रास दि.२२/१०/२०२४ रोजी फिर्यादी सुचना व दि.१९/०१/२०२४ रोजी प्रस्तावित निर्देश दिले असून अंमलबजावणी चालू आहे.

मा. राष्ट्रीय हरित लवाद, पुणे यांचा दावा क्र.७०/२०२३ हा निकाली काढला असून यामध्ये तसेच वासासंदर्भात 'राष्ट्रीय हवा गुणवत्ता मानक (२००९) अनुसार कोणतेही परिमानके ' केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळ' यांच्याकडून ठरवण्यात आलेली नासल्याने केंद्रिय प्रदूषण नियंत्रण मंडळास वासा संदर्भात परिमापके एक वर्षाच्या आत निश्चित करण्याचे निर्देषित केले आहे. तळोजा औद्योगिक वसाहतीमधील लघु आणि मध्यम उद्योगांसाठी 'लॉक आणि की' व्यवस्था आणि पॉसिटीव्ह डिस्चार्जबाबत महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाला निर्देश दिले असून याची अंमलबजावणी सुरू आहे. दरम्यान महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून सध्या तळोजा औद्योगिक वसाहतीमध्ये सीसीटीव्ही बसवण्याचे काम सुरू आहे. सीसीटीव्ही नेटवर्कच्या मदतीने स्थानिक पोलिसांना आणि महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाला दक्षता सुधारण्याचे निर्देश दिले आहेत.

*******

## महाराष्ट्र विधानसभा- सन २०२५ चे प्रथम (अर्थसंकल्पीय) अधिवेशन

मा.श्री.बापूसाहेब पठारे, डॉ.जितेंद्र आव्हाड, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये लक्षवेधी सूचना क्र.५९७ पुढीलप्रमाणे आहे :-

"वडगावशेरी मतदारसंघाची लोकसंख्या सुमारे ७ लाख इतकी असणे, मात्र मतदारसंघातील परिमंडळ-ई विभागात प्राधान्य कुटुंब लाभार्थी योजनेचा इष्टांक फक्त १,०८,००० एवढाच असून सदर इष्टांक १०० टक्के पूर्ण झालेला असणे, तथापी मतदारसंघात लक्ष्मीनगर, गांधीनगर, भाटवस्ती, वडारवस्ती, भीमनगर, येरवडा, यमुनानगर या भागात मोठ्या प्रमाणात झोपडपट्टी वसाहत असून सदर भागामध्ये हातावर पोट असणारे, मजुरी करणारे गोरगरीब नागरिक वास्तव्यास असणे, तसेच मतदारसंघात विश्रांतवाडी, लोहगाव, खराडी हे नव्याने विकसित होत असलेले भाग असून सदर भागामध्ये स्थलांतरीत मजुराचे प्रमाण अधिक असणे, परिमंडळ-ई विभागात प्राधान्य कुटुंब लाभार्थी योजनेचे १,०८,००० इतके लाभार्थी असून. उर्वरित पात्र असूनही योजनेचा लाभ मिळत नसलेल्या लाभार्थ्यांची संख्या मोठ्या प्रमाणात असणे, परंतु इष्टांक पूर्ण झालेला असल्याने वाढीव लाभार्थ्यांना या योजनेचा लाभ दिला न जाणे, पर्यायाने पात्र गोर-गरीब लाभार्थी सदर योजनेपासून वंचित राहणे, सबब मतदारसंघातील परिमंडळ-ई विभागास प्राधान्य कुटुंब लाभार्थी योजनेचा किमान ५०,००० इतका वाढीव इष्टांक मंजूर करून मिळणेसाठी मा. मंत्री अन्न, नागरी पुरवठा व प्रधान सचिव अ.ना.पु. यांना दिनांक ९ जानेवारी २०२५ रोजीचा पत्रव्यवहार, याबाबत - शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

---

### मा. उपमुख्यमंत्री तथा मंत्री (अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण) यांचे निवेदन.

राज्यात दि.१ फेब्रुवारी, २०१४ पासून राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियम, २०१३ ची अंमलबजावणी सुरु करण्यात आली आहे. त्यानुसार अंत्योदय अन्न योजना (AAY) व प्राधान्य कुटुंब लाभार्थी (PHH) या योजनांसाठी पात्र लाभार्थ्यांची निवड करण्याकरिता केंद्र शासनाकडून महाराष्ट्र राज्याकरिता ७,००,१६,६८४ लाभार्थी इतका इष्टांक देण्यात आला आहे. त्यामध्ये अंत्योदय योजनेसाठी केंद्र शासनाने २५,०५,३०० शिधापत्रिका आणि प्राधान्य कुटुंब लाभार्थी योजनेसाठी ५,९२,१६,०३१ लाभार्थी इतका इष्टांक मंजूर केलेला आहे.

राज्यात दि.१ फेब्रुवारी, २०१४ पासून राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियम, २०१३ ची अंमलबजावणी सुरु करण्यात आली आहे. सदर अधिनियमातील कलम ३(२) मधील तरतुदीनुसार देशाच्या ग्रामीण भागातील ७५% व शहरी भागातील ५०% लोकसंख्येएवढ्या जनतेचा समावेश या योजनेंतर्गत पात्र लाभार्थी म्हणून करण्याची तरतूद आहे. त्या आधारे केंद्र शासनाने त्यांच्या दि.२६.०७.२०१३ च्या पत्रान्वये जनगणना २०११ मधील लोकसंख्येनुसार महाराष्ट्र राज्यातील ग्रामीण भागातील ७६.३२ टक्के व शहरी भागातील ४५.३४ टक्के एवढ्या लोकसंख्येस राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियमातंर्गत पात्र ठरविले असून त्यानुसार ७,००,१६,६८४ (ग्रामीण-४,६९,७१,४८१ व शहरी- २,३०,४५,२०३) एवढी लाभार्थ्यांची संख्या निश्चित केली आहे. सदर लाभार्थ्यांचा इष्टांक देताना अधिनियमातील तरतूदीनुसार वरीलप्रमाणे ग्रामीण व शहरी भागासाठी स्वतंत्र आकडेवारी दर्शविण्यात आली होती. त्यानुषंगाने प्रथमतः दि.१७.१२.२०१३ च्या शासन निर्णयान्वये ग्रामीण व शहरी भागाकरिता लाभार्थ्यांचा जिल्हानिहाय इष्टांक देण्यात आला होता.

उक्त अधिनियमातील कलम ३ (१) मध्ये अंत्योदय अन्न योजनेचे सर्व लाभार्थी या अधिनियमांतर्गत पूर्वीप्रमाणेच अन्नधान्याचा लाभ घेण्यास पात्र ठरतील अशी तरतूद करण्यात आली आहे. केंद्र शासनाने राज्यासाठी दि.१२.५.२००५ च्या पत्रान्वये अंत्योदय अन्न योजनेचा २५,०५,३०० एवढा शिधापत्रिकांचा इष्टांक दिला आहे. तसेच प्राधान्य कुटुंब लाभार्थी योजनेसाठी ५,९२,१६,०३१ लाभार्थी इतका इष्टांक मंजूर केलेला आहे.

राज्यामध्ये सन्माननीय लोकप्रतिनिधी तसेच क्षेत्रीय पुरवठा यंत्रणांकडून वारंवार इष्टांक सुधारीत करण्याची मागणी करण्यात येते. त्यामुळे २०११ च्या जनगणनेअंती प्रसिद्ध आकडेवारीनुसार देण्यात आलेल्या ७,००,१६,६८४ लाभार्थी इतक्या इष्टांकामध्ये वाढ करण्याची विनंती राज्य शासनाने केंद्र शासनास केली होती. त्यानुसार सन २००१ ते २०११ या दशकातील महाराष्ट्राच्या लोकसंख्या वाढीच्या अनुषंगाने सुधारित इष्टांक परिगणित करुन महाराष्ट्र राज्यासाठी ८,२०,६१,३४२ इतका इष्टांक देण्याची मागणी दि.०७.०३.२०२२ च्या शासन पत्रान्वये केंद्र शासनाकडे करण्यात आली होती. त्यानुषंगाने राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियम, २०१३ योजनेचे निकष सर्व राज्य/केंद्रशासित प्रदेशांना एकसमानपणे लागू असल्याने विशिष्ट राज्यांच्या लाभार्थी संख्येत सुधारणा करणे शक्य नसल्याचे, तसेच राज्य सरकारच्या विनंतीचा विचार करुन नवीन जनगणनेनंतर करण्यात येईल, असे अभिप्राय केंद्र शासनाने दि.२३.०३.२०२२ च्या पत्रान्वये दिले आहेत.

राज्यासाठी दिलेल्या एकूण इष्टांकांच्या अनुषंगाने पात्र लाभार्थ्यांना लाभ होण्याच्या दृष्टीकोनातून अंत्योदय अन्न योजना व प्राधान्य कुटुंब लाभार्थी घटकांचा वेळोवेळी आढावा घेण्यात येऊन सुधारीत इष्टांक देण्याच्या दृष्टीने राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियम, २०१३ अंतर्गत जिल्हानिहाय सुधारीत इष्टांक दि.२६.०६.२०२४ रोजीच्या शासन निर्णयान्वये वितरीत करण्यात आलेला आहे/ येत असतो. त्यामध्ये अन्नधान्य वितरण अधिकारी कार्यालय, पुणे यांना पुणे शहरासाठी अंत्योदय अन्न योजनेच्या लाभार्थ्यांसाठी (AAY) ७४५९ शिधापत्रिका इतका इष्टांक देण्यात आला आहे. तसेच प्राधान्य कुटुंब योजनेतील (PHH) लाभार्थ्यांसाठी १३,३६,९४१ लाभार्थी इतका इष्टांक मंजूर करण्यात आला आहे. त्यानुसार अन्नधान्य वितरण अधिकारी कार्यालय, पुणे यांच्या दि.०३.०७.२०२४ रोजीच्या पत्रान्वये त्या कार्यालयाच्या अधिनस्त ११ परिमंडळ कार्यालयनिहाय संबंधित परिमंडळ कार्यक्षेत्रातील लोकसंख्या, झोपडपट्टी परिसर इ. अनुषंगिक बाबी विचारात घेऊन इष्टांकाचे वाटप केलेले आहे.

त्यानुसार अन्नधान्य वितरण अधिकारी, पुणे कार्यालयाच्या अधिनस्त परिमंडळ कार्यालय-ई विभागातील अंत्योदय अन्न योजनेतील शिधापत्रिकाधारकांकरिता ३६२ शिधापत्रिका इतका इष्टांक देण्यात आला आहे. सदरचा इष्टांक पूर्ण झालेला आहे. तसेच प्राधान्य कुटुंब योजनेतील लाभार्थ्यांकरिता १,०८,३९७ लाभार्थी इतका इष्टांक देण्यात आला आहे. त्यापैकी १,०७,८१३ इतक्या लाभार्थ्यांना योजनेचा लाभ देण्यात आला असून ५८४ लाभार्थी इतका इष्टांक शिल्लक आहे. सद्य:स्थितीत सन्माननीय लोकप्रतिनिधी तसेच क्षेत्रीय पुरवठा यंत्रणांकडून इष्टांक देण्याबाबत होत असलेल्या मागणीच्या अनुषंगाने केंद्र शासनाने मंजूर केलेल्या इष्टांकाच्या मर्यादेत संपूर्ण राज्यासाठी देण्यात आलेल्या इष्टांकाचा आढावा घेऊन पात्र व उचित लाभार्थ्यांना योजनेचा लाभ देणेकामी सुधारीत इष्टांक वितरीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

**********

**महाराष्ट्र विधानसभा, सन २०२५ चे पहिले (अर्थसंकल्पीय) अधिवेशन**

**मा. श्री. विक्रम पाचपुते, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्र. २४९० पुढीलप्रमाणे आहे :-**

"मौजे घुगलवडगाव ता. श्रीगोंदा जि. अहिल्यानगर येथील श्री. दत्तात्रय गोविंद दागंडे यांचे स्वस्त धान्य दुकानसंदर्भात स्थानिकांच्या चुकीच्या तक्रारीनूसार मा. उप आयुक्त (पुरवठा), नाशिक विभाग, नाशिक यांनी निलंबित करणे, जिल्हा पुरवठा अधिकारी, अहिल्यानगर यांनी दुकानाचा परवाना पुर्ववत केल्यानंतर सुध्दा उप आयुक्त, पुरवठा विभाग, नाशिक यांनी आर्थिक देवाणघेवाण करून सदर निर्णय रद्द करुन चुकीच्या पध्दतीने दुकानाचा परवाना निलंबित करण्यात आला असणे, सदर प्रकरणाची चौकशी करुन दोषी अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याची आवश्यकता, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

---

**श्री. अजित आशाताई अनंतराव पवार, मा. उप मुख्यमंत्री तथा मंत्री**
**अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण यांचे निवेदन**

श्री. दत्तात्रय गोविंद दांगडे यांचे मौजे घुगलवडगाव, ता. श्रीगोंदा येथे स्वस्त धान्य दुकान क्र. १५२२१३७००१२८ असा असून अंत्योदय कार्ड धारक ४६ व प्राधान्य कार्ड धारक २१९ असे एकूण २६५ कार्डधारक आहेत. श्री. रोहिदास हरिशचंद्र दांगडे व इतर ६, यांनी रा. घुगलवडगाव येथील रहिवासी यांनी स्वस्त धान्य दुकान परवानाधारक श्री. दत्तात्रय गोविंद दांगडे हे दोन महिन्याचे धान्य वाटप न करता काळाबाजारात विक्री करण्यासाठी घेऊन जात असतांना पकडला व त्याची चौकशी करुन कार्यवाही करण्याबाबत तहसिलदार, श्रीगोंदा यांना दि. ३१/०१/२०२२ रोजीच्या अर्जान्वये कळविले. सदर अर्जाच्या अनुषंगाने तहसिलदार, श्रीगोंदा यांनी पुरवठा निरीक्षक यांचेसह परवानाधारक / अर्जदार यांचे जबाब नोंदविले. माहे डिसेंबर २०२१ व माहे जानेवारी २०२२ चे धान्य दुकानात शिल्लक असून लाभार्थ्यांना दोन महिन्याचे धान्य देणे बाकी आहे. स्वस्त धान्य दुकान परवाना पडताळणीमध्ये धान्य तफावत दिसून आलेली आहे. चौकशीमध्ये परवानाधारक यांनी धान्य त्यांच्या घरी ठेवले असल्याने सदर दुकानाचा परवाना निलंबीत करण्याचे तहसिलदार, श्रीगोंदा यांनी दि. ३१/०१/२०२२ जिल्हा पुरवठा अधिकारी, अहिल्यानगर यांचकडे प्रस्तावित केले.

तहसिलदार, श्रीगोंदा यांनी सादर केलेल्या अहवालाच्या अनुषंगाने परवानाधारक यांनी अटी व शर्तीचा भंग केलेला असून दुकानास जोडलेल्या शिधापत्रिकाधारकांची तपासणी करणे आवश्यक असून १००% जबाब घेऊन स्वस्त धान्य दुकानाची सखोल तपासणी करुन सदर चे स्वस्त धान्य दुकानास जोडण्यात आलेल्या लाभार्थीचे अन्न धान्य मुदतीत व नियमानुसार त्यांना मिळते किंवा कसे याची तपासणी होईपर्यंत जिल्हा पुरवठा अधिकारी, अहिल्यानगर यांनी दि. ११/०५/२०२२ च्या आदेशान्वये रास्तभाव दुकान निलंबीत करण्यात आले.

उक्त आदेशाविरुध्द श्री. दत्तात्रय गोविंद दांगडे यांनी उप आयुक्त (पुरवठा), नाशिक विभाग, नाशिक यांचेकडील महाराष्ट्र अनुसूचित वस्तू (वितरणाचे विनियमन) १९७५ चे कलम २४ अन्वये पुनरीक्षण अर्ज दाखल करण्यात आला. त्यास अनुसरुन अर्जदार यांचा पुर्नरिक्षण अर्ज अशंतः मंजूर करुन जिल्हा पुरवठा अधिकारी, अहिल्यानगर यांचा आदेश दिनांक ११/०५/२०२२ रोजीचा आदेश रद्द करण्यात आला. जिल्हा पुरवठा अधिकारी, अहिल्यानगर यांनी २ महिन्यात ८० टक्के हुन अधिक कार्डधारक यांची चौकशी करून गुणवत्तेवर अंतिम निर्णय घेण्यात यावा असे उप आयुक्त (पुरवठा), नाशिक यांनी दि. १६/०६/२०२३ रोजी आदेश पारीत केले.

तद्नंतर तहसिलदार, श्रीगोंदा यांनी मौजे घुगलवडगाव, ता. श्रीगोंदा येथील स्वस्त धान्य दुकान परवानाधारक यांची ८० टक्के लाभार्थीचे यांचे जबाब घेऊन अहवाल जिल्हा पुरवठा अधिकारी, अहिल्यानगर यांना सादर केला. त्यानुषंगाने जिल्हा पुरवठा अधिकारी, अहिल्यानगर यांनी सदर स्वस्त धान्य दुकान गुणवत्तेवर निर्णय घेऊन दि.१९/०३/२०२४ रोजी महाराष्ट्र अनुसूचित वस्तू (वितरणाचे विनियमन) आदेश १९७५ अन्वये पुवर्वत केले.

सदर दि. १९/०३/२०२४ रोजीच्या आदेशाविरुध्द श्री. रोहिदास हरिशचंद्र दांगडे व इतर ६ यांनी उप आयुक्त (पुरवठा) नाशिक यांचेकडेस पुर्नरिक्षण अर्ज दाखल केला. दि. १५/०१/२०२५ रोजीचे आदेशान्वये उप आयुक्त (पुरवठा), नाशिक यांनी पुर्नरिक्षण अर्ज अंशतः मंजुर करून जिल्हा पुरवठा अधिकारी अहिल्यानगर यांचा दि.१९/०३/२०२४ रोजीचा आदेश रद्द करुन सदर स्वस्त धान्य दुकानास जोडलेल्या ८० टक्के हून अधिक कार्डधारकांची एक महिन्याच्या आत फेर चौकशी करुन गुणवत्तेवर अंतिम निर्णय घेणेबाबत आदेशित केले आहे.

सदरचे दुकान निलंबित झाल्यामुळे व उप आयुक्त (पुरवठा), नाशिक यांनी दिलेल्या दि. १५/०१/२०२५ आदेशाच्या अंमलबजावणी करीता तहसिलदार, श्रीगोंदा यांना कार्ड धारकांची फेर चौकशी करणेसाठी दि.०३/०२/२०२५ रोजीच्या पत्रान्वये जिल्हा पुरवठा अधिकारी, अहिल्यानगर यांनी कळविले आहे. तसेच तहसिलदार, श्रीगोंदा यांचा अहवाल अदयाप अप्राप्त आहे. त्यामुळे लाभार्थ्यांचे गैरसोय होऊ नये म्हणून सदरचे स्वस्त धान्य दुकान शेजारील देऊळगांव या गावांतील स्वस्तधान्य दुकानास तात्पुरते स्वरुपात जोडण्यात आले आहे.

रास्तभाव दुकानदार यांना महाराष्ट्र अनुसूचित वस्तू (वितरणाचे विनियमन) १९७५ चे कलम २४ अन्वये उप आयुक्त (पुरवठा), नाशिक विभाग, नाशिक यांच्या दि. १५/०१/२०२५ आदेशाविरुध्द मा. मंत्री, अन्न नागरी पुरवठा व ग्राहक सरंक्षण, मंत्रालय, मुंबई यांचेकडे पुर्नरिक्षण अपील अर्ज दाखल करु शकतात.

**********

<u>लक्षवेधी सूचना क्र.१९९७</u>

**महाराष्ट्र विधानसभा**

**सन २०२५ चे पहिले अधिवेशन**

मा. श्री.भीमराव केराम, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना क्र. १९९७ खालीलप्रमाणे आहे:-

"अनुसूचित जमातीच्या ४८० विद्यार्थ्यांना दहावीनंतर अभियांत्रिकी (जेईई) आणि वैद्यकीय (नीट) प्रवेश परीक्षांचे मोफत मार्गदर्शन करण्यासाठी नामवंत खाजगी प्रशिक्षण संस्थांचे नियुक्ती करण्याचा शासन आदेश ८ जून २०२३ रोजी जारी होऊनही अद्याप ही योजना लाल फितीत अडकल्याची गंभीर बाब उघडकीस येणे, आदिवासी विकास विभागांतर्गत कार्यरत असलेल्या प्रत्येक अप्पर आयुक्त कार्यालय स्तरावर शासकीय आश्रम शाळा, अनुदानित आश्रम शाळा किंवा एकलव्य मॉडेल निवासी शाळेतील एक तुकडी वैद्यकीय आणि दुसरी तुकडी अभियांत्रिकी अभ्यासक्रमाला प्रवेश घेऊ शकेल, अशा पद्धतीने प्रशिक्षित करण्याची योजना आखण्यात आली असणे, नीट, जेईई पात्रता परीक्षेच्या तयारी करिता योजना तयार करण्याची मागणी आदिवासींसाठी काम करणाऱ्या ट्रायबल फोरम या संघटनेने केली असणे, सरकारकडे त्याबाबत वारंवार पत्रव्यवहारही केला असल्याचे निदर्शनास येणे, मात्र अद्याप या योजनेची अंमलबजावणी झालेली नसणे, उलट आत्तापर्यंत अर्थसंकल्पात आदिवासी समाजाच्या मागण्यांना कात्रिच लावण्यात आली असल्याचे निदर्शनास येणे, अनुसूचित जमातीवर हा अन्याय असल्याने ही योजना राबवण्यासाठी अर्थसंकल्पात लोकसंख्येच्या प्रमाणात आर्थिक तरतूद करावी अशी मागणी सरकारकडे केली असणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

---

**मा. मंत्री, आदिवासी विकास यांचे निवेदन.**

महाराष्ट्र राज्यातील अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना दहावी नंतर दोन वर्ष कालावधीसाठी नामवंत खाजगी प्रशिक्षण संस्थेच्या साहाय्याने अभियांत्रिकी व वैद्यकीय प्रवेश परीक्षांचे मार्गदर्शन करण्यासंदर्भातील योजना राबविण्याचा दिनांक ८ जून, २०२३ रोजी शासन निर्णय निर्गमित करण्यात आला होता. सदरील शासन निर्णयामध्ये आवश्यक अटी व शर्तीचा समावेश करुन त्यामध्ये सुधारणा करण्याचे आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक यांनी दिनांक २६ जुन, २०२४ रोजीच्या पत्रान्वये प्रस्तावित केले. त्यानुषंगाने आदिवासी विकास विभागांतर्गत असलेल्या शासकीय आश्रमशाळा / अनुदानित आश्रमशाळा / एकलव्य मॉडेल रेसिडेंशियल स्कुलमध्ये इयत्ता ११ वी व १२ वी मध्ये शिकत असलेल्या अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांकरिता अभियांत्रिकी व वैद्यकीय प्रवेश परीक्षेची तयारी करुन घेणेकरिता सुधारित अटी व शर्तीचा समावेश करुन त्याप्रमाणे दिनांक १४.१०.२०२४ रोजीच्या शासन निर्णयान्वये सुधारित मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात आल्या.

प्रस्तुत शासन निर्णयातील तरतूदींनुसार आदिवासी विकास विभागातंर्गत असलेल्या चार अपर आयुक्त आदिवासी विकास कार्यालयाच्या अधिनस्त प्रत्येकी एक अशा एकूण चार आश्रमशाळांची निवड

करण्यात आली असून त्या आश्रमशाळा व प्रशिक्षण द्यावयाच्या विद्यार्थ्यांची संख्या याबाबतचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र | अपर आयुक्त | प्रशिक्षण ठिकाण | मुले/मुली | इ.११ वी प्रवेश क्षमता | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | CET/JEE | NEET |
| १. | नाशिक | शासकीय आश्रमशाळा मुंढेगांव | मुले | ४० | ४० |
| २. | ठाणे | एकलव्य मॉडेल रेसिडेंशियल स्कुल शेंडेगांव | मुली | ४० | ४० |
| ३. | अमरावती | शासकीय आश्रमशाळा चिंचघाट | मुले | ४० | ४० |
| ४. | नागपुर | शासकीय आश्रमशाळा सिंधिविहीर | मुली | ४० | ४० |

उक्त दिनांक १४.१०.२०२४ रोजीच्या शासन निर्णयातील तरतूदीस अनुसरुन सन २०२५-२०२६ व सन २०२६- २७ या शैक्षणिक वर्षात सदरची योजना राबविणेच्या अनुषंगाने महाराष्ट्र राज्यातील अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना दहावी नंतर दोन वर्ष कालावधीसाठी नामवंत खाजगी प्रशिक्षण संस्थेच्या साहाय्याने अभियांत्रिकी व वैद्यकीय प्रवेश परीक्षांचे मार्गदर्शन करण्यासंदर्भातील प्रशासकीय मान्यतेचा प्रस्ताव, आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक यांनी सादर केला होता.

सदरील प्रस्तावास दिनांक ३१.०१.२०२५ रोजीच्या आदेशान्वये प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली. त्यानूषंगाने http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर निविदा क्र. २०२५_CTDN_११४९०४७ १ दि.११.०२.२०२५ नुसार आयुक्तलयाच्या स्तरावरुन निविदा प्रसिध्द करण्यात आली. सदर निविदा दिनांक ०६.०३.२०२५ रोजी उघडण्यात आली असुन त्यात ९ निविदाधारकांनी सहभाग नोंदविला आहे.

प्रस्तूत निविदा अंतिम करण्याच्या अनुषंगाने आयुक्त, आदिवासी विकास नाशिक यांच्या स्तरावरील खरेदी समिती मार्फत कागदपत्रांची छाननी सुरू असून छाननीनंतर निविदेतील अटी व शर्ती नुसार पात्र न्युनतम दरधारक असलेल्या संस्थेची निवड करण्यात येणार आहे. सदर संस्थाकडून सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षापासून अभियांत्रिकी व वैद्यकीय प्रवेश परीक्षांच्या प्रशिक्षणास सुरुवात करण्यात येणार आहे.

सन २०२५-२६ या आर्थिक वर्षासाठी अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना विविध स्पर्धा परीक्षा/परकीय विद्यापीठांमध्ये प्रवेशासाठीच्या अर्हताकारी परीक्षा/परकीय भाषांचे प्रशिक्षण देणे (लेखाशिर्ष २२२५डी ३८७) या योजनेकरीता रू.१००.०० कोटी इतकी तरतूद अर्थसंकल्पित करण्यात आली आहे.

******************************

प्रश्न-१३e४-१३r.

## महाराष्ट्र विधानसभा सन २०२५ चे पहिले (अर्थसंकल्पीय अधिवेशन)

डॉ. मिलिंद नरोटे, मा. विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ (३) अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र. २५०७ पुढील प्रमाणे आहे.

"गडचिरोली जिल्ह्यातील भामरागड एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालयात दुधाळ गाय वाटप योजनेत भ्रष्टाचार होणे, या प्रकरणाच्या चौकशीत तत्कालीन प्रकल्प अधिकारी शुभम गुप्ता दोषी आढळले, आदिवासींच्या विकासासाठी केंद्र व राज्यांकडून विविध योजना राबविण्यात येत असून यात दुधाळ गाय वाटप योजनेचाही समावेश असणे, भामरागड परिसरातील लाभार्थ्यांना गाय घेण्यासाठी मंजूर निधी त्यांच्या खात्यातून इतरत्र वळविण्यात आल्याचेही समोर येणे, तसेच गुप्ता यांनी कार्यालयातील कर्मचारी व लाभार्थ्यांना धमकावून गैरव्यवहार केल्याचे आढळून येणे, मागील अनेक वर्षांपासून हा प्रकार सुरू असणे, सदर प्रकरणी नागपूर आदिवासी विभागाच्या अप्पर आयुक्तांनी तसा अहवाल शासनाकडे पाठवण्यात येणे, परंतु अद्याप दोषी असलेले शुभम गुप्ता यांच्यावर कोणतीच कारवाई करण्यात आलेली नसणे, याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, सदर दोषी शुभम गुप्ता यांच्यावर शासनाने तातडीने करावयाची कारवाई व शासनाची प्रतिक्रिया."

### मा.मंत्री, आदिवासी विकास यांचे निवेदन

प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, भामरागड या कार्यालयाच्या क्षेत्रांतर्गत सन २०२२-२३ मध्ये केंद्रवर्ती अर्थसंकल्प योजनेंतर्गत थेट लाभ हस्तांतरण माध्यमातून आदिवासी लाभार्थ्यांना दुधाळ गायी पुरविणे या योजनेत अनियमितता झाल्याबाबतची बातमी दैनिक लोकसत्ता नागपूर आवृत्ती वृत्तपत्रामध्ये दि.१९.०४.२०२३ रोजी प्रसिद्ध झाली होती. त्या अनुषंगाने सदर प्रकरणी सखोल तपासणी करून अहवाल सादर करण्याबाबत आयुक्त, आदिवासी विकास नाशिक यांना कळविण्यात आले होते. आयुक्त, आदिवासी विकास नाशिक यांनी अपर आयुक्त आदिवासी विकास नागपूर यांना याबाबत तपासणी करण्याचे कळवले. त्यानुसार अपर आयुक्त विकास नागपूर यांनी उपायुक्त, अपर आयुक्तालय आदिवासी विकास नागपूर यांच्या अध्यक्षतेखाली चौकशी समिती गठित करून सदर समितीचा सविस्तर अहवाल दि.१४.०८.२०२३ रोजीच्या पत्रान्वये शासनास सादर केला होता. सदर अहवालातील निष्कर्षानुसार सदर प्रकरणी अनियमितता झाल्याचे दिसून आल्याने श्री. शुभम गुप्ता तत्कालीन प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, भामरागड तसेच प्रकल्प कार्यालयातील इतर कर्मचारी यांना सदर प्रकरणी दि. १४.०९.२०२३ रोजीच्या ज्ञापनान्वये खुलासा शासनास सादर करण्याबाबत कळवण्यित आले होते. त्यानुसार त्यांच्याकडून प्राप्त खुलास्यावर अपर आयुक्त, आदिवासी विकास नागपूर यांचे अभिप्राय घेण्यात आले. संबंधितांनी दिलेला खुलासा व अपर आयुक्त,

आदिवासी विकास नागपूर यांचे सदर खुलास्यावरील अभिप्राय विचारात घेऊन श्री. शुभम गुप्ता तत्कालिन प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प ,भामरागड यांच्याविरुद्ध अखिल भारतीय सेवा (शिस्त व अपील) नियम ८ नुसार कारवाई करण्याचा प्रस्ताव शिफारशीसह व दोषारोपापत्रासह तत्कालीन मा. मंत्री आदिवासी विकास यांच्या मान्यतेने सामान्य प्रशासन विभागास सादर केला होता. सामान्य प्रशासन विभागाने सदर प्रकरणाची मूळ नस्तीची छायांकित प्रत ठेवून त्यावर कार्यवाही करण्याचे नमूद करून आदिवासी विकास विभागाची मूळ नस्ती विभागास परत केली. श्री. शुभम गुप्ता यांचेबरोबरच सदर प्रकरणात सहभागी असणाऱ्या प्रकल्प भामरागड अंतर्गत कार्यरत इतर अधिकारी/कर्मचारी यांचे विरुद्धही स्वतंत्ररित्या विभागीय चौकशी करण्यात येत आहे.

दरम्यानच्या कालावधीत अपर आयुक्त, आदिवासी विकास नागपूर यांनी दि.१३/१२/२०२४ च्या पत्रान्वये सदर प्रकरणी अधिकचे पुरावे व त्या आधारावर सुधारित दोषारोपपत्र शासनास सादर केले होते. सदर सुधारित दोषारोपपत्र पुढील कार्यवाहीसाठी सामान्य प्रशासन विभागास सादर केले असता सामान्य प्रशासन विभागाने प्रस्तुत प्रकरणी काही मुद्दे उपस्थित केले होते. सदर मुद्यांची माहिती शासनास सादर करण्याबाबत अप्पर आयुक्त आदिवासी विकास यांना दि.११/०३/२०२५ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आले होते. सदर उपस्थित मुद्यांची माहिती अप्पर आयुक्त, आदिवासी विकास नागपूर यांनी त्यांच्या दि.२८/०३/२०२५ व दि.३१/०३/२०२५ रोजीच्या पत्रान्वये शासनास सादर केली होती. दरम्यानच्या कालावधीत सुधारित दोषारोपपत्रास सामान्य प्रशासन विभागाने नमूद केल्याप्रमाणे विद्यमान मा. मंत्री, आदिवासी विकास यांची मान्यता घेण्यात आली. सदर मान्यतेनंतर व अप्पर आयुक्त यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीनुसार श्री. शुभम गुप्ता यांच्यावरील सुधारित दोषारोपपत्राचा प्रस्ताव सामान्य प्रशासन विभागास पुढील कार्यवाहीसाठी सादर करण्यात आलेला आहे.

************

एच -१६- 2

**लक्षवेधी सूचना क्र.१८५१**

महाराष्ट्र विधानसभा सन २०२५ चे प्रथम (अर्थसंकल्पीय) अधिवेशनात श्री.साजिद पठाण, श्री.विजय वडेट्टीवार, श्री.अस्लम शेख, श्री.अमिन पटेल, डॉ.विश्वजित कदम, श्री.विकास ठाकरे, श्री.अमित झनक, श्री.संजय मेश्राम, श्री.अनिल मांगुळकर, श्री.हेमंत ओगले, मा.विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय नियम १०५ अन्वये उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना क्र.१८५१ पुढीलप्रमाणे आहे:-

"सन १९६७ पासून अकोला नगरीचे श्रध्दास्थान असलेले शहरातील पुरातन स्थळ व आराध्य दैवत म्हणून मान असलेले ४०० वर्ष जुने शिव मंदिर व श्री राजराजेश्वर मंदिराचा विकास आराखडा अदयापही रखडलेला असणे,तिर्थक्षेत्र दर्जा व "ब" वर्ग दर्जा मिळालेला नसणे, दिनांक ६ जानेवारी, २०२३ रोजी झालेल्या नियोजन समितीच्या बैठकीत तिर्थक्षेत्र "क" वर्ग दर्जाचा ठराव घेऊनही आजतागायत प्रस्ताव प्रलंबित असणे,दरवर्षी श्रावण महिन्यात तसेच महाशिवरात्रीला कावड यात्रेचे आयोजन केले जात असणे, आठ लाखाहून अधिक बाहेरील जिल्हयातून भक्त दर्शनाकरिता येत असणे, लाखो भाविक येत असतांनाही त्याठिकाणी भाविकांना भक्त निवासस्थान,पोहोच रस्ते,पाणी, विदयुत व आरोग्य इत्यादी सुविधा नसणे, येथे पार्किंगकरिता जागा विकास आराखड्यात आरक्षित करण्यात आलेली असतांनाही जुने शहर पोलिस चौकीची जागा बदलून तेथे पोलिस विभागाने नविन पोलिस चौकी बांधण्याबाबत प्रस्ताव मंजूर करणे,याबाबत शासनाने गांभीर्याने लक्ष घालून विकास आराखडयात दाखविण्यात आलेल्या पार्किगबाबतचा निर्णय घेण्याची आवश्यकता, उक्त राजराजेश्वर मंदिर परिसराचा विकास करणे गरजेचे असल्याने याकरिता रु.५१८.६४ कोटीचा श्री राजराजेश्वर मंदिर परिसर व मोर्णा घाट विकासाचा आराखडा तयार असूनही अदयाप मंजूरी देण्यास होत असलेला विलंब,यासंदर्भात स्थानिक लोकप्रतिनिधींकडून सातत्याने होत असलेला पाठपुरावा,याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाने प्राधान्याने लक्ष घालून श्री राजराजेश्वर मंदिराला "क" वर्ग दर्जा देण्याबाबत तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया".

## मा. मंत्री, पर्यटन यांचे निवेदन

अकोला महानगरपालिका हद्दीतील श्री राजराजेश्वर मंदिर हे पुरातन स्थळ आहे. दरवर्षी श्रावण महिना आणि महाशिवरात्रीला कावड यात्रेचे आयोजन करण्यात येते. सदर ठिकाणी वर्षभरात अंदाजे ८ लक्ष पेक्षा अधिक भाविक दर्शनाला येत असतात. सदर गर्दी विचारात घेता भाविकांना देण्यात येणाऱ्या मुलभूत सुविधा पुरविणे कठीण असल्याने, तसेच संस्थांनाच्या जागेवर भक्त निवास, पाणी, पोहोच रस्ता आणि आरोग्य इत्यादी सुविधा नसल्यामुळे भाविक-भक्तांना त्रास होतो. सदर बाबी विचारात घेऊन श्री राजराजेश्वर मंदिर परिसर व मोर्णा नदी घाट विकासाचा रु.५१८.६४ कोटीचा आराखडा जिल्हाधिकारी, अकोला यांचेमार्फत तयार करण्यात आला आहे. सदर आराखडयात खालील कामे प्रस्तावित करण्यात आली आहेत:-

| अ.क्र. | प्रस्तावित बाब (कामे) | रक्कम (रुपये कोटीत) |
|---|---|---|
| **१. राजराजेश्वर मंदिर परिसरातील प्रस्तावित कामे** | | |
| १ | सभागृह | ४९.८८ |
| २ | भक्त निवास व इतर सुविधा | १६.०८ |
| ३ | पोहोच रस्ता | ३.७४ |

| | | |
|---|---|---|
| ४ | प्रवेशद्वार | ७.२० |
| ५ | वाहनतळ | ४९.८५ |
| | **२. मोर्णा नदी घाट विकास** | |
| ६ | घाट बांधकाम | १७५.५० |
| ७ | पुलाचे बांधकाम | २८.५८ |
| ८ | इतर बाबी | १८७.८१ |
| | **एकूण** | **५१८.६४** |

१. प्रस्तावित आराखडयामध्ये भक्त निवासाकरीता मंदिराच्या पाठीमागे १५ मजली इमारत प्रस्तावित असून, त्यामध्ये वेधशाळा, मंदीर कार्यालय, एमपी थिएटर, १५० भक्तांची राहण्याची सोय इ. बाबी अंतर्भूत आहेत.

२. मोर्णा नदी घाट व पूल बांधकाम हे पूरनियंत्रण रेषेच्या बाहेर असून, पुरामुळे हानी होणार नसल्याबाबत नगररचना विभाग, अकोला यांनी प्रमाणित केले आहे.

३. आराखडयाची कामे पूर्ण झाल्यानंतर श्री राजराजेश्वर संस्थांन, अकोला यांचेमार्फत देखभाल व दुरुस्ती करण्यात येणार आहे.

०२. उपरोक्त आराखडयाच्या अनुषंगाने नमूद करण्यात येते की, रु.५१८.६४ कोटी इतक्या आराखडयास जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखालील जिल्हास्तरीय कार्यकारी समितीने दि.१२/०८/२०२४ रोजी मान्यता प्रदान केली आहे. तथापि, सदर आराखड्यास पालकमंत्री, अकोला यांच्या अध्यक्षतेखालील जिल्हास्तरीय समितीची मान्यता मिळणेबाबत कार्यवाही सुरु आहे. श्री.राजराजेश्वर संस्थानाला "ब" वर्ग तिथक्षेत्र दर्जा मिळणेबाबतचा प्रस्ताव विभागीय आयुक्त, अमरावती यांनी दि.०३/०७/२०२४ रोजी नगर विकास विभागास सादर केला आहे. याबाबत आवश्यक ती कार्यवाही नगर विकास विभाग करत आहे.

*******

**लक्षवेधी सूचना क्र.२२१९**

महाराष्ट्र विधानसभा सन २०२५ चे प्रथम (अर्थसंकल्पीय) अधिवेशनात श्री.शिवाजी पाटील, मा.विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय नियम १०५ अन्वये उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना क्र.२२१९ पुढीलप्रमाणे आहे :-

"कोल्हापूर जिल्ह्यातील चंदगड मतदारसंघ हा कर्नाटक व गोवा राज्याच्या सीमेला लागून आहे. कर्नाटक व गोवा राज्यातून आपल्या राज्यात कोल्हापूर जिल्ह्यात प्रवेश करतानाचे प्रवेशद्वार आहे. १)चंदगड विधानसभा मतदारसंघ पर्यटनदृष्ट्या खूप महत्त्वाचा भाग आहे. येथेअनेक गडकिल्ले असणे, पारगड, कलानंदीगड, गंधर्वगड, सामानगड, महिपाळगड व इतर असे गडकिल्ले आहेत. यासर्व गडकिल्ल्यांना एक इतिहास आहे. या सर्व गडकिल्ल्यांना जाणारे रस्ते आपण जोडले आणि यागडकिल्ल्यांचे सुशोभिकरण करून येथे पायाभूत सुविधा पुरविल्यास या ठिकाणी मोठ्या प्रमाणात पर्यटकआकर्षित होण्याचीशक्यता नाकारता येतनसणे. २) गडहिंग्लज ता.नेसरी यागावी सरसेनापती प्रतापराव गुजर स्मारक आहे. सरसेनापती प्रतापराव गुजर यांचे खूप मोठे योगदान आपल्या स्वराज्यासाठी आहे.अशा थोर व्यक्तीच्या स्मारकाचे सरकारने विकास करून भावी पिढीस एक आदर्श मिळावा, यासाठी लक्ष दिले पाहिजे. येथील स्मारकास निधी उपलब्ध करून देण्याची आवशक्यता, येथे पर्यटकनिवास, संग्रहालय, इतर पायाभूत सुविधा निर्माण करणे गरजेचे असणे, इतिहास लाभलेल्या याभूमीचा विकास करणे आणि यातून आपल्या युवा पिढीने प्रेरणा घेणे हे आपले सर्वांचे कर्तव्य असणे. ३) चंदगड तालुक्यातील तिलारीधरण, स्वप्नवेल धबधबा, राहतोबा व इतर अनेक ठिकाणे निसर्गाने नटलेली आहेत. याभागातील या निसर्गाने नटलेल्या पर्यटन स्थळांचा आपण विकास केल्यास याठिकाणी मोठ्याप्रमाणात पर्यटक येतील.याठिकाणी आवश्यक त्यापायाभूतसुविधा निर्माणकरणे गरजेचे असणे. ४) सर्व पर्यटन स्थळांच्या विकास केल्यास येथील स्थानिक नागरिकांना मोठ्या प्रमाणात रोजगार उपलब्ध होईल. तसेच, शासनालाही महसूल मिळेल शासनाने यावर करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

## मा. मंत्री, पर्यटन यांचे निवेदन

कोल्हापूर जिल्हयातील चंदगड हा एक दुर्गम आणि डोंगराळ व निसर्ग संपन्नतेने नटलेला तालुका आहे. चंदगड तालुक्यामधील पारगड, कलानिधीगड हे किल्ले वनक्षेत्रात असून, पारगड हा इतिहास प्रसिध्द किल्ला छत्रपती शिवाजी महाराज यांनी निर्माण केला आहे. पारगड व कलानिधीगड हया चंदगड तालुक्यातील किल्ल्यांचे ऐतिहासिक आणि पुरातत्वीय महत्व लक्षात घेऊन, त्यांना राज्य संरक्षित स्मारक घोषित करण्याची कार्यवाही पुरातत्व व वस्तुसंग्रहालये विभागाकडून करण्यात येत आहे. पारगड किल्ला या स्मारकाचे सर्वांगीण विकास करण्यासाठी स्थळ व्यवस्थापन आराखडा तयार करण्यात येत असून, सदर आराखडयामध्ये स्मारकाचे जतन व संवर्धन आणि पर्यटक उपयुक्त सुविधा पुरविणे याबाबींचा समावेश आहे. गंधर्वगड किल्ला आणि महिपाळगड किल्ला ही स्मारके सद्य:स्थितीत असंरक्षित आहेत.

सरसेनापती प्रतापराव गुजर यांचे नेसरी येथील समाधीस्थळ सद्य:स्थितीत असंरक्षित स्मारक असून, हे स्मारक आधुनिककालीन आहे. सदरहू स्मारकाकरीता १७ गुंठे एवढया क्षेत्रफळाच्या परिसरात संरक्षण भिंत व

स्तंभ उभारण्यात येऊन, उद्यान तयार करण्यात आले आहे. या स्मारकाची देखरेख ग्रामपंचायत कांदळेवाडी ऊर्फ कुपे यांच्याकडून करण्यात येत असून, स्मारकासाठी ग्रामपंचायत यांच्याकडून पहारेकऱ्याची नेमणूक करण्यात आली आहे.

गडहिंग्लज तालुक्यामधील सामानगड किल्ला महाराष्ट्र वन विभागाच्या अखत्यारित असून, सदर किल्ल्याचा विकास, देखभाल व दुरुस्ती महाराष्ट्र वनविकास मंडळ यांचेकडून करण्यात येते.

तिलारीनगर परिसर निसर्ग पर्यटन अंतर्गत विकास करण्यासाठी कोल्हापूर वन विभागाकडून रु.९३५.०० लक्ष इतक्या रकमेचा निसर्ग पर्यटन आराखडा तयार करण्यात आलेला असून, त्यास महाराष्ट्र निसर्ग पर्यटन मंडळाकडून मंजूरी घेण्यात आलेली आहे. सदर पर्यटन विकास आराखड्यानुसार तिलारीनगर परिसरातील रायतोबा पॉईंट, लष्कर पॉईंट, तिलांरी धबधबा, पॉप्युलर धबधबा, स्वप्नवेल पॉईंट याठिकाणी आकर्षक कमान करणे, रस्ता बळकटीकरण करणे, आवश्यक ठिकाणी रैलिंग व पायरी टप्पे करणे, पर्यटकांसाठी view point तयार करणे, बसण्याची व्यवस्था करणे, निसर्ग माहितीपर फलक लावणे, पॅगोडा उभारणे, तिकिट घर, माहिती केंद्र उभारणे, वन्य प्राण्यांचे आकर्षक पुतळे उभारणे, पर्यटकांसाठी डॉर्मेटरी उभारणे, स्वच्छतागृह, पिण्याचे पाण्याची सोय, इ. विविध कामे प्रस्तावित आहेत.

तिलारीनगर परिसरातील विविध ठिकाणास पर्यटक मोठया प्रमाणात भेट देत असतात. पर्यटकांना सोयीसुविधा उपलब्ध करुन दिल्याने स्थानिकांना रोजगार उत्पन्न होणार आहे. कोल्हापूर जिल्हयातील चंदगड परिसरातील एकात्मिक स्थळांचा पर्यटन विकास आराखडा शासनास प्राप्त झाल्यानंतर पुढील योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.

************

सन २०२५ चे प्रथम (अर्थसंकल्पीय अधिवेशन)

लक्षवेधी सूचना क्र. २०८८

श्री.शंकर मांडेकर वि.स.स., यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे :-

"पुणे जिल्ह्यातील भोर तालुक्यातील रायरेश्वर येथे छत्रपती शिवाजी महाराजांनी हिंदवी स्वराज्याची शपथ चैत्रशुध्द सप्तमी १६४५ रोजी आपल्या सवंगड्यासह शपथ घेण्यात आलेली असणे, सदर जमिनीची जागा भोर संस्थान पंतसचिवराजे यांनी रायरेश्वर डोंगरी विकास परिषद तर्फे संस्थेच्या नावे जमीन अवघ्या नाममात्र दहा रुपये व फी फक्त पाच रुपयात बक्षीस पत्र करुन घेण्यात येणे. या पाठीमागे भोर संस्थानचा एक प्रामाणिक हेतू होता की, रायरेश्वर हे पवित्र ठिकाणचे संवर्धन व जतन व सर्वांगीण विकास व्हावा, परंतु संबंधित मंदिर व परिसर आजपर्यंत तसाच आहे. या जागेचा सर्वांगीण विकासात झाला नाही, ही पवित्र जागा महाराष्ट्र शासनाच्या नावे वर्ग करावी, अशी सर्व शिवप्रेमीची मागणी असणे ही जागा अद्यापही रायरेश्वर डोंगरी परिषदेच्या नावावर ताब्यात असणे त्यामुळे या परिसराचा विकास करण्यासाठी शासकीय निधी मिळत नसणे, आणि रायरेश्वर डोंगरी परिषद स्वनिधीतून विकास करत नसणे, याचा सर्वांगीण विकास होण्यासाठी खाजगी संस्थेच्या नावाचा मोठा अडथळा असणे तो अडथळा दूर करण्यास व विकासाला गती मिळण्यास जमीन राज्य शासनाने ताब्यात घ्यावी परिणामी शासनाने रायरेश्वर परिसरात शासनाच्या ताब्यात घेण्याची निर्माण झालेली गरज व त्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना"

## मा.मंत्री, सांस्कृतिक कार्य यांचे निवेदन

रायरेश्वर मंदिर, ता.भोर, जि.पुणे या ठिकाणी छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्याची शपथ घेतली. रायरेश्वर मंदिर व परिसर हा भाग असंरक्षित स्मारक आहे. सदर स्मारकाचे क्षेत्र १९ x ७ मीटर एवढे असून, सभोवतालच्या परिसराचे क्षेत्रफळ १७ x १८ मीटर इतके आहे.

रायरेश्वर मंदिराचे ऐतिहासिक महत्त्व लक्षात घेता सन २०२३-२४ साली जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) अंतर्गत जिल्हा नियोजन समिती, पुणे यांचे कार्यालयाकडून प्राप्त झालेल्या निधीतून पुरातत्व व वस्तुसंग्रहालये संचालनालय, मुंबई यांचे अधिनस्त असलेल्या पुणे विभागीय कार्यालयाकडून सदरहू स्मारकाच्या जतन व दुरुस्ती करीता रु.१,०७,५०,६६७/- इतका निधी मंजूर झाला आहे. सदर जतन व दुरुस्तीचे काम अंतिम टप्प्यात असून माहे मार्च, २०२५ पर्यंत रु.८५,६९,५१५/- इतक्या रकमेचे काम पूर्ण होत आहे. यामध्ये मंदिराची संरक्षण भिंत बांधणे, दगडी फरशी बसविणे, वॉटर प्रुफिंग करणे, लाकडी मुखमंडप बांधणे व इतर अनुषंगिक कामांचा समावेश आहे.

रायरेश्वर मंदिर या जागेचे भोगवटदार म्हणून श्री. अनंत नारायण थोपटे, अध्यक्ष- रायरेश्वर डोंगरी विकास परिषद यांची नोंद असल्याचे आढळून आले आहे. रायरेश्वर मंदिर हे राज्य संरक्षित स्मारक घोषित करण्यासाठी सदरहू स्थळाचे भूसंपादन स्थानिक जिल्हा प्रशासनाच्या समन्वयाने करण्यात येईल.

मोरा म/१५२१ (७५०-३-२५)

--- x o x ---

## लक्षवेधी सूचना क्रमांक २१५५

### महाराष्ट्र विधानसभा

### सन २०२५ चे प्रथम (अर्थसंकल्पीय) अधिवेशन

**श्री.अमोल खताळ, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधासनसभा नियम १०५ अन्वये उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना क्रमांक २१५५ खालीलप्रमाणे आहे :-**

"संगमनेर नगरपालिका हद्दीतील मोक्याच्या ठिकाणी असलेली सर्वे नंबर १४९,जुना सर्वे नंबर ८०३, क्षेत्र ४ एकर १७ गुंठे ही मिळकत अलीकडेच वक्फ मंडळाने वक्फ कायदा कलम ४०, ४१ अंतर्गत वक्फ मिळकत म्हणून घोषित केलेली असणे, फेर. नंबर ४३७ ने दादामिया ताजमहंमद उर्फ बनेमियाचे नावे मालकीची नोंद असलेल्या मिळकतीशी संबंधित खरेदीखतामध्ये कुठेही सदर मिळकत मस्जिद अथवा पीर ईनाम असल्याबाबत नोंद नसणे, संरक्षित कूळ असलेल्या शंकर गजाबा ताजणे यांनी कूळ कायदा अंतर्गत केस चालून सदर मिळकत खरेदी केलेली असणे, पुढे बिगर शेती झाल्यानंतर अनेक हिंदू नागरिकांनी खरेदी करून दुकाने, कार्यालय, राहती घरे बांधलेली असणे, तत्पश्चात वक्फ चे हत्यार वापरुन सदर मिळकत ताब्यात घेण्याचे इराद्याने २२५ चौरसफुटा करिता दिनांक २६.१२.२०१८ रोजी फकरुल्ला शहा दर्गा पीर नावाने नोंदविला जाणे, सन २०१९ मध्ये नव्याने चौकशीच्या नोटीसा देऊन सर्वे नंबर ८०३ पैकी ४ एकर १७ गुंठे क्षेत्र वक्फ मिळकत म्हणून घोषित करणे, त्यामुळे धार्मिक तणाव निर्माण होऊन कायदा- सुव्यवस्थेची परिस्थिती बिघडण्याची दाट शक्यता असल्याने दान देणारा आणि दान स्वीकारणारा, दोन्ही घटक मुस्लिम असल्याशिवाय वक्फ निर्माण होत नसताना देखील उक्त मिळकतीवर केलेला दावा खारीज करण्याची आवश्यकता याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही आणि उपाय योजना"

## श्री.दत्तात्रय भरणे, मा.मंत्री (अल्पसंख्याक विकास) यांचे निवेदन :-

अहिल्यानगर जिल्हयातील संगमनेर नगरपालिकेच्या हद्दीत असलेली मुस्लीम समाज दर्गाह पीर हजरत फक्रुल्लाह शाह उर्फ बारामासी ही दर्गाह तसेच सर्वे क्रमांक १४९ (एकूण क्षेत्र ४ एकर १७ गुंठे) या मालमत्तेची नोंदणी करणेबाबत सन २०१२ मध्ये महाराष्ट्र महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाकडे अर्ज प्राप्त झाला होता. उपलब्ध कागदपत्रे व वक्फअधिनियमातीलतरतुदीनुसार वक्फ मंडळाने दि.२६.१२.२०१८ रोजी दर्गाहच्या एकूण क्षेत्र २२५ चौरस फूट इतक्या जागेची वक्फ म्हणून नोंदणी केली.

तद्नंतर संगमनेर गट नं.१४९ (जुना सर्वे क्र.८०३) मधील संपूर्ण ४ एकर १७ गुंठे इतकी मालमत्ता वक्फ संस्थेच्या नावे लावण्याबाबत दि.२१.०१.२०१९ आणि दि.२७.०१.२०२१ रोजी वक्फ मंडळाकडे प्राप्त झालेल्या अर्जाबाबत उपलब्ध अभिलेख, तत्कालीन प्रादेशिक वक्फ अधिकारी यांचा अहवाल या सर्व बाबी विचारातघेऊन संगमनेर येथील गट क्र.१४९ (जुना सर्वे क्र.८०३) मधील ४.१७ एकर ही मिळकत वक्फ अधिनियम,१९९५ मधील कलम ४० अन्वये वक्फ मिळकत म्हणून घोषित करण्यात येत असल्याचा ठराव वक्फ मंडळाने दि.११.१२.२०२२ रोजी वक्फ मंडळाच्या बैठकीत पारित केला. त्यानुसार सदर मिळकत वक्फ असल्याबाबतचे आदेश वक्फ मंडळामार्फत दि.३१.०१.२०२३ रोजी पारित करण्यात आले.

वक्फ अधिनियम,१९९५ मधील कलम ४० येथील तरतूदीनुसार एखादी मालमत्ता वक्फ आहे किंवा कसे हे ठरविण्याचे अधिकार वक्फ मंडळास आहेत. यासंदर्भात प्राप्त अर्जांची चौकशी करुन निर्णय घेण्याची जबाबदारी वक्फ मंडळावर असते. त्यानुसार सदर आदेश पारित करण्यात आलेले आहेत. वक्फ मंडळाने पारित केलेल्या आदेशाने समाधान न झाल्यास सदर आदेशाविरुध्द महाराष्ट्र राज्य वक्फ न्यायाधिकरणामध्ये दाद मागण्याची तरतूद आहे.

प्रस्तुत प्रकरणी महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाने पारित केलेल्या आदेशास संबंधितांनी महाराष्ट्र राज्य वक्फ न्यायाधिकरणात आव्हान दिले असून सद्य:स्थितीत सदर प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.

--:=oooOOOOOooo=:-

लक्षवेधी सूचना क्र. १५५५

सन २०२५ चे प्रथम (अर्थसंकल्पिय) अधिवेशन

श्री. उत्तमराव जानकर, विधानसभा सदस्य यांनी उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना क्र. १५५५ सूचना पुढीलप्रमाणे आहे-

"खेड (जि. पुणे) पंचायत समितीच्या एकात्मिक बाल विकास सेवा योजनेंतर्गत तालुक्यात जवळपास पाचशेच्या वर अंगणवाड्या असून अंगणवाडीतील चिमुकल्या मुलांना पोषण आहार दोन महिन्यांनी दिला जात असणे, देशमुखवाडी येथील अंगणवाडीतून सुतार समाजातील मुलांच्या पालकांना देण्यात आलेल्या पोषण आहार सामग्रीची मुदत (एक्सपायरी) दिनांक संपलेली असल्याची धक्कादायक घटना दि. ५ फेब्रुवारी, २०२५ रोजी उघडकीस आली असणे, त्यामुळे एकात्मिक बाल विकास सेवा योजना कार्यालयाचा कारभार भोंगळ सुरू असल्याचे निदर्शनास येणे, अंगणवाडीतील दक्ष देविदास भालेराव या चिमुकल्या मुलांच्या पालकांना चनाडाळ, मुगडाळ, हळद पावडर व अन्य वस्तू या मुदत संपलेल्या दिल्या असल्याचे निदर्शनास येणे, अंगणवाडीतील मुलांना मुदत संपलेला पोषण आहार देत असल्यामुळे मुलांच्या जीविताला धोका निर्माण झाला असल्याने पालक वर्गात चिंता व्यक्त होत असणे, याप्रकरणी पालकांनी व स्थानिक लोकप्रतिनिधींनी शासनाकडे तक्रार केली असणे, याबाबत शासनाने तात्काळ संबंधित दोषींवर कारवाई करुन अंगणवाडीतील मुलांना चांगल्या प्रतीचा पोषण आहार देण्याबाबत तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना "

मा. मंत्री, महिला व बाल विकास यांचे निवेदन

एकात्मिक बाल विकास सेवा योजने अंतर्गत ६ महिने ते ३ वर्ष वयोगटातील बालकांना घरपोच आहार (THR) देण्यात येतो. खेड तालुक्यातील खेड-२ प्रकल्पांतर्गत ग्रामपंचायत देशमुखवाडी अंगणवाडी केंद्रांतर्गत दिनांक ५ फेब्रुवारी, २०२५ रोजी मुदतबाह्य (एक्सपायरी) झालेला पोषण आहार देण्यात आलेला नाही.

तथापि, माहे जुलै २०२४ मध्ये ग्रामपंचायत देशमुखवाडी अंगणवाडी केंद्रांतर्गत दक्ष देविदास भालेराव या बालकाच्या पालकाला देण्यात आलेला आहार मुदतबाह्य असल्याचे उघडकीस आले होते. श्री. देविदास भालेराव यांनी अंगणवाडी सेविका यांच्याकडे त्यांच्या बालकासाठीच्या घरपोच आहाराची मागणी केली होती. त्यानुषंगाने अंगणवाडी सेविका यांनी आधार व्हेरिफिकेशन अनिवार्य झाले असल्याने आपण आधार क्रमांकासाठी आधार कार्ड सादर करावे अशा सूचना केल्या होत्या. यापूर्वी वडिलांच्या आधार कार्डवर आहार देण्यात येत होता त्याप्रमाणे यावेळी देखील अंगणवाडी सेविकेने वडिलांच्या आधार कार्डवर आहार देण्याची तयारी दर्शविली. त्यानुसार त्यांनी आहार ताब्यात घेतला व सहीदेखील केली. तदनंतर बालकाचे आधारकार्ड आल्यावरच आहार घेऊन जाऊ असे सांगून तो आहार अंगणवाडी केंद्रातच शिल्लक ठेवला होता. गावातील उर्वरित सर्व लाभार्थ्यांना नियमितपणे आहाराचे वाटप केलेले होते. त्यानंतर ४ महिन्याच्या कालावधीनंतर श्री. भालेराव यांनी अंगणवाडी केंद्रामध्ये जाऊन बालकाचे आधार कार्ड प्रत्यक्ष सादर करून आहाराची मागणी केली. त्या दिवशी अंगणवाडी सेविका रजेवर असल्याने अंगणवाडी मदतनीस यांच्याकडून त्यांनी चालू महिन्याचा आहार ताब्यात घेऊन तसेच मागील शिल्लक आहार स्वतः घेतला व सदर आहाराची मुदत संपलेली असल्याचे त्यांनी प्रसार माध्यमाकडे माहिती दिली. मात्र त्यावेळी गावातील कोणत्याही लाभार्थ्यांना मुदतबाह्य पोषण आहार देण्यात आलेला नव्हता. श्री. देविदास भालेराव यांनी अंगणवाडी सेविका रजेवर असताना मदतनीस यांच्याकडून स्वतः शिल्लक आहार प्राप्त करून प्रसार माध्यमांमध्ये माहिती दिली होती. या संदर्भात संबंधित बाल विकास प्रकल्प अधिकारी यांच्यामार्फत अंगणवाडी सेविका व मदतनीस यांना कारणे दाखवा नोटीस बजावून त्यांच्याकडून खुलासा घेण्यात आलेला आहे. तसेच, सदर आहाराच्या अनुषंगाने श्री. देविदास भालेराव यांच्या तक्रारीचे ग्रामपंचायत स्तरावर निवारण केलेले होते.

...............

(रोटा) उच/००८६-१(७५०-०५-२०२५)

लक्षवेधी सूचना क्र. २०९२

सन २०२५ चे प्रथम (अर्थसंकल्पिय) अधिवेशन

**श्री. उत्तमराव जानकर, विधानसभा सदस्य यांनी उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना क्र. २०९२ पुढीलप्रमाणे आहे-**

"माळशिरस (जि. सोलापूर) तालुक्यासह राज्यातील सर्वच पंचायत समितीच्या एकात्मिक बाल विकास सेवा योजनेतर्गत तालुक्यात अंगणवाड्या असून अंगणवाडीतील चिमुकल्या मुलांना पोषण आहार दोन महिन्यांनी दिला जात असणे. माळशिरस तालुक्यातील अंगणवाडीतून मुलाच्या पालकांना देण्यात आलेल्या पोषण आहार सामग्रीची मुदत (एक्सपायरी) दिनांक संपलेली असल्याची धक्कादायक घटना दि. ५ फेब्रुवारी, २०२५ रोजी उघडकीस आली असणे, त्यामुळे एकात्मिक बाल विकास सेवा योजना कार्यालयाचा कारभार भोंगळ सुरु असल्याचे निदर्शनास येणे, अंगणवाडीतील चिमुकल्या मुलांच्या पालकांना चनाडाळ, मुगडाळ, हळद पावडर व अन्य वस्तू या मुदत संपलेल्या दिल्या असल्याचे निदर्शनास येणे, अंगणवाडीतील मुलांना मुदत संपलेला पोषण आहार देत असल्यामुळे मुलांच्या जीविताला धोका निर्माण झाला असल्याने पालक वर्गात चिंता व्यक्त होत असणे, याप्रकरणी पालकांनी व स्थानिक लोकप्रतिनिधींनी शासनाकडे तक्रार केली असणे, तसेच मुदतबाह्य पोषण आहार वाटप करणाऱ्या कंपनीवर कठोर कारवाई करुन त्यांची निविदा तात्काळ रद्द करुन त्यांना काळ्या यादीत टाकण्याची जनतेकडून मागणी होत असणे, याबाबत शासनाने तात्काळ संबंधित दोषींवर कारवाई करुन अंगणवाडीतील मुलांना चांगल्या प्रतीचा पोषण आहार देण्याबाबत तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

मा. मंत्री, महिला व बाल विकास यांचे निवेदन

एकात्मिक बाल विकास सेवा योजनेअंतर्गत ६ महिने ते ३ वर्षे वयोगटातील बालके, गरोदर महिला, स्तनदा मातांना घरपोच आहाराचा पुरवठा करण्यात येतो तसेच ३ ते ६ वर्षे वयोगटातील बालकांना गरम ताजा आहाराचा पुरवठा करण्यात येतो. सोलापूर जिल्हयातील माळशिरस तालुक्यातील अंगणवाडी केंद्रांमध्ये लाभार्थ्यांच्या पालकांना चनाडाळ, मुगडाळ, हळद पावडर व अन्य वस्तूंचा मुदतबाहय पुरवठा झालेला नाही. माहे जानेवारी २०२५ ते फेब्रुवारी २०२५ या कालावधीचा घरपोच आहाराचा पुरवठा केलेला आहे आणि या पुरवठ्यामध्ये पुरवठाधारकाने ३० अंगणवाडी केंद्रांना मुदतबाहय झालेल्या घरपोच आहाराचे वाटप केले होते. परंतु अंगणवाडी सेविकेने लाभार्थ्यांना या मुदतबाहय घरपोच आहाराचे वितरण केलेले नाही. सदर मुदतबाह्य झालेला घरपोच आहार पुरवठाधारकास परत करुन पुरवठाधारकाकडून विहित मुदतीतील आहार मागविण्यात आला व विहित मुदतीतील आहाराचे वाटप लाभार्थ्यांना केलेले आहे. या सर्व प्रकियेमध्ये आहार पुरवठ्यास विलंब झाल्याने पुरवठाधारकाकडून दंड वसुल करण्यात आलेला आहे. तसेच, यापुढे असे मुदतबाह्य घरपोच आहाराचा पुरवठा करण्यात येऊ नये अशा सक्त सूचना संबंधित पुरवठाधारकास देण्यात आलेल्या आहेत.

........ .....

रोरा H/0083(750-5-25)

# महाराष्ट्र विधानसभा

## सन २०२५ चे पहिले अर्थसंकल्पीय अधिवेशन
## लक्षवेधी सूचना क्र. ४२२

**श्री. भास्कर जाधव, मा.विधानसभा सदस्य यांनी विधानसभा नियम-१०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्र.४२२ पुढीलप्रमाणे आहे :-**

"मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गावरील परशुराम घाटात रस्त्याच्या संरक्षणासाठी नव्याने बांधण्यात आलेली 200 मीटरची संरक्षक भिंत पहिल्याच पावसात भरावासह कोसळल्याची घटना दि. 21 जून 2024 रोजी घडणे, परिणामी मुख्य रस्त्यालाही तडे जावून वाहतुकीला निर्माण झालेला धोका, घाटाच्या पायथ्याशी असलेल्या पेढे, ता. चिपळूण या गावातील रहिवाशांच्या जिविताचा निर्माण झालेला प्रश्न, तीन-चार वर्षात सातत्याने दरडी व मोठमोठे दगड खाली येवून घडलेल्या दुर्घटनांमुळे त्यांच्यावर जीव मुठीत धरून राहण्याची आलेली वेळ, प्रत्यक्ष पाहणीनंतर बांधण्यात आलेली संरक्षक भिंत अत्यंत तकलादू आणि त्यामध्ये मातीचा भराव करून पृष्ठभागावर दगड लावण्यात आल्याचे समोर येणे, अत्यंत निकृष्ट दर्जाच्या केलेल्या कामामुळे सदर घटना घडल्याचे स्पष्ट होणे, घाटात दरवर्षी दुर्घटना घडूनही ठेकेदार कंपनीसह संबंधित अभियंते व अधिकाऱ्यांवर कोणतीही कारवाई न होणे, चुकीच्या उत्खननामुळे परशुराम गावातील लोकवस्तीला निर्माण झालेल्या धोक्याबाबत अदयाप कोणतीही कार्यवाही न होणे, त्यामुळे पेढे व परशुराम दोन्ही गावांतील नागरिकांत असलेली संतापाची भावना, गेल्या 12-13 वर्षांपासून रखडलेल्या महामार्गाचे काम पूर्ण करण्याबाबत शासनाकडून देण्यात आलेली खोटी आश्वासने, रखडलेल्या कामामुळे अपघात होवून हजारो निष्पाप नागरिकांचे नाहक गेलेले प्राण, या संपूर्ण प्रकाराची सखोल चौकशी होवून संबंधितांवर कठोर कारवाईची होणारी मागणी, यावर शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

**<u>मा. मंत्री, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) यांचे निवेदन.</u>**

मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्ग क्र. ६६ ची महाराष्ट्र राज्यातील कि.मी. ०/००० (पळस्पे) ते कि.मी. ४७१/३०० (पात्रादेवी) अशी एकूण ४७१.३०० कि.मी. लांबी आहे. सदर लांबीपैकी कि.मी. ००/००० (पळस्पे) ते कि.मी. ८४/००० (इंदापूर) या ८४ कि.मी. या लांबीतील चौपदरीकरणाचे काम भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण (NHAI) यांचेमार्फत प्रगतीपथावर आहे. तसेच इंदापूर (किमी ८४/०००) ते झाराप (किमी ४५०/१७०) या लांबीतील चौपदरीकरणाचे काम सार्वजनिक बांधकाम विभागाच्या राष्ट्रीय महामार्ग विभागामार्फत प्रगतीत आहे.

कि.मी. १६१/ ६०० (कशेडी) ते कि.मी. २०५/४०० (परशुराम घाट) या ४२.४३८ कि.मी. लांबीतील चौपदरीकरणाचे काम हायब्रीड अॅन्युईटी (HAM) तत्वावर माहे जुलै २०१६ मध्ये मे. कल्याण टोलवेज यांना देण्यात आलेले आहे. सदर कामावर देखरेख करणे, तांत्रिक बाबी तपासणे व देयके अदा करणे इत्यादी कामे करण्यासाठी केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्रालय ( MoRTH) मार्फत मे. ब्लुम कंपनी यांची स्वतंत्र अभियंता म्हणून नियुक्ती केलेली आहे.

परशुराम घाटातील डोंगर भागातील माती ही दगड मिश्रीत असल्यामुळे तिचा धर कमी आहे. सदर ठिकाणी गावे वसलेली असल्यामुळे ब्लास्टींग करुन रस्त्यासाठी खोदकाम करता येणे शक्य नसल्याने या घाटामध्ये वाहतूक बंद ठेवून डोंगर भागात सुरक्षितपणे रस्त्याचे काम करण्यात आले आहे.

[क्रमशः]

रोमा H/1401 (750-3-25)

कोकण विभागामध्ये मान्सून कालावधीमध्ये सर्व साधारणपणे सुमारे ४००० ते ४५०० मि.मी. एकूण पाऊस पडतो. सदर महामार्ग घाट मार्गातून असल्याने पावसाळयादरम्यान अतिवृष्टीमुळे दरडी कोसळण्याच्या व नैसर्गिक आपत्ती येण्याच्या घटना वारंवार घडत असतात.

दिनांक २२ जुलै व २३ जुलै ,२०२१ रोजी चिपळूण तालुक्यात आलेल्या महापुराच्या वेळी परशुराम घाटामध्ये अतिवृष्टी व नैसर्गिक आपत्तीमुळे घाटाच्या दरीकडील भागामध्ये असलेल्या पेढे- कुंभारवाडी येथील घरांवर दरड कोसळून ३ जणांचा दुर्दैवी मृत्यु झाला होता. यामध्ये पेढे गावातील काही घरांचे नुकसान देखील झाले होते. यानंतर पूरहानी दुरुस्तीच्या माध्यमातून दरड कोसळलेल्या ठिकाणी संरक्षक भिंत उभारण्यात आली आहे. माहे जुलै २०२१ नंतर परशुराम घाटातील काही भागात छोट्या मोठ्या प्रमाणात दरडी कोसळण्याच्या घटना घडलेल्या आहेत. परंतु त्यामुळे स्थानिक ग्रामस्थांच्या घरांना कुठलेही नुकसान झाल्याचे निदर्शनास आले नाही. तसेच महामार्ग देखील वाहतूकीसाठी त्वरित खुला करण्यात आला आहे.

दिनांक २१ जून, २०२४ रोजी परशुराम घाटामध्ये झालेल्या सततच्या पावसामुळे व भुस्खलनामुळे दरीकडील बाजूस बांधण्यात आलेल्या लांबी पैकी सुमारे ४० मी. लांबीतील संरक्षक भिंत कोसळली. तहसील कार्यालय, चिपळूण येथील अभिलेखानुसार सदर दिवशी या घाट परिसरात सुमारे १४० मि.मी. पाऊस पडल्याची नोंद आहे. या अतिवृष्टीमुळे पावसाच्या पाण्याच्या निचरा संरक्षक भिंतीमध्ये देण्यात आलेल्या वीप होल्स मधून न झाल्याने पाण्याच्या अतिरिक्त दाबामुळे संरक्षक भिंत कोसळल्याचे प्रथमदर्शनी दिसून आले आहे.

त्यानंतर दि. १६ ऑक्टोबर २०२४ रोजी परशुराम घाटात झालेल्या सततच्या पावसामुळे आणि भूस्खलनामुळे सुमारे ३० मीटर लांबीतील संरक्षक भिंत कोसळली. सदर दोन्ही कोसळलेल्या संरक्षक भिंती नव्याने बांधण्याचे काम संबंधित चौपदरीकरणाचे कंत्राटदार मे. कल्याण टोलवेज यांचे मार्फत सुरु करण्यात आले आहे. सदर काम HAM तत्वावर असल्याने करारनाम्यानुसार कामाची देखभाल दुरुस्ती १५ वर्षासाठी कंत्राटदारामार्फत करण्यात येते. त्यामुळे नव्याने करण्यात येणाऱ्या कामासाठी करारनाम्यानुसार कोणताही अतिरीक्त देयक कंत्राटदारास अदा करण्यात येत नाही. करारनाम्यातील तरतुदीनुसार संरक्षक भिंतीची संकल्पचित्रे कंत्राटदारामार्फत तयार करण्यात आली असून या प्रकल्पासाठी नियुक्त स्वंतत्र अभियंता मे. ब्लुम कंपनी यांचेमार्फत तपासण्यात आलेली आहेत.

परशुराम घाटातील दरडप्रवण क्षेत्रातील दरड कोसळण्याच्या प्रसंगांना आळा घालण्यासाठी सुरक्षिततेच्या दृष्टीने आवश्यक उपाययोजना करण्यासाठी केंद्र शासनामार्फत टेहरी हायड्रो डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन लिमिटेड या संस्थेकडून सर्वेक्षण पूर्ण करण्यात आले असून त्याचा डीपीआर तयार करण्यात आला आहे. त्यानुसार सदर कामाची निविदा प्रक्रिया पूर्ण होऊन सदर काम प्रगतीत आहे. सदर काम पूर्ण झाल्यावर परशुराम घाटभागातील दरड कोसळण्याचे प्रमाण कमी करण्याचा शासनाचा प्रयत्न आहे.

भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण (NHAI) यांचे मार्फत प्रगतीपथावर असलेल्या ८४ कि.मी. लांबीपैकी सद्यस्थितीत ७४.८०० कि.मी. लांबीतील कॉक्रिटीकरणाचे काम पूर्ण झाले असून उर्वरित काम डिसेंबर- २०२५ पर्यत पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत प्रगतीत असलेल्या एकूण ३५५.२८० कि.मी. लांबीपैकी ३२४.६५० कि.मी. लांबीतील काम पूर्ण झालेले आहे. उर्वरित लांबीतील चौपदरीकरणाचे काम मोठे पुल/उड्डाणपूल वगळता जून-२०२५ पर्यत पूर्ण करण्याचे नियोजन असून बायपास व उड्डाणपूलांसहित रस्त्याचे काम जानेवारी-२०२६ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन आहे. चौपदरीकरणानंतर अपघाताचे प्रमाण कमी झाल्याचे आढळून आले आहे.

***********************

## महाराष्ट्र विधानसभा
## सन २०२५ चे पहिले (अर्थसंकल्पीय) अधिवेशन

**लक्षवेधी सूचना क्र. ५१२**

**श्री. रईस शेख, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना :-**

"भिवंडी शहराची लोकसंख्या सध्या १७ लाखाच्या वर असून याठिकाणी अनेक कंपन्या, छोटेमोठे उद्योग धंदे सुरु असणे, शहरातील वाहतुकीची वरदळ मोठ्या प्रमाणात असल्याने त्याठिकाणी समस्या दिवसेंदिवस वाढत असल्याने उद्योजकांना, स्थानिकांना, विद्यार्थ्यांना अत्यंत नाहक त्रास सहन करावा लागत असूनही प्रशासनाकडून कोणतीही दखल घेण्यात न येणे, सद्य:स्थितीत जव्हार / पालघर येथून वाडामार्गे येणारी वाहने NH-८४८/SH-३५ नाशिकएक्स्प्रेसवे NH-१६० च्या दिशेने भिवंडी शहरातून प्रवास करावा लागत असणे, भिवंडी वाडा रोड SH३५ वरुन येणाऱ्या वाहनांना अंबाडी नाक्यावरुन प्रवास करावा लागत असणे तसेच नाशिक महामार्गाकडे जाण्यासाठी वंजारपट्टीनाका म्हणजेच नाशिक रोडवरुन भिवंडी शहरातून प्रवास करावा लागत असणे, भिवंडी शहरातून ये-जा अवजड वाहनांमुळे मोठया प्रमाणात वाहतूक कोंडीला सामोरे जावे लागणे, त्यामुळे भिवंडी वाडा रस्त्यावरुन येणारी वाहने ही अवजड मालवाहू वाहने ये-जा करत असल्याने, रस्त्याची दुरावस्था होणे, वायू व ध्वनी प्रदूषणात मोठ्या प्रमाणात वाढ होवून स्थानिकांना नाहक त्रास सहन करावा लागत असणे, भिवंडीतील विश्वभारती फाटा ते वडपा जंक्शन, स्टेट हायवे-७६ ते स्टेट हायवे ८४ भिनार ते निंबवली असे ७.७०० कि.मी. लांबीचे क्षेत्रफळाच्या भिवंडी बायपास महामार्गाचे काम सा बां विभागामार्फत प्रस्तावित असून सद्य:स्थितीत रस्त्याचे काम अपूर्ण असणे, सदर रस्ता समृध्दी महामार्गाला सुध्दा जोडला जाणार असणे, सदर प्रस्तावित रस्त्याच्या कामामुळे भिवंडी शहराची वाहतूक कोंडी समस्या कमी होणे, आर्थिक भूर्दंड कमी होण्यास मदत होणे, सदर बायपास रस्ता उपलब्ध झाल्यास वाहनांची वाहतूक शहराबाहेरुन होण्यास मदत होणार असल्याने भिवंडीचे वि.स.स. यांनी दिनांक १७/०३/२०२३ रोजी निवेदनादवारे मागणी केलेली असणे, अद्यापी सदरहू बायपासचे काम प्रलंबित असल्याने शासनाविरुध्द स्थानिकांमध्ये प्रचंड नाराजी व असंतोषाची भावना निर्माण झालेली असणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

### मा. मंत्री (सा.बां.) यांचे निवेदन

मनोर-वाडा-भिवंडी या विश्वभारती फाटा ते वडपा जंक्शन बाहय वळण हा दुपदरी रस्त्याचे चौपदरीकरण प्रकल्प खाजगीकरणा अंतर्गत "बांधा, वापरा व हस्तांतरीत करा" या तत्वावर राबविण्यात आला होता. प्रकल्पाचे उद्योजक रस्ता देखभाल दुरुस्तीस असमर्थ ठरल्यामुळे, सदर रस्ता सुस्थितीत ठेवण्याबाबत स्थानिक प्रतिनिधी, राजकिय व सामाजिक संघटना, स्थानिक जनता यांच्याकडून प्राप्त तक्रारी व आंदोलने यामुळे शासन पत्र, दि. ११/१०/२०१९ अन्वये उद्योजका समवेत केलेला करारनामा संपुष्टात आणण्यात आला असून, पथकर वसूली बंद करण्यात आली आहे. तद्नंतर सदर रस्त्याची देखभाल दुरुस्ती सार्वजनिक बांधकाम विभागाकडून करण्यात येत आहे. सदर रस्ता नादुरुस्त असल्याने शासनाने अर्थसंकल्पीय कामे अंतर्गत या रस्त्याच्या कामास मंजूरी देवून दि. १५/१०/२०२४ रोजी रक्कम रु. ८०१.६८ कोटी चे कार्यारंभ आदेश निर्गमित करण्यांत आले आहेत. सदर काम सुरु असताना वाहतुक सुरळीत व सुरक्षित होण्याकरिता आवश्यक असणाऱ्या सर्व उपाययोजना करण्यात आल्या आहेत.

[क्रमाप]

रस्ते ५/1413 (800-3-25)

विषयांकित समस्येवर तोडगा काढण्यासाठी भिवंडी बायपास रस्ता प्रस्तावित करण्यात आला असून, हा बायपास विश्वभारती फाटा ते वडपा जंक्शन दरम्यान ७.७ कि.मी. लांबीचा आहे. सदर बायपास रस्त्याबाबत मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत कार्यवाही करण्यात येत आहे. सद्य:स्थितीत सल्लागाराने प्रारुप सविस्तर प्रकल्प अहवाल सादर केला आहे. सल्लागाराने मंजूर संरेखनात बाधित होणाऱ्या जमिनीचे ७/१२ उतारे तसेच प्रारुप भू-संपादन प्रस्ताव प्राधिकरणास सादर केला असून, प्राधिकरणाच्या भूमी शाखेमार्फत सदर प्रस्तावाची पडताळणी करुन सदर प्रस्ताव जिल्हाधिकारी, ठाणे यांचेकडे भू-संपादनासाठी सादर करण्यात येत आहे.

*****************

**महाराष्ट्र विधानसभा**
**सन २०२५ चे पहिले (अर्थसंकल्पीय) अधिवेशन**

**लक्षवेधी सूचना क्र. १८५९**

**श्री. उमेश ऊर्फ चंदु यावलकर, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना :-**

"सार्वजनिक बांधकाम विभाग, महाराष्ट्र राज्य रस्ते विभाग यांनी निविदा दिलेल्या ठेकेदारांनी बनवलेल्या राष्ट्रीय रज्य मार्गाचे अतिनिकृष्ट दर्जाचे काम झालेले असुन ईगतपुरी ते छत्रपती संभाजी नगर समृध्दीमहामार्गामध्ये नव्याने बांधलेले ब्रिज व सिसिरोड यांचे ताळमेळ बसत नसल्यामुळे अनेक वाहनांना बिज सिसिरोड मध्ये खड्याचे तफावत असुन सिसिरोडांना तडे गेल्यामुळे मोठ्या प्रमाणावर अपघात होत असणे, यापुढेही कसारा घाट चालू झाल्यानंतर प्रचंड मोठ्या प्रमाणावर वाहन अपघात ब्रिज सिसिरोडमध्ये तफावत खड्डे तडे पडल्यामुळे होण्याची शक्यता असणे, त्याचप्रमाणे वाडा-मनोर-रोड जुने मुंबई-नाशिक रोड याठिकाणी सुध्दा अतिनिकृष्ट दर्जाचे कामे चालू असून येथील ठेकेदार ईगल कन्स्ट्रक्शन कंपनी याच्याविरुध्द ब्लॅकलिस्टेड एसआयटी चौकशी करण्याची मागणी वारंवार नागरीक लोकप्रतिनिधी करत असतांना निविदा या कंपनीला देण्यात आलेली आहे परंतु सदर ठेकेदाराचे निकृष्ट दर्जाचे काम पाहता त्याने सर्व नियमांना डावलून गल्लीबोळातले म्युन्सीपाल्टीचे गटार बनवण्यासारखे कामे हाती घेतलेले असुन सदर ठेकेदाराविरुध्द ब्लॅकलिस्टेड करुन एसआयटी चौकशी लावणेबाबत लोकप्रतिनिधींनी यापुर्वीच प्रशासनाला सूचना केलेले असुन त्याबाबत नागरीकांनी कार्यकारी अभियंता ठाणे व पालघर यांना दिनांक २४/०२/२०२५ रोजी सदर ठेकेदाराची निविदा रद्द करुन अनुभवी ठेकेदाराला निविदा देण्याचे तक्रार दिलेली असल्यामुळे शासनाने या भ्रष्ट ठेकेदाराची चौकशी करुन इतर प्रामाणिक ठेकेदाराला निविदा देणेसंबंधी शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**मा.मंत्री, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) यांचे निवेदन**

समृध्दी महामार्गाची ही ग्रीनफिल्ड अलाईनमेंट असून IRC च्या मानकामधील मार्गदर्शक तत्वानुसार बांधण्यात आलेला आहे. इगतपूरी ते छत्रपती संभाजीनगर लांबीमधील ज्या ठिकाणी पुलांचे पोहोचमार्ग व काँक्रीटरस्ता यामध्ये उंचसखलपणा आहे, त्या ठिकाणी दुरुस्ती करण्यात आलेली आहे व नियमितपणे अशी दुरुस्ती करण्यात येत आहे. काँक्रीट रस्त्यावर तडे आहेत, त्या ठिकाणचे काँक्रीट पॅनेल बदलून घेण्यात आलेले आहेत व घेण्यात येत आहेत.

सदर लांबीमध्ये अपघात होऊ शकतो असे तडे पुलांच्या ठिकाणी गॅप व काँक्रीट रस्त्यावर नाहीत. समृध्दी महामार्गावरुन वाहतूक सुरळीत आहे. आवश्यकते प्रमाणे सदर पुलांच्या ठिकाणी असलेले गॅप व महामार्गावरील तडयांची दुरुस्ती करण्यात आलेली आहे व करण्यात येत आहे. तसेच या लांबीमध्ये मे. ईगल कन्स्ट्रक्शन यांनी कोणतेही काम केल्याचे आढळून आले नाही.

मनोर-वाडा राज्यमार्ग क्र.३४ सा.क्र.कि.मी. २९/५५० ते ५३/८०० या लांबीमध्ये आणि वाडा-भिवंडी राज्यमार्ग क्र. ३५ सा.क्र.कि.मी. ४९/००० ते कि.मी. ८९/७०० या लांबीमध्ये रस्त्याची सुधारणा करणे या कामाकरीता दि. ०५/०३/२०२४ च्या आदेशान्वये रक्कम रु. १०४२.६० कोटी करीता प्रशासकीय मान्यता प्राप्त आहे. सदर कामाची निविदा प्रक्रिया पूर्ण करुन सदर काम कार्यान्वित करणे करीता दि. १५/१०/२०२४ रोजी कार्यारंभ आदेश निर्गमित करण्यांत आले आहेत. सदर कामाच्या करारनाम्यात प्रामुख्याने भिवंडी ते वाडा आणि वाडा ते मनोर या रस्त्याच्या ५५.६१० कि.मी. लांबीचे चारपदरी कॉक्रीटीकरणाच्या कामाचा समावेश आहे. सदरचे काम निविदा शर्तीनुसार व सार्वजनिक बांधकाम नियमावलीचे विर्निदेशानुसार प्रगतीत असून विहीत मूदतीत पूर्ण करणेचे नियोजन आहे.

******************

२४७१

**महाराष्ट्र विधानसभा**

**सन २०२५ चे अर्थसंकल्पीय अधिवेशन**

**लक्षवेधी सूचना क्रमांक २४७१**

**मा. डॉ. किरण लहामटे, वि.स.स., यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम-१०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्र. २४७१**

"कळस ते बारी ता. अकोला, जि. अहिल्यानगर SS५० हा रस्ता २०१७-१८ साली मंजूर असणे, सदर रस्त्याच्या कामासाठी अंदाजित १४३ कोटी रूपये मंजूर करण्यात आलेले असणे, तसेच रस्ता आतापर्यंत पूर्णत्वास गेलेला नसून रस्त्याच्या कडेच्या झाडांची वृक्षतोड करुन त्या ऐवजी नवीन झाडे लावणे कायद्याने बंधनकारक असतांनाही झाडे लावलेली नसणे, सदर रस्त्याचे काम पुढे चालू असून मागील रस्त्याचे काम उखडत असल्याचे फेब्रुवारी, २०२५ मध्ये निदर्शनास येणे, परिणामी स्थानिक जनतेमध्ये तीव्र असंतोष पसरुन शासनाप्रती रोष निर्माण होणे, त्याबाबत शासनाने संबंधित कंत्राटदार यांच्याविरुध्द चौकशी करुन कार्यवाही करण्याची आवश्यकता, तसेच सदरच्या कामास निधी उपलब्ध करुन देण्याची आवश्यकता व त्याबाबत शासनाची भूमिका."

---

**मा.मंत्री सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) यांचे निवेदन.**

सदर रस्ता हा हायब्रीड ॲन्युईटी अंतर्गत पॅकेज क्रमांक NSK -७१ अ.व.ब अंतर्गत जिल्हा हद्द बारी- राजूर-जामगाव फाटा रस्ता रामा-२३ सा.क्र. किमी २०५/९८० ते २३३/८७० आणि जामगाव फाटा- अकोले- कळस रामा- ५० सा.क्र.किमी ७८/९०० ते १००/२१० अशी एकूण लांबी ४९.२०० किमी या कामास दि. ३०/११/२०१६ अन्वये रु.१४१.१२ कोटी इतक्या रक्कमेस प्रशासकिय मान्यता देण्यात आली. तसेच सदर कामाचे कार्यारंभ आदेश दि. २९/०५/२०१९ रोजी देण्यात आले. सदर काम हे ऑगस्ट २०२३ मध्ये पुर्ण झाले असुन, आता १० वर्षे देखभाल व दुरुस्ती कालावधी सुरु आहे.

या कामाअंतर्गत निविदेतील अटी व शर्तीनुसार २६२२ वृक्ष लागवड करणे आवश्यक होते, त्यानुषंगाने जानेवारी २०२४ मध्ये कंत्राटदारासमवेत केलेल्या पाहणीनुसार रस्त्यावर २६०३ इतके वृक्ष लागवड केल्याचे व त्या पैकी सध्या २२०९ वृक्ष जिवंत असल्याचे आढळून आले, आणखी ४१३ वृक्ष येत्या पावसाळ्यात लावण्याचे नियोजन आहे.

सदर रस्त्याची सन २०१९-२० मध्ये काम करण्यात आलेली काही लांबी खराब झाल्याचे आढळून आले होते. सदर खराब लांबीत मार्च २०२३ मध्ये कंत्राटदाराच्या खर्चाने नुतनीकरण करण्यात आलेले आहे. तसेच राजूर गावातील ६७ मीटर लांबीत कंत्राटदाराने काम न केल्यामुळे सदरचे काम हे Risk and Cost वर कंत्राटदाराकडून पूर्ण करण्यात आले आहे.

संपूर्ण रस्त्याचे काम हे ऑगस्ट २०२३ मध्ये पुर्ण झाले असुन, सदरच्या कामाचे देयक कंत्राटदारास अदा करण्यात आले आहे. सद्यस्थितीत सदर रस्ता करारनाम्याच्या तरतूदीप्रमाणे वाहतुकीकरिता सुस्थितीत ठेवण्यात येत आहे.

---

रोटा H||417(700-3-25)

**महाराष्ट्र विधानसभा**
**सन २०२५ चे अर्थसंकल्पीय अधिवेशन**
**लक्षवेधी सूचना क्रमांक २५३५**

**मा. श्रीमती मंजुळा गावित, वि.स.स., यांच्या लक्षवेधी सूचना क्र. २५३५ वरील निवेदन सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री सभागृहासमोर ठेवतील :-**

" धुळे जिल्हयातील साक्री विधानसभा मतदार संघातील पिंपळनेर ते दापुर ते धंगाई-कुरुसवाडे-सुतारे या २४ किमी रस्त्याचे वर्क ऑर्डर देवुन २ वर्षाचा कालावधी उलटून जाणे, तथापि संबंधीत ठेकेदाराने आतापर्यंत केवळ ३० टक्के काम केलेले असणे, करण्यात आलेले काम हे अत्यंत निकृष्ट दर्जाचे झालेले असणे, ठेकेदारास सुचना देवुनही ठेकेदारचे होत असलेले दुर्लक्ष, यासंदर्भात ठेकेदारावर कडक कारवाई करुन त्यास काळया यादीत टाकण्यात यावी अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधीकडून करण्यात येणे, तसेच साक्री तालुक्यातील ग्रामा-१४ कासारे-छाईल-प्रतापपुर-हिंदळबारी या रस्त्याच्या कामात किमी ०/० ते ३/० हया कासारे गावातुन जाणा-या रस्त्याचे कॉंक्रिटिकरणाचे व सुधारणा करण्याचे काम अत्यंत निकृष्ट झालेले असणे, याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधीनी वारंवार तक्रारी केलेल्या असून त्याची दखल घेण्यात आलेली नसणे, ठेकेदाराने सिमेंटचे प्रमाण कमी वापरल्याने आतापासुनच खडी निघुन रस्ता उखडत असणे, तसेच धमनार ते म्हसदी, शेवाळी फाटा ते धननार या रस्त्याचे वर्क ऑर्डर देवुनही संबंधीत ठेकेदार काम सुरु करीत नसणे, या रस्त्यावर प्रचंड खड्डे पडलेले असुन दररोज ठेकेदारास सुचना देवुनही ठेकेदार काम करीत नसणे, शासनाने यासर्व प्रकरणी चौकशी करुन संबंधित ठेकेदारावर कडक कारवाई करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने केलेली कार्यवाही वा शासनाची प्रतिक्रिया."

---

**मा.मंत्री सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) यांचे निवेदन.**

पिंपळनेर -दापुर -धंगाई-कुरुसवाडे-सुतारे या रस्त्याची एकुण लांबी २३.९७५ कि.मी. असून सदर रस्त्याच्या कामाला प्रधानमंत्री ग्रामसडक योजना भाग-३ अंतर्गत शासन निर्णय ग्रामविकास विभाग दि.०६ मार्च, २०२३ अन्वये प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. सदर कामाचा कार्यारंभआदेश दि.०८/०९/२०२३ रोजी देण्यात आला आहे. सदर कामाची मुदत दि.०७/०३/२०२५ पर्यंत (१८ महिने) अशी होती. सदर कामाच्या एकूण लांबीपैकी सा.क्र. कि.मी १०/५०० ते १३/२०० पर्यंतचा रस्ता वन विभागाच्या हद्दीत आहे. वन विभागाकडून प्राथमिक सर्वेक्षण झालेले असुन अद्यापपर्यंत वन विभागाची परवानगी मिळाली नसल्यामुळे वन हद्दीतील २.७ किमी लांबीमधील कामास सुरुवात झालेली नाही. तसेच कामाची मुदत संपल्यामुळे ठेकेदारास निविदा व अटी व शर्ती नुसार दि.२०/०२/२०२५ रोजीच्या पत्रान्वये नोटीस देण्यात आली आहे. सदर कामावर राज्य गुणवत्ता निरीक्षक यांच्या दि. २९/०६/२०२४ रोजी व केंद्रीय गुणवत्ता निरीक्षक यांच्या दि.२६/०९/२०२४ रोजीच्या तपासणी दरम्यान कामांस समाधानकारक शेरा प्राप्त झालेला आहे. तथापि, राज्य गुणवत्ता निरीक्षक यांच्या दि.३०/०१/२०२५ रोजीच्या तपासणी दरम्यान २८०० मीटर लांबीत **WBM G-II** साठी असाधानकारक शेरा प्राप्त झालेला आहे. त्यानुषंगाने संबंधित ठेकेदारास दि.०४.०२.२०२५ रोजीच्या पत्रान्वये सूचना देण्यात आलेल्या असून संबंधित ठेकेदाराकडून दुरुस्तीचे काम प्रगतीत असून मानकांनुसार करुन घेण्यात येत आहे.

ग्रामा-१४, कासारे-छाईल-प्रतापपुर-हिंदळबारी सा.क्र. किमी ०/०० ते ३/०० सदर रस्ता प्रजिमा-३२ दर्जाचा आहे. सदरहू कामाचे कार्यारंभ आदेश दि.०६/०३/२०२४ रोजी देण्यात आले असून काम पुर्ण करण्याची

मुदत ९ महिने आहे. सदर काम ९०% पूर्ण झालेले असून, निधी अभावी सदर कामास दि.३१/०५/२०२५ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. सदर कामाबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींच्या कोणत्याही लेखी तक्रारी प्राप्त नाहीत. सदर कामाची दक्षता व गुणनियंत्रण विभाग, नाशिक यांचेव्दारे दि.२७/११/२०२४ रोजी प्रत्यक्ष पाहणी करण्यात आली असुन काही आक्षेपार्य बाब आढळुन आलेली नाही. रस्त्याच्या काँक्रीटीकरणाच्या कामाचा पृष्ठभाग व डांबरी सुधारणा करण्यात आलेल्या कामाचा पृष्ठभाग सुस्थितीत आहे. सदर रस्त्याचे डांबरीकरणाचे काम अद्यापपर्यंत पुर्ण झालेले नसुन प्रगती पथावर आहे. सदरचे काम निविदेतील अटी /शर्तीनुसार करण्यात आलेले असून, काम गुणवत्तापूर्वक करण्यात आलेले आहे.

धमणार ते म्हसदी सदर रस्ता रामा-१६ दर्जाचा असुन सदर रस्त्याची लांबी सा.क्र. २९/९३० ते ४०/२०० अशी एकूण १०.२७ कि.मी. आहे. सदर लांबीपैकी सा.क्र.किमी २९/९३० ते ३५/०० दरम्याणच्या पृष्ठभागावर सद्यस्थितीत कोणतेही काम मंजुर नसुन सदर लांबीत खड्डे भरणेचे काम पुर्ण करण्यात आलेले आहे. सा.क्र. किमी ३५/०० ते ४०/२०० या लांबीत दि.१३/०३/२०२४ रोजी कार्यारंभ आदेश देण्यात आले असुन काम पूर्ण करण्याचा कालावधी १२ महिने आहे. सदर काम ८० % पूर्ण झालेले असून, निधी अभावी सदर कामास दि.३१/०५/२०२५ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे.

शेवाळी फाटा ते धमणार सदर रस्ता प्ररामा-८ दर्जाचा असुन सदर रस्त्याची लांबी सा.क्र. कि.मी. १२५/४३० ते १३३/००० अशी एकूण ७.५७ कि.मी. सदर रस्त्यावरील सा.क्र. किमी १२५/४३० ते १३७/६०० या लांबीत अर्थसंकल्प जुलै-२०२२ मध्ये काम मंजूर होते व सदरहू लांबी **HAM** प्रकल्पांतर्गत मंजुरीच्या अंतीम टप्प्यात होती परंतु सदरहू लांबी **HAM** कार्यक्रमांतर्गत अंतिमतः मंजुर न झाल्याने जुलै-२०२२ च्या अर्थसंकल्पातील तरतुदीनुसार दि. १८/२/२०२५ रोजी सदर कामाचे कार्यारंभ आदेश देण्यात आले. सदर काम पुर्ण करण्याचा कालावधी १२ महिने आहे. सदर काम प्रगती पथावर आहे.

---

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२५ चे पहिले अधिवेशन

**लक्षवेधी सुचना क्र. ४८**

मा.श्री. काशनाथ महादु दाते सर, श्री. सुरेश धस, श्री. राघवेंद्र (रामदादा) मनोहर पाटील, श्री.अशोकराव माने (बापू) दलीतमित्र, श्री. सिध्दार्थ खरात, श्री. विश्वजित कदम, श्री. नानाभाऊ पटोले, श्री. अस्लम शेख, श्री. विकास ठाकरे, श्री. संजय मेश्राम यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम-१०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सुचना क्र. ४८ पुढीलप्रमाणे आहे. :-

" उपलब्ध पाण्याचे नियोजन करून जमिनीची सुपीकता वाढवण्यासाठी राज्य शासनाकडून २०२३-२४ या आर्थिक वर्षात मागेल त्याला ठिबक सिंचन योजना राबवली जाणे, केंद्र राज्य शासनाचा ६०-४०% हिसा असलेल्या सूक्ष्म सिंचन योजनेतून ठिबक सिंचन प्रणालीच्या माध्यमातून शेतातील पिकांना पाणी देण्याची व्यवस्था केल्यानंतर शेतकऱ्यांना खर्चाच्या सुमारे ८० टक्के रक्कम अनुदान म्हणून दिली जाणे, शेतातील पिकांना पाणी देण्यासाठी ठिबक सिंचन प्रणालीचा वापर करण्यावर शेतकऱ्याकडून भर देण्यात येणे, यामध्ये राज्यातील १ लाख ३० हजार शेतकऱ्यांनी या योजनेत सहभाग घेणे, गेल्या दीड वर्षापासून शेतकऱ्यांना ठिबक सिंचन योजनेतून सुमारे ७१६ कोटी रुपयाचे अनुदान त्यांच्या खात्यात वर्ग न झाल्याचे दिनांक १७/२/२५ रोजी वा त्यासुमारास उघडकीस येणे, गत वर्षातील अनुदान रखडल्याने २०२४-२५ यावर्षी या योजनेची अंमलबजावणी झालेली नसणे, फळ पिकासाठी सिंचनाची गरज असतानाही शेतकरी त्यापासून वंचित राहत असणे, एकट्या अहिल्यानगर जिल्ह्यात ठिबक सिंचन अनुदानाच्या प्रतीक्षेत असलेल्या शेतकऱ्यांची संख्या ६३२७ असणे, या शेतकऱ्यांना सुमारे १७ कोटी ८७ लाख ११ हजार ३२ रुपयेचे अनुदान न मिळाल्याचेही उघडकीस येणे, यामुळे राज्यातील शेतकऱ्यांना अनुदान न मिळाल्याने होणारे आर्थिक नुकसान व त्यांच्यामध्ये पसरलेली नाराजी, याबाबत शासनाने ठिबक सिंचनाचे थकीत अनुदान शेतकऱ्यांच्या खात्यात वर्ग करण्याबाबत करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया"

---

**मा. मंत्री (कृषि) यांचे निवेदन**

राज्यामध्ये सुक्ष्म सिंचन योजना केंद्र पुरस्कृत राष्ट्रीय कृषी विकास योजनेतील प्रति थेंब अधिक पिक घटकांतर्गत राबविण्यात येते. या योजनेत निधीची तरतूद केंद्र व राज्य हिस्सा ६०:४० प्रमाणात आहे. प्रति थेंब अधिक पिक अंतर्गत अल्प व अत्यल्प भुधारक शेतक-यांना ५५ टक्के व इतर शेतक-यांना ४५ टक्के लाभ दिल्यानंतर मुख्यमंत्री शाश्वत कृषि सिंचन योजनेअंतर्गत अनुक्रमे २५ टक्के व ३० टक्के पुरक अनुदान देऊन एकुण अनुक्रमे ८० व ७५ टक्के अनुदान देय आहे.

शेटा H/1424 (780-3-25) [क्रमाने]

दि. २५/०४/२०२३ च्या शासन निर्णयान्वये सन २०२३-२४ आर्थिक वर्षाकरीता मागेल त्याला फळबाग/ ठिबक / तुषार सिंचन /शेततळे / अस्तरीकरण/ शेडनेट/आधुनिक पेरणी यंत्र / कॉटन श्रेडर देणेबाबत घोषणा करण्यात आली होती. या निर्णयातील समाविष्ठ घटकांसाठी कृषि विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या प्रचलित योजनांअतर्गत व त्याच्या अर्थसकल्पीय तरतुदीतून उपलब्ध करुन देण्यात येणार होते. त्यामुळे ठिबक सिंचन व तुषार सिंचन घटकासाठी संपूर्ण वर्षभर लाभार्थी निवड करण्यात आली. त्यामुळे मोठ्या प्रमाणावर दायित्व निर्माण झालेले आहे.

सदर योजनेकरीता सन २०२३-२४ मध्ये रु. ५१०.०० कोटी (केंद्र हिस्सा रु. ३०६ कोटी व राज्य हिस्सा रु. २०४ कोटी) रक्कमेचा वार्षिक कृती आराखडा केंद्र शासनाने मंजूर केला होता. त्यापोटी रु.१५४.१७ कोटी (केंद्र हिस्सा रु ९२.५० कोटी व राज्य हिस्सा रु ६१.६७ कोटी) इतका निधी प्राप्त झालेला आहे.

या योजनेकरिता सन २०२४-२५ मध्ये तीन हप्त्यांपोटी प्राप्त झालेला केंद्र हिस्सा ₹ ३६०.४४ कोटी व त्याच्या समरुप राज्य हिस्सा ₹ २४०.३० कोटी असा एकूण ₹ ६००.७४ कोटी इतका निधी वितरित करण्यात आलेला आहे. आता, केंद्र शासनाकडून चौथा हप्ता मंजूर झाल्याने, केंद्र हिस्सा ₹ ११६.९५ कोटी व त्याच्या समरुप राज्य हिस्सा ₹ ७७.९६७ कोटी असा एकूण ₹ १९४.९१७ कोटी इतका निधी आयुक्त (कृषि), कृषि आयुक्तालय, पुणे यांना शासन निर्णय दिनांक २१.०३.२०२५ व दिनांक २२.०३.२०२५ अन्वये उपलब्ध करुन देण्यात आला आहे. सदर निधी वितरित करण्याची कार्यवाही आयुक्त (कृषि), कृषि आयुक्तालय, पुणे यांचे स्तरावरुन करण्यात येत आहे.

सन २०२४-२५ मध्ये एकूण ४ हप्त्यांपोटी ₹ ७९५.६५७ कोटी (केंद्र हिस्सा ६०% ₹ ४७७.३९ कोटी व राज्य हिस्सा ₹ ३१८.२६७ कोटी) इतका निधी सदर योजनेकरिता उपलब्ध करुन देण्यात आला आहे.

अहिल्यानगर जिल्ह्यामध्ये सन २०२३-२४ वर्षात उपरोक्त योजनेअंतर्गत १३४६६ शेतकऱ्यांना पूर्वसंमती प्रदान करण्यात आली असून शेतात ठिबक/तुषार संच बसवल्यानंतर अहिल्यानगर जिल्ह्यात एकूण रू. ३४९७.०२ लक्ष इतके अनुदान रक्कम अनुज्ञेय आहे. त्यापैकी ७१३९ शेतकऱ्यांना अनुदान रक्कम रु. १७०९.९१ लक्ष वितरीत करण्यात आलेले आहे. सद्य:स्थितीत ६३२७ लाभार्थी शेतकऱ्यांची रक्कम रु.१७८७.११ लक्ष इतके अनुदान प्रलंबित असून ते वितरीत करण्याची कार्यवाही सुरु आहे.

सन २०२४-२५ वर्षात सदर योजनेंतर्गत ४८९ शेतकऱ्यांना पूर्वसंमती प्रदान करण्यात आली असून त्यापैकी अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती प्रवर्गातील १६३ शेतकऱ्यांना रु.३७.१८ लक्ष इतके अनुदान अदा करण्यात आलेले आहे.

**********

**महाराष्ट्र विधानसभा**

**सन २०२५ चे पहिले (अर्थसंकल्पीय) अधिवेशन**

मा.श्री.नारायण गोविंदराव पाटील, मा. विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली **लक्षवेधी सूचना क्र. ४४०** पुढीलप्रमाणे आहे :-

"मौजे शेलगाव (वां.) (ता.करमाळा, जि.सोलापूर) येथे केळी संशोधन केंद्र, ऊती संवर्धन प्रयोगशाळा व केळी प्रशिक्षण केंद्र उभारण्यात यावे अशी मागणी जिल्ह्यातील शेतक-यांकडून गेल्या अनेक वर्षापासून होत असणे, करमाळा तालुक्यात मोठ्या प्रमाणात केळीचे उत्पादन घेण्यात येत असून आखाती देशाबरोबरच युरोपीयन देशांमध्ये तालुक्यातून केळीची निर्यात होत असणे, सन २०२३-२४ मध्ये ७३०० हेक्टर एवढ्या क्षेत्रावर केली पिकाची लागवड केल्याची कृषी विभागाकडे नमूद असून सरासरी उत्पादकता ६९ टन प्रति हेक्टर असणे, मौजे शेलगाव (वां.) येथील कुलसचिव, महात्मा फुले कृषि विद्यापीठ,राहुरी यांचे गट नं.२९६९ मध्ये १८.८५ हेक्टर तसेच कृषी विभाग, महाराष्ट्र शासनाची गट नं.५९४ मध्ये २०.१४ हेक्टर जमीन व पाणी उपलब्ध असून सदर ठिकाणी शासनाने केळी संशोधन केंद्र, ऊती संवर्धन प्रयोगशाळा व केळी प्रशिक्षण केंद्र उभारण्याचा प्रस्ताव कुलसचिव, महात्मा फुले कृषि विद्यापीठ,राहुरी आणि महासंचालक, महाराष्ट्र कृषि व संशोधन परिषद, पुणे यांनी शासनाकडे सादर केलेला असणे, उक्त प्रस्तावास तात्काळ मंजूरी देण्यात यावी अशीमागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी माहे जानेवारी, २०२५ च्या शेवटच्या आठवड्यात मा.कृषीमंत्री यांचेकडे लेखी निवेदनाव्दारे केलेली असणे, परंतु त्यावर अद्यापही कोणतेच निर्णयात्मक कार्यवाही न होणे, परिणामी करमाळा तालुक्यातील शेतकऱ्यांमध्ये वाढता तीव्र असंतोष, याबाबत शासनाने केलेली कार्यवाही वा शासनाची प्रतिक्रिया."

**ॲड. माणिकराव कोकाटे, मा. मंत्री (कृषि) यांचे निवेदन**

राज्यात सद्य:स्थितीत जळगाव व नांदेड या ठिकाणी केळी संशोधन केंद्र अस्तित्वात आहे. सदर केंद्रामार्फत केळी या फळ पिकाबाबतचे विस्तार कार्य, प्रशिक्षण व संशोधन कार्य सुरु आहे. सदर केंद्रांनी आतापर्यंत २० महत्वपूर्ण लागवड तंत्रज्ञान शिफारशी दिलेल्या आहेत. राज्यात सद्य:स्थितीत जळगाव या जिल्ह्यात केळीचे सर्वात जास्त लागवडीखाली एकूण ६२,९२३ हेक्टर क्षेत्र असून सदर जिल्ह्याची उत्पादकता ही सर्वात जास्त आहे. त्यानंतर सोलापूर जिल्ह्यात केळीचे लागवडीखालील क्षेत्र हे १५,७३३ हेक्टर इतके आहे. सोलापूर जिल्ह्यात केळी पिकासाठी पोषक वातावरण निर्माण झालेले असून, केळी पिकाच्या क्षेत्रात वाढ होत असल्याने मौजे शेलगाव (वां.) ता.करमाळा, जि.सोलापूर येथे केळी संशोधन केंद्र स्थापन करण्याबाबतची मागणी होत आहे.

महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी अंतर्गत मौजे शेलगाव, ता.करमाळा,जि.सोलापूर येथे कोरडवाहू संशोधन केंद्राची स्थापना, सन १९४१ मध्ये कोरडवाहू पिकांवर संशोधन करणेसाठी झाली आहे. कोरडवाहू पिकावरील संशोधन केंद्र हे महात्मा फुले कृषि विद्यापीठातील महत्वाचे कोरडवाहू संशोधन पडताळणी केंद्र (Verification Center) आहे. या केंद्रामार्फत महत्वाच्या कोरडवाहू पिकांवर संशोधन करुन नवीन वाण व कृषि

तंत्रज्ञान शिफारशी देण्यात येतात. आतापर्यंत या केंद्रावर ज्वारी, करडई, हरभरा, कडधान्य इ. पिकांचे विविध वाण व कृषि तंत्रज्ञान शिफारशी पडताळणी करुन शेतकऱ्यांसाठी प्रसारीत करण्यात आल्या आहेत. राज्यातील जवळपास ८६ टक्के कृषि योग्य क्षेत्र कोरडवाहू पिकाखाली असल्याने कोरडवाहू संशोधन केंद्र, शेलगाव, ता.करमाळा, जि.सोलापूर हे राज्यासाठी आणि कृषि विद्यापीठ संशोधनासाठी महत्वपूर्ण असून सदरची जमीन केळी संशोधन केंद्रासाठी उपलब्ध करुन देता येणे शक्य नसल्याचे अभिप्राय कृषि विद्यापीठाने दिलेले आहेत.

तालुका फळरोपवाटीका शेलगाव, ता.करमाळा, जि.सोलापूर येथे सन १९८२ पासून कार्यरत आहे. सोलापूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांना आजपर्यंत विविध पिकांची गुणवत्तापूर्ण, दर्जेदार कलमे/रोपे लागवडीसाठी पुरविण्यात आलेली आहेत. तसेच, त्यासाठी आवश्यक असणारे सर्व पिकांचे मातृवृक्ष सुमारे ३५ ते ३४ वर्ष वयाचे आहेत. तसेच या प्रक्षेत्रावर तालुका बीजगुणन केंद्र कार्यरत आहे. त्यामाध्यमातून वाशी, करमाळा व माढा तालुक्यातील शेतकऱ्यांना विविध विषयावरील शेतीविषयक प्रशिक्षण उपलब्ध करुन दिले जात आहे. तालुका फळरोपवाटीका व तालुका बिजगुणन केंद्र, जेऊर (शेलगाव वांगी) ता.करमाळा, जि.सोलापूर येथील मागणी केलेले २०.७१ हेक्टर क्षेत्र केळी संशोधन केंद्र स्थापन करण्यासाठी उपलब्ध करुन देण्यासाठी शिफारस करणे योग्य होणार नाही. तथापि, यासंदर्भात अंतिम निर्णय शासन स्तरावरुन घेण्यात यावा, असे अभिप्राय कृषि आयुक्तालय, पुणे यांनी दिलेले आहेत.

महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी अंतर्गत कृषि विद्यापीठ कार्यकारी परिषद, केळी संशोधन केंद्राच्या प्रस्तावास मान्यता दिलेली आहे. संशोधन केंद्रासाठी निकषांनुसार किमान २० हेक्टर जमीन उपलब्धतेच्या अधीन राहून संशोधन केंद्र स्थापन करण्यास ठराव क्र.१८/११७/२०२४, दि.०३.१०.२०२४ अन्वये कृषि परिषदेने शासनास शिफारस केलेली आहे. तथापि, यासंदर्भात धोरणात्मक निर्णय अद्याप झालेला नाही.

भारतामधून सन २०२२-२३ मध्ये २,०४,६०७ मे.टन केळीची निर्यात झाली आहे. यापैकी महाराष्ट्रातून १,४०,४०२ मे.टन केळीची निर्यात करण्यात आलेली आहे.

राज्यात सद्यस्थितीत केळी संशोधन केंद्र हे जळगांव व नांदेड या ठिकाणी कार्यरत असून सदर केंद्रांमार्फत वेळोवेळी तंत्रज्ञान विषयक शिफारशी, संशोधन विषयक प्रसाराचे कार्य, प्रशिक्षण व शेतकऱ्यांना प्रशिक्षण देण्यात येत आहे.

********************

लक्षवेधी सुचना क्रमांक ६६२

महाराष्ट्र विधान सभा

सन २०२५ चे अर्थसंकल्पीय अधिवेशन

**श्री.रोहित पाटील, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधान सभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सुचना क्र.६६२ पुढीलप्रमाणे आहे:-**

"पिकांच्या वाढीसाठी मागील पंधरा वर्षांपासून शेतकऱ्यांकडून पीक संजीवकांचा वापर केला जात आहे. पीजीआर संदर्भात २०२१ साली केंद्र सरकारकडे पेस्टिसाइड औषधांसाठी लागू असलेल्या नियमांप्रमाणेच नियमावली तयार करण्याचा प्रस्ताव देण्यात आला होता. परंतु, मागील तीन ते चार वर्षांत केंद्र सरकारकडून यासंदर्भात कोणतीही ठोस पावले उचलली गेलेली नाहीत. २०२१ पर्यंत पीजीआर उत्पादक कंपन्यांची अधिकृत नोंदणी करता येत होती. मात्र, सध्याच्या परिस्थितीत केवळ उद्योग आधारच्या आधारे अनेक कंपन्या कार्यरत आहेत. पीक संजीवक पुरवठ्यासंदर्भात कोणतीही अधिकृत नियमावली नसल्याने अशा उत्पादनांची तपासणी करण्यासाठी कोणतीही प्रमाणित प्रयोगशाळा उपलब्ध नाही. परिणामी, पीजीआर उत्पादक कंपन्यांवर कोणत्याही कायद्याची बंधनं नाहीत. मोठ्या उत्पादन क्षमता असलेल्या पिकांसाठी जसे की द्राक्षे, ऊस आणि डाळिंब - शेती सल्लागार व औषध विक्रेत्यांकडून शेतकऱ्यांना पीजीआर घेण्याचा आग्रह केला जातो. मात्र, निश्चित नियमावली नसल्याने पीजीआरच्या नावाखाली कोणतीही उत्पादने विकली जातात, त्यामुळे शेतकऱ्यांना अपेक्षित लाभ मिळत नाही, उलट त्यांच्यावर अनावश्यक आर्थिक भार वाढतो. यामुळे, योग्य नियम व कायदे तयार करून शेतकऱ्यांचे आर्थिक शोषण थांबवण्याची नितांत गरज आहे. त्यामुळे शेतकऱ्यांच्या हितासाठी लवकरात लवकर प्रभावी धोरण आखले जावे याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना"

**ॲड. माणिकराव कोकाटे,मा.मंत्री (कृषि) यांचे निवेदन**

महाराष्ट्र राज्यामध्ये पिकांच्या वाढीसाठी मागील पंधरा वर्षापासून शेतकऱ्यांकडून पीक संजीवकांचा वापर केला जात आहे. पीजीआर संदर्भात २०२१ साली केंद्र सरकारकडे राज्य शासनाकडून पेस्टिसाइड औषधांसाठी लागू असलेल्या नियमांप्रमाणे नियमावली तयार करण्याचा प्रस्ताव देण्यात आला नाही. राज्यामध्ये एकुण पाच खत चाचणी प्रयोगशाळा असून जैवउत्तेजक चाचणीची विश्लेषक पद्धती केंद्र शासनकडून प्राप्त झाली नसल्यामुळे त्यामध्ये जैवउत्तेजक चाचणी होत नाही.

केंद्र शासनाने सदरची जैवउत्तेजक उत्पादने कायद्याच्या चौकटीत आणण्याच्या अनुषंगाने केंद्र शासनाच्या स्थायी आदेश क्र S.O ८८२, दि.२३/०२/२०२१ अन्वये, खत नियंत्रण आदेश १९८५ खंड २० (C) चे परिशिष्ट ६ अंतर्गत Biostimulant या घटकाचा नव्याने समावेश केला आहे. त्यामुळे सन २०२१ पर्यंत पीक संजीवक कंपन्यांची नोंदणी करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

उप सचिव, एकात्मिक अन्नद्रव्य व्यवस्थापण विभाग, कृषि व सहकार मंत्रालय, भारत सरकार यांचे दिनांक २ ऑगस्ट २०२१ रोजीच्या पत्रामध्ये प्रोविजनल नोंदणी करिता G२ प्रमाणपत्र प्रदान करण्याची कार्य पद्धती निश्चित करुन दिली आहे. त्यात त्यांनी सदर कार्यवाही ही ३१ डिसेंबर २०२१ पर्यंत पूर्ण करणे बाबत निर्देशीत केले होते. परंतु जास्त प्रमाणात अर्ज संख्या प्राप्त झालेमुळे प्रथम दिनांक ३० सप्टेंबर २०२२ पर्यंत व तद्नंतर दि. ३१ मार्च २०२३ पर्यंत अशी दोन वेळेस मुदतवाढ केंद्र शासनाकडून देण्यात आली होती. त्यानंतर मुदतवाढ देण्यात आलेली नाही. दि.३१

मार्च २०२३ पर्यंत एकूण १३३५ जैवउत्तेजक कंपन्यांना प्रमाणपत्र निर्गमित करण्यात आले होते. जैवउत्तेजक प्रमाणपत्राच्या आधारे G-३ प्रमाणपत्र मिळणेसाठी केंद्र सरकारकडे उद्योजक अर्ज सादर करतात. परंतु G-२ प्रमाणपत्राचे आधारे उद्योजक व्यवसाय करु शकतात. सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग मंत्रालय, भारत सरकार यांचे मार्फत उद्यम आधार हे प्रमाणपत्र उद्योजकांना निर्गमित केले जाते. केवळ उद्यम आधारावर जैवउत्तेजकांचा व्यवसाय करण्यात येत नाही.

दिनांक १२ सप्टेंबर २०२४ रोजी केंद्र शासनाने खत नियंत्रण आदेश १९८५ मधील शेड्युल्ड ६ मध्ये ४ वर्गामध्ये ११ जैवउत्तेजके ग्रेड निश्चीत करुन देण्यात आले आहेत. सदर ग्रेडच्या विश्लेषणाची पद्धती निश्चित करुन दिलेली नसलेमुळे सद्यःस्थितीत जैवउत्तेजक उत्पादनावर, गुणनियंत्रणावर व विक्री परवाना निर्गमित करण्यावर मर्यादा येत आहेत. त्यानुषंगाने कृषी आयुक्तालयाने केंद्र शासनाकडे या बाबतचे मार्गदर्शन मागविलेले आहे.

जैवउत्तेजकांचा खत (नियंत्रण) आदेश १९८५ मध्ये समावेश करत असताना त्यांच्या अधिसुचनेत नमूद केल्या प्रमाणे Biostimulant च्या प्रत्येक उत्पादक व आयातदारास त्यांच्या उत्पादनांची १) Chemistry, २) Bio efficacy, ३) Toxicity,४) Heavy metals, ५) Pesticide residues या बाबींची तपासणी विविधस्तरावर घ्यावी लागते. त्यासाठी पुरेसा अवधी लागतो. जैवउत्पादन उत्पादनांची कायदेशीररित्या तपासणी करण्याची कार्यपद्धती अंतिम करण्याची कार्यवाही केंद्र शासनस्तरावर सुरु असून ती अंतिम टप्यात आहे.

मोठ्या उत्पादन क्षमता असलेल्या पिकांसाठी जसे की द्राक्षे, ऊस आणि डाळिंब शेती सल्लागार व औषध विक्रेत्यांकडून शेतकऱ्यांना पीजीआर घेण्याचा आग्रह केला जात असल्याची बाब निदर्शनास आली नाही.

*********

# महाराष्ट्र विधानसभा

सन २०२५ चे पहिले (अर्थसंकल्पीय) अधिवेशन

विधानसभा नियम १०५ अन्वये लक्षवेधी सूचना क्रमांक-३५

सर्वश्री. कशिनाथ दाते, विजय वडेट्टीवार, अस्लम शेख, श्रीमती नमिता मुंदडा, सर्वश्री. संजय मेश्राम, विकास ठाकरे, नानाभाऊ पटोले, अमित झनक, मा. विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्रमांक ३५ पुढीलप्रमाणे आहे :-

"राज्यातील ज्या नागरिकांना घरे नाहीत अशा नागरिकांना पंतप्रधान आवास योजना, अनुसूचित जातीकरिता रमाई आवास योजना, अनुसूचित जमातीकरिता शबरी आवास योजना व तांडा वस्ती योजना, मोदी आवास योजना अशा विविध योजना मार्फत शासनाकडून घरकुल बांधून देण्यात येणे, या योजनेतून घरकुल बांधकामा करता ग्रामीण भागात सुमारे १ लाख ३० हजार रुपये व शहरी भागात २ लाख ५० हजार रुपये शासनाकडून इतके अनुदान देण्यात येणे, परंतु हे अनुदान घर बांधण्याकरिता अतिशय तटपुंजे असणे, घर बांधण्यासाठी आवश्यक असलेले सिमेंट, विटा, रेती, लोखंड व कामगार इत्यादी साहित्यांचे दर वाढल्याने लाभार्थ्यांना या अनुदानात घर बांधणे अशक्य झालेले झालेले असणे, घरकुल बांधण्याकरता शासनाकडून मिळणाऱ्या अनुदानात घर बांधणे शक्य नसल्याने लाभार्थ्यांकडून अनुदानात वाढ करण्याची मागणी वारंवार होत असणे, काही ठिकाणी नागरिकांना घरकुल मंजूर होऊनही जागे अभावी घरकुले परत गेलेली असणे, त्यामुळे गायरान जमिनीवर या लोकांना घरकुल बांधण्या करिता होत असलेली लाभार्थ्यांची मागणी, इतक्या महागाईच्या काळात इतक्या रकमेत घर बांधणे शक्य नसणे त्यामुळे गरीब, गरजू लोकांच्या मनात आपल्याला घर भेटेल की नाही याबाबत त्यांच्या मनात पसरलेली चिंता व भीतीचे वातावरण, याबाबत शासनाने घरकुल अनुदानात त्वरित वाढ करण्याबाबत करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया"

---

## मा.मंत्री (ग्रामविकास व पंचायत राज) यांचे निवेदन

राज्यामध्ये केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचनेप्रमाणे प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण (PMAY-G) राबवली जाते. तसेच, विविध प्रवर्गांकरिता संबंधित प्रशासकीय विभागांकडून राज्य पुरस्कृत आवास योजना-रमाई, शबरी, आदीम, पारधी, अटल बांधकाम कामगार, यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर, मोदी आवास घरकुल योजना या प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीणच्या धर्तीवर राबविण्यात येतात.

सद्य:स्थितीत सदर आवास योजनांतर्गत घरकुल बांधकामाकरीता रु. १.२० लक्ष अर्थसहाय्य अनुज्ञेय असुन या व्यतिरिक्त मनरेगा अंतर्गत ९० दिवस अकुशल मजूरी साधारणपणे रक्कम रु. २६,७३०/- व स्वच्छ भारत मिशन अंतर्गत रु. १२,०००/- असे एकूण रु.१,५८,७३०/- अर्थसहाय्य देय आहे.

डिगस ग्रामपंचायत क्षेत्रात (१) कल्र्याचेगाळू निवारा शेड (२)पाताडेवाडी स्मशान शेड (३) पातडेवाडी गणेश घाट अशी ३ कामे केली असून पाताडेवाडी स्मशान शेड व पातडेवाडी गणेश घाट या कामाचे रक्कम रू. १००/- च्या स्टॅम्प पेपरवर मे. कार्यकारी दंडाधिकारी, कुडाळ यांचे समक्ष ग्रामपंचायतीने समत्ती पत्र करून घेतलेले आहे. कल्र्याचेगाळू निवारा शेड बांधणे हे काम सार्वजनिक बांधकाम विभाग यांच्या मालकीच्या रस्त्यालगत केलेले आहे. संबंधित जमीन मालकांनी समत्ती पत्राद्वारे जमीन उपलब्ध करून दिली असून त्यांची याबाबत हरकत/आक्षेप नाहीत. सदर कामांचा जनतेला उपयोग होत असुन शासनाच्या निधीचा दुरुपयोग झालेला दिसुन येत नाही .

डिगस ग्रामपंचायत क्षेत्रातील ७ सार्वजनिक विहीरीचे बक्षिस पत्र प्राप्त आहे. सदरची कामे राष्ट्रीय ग्रामीण पेयजल योजनेंतर्गत ग्रामीण पाणीपुरवठा व स्वच्छता समिती मार्फत पूर्ण झालेली असून विहिरीची कामे सुस्थितीत असून त्याचा वापर सार्वजनिक प्रयोजनार्थ होत आहे. याबाबत जमीन मालक यांची हरकत अगर आक्षेप नाही.

ग्रामपंचायतीचे सन २०२२-२०२३ या आर्थिक वर्षापर्यंत लेखा परिक्षण झालेले असून अहवालाचे अवलोकन करता सदर लेखापरीक्षण आक्षेपांमध्ये गंभीर स्वरूपाच्या आर्थिक अनियमिता झाल्याचा गोपनिय अहवाल प्राप्त नाही.

श्री.बुदधनाथ मच्छिंद्रनाथ गोसावी यांनी ग्रामपंचातीच्या कारभाराची तक्रार अर्जांची चौकशी साठी दिनांक २१/०४/२०२२, दि.५/५/२०२२,दि.१/८/२०२२, दि.१/८/२०२४, रोजी अर्ज सादर केलेले आहेत.सदर अर्जांची दि.८/८/२०२२, दि.११/०१/२०२३ व दिनांक १९/९/२०२४ रोजी चौकशी करुन संबधित अर्जदार यांना कळविण्यात आलेले आहे.

*****

## महाराष्ट्र विधानसभा, सन २०२५ चे प्रथम (अर्थसंकल्पीय) अधिवेशन
## लक्षवेधी सूचना

**मा. श्री. रवी राणा, विधानसभा सदस्य** यांनी विधानसभा नियम १०५ नुसार दिलेली लक्षवेधीसूचना क्र. १४१० **खालीलप्रमाणे आहे-**

"पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर ग्रामीण यात्रास्थळ योजना अंतर्गत ब वर्ग तीर्थक्षेत्र सामदा काशीपुर ता दर्यापूर जी. अमरावती येथील श्री.सूर्यवंशी वाल्मिकी मठ संस्थान सामदा काशीपुर संस्थांनसाठी शासनकडून निधी मंजूर होण्यासाठी मागणीचा प्रस्ताव किंमत १६१३.९३ कोटी रु चा.कार्यकारी अभियंता जि. प. बांधकाम विभाग अमरावती यांनी त्यांचे पत्र क्रमांक:८४७/२०२५/ दिनांक.१२/०२/२०२५ रोजी जिल्हा नियोजन अधिकारी जिल्हाधिकारी कार्यालय अमरावती यांना पाठविला असून या प्रस्तावाची प्रत श्री.उमेश महादेवराव ढोणे महासचिव म.कृ.स.यांना प्राप्त झाली असणे त्या संबंधाने त्यांनी वी.स.स. लोकप्रतिनिधी म्हणून केलेला पाठपुरावा त्यांचा संदर्भ घेऊन पत्र विद्यमान ग्रामविकास व विद्यमान मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य व शासनाच्या ग्रामविकास विभाग मंत्रालय मुंबई यांना मेल द्वारे पाठवून त्याची प्रत विभागीय आयुक्त अमरावती व विभागीय आयुक्त कार्यालयातील सी.एम. ओ.कक्ष यांना दिनांक २८ फेब्रुवारी २०२५ रोजी सादर केली असून त्यामध्ये वरील प्रस्ताव मान्य करून निधी मंजूर करावे अशी मागणी दिलेल्या पत्रात केली असणे, शासनाकडे व लोकप्रतिनिधी म्हणून वरील विषय प्रस्ताव शासनाकडून मंजूर होणेबाबत सातत्याने उमेश ढोणे हे पाठपुरावा करत असणे. त्यानुषंगाने शासनाकडून वरील प्रस्ताव मंजूर करण्याची नितांत आवश्यकता व यासंबंधाने शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

---

### मा.मंत्री (ग्रामविकास) यांचे निवेदन

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर ग्रामीण यात्रास्थळ योजना ("ब" वर्ग) या योजनेतंर्गत "श्री सूर्यवंशी महर्षी वाल्मिकी मठ संस्थान, सामदा काशीपूर ता. दर्यापुर जि. अमरावती या तीर्थक्षेत्रास "ब" वर्ग दर्जा प्राप्त आहे. सदर तीर्थक्षेत्रास जिल्हा परिषद, अमरावती यांच्या प्रस्तावानुसार यापूर्वीच ग्रामविकास विभाग शासन निर्णय क्रमांक: तिर्थवि-२०२३/प्र.क्र.२७१/योजना-११, दि. १३ मार्च, २०२४ अन्वये रु. २००.६० लक्ष ची प्रशासकिय मान्यता प्रदान करुन प्रशासकीय मान्यतेच्या १०% म्हणजेच रु २०.०० लक्ष निधी उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे. सद्यस्थितीत प्रशासकीय मान्यता प्राप्त कामे प्रगतीत आहेत.

२. श्री सूर्यवंशी महर्षी वाल्मिकी मठ संस्थान, सामदा काशीपूर ता. दर्यापुर जि. अमरावती या तीर्थक्षेत्रास रू. २५.०० कोटी निधी उपलब्ध करून देण्याची विनंती मा.लोकप्रतिनिधींनी श्री.उमेश महादेवराव ढोणे, महासचिव म.कृ.स. यांच्या पत्रास अनुसरून केली होती. या पत्रातील विनंतीनुसार सदर तीर्थक्षेत्राचा रू. २५.०० कोटीचा प्रस्ताव सादर करण्याचे जिल्हाधिकारी, अमरावती यांना दि. २७ जून, २०२४ व दि. ०५ फेब्रुवारी, २०२५ रोजीच्या पत्राव्दारे कळविण्यात आले आहे. त्याअनुषंगाने कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद, बांधकाम विभाग, अमरावती यांनी रू. १६१३.९३ लक्ष किंमतीचा प्रस्ताव दि. १८.०२.२०२५ रोजी जिल्हाधिकारी, अमरावती यांना सादर केला होता. परंतु, सदर प्रस्तावामध्ये त्रुटी असल्याने जिल्हाधिकारी, अमरावती यांनी दि. ०७.०३.२०२५ रोजीच्या पत्रान्वये त्रुटींची पुर्तता करून प्रस्ताव फेर सादर करण्याचे कळविले. प्रस्ताव अद्याप या विभागास प्राप्त झालेला नाही.

**********************************

# महाराष्ट्र विधानसभा

सन २०२५ चे पहिले (अर्थसंकल्पीय) अधिवेशन

विधानसभा नियम १०५ अन्वये लक्षवेधी सूचना क्रमांक-१५५४

श्री. उत्तमराव जानकर व श्री. सुधीर मुनगंटीवार, मा.विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्रमांक १५५४ पुढीलप्रमाणे आहे :-

"प्रधानमंत्री आवास योजना आणि रमाई घरकुल आवास योजनेसाठी लाभार्थ्यांना देण्यात येणाऱ्या अनुदानामध्ये शहरी आणि ग्रामीण भाग असा भेदभाव करण्यात येणे, घरकुल बांधण्यासाठी साहित्याचे दर सर्वच ठिकाणी सारखे असताना अनुदानात मात्र तफावत करण्यात येत असल्याने लाभार्थ्यांमधून नाराजी व्यक्त होत असणे, अपुऱ्या अनुदानात घरे कसे बांधायचे असा प्रश्न ग्रामीण भागातील लाभार्थ्यांमधून व्यक्त होत असणे, राज्य शासनाच्या निर्णयानुसार ७ जानेवारी, २०१७ रोजीच्या निर्णयानुसार ३० चौरस मीटर क्षेत्रफळाचे घर बांधण्याकरीता ग्रामीण भागाकरीता १ लाख २० हजार आणि शहरी भागाकरीता २ लाख ५० हजार रुपये अनुदान देण्यात येणे, त्यामुळे ग्रामीण आणि शहरी अनुदानात तफावत असल्याचे दिसून येणे, सध्या वाळू, विटा, लोखंडी सळई, खडी, माती, मुरुम, सिमेंट आणि मजुरीचे दर वाढलेले असतांना ग्रामीण भागात दीड लाखात घरकुलाचे कामे पूर्ण होत नसणे, अनेक घरकुलांची बांधकामे अपूर्ण अवस्थेत पडून असणे, काही लाभार्थ्यांनी घरकुल बांधण्याकडेच पाठ फिरवली असणे, घरकुल बांधण्यासाठी बँकेच्या खात्यावर अनुदान जमा होऊनही बहुतांश लाभार्थ्यांनी घरे बांधलेली नसणे, त्यामुळे घरकुल योजनेच्या अनुदानामध्ये क्षेत्राप्रमाणे वाढ करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी व घरकुल लाभार्थ्यांनी शासनाकडे वारंवार केली असणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

---

## मा.मंत्री (ग्रामविकास व पंचायत राज) यांचे निवेदन

राज्यामध्ये केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचनेप्रमाणे प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण (PMAY-G) राबवली जाते. तसेच, राज्य पुरस्कृत आवास योजना सुध्दा प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीणच्या धर्तीवर राबविण्यात येतात. सद्यःस्थितीत प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण व राज्य पुरस्कृत आवास योजना घरकुल बांधकामाकरीता रु. १.२० लक्ष अर्थसहाय्य अनुज्ञेय असुन या व्यतिरिक्त मनरेगा अंतर्गत ९० दिवस अकुशल मजूरी साधारणपणे रक्कम रु. २६,७३०/- व स्वच्छ भारत मिशन अंतर्गत रु. १२,०००/- असे एकूण रु.१,५८,७३०/- अर्थसहाय्य देय आहे. या योजनांतर्गत लाभार्थी घरकुलाचे बांधकाम स्वत: करतात.

प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण व रमाई आवास योजनेंतर्गत लाभार्थ्यांना अनुदानाची रक्कम त्यांनी केलेल्या बांधकामाच्या टप्प्यानुसार लाभार्थ्यांच्या खात्यात थेट जमा करण्यात

येते. प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण टप्पा-१ अंतर्गत १३,५७,३७३ घरकुले मंजूर असून १२,६६,१६७ (९३.३%) इतकी घरकुले पूर्ण झाली आहेत. तसेच रमाई आवास योजनेंतर्गत ५,६४,२४४ घरकुले मंजूर असून ४,१८,५६५ (७४.२%) इतकी घरकुले पूर्ण झाली आहेत. राज्यात ग्रामीण गृहनिर्माण कार्यक्रमांतर्गत प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण व इतर राज्य पुरस्कृत ग्रामीण गृहनिर्माण योजना गतिमान करण्यासाठी व त्यात गुणवत्ता आणण्यासाठी शासन दिनांक ०१ जानेवारी, २०२५ ते ३१ मार्च, २०२५ या कालावधीत महाआवास अभियान राबवित आहे.

प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण अंतर्गत लाभार्थ्यांच्या अनुज्ञेय अनुदानात वाढ करण्याबाबत राज्यातील लोकप्रतिनिधी, लाभार्थी व इतरांकडून प्राप्त झालेल्या मागणीच्या अनुषंगाने राज्यशासनाने ग्रामीण विकास मंत्रालय, भारत सरकार यांचेकडे दि. २५/११/२०२० रोजी प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण करीता, प्रधानमंत्री आवास योजना-शहरी प्रमाणे अर्थसहाय्य रु. २.५० लक्ष वाढवून मिळणेबाबत प्रस्ताव सादर करणेत आला असता, केंद्र शासनाने सध्यःस्थितीत कुठल्याही प्रकारची वाढ करता येणार नाही असे दि. ०२/१२/२०२० च्या पत्रान्वये कळविले असुन, राज्यशासन याबाबत निर्णय घेवू शकते असे सूचित केले होते. तद्नंतर सुध्दा वारंवार विविध मान्यवरांकडून राज्य शासनाकडे प्राप्त झालेल्या मागणीच्या अनुषंगाने दि.०१/०८/२०२२ व २६/०२/२०२४ रोजीच्या पत्रांन्वये केंद्रशासनाकडे अनुदान वाढीची मागणी केली आहे. परंतु, अद्याप या संदर्भात केंद्रशासनाकडून मार्गदर्शन प्राप्त झालेले नाही.

प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण टप्पा-२ अंतर्गत लाभार्थ्यांना द्यावयाच्या अनुदानात रु.५०,०००/- वाढ करण्याची घोषणा मा. मुख्यमंत्री यांनी मा. राज्यपाल महोदयांच्या अभिभाषणाच्या उत्तरात केली असून, तसेच मा. उपमुख्यमंत्री (वित्त) यांनी देखील ही घोषणा सन २०२५-२६ च्या अर्थसंकल्पीय भाषणात केली आहे. त्यानूसार प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण अंतर्गत लाभार्थ्यांना द्यावयाच्या अनुदानात रु.५०,०००/- एवढी वाढ देण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

---

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२५ चे पहिले (अर्थसंकल्पीय) अधिवेशन

श्री. दिलीप गंगाधर सोपल, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे :-

"जिल्हापरिषद, सोलापूर अंतर्गत मौ. वैराग, ता. बार्शी येथील जिल्हापरिषद मालकीची जागा (सर्व्हे नं. ३९७/इ) "बांधा, वापरा आणि हस्तांतरीत करा तत्वावर प्रकल्प राबविण्यासाठी प्रस्ताव ग्रामविकास विभागाकडे दिनांक १५ जुलै, २०२४ रोजी मंजूरीसाठी सादर केला असणे, वैराग ता. बार्शी जिल्हापरिषद शाळेची इमारती जीर्ण व धोकादायक झालेली असून असुविधायुक्त असणे, याबाबत कॉलेज ऑफ इंजिनियरिंग टेक्नॉलॉजी युनिर्व्हसिटी, पुणे यांनी दिनांक १९ जून, २०२४ च्या पत्रान्वये स्ट्रक्चरल ऑडीट अहवाल सादर केलेला असणे, ग्रामविकास विभागाचा शासन निर्णय दिनांक १/९/२००८ मधील दिलेल्या मार्गदर्शक सुचनानुसार मुख्य अभियंता प्रधानमंत्री ग्रामसडक योजना पुणे यांनी वैराग जिल्हा परिषद शाळेची इमारत पुर्नजिवित करावयाचा सविस्तर अहवाल दिनांक १५ जुलै, २०२४ सादर करणे, सदर अहवालानुसार शाळेची इमारतीच्या प्रस्तावास शासनाने मंजूरी देण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रीया. "

---

मा.मंत्री (ग्रामविकास) यांचे निवेदन

जिल्हा परिषद / पंचायत समिती व ग्रामपंचायत या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या मालकीच्या / ताब्यातील भुखंड खाजगी करणाच्या माध्यमातून (BOT) व्यापारी तत्वावर विकसित करण्याच्या अनुषंगाने ग्राम विकास विभागाच्या दिनांक ०१ सप्टेंबर, २००८ रोजीच्या शासन निर्णयान्वये, धोरण निश्चित करण्यात आलेले आहे. सदर धोरणाच्या अनुषंगाने जिल्हा परिषद, सोलापूर (जि. सोलापूर) अंतर्गत वैराग ता. बार्शी येथील जिल्हा परिषदेच्या मालकीचा भूखंड (सर्व्हे नं. ३९७/इ) BOT अंतर्गत प्राथमिक शाळा इमारत बांधकामाचे काम प्रस्तावित करण्यात आले असून त्या बदल्यात व्यापारी तत्वावर व्यवासायिक गाळे विकसित करण्यानुषंगाने सुसाध्यता अहवालास मान्यता देण्याबाबतचा प्रस्ताव मुख्य अभियंता, प्रधानमंत्री ग्रामसडक योजना, महाराष्ट्र ग्रामीण रस्ते विकास संस्था, पुणे यांच्या मार्फत शासनास सादर करण्यात आला आहे. तथापि, सदर प्रस्ताव परिपुर्ण नसल्याने क्षेत्रीय कार्यालयाकडून त्रुटींची पुर्तता झाल्यावर विभागाच्या दिनांक ०१ सप्टेंबर, २००८ रोजीच्या शासन निर्णयातील अटी व शर्तीनुसार उचित कार्यवाही करण्यात येईल.

*****************

## अर्थसंकल्पीय अधिवेशन २०२५

### महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये लक्षवेधी सूचना क्र.२०६६

श्री. प्रकाश सोळंके, वि.स.स यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये लक्षवेधी सूचना क्र.२०६६पुढीलप्रमाणे आहे:-

महाराष्ट्रातील ग्रुप ग्रामपंचायत बरखास्त करून महसुल गावांना स्वतंत्र ग्रामपंचायत निर्माण करण्याची मागणी श्री. जयंत पाटील, अध्यक्ष अखिल भारतीय सरपंच परिषद यांनी फेब्रुवारी २०२५ च्या सुमारास मा. मुख्यमंत्री यांच्याकडे करणे, राज्यात एकुण गावांची संख्या ४०,९५९ असणे, महसुल गावांची संख्या ३६,५३७ असणे, या मध्ये सद्या अस्तित्वात असलेल्या ग्रामपंचायतींची संख्या २७,९५१ असणे, ग्रुप ग्रामपंचायतीमुळे विकास कामावर विपरीत परिणाम होत असणे, महसुल गावांना तुलनेत ८,५५६ ग्रामपंचायती कमी असणे, शहरात नागरीकांना मिळणा-या सोयी सुविधा ग्रामीण भागातही देण्याची आवश्यकता असणे, त्यामुळे ग्रुप ग्रामपंचायती बरखास्त करून महसुल गावांना स्वतंत्र ग्रामपंचायत निर्माण करण्याची आवश्यकता असणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना

---

### मा.मंत्री ग्राम विकास विभाग यांचे निवेदन

- महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १९५९ च्या कलम ४ अन्वये व राज्यघटनेच्या कलम २४३ च्या (छ) नुसार मा. राज्यपाल यांनी गाव जाहीर करावयाचे आहे.
- ग्राम विकास विभाग शा. नि. दिनांक १२ फेब्रुवारी, २००४ अन्वये स्वतंत्र ग्रामपंचायत स्थापनेसंदर्भात सर्वसमावेशक सूचना काढल्या आहेत. त्यानुसार ज्या ठिकाणी स्वतंत्र ग्रामपंचायत स्थापन करावयाची आहे ते क्षेत्र महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ च्या कलम ४ (१) नुसार स्वतंत्र महसुली गाव म्हणून जाहीर झालेले असले पाहिजे.
- स्वतंत्र ग्रामपंचायत स्थापनेबाबतचे निकष खालील प्रमाणे :-

| अ.क्र | गाव | लोकसंख्या | दरडोई वार्षिक कर उत्पन्न | अंतर |
|---|---|---|---|---|
| १ | सर्वसामान्य | २००० | किमान रुपये ३० /- | किमान ३ कि.मी. |
| ३ | आदिवासी/ तांडा | १००० | रुपये २५ /- | किमान ३ कि.मी |
| ४ | पुर्नवसित | ३५०-१००० | रुपये २० /- | किमान ३ कि.मी. |
| ५ | बंजारा/लमान तांडा | ७०० | रुपये २५/- | ३ .०० कि.मी. अट शिथिल |

- ग्रामस्थांच्या मागणीसह ग्रामसभेचा व स्थायी समितीचा ठराव आवश्यक आहे. ग्रामस्थांच्या सूचना/हरकती लक्षात घेऊन विहित कार्यपध्दतीने विभागीय आयुक्ताच्या शिफारशीसह प्रस्तावावर शा.नि १२.०२.२००४ च्या निकषानुसार कार्यवाही करण्यात येते.
- राज्यात एकूण २७९२१ ग्रामपंचायती आणि ४४७३८ महसूली गावे असली तरी प्रत्येक महसूली गावाने उपरोक्त निकष पूर्ण केल्यास स्वतंत्र ग्रामपंचायत होऊ शकते. सन २०२३ ते फेब्रुवारी २०२५ पर्यंत ग्रुप ग्रामपंचायतीतुन एकुण ४४ स्वतंत्र ग्रामपंचायती स्थापन करण्यात आल्या आहेत.
- राज्यातील गावांतर्गत मुलभूत सुविधांच्या विकास कामांसाठी शासनाने दि.२७ मार्च, २०१५ रोजीच्या शासन निर्णयान्वये मा.लोकप्रतिनिधींनी सुचविलेल्या ग्रामीण भागातील मुलभूत सुविधा पुरविणे ही योजना सन २००८-०९ पासून सुरू केली आहे. या योजनेअंतर्गत (लेखाशीर्ष २५१५ १२३८) मा. लोकप्रतिनिधींकडून म्हणजेच अ) खासदार ब) आमदार क) जिल्हा परिषद, पंचायत समिती व ग्राम पंचायतीचे सदस्य यांनी त्यांच्या ग्रामीण भागातून मुलभूत सुविधा पुरवण्याबाबत सुचविलेल्या कामांना, शासन मान्यतेअंती व योजनेच्या अटी व शर्ती नुसार मंजूरी दिली जाते. त्यानुसार

सदर योजनेंतर्गत मागील ३ वर्षात ग्रामीण भागातील सोयी-सुविधांच्या कामांसाठी खालीलप्रमाणे प्रशासकीय मान्यता दिली आहे.

| **आर्थिक वर्ष** | **मंजूर प्रशासकीय मान्यता (रु.कोटीत)** |
|---|---|
| २०२२-२३ | २०००.०० |
| २०२३-२४ | २७४०.०० |
| २०२४-२५ | २१६०.२६ |

- ५००० पेक्षा जास्त लोकसंख्येवरील ग्रामपंचायतीना नागरी सुविधा विशेष अनुदान दिले जाते.

*******************

## लक्षवेधी सूचना क्र. २१०९

महाराष्ट्र विधानसभा
सन २०२५ चे (अर्थसंकल्पीय)अधिवेशन

श्री.नितीन अर्जुन (ए.टी.) पवार, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र.२१०९ पुढील प्रमाणे आहे.

"खोटी कागदपत्रे सादर करून शासकीय योजनांचा लाभ शासकीय कर्मचाऱ्यांकडून घेणे सर्वथा चुकीचे असून याच प्रकारच्या घटना वारंवार घडत असणे, नाशिक जिल्ह्यातील चणकापूर तालुका कळवण येथील ग्राम विकास अधिकारी यांनी त्यांच्या पदाचा गैरवापर करून खोटी कागदपत्र तयार करणे, या खोट्या कागदपत्रांच्या आधारे त्यांच्या पत्नीला प्रधानमंत्री आवास योजनेचा लाभ देणे, सदर योजनेचे काम पाहणारे अधिकारी देखील या अनियमितते मध्ये सहभागी असणे अशाप्रकारे पदाचा लाभ घेऊन शासनाचे आर्थिक नुकसान करणे,अशा ग्राम विकास अधिकारी व प्रधान मंत्री आवास योजनेचे काम पाहणाऱ्या अधिकाऱ्यांची तात्काळ चौकशी करून निलंबन करणे आवश्यक असणे, लोकप्रतिनिधींनी तक्रार करून देखील शासनाने तत्काळ कारवाई न करणे, तसेच त्यांनी पदाचा गैरवापर करत ग्रामसेवक पतसंस्थेचे सचिव असताना ग्रामपंचायत कर्मचाऱ्याचे खात्यावरील रक्कम देखील वेळोवेळी काढून अपहार करून शासनाची लूट करणे ही लूट सुरू असताना देखील तत्काळ निलंबित करणे आवश्यक असताना देखील पदावर ठेवून चौकशी केली जाणे, सदर व्यक्तींनी गैरव्यवहार केला असल्यामुळे भविष्यात देखील पदाचा गैरवापर करून पुरावे नष्ट करण्याचा धोका असणे शासनाचे सदर बाबीकडे होत असणाऱ्या अक्षम्य दुर्लक्ष, त्यामुळे पदाचा गैरवापर करण्याचे वाढलेले प्रमाण, याबाबत सक्त कारवाई करण्याचे असणारी आवश्यकता, याबाबत शासनाने तत्काळ करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

## मा. मंत्री (ग्रामविकास) यांचे निवेदन

ग्रामपंचायत चणकापूर,ता.कळवण येथील ग्रामपंचायत अधिकारी (ग्रामविकास अधिकारी) श्री.रामराव उखाराम महाजन यांची पत्नी श्रीमती शितल रामराव महाजन यांना ग्रामपंचायत करंभेळ (क.) ता.कळवण अंतर्गत सन २०१९-२० मध्ये शबरी घरकुल आवास योजनेंतर्गत घरकुलाचा लाभ मंजूर करणेत आला आहे. श्री.रामराव उखाराम महाजन, ग्रामपंचायत अधिकारी यांनी पत्नी सौ.शितल रामराव महाजन यांचे नावावर शबरी आवास योजनेतून घरकुल लाभ घेणे, कर्तव्यात कसूर करणे असे नियमबाह्य वर्तन केल्याचे सकृतदर्शनी निदर्शनास आल्याने त्यांचेवर दि. १५.३.२०२५ रोजीच्या आदेशान्वये विभागीय चौकशी प्रस्तावित केली आहे. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, नाशिक यांनी दि.१४.३.२०२५ रोजीच्या पत्रान्वये कळविल्यानुसार श्री.रामराव महाजन हे नाशिक जिल्हा ग्रामसेवकांची सहकारी पतसंस्थेचे संचालक अथवा पदाधिकारी म्हणून कार्यरत नव्हते. सभासद म्हणून वैयक्तिक व्यवहार वगळता संस्थेचा आणि त्यांचा कोणताही संबंध येत नाही. त्यामुळे ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांचे खातेवरील रक्कम काढण्याच्या व्यवहाराशी संबंध येत नाही.

श्रीमती शितल रामराव महाजन यांना ग्रामपंचायत करंभेळ (क.) ता.कळवण अंतर्गत सन २०१९-२० मध्ये शबरी घरकुल आवास योजनेंतर्गत घरकुलाचा लाभ मंजूर करतांना ग्रामपंचायत करंभेळ (क.) चे ग्रामपंचायत अधिकारी श्री.तुकाराम नामदेव गावीत यांना लाभार्थी यांचे पती श्री.रामराव उखाराम महाजन

हे कळवण गटात ग्रामपंचायत अधिकारी म्हणून कार्यरत आहेत हे माहित असून देखिल त्यांनी सदर घरकुल योजनेचा लाभ मंजूर केल्याचे निदर्शनास आले आहे. श्री.तुकाराम नामदेव गावीत, यांनी सौ.शितल रामराव महाजन यांना शबरी घरकूल आवास योजनेतून लाभार्थी म्हणून निवडतांना खात्री करुन प्रस्ताव सादर करणे आवश्यक होते. तथापि, त्यांनी तसे न करता शबरी घरकुल आवास योजना सन २०१९-२० अंतर्गत चुकीच्या लाभार्थ्यांची निवड करणे, कर्तव्यात कसूर केल्याचे स्पष्ट होते. त्यामुळे मुख्य कार्यकारी, जि.प.नाशिक यांनी दि. १५.३.२०२५ रोजीच्या आदेशान्वये श्री.तुकाराम नामदेव गावीत, ग्रामपंचायत अधिकारी यांना निलंबित केले असून त्यांच्यावर विभागीय चौकशी प्रस्तावित केली आहे.

प्रकल्प संचालक,जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा,नाशिक यांनी याप्रकरणी सादर केलेल्या अहवालानुसार श्रीमती शितल रामराव महाजन यांना घरकूल लाभ मंजूर केलेल्या कालावधीत कौटुंबिक वादामुळे त्यांचे पती श्री.रामराव उखाराम महाजन यांचेबरोबर दि.८.८.२०१९ रोजी लेखी निरंतर ताकदीचा जाहीर फारकतनामा जात पंचासमक्ष झालेला होता. दि. २७.६.२०२२ रोजी जातपंचा समक्ष आपसी सुलाहनामा झाला. यानंतर सदर घरकूल लाभ घेणे गैर असल्याने श्रीमती शितल रामराव महाजन यांनी लाभ रद्द करणेबाबत विनंती करुन घरकूल रक्कमेचा भरणा शासनखाती केला आहे.

* * * * * * * * *

## महाराष्ट्र विधानसभा, सन २०२५ चे पहिले (अर्थसंकल्पीय) अधिवेशन

**लक्षवेधी सूचना क्रमांक २१२३**

श्री. आमश्या पाडवी, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम-१०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना खालीलप्रमाणे आहे.

"ग्रुप ग्रामपंचायत डेब्रामाळ (ता.अक्कलकुवा, जि.नंदुरबार) अंतर्गत येणाऱ्या कंजाला व पलासखोब्रा या गावात सुमारे **35** वर्षांपासून एकतर्फी सत्ता स्थापन करून कायद्याचा दुरूपयोग झालेला असणे, पेसा कायद्याची ग्रामकोश निधीची अंमलबजावणी सन **2014** पासून झालेली असणे, तेथील एकमेव ग्रामकोष समितीचे अध्यक्ष श्री.रामसिंग दुधल्या वळवी यांच्या नेतृत्वात कामकाज चालत असणे, अनुसूचित क्षेत्रातील गावात (पेसा गावात) ग्रामसभेच्या कामासंबंधी ठेवायच्या नोंदवह्यात ग्रामसभा न भरवता तसेच ग्रामपंचायस सदस्य व ग्रामस्थांनी विश्वासान न घेता मनमानी कारभार करून निधी हडप करणे, एवढेच नव्हे तर दि.**17/12/2022** रोजी ग्रामपंचायतीच्या सार्वत्रिक निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर होऊन आदर्श आचारसंहिता असताना श्री.वळवी यांनी त्यांच्या मुलाच्या नावे रक्कम वर्ग करणे, दि.**13/06/2023** रोजी याहा गुंदारी बाहागोऱ्या वंदन या बचत गटाच्या नावे लाखो रूपये वर्ग केलेले असणे, तसेच तेराव्या वित्त आयोगाच्या निधीचा दुरूपयोग झालेला असणे, तसेच दप्तर हस्तांतरण न केलेली कामे महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम, **1959** च्या मुंबई अधिनियम क्र.**03** आणि त्याखालील नियमाचे कलम, **179** अन्वये कारवाई करण्याबाबत गट विकास अधिकारी, पंचायत समिती अक्कलकुवा, जि.नंदुरबार यांनी मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नंदुरबार यांच्याकडे दिनांक **09/02/2024** रोजी तक्रार दाखल करणे, तथापि अद्यापपर्यंत सदर प्रकरणी चौकशी झालेली नसणे, परिणामी ग्रामस्थांमध्ये वाढती असंतोषाची भावना, याप्रकरणी शासनाने चौकशी करून दोषींविरूध्द कारवाई करण्याची आवश्यकता वा शासनाची प्रतिक्रिया."

### -: मा.मंत्री, ग्रामविकास व पंचायतराज यांचे निवेदन :-

सदर प्रकरणी, ग्रामपंचायत डेब्रामाळ, ता.अक्कलकुवा, जि.नंदूरबार येथील सध्या कार्यरत ग्रामपंचायत अधिकारी श्री.आत्माराम सामू वळवी यांना पूर्वीचे ग्रामपंचायत अधिकारी श्री.अशोक फोपा पावरा यांनी त्यांच्या कार्यकाळातील (दिनांक ०३/०९/२०१९ ते मे, २०२३ पर्यंत) दप्तर अद्यापही उपलब्ध करून न दिल्याने दप्तराअभावी निधी हडप केलेबाबतच्या मुद्यांची चौकशी करता आली नाही. तथापि, ग्रामकोष समिती कंजाला बँक ऑफ महाराष्ट्र शाखा मोलगी येथील बँक खाते क्र.६०२२२८८९५८९ येथून दिनांक १३/०६/२०२२ रोजी याहा गुंदारी बाहागोऱ्या वंदन या महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान (उमेद) अंतर्गत नोंदणीकृत नसलेल्या बचत गटाच्या नावे रुपये ४,००,०००/- इतकी रक्कम वर्ग केले. श्री. रामसिंग दुधल्या वळवी माहे जून, २०१६ पासून जानेवारी, २०२३ पर्यंत ग्रामकोष समितीचे अध्यक्ष होते. तसेच दिनांक १७/१२/२०२२ रोजी ग्रामपंचायतीच्या सार्वत्रिक निवडणूकीचा कार्यक्रम जाहीर होऊन आदर्श आचारसंहिता लागू झाली असताना श्री. विनायक रामसिंग वळवी यांच्या नावे रुपये, २,१०,०००/- इतकी रक्कम वर्ग केल्याचे बँक स्टेटमेंटवरुन निदर्शनास येत आहे. तत्कालिन ग्रामपंचायत अधिकारी, श्री. अशोक फोपा पावरा यांनी कार्यभार हस्तांतरणावेळी त्यांच्या कालावधीचे दप्तर हस्तांतरण न केल्याबाबत त्यांना जिल्हा परिषद सेवेतून निलंबीत करण्यात आले आहे. जिल्हा परिषद स्तरावरून दप्तर उपलब्ध करून घेणेबाबत कार्यवाही सूरू असून तत्कालीन ग्रामपंचायत अधिकारी श्री. अशोक फोपा पावरा व श्री. एफ.डी.कुवर यांचे कार्यकाळातील दप्तर उपलब्ध होणेकामी महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १९५९ चे कलम १७९ नुसार त्यांचे विरूध्द कार्यवाहीचा प्रस्ताव जिल्हाधिकारी, नंदूरबार यांचेकडे सादर झालेला आहे. तसेच गट विकास अधिकारी, पंचायत समिती अक्क्लकुवा यांनी संबंधितांविरुध्द विहीत कालावधीत प्रशासकीय कार्यवाही न केल्याने व महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १९५९ चे कलम १७९ नुसार अभिलेख मिळणेबाबत कार्यवाही करणेचा प्रस्ताव सादर न केल्याने त्यांचे विरुध्द शिस्तभंगविषयक कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली आहे. याबाबत दप्तर उपलब्ध होताच जिल्हा परिषदेकडून सविस्तर चौकशी करून दोषींवर नियमानुसार उचित कारवाई करण्यात येईल.

*******************

शेटा H/1436 (750-3-25)

**लक्षवेधी सूचना क्र.२१५४**

**( सन २०२५ चे प्रथम (अर्थसंकल्पीय) अधिवेशन )**

मा.श्री. नितीन पवार, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ नुसार दिलेली **लक्षवेधी सूचना क्र. २१५४** खालीलप्रमाणे आहे-

"नाशिक जिल्हा परिषद येथे बनावट प्रशासकीय मान्यतेच्या आधारे जिल्हा परिषद बांधकाम विभाग यांनी निविदा प्रक्रिया करणे, निविदा प्रक्रिया करताना अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी देखील कोणतीही शहानिशा न करता निविदा प्रक्रियेला मान्यता देणे, लेखा वित्त विभागातील अधिकाऱ्यांनी देखील कोणतीही शहानिशा न करता निविदा प्रक्रियेस मान्यता देणे, सदर बाब निदर्शनास आल्यानंतर मात्र केवळ कार्यकारी अभियंता व वर्ग ३ च्या कर्मचाऱ्यांवर कारवाई करणे, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी व वित्त व लेखा अधिकारी हे जबाबदार अधिकारी असताना देखील कनिष्ठ अधिकाऱ्यांवर कार्यवाही करून या प्रकरणातून सुटण्याचा प्रयत्न करीत असणे, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी पदाचा गैरवापर करून पुरावे नष्ट करण्याचा प्रयत्न करीत असणे, कार्यकारी अभियंता यांनी मॅट कोर्टामध्ये याबाबत पुरावे दिलेले असणे, बनावट प्रशासकीय मान्यता आदेश करून त्याची निविदा प्रक्रिया करणे ही गंभीर बाब असल्यामुळे, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी व मुख्य लेखा अधिकारी यांचा समावेश या प्रकरणात असल्याचा आरोप झालेला असल्यामुळे त्यांना निलंबित करून त्यांची अन्यत्र बदली करून या संपूर्ण प्रकरणाची वरिष्ठ स्तरावरून चौकशी होण्याची असणारी आवश्यकता, शासनाचे सदर बाबीकडे होत असणारे दुर्लक्ष, त्यामुळे या प्रकरणातील मुख्य आरोपी यांच्याकडे होत असलेले दुर्लक्ष, याबाबत शासनाने तात्काळ करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया"

---

**मा.मंत्री (ग्रामविकास) यांचे निवेदन**

या लक्षवेधी सूचनेतील विषयासंदर्भात श्री. भास्कर भगरे, मा. लोकसभा सदस्य दिंडोरी लोकसभा यांचे पत्र व त्या सोबत शासन निर्णय, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, क्र.टिडीएस २०२४/२००६/प्र.क्र.१२०/पर्यटन-०१, दि. ०६.०८.२०२४ ची प्रत, कार्यकारी अभियंता, इमारत व दळणवळण विभाग क्र. ०३, जिल्हा परिषद, नाशिक यांच्या कार्यालयात प्राप्त झाला.

महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ चे कलम ९९ (अ) नुसार, जिल्हा परिषदेच्या प्रत्येक विभाग प्रमुखास, आपल्या विभागाशी संबंधित असलेल्या कामांच्या व विकास परियोजनांच्या बाबतीत तांत्रिक मंजूरी देता येते. तसेच महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती, लेखा संहिता, १९६८ चे कलम १५१ नुसार दुसऱ्या विभागाने प्रारंभ केलेल्या किंवा त्या विभागाच्या गरजांशी संबंधित असलेल्या कोणत्याही बांधकामाकरीता दुरुस्तीची किंवा किरकोळ नसतील अशी कामे बांधकाम विभागाकडून तांत्रिक मंजूरी दिली जाण्यापूर्वी त्या त्या विभागांची सहमती घेणे आवश्यक आहे. तथापि कार्यकारी अभियंता, (इ.व द.) विभाग क्र.३ जिल्हा परिषद, नाशिक यांनी प्रशासकीय मान्यता मिळाल्याचे, त्यांना प्राप्त झालेल्या शासन निर्णयाची आवश्यक ती पडताळणी न करता कार्यवाही प्रस्तावित केलेली असे दिसून येते.

कार्यकारी अभियंता यांनी सादर केलेल्या प्रस्तावावर, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नाशिक यांनी प्रशासकिय मान्यतेची पडताळणी कार्यकारी अभियंता यांनी करावी असा शेरा लिहलेला आहे. याशिवाय मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद, नाशिक यांचेकडील पत्र क्र. जिपना/अर्थ/१२५/२०१४ दि. १०.०३.२०१४ नुसार, कामांचे प्रशासकीय व निविदा मान्यतेसाठी नस्ती सादर करतांना, संबंधित खाते प्रमुखांनी प्रशासकीय मान्यता व वित्तीय मान्यता असल्याची खात्री करुनच वरिष्ठांकडे प्रस्ताव सादर करण्याची दक्षता घेणेच्या सूचना आहेत. त्यानुसार मुख्य लेखा व वित्त अधिकारी, वित्त विभाग जि.प. नाशिक यांचे कार्यालयानेही या प्रस्तावातील कामांस तपासणी करुन सदर कामांस निधी अप्राप्त असलेबाबतचा शेरे / नोंद केलेली आहे. याप्रमाणे शेरे / अभिप्राय नमुद केलेले असतांनाही, या अभिप्रायाप्रमाणे प्रशासकिय मान्यतेची पडताळणी किंवा खात्री करुन न घेता, तसेच अंतिम मंजुरी दिलेली नसतांनाही कार्यकारी अभियंता (इ.व द.) विभाग क्रं. ३ यांनी परस्पर ई-निविदा प्रसिध्दी केलेली आहे.

ज्या शासन निर्णयाच्या आधारे कार्यकारी अभियंता, नाशिक यांनी निविदेची कार्यवाही केली आहे, तो महाराष्ट्र शासनाच्या शासन निर्णय संकेतस्थळावर प्रसिद्ध नाही. तसेच शासनस्तरावरुन जिल्हा परिषदेच्या कार्यालयाच्या ई-मेलवरही प्राप्त झालेला नाही. तरी देखील कार्यकारी अभियंता, (इ.व द.) विभाग क्र. ०३, जि. प. नाशिक यांनी सदरच्या विवादित शासन निर्णयाची कुठल्याही प्रकारची शहानिशा न करता, खात्री न करता या शासन निर्णयात नमूद निफाड तालुक्यातील "हिंगलाज माता मंदिर भक्तनिवास बांधणे" या ५० लक्षची रु. च्या कामास परस्पर तांत्रिक मंजुरी दि. ०४.१२.२०२४ रोजी व चांदवड तालुक्यातील "पारेगाव पाराशर ऋषी आश्रम भक्त निवास बांधणे" या कामाच्या ५० लक्षची रु. च्या कामास आपल्या अधिकाराचा गैरवापर करुन परस्पर तांत्रिक मंजुरी दि. ०९.१२.२०२४ रोजी दिलेली आहे व त्याअनुषंगाने "ई-निविदा " प्रसिध्द केलेल्या आहेत. त्यामूळे मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नाशिक यांनी कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद, नाशिक यांचा कार्यभार काढून घेतला आहे व ते सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिकारी असल्याने त्यांच्या विरूध्द शिस्तभंगाची कार्यवाही करण्याचा प्रस्ताव अपर मुख्य सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई - ३२ यांना सादर केला आहे.

कार्यकारी अभियंता यांनी त्यांचा पदभार काढून घेतल्यामुळे, या कार्यवाहीविरुध्द मा. महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरणात मुळ अर्ज दाखल केला आहे. सदर मुळ अर्ज मा. न्यायाधिकरणाने अदयाप निकाली काढलेली नाही.मा.महाराष्ट्र प्रशासकिय न्यायाधिकरण मुळ अर्जावर जो निर्णय देईल त्यानिर्णयाप्रमाणे पुढील कार्यवाही करण्यात येईल.

******

# महाराष्ट्र विधानसभा

सन २०२५ चे पहिले (अर्थसंकल्पीय) अधिवेशन

विधानसभा नियम १०५ अन्वये लक्षवेधी सूचना क्रमांक-२२८८

श्री. चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील, मा.विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्रमांक २२८८ पुढीलप्रमाणे आहे :-

मुक्ताईनगर (जि. जळगाव) येथे प्रो. प्रा. योगराज कन्स्ट्रक्शन/योगराज इन्फ्रास्ट्रक्चर, मुक्ताईनगर हा शासनाचा नोंदणी कृत मक्तेदार असणे, या नोंदणी कृत कन्स्ट्रक्शन कंपनी मध्ये श्री. नामदेव सोनवणे हे दोघे पिता-पुत्र भागीदार असून, जळगाव तसेच बुलढाणा जिल्ह्यातील नाबार्ड, प्रधानमंत्री ग्रामसडक योजना, ग्रामविकास विभाग, सार्वजनिक बांधकाम यासारख्या विभागांतर्गत निघणाऱ्या कामांच्या निविदाद्वारे कोट्यावधी रुपयांची कामे सन २०१२ ते आज पावेतो पर्यंत श्री. विनोद सोनवणे यांकडून करण्यात येणे, स्वतःच्या व वडिलांच्या नावे शासनाच्या गरिबांसाठी असणाऱ्या इदिरा गांधी कल्याणकारी योजने अंतर्गत अधिकृतरित्या एकाच कुंटुंबात दोन घरकुलांचा लाभ घेतला असणे, यासाठी सोनवणे यांनी रुपये ३५ हजार तर त्यांच्या वडिलांनी ९४ हजार रकमेचा निधी शासनाची फसवणूक करून घेतला असणे, सदर प्रकरण अंगाशी येऊ नये यासाठी सोनवणे यांनी स्वतःचे नावी असलेले घरकुलाची रक्कम शासकीय अधिकाऱ्यांना हाताशी धरून शासन जमा केल्याच्या पावत्या, नोंदी तयार केल्या असणे, त्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी कडून मा. ग्रामविकास मंत्राकडे वारंवार पाठपुरावा करूनही कोणतीही कारवाही न होणे, याबाबत शासना प्रती लोकांच्या मनात चिड व असंतोष निर्माण होणे, याबाबत शासनाने तातडीने केलेल्या व करावयाच्या उपाययोजना आणि शासनाची प्रतिक्रिया."

---

## मा.मंत्री (ग्रामविकास व पंचायत राज) यांचे निवेदन

योगराज इन्फ्रास्ट्रक्चर, मुक्ताईनगर ही शासनाची नोंदणीकृत मक्तेदार कंपनी असुन यामध्ये श्री. नामदेव गोंडू सोनवणे, श्रीम. जयश्री विनोद सोनवणे, श्री. विनोद नामदेव सोनवणे हे भागीदार आहेत. सार्वजनिक बांधकाम (उत्तर) विभाग, जळगाव अंतर्गत त्यांच्या नावे सन २०१२-१३ ते २०२३-२४ या कालावधित एकुण ७१ कामे प्रदान करण्यात आली आहेत.

बांधकाम विभाग, जिल्हा परिषद, जळगाव यांचेकडुन सन २०२१ मध्ये ०२ कामे व जिल्हा परिषद, बुलढाणा यांचेकडुन सन २०२२-२३ मध्ये ०१ काम देण्यात आले होते. महाराष्ट्र ग्रामीण रस्ते विकास संस्था, जळगाव यांच्याकडून मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेअंतर्गत सन २०१२-१३ पासून एकूण १२ कामे मंजूर करण्यात आलेली आहेत. तसेच महाराष्ट्र ग्रामीण रस्ते विकास संस्था, बुलढाणा यांच्याकडून प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेतून सन २०२२-२३ मध्ये ०१ काम व मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेतुन सन २०१९-२० मध्ये ०१ काम मंजूर करण्यात आलेले आहे. अशी एकुण १७ कामे योगराज इन्फ्रास्ट्रक्चर (भागीदारी संस्था) यांना देण्यात आली आहेत.

मुक्ताईनगर तालुक्यातील खामखेडा येथिल रहिवासी श्री. विनोद नामदेव सोनवणे श्री. नामदेव गोंडू सोनवणे या दोघांचीही नावे सन २००२-२००७ या दरम्यान दारिद्रय रेषेखालील यादीमध्ये असल्यामुळे त्यांना इंदिरा आवास योजनेंतर्गत सन २०१४-१५ घरकुल मंजुर झाले होते.

इंदिरा आवास योजनेंतर्गत एकुण रुपये ९५,०००/- अनुदान अनुज्ञेय होते. त्यापैकी श्री. नामदेव गोंडू सोनवणे यांना दोन हप्त्यांमध्ये एकुण रक्कम रू. ७०,०००/- रूपये वितरीत करण्यात आले होते. श्री. विनोद नामदेव सोनवणे यांना रक्कम रू.३५,०००/- रूपयांचा पहिला हप्ता देण्यात आला होता. श्री. विनोद नामदेव सोनवणे यांनी त्यांचे कौटुंबिक समस्येमुळे घरकुल पुर्ण करण्यास असमर्थता दर्शविल्यामुळे अदा करण्यात आलेला पहिला हप्ता रक्कम रू.३५,०००/- ग्रामपंचायतीस रोख स्वरूपात दि.०६.०९.२०१६ रोजी पंचायत समिती, मुक्ताईनगर स्तरावर भरणा केला आहे.

मा. श्री. चंद्रकांत पाटील, वि.स.स. यांनी तत्कालीन मा. मंत्री, ग्रामविकास व पंचायत राज यांचेकडे दिलेल्या दि. ०२.०७.२०२४ रोजीच्या निवेदनानुसार प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, जळगाव यांचेकडून गट विकास अधिकारी, पंचायत समिती, मुक्ताईनगर यांना दि.१२.०७.२०२४ व दि.०६.०८.२०२४ रोजी अहवाल सादर करण्याचे निर्देश देण्यात आले होते. तसेच सदर निवेदनानुसार दि.०९.०८.२०२४ व दि.२३.०९.२०२४ रोजी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, जळगाव यांचे दालनात सुनावणी घेण्यात आली होती. सदर सुनावणीमध्ये लाभार्थी गैरहजर होते. त्यानंतर लाभार्थी श्री. विनोद नामदेव सोनवणे यांनी दि.०९.१०.२०२४ रोजी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, जळगाव यांचे कार्यालयात खुलासा सादर केला.

त्यानंतर मा. श्री. चंद्रकांत पाटील, वि.स.स. यांनी दि.११.१०.२०२४ रोजी तात्काळ चौकशी करण्याची मागणी केल्यामुळे प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यत्रंणा, जळगांव व उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रापं), जि.प. जळगांव यांना मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, जळगाव यांनी चौकशीचे आदेश दिले. त्यानुसार त्यांनी दि.१२.१०.२०२४ अन्वये अहवाल सादर केला. सदर चौकशी अहवालानुसार घरकुलासाठी चुकीचा लाभ घेणाऱ्या लाभार्थ्यांच्या अनुषंगाने पब्लिक अकाउंट कमिटीच्या २०१५-१६ च्या अहवालानुसार इंदिरा आवास योजनेच्या फंडाचा गैरवापर करणाऱ्या लाभार्थ्यांकडून वसुलीचे निर्देश दिले आहेत. या प्रकरणी लाभार्थी श्री. विनोद नामदेव सोनवणे यांनी स्वतः हप्त्याची रक्कम भरलेली असुन सदर पत्राची प्रत मा. वि.स.स. यांना पाठविण्यात आली आहे.

तसेच श्री. नामदेव गोंडू सोनवणे यांना इंदिरा आवास योजने अंतर्गत रक्कम रु.७०,०००/- अनुदान वाटप झालेले असुन त्यांनी घरकुलाचे बांधकाम पुर्ण केले आहे.

---

लक्षवेधी सूचना क्र.४४९

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२५ चे प्रथम (अर्थसंकल्पीय) अधिवेशन

श्री. संतोष बागर, वि.स.स यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम, १०५ अन्वये उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना खालीलप्रमाणे आहे:-

"राज्यात अन्नपदार्थांमध्ये भेसळ मोठ्या प्रमाणात होत आहे आणि ती समाजाच्या आरोग्यासाठी आणि कल्याणासाठी एक गंभीर धोका बनली असणे; भेसळीमुळे कर्करोग, स्नायू पक्षाघात, मेंदूचे नुकसान, यकृत रोग, हृदयविकार इत्यादी आजार बळावण्याचा धोका उदभवणे; अन्न आणि औषधे यांचे विश्लेषण करण्यासाठी प्रत्येक विभागात सर्व सुविधायुक्त प्रयोगशाळा शासनाकडून उभारणे तसेच प्रशासक व तपासणी अधिकारी यांच्या नियुक्तीबाबत निष्क्रियता दाखवली जाणे; अशा केसेसमध्ये आरोपींना न्यायालयात गुन्हा सिद्ध होऊन शिक्षा होण्याचे प्रमाण वाढविण्यासाठी शासनामार्फत प्रयत्न करण्याची आवश्यकता असणे; राज्यातील अनेक महानगरपालिका, नगरपालिका इत्यादी संस्थामार्फत प्रशासक व तपासणी अधिकाऱ्यांची रिक्त पदे अद्याप भरलेली नसणे; त्याचबरोबर अन्न आणि औषधे यांचे विश्लेषण करण्यासाठी सर्व सुविधायुक्त प्रयोगशाळा स्थापन करण्यात न आल्याने अन्नपदार्थांमध्ये भेसळ करणाऱ्यांचा शोध घेऊन त्यांना प्रतिबंधित करणे तसेच शिक्षा करणेसाठी यंत्रणा कुचकामी ठरणे; जनतेच्या आरोग्याशी संबंधित या गंभीर आणि महत्त्वाच्या विषयाकडे शासनाचे दुर्लक्ष होत असल्याने पसरलेला तीव्र असंतोष व नाराजीची भावना; याबाबत शासनामार्फत तातडीने कार्यवाही करण्याची आवश्यकता व शासनाची प्रतिक्रिया."

---

मा.मंत्री (अन्न व औषध प्रशासन) यांचे निवेदन

अन्नपदार्थातील भेसळीमुळे राज्यातील नागरिकांचे आरोग्यास धोका होवू नये व जनतेस सुरक्षित, आरोग्यदायी अन्नपदार्थ उपलब्ध व्हावेत तसेच, अन्नपदार्थांची गुणवत्ता अबाधित राहावी याकरिता अन्न व औषध प्रशासन, महाराष्ट्र राज्य हे अन्न सुरक्षा व मानके कायदा, २००६ व त्याखालील नियम व नियमने यांची अमलबजावणी सक्षमपणे करीत आहे.

राज्यात सद्यस्थितीत अन्न व औषध प्रशासनांतर्गत मुंबई, छत्रपती संभाजीनगर व नागपूर येथे प्रयोगशाळा कार्यरत आहेत. पुणे व नाशिक येथे प्रशासनाची नवीन प्रयोगशाळेची बांधकामे प्रगतीपथावर असून अमरावती व कोकण विभागासाठी नवीन प्रयोगशाळा करण्याचे शासनाच्या विचाराधीन आहे. अन्न व औषध प्रशासनाच्या प्रयोगशाळेव्यतिरिक्त बृहन्मुंबई महानगरपालिकेची अन्न चाचणी प्रयोगशाळा व सार्वजनिक आरोग्य विभागांतर्गत असलेली प्रयोगशाळेकडे अन्न नमुने विश्लेषणासाठी पाठविण्यात येतात. तसेच, ऑक्टोबर, २०२४ पासून भारतीय

अन्न सुरक्षा व मानके प्राधिकरणाने प्राधिकृत केलेल्या एकूण ५ खाजगी NABL प्रयोगशाळेकडून अन्न नमुन्यांचे विश्लेषण करून घेण्यात येत आहे.

राज्यातील अन्न पदार्थामधील भेसळ रोखण्यासाठी अन्न व औषध प्रशासनामार्फत अन्न सुरक्षा मानके कायदा, २००६ अन्वये राज्यात १ एप्रिल २०२४ ते २८ फेब्रुवारी २०२५ या कालावधीत विविध अन्नपदार्थांचे एकूण ६२४२ अन्न नमुने विश्लेषणासाठी घेण्यात आले असून एकूण किंमत रु.३०.२७ कोटी रुपयांचा साठा जप्त करण्यात आला आहे. विश्लेषणासाठी घेण्यात आलेल्या एकूण ६२४२ नमुन्यांपैकी ३३३८ नमुन्यांचे विश्लेषण अहवाल प्राप्त झाले असून त्यापैकी २८३९ नमुने प्रमाणित घोषित झाले आहेत. तसेच, २५४ नमुने कमी दर्जाचे, १३९ नमुने असुरक्षित व १०६ नमुने मिथ्याछाप घोषित झाले असून २९०४ नमुन्यांचे विश्लेषणाबाबत कार्यवाही सूरु आहे. ०१ एप्रिल २०२४ ते २८ फेब्रुवारी २०२५ या कालावधीत अन्न व औषध प्रशासनामार्फत कमी दर्जाच्या व मिथ्याछाप प्रकरणांपैकी २९ प्रकरणी तडजोड अर्ज दाखल करण्यात आले असून एकूण रु. २.६६ लक्ष दंड आकारण्यात आला आहे. उर्वरित २९ प्रकरणी तडजोड अर्ज दाखल करण्याची प्रक्रिया सुरु आहे. तसेच, ५९ प्रकरणी न्यायनिर्णय अर्ज दाखल करण्यात आले असून उर्वरित २४३ प्रकरणी न्यायनिर्णय अर्ज दाखल करण्याची प्रक्रिया सुरु आहे. ९ असुरक्षित अन्न नमुने प्रकरणी मा. न्यायालयात खटले दाखल करण्यात आले असून उर्वरित १३० प्रकरणी मा. न्यायालयात खटले दाखल करण्याची प्रक्रिया सुरु आहे.

अन्न व औषध प्रशासनातील अन्न सुरक्षा अधिकारी यांनी घेतेलेले नमुने व केलेल्या तपासणीच्या अनुषंगाने न्याय निर्णयाकरिता प्रलंबित असलेल्या प्रकरणांची एकूण संख्या विचारात घेता, न्यायनिर्णयाकरिता प्रलंबित असलेल्या प्रकरणांचा जलद निपटारा होण्याकरिता अन्न व औषध प्रशासनातील २५ सहायक आयुक्त (अन्न) संवर्गातील अधिकारी यांना तात्पुरत्या स्वरुपात न्यायनिर्णय अधिकारी म्हणून अधिसूचित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत ८ सहायक आयुक्त (अन्न), गट- अ व १९४ अन्न सुरक्षा अधिकारी, गट-ब यांची निवड करण्यात आली असून शिफारसपात्र उमेद्वारांच्या कागदपत्रांची पडताळणी करण्याची कार्यवाही सुरू आहे. सदरप्रमाणे पडताळणीची कार्यवाही झाल्यानंतर सदरहू उमेद्वारांना नियुक्ती देण्यात येणार आहे. तसेच, वैज्ञानिक अधिकारी, गट-ब या संवर्गाची १४ रिक्त पदे सरळसेवेने भरण्याबाबातचे मागणीपत्र महाराष्ट्र लोकसेवा आयोगास पाठविण्याची कार्यवाही सुरू आहे. अन्न व औषध प्रशासन प्रयोगशाळा वर्ग-३ संवर्गातील विश्लेषण रसायन शास्त्रज्ञ यांची १९ पदे व वरिष्ठ तांत्रिक सहायक यांची ३७ पदे भरण्यासाठी परीक्षा पार पडली असून निवड प्रक्रिया अंतिम टप्प्यात आहे.

अन्न व औषधे प्रशासनाच्या मुंबई, छत्रपती संभाजीनगर व नागपूर येथील प्रयोगशाळेमधील विश्लेषणसाठी प्राप्त प्रलंबित नमुन्यांची संख्या व मनुष्यबळाची कमतरता विचारात घेता, अन्न व औषध प्रशासनाच्या तीनही प्रयोशाळांमध्ये अन्न सुरक्षा पद्धतीचे बळकटीकरण या योजनेअंतर्गत कंत्राटी पद्धतीने ५६ बेंच केमिस्टची नेमणुक करण्यात आली आहे.

********

H/८८७२८-१९

लक्षवेधी सूचना क्र.२१६१

महाराष्ट्र विधानसभा
सन २०२५ चे प्रथम (अर्थसंकल्पीय) अधिवेशन

श्री. विश्वजीत कदम, वि.स.स यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम, १०५ अन्वये उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना खालीलप्रमाणे आहे:-

"सांगली जिल्हयात प्रतिबंधित गुटखा, मावा व नशिल्या रिमझीम, फुलचंद पानांची सर्रास विक्री होत असल्याचे माहे मार्च, २०२५ च्या पहिल्या आठवडयात निदर्शनास येणे, जिल्हयाभरात जिल्हा परिषदेच्या बहूतांश प्राथमिक शाळा पानटप-यांनी वेढल्या गेल्या असून तेथे हे नशिले पानांचे वीडे सर्रास विकले जाते, शाळकरी वयातील पानांचे मुलांची नशेची सुरुवात या पानांपासून होणे, त्यामुळे विडयाच्या पानात नशेच्या गोळया किंवा औषधांचा समावेश होत असल्याच्या तक्रारी वारंवार येणे, याशिवाय येथे नशेसाठी वापरत असलेल्या मेफेनटमाईन या इंजेक्शनची विक्री मोठया प्रमाणात हात असणे, या नशेच्या इंजेक्शनचा वापर करणा-यांची ही संख्या अधिक असणे, त्यामुळे शासनाने सांगली जिल्हयातील नशेच्या पदार्थाची साठवणूक, विक्री रोखण्याबाबत कारवाई करण्याची आवश्यकता असतानाही होत असलेला विलंब, परिणामी राज्यातील जनतेत पसरलेले असंतोषाचे वातावरण व नाराजीची भावना, शासनाने याबाबत करावयाची तातडीची कार्यवाही व उपाययोजना"

---

मा.मंत्री (अन्न व औषध प्रशासन) यांचे निवेदन

राज्यात अन्न व औषध प्रशासनामार्फत अन्न सुरक्षा व मानके कायदा, २००६ अंतर्गत गुटखा, पान मसाला, सुगंधित तंबाखू, सुगंधित सुपारी व तत्सम पदार्थाच्या उत्पादन, साठा, विक्री, वाहतूक (महाराष्ट्र राज्यामध्ये व राज्यातून), वितरण करण्यास दिनांक २० जुलै २०१२ पासून दरवर्षी एक वर्षाच्या कालावधीसाठी प्रतिबंध घालण्यात येत आहे. सद्यस्थितीत दिनांक १२/०७/२०२४ रोजीच्या अधिसूचनेन्वये दिनांक २० जुलै २०२४ पासून एक वर्षाकरिता राज्यात गुटखा, पान मसाला, सुगंधित तंबाखू, सुगंधित सुपारी व तत्सम पदार्थास उत्पादन, विक्री, वितरण, साठा, वाहतूक (महाराष्ट्र राज्यामध्ये व राज्यातून) करण्यास प्रतिबंध घालण्यात आलेला आहे. त्यानुसार गुटखा, पान मसाला, सुगंधित तंबाखू, सुगंधित सुपारी व तत्सम अन्न पदार्थाची उत्पादन, विक्री, वितरण, साठा, वाहतूक (महाराष्ट्र राज्यामध्ये व राज्यातून) करणाऱ्या व्यक्ती/आस्थापनांवर अन्न व औषध प्रशासनामार्फत नियमितपणे कारवाई करण्यात येते.

सांगली जिल्ह्यात विड्याच्या पानात नशेच्या गोळया किंवा औषधांचा समावेश होत असल्याबाबतच्या तक्रारी अन्न व औषध प्रशासनाच्या सांगली कार्यालयात प्राप्त नाहीत. तथापि, अन्न व औषध प्रशासनाने सांगली जिल्ह्यात गुटखा व तत्सम प्रतिबंधीत पदार्थाच्या अनुषंगाने ०१ एप्रिल २०२४ ते २८ फेब्रुवारी २०२५ या

कालावधीत एकूण पाच ठिकाणी कारवाया करण्यात आल्या असून एकूण रु. ६९,३४,४८४/- इतक्या किंमतीचा साठा जप्त करण्यात आला आहे. सदर कालावधीत एकूण तीन वाहने जप्त करण्यात आली असून दोन आस्थापना व एक गोदाम सील करण्यात आले आहे. तसेच, सर्व प्रकरणी प्रथम खबरी अहवाल नोंदविण्यात आले आहेत.

अन्न व औषध प्रशासनाने पोलिसांमार्फत सांगली जिल्ह्यात माहे एप्रिल, २०२४ ते फेब्रुवारी, २०२५ या कालावधीत मेफेनटरमाईन इंजेक्शन व तत्सम नशेसाठी गैरवापर करण्यात येणाऱ्या औषधांच्या एकूण पाच प्रकरणात कारवाई करण्यात आली असून सर्व प्रकरणात संबधितांविरूद्ध प्रथम खबर अहवाल दाखल करण्यात आले आहेत. त्यापैकी दोन प्रकरणात संबधितांविरूद्ध मुख्य न्यायदंडाधिकारी, सांगली यांचे न्यायालयात खटले दाखल करण्यात आले आहेत. तसेच, उर्वरीत तीन प्रकरणी पुढील तपास पोलिसांसमवेत सुरू आहे. सदर ठिकाणी आढळून आलेल्या औषधांचे नमुने विश्लेषणासाठी घेण्यात आले असून तेथील साठा पोलिसांनी जप्त केला आहे.

राज्यात मुख्यत: शाळांमध्ये अंमली पदार्थांची वाढत असलेली विक्री व अंमली पदार्थाचा महाविद्यालयातील युवकांमध्ये होत असलेला प्रसार व त्यामुळे विद्यार्थी जीवनावर होणारे विपरीत परिणाम लक्षात घेऊन याबाबत शासनाने शाळा तसेच महाविद्यालयातील विद्यार्थ्यांमध्ये जागरुकता मोहीम सुरु करुन अंमली पदार्थांच्या विक्रीवर आळा बसविण्यासाठी व लहान मुलांमध्ये नशा करण्याबद्दलची प्रवृत्ती टाळण्यासाठी केंद्र शासनाने संयुक्त कृती योजना (Joint Action plan) "Prevention of Drug and Substance Abuse among Children and Illicit Trafficking" दिनांक ०९/०२/२०२१ रोजी निर्गमित केली आहे. सदर संयुक्त कृती योजनेची अंमलबजावणी गृह विभाग, शालेय शिक्षण विभाग, नारकोटिक कंट्रोल ब्युरो, सामाजिक न्याय विभाग व इतर विविध विभागामार्फत करण्यात येते. तसेच, अंमली पदार्थ वापर/गैरवापर, आळा घालण्यासाठी केंद्रीय/राज्यस्तर/जिल्हास्तर स्थापित अंमली पदार्थ समन्वय समिती (NARCO CORDINATION CENTRE- NCORD) यांची वेळोवेळी बैठक होते.

ज्या नारकोटिक द्रव्यांचा औषध म्हणून वापर होतो त्या औषधांचे उत्पादन, साठवणूक, विक्री, वितरण इत्यादीचे नियंत्रण अन्न व औषध प्रशासनामार्फत करण्यात येत असून अशा अंमलीपदार्थयुक्त औषधांचा नशेसाठी गैरवापर होऊ नये म्हणून विशेष तपासणी मोहिम राबविण्यात येतात. औषध निरीक्षकांद्वारे वेळोवेळी किरकोळ औषध विक्रेत्यांच्या औषधे व सौंदर्य प्रसाधने कायदा, १९४० व नियमाअंतर्गत तपासण्या करण्यात येतात. सदर तपासण्यांमध्ये विना प्रिस्क्रीपशनद्वारा औषधाची विक्री केली जाते किंवा कसे, ही बाब सुध्दा पडताळण्यात येते. ज्या प्रकरणी विक्रेत्यांद्वारे अशा प्रकारचे गंभिर उल्लंघने आढळून येतात त्यांच्यावर परवाने निलंबन अथवा परवाने रद्दची कारवाई करण्यात येते. अन्न व औषध प्रशासनाने माहे एप्रिल, २०२४ ते फेब्रुवारी, २०२५ या कालावधीत किरकोळ औषध विक्री पेढ्यांच्या एकूण ८८६४ तपासण्या करण्यात आलेल्या आहेत. त्यापैकी २६८७ औषध पेढीचे परवाने निलंबन केले असून ३३१ पेढीचे परवाने रद्द केले आहे.

********

## सन २०२५ चे अर्थसंकल्पिय अधिवेशन

**श्री.सुधीर मुनगंटीवार वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम, १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे :-**

"बल्लारपूर मतदार संघामध्ये शहरी व ग्रामीण भागात मोठया प्रमाणात संजय गांधी निराधार व श्रावणबाळ योजनेचे लाभार्थी असणे, निराधार लाभार्थ्यांचे पालनपोषण उक्त योजनांच्या मानधनातुन होणे, परंतु उक्त योजनांचे मानधन मागील तीन महिन्यांपासून नियमित न मिळणे, त्यामुळे लाभार्थ्यांच्या उपजिवीकेचा प्रश्न निर्माण होणे, दैनंदिन गरजांची पूर्तता न होणे, वृध्दांना वेळेच्या आत औषध उपलब्ध न होणे व इतर आर्थिक संकटांना तोंड द्यावे लागणे या समस्या निर्माण होणे, शासनाचे याकडे होणारे अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाय योजना"

******************************************************************************

**श्री. नरहरी झिरवाळ, मा. मंत्री, विशेष सहाय्य यांचे निवेदन :-**

सामाजिक न्याय आणि विशेष सहाय्य विभागांतर्गत राज्य पुरस्कृत संजय गांधी निराधार अनुदान योजना व श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन योजना या योजना राबविण्यात येतात. सदर राज्य पुरस्कृत योजनेत निराधार, आर्थिक दुर्बल घटकांचा समावेश असून सदर योजनेतील पात्र लाभार्थ्यांना दरमहा रु.१५००/- इतके अर्थसहाय्य देण्यात येत आहे.

विशेष सहाय्य योजनेतील पात्र लाभार्थ्यांना थेट त्यांच्याच खात्यात त्वरीत रक्कम मिळण्यासाठी दरमहा अर्थसहाय्याचे वितरण डी.बी.टी. पोर्टलव्दारे करण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे. त्यानुसार सदर योजनेतील पात्र लाभार्थी योजनेच्या लाभापासून वंचित राहू नये यासाठी लाभार्थ्यांची माहिती विहीत विवरणपत्रात भरुन डी.बी.टी. पोर्टलवर अपलोड करण्यासंदर्भात जिल्हाधिकारी कार्यालयांना वेळावेळी सूचना दिलेल्या आहेत. तसेच वेळावेळी वरीष्ठ स्तरावरुन व्हिडीओ कॉन्फरन्सद्वारे निर्देश दिलेले आहेत.

बल्लारपूर मतदार संघामध्ये बल्लापूर, मुल, पोंभुर्णा व चंद्रपूर मधील ग्रामीण भाग समाविष्ट आहे. मुल, पोंभुर्णा आणि चंद्रपूर तालुक्यातील विशेष सहाय्य योजनेंतर्गत काही लाभार्थ्यांचे माहे ऑक्टोबर व नोव्हेंबर,२०२४ चे अर्थसहाय्य लाभार्थ्यांना तालुका स्तरावरुन अदा करण्यात आले आहे. तसेच माहे डिसेंबर, २०२४ व जानेवारी ते मार्च, २०२५ पर्यंतचे अर्थसहाय्य डी.बी.टी. पोर्टलव्दारे शासन स्तरावरुन अदा करण्यात आले आहे.

बल्लारपूर तालुक्यातील संजय गांधी निराधार योजनेंतर्गत अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीमधील काही लाभार्थ्यांचे माहे ऑक्टोबर व नोव्हेंबर, २०२४ चे अर्थसहाय्य अर्थसंकल्पीय प्रणालीवरील तांत्रिक अडचणीमुळे आहरीत करता आले नाही. सदर अर्थसहाय्य प्रलंबित असलेल्या

लाभार्थ्यांची माहीती शासनास प्राप्त झाली असून, सदर लाभार्थ्यांचे अनुदान डी.बी.टी. पोर्टलद्वारे थेट लाभार्थ्यांच्या खात्यात वितरीत करण्याची कार्यवाही सुरु आहे.

संजय गांधी निराधार अनुदान योजना व श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन योजनेतील डी.बी.टी. पोर्टलवर नोंदणी झालेल्या सर्व लाभार्थ्यांना माहे डिसेंबर, २०२४ चे अर्थसहाय्य डी.बी.टी. पोर्टलद्वारे थेट त्यांच्या खात्यात जमा करण्यात आले आहे. माहे जानेवारी, २०२५ पासून डी.बी.टी. पोर्टलवर नोंदणीकृत आधार प्रमाणित (Aadhar Validate) झालेल्या लाभार्थ्यांनाच डी.बी.टी. पोर्टलद्वारे अर्थसहाय्य वितरीत करण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे. त्यानुसार विशेष सहाय्य योजनांचे मार्च, २०२५ पर्यंतचे अर्थसहाय्य लाभार्थ्यांच्या खात्यात जमा करण्यात आले आहे. माहे जानेवारी, २०२५ मध्ये ३१,५९,७२९, माहे फेब्रुवारी, २०२५ मध्ये ३२,६९,९०० व माहे मार्च, २०२५ मध्ये ३२,७४,६७० इतक्या लाभार्थ्यांना डी.बी.टी. पोर्टलद्वारे अर्थसहाय्य वितरीत करण्यात आले आहे.

तसेच विशेष सहाय्य योजनेतील लाभार्थी लाभापासून वंचित राहू नयेत यासाठी शासन स्तरावरुन अ.शा.पत्र दि.२४/०१/२०२५ व दि.०५/०३/२०२५ अन्वये तसेच अर्थसहाय्य वितरणाच्या शासन निर्णयांद्वारे सर्व जिल्हाधिकारी यांना डी.बी.टी. पोर्टलवर प्रलंबित असलेल्या लाभार्थ्यांची माहिती भरण्याची कार्यवाही युध्दपातळीवर करणेबाबत तसेच लाभार्थ्यांचे आधार अद्ययावत/बँक खाते आधार संलग्न करण्यासाठी जिल्हा/तालुका/मंडळस्तरावर विशेष मोहिम राबवून लाभार्थ्यांचे आधार १०० टक्के अद्ययावत करण्याबाबत सूचना देण्यात आलेल्या आहेत. त्यानुसार जिल्हाधिकारी कार्यालयांकडून कार्यवाही सुरु आहे.

*****************************************************************

## लक्षवेधी सूचना क्र.१४९७

### सन २०२५ चे अर्थसंकल्पिय अधिवेशन

**श्री. चंद्रकांत रमाकांत नवघरे, श्री. चेतन विठ्ठल तुपे, श्री. अनिल भाईदास पाटील, श्रीमती सुलभा संजय खोडके, श्री. शंकर हिरामण मांडेकर, श्री. राघवेंद्र (रामदादा) मनोहर पाटील, डॉ.जितेंद्र सतिश आव्हाड, श्री. मंगेश रमेश चव्हाण, श्री. दौलत भिका दरोडा, श्री. ज्ञानेश्वर ऊर्फ माऊली आबा कटके, श्रीमती सना मलिक, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम-१०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे :-**

"राज्य सरकारकडून संजय गांधी निराधार अनुदानयोजना व श्रावणबाळसेवा राज्य निवृत्तीवेतन योजना राबविली जाणे, मात्र यायोजनेतील तब्बल १० लाख लाभार्थीची बँकखाती आधारकार्डशी जोडली गेली नसल्याचे निदर्शनास आलेले असणे, त्यामुळे मागील दोन महिन्यांपासून यालाभार्थीचे अर्थसहाय्य बंद करण्यांत येणे, लाभ मिळत नसल्याने जिल्हा बँकांसह अन्य बँकेत लाभार्थी फेऱ्या मारत असून त्याठिकाणी वादावादीचे प्रसंगही घडणे, निराधार व्यक्ती, अंध, विकलांग, अनाथ मुले, दीर्घ आजारी असणाऱ्या व्यक्तीं, घटस्फोटीत स्त्रिया आदिं लाभार्थीना संजयगांधी निराधार योजनेतून तर श्रावणबाळ सेवा राज्यनिवृत्तीवेतन योजनेतून देखील निराधानांना प्रत्येकी १,५०० रुपये आर्थिक लाभ दिला जात असणे, यापूर्वी तसेंच लाभार्थ्यांच्या याद्या बँकांना दिल्या जात असणे, व त्यायाद्यांच्या आधारे बँकेकडून लाभार्थीच्या खात्यावर लाभार्थी रक्कम जमा केली जाणे, तथापि शासनाने आता लाभार्थीच्या खात्यावर थेट रक्कम जमा करण्याचा निर्णय शासनाने घेऊन डिसेंबर,२०२४ पासून नव्या निर्णयाची अंमलबजावणी सुरु करण्यांत आलेली असणे, लाभार्थीना थेट लाभ हस्तांतर करण्यापूर्वी त्यांची बँक खाती आधारकार्डाशी जोडण्याचे आदेश बँक आणि जिल्हाधिकारी यांना देण्यांत आल्यामुळे मात्र सर्वचलाभार्थीची बँकखाती आधारकार्डाशी संलग्न करण्यात प्रशासनाला आलेले अपयश, परिणामी लाभार्थ्यांकडून निधीची होत असलेली मागणी विचारांत घेतां संजयगांधी निराधार योजना, श्रावणबाळ सेवा व यासह अन्यलाभार्थ्यांचे आधारकार्ड बँकखात्याशी तातडीने जोडण्याबाबत शासनाने केलेली वा करण्यांत येत असलेली उपाययोजना."

---

### श्री. नरहरी झिरवाळ, मा. मंत्री, विशेष सहाय्य यांचे निवेदन :-

सामाजिक न्याय आणि विशेष सहाय्य विभागांतर्गत राज्य पुरस्कृत संजय गांधी निराधार अनुदान योजना व श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन योजना या योजना राबविण्यात येतात. सदर राज्य पुरस्कृत योजनेत निराधार, आर्थिक दुर्बल घटकांचा समावेश असून सदर योजनेतील पात्र लाभार्थ्यांना दरमहा रु.१५००/- इतके अर्थसहाय्य देण्यात येत आहे. सदर योजनेसाठी दारिद्रय रेषेखालील यादीच्या कुटुंबात नाव असणे अथवा रु.२१,०००/- पेक्षा कमी वार्षिक उत्पन्न असणे आवश्यक आहे. तसेच संजय गांधी निराधार अनुदान योजना व श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन योजनेतील दिव्यांग लाभार्थ्यांसाठी वार्षिक कौटुंबिक उत्पन्न मर्यादा रु.५०,०००/- इतकी करण्यात आली आहे.

[कृ.मा.प.]

रोप्रा H/1433 (750-3-25)

विशेष सहाय्य योजनेतील पात्र लाभार्थ्यांना थेट त्यांच्याच खात्यात त्वरीत रक्कम मिळण्यासाठी दरमहा अर्थसहाय्याचे वितरण डी.बी.टी. पोर्टलद्वारे करण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे. त्यानुसार विशेष सहाय्य योजनेतील लाभार्थ्यांना अर्थसहाय्याचे वितरण डी.बी.टी. द्वारे करण्याबाबत महाआयटी कार्पोरेशन लिमिटेड यांना दिनांक १२ जानेवारी, २०२४ रोजी कार्यादेश देण्यात आले. त्यानुषंगाने विभागाच्या दिनांक १२.०३.२०२४, दि.१६.०४.२०२४, दि.२१.०५.२०२४, दि.११.०६.२०२४, दि.०४/०९/२०२४ रोजीच्या पत्रांन्वये सदर योजनेतील पात्र लाभार्थी योजनेच्या लाभापासून वंचित राहू नये यासाठी लाभार्थ्यांची माहिती विहीत विवरणपत्रात भरुन डी.बी.टी. पोर्टलवर अपलोड करण्यासंदर्भात जिल्हाधिकारी कार्यालयांना वेळावेळी सूचना दिलेल्या आहेत. तसेच वेळावेळी वरीष्ठ स्तरावरुन व्हिडीओ कॉन्फरन्सद्वारे निर्देश दिलेले आहेत.

संजय गांधी निराधार अनुदान योजना व श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन योजनेतील डी.बी.टी. पोर्टलवर नोंदणी झालेल्या सर्व लाभार्थ्यांना माहे डिसेंबर, २०२४ चे अर्थसहाय्य डी.बी.टी. पोर्टलद्वारे थेट त्यांच्या खात्यात जमा करण्यात आले आहे. माहे जानेवारी, २०२५ पासून डी.बी.टी. पोर्टलवर नोंदणीकृत आधार प्रमाणित (Aadhar Validate) झालेल्या लाभार्थ्यांनाच डी.बी.टी. पोर्टलद्वारे अर्थसहाय्य वितरीत करण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे. त्यानुसार विशेष सहाय्य योजनांचे मार्च, २०२५ पर्यंतचे अर्थसहाय्य लाभार्थ्यांच्या खात्यात जमा करण्यात आले आहे. माहे जानेवारी, २०२५ मध्ये ३१,५९,७२९, माहे फेब्रुवारी, २०२५ मध्ये ३२,६९,९०० व माहे मार्च, २०२५ मध्ये ३२,७४,६७० इतक्या लाभार्थ्यांना डी.बी.टी. पोर्टलद्वारे अर्थसहाय्य वितरीत करण्यात आले आहे.

तसेच विशेष सहाय्य योजनेतील लाभार्थी लाभापासून वंचित राहू नयेत यासाठी शासन स्तरावरुन अ.शा.पत्र दि.२४/०१/२०२५ व दि.०५/०३/२०२५ अन्वये तसेच अर्थसहाय्य वितरणाच्या शासन निर्णयांद्वारे सर्व जिल्हाधिकारी यांना डी.बी.टी. पोर्टलवर प्रलंबित असलेल्या लाभार्थ्यांची माहिती भरण्याची कार्यवाही युध्दपातळीवर करणेबाबत तसेच लाभार्थ्यांचे आधार अद्ययावत/बँक खाते आधार संलग्न करण्यासाठी जिल्हा/तालुका/मंडळस्तरावर विशेष मोहिम राबवून लाभार्थ्यांचे आधार १०० टक्के अद्ययावत करण्याबाबत सूचना देण्यात आलेल्या आहेत. त्यानुसार जिल्हाधिकारी कार्यालयांकडून कार्यवाही सुरु आहे.

*******************************

## महाराष्ट्र विधानसभा

## सन २०२५ चे प्रथम (अर्थसंकल्पीय) अधिवेशन

**लक्षवेधी सुचना क्र.२५३८**

**श्री.साजिद पठाण, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र.२५३८ पुढीलप्रमाणे आहे: -**

**"वित्त व नियोजन विभाग सन २००१ मध्ये डॉ. भांडे समिती चा रिपोर्ट आल्यावर तब्बल २० वर्षांनी राज्यशासनाने सन २०१९ मध्ये स्विकारला असणे, असे असतांनाही राज्यातील धोबी समाजाला सन २००१ मध्ये डॉ.भांडे समितीच्या तिस-या अहवालातील शिफारशीनुसार तात्काळ सवलती प्रामुख्याने आरक्षण देण्यास विलंब होत असल्याचे माहे मार्च, २०२५ मध्ये निदर्शनास येणे, समितीच्या तिस-या शिफारशीमध्ये स्पष्ट उल्लेख असतानाही धोबी समाजाला त्या समाजाच्या संख्येच्या प्रमाणात तत्सम सवलती लागू करण्याची आवश्यकता असणे, धोबी समाजाला कुठलेही आरक्षण न देता फक्त अन्याय सुरु असणे, सन्मा मुख्यमंत्री जेव्हा विरोधी पक्ष नेते होते तेव्हा त्यांनी डॉ. भांडे समितीचा रिपोर्ट असतांना देखील बार्टी चा रिपोर्ट मागण्यात येत असतांना बार्टीचा रिपोर्ट मागण्याची काय आवश्यकता असे मत व्यक्त केले असणे, परंतू ते सध्य:स्थिततही बार्टीचा अहवालाची मागणी करुन धोबी समाजाला अंधारात ठेवत असणे, यामुळेच मागील अनेक वर्षापासून प्रलंबित असलेले धोबी समाजाच्या आरक्षणास विलंब होत असणे, तत्कालीन विरोधी पक्ष नेते व सध्याचे मुख्यमंत्री धोबी समाजाच्या विविध प्रश्न प्रामुख्याने आरक्षणचा विषय गांर्भीयाने न घेणे, आरक्षणाबाबत होत असलेल्या विलंबामुळे धोबी समाजातील नागरिकांमध्ये निर्माण झालेली चिड, असंतोष लक्षात घेता शासनाने त्वरीत याबाबत करावयाची आवश्यक कार्यवाही तसेच याबाबत शासनाची प्रतिक्रिया ..."**

## मा. मंत्री (सामाजिक न्याय) यांचे निवेदन

'धोबी' जातीचा समावेश इतर मागासवर्ग जाती यादीमध्ये अ.क्र.१२५ वर करण्यात आला आहे. या जातीच्या नागरिकांना सध्या इतर मागासवर्गीयांसाठी अनुज्ञेय असलेले लाभ देय आहेत. 'धोबी' जातीचा समावेश अनुसूचित जातीच्या यादी करावा किंवा कसे डॉ. डी. एम. भांडे यांच्या अध्यक्षतेखाली शासन निर्णय, दि.०५.०९.२००१ मध्ये समिती गठीत करण्यात आली होती. सदर समितीने त्यांचा अहवाल दि.०५.०३.२००२ रोजी शासनास सादर केला होता. तदनंतर, तत्कालिन मा.मंत्री (सामाजिक न्याय) यांच्या अध्यक्षतेखाली नेमण्यात आलेल्या समितीने सदर अहवालावर डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे यांचे अभिप्राय घेण्याचा निर्णय घेतला.

डॉ.भांडे समिती व डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे यांचे अहवाल राज्य शासनाच्या दि.१३.०४.२००५ च्या पत्रान्वये पुढील उचित कार्यवाहीसाठी केंद्र शासनाकडे पाठविण्यात आले होते. त्यानुषंगाने केंद्र शासनाने दि.०३.०५.२००५ च्या पत्रान्वये सविस्तर जातीय अभ्यासाच्या माहितीसह विहीत नमून्यात केंद्र सरकारकडे प्रस्ताव फेरसादर करण्याबाबत राज्य शासनास कळविल होते.

राज्य शासनाच्या दि.०४.०९.२०१९ रोजीच्या पत्रान्वये केंद्र शासनास डॉ. भांडे समितीचा अहवाल विचारात घेण्याबाबत कळविण्यात आले होते. त्याअनुषंगाने केंद्र शासनाने दि.०१.१०.२०१९ रोजीच्या पत्रान्वये दि.०३.०५.२००५ च्या पत्रासोबतच्या विहित विवरणपत्रामधील माहितीसह सुधारित प्रस्ताव सादर करण्यास

शेरा - बिस-१३०२ (८५०-३-२०२५)

(कृ.मा.प.)

कळविले होते. त्यास अनुसरुन शासन पत्र, दि.२२.१०.२०२१ अन्वये केंद्र शासनास सुधारित प्रस्ताव सादर करण्यात आला होता.

सदर प्रस्तावास भारताचे रजिस्ट्रार जनरल व सेन्सस कमिश्नर (ORGI) यांनी दि.१७.०६.२०२२ अन्वये समर्थन दिलेले नसल्याचे सामाजिक न्याय व अधिकारीता मंत्रालय, भारत सरकार यांनी दि.२९.०६.२०२२ रोजीच्या पत्रान्वये राज्य शासनास कळविले असून, सदर प्रस्तावाचे पुनर्विलोकन करण्याबाबत किंवा भारताचे रजिस्ट्रार जनरल व सेन्सस कमिश्नर (ORGI) यांनी उपस्थित केलेल्या मुद्दयांच्या अनुषंगाने पुन्हाः सविस्तर माहितीसह प्रस्ताव सादर करण्याबाबत कळविले आहे. त्यास अनुसरून डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे यांनी सादर केलेला अहवाल राज्य शासनाच्या दि.२१.०९.२०२३ रोजीच्या पत्रान्वये केंद्र शासनाकडे पाठविण्यात आला. केंद्र शासनाच्या दि.२७.०९.२०२४ रोजीच्या पत्रान्वये महाराष्ट्र राज्यातील अनुसूचित जातीच्या यादीत धोबी जातीचा समावेश करण्यासंदर्भात भारताचे रजिस्ट्रार जनरल व सेन्सस कमिश्नर (ORGI) यांनी उपस्थित केलेल्या मुद्दयांच्या समर्थनार्थ आवश्यक ती माहिती सादर करण्याबाबत शासन पत्र, दि.२३.०१.२०२५ अन्वये डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे यांना कळविण्यात आले आहे. प्रस्तुत प्रकरणी डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे यांचेकडून कार्यवाही करण्यात येत आहे.

अनुसूचित जातीच्या यादीत कोणत्या जातीचा समावेश करण्यात यावा किंवा वगळण्यात यावा, याबाबतचे अधिकार राज्य घटनेच्या अनुच्छेद ३४१ नुसार केंद्र शासनास आहेत.

*****

# महाराष्ट्र विधानसभा
## सन-२०२५ चे प्रथम (अर्थसंकल्प) अधिवेशन

मा.श्री.रवी राणा, वि.स.स.यांनी महाराष्ट्र विधानासभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र.१६१० खालीलप्रमाणे आहे.:-

"अमरावती जिल्ह्यातील आदिवासी बहुल क्षेत्र मेळघाट धारणी येथे अतीदुर्गम परिसरात स्वतंत्र बस आगार निर्मितीचा प्रस्ताव शासनाकडून मंजूर करून देणेबाबत वी. स.स.लोकप्रतिनिधी यांनी त्यांचे पत्र क्रमांक ८४५/२०२५ दि.१०/०२/२०२५ रोजी विद्यमान मुख्यमंत्री व परिवहन मंत्री यांना व परिवहन विभागाचे सचिव तसेच अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक वाहतूक भवन मुंबई यांना मेल द्वारे पत्र पाठवले असणे. यापूर्वीही विभाग नियंत्रक रा. प. महामंडळ अमरावती यांनी त्यांचे पत्र क्रमांक २६१८ दि.१३ डिसेंबर २०२३ रोजी महाव्यवस्थापक नियोजन व पनन मुंबई यांना प्रस्ताव पाठविला असणे. तसेच बडनेरा आगारसाठी १८ ई बसेस उपलब्ध करून देण्याचे नियोजन असल्याचे महाव्यवस्थापक वाहतूक म. रा. म. प. वाहतूक भवन मुंबई यांनी त्यांचे पत्र क्रमांक ७४१ दिनांक ११ फेब्रुवारी २५ रोजी चे लेखी पत्र पाठवून वि.स.स.लोकप्रतिनिधी यांना कळविले असणे परंतु अद्यापपर्यंत या संबंधाने कोणतीच कार्यवाही झालेली नसणे, या पूर्वीही व्हि.सी.एम.डी. परिवहन मुंबई यांना वि.स.स.लोकप्रतिनिधी यांनी गेल्या माहे जानेवारी व फेब्रुवारी या महिन्यात बरेच पत्र पाठविले असणे,परंतु त्यावर कोणतीच कार्यवाही त्यांनी केली नसणे. वरील प्रमाणे शासनाकडे व त्याचे परिवहन वीभागात केलेली लेखी मागणी या संबंधाने शासनाने त्या मागण्या मंजूर करणेसाठी याबाबत शासनाने निर्णय घेण्याची आवश्यकता व करावयाची कार्यवाही व उपाययोजना"

## निवेदन

{श्री.प्रताप सरनाईक,मा.मंत्री (परिवहन)}

धारणी जिल्हा अमरावती येथे नवीन आगार निर्मितीबाबत मा.श्री.रवी राणा, विधानसभा सदस्य यांनी केलेल्या विनंती आणि सदर तालुक्याची भौगोलिक परिस्थितीही दुर्गम व घनदाट असून शासनाने धारणी हे गाव अदिवासी भाग म्हणून घोषित केल्याने ग्रामिण भागातील रा.प.सेवा सुरू करून प्रवाशांची गैरसोय टाळणेकरीता व वाहतूकीचे जाळे निर्माण होण्यास मदत होणार असल्याने रा.प.महामंडळाने

दि.०१/१०/२०२४ अन्वये धारणी आगार निर्मितीसाठी ठराव पारित केला आहे. त्यानुषंगाने कार्यवाही करण्यात येत आहे.

तसेच, मा. श्री. रवी राणा विधानसभा सदस्य, यांच्या मागणीनुसार १८ ई-बसेस बडनेरा आगारासाठी देण्याचे नियोजन असुन, रा.प.महामंडळाच्या स्वमालकीच्या साध्या बसेस प्राप्त झाल्यानंतर त्या आगारांना/ विभागांना वाटप करण्यात येईल. असे महाव्यवस्थापक (वाहतूक) यांनी विधानसभा सदस्य यांना दि.११.०२.२०२५ च्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे.

*****

लक्षवेधी सूचना क्र.७७५

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२५ चे पहिले (अर्थसंकल्पीय) अधिवेशन

महाराष्ट्र विधानसभा नियम - १०५ अन्वये लक्षवेधी सूचना क्र.७७५

श्री. भीमराव केराम, मा.वि.स.स. यांनी उपस्थित केलेली महाराष्ट्र विधानसभा नियम - १०५ अन्वये लक्षवेधी सूचना क्र.७७५ पुढीलप्रमाणे आहे :-

"ग्रामपंचायत लांजी तालुका माहूर जिल्हा नांदेड येथे सन २०२४-२५ मध्ये रोहयोअंतर्गत फेवर ब्लॉकची प्रत्येकी दहा लाखाची चार व १५ लाखाचे एक असे एकूण पाच व जि प प्राथमीक शाळा संरक्षण भिंतीचे काम एक अशी एकूण ६५ लाखाची सहा कामे मंजूर करण्यात आली आहेत. प्रत्यक्ष कोणतेही काम न करता प्रत्येक कामाचे त्यामध्ये अकुशल देयकाचे मस्टर काढून एम आय एस करुन शासनाची फसवणूक करीत असणे, दिनांक २८-१-२०२५ रोजी सुरु करण्यात आलेल्या सीसी रोडचे कोणतेही खोदकाम केले नसून, जुन्या रस्त्यावरच बॉर्डर गिट्टी अंथरुण त्यावर काम करण्यात येत असणे, सदर कामासाठी रेतीचा वापर न करता माती मिश्रीतचुरा टाकून व अत्यल्प प्रमाणात सिमेंटच्या वापर करुन थातूरमातूरपणे निकृष्ट दर्जाचे काम करण्यात आले. सदर निधी हडपण्यासाठीच काम न करता देखावा करण्यात आला. ज्यामुळे शासनाचे लाखो रुपयांचे नुकसान होणे, सबब ग्रामपंचायत लांजी तालुका माहूर जिल्हा नांदेड येथील रोहयो अंतर्गत करण्यात येत असलेल्या कामाची चौकशी करण्यात यावी व सुरु असलेले कामे तात्काळ बंद करण्यात यावी तसेच कामे न करताच अकुशल देखील काढून शासनाचे फसवणूक करणाऱ्या सर्व संबंधिताविरुद् करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रीया"

## मा.मंत्री (रोजगार हमी योजना) यांचे निवेदन

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत मौजे लांजी, ता. माहूर, जि. नांदेड या ग्रामपंचायतींतर्गत सन २०२४-२५ या आर्थिक वर्षात सिमेंट रस्ता / पेव्हर ब्लॉकची एकुण ०६ कामे सुरु असुन शाळेसाठी संरक्षक भिंतीचे ०१ काम सुरु आहे. सदर कामांवर झालेल्या अकुशल आणि कुशल स्वरुपाच्या खर्चाची माहिती खाली कोष्टकात नमूद करण्यात आली आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम | | | अकुशल खर्च | कुशल खर्च | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | अकुशल | कुशल | एकुण | | | |
| १. | जि.प.शाळा संरक्षक भिंत | ९५१५४.६६ | ८९९८४४.८७ | १०,००००० | रु.६२,९६४/- | निरंक | रु.६२,९६४/- |
| २. | सीसी रस्ता व पेव्हर ब्लॉक बसविणे | ९५३९९.२६ | ९००६००.६३ | १०,००००० | रु.६०,५८८/- | निरंक | रु.६०,५८८/- |
| ३. | सीसी रस्ता व पेव्हर ब्लॉक बसविणे | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक |
| ४. | सीसी रस्ता व पेव्हर ब्लॉक बसविणे | २२८४७३.३३ | १२६६२५.९३ | १४,९९९९९ | रु.२६,७३०/- | निरंक | रु.२६,७३०/- |
| ५. | सीसी रस्ता व पेव्हर ब्लॉक बसविणे | ९५३९९.२६ | ९००६००.६३ | १०,००००० | रु.६५,३४०/- | निरंक | रु.६५,३४०/- |
| ६. | सीसी रस्ता व पेव्हर ब्लॉक | ९५३९९.२६ | ९००५९९.६३ | ९,९९,९९९ | रु.६८,३१०/- | निरंक | रु.६८३१०/- |

वरील कामांवर केवळ अकुशल स्वरुपाचा खर्च झालेला असुन कुशल खर्च झालेला नाही. उपरोक्त कामांचा दर्जा व गुणवत्तेबाबत स्थनिकस्तरावर तक्रार प्राप्त झाली होती. तसेच, सदर कामांसंदर्भात तांत्रिक चुका देखील आढळुन आल्या होत्या. सबब, उपरोक्त कोष्टकात नमूद कामे तात्पुरत्या स्वरुपात बंद ठेवण्याबाबत सहकार्यक्रम अधिकारी तथा गटविकास अधिकारी, पंचायत समिती, माहुर, जि.नांदेड यांच्यामार्फत संबधित ग्रामपंचायतीस सुचना करण्यात आल्या आहेत.

वरील मंजुर कामावर अकुशल खर्च झालेला असल्याने सदर कामांच्या दर्जा व गुणवत्ता राखण्याबाबत तांत्रीक अधिकाऱ्यांच्या सल्ल्यानुसार कामांमध्ये सुधारणा करण्यात येईल व सदर कामे पुर्ण झाल्यांनतर कामांचे सामाजिक अंकेक्षण करण्यात येईल.

**********

लक्षवेधी सूचना क्र.१०७०

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२५ चे पहिले (अर्थसंकल्पीय) अधिवेशन

महाराष्ट्र विधानसभा नियम - १०५ अन्वये लक्षवेधी सूचना क्र.१०७०

श्री. शिरीषकुमार नाईक मा.वि.स.स. यांनी उपस्थित केलेली महाराष्ट्र विधानसभा नियम - १०५ अन्वये लक्षवेधी सूचना क्र.१०७० पुढीलप्रमाणे आहे :-

**"नंदूरबार जिल्ह्यातील नवापूर तालुक्यातील गांव/पाड्यांवर मनरेगा योजनेंतर्गत पेव्हर ब्लॉक बसविणे व रस्ता कॉक्रीटीकरणाचे कामे सुरु असणे, एजन्सीद्वारे पेव्हर ब्लॉकची कामे करतांना खोदकाम व दगड सोलिंग, P.C.C केलेली नसणे, पेव्हर ब्लॉक वॉटर फ्युरींग, रुबल सोलिंग न करणे, सदर कामांसाठी राबविण्यात आलेली निवीदा प्रक्रिया मनरेगाच्या निकषानुसार राबविलेली नसणे, सदरील कामे अत्यंत निकृष्ट व सुमार दर्जाचे असणे, त्यामुळे गांकऱ्यांच्या मनात असंतोषाची भावना असणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."**

**मा.मंत्री (रोजगार हमी योजना) यांचे निवेदन**

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत (मनरेगा) नंदूरबार जिल्ह्यातील नवापूर तालुक्यातील सिमेंट, काँक्रीट रस्ते व पेव्हर ब्लॉक बसविणे अशी एकुण ३० कामांच्या गुणवत्तेबाबत आणि निविदा प्रक्रीयेबाबत श्री.शिरीषकुमार सुरूपसिंग नाईक, मा.वि.स.स., नवापूर विधानसभा मतदारसंघ यांची तक्रार जिल्हाधिकारी कार्यालयास २७ फेब्रुवारी, २०२५ रोजी प्राप्त झाली होती. सदर कामे करताना कुठल्याही प्रकारचे खोदकाम व दगड सोलिंग न करणे, वॉटर फ्युरींग न करता रस्ता काँक्रीटीकरण व पेव्हर ब्लॉक बसविणे, निकृष्ट दर्जाचे पेव्हर ब्लॉक असणे आणि मनरेगाच्या निकषानुसार निविदा प्रक्रीया न राबविणे अशा स्वरुपाच्या तक्रारी सदर पत्रात नमूद होत्या. नवापूर तालुक्यातील मनरेगांतर्गतच्या सिमेंट काँक्रीटीकरण व पेव्हर ब्लॉक बसविणे या ३० कामांसाठी उपविभागीय अभियंता सार्वजनिक बांधकाम उपविभाग कार्यालय, नवापूर यांच्यास्तरावर विहीत पद्धतीने निविदा मागविण्यात आल्या होत्या. त्यानुसार भगवती एंटरप्रायजेस, नवापूर यांना सदर कामांसाठी पूरवठादार म्हणुन नियुक्त करण्यात आले आहे.

४. श्री.शिरीषकुमार नाईक, मा.विधानसभा सदस्य यांच्यामार्फत प्राप्त उपरोक्त तक्रारींबाबत चौकशी अहवाल सादर करण्याचे जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत तहसिलदार तथा कार्यक्रम अधिकारी, नवापूर यांना कळविण्यात आले होते. सदर कामांबाबत चौकशी करुन अहवाल सादर करण्याचे तहसिलदार, नवापूर यांच्यामार्फत उपविभागीय अधिकारी, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, नवापूर यांना आणि व्यवस्थापकीय संचालक, टॉरिऑनझिअस स्ट्रक्चर अॅण्ड टेक्नॉलॉजी या तटस्थ संस्थेस निदेश देण्यात आले आहेत. त्यानुसार सदर तटस्थ संस्थेमार्फत उपरोक्त लोकप्रतिनिधींच्या तक्रारीत नमूद ३० कामांबाबतची चौकशी सुरू करण्यात आली आहे. संदर चौकशी अहवाल प्राप्त झाल्यानंतर नियमानुसार पुढील यथायोग्य कार्यवाही करण्यात येईल.

****************

लक्षवेधी सूचना क्र. १९८६

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२५ चे प्रथम (अर्थसंकल्पीय) अधिवेशन

श्री. उमेश यावलकर विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र. १९८६ पुढीलप्रमाणे आहे :-

"मौजा लोणी व राजुरा बाजार, ता.वरुड, जि.अमरावती या भागात माहे नोव्हेंबर, डिसेंबर २०२३ या कालावधीत अतिवृष्टी व माहे एप्रिल २०२४ ला गारपीट होणे, अतिवृष्टीमुळे झालेल्या शेती पिकांच्या नुकसानीपोटी बाधितांना मदत शासन निर्णय क्रमांक - सीएलएस २०२३ प्र.क्र.२८६(११) म-३ ३१ जानेवारी २०२४ नुसार निधी वितरीत करण्यास शासनाने मंजुरी दिली असणे, तसेच गारपीट व अवेळी पावसामुळे शेती पिकांच्या नुकसानीपोटी बाधितांना मदत शासन निर्णय क्रमांक-सीएलएस २०२३ प्र.क्र.२८६ (११) म-३ दिनांक २ ऑगस्ट २०२४ नुसार निधी वितरीत करण्यास शासनाने मंजुरी दिली असणे, त्याप्रमाणे शेतक-यांनी KYC सुद्धा केलेली असणे, परंतु आता उर्वरित शेतक-यांना अनुदानाचे वाटप थांबविण्यात आलेले असणे, वरूड तालुक्यातील शेतकरी संत्रा व मोर्सची फळपिकांचे २ हंगामामध्ये पीक घेत असून अवेळी पाऊस व गारपीटमुळे संत्रा व मोर्सची उत्पादक शेतकऱ्यांना मोठ्या नुकसानाला समोर जावे लागणे, संत्रा मोसंबी फळपिकांचे दोन हंगाम लक्षात घेता संत्रा व मोसंबी उत्पादक शेतक-यांना अतिवृष्टी व गारपीट चे अनुदान तात्काळ वाटप करण्याच्या दृष्टीने शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

---

मा. मंत्री (मदत व पुनर्वसन) यांचे निवेदन

१. केंद्र शासनाने चक्रीवादळ, दुष्काळ, भूकंप, आग, पुर, त्सुनामी, गारपीट, दरड कोसळणे, बर्फखंड कोसळणे, ढगफुटी, टोळधाड, थंडीची लाट व कडाक्याची थंडी या १२ नैसर्गिक आपत्तीमध्ये बाधित होणाऱ्या नागरिकांना मदत अनुज्ञेय आहे.

२. राज्य शासनाने या व्यतिरिक्त अवेळी पाऊस, अतिवृष्टी, वीज कोसळणे, समुद्राचे उधाण, आकस्मिक आग व सततचा पाऊस या ६ नैसर्गिक आपत्ती घोषित केल्या आहेत.

३. केंद्र शासनाने घोषित नैसर्गिक आपत्तींना शासन निर्णय दि.२७.०३.२०२३ नुसार निकष व दर निश्चित केलेले आहेत.

४. राज्य शासनाने शासन निर्णय दि.०१.०१.२०२४ नुसार नैसर्गिक आपत्तीमुळे होणाऱ्या शेतीपिक नुकसानीकरिता बाधित शेतकऱ्यांना राज्य आपत्ती प्रतिसाद निधीच्या निकषाबाहेर मदत करण्याकरिता वाढीव दराने निविष्ठा अनुदाना स्वरुपात मदत प्रदान करण्यास मान्यता देण्यात आलेली आहे. त्यानुसार जिरायत पिकांच्या नुकसानीसाठी रु.१३,६००/- प्रति हेक्टर, बागायत पिकांच्या नुकसानीसाठी रु.२७,०००/- प्रति हेक्टर तर बहुवार्षिक पिकांच्या नुकसानीसाठी रु.३६,०००/- प्रति हेक्टर या वाढीव दराने मदत देण्यात येत आहे. तसेच ही मदत केंद्र शासनाच्या २ हेक्टर ऐवजी ३ हेक्टरच्या मर्यादेत वाढविण्यात आलेली आहे.

शासन निर्णय दि.०१.०१.२०२४ नुसार शेतीपिकांच्या नुकसानीकरिता संपूर्ण हंगामामध्ये एकाच वेळी अनुदान अनुज्ञेय आहे.

माहे नोव्हेंबर व डिसेंबर, २०२३ या महिन्यात अवेळी पाऊसामुळे शेतीपिकांच्या झालेल्या नुकसानीकरीता, पुढील हंगामामध्ये उपयोगी पडावे म्हणून, एका हंगामात एक वेळेस याप्रमाणे शेतकऱ्यांना निविष्ठा अनुदान देण्यासाठी अमरावती जिल्ह्यास शासन निर्णय दि.३१ जानेवारी २०२४ अन्वये रु.३५७.९५ कोटी इतका निधी वितरीत करण्यास मंजूरी देण्यात आलेली आहे.

तसेच फेब्रुवारी ते एप्रिल, २०२४ या कालावधीत अवेळी पावसामुळे झालेल्या शेतीपिक नुकसानीसाठी पुढील हंगामामध्ये उपयोगी पडावे म्हणून, एका हंगामात एक वेळेस याप्रमाणे शेतकऱ्यांना निविष्ठा अनुदान देण्यासाठी अमरावती जिल्ह्यास शासन निर्णय दि.२ ऑगस्ट, २०२४ अन्वये रु.१६६.६३ कोटी इतका निधी वितरीत करण्यास मंजूर देण्यात आलेली आहे.

दि.३१ जानेवारी, २०२४ च्या शासन निर्णयानुसार वरुड तालुक्यासाठी माहे नोव्हेंबर-डिसेंबर, २०२३ मध्ये एकूण ३७,७९५ लाभार्थ्यांकरिता रु.११२.६० कोटी इतक्या रक्कमेची यादी पोर्टलवर मंजूर करण्यात आली. त्यापैकी ३७,०६६ इतक्या पात्र लाभार्थ्यांना रु.१०९.८८ कोटी इतके अनुदान डिबीटीमार्फत वितरीत करण्यात आले आहे. उर्वरित ७२९ लाभार्थ्यांना विविध कारणास्तव उदा. व्दिरुक्ती, सामाईक खातेदार इ. कारणामुळे निधी वितरीत करता आलेला नाही. तथापि, उपरोक्त त्रुटी दुर करुन डिबीटीमार्फत निधी वितरणाची कार्यवाही सुरु आहे.

दि.२ ऑगस्ट, २०२४ च्या शासन निर्णयानुसार वरुड तालुक्यासाठी माहे फेब्रुवारी ते एप्रिल, २०२४ मध्ये एकूण ७,१०९ लाभार्थ्यांकरिता रु.२७.७५ कोटी इतक्या रक्कमेची यादी पोर्टलवर मंजूर करण्यात आली. त्यापैकी ४,८८२ इतक्या पात्र लाभार्थ्यांना रु.१४.०० कोटी इतके अनुदान डिबीटीमार्फत वितरीत करण्यात आले आहे. उर्वरित २,२२७ पैकी १९७९ लाभार्थ्यांना एकाच हंगामात ३ हेक्टरपेक्षा जास्त नुकसान झाल्याने व यापूर्वी दि.३१ जानेवारी, २०२४ च्या शासन निर्णयानुसार ३ हेक्टरच्या मर्यादेत लाभ घेतला असल्याने आता, दि.१ जानेवारी, २०२४ च्या शासन निर्णयातील निकषानुसार डिबीटी पोर्टलवर मदत मंजूर करण्यात आलेली नाही.

उर्वरित २४८ लाभार्थ्यांना विविध कारणास्तव उदा. व्दिरुक्ती, सामाईक खातेदार इ. कारणामुळे निधी वितरीत करता आलेला नाही, उपरोक्त त्रुटी दुर करुन डिबीटीमार्फत निधी वितरणाची कार्यवाही सुरु आहे.

जिल्हाधिकारी, अमरावती यांच्या दि.१७.०१.२०२५ च्या पत्रान्वये ३ हेक्टरची मर्यादा न लावता वरुड तालुक्यातील संत्रा व मोसंबी उत्पादकांना अनुदान देण्याबाबत विनंती केली होती. याबाबत दि.३१ जानेवारी, २०२४ च्या शासन निर्णयानुसार ३ हेक्टरच्या मर्यादेत लाभ घेतला असल्याने व एका हंगामात दोनदा नुकसान झाल्याने दुसऱ्या वेळेच्या नुकसानीचे अनुदान अनुज्ञेय ठरत नसल्याबाबत निर्णय घेण्यात आला आहे.

*********************

सन २०२५ चे पहिले अधिवेशन

विधान सभा नियम १०५ अन्वये लक्षवेधी सूचना क्रमांक १२५७

मा.श्री.मोहन मते, वि.स.स. यांनी विधान सभेत नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना खालील प्रमाणे आहे :-

"सिंधुदुर्ग जिल्ह्यातील कुडाळ तालुक्यातील डिगस ग्रामपंचायतीत ढिसाळ, मनमानी व भ्रष्ट कारभार सुरू असल्याची गंभीर बाब दि. २५ फेब्रुवारी, २०२५ रोजी निदर्शनास येणे, या ग्रामपंचायतीच्या पदाधिकारी यांनी सुस्थितीत असलेली आरोग्य उपकेंद्राची इमारत निर्लेखीत न करताच पाडून ग्रामपंचायतीचे सुमारे साडेतीन लाखांचे केलेले नुकसान, तसेच गावठाणवाडी एसटी स्टॉप नजीकचे संडास-बाथरूम देखील निर्लेखीत न करताच पाडून ग्रामपंचायतीचे सुमारे दीड लाखाचे केलेले नुकसान, ग्रामपंचायत क्षेत्रात विविध विकास कामे करताना ग्रामस्थांकडून जमिनीचे बक्षीसपत्र, दानपत्र न घेताच शासनाचा लाखो रुपयांचा निधी नियमबाह्यरित्या खर्च केले असणे, ग्रामीण पाणी पुरवठा योजनांमधील ७ विहीरीचे बांधकाम करताना जमीन मालकांकडून जमिनीचे बक्षीसपत्र घेण्यात केलेली अक्षम्य दिरंगाई, ग्रामपंचायतीच्या कारभारावर लेखा परीक्षण अहवालात ओढण्यात आलेले गंभीर ताशेरे, या ग्रामपंचायतीच्या भ्रष्ट कारभाराची सखोल चौकशी होणेसाठी ग्रामस्थांनी सातत्याने केलेला पत्रव्यवहार, तसेच करण्यात आलेली उपोषण, तरीदेखील स्थानिक प्रशासनाने न घेतलेली गंभीर दखल, केवळ चौकशीचा बनाव करून ग्रामपंचायतीतील भ्रष्ट कारभाराची केलेली पाठराखण, परिणामी, स्थानीक नागरिकांत पसरलेली तीव्र नाराजीची भावना, यास्तव सिंधुदुर्ग जिल्ह्यातील डिगस ग्रामपंचायतीच्या भ्रष्ट कारभाराची सखोल चौकशी करून दोषी कर्मचारी, पदाधिकारी, तसेच त्यांची पाठराखण करणाऱ्या पंचायत समिति, कुडाळ व जि,प., सिंधुदुर्गमधील अधिकाऱ्यांवर देखील कठोर कारवाई करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना"

---

मा.मंत्री. (ग्राम विकास ) यांचे निवेदन

डिगस ग्रामपंचायत कार्यक्षेत्रातील आरोग्य उपकेंद्र हि इमारत स्वतंत्र नसून ग्रामपंचायत डिगसच्या मागील बाजूच्या खोलीत १९८७ पासून प्राथमिक आरोग्य उपकेंद्र कार्यरत आहे. सदर खोलीचे पुर्नबांधकाम ग्रामपंचायत कडील १४ वा वित्त आयोगाच्या निधीतून केलेले असुन सद्यस्थितीत उपकेंद्र कार्यरत आहे. त्यामुळे ग्रामपंचायत निधीचे कोणतेही नुकसान झालेले दिसून येत नाही.

ग्रामपंचायत कार्यालयाकडील जुन्या नादुरुस्त संडास / बाथरूम चे काम निष्कासीत करुन त्या ठिकाणी नव्याने शौचालय बांधकाम करण्यात आलेले आहे. जुन्या शौचालयाच्या निरूपयोगी साहित्याची रक्कम कनिष्ठ अभियंता ग्रामीण पाणी पुरवठा उपविभाग ओरोस यांनी रक्कम रूपये १५००/- निश्चित करून दिलेली आहे. निरुपयोगी साहित्याचा लिलाव करुन त्याची रक्कम रुपये १५००/- ग्रामपंचायतीने नमुना नं. ७ पावती क्र. ८२ दि. १६/०३/२०२१ ने ग्रामनिधीमध्ये भरणा करून घेतलेली आहे. त्यामुळे ग्रामपंचातीचे दिड लाखाचे नुकसान झाल्याचे दिसुन येत नाही.

डिगस ग्रामपंचायत क्षेत्रात (१) कल्याचेगाळू निवारा शेड (२)पाताडेवाडी स्मशान शेड (३) पातडेवाडी गणेश घाट अशी ३ कामे केली असून पाताडेवाडी स्मशान शेड व पातडेवाडी गणेश घाट या कामाचे रक्कम रू. १००/- च्या स्टॅम्प पेपरवर मे. कार्यकारी दंडाधिकारी, कुडाळ यांचे समक्ष ग्रामपंचायतीने समत्ती पत्र करून घेतलेले आहे. कल्याचेगाळू निवारा शेड बांधणे हे काम सार्वजनिक बांधकाम विभाग यांच्या मालकीच्या रस्त्यालगत केलेले आहे. संबंधित जमीन मालकांनी समत्ती पत्राद्वारे जमीन उपलब्ध करून दिली असून त्यांची याबाबत हरकत/आक्षेप नाहीत. सदर कामांचा जनतेला उपयोग होत असुन शासनाच्या निधीचा दुरुपयोग झालेला दिसुन येत नाही .

डिगस ग्रामपंचायत क्षेत्रातील ७ सार्वजनिक विहीरीचे बक्षिस पत्र प्राप्त आहे. सदरची कामे राष्ट्रीय ग्रामीण पेयजल योजनेंतर्गत ग्रामीण पाणीपुरवठा व स्वच्छता समिती मार्फत पूर्ण झालेली असून विहिरीची कामे सुस्थितीत असून त्याचा वापर सार्वजनिक प्रयोजनार्थ होत आहे. याबाबत जमीन मालक यांची हरकत अगर आक्षेप नाही.

ग्रामपंचायतीचे सन २०२२-२०२३ या आर्थिक वर्षापर्यंत लेखा परिक्षण झालेले असून अहवालाचे अवलोकन करता सदर लेखापरीक्षण आक्षेपांमध्ये गंभीर स्वरूपाच्या आर्थिक अनियमिता झाल्याचा गोपनिय अहवाल प्राप्त नाही.

श्री.बुदधनाथ मच्छिंद्रनाथ गोसावी यांनी ग्रामपंचातीच्या कारभाराची तक्रार अर्जांची चौकशी साठी दिनांक २१/०४/२०२२, दि.५/५/२०२२,दि.१/८/२०२२, दि.१/८/२०२४, रोजी अर्ज सादर केलेले आहेत.सदर अर्जांची दि.८/८/२०२२, दि.११/०१/२०२३ व दिनांक १९/९/२०२४ रोजी चौकशी करुन संबधित अर्जदार यांना कळविण्यात आलेले आहे.

*****

## महाराष्ट्र विधानसभा

### सन २०२५ चे पहिले (अर्थसंकल्पीय) अधिवेशन

### विधानसभा नियम १०५ अन्वये लक्षवेधी सूचना क्रमांक-३५

सर्वश्री. कशिनाथ दाते, विजय वडेट्टीवार, अस्लम शेख, श्रीमती नमिता मुंदडा, सर्वश्री. संजय मेश्राम, विकास ठाकरे, नानाभाऊ पटोले, अमित झनक, मा. विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्रमांक ३५ पुढीलप्रमाणे आहे :-

"राज्यातील ज्या नागरिकांना घरे नाहीत अशा नागरिकांना पंतप्रधान आवास योजना, अनुसूचित जातीकरिता रमाई आवास योजना, अनुसूचित जमातीकरिता शबरी आवास योजना व तांडा वस्ती योजना, मोदी आवास योजना अशा विविध योजना मार्फत शासनाकडून घरकुल बांधून देण्यात येणे, या योजनेतून घरकुल बांधकामा करता ग्रामीण भागात सुमारे १ लाख ३० हजार रुपये व शहरी भागात २ लाख ५० हजार रुपये शासनाकडून इतके अनुदान देण्यात येणे, परंतु हे अनुदान घर बांधण्याकरिता अतिशय तटपुंजे असणे, घर बांधण्यासाठी आवश्यक असलेले सिमेंट, विटा, रेती, लोखंड व कामगार इत्यादी साहित्यांचे दर वाढल्याने लाभार्थ्यांना या अनुदानात घर बांधणे अशक्य झालेले झालेले असणे, घरकुल बांधण्याकरता शासनाकडून मिळणाऱ्या अनुदानात घर बांधणे शक्य नसल्याने लाभार्थ्यांकडून अनुदानात वाढ करण्याची मागणी वारंवार होत असणे, काही ठिकाणी नागरिकांना घरकुल मंजूर होऊनहीं जागे अभावी घरकुले परत गेलेली असणे, त्यामुळे गायरान जमिनीवर या लोकांना घरकुल बांधण्या करिता होत असलेली लाभार्थ्यांची मागणी, इतक्या महागाईच्या काळात इतक्या रकमेत घर बांधणे शक्य नसणे त्यामुळे गरीब, गरजू लोकांच्या मनात आपल्याला घर भेटेल की नाही याबाबत त्यांच्या मनात पसरलेली चिंता व भीतीचे वातावरण, याबाबत शासनाने घरकुल अनुदानात त्वरित वाढ करण्याबाबत करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया"

---

### मा.मंत्री (ग्रामविकास व पंचायत राज) यांचे निवेदन

राज्यामध्ये केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचनेप्रमाणे प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण (PMAY-G) राबवली जाते. तसेच, विविध प्रवर्गाकरिता संबंधित प्रशासकीय विभागांकडून राज्य पुरस्कृत आवास योजना-रमाई, शबरी, आदीम, पारधी, अटल बांधकाम कामगार, यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर, मोदी आवास घरकुल योजना या प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीणच्या धर्तीवर राबविण्यात येतात.

सद्य:स्थितीत सदर आवास योजनांतर्गत घरकुल बांधकामाकरीता रु. १.२० लक्ष अर्थसहाय्य अनुज्ञेय असुन या व्यतिरिक्त मनरेगा अंतर्गत ९० दिवस अकुशल मजूरी साधारणपणे रक्कम रु. २६,७३०/- व स्वच्छ भारत मिशन अंतर्गत रु. १२,०००/- असे एकूण रु.१,५८,७३०/- अर्थसहाय्य देय आहे.

दिनांक २०/०३/२०२५ रोजीच्या मंत्रीमंडळ बैठकीमध्ये केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण टप्पा-२, तसेच, विविध राज्य पुरस्कृत घरकुल योजनेंतर्गत सन २०२४-२५ मध्ये प्राप्त उद्दिष्टामधील मंजूर घरकुल लाभार्थ्यांना द्यावयाच्या अनुदानात रु.५०,०००/- एवढी वाढ करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. त्यामध्ये सौरउर्जा यंत्रणा उभारण्याचा देखील समावेश आहे.

भूमिहीन लाभार्थी गृहनिर्माण योजनांपासून वंचित राहू नयेत, याकरिता राज्यशासनाकडून पंडीत दीनदयाळ उपाध्याय घरकुल जागा खरेदी अर्थसहाय्य योजना, शासकीय जागा विनामूल्य उपलब्ध करून देणे, निवासी जागेवरील अतिक्रमण नियमानुकूल करणे व इतर मार्ग जसे - बक्षिसपत्र, भाडेपटटा इ. उपाययोजना राबविण्यात येतात. तसेच, पंडीत दीनदयाळ उपाध्याय घरकुल जागा खरेदी अर्थसहाय्य योजने अंतर्गत भुमिहीन लाभार्थ्यांना ५०० चौ.फु. पर्यंत जागा खरेदी करण्यासाठी विभागाच्या दिनांक ०६ फेब्रुवारी , २०२४ रोजीच्या शासन निर्णयान्वये अर्थसहाय्य रक्कम रु.५०,०००/- या रकमेत वाढ करुन रक्कम रु. १,००,०००/- इतकी करण्यात आली आहे.

ग्रामीण गृहनिर्माण कार्यक्रमांतर्गत पात्र परंतु भूमिहीन एकुण १,००,७८२ लाभार्थ्यांपैकी आतापर्यंत ९८,८०३ इतक्या भूमिहीन लाभार्थ्यांना विविध योजनांतर्गत जागा उपलब्ध करून देण्यात आली असून १,९७९ इतके भूमिहीन लाभार्थी यांना जागा देण्याची प्रक्रिया सुरू आहे. देशात सर्वाधीक भूमिहिन लाभार्थी महाराष्ट्र राज्यात असून भूमिहिन लाभार्थ्यांना जागा उपलब्ध करुन देण्यामध्ये महाराष्ट्र राज्य देशात प्रथम क्रमांकावर आहे. तसेच, राज्यात ज्या ठिकाणी जागांची उपलब्धता कमी आहे वा किमती जास्त आहेत, अशा ठिकाणी भूमिहीन लाभार्थ्यांच्या जागेच्या समस्या सोडविण्यासाठी बहुमजली इमारती, हाऊसिंग कॉलनी, हाऊसिंग अपार्टमेंट व लँड बँक इ. उपाययोजना करण्यात आल्या आहेत.

महसूल व वन विभागाच्या प्राप्त अभिप्रायानूसार, शासकीय/गायरान जमिनीवरील अतिक्रमणासंदर्भात मा. उच्च न्यायालय मुंबई येथे सुओमोटो जनहित याचिका क्र.२/२०२२ याचिका दाखल केली आहे. सदर प्रकरणी मा. उच्च न्यायालय मुंबई यांनी दि. १५/०९/२०२२ व दि. ०६/१०/२०२२ रोजी आदेश पारित केले असून अद्यापही सदरहू प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.

बंजारा/लमाण तांड्यामध्ये सामुहीक विकासाच्या विविध मुलभूत सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी "संत सेवालाल महाराज बंजारा/लमाण तांडा समृध्दी योजना" सुरू करण्यात आली आहे. ही योजना वैयक्तीक लाभाची योजना नसल्यामुळे सदर योजनेंतर्गत कोणताही घरकुलाचा लाभ दिला जात नाही.

---

**महाराष्ट्र विधानसभा**

**सन २०२५ चे प्रथम अधिवेशन**

श्री.राजकुमार बडोले, मा.विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम-१०५ अन्वये लक्षवेधी सूचना क्र.१८२७ पुढील प्रमाणे आहे-

"राज्यातील गोड्या पाण्यातील मच्छिमार सहकारी संस्थांनकरिता संस्था नोंदणी व तलाव ठेक्याच्या सुधारित शासन निर्णय दि.३/०७/२०१९ रोजी निर्गमित करणे, सदरचा शासन निर्णय राज्यातील मच्छिमार सहकारी संस्थांच्या हिताच्या असणे, तथापि त्यामध्ये बदल करुन मत्स्य व्यवसाया संबंधीबाबत दि. १२/५/२०२३ रोजी शासन निर्णय निर्गमित करण्यांत येणे, तथापि सदर शासन निर्णयावरती दि.२६/५/२०२३ रोजीच्या निर्णयान्वये स्थगिती उठविण्यात येणे, परंतु दि. १२/५/२०२३ रोजीचा सदर शासन निर्णय हे सध्या अस्तित्वात असलेल्या संस्थेच्या हिताचे नसणे, त्यामुळे सर्व भूजलाशयातील मत्स्य संस्थेवर फार मोठ्या अडचणी निर्माण होणे, सदर शासन निर्णयामुळे अस्तित्वात असलेल्या संस्थेवर उपासमारीची वेळ येणे, त्यामुळे दि. १२/५/२०२३ रोजीचा शासन निर्णयावर दि. २६/५/२०२३ ला स्थगिती देण्यात आलेली असून सदर शासन निर्णयावरील स्थगिती कायम करण्यांत यावी अशी गोंदिया मच्छिमार सहकारी संस्थांची मागणी असणे, परिणामी, दिनांक १२/५/२०२३ रोजीचा शासन निर्णय कायमस्वरुपी रद्द करण्याबाबत शासनाने केलेली व करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

---

**मा.मंत्री (मत्स्यव्यवसाय) यांचे निवेदन**

भुजलाशयीन मत्स्यव्यवसाय सहकारी संस्थांची नोंदणी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व नियम १९६१ मधील तरतुदी व मत्स्यव्यवसाय विभागाने मत्स्यव्यवसाय सहकारी संस्थांबाबत निर्गमित केलेल्या शासन निर्णयाच्या आधारे होते. सहकार विभागाने ९७ व्या घटनादुरुस्ती अन्वये सहकारी संस्थांच्या कामकाजामध्ये आमुलाग्र बदल घडवून संस्थांचा गुणात्मक विकास करणेचे धोरण स्विकारले आहे. सदरील बदलांचा मत्स्यव्यवसाय सहकारी संस्थांच्या कामामध्ये समावेश करणे व मत्स्यविभागाचे धोरण व भूजलाशयीन मत्स्यव्यवसाय सहकारी संस्था (प्राथमिक) जलाशयावर निर्माण करावयाचा संघ व भूजलाशयीन जिल्हा मच्छिमार संघ नोंदणीचे धोरण यामध्ये सुसूत्रता व एकवाक्यता आणण्याकरिता पुर्वीचे सर्व शासन निर्णय व परिपत्रके एकत्रित समायोजित करुन दि.०३/०७/२०१९ चा शासन निर्णय निर्गमित करण्यात आला होता.

तथापि दि.०३.०७.२०१९ अन्वये निर्गमित शासन निर्णयातील तरतूदी जसे की, तलाव जलाशयावर नोंदणीकृत संस्था असल्यास अशा तलाव / जलाशयावर नव्याने संस्थेची नोंदणी करण्यात येऊ नये, नव्याने हस्तांतर झालेल्या तलाव /जलाशयावर एकापेक्षा जास्त संस्थेची नोंदणी करण्यास प्रतिबंध असणे, यामुळे अपेक्षित मत्स्योत्पादन साध्य होत नाही असे, निर्दशनास आले आहे.

शासन निर्णयातील संस्था नोंदणी करीता असलेली १० किमी अंतराची मर्यादा या अटीमुळे सामाजिक दृष्ट्या, आर्थिक दृष्टया वंचित असणाऱ्या वर्गास ते जलाशयापासून १० किमी. अंतरापेक्षा दूर राहतात या कारणास्तव तलाव /जलाशयावर नोंदणी करण्यात अनुमती प्राप्त होत नाही. याशिवाय ज्या संस्थांचे पूर्वी तालुका स्तरीय कार्यक्षेत्र निश्चित करण्यात आले होते त्या संस्थेकडे असलेले तलाव १० किमीपेक्षा जास्त अंतरावर असेल तर अशा संस्था तलाव ठेक्याने घेण्याच्या प्रक्रियेपासून वंचित राहतात. दि.०३.०७.२०१९ शासन निर्णयातील क्रियाशील मच्छिमार ही व्याख्या संभ्रम निर्माण करणारी होती.

या बाबी विचारात घेवून भुजलाशयीन मत्स्यव्यवसाय वाढविण्याच्या दृष्टीने स्पर्धात्मक वातावरण निर्माण करणे, सक्षम क्रियाशील मच्छिमार संस्थांद्वारे मच्छिमारी होणे, मत्स्यव्यवसायाच्या माध्यमातून पारंपरिक मच्छिमार यांना संधी देवून आधुनिक तंत्रज्ञानाद्वारे तलाव/ तलाशयाची उत्पादन क्षमता वाढविणे, मत्स्यव्यवसाय अधिकाधिक उद्योग स्नेही करणे, ही उद्दिष्टे विचारात घेवून, भुजलाशयीन मत्स्यव्यवसाय सहकारी संस्थाच्यां नोंदणीबाबत दि.१२/०५/२०२३ चा शासन निर्णय निर्गमित करण्यात आला.

तसेच दि.१२/०५/२०२३ च्या शासन निर्णयामुळे , संस्थांच्या उपविधीत एकाही तलावाची नोंद नसणाऱ्या संस्थांना उपलब्ध तलावाच्या जलक्षेत्राचा संस्थेच्या उपविधीत समावेश करता येईल. यामुळे कोणतीही संस्था तलाव ठेक्याने घेण्याच्या प्रक्रियेपासून वंचित राहणार नाही. संस्थेच्या उत्तम कार्यप्रणालीमुळे संस्थेचा लेखापरिक्षण वर्ग "अ" राखणे शक्य होऊन त्यामध्ये सातत्य राहिल. आधुनिक तंत्रज्ञानामुळे तलावातून मत्स्योत्पादन वाढून संस्था व मच्छिमार सभासद यांच्या आर्थिक व सामाजिक प्रगती होण्यास सहाय्यभूत ठरेल.

*******************

**लक्षवेधी सूचना क्र. १९९१**

**महाराष्ट्र विधानसभा**

**सन २०२५ चे प्रथम (अर्थसंकल्पिय) अधिवेशन**

**श्री. सुनिल प्रभू व श्री. सुरेश धस वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना क्र. १९९१ पुढील प्रमाणे आहे:-**

"पालघर जिल्ह्यातील ग्रामीण भागात परवानगी नसताना मोठ्या प्रमाणात टायर पासून ऑईल करणाऱ्या कंपन्यांचे जाळे पसरलेले असणे, वडवली (ता. वाडा, जि. पालघर) येथील एम.डी पायरोलिसेस या कंपनीत नियमाचे पालन न करता जुने टायर जाळून त्यापासून ऑईल, तारा काढून त्यांची विक्री मोठ्या प्रमाणात होत असणे, त्यातच दिनांक १ फेब्रुवारी, २०२५ रोजी बॉयलरचा स्फोट होऊन आग लागण्याची घटना घडणे, सदर घटनेत कंपनीतील एका कामगारांचे कुटुंब गंभीररित्या जखमी होणे, सदर कुटुंबावर मुंबईच्या रुग्णालयात उपचार सुरु असताना त्यात त्यांचा झालेला मृत्यू, सदर कंपन्यांचा ग्रामस्थांना मोठा त्रास होत असल्याच्या अनेक तक्रारी प्रशासनाकडे करीत असणे, सदर कंपन्या तातडीने बंद करण्याची ग्रामस्थांकडून होत असलेली मागणी, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

---

**<u>मा. मंत्री (कामगार) यांचे निवेदन</u>**

मे. एम.डी. पायरोलेसिस एल.एल.पी., मौजे वडवली, ता. वाडा, जि. पालघर या कारखान्यामध्ये स्क्रॅप टायर पासून ऑईल व कार्बन पावडर बनविण्याचे काम चालते. या कारखान्यात दिनांक २९/०१/२०२५ रोजी रिॲक्टरमध्ये पायरोलेसिस प्रक्रिया सुरु असतांना रिॲक्टरचा सेकंडरी टँक चोकअप होवून रिॲक्टरमधील प्रेशर वाढल्याने रिॲक्टरच्या पाईप व इन्सुलेशन टँकमध्ये स्फोट झाला. त्यामधील गरम गॅस व आगीमुळे जवळच कुलींग टॉवरजवळ असलेल्या दोन महिला कामगार व त्यांची दोन लहान मुले तसेच रिॲक्टरजवळ काम करणारा ऑपरेटर हे सर्व गंभीर जखमी झाले. त्यांना रुग्णालयात दाखल केले असता उपचारादरम्यान दोन महिला कामगारांचा आणि दोन मुलांचा मृत्यु झालेला होता. तसेच अन्य एका जखमी कामगारास उपचारानंतर रुग्णालयातून घरी सोडण्यात आले.

सदर आस्थापनेच्या भोगवटादाराने कारखाने अधिनियम, १९४८ अंतर्गत परवाना घेतला नसल्याचे घटनेच्या चौकशीदरम्यान आढळून आले. तसेच अपघाताच्या घटनेच्यावेळी सुरक्षित कामाच्या पध्दतीचा अवलंब करण्यात आलेला नव्हता. सबब सदर कारखान्याच्या भोगवटादाराविरुध्द कारखाने अधिनियम, १९४८ व महाराष्ट्र कारखाने नियम, १९६३ अंतर्गत मा. प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, वसई येथे दिनांक २१.०३.२०२५ रोजी फौजदारी खटला दाखल करण्यात आला आहे.

रोटा H/0089 (700-5-25)

[ढ़.मा.प.

कारखान्याच्या भोगवटादाराने जखमी कामगाराच्या औषधोपचाराचा खर्च रु. ९ लाख केलेला आहे. तसेच मृत कामगारांच्या वारसांना नुकसान भरपाई म्हणून रु. १५ लाख इतकी अर्थिक मदत आणि सानुग्रह अनुदान म्हणून रु.५० हजार दिले आहेत. मृत कामगारांच्या वारसांना नियमानुसार देय असलेली नुकसान भरपाई देण्याबाबत नुकसान भरपाई आयुक्तांना यांना कळविण्यात आलेले आहे.

पोलीसांनी कारखान्याचे मालक व इतर यांच्याविरूध्द निष्काळजीपणामुळे मृत्युस कारणीभूत असल्याबाबत भारतीय न्यायसंहिता कलम १०६(१), १२५(अ), १२५(ब), ३(५) अन्वये दिनांक ०७/०२/२०२५ रोजी गुन्हयाची नोंद केलेली आहे.

महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, कल्याण यांनी दिनांक ३१/०१/२०२५ रोजी सदर कारखान्यातील उत्पादन प्रक्रिया बंद बाबतचे आदेश पारित केलेले आहेत. त्यामुळे कारखाना सद्यस्थितीत बंद आहे.

रिपब्लिकन जनरल कामगार युनियन व्दारे मे. हायटेक बायोएनर्जी प्रा. लि., खानिवली, ता. वाडा या टायरपासुन ऑईल निर्मिती करणाऱ्या कारखान्याच्या बाबतीत तक्रार प्राप्त झाली होती. या तक्रारीची चौकशी करुन आढळलेल्या सुरक्षिततेच्या भंगाबाबत कारखान्याच्या भोगवटादाराविरुध्द न्यायालयात दिनांक २१/११/२०२४ रोजी फौजदारी खटला दाखल करण्यात आलेला आहे.

पालघर जिल्हयातील स्क्रॅप टायर पासून ऑईल व कार्बन पावडर निर्मिती करणाऱ्या कारखान्यांना विभागामार्फत वेळोवेळी भेटी देवुन विना परवाना सुरु असलेल्या कारखान्यांना व कामगारांच्या सुरक्षिततेबाबत आढळलेल्या त्रुटींसाठी कारखान्यांच्या भोगवटादाराविरुध्द औद्योगिक सुरक्षा व आरोग्य, संचालनालयामार्फत न्यायालयात आतापर्यंत एकूण ११ फौजदारी स्वरुपाचे खटले दाखल करण्यात आलेले आहेत.

महाराष्ट्र विधान सभा

सन २०२५ चे पहिले (अर्थसंकल्पीय) अधिवेशन

लक्षवेधी सूचना क्र.२३२७

**श्री. मंगेश कुडाळकर, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधान सभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्रमांक -२३२७ खालील प्रमाणे आहे.**

"राज्यात गृहनिर्माण सहकारी संस्थांच्या पुर्नविकासाचे अनेक प्रकल्प नियोजनाअभावी व निधी अभावी प्रलंबित असणे, वसई-विरार महानगरपालिका क्षेत्रातील पुर्नविकासाच्या नावाखाली जनतेची विकासंकांकडून आर्थिक फसवणूक होणे, त्यामुळे स्थानिकांना मा. न्यायालयात जाण्याची आलेली वेळ, उपनिंबधक कार्यालयाकडून विशेष सर्वसाधारण सभा घेण्यासाठी श्री. सुगंध विभुते या प्राधिकृत अधिकाऱ्याची नेमणूक करण्यात येणे, सहकार पणन व वस्त्रोद्योग विभागाकडून दि. ४ जुलै २०१९ रोजी पुनर्विकासासंबंधी आदेश दिलेला असणे, नियुक्त प्राधिकाऱ्याकडून सन २०२१ ते २०२४ या गेल्या चार वर्षामध्ये संस्थांच्या इमारतींच्या पुनर्विकासासाठी बेकायदेशीररित्या आदेश पारित केलेले असणे,या प्राधिकाऱ्याकडून सहकारी संस्थांच्या सभा वेळोवेळी घेतल्या जात नसणे, याबाबतच्या तक्रारी स्थानिकांकडून उपनिबंधक कार्यालयात माहे जानेवारी,२०२५ मध्ये केलेल्या असणे, प्राधिकाऱ्याकडून घेतलेल्या चूकीच्या निर्णयामुळे जनतेच्या विकासाचा हेतु साध्य होत नसणे, पुनर्विकासाच्या ठिकाणी मुलभुत सोयीसुविधांचा अभाव असणे, अशा बेकायदेशीर बांधकामांमुळे स्थानिक नागरीकांच्या पाणी, विज, रस्ते यासारख्या मुलभुत सुविधांवर येणाऱ्या ताणामुळे नागरीकांचे होणारे हाल, रस्ते वाहतुकीवर होणारा परिणाम, शासनाचे होणारे महसूली नुकसान, याबाबत जनतेत प्रचंड प्रमाणात असलेला आक्रोश, यामुळे कायदा व सुव्यवस्थेची परिस्थीती उद्भवण्याची भिती, स्थानिकांना यामुळे प्रशासकीय अडचणींना सामोरे जावे लागत असणे, प्रशासनाने याप्रकरणाकडे लक्ष देवून कठोर पावले उचलण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने कारावयाची कार्यवाही व उपाययोजना."

मा. मंत्री (सहकार) यांचे निवेदन

राज्यातील सहकारी गृहनिर्माण संस्थांच्या इमारतींचा पुनर्विकास करण्याबाबत महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० मधील कलम ७९ (अ) नुसार सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभागाच्या दिनांक ०४.०७.२०१९ च्या शासन निर्णयाव्दारे मार्गदर्शक सुचना निर्गमित करण्यात आल्या आहेत.

गृहनिर्माण संस्थांच्या इमारतींचा पुनर्विकास करण्याचा निर्णय हा संबंधीत संस्थेच्या नोंदणीकृत उपविधीअन्वये त्या संस्थेच्या विशेष सर्वसाधारण सभेमध्ये शासन निर्णयामध्ये नमूद मार्गदर्शक सुचनाद्वारे निर्धारित कार्यपध्दतीनुसार घेतला जातो. संस्था स्तरावर सभासदांच्या विशेष सर्वसाधारण सभेत संस्थेच्या इमारतीचा पुनर्विकास करण्याबाबत ठराव मंजुर केल्यानंतर संस्था स्तरावर पुनर्विकासाबाबत कार्यवाही करण्यात येते. संस्थेच्या इमारतीच्या पुनर्विकासाबाबत विकासकांकडुन निविदा प्राप्त झाल्यानंतर अंतिम विकासकाची निवड करण्यासाठी संस्थेच्या सभासदांच्या विशेष सर्वसाधारण सभेचे आयोजन करण्यात येते. सदरची विशेष सर्वसाधारण सभा निबंधक कार्यालयाच्या प्रतिनिधींच्या उपस्थितीत होण्यासाठी प्राधिकृत अधिकारी नियुक्त करण्याकरीता निबंधकाकडे संस्थेमार्फत अर्ज सादर केला जातो.

संस्थेच्या इमारतीच्या पुनर्विकासाबाबत विकासकाची निवड करण्यासाठी आयोजित केलेल्या विशेष सर्वसाधारण सभेत उपस्थित राहण्यासाठी निबंधक कार्यालयामार्फत प्राधिकृत

अधिकारी यांची नियुक्ती करण्यात येते. सदरच्या सभेसाठी संस्थेच्या एकुण सभासदांच्या २/३ गणपूर्ती आवश्यक असुन विकासक यांच्या नियुक्तीस संस्थेच्या एकुण सभासद संख्येच्या किमान ५१ टक्केपेक्षा कमी नाही इतक्या उपस्थित सभासदांची मान्यता आवश्यक आहे.

उपनिबंधक, सहकारी संस्था, वसई या कार्यालयाकडे सन २०२१ ते २०२४ या कालावधीत प्राप्त झालेल्या २१९ गृहनिर्माण संस्थांच्या विनंती अर्जास अनुसरुन विशेष सर्वसाधारण सभेत उपस्थित राहण्यासाठी श्री सुगंध विभुते, सहकार अधिकारी (श्रेणी-२), यांची नियुक्ती उपनिबंधक , सहकारी संस्था, वसई यांच्याव्दारे, प्राधिकृत अधिकारी म्हणून करण्यात आली होती.

नियुक्त केलेले प्राधिकृत अधिकारी यांनी गृहनिर्माण संस्थांच्या विशेष सर्वसाधारण सभेत नियमानुसार सहकारी गृहनिर्माण संस्थांच्या इमारतीच्या पुनर्विकासासाठी विकासकाची नियुक्ती झाली असल्याबाबत अहवाल सादर केल्यानंतर त्याबाबत उपनिबंधक, सहकारी संस्था, वसई या कार्यालयाकडुन विशेष सर्वसाधारण सभेत निवड झालेल्या विकासकाच्या नावाची शिफारस करण्यात आलेली आहे. या प्रक्रियेमध्ये प्राधिकृत अधिकारी यांच्याकडुन हस्तक्षेप करण्यात आलेला नाही. विकासक निवडीचे सर्वोच्च अधिकार संस्थेच्या सभासदांच्या विशेष सर्वसाधारण सभेस आहेत. तसेच इमारतीच्या पुनर्विकासाबाबत अटी व शर्ती या संस्था व विकासक यांच्यकडून अंतिम केल्या जातात व त्यानुसार विकसन करारनामा नोंदणीकृत केला जातो. विकसन करारनामा नोंदणीकृत झाल्यानंतर सदरप्रकरणी हस्तक्षेप करण्याचा अधिकार निबंधक यांना नाही.

श्री. सुगंध विभुते, सहकार अधिकारी (श्रेणी-२) यांची बदली सहायक निबंधक, सहकारी संस्था, ता शहापुर, जि. ठाणे या कार्यालयात झाली असुन त्यांना दिनांक २१/०६/२०२४ रोजी कार्यमुक्त करण्यात आलेले आहे. सद्य:स्थितीत ते उपनिबंधक सहकारी संस्था, ता. वसई, जि पालघर या कार्यालयात कार्यरत नाहीत.

सहकारी गृहनिर्माण संस्थाच्या पुनर्विकासाबाबत उपनिबंधक सहकारी संस्था, वसई यांचेकडे जानेवारी २०२५ मध्ये १२ तक्रारी प्राप्त झालेल्या असुन सदर तक्रारींवर कार्यवाही करण्यात येत आहे.

वसई विरार शहर महानगरपालिकेच्या नगररचना विभागामार्फत इमारतीच्या पुनर्विकासाची बांधकाम परवानगी एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली- २०२० अन्वये देण्यात येते. एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली- २०२० तसेच महाराष्ट्र राज्य प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ अन्वये तांत्रिक छाननी करून तसेच आवश्यक कागदपत्रे/ परवानग्या यांची पडताळणी करून पुनर्विकासासाठी बांधकाम परवानगी देण्यात येते.

त्याचप्रमाणे सदर इमारतीस भोगवटा दाखला देण्यापूर्वी मंजूर नकाशा प्रमाणे करण्यांत आलेले इमारतीचे काम याव्यतिरिक्त इमारतीसाठी विकसीत केलेला पोचरस्ता, वादळी पाण्याचा निचरा होण्यासाठी विकसीत केलेले गटर, मलनि:स्सारण टाकी, पाण्याची टाकी, पावसाचे पाणी साठवण यंत्रणा (Rain Water Harvesting), ऑरगॅनिक वेस्ट कंपोस्टींग यंत्रणा यासारख्या मुलभूत सोयी सुविधा यांची खातरजमा करुन भोगवटा दाखला अदा करण्यात येतो. याव्यतिरिक्त इमारतीसाठी महाराष्ट्र राज्य विदयुत वितरण केंद्र यांच्यामार्फत विजपुरवठा संबंधित कार्यवाही करण्यांत येते व भोगवटा दाखला अदा केल्यानंतर संबंधित विभागाच्या सहाय्यक आयुक्ता मार्फत सदर इमारतीस मालमत्ता कराची आकारणी करण्यांत येते तसेच पाणी पुरवठा विभागामार्फत संबंधित इमारतीस पाणी पुरवठा करण्याबाबत कार्यवाही करण्यांत येते.

****************

लक्षवेधी सुचना क्र. ५०३

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२५ चे प्रथम अधिवेशन

श्री सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र.५०३ पुढीलप्रमाणे आहे:-

" उपजिल्हा रूग्णालय, मुल येथे ७ वैद्यकिय अधिकारी यांची मान्यता असुन फक्त २ वैद्यकिय अधिकारी यांचे नियमित पद व २ कंत्राटी वैद्यकिय अधिकारी यांची पदे भरण्यात आलेले असणे, एकाकडे अधिक्षक यांचा प्रभार देण्यात आलेला असणे, स्त्री रोगतज्ञ, दंत शल्य चिकित्सक, अस्थीरोग तज्ञ ही महत्वाची पदे तातडीने भरण्याची तसेच सोनोग्राफीची सोय नियमित उपलब्ध होण्याची आवश्यकता, रूग्णालयातील दंतशल्य चिकित्सक यांचे पदे मागील ८ महिन्यापासुन रिक्त असल्यामुळे रूग्णालयातील दंत सेवा बंद असणे, त्यामुळे रुग्णांची गैरसोय होत असल्याने सदर पदे तातडीने भरण्याची आवश्यकता, उपजिल्हा रूग्णालय, मुल येथे रेडिओलॉजीस्ट उपलब्ध नसल्यामुळे नियमित सोनोग्रॉफी काढण्यात न येणे, आठवडयातुन दोन दिवस बुधवार व शुक्रवारला सोनोग्राफी काढण्यात येणे याबाबत देखील उपाय योजना करण्याची नितांत आवश्यकता, उपजिल्हा रूग्णालय, मुल येथे अस्थीरोग तज्ञ हे पद भरण्याबाबत कार्यवाही करण्याची नितांत आवश्यकता, रूग्णांना रूग्णसेवा देण्यास वैद्यकिय अधिकारी यांच्या कमतरतेमुळ अडचण निर्माण होणे, परिणामी रुग्णसेवेवर त्याचा विपरीत परिणाम होणे, शासनाचे याकडे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष. याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

---

मा. श्री. प्रकाश आबिटकर, मा. मंत्री सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री यांचे निवेदन

चंद्रपूर जिल्हयात उपजिल्हा रुग्णालय, मुल हे ५० खाटांचे रुग्णालय कार्यान्वीत आहे. सदर रुग्णालयामध्ये मवैआसे गट-अ (एस-२३) मधील वैद्यकीय अधिक्षक हे एक पद मंजूर असून ते बदली झाल्यामुळे रिक्त आहे. त्यामुळे नियमित वैद्यकीय अधिकारी, गट-अ यांचेकडे वैद्यकीय अधिक्षक या पदाचा अतिरिक्त कार्यभार देण्यात आलेला आहे.

मवैआसे गट-अ (एस-२०) मधील वैद्यकीय अधिकारी यांचे ७ पदे मंजूर आहेत. त्यापैकी २ पदे भरलेली असून ५ पदे रिक्त आहेत. सामान्य राज्य सेवा गट-ब मधील दंतशल्य चिकित्सक हे एक पद मंजूर असून ते रिक्त आहेत.

उपजिल्हा रुग्णालय, ग्रामीण रुग्णालय, स्त्री रुग्णालयातील वैद्यकीय अधिक्षकांचे पद हे जिल्हा शल्य चिकित्सक या संवर्गातून भरण्यात येते. जिल्हा शल्य चिकित्सक संवर्गातील रिक्त पदे भरण्याकरिता महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत दि.१७/१/२०२५ रोजी एकूण २२५ पदाची जाहिरात प्रसिध्द झाली असून पदे भरण्याची कार्यवाही सुरु आहे. तसेच, सन २०२४-२५ च्या निवडसुची वर्षातील पदोन्नतीची एकूण ४६ पदे भरण्याची कार्यवाही सुरु आहे.

मवैआसे गट-अ (एस-२०) मधील वैद्यकीय अधिकारी यांचे ७ पदे मंजूर असून त्यामध्ये वैद्यकीय अधिकारी २ पदे, वैद्यकीय अधिकारी (स्त्रीरोगतज्ञ)-१ पद , वैद्यकीय अधिकारी (भूलतज्ञ)-१ पद, वैद्यकीय अधिकारी (बालरोगतज्ञ) १ पद, वैद्यकीय अधिकारी (सर्जन)-१ पद, वैद्यकीय अधिकारी (भिषक)-१ पद मंजूर असून यापैकी वैद्यकीय अधिकारी १ पद व वैद्यकीय अधिकारी(बालरोगतज्ञ)-१ पद अशी दोन पदे भरलेली आहेत. मवैआसे गट-अ (एस-२०) मधील वैद्यकीय अधिकारी, वैद्यकीय अधिकारी (स्त्रीरोगतज्ञ) , वैद्यकीय अधिकारी (सर्जन), वैद्यकीय अधिकारी (भिषक) हे पद जरी रिक्त असले तरी सदर रुग्णालयामध्ये ०२ वैद्यकीय अधिकारी (MBBS) (कंत्राटी) पध्दतीने कार्यरत आहे. तसेच जिल्हा रुग्णालय, चंद्रपूर येथील, वैद्यकीय अधिकारी(स्त्रीरोगतज्ञ)-१ पद व वैद्यकीय अधिकारी(भिषक)-१ पद यांची सेवा संलग्न करण्यात आलेली आहे. तसेच, उपजिल्हा रुग्णालय, वरोरा, जिल्हा चंद्रपूर येथून एक वैद्यकीय अधिकारी(अस्थिव्यंगतज्ञ) यांची सेवा संलग्न करण्यात आली आहे. त्याचप्रमाणे ग्रामीण रुग्णालय सिंदेवाही जि. चंद्रपूर येथील दंतशल्य चिकित्सक यांची दोन दिवस सेवा संलग्न करण्यात आलेली आहे.

याशिवाय राष्ट्रीय आरोग्य अभियानाअंतर्गत राष्ट्रीय मौखीक आरोग्य कार्यक्रमांतर्गत दंत शल्य चिकित्सकाची रिक्त असलेली पदे भरण्याबाबत सुचना देण्यात आलेल्या आहेत. तसेच राज्यातील आरोग्य संस्थांना आवश्यक असलेल्या २८९ दंत शल्य चिकित्सकाची रिक्त पदाची जाहिरात महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत प्रसिध्द झालेली असून पदे भरण्याची कार्यवाही सुरु आहे.

उपजिल्हा रुग्णालय, मुल येथील ५० खाटांचे उपजिल्हा रुग्णालय असल्याने आकृतीबंधानुसार अस्थीरोगतज्ञ तसेच क्ष-किरण तज्ञ ही पदे मंजूर नाहीत. तथापी रुग्णालयातील रुग्णांना सोनोग्राफी सेवा मिळण्याचे दृष्टीने आठवडयातील दर बुधवार व शुक्रवार हे दोन दिवस क्ष-किरणतज्ञ व अस्थिव्यंगोपचारतज्ञ यांच्या सेवा उसनवारी तत्वावर घेण्यात आलेल्या आहेत.

उपजिल्हा रुग्णालय, मुल येथे आयपीएचएस अंतर्गत बालरोगतज्ञ, भुलतज्ञ , स्त्रिरोगतज्ञ इत्यादी विशेषज्ञाच्या सेवा तसेच अधिपरिचारीका, क्ष-किरण तंत्रज्ञ यांच्यासुध्दा सेवा ऑनकॉल पध्दतीने घेण्यात येत आहे.

उपजिल्हा रुग्णालय, मुल येथे आयपीएचएस अंतर्गत रक्त साठवणुक केंद्र कार्यान्वित असून तेथे रक्त पेढीतंत्रज्ञ कार्यरत आहे. तसेच या रुग्णालयांमध्ये सिझेरियन प्रसुतीची सुविधा उपलब्ध आहे. तसेच गरोदर मातांना सोनोग्राफी सुविधा उपलब्ध आहे. नवजात बालकासाठी एनबीएसयु विभाग सर्व सुविधासह उपलब्ध आहे.

शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, चंद्रपूर येथे शल्य चिकित्सक शास्त्र, न्यायवैद्यक शास्त्र, स्त्रीरोगतज्ञ, शरीरविकृतीशास्त्र इत्यांदी पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम पूर्ण करणा-या उमेदवारांना जिल्हा निवासी कार्यक्रम प्रशिक्षणाअंतर्गत उपजिल्हा रुग्णालय, मुल येथे तीन महिनेसाठी सेवा देण्यात येतात.

दि. ३१.०५.२०२४ रोजी वैद्यकीय अधिकारी गट-अ यांची रिक्त असलेली १७२९ पदांची जाहिरात प्रसिध्द करण्यात आली होती. सदर भरतीच्या अनुषंगाने प्रतिक्षा यादीतील एकूण ४१९ उमेदवारांचे नियुक्ती आदेश दि. २५.०२.२०२५ रोजी निर्गमित करण्यात आलेले आहेत. सदर उमेदवारांना रुजू करुन घेण्याची कार्यवाही चालू आहे.

सन २०२४-२५ (जानेवारी २०२५ पर्यंत) कालावधीत उपजिल्हा रुग्णालय मुल येथील कार्याचा अहवाल खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | रुग्णालयाचे नाव | ओपीडी | आयपीडी | मोठया शस्त्रक्रिया | लहान शस्त्रक्रिया | प्रयोगशाळा चाचण्या | क्ष-किरण | नॉर्मल प्रसुती | सिझेरीयन LSCS | USG |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | उपजिल्हा रुग्णालय, मुल | ६७३६५ | ४५६९ | २६९ | १३१ | ४०१४६ | ३७२४ | २४३ | ११३ | ७९२ |

उपजिल्हा रुग्णालय, मुल येथे नियमित व आयपीएचएस अंतर्गत कार्यरत वैद्यकीय अधिकारी/कर्मचारी यांचेमार्फत रुग्णालयात दाखल रुग्णांवर आवश्यक ते उपचार करण्यात येतात तसेच अत्यावश्यक प्रसंगी रुग्णास शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, चंद्रपूर येथे संदर्भित करण्यात येते. तरी रुग्णालयातील कामकाजात उपलब्ध मनुष्यबळाव्दारे आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्यात येत असल्याने रुग्णांची गैरसोय होत नाही.

*********************************

महाराष्ट्र विधानसभा
सन २०२५ चे प्रथम (अर्थसंकल्पिय) अधिवेशन

"श्री.मिहीर कोटेचा, मा.विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्र.११९९ पुढीलप्रमाणे आहे:-

"हिमोफेलिया हा अनुवांशिक रक्तदोषामुळे होणारा आजार असून हा एक अत्यंत दुर्मिळ अनुवंशिक रोग आहे. हा रक्ताचा डिसऑर्डर रोग आहे. ज्यामध्ये रक्त योग्यप्रकारे जमत नाही. या आजाराने ग्रस्त असलेल्या एखाद्याच्या शरीरावर इजा झाल्यास रक्तस्राव थांबत नाही. हे शरीरात रक्त जमणे विशिष्ट घटकांच्या अभावामुळे होते. रक्त जमविणारे घटक एक प्रकारची प्रथिने आहेत. त्याची लक्षणे रक्तातील गुठळ्या करणाऱ्या घटकांवर अवलंबून असतात. भारतात अशी सुमारे २ लाख प्रकरणे आहेत. राज्यात साधारणत ७००० रुग्ण असून मुंबईत १९०० तर ठाण्यात साधारणत ८०० आजच्या घडीला आहेत. हेमोफिलियाच्या रुग्णांना होणारी जखम धोकादायक सिद्ध होऊ शकते. एका आकडेवारीनुसार, प्रत्येक ५,००० पुरुषांपैकी एक पुरुष या समस्येचा बळी आहे. रक्ताच्या गुठळ्या तयार झाल्यामुळे रक्त जमणे थांबते. रक्ताच्या जमावाची प्रक्रिया रक्त गोठण्याच्या कारणामुळे सुरू होते. जेव्हा शरीरात या घटकाची कमतरता असते, तेव्हा हा रक्तस्राव होऊ शकतो. हेमोफिलियाचे बरेच प्रकार आहेत. सद्यस्थितीत महाराष्ट्रात या आजारावर कुठेही मुबलक औषध उपलब्ध करून दिली जात नाही, मुंबईतील के.ई.एम. रुग्णालयातील एकमेव उपचार केंद्र आता बंद केलेले आहे. त्यामुळे १२०० रुग्णाचे जीव धोक्यात आलेले आहे. तरी शासनाने तातडीने हिमोफेलियाच्या रुग्णाकरिता मुबलक औषध उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना "

---

**मा.श्री.प्रकाश आबिटकर, मा. मंत्री (सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण) यांचे निवेदन.**

हिमोफिलीया आजार हा अनुवंशिक आजार असुन तो प्रामुख्याने पुरुषांमध्ये आढळतो. अदाजे ५,००० ते १०,००० पुरुषांमागे एक हिमोफिलीया रुग्ण आढळतो. या आजारामध्ये रक्तातील रक्त गोठवण्याच्या घटकांची कमतरता असते त्यामुळे या रुग्णांमध्ये अतिरक्तस्राव होण्याचा धोका असतो. या रुग्णांमध्ये सांधे, मांसपेशी, मेंदू, पोटात रक्तस्राव होण्याची लक्षणे दिसून येतात. अशा रुग्णांमध्ये गरजेनुसार आवश्यक असणारे फॅक्टर देणे आवश्यक असते.

राज्यात सद्यस्थितीत सुमारे ५००० हिमोफिलीया रुग्ण आहेत. त्यापैकी मुंबईमध्ये के.ई.एम. रुग्णालय हे हिमोफिलीया रुग्णांसाठी उपचार केंद्र असून, सध्या के.ई.एम. रुग्णालयामध्ये नोंदणीकृत हिमोफिलीया रुग्णांची संख्या १४१५ इतकी आहे. तर, ठाणे जिल्ह्यामध्ये ८७८ हिमोफिलिया रुग्णांची नोंदणी होऊन त्यांना जिल्हा रुग्णालय, ठाणे येथे

उपचार देण्यात येतात. सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत मुंबई वगळता इतर सर्व जिल्हयांमध्ये प्रत्येकी एक प्रमाणे (एकुण ३४) हिमोफिलीया डे-केअर सेंटर्स कार्यान्वित करण्यात आले आहेत. सर्व जिल्ह्यांमधील हिमोफिलिया डे केअर सेंटरमध्ये हिमोफिलिया रुग्णांवर उपचार करण्यात येत आहेत.

रक्त गोठण्यासाठी Factor VIII व Factor IX या रक्तघटकांची आवश्यकता असते. सदर घटकांच्या कमतरतेमुळे हिमोफिलीया रुग्णांमध्ये सांधे, मांसपेशी, मेंदू, पोटात रक्तस्त्राव होण्याची लक्षणे दिसून आल्यानंतर, त्यांच्या उपचारासाठी Anti-Hemophilic Factors ( Factor VII,VIII,IX, FEIBA ) आवश्यकतेनुसार उपलब्ध करून देण्यात आली आहेत व याद्वारे या रुग्णांवर उपचार करण्यात येतात.

राज्यामध्ये सन २०१३ पासून, हिमोफिलिया उपचाराच्या सुविधा उपलब्ध करून देण्यात आलेल्या असून व त्यासाठी केंद्रशासनामार्फत उपलब्ध करून देण्यात येणाऱ्या अनुदानातून हिमोफिलिया रुग्णांच्या उपचारासाठी फॅक्टर्स खरेदी करून आवश्यकतेनुसार या हिमोफिलिया डे-केअर सेंटर्सना उपलब्ध करून देण्यात येतात. तसेच, एका हिमोफिलिया डे-केअर सेंटर मधून दुसऱ्या हिमोफिलिया डे केअर सेंटर मध्ये सदर फॅक्टर्स आवश्यकतेनुसार स्थलांतरित केले जातात. जिल्हास्तरावर अनुदान वितरित करण्यात येते जेणेकरून या अनुदानातून जिल्हास्तरावर या फॅक्टरची खरेदी करून रुग्णास तात्काळ उपलब्ध करून देणे शक्य होते. सद्य:स्थितीत ठाणे जिल्ह्यातील हिमोफिलीया डे-केअर सेंटरमध्ये Factor VII-९५ Vials, Factor VIII-८४ Vials, Factor IX-४ Vials, FEIBA-१३९ Vials उपलब्ध आहेत. तथापि, राज्यातील सर्व जिल्हयांमध्ये मिळून एकत्रित Factor VII- ६२२ Vials, Factor VIII-३१८७ Vials, Factor IX-१६०५ Vials, FEIBA-१५७६ Vials सध्या उपलब्ध आहेत.

पुढील काळात फॅक्टर्सची पुरेशी उपलब्धता होण्याच्या दृष्टीने फॅक्टर VIII, XI व FEIBA उपलब्ध करून देण्याबाबतचे आदेश संबंधित पुरवठादारांना खरेदी प्राधिकरण, मुंबई यांच्यामार्फत देऊन पुरवठा करण्याबाबत कळविले आहे.

मुंबईतील के.ई.एम. रूग्णालयातील उपचारकेंद्र बंद नसून, तेथे हिमोफिलीया रुग्णांवर उपचार सुरु आहेत. के.ई.एम. रुग्णालय येथील हिमोफिलिया रुग्णांसाठीच्या उपचारकेंद्रासाठी मागील १० वर्षापासून केंद्र शासनामार्फत उपलब्ध होणाऱ्या निधीमधून काही प्रमाणात सदर फॅक्टरचा पुरवठा करण्यात येत होता. तथापि, केंद्रशासनाच्या सन २०२४-२५ मधील मार्गदर्शक सूचनानुसार वैद्यकीय महाविद्यालय व टर्शरी केअर सेंटर येथे केंद्रशासनाच्या निधीमधून फॅक्टर्सचा पुरवठा करण्यात येऊ नये असे कळविले आहे. सदर के. ई.एम रुग्णालय, मुंबई हे वैद्यकीय महाविद्यालय व टर्शरी केअर सेंटर असल्यामुळे या रुग्णालयास यापुढे सदर फॅक्टर्सचा पुरवठा करता येणार नाही अशा आशयाचे पत्र अतिरिक्त महापालिका आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका व के. ई. एम रुग्णालय, मुंबई यांना आरोग्य सेवा आयुक्तालयामार्फत देण्यात आले आहे. त्यानुसार, त्यांच्यास्तरावर सदर फॅक्टर्स उपलब्ध करून देणे गरजेचे आहे. त्यानुषंगाने, के.ई.एम. रूग्णालयाच्या स्तरावर हिमोफिलियाच्या रूग्णांवर उपचार थांबवलेले नसून, सध्या के.ई.एम. रूग्णालयामध्ये हिमोफिलियाच्या नोंदणीकृत रूग्णांची संख्या १४१५ आहे व त्यांच्यावर तेथे उपचार केले जातात.

**************

महाराष्ट्र विधानसभा, सन २०२५ चे प्रथम अधिवेशन

महाराष्ट्र विधानसभा नियम-१०५ अन्वये लक्षवेधी सूचना क्रमांक-१२७४

मा.सर्वश्री. संतोष बांगर, मुरजी (काका) पटेल, संजय गायकवाड, विधानसभा सदस्य

" राज्यात आरोग्य विभागाच्या बॉम्बे नर्सिंग ॲक्टमधील तरतुदीनुसार कोणत्याही खासगी रुग्णालयास मृत रुग्णाचा मृतदेह बिल न भरल्याने अडविता येत नसणे. तरी देखील कायद्यातील

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२५ चे अर्थसंल्पीय अधिवेशन

लक्षवेधी सूचना क्र. २४०३

श्री. तुकाराम काते, मा. विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्र. २४०३ पुढीलप्रमाणे आहे :-

" चेंबूर येथील माहुल गाव खाडीतील समुद्रात कांदळवन तोडून भराव करण्याचे काम एजेस केमिकल कंपनीकडून होत असणे त्याकडे ठाणे खाडी वन विभागाचे दुर्लक्ष होणे, एजेस केमिकल कंपनीकडून कांदवळन तोडून त्यावर भराव करणे, भराव करुन त्यावर प्लांट उभारण्याचे काम सुरु करणे, याकडे प्रशासनाचे दुर्लक्ष असणे, त्यामुळे माहुल गाव येथील खाडीत येणाऱ्या फ्लेमिंगो पक्षी यांना भविष्यात धोका होणे व भराव झाल्याने माहुलगाव येथील मच्छीमारी धोक्यात येणे हे गंभीर बाब असून शासनाकडून करावयाची कार्यवाही व उपाययोजना. "

मा.मंत्री (बंदरे) यांचे निवेदन

चेंबूर येथील माहुल गाव खाडीतील टाटा पॉवर जेट्टीजवळील भुखंड मुंबई बंदर प्राधिकरण यांच्या मालकीचा आहे. मुंबई बंदर प्राधिकरणाने सदर भूखंड तेल साठवणूकीच्या टाक्या उभारण्यासाठी एजिस लॉजिस्टिक लिमिटेडला भाडेतत्त्वावर दिला आहे. एजिस लॉजिस्टिक्स लिमिटेडने कंपनीने टाटा पॉवर जेट्टीजवळील भूखंडासाठी भरावाचे काम केलेले नाही. एजिस लॉजिस्टिक्स लिमिटेड कंपनीने या कामासाठी केंद्रीय पर्यावरण, वने आणि हवामान बदल मंत्रालयाकडून सीआरझेड मंजुरी मिळवली आहे. सदर क्षेत्रातील खारफुटींचे कोणतेही नुकसान झालेले नाही. प्रत्यक्षात सदरच्या भूखंडाच्या आजूबाजूला कोणतीही खारफूटी नाही. सदर कामासाठी मुंबई बंदर प्राधिकरण, औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालय तसेच महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ यांच्याकडून परवानगी घेण्यात आलेली आहे.

स्थानिक वन विभागाच्या स्थळपाहणी अहवालानुसार, सदर जागा ही कांदळवनापासून ५५ ते ६० मी. अंतरावर असून ही जागा व कांदळवन क्षेत्रामध्ये पिरपाव जेट्टीकडे जाणारा डांबरी रस्ता व त्यालगत मोठी पाईपलाईन असल्याचे निदर्शनास येते.

एजिस लॉजिस्टीक कंपनी मुळे माहुल-ट्रॉम्बे परिसरातील मच्छिमारांना कोणत्याही प्रकारचा त्रास झाल्याची अथवा त्यांच्या मासेमारीवर विपरित परिणाम झाल्याची कोणतीही तक्रार अथवा निवेदन प्राप्त झालेले नाही.

****************

लक्षवेधी सूचना क्र.११७१

## महाराष्ट्र विधानसभा
## सन २०२५ चे अर्थसंकल्पीय अधिवेशन

### महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये लक्षवेधी सूचना

**श्रीमती सरोज अहिरे वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सुचना क्र. ११७१ पुढील प्रमाणे आहे:-**

"नाशिक या कृषिप्रधान जिल्हयात भाजीपाला, फळे, अन्नधान्ये यांचे विक्रमी उत्पादन होते असणे. त्यामुळे शेतकऱ्यांच्या शेतमालास चांगली बाजारपेठ मिळण्यासाठी नाशिक येथे अद्ययावत टर्मिनल मार्केट उभारण्याच्या प्रस्तावास २२ जुलै २००९ रोजी मान्यता देण्यात आली असणे. त्यानुसार नाशिक जिल्ह्याच्या मौजे पिंपरी सय्यद (ता.नाशिक) येथील गट क्रमांक १६२१ व १६५४ मधील शासन मालकीच्या जागेपैकी १०० एकर जमीन बाजारमुल्याच्या ५० टक्के भोगाधिकार मुल्य न आकारता महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळास विनामुल्य हस्तांतरित करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. महसूल व वन विभागाने निश्चित केलेल्या अटी व शर्तीनुसार मुंबई टर्मिनल मार्केटच्या धर्तीवर या प्रकल्पाची उभारणी केली जाणार असणे. याबाबत या मतदारसंघाची लोकप्रतिनिधी यांनी दिनांक १२/२/२०२५ रोजी मा. मुख्यमंत्री महोदय यांना सदर विषयाबाबतचे पत्र देणे त्यानुसार प्रधान सचिव कृषि यांना माननीय मुख्यमंत्री महोदयांनी सदर पत्रावर तपासून कारवाई करावी असे निर्देश करणे त्याअनुषंगाने अवर सचिव सहकार व पणन विभाग यांनी कार्यकारी संचालक महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ पुणे यांना दि.२० फेब्रुवारी २०२५ रोजी च्या पत्रान्वये अहवाल सादर करणेबाबत विनंती करणे सदर नाशिकमध्ये कृषीटर्मिनल मार्केट उभारण्याबाबत लवकरात लवकर कार्यवाही करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना"

### मंत्री (पणन) यांचे निवेदन

नाशिक विभाग विकास कार्यक्रम २००९ अंतर्गत नाशिक विभागातील कृषि मालाकरिता पणन विषयक पायाभूत सुविधा निर्माण करणेबाबतचा प्रकल्प उभारणेस दि. १३.८.२००९ रोजीच्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली होती. यामध्ये नाशिक येथे टर्मिनल मार्केट उभारणीच्या तरतुदीचा समावेश होता.

मौजे शिलापुर तालुका व जिल्हा नाशिक येथील शासकीय जागा (सर्वे नंबर २२०, मधील ८१.३५ हेक्टर) पणन मंडळास हस्तांतर करणेबाबतचा प्रस्ताव जिल्हाधिकारी, नाशिक यांच्यामार्फत महसुल व वन विभाग मंत्रालय, मुंबई यांना दि.२९.३.२०१० रोजी सादर करण्यात आला होता. तथापि,जिल्हाधिकारी, नाशिक यांनी दि.५.८.२०१० च्या पत्रान्वये संबधीत जागेवर शैक्षणीक आरक्षण असल्यामुळे पर्यायी जागा म्हणुन पिंप्री सय्यद ता. नाशिक येथील गट नं.१६२१ व १६५४ या शासकीय जागेची मोजणी करुन मोजणी नकाशा सादर करणेस पणन मंडळास सुचित केले होते.

त्यानुसार पणन मंडळाने दि.१३.०८.२०१९ रोजी जिल्हाधिकारी, नाशिक यांना कंटुर सर्व्हेनुसार नाशिक टर्मिनल मार्केटसाठी मौजे पिंप्री सैय्यद ता.जि.नाशिक येथील गट क्र. १६५४ मधील १५.४५ हेक्टर आर व गट क्र.१६२१ मधील २४.५५ हेक्टर आर.जागा उपयुक्त असल्याने अशी एकूण १०० एकर जागा या दोन्ही गटातून नाशिक टर्मिनल मार्केटसाठी देण्याबाबत विनंती केली होती.

यासंदर्भात सहा. संचालक नगररचना, नाशिक यांनी नाशिक टर्मिनल मार्केटकरिता गट क्र. १६२१ च्या जागेच्या वापरासाठी सदर जागेवरील "शैक्षणीक वापर" हे आरक्षण बदल करणेसाठी ३०% अधिमूल्य रक्कम भरणा करावा लागणार असल्याचे पणन मंडळास कळविले. त्यानुसार जमीनीवरील आरक्षण बदल प्रक्रिया शुल्क व अधिमुल्य रक्कम यापोटी पणन मंडळास अंदाजे रु.२१ ते २४ कोटी रक्कम भरणा करावी लागणार होती. त्यामुळे गट क्र.१६२१ मधील जमिनीवर असलेले शैक्षिणक आरक्षण बदल प्रक्रिया नि:शुल्क करण्यासाठी उचित कार्यवाही होणेची विनंती पणन मंडळामार्फत जिल्हाधिकारी नाशिक यांना करण्यात आली होती. तथापि, यासंदर्भात त्यांच्याकडून उचित कार्यवाही झालेली नाही.

त्याचप्रमाणे नाशिक टर्मिनल मार्केटसाठी सुचविलेल्या मौजे पिंप्री सय्यद येथील गट नं. १६५४ मधील जमीनीवर अतिक्रमण झालेले असून, सदर जमीन ही मौजे पिंप्री सय्यद ते सिन्नर (शिंदेमार्गे) या उपमार्गापासुन आतील भागात असल्याने व तेथून महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लि. यांची उच्च दाब विद्युत वाहिनी (High tension Line) गेलेली असल्याने सदर जागेचा व्यावसायिकदृष्ट्या वापर करणेबाबत मर्यादा येणार असल्याचे पणन मंडळानी जिल्हाधिकारी नाशिक यांना दि. १५.३.२०२३ च्या पत्रान्वये निदर्शनास आणून दिले होते.

तद्नंतर श्रीम. सरोज अहिरे, विधानसभा सदस्य यांनी दिनांक १२.२.२०२५ रोजी मा. मुख्यमंत्री महोदय यांना सादर केलेल्या पत्रान्वये महसूल व वन विभागाने निश्चित केलेल्या अटी व शर्तीनुसार मुंबई टर्मिनल मार्केटच्या धर्तीवर या प्रकल्पाची उभारणी करण्याची विनंती केली आहे. यासंदर्भात कार्यकारी संचालक, महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ, पुणे यांनी दिनांक २०.०२.२०२५ रोजीच्या पत्रान्वये कळविले आहे की, नाशिक टर्मिनल मार्केट प्रकल्पाचे बांधकाम सुरु करणेपुर्वी प्रस्तावित जागेच्या आरक्षण बदलापोटी देय शुल्क व सपाटीकरणाचा खर्च असा एकूण ३७ ते ४० कोटी खर्च अपेक्षीत असल्याने, सदरचा प्रकल्प आर्थिकदृष्ट्या सक्षम होईल किंवा कसे याबाबत साशंकता आहे. तसेच, पणन मंडळ, बाजार समिती व खाजगी गुंतवणूकदार प्रकल्पाचे बांधकाम सुरु करण्यापुर्वी एवढ्या मोठ्या प्रमाणावर पूर्वगुंतवणुक करु शकणार नाही. या सर्व बाबी विचारात घेवून नाशिक टर्मिनल मार्केटच्या जागेबाबत फेरविचार करणेसंदर्भातील प्रस्ताव पणन मंडळाच्या आगामी संचालक मंडळ सभेपुढे आवश्यक कार्यवाहीसाठी सादर करण्यात येईल.

****************

## महाराष्ट्र विधानसभा

**श्री. सिध्दार्थ खरात, मा. वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र.२३९९ पुढीलप्रमाणे आहे.**

" राज्याच्या आर्थिक परिस्थितीचे कारण पुढे करून वरिष्ठ महाविद्यालयांना २४ नोव्हेंबर, २०२१ रोजीच्या मंत्रीमंडळाच्या बैठकीत कायम विनाअनुदान तत्वावर यापुढे परवानगी दिली जाईल असा धोरणात्मक निर्णय घेणे, सन २००१ पासुन कला, वाणिज्य व विज्ञान शाखेच्या वरिष्ठ महाविद्यालयांना कायम विनाअनुदान तत्वावर परवानगी देण्यात येणे, सन २००१ ते २०१९ पर्यंत जवळपास २२०० हुन अधिक नवीन महाविद्यालयांना कायम विनाअनुदान तत्वावर देण्यात आलेली परवानगी, कायम विनाअनुदान तत्वावर परवानगी देतांना महाविद्यालयांकडून भविष्यात कधीही अनुदानाची मागणी करणार नाही असे हमीपत्र लिहून घेणे, नोव्हेंबर २००१ मध्ये राज्य मंत्रीमंडळाने कायम विनाअनुदान तत्वावर परवानगी देण्यासाठी माध्यमिक शाळा, कनिष्ठ महाविद्यालये आणि वरिष्ठ कला, वाणिज्य व विज्ञान यांचेकरीता एकत्रितपणे निर्णय घेणे, तथापी माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालये यांचा कायम शब्द काढून त्यांना टप्प्याटप्प्याने अनुदानावर आणण्याचा निर्णय शासनाने घेतलेला असणे, यांचधर्तीवर वरिष्ठ महाविद्यालयांना विनाअनुदान तत्त्वावर मान्यता देऊन टप्याटप्याने अनुदान देणेबाबत विनाअनुदानित वरिष्ठ महाविद्यालये कृती समितीने याचिका क्रमांक ४१२०/२०१९ मा. उच्च न्यायालय, नागपूर खंडपीठ येथे दाखल करणे, सदर याचिकेवर मा. उच्च न्यायालयाने दिनांक २७ जून २०२२ रोजी दिलेल्या निकालानुसार राज्याची आर्थिक परिस्थिती सुधारल्यास व परिस्थिती बदलल्यास कायम विनाअनुदानित महाविद्यालयांना शासनाने अनुदान द्यावे असे निर्देश देणे, शासनाने वरिष्ठ महाविद्यालयात शिकणा-या विद्यार्थ्यांची संख्या लक्षात घेता कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयांना टप्याटप्याने अनुदानावर देण्याची आवश्यकता. "

---

## मा.श्री. चंद्रकांत पाटील, मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण यांचे निवेदन

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम १०९ मधील विहित तरतुदी व उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन निर्णय दिनांक १५.०९.२०१७ नुसार विहित निकष व कार्यपद्धतीनुसार अकृषी विद्यापीठांनी निश्चित केलेल्या बृहत आराखड्यानुसार त्या त्या शैक्षणिक वर्षाकरिता नवीन महाविद्यालयांना कायम विनाअनुदानित तत्वावर मान्यता देण्यात येते.

राज्याची आर्थिक स्थिती, राज्यावरील वित्तीय दायित्व लक्षात घेऊन १७ मे २००१ रोजीच्या मंत्रीमंडळ बैठकीत मंत्रीमंडळ उपसमितीने सन २००१-०२ या शैक्षणिक वर्षापासून नवीन महाविद्यालय सुरु करण्यासंदर्भात खालील प्रमाणे निर्णय घेतला आहे.

"ज्या तालुक्यामध्ये आजमितीस एकही वरिष्ठ महाविद्यालय कार्यरत नाही, अशा तालुक्यामध्ये अनुदानाच्या प्रचलित धोरणानुसार नवीन महाविद्यालय सुरु करण्यास परवानगी देण्यात यावी. तसेच, इतर ठिकाणी कायम विना अनुदान तत्वावर नवीन महाविद्यालय सुरु करण्यास परवानगी देण्यात यावी. कायम विना अनुदान तत्वावर परवानगी देताना इच्छुक संस्थेकडून संस्था भविष्यामध्ये कोणत्याही प्रकारच्या अनुदानाची मागणी करणार नाही. तसेच, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या आर्थिक बाबींची सर्वस्वी जबाबदारी संस्था स्वीकारेल असे हमीपत्र घेण्यात यावे."

त्याचप्रमाणे दि. २४.११.२००१ रोजी वित्त विभागाने मंत्रिमंडळास सादर केलेल्या प्रस्तावाच्या अनुषंगाने मंत्रिमंडळाने शालेय शिक्षण, उच्च व तंत्र शिक्षण व वैद्यकिय शिक्षण इत्यादी क्षेत्रात नवीन शासकीय संस्था उघडण्यात येऊ नयेत. मात्र अलिकडे अवलंबविलेल्या धोरणानुसार कायम स्वरुपी विना अनुदानित तत्वावर खाजगी क्षेत्रात अशा संस्था उघडण्याची परवानगी देण्यात यावी, असा निर्णय घेतला आहे.

उपरोक्त मंत्रिमंडळ उप समिती व मंत्रिमंडळाचा निर्णय विचारात घेऊन शैक्षणिक वर्ष २००१ नंतर नवीन महाविद्यालये / विषय / अभ्यासक्रम / विद्याशाखा / अतिरिक्त तुकडया यांना कायम स्वरुपी विना अनुदानित तत्वावर मंजूरी देण्याचे धोरण अवलंबविण्यात येत आहे. कायम विनाअनुदान तत्वाचे धोरण विचारात घेऊन नवीन महाविद्यालयांना कायम विना अनुदान तत्वावर परवानगी देताना इच्छुक संस्थेकडून संस्था भविष्यामध्ये कोणत्याही प्रकारच्या अनुदानाची मागणी

करणार नाही. तसेच, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या आर्थिक बाबींची सर्वस्वी जबाबदारी संस्था स्वीकारेल असे हमीपत्र घेण्यात येते .

महाराष्ट्र राज्य कायम विना अनुदानित वरिष्ठ महाविद्यालय कृती समितीने उच्च शिक्षण देणाऱ्या संस्थांना अनुदानाबाबतचे धोरण ठरविण्याकरिता पाऊले उचलणे तसेच दि. २४.११.२००१ रोजी नवीन महाविद्यालयांना कायम विना अनुदान तत्त्वावर परवानगी देण्याबाबत मंत्रीमंडळामध्ये झालेल्या बैठकीत ठरविण्यात आलेले धोरण हे शासन निर्णय दिनांक ०४.०१.१९८९ व ०८.०१.१९९१ नुसार स्पष्टपणे बेकायदेशीर असल्याबाबत याचिका क्र.४१२०/२०१९ दाखल केली होती.

सदर याचिकेमध्ये मा. उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ नागपूर यांनी दि. २७.०६.२०२२ रोजीच्या आदेशात नमूद केले आहे की, कायम विना अनुदान तत्व म्हणजे कायमस्वरूपी अनुदान नाकारणे नसून भविष्यात शासनाच्या आर्थिक परिस्थितीत सुधारणा झाल्यानंतर शासन अनुदान देणेबाबतचे धोरण निश्चित करून शकते. ("on permanent no grant basis" would only mean that there is no denial of no grant permanently and there is a possibility of making available grants in future in accordance with the law and the policy that may be formulated by the State Government on improvement of the State's financial condition and other relevant circumstances.)

उच्च शिक्षण विभागांतर्गत शैक्षणिक वर्ष २०२२-२३ पर्यंत कला, वाणिज्य, विज्ञान, विधी, शारिरीक शिक्षण, व समाजकार्य विद्याशाखेशीसंबंधित एकूण २२१२ कायम विनाअनुदानित महाविद्यालये आहेत.

महाविद्यालयाच्या अनुदानाबाबत वित्त विभागाने नमूद केल्यानुसार सन २०२४-२५ मधील उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे रु.११,८०३ कोटी इतका वेतनावर खर्च असून सन २०२४-२५ मधील राज्याचे वेतन, व्याज व निवृत्तीवेतन यावरील (भारीत खर्च) एकूण खर्च रु. २,९०,००० कोटी आहे. सदर खर्च हा एकूण महसूली उत्पादनाच्या ५५ टक्के आहे. राज्याचे साधनसंपत्ती मर्यादित असून वेतनावर शासनाचा जास्त होणारा खर्च, महसूली तूट, राजकोषिय दायित्व तसेच शासनाने घोषित केलेल्या नवीन योजना यामुळे मोठ्या प्रमाणात येणारा आर्थिक भार विचारात घेता, वेतनावरील खर्च मर्यादित ठेवणेबाबत विभागाने अनुदान धोरणात कालानुरुप बदल करणे आवश्यक आहे. आरटीई कायद्यानुसार प्राथमिक शिक्षणाची जबाबदारी शासनाने स्विकालेली असून, उच्च शिक्षणासंदर्भात

येणारा आर्थिक भार संबंधित महाविद्यालय व शैक्षणिक संस्था यांनीच स्विकारणे आवश्यक आहे, असे अभिप्राय वित्त विभागाने महाविद्यालयांच्या अनुदानाबाबत नोंदविले आहेत.

सबब, सद्यस्थितीत सन २००१ नंतर कायम विना अनुदान तत्वाचे धोरण अवलंबविण्यात येत आहे. सदर धोरणामध्ये बदल करून कायम विना अनुदानित महाविद्यालयांच्या नावातील कायम शब्द वगळून कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयांना टप्याटप्याने अनुदानावर आणण्याबाबतची बाब शासनाच्या विचाराधीन नाही.

सन २००१ नंतर नवीन महाविद्यालयांना कायम विनाअनुदान तत्वावर मान्यता देण्यात येत असली तरी, या महाविद्यालयातील विविध महाविद्यालयांतील विविध अभ्यासक्रमांचे प्रवेशित विद्यार्थ्यांचे शिक्षण शुल्क व परिक्षा शुल्क प्रतिपूर्तीबाबत शासनाने विविध योजना लागू केलेल्या आहेत.

सामाजिक व शैक्षणिक मागास प्रवर्ग, आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक व खुल्या प्रवर्गातील प्रवेशीत विद्यार्थ्यांसाठी सदर योजनांची अंमलबजावणी उच्च व तंत्र शिक्षण विभागामार्फत केली जाते. उच्च शिक्षण संचालनालयांतर्गत महाविद्यालयांमध्ये उच्च शिक्षण घेणा-या विद्यार्थांसाठी एकूण १४ शिष्यवृत्ती योजना कार्यान्वित आहेत. त्यामध्ये राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना व डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजना या दोन महत्त्वाच्या योजनांचा समावेश आहे.

तसेच सामाजिकदृष्ट्या मागासवर्गीय प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, इतर बहुजन कल्याण विभाग, आदिवासी विकास विभाग यांचेकडून शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना व वसतिगृह निर्वाह भत्ता योजना राबविली जाते. उच्च व तंत्र शिक्षण तसेच अन्य विभागांमार्फत राबविण्यात येणा-या शिष्यवृत्तीच्या योजना अशासकीय कायम विनाअनुदानित महाविद्यालयातील अभ्यासक्रमांनादेखील लागू आहेत.

उच्च शिक्षण संचालनालयांतर्गत महाविद्यालयांमधील सामाजिक व शैक्षणिक मागास प्रवर्ग, आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक व खुल्या प्रवर्गातील प्रवेशीत विद्यार्थ्यांना राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती या योजनेकरिता शासनाने शैक्षणिक वर्ष २०२३-२४ साठी रू. १०२.४४ कोटी इतकी रक्कम अदा केली आहे तसेच डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता या

योजनेकरिता शासनाने शैक्षणिक वर्ष २०२३-२४ साठी रू. १.६५ कोटी इतकी रक्कम अदा केली आहे.

सन २००१ नंतर महाविद्यालयांचे स्वरूप कायम विनाअनुदानित तत्वावरील असले तरी, महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती स्वरूपात शिक्षण शुल्क, परिक्षा शुल्क व वसतीगृह निर्वाह भत्ता रक्कम देण्यात येत असल्याने शासनाकडून विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक हिताची काळजी घेण्यात येत आहे.

****************************

# महाराष्ट्र विधानसभा, सन २०२५ चे प्रथम (अर्थसंकल्पीय) अधिवेशन

## लक्षवेधी सूचना क्र.२२३४

**मा. श्री. शिवाजी पाटील, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्र. २२३४ खालीलप्रमाणे आहे.**

"चंदगड मतदारसंघ हा कर्नाटक व गोवा राज्याच्या सीमेस लागून आहे. हा मतदारसंघ महाराष्ट्राचे कर्नाटक राज्याकडे जातानाचे शेवटचे टोक आहे.आजपर्यंत हा मतदारसंघ विकासापासून वंचित असणे,येथेसामाजिक,शैक्षणिक,आरोग्य,रस्ते,वीज,पाणी आणि शेती तसेच इतर अनेक समस्या आहेत.१)स्वातंत्र्य काळापासून आजही येथील धनगरवाडे सर्व पायाभूत सुविधांपासून वंचित असून नारस्त्यांची सोय, ना वाहतूकसुविधा, नाआरोग्याची सुविधा,नाशिक्षणाची सोय अशा परिस्थितीत येथे लोक राहत असून येथे सुविधा होणे आवश्यक असणे. २)सदरमतदारसंघास लागूनचकर्नाटक राज्याचा सीमाभाग असून कर्नाटक सरकारने बेळगाव हा भाग कर्नाटक राज्याची उपराजधानी बनवून विकसित करून येथील मेडिकल हब हे संपूर्ण देशात व परदेशात नावाजलेले असल्याने त्याठिकाणी सर्व पायाभूत सोयीसुविधांसह शैक्षणिक, आरोग्य, रस्ते, उद्योग व इतर सर्व सोयीसुविधा निर्माण करून बेळगावचा भाग विकसित करणे, त्याचधर्तीवर महाराष्ट्रशासनाने हा मतदारसंघ शैक्षणिक, सामाजिक, आरोग्य, रस्ते, वीज व उद्योग इत्यादीबाबतीत विकसित करण्याची आवशक्यता, मेडिकल हब देखील चंदगड मतदारसंघात करावे. जेणेकरून नागरिकांना इथेच सर्वसोयीसुविधा उपलब्ध होतील. येथेच शिक्षणाची व रोजगाराची संधी उपलब्ध होण्याची शक्यता नाकारता येत नसणे. ३) चंदगड मतदारसंघामध्ये शासनाने शासकीय उच्चशिक्षण संस्था, शासकीय मेडिकल कॉलेज, शासकीय मोठे हॉस्पिटल, स्पोर्ट्स ॲकाडमी व इतर शासकीय संस्था याभागात स्थापन करून येथील युवक वर्गास शिक्षणासाठी चालना देण्याची आवशक्यता, कर्नाटक व गोवा राज्याच्या धर्तीवर चंदगड मतदार संघात शैक्षणिक, सामाजिक, आरोग्य, रस्ते, वीज व उद्योग इत्यादी सर्व सोयीसुविधा विकसित करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही."

### मा. मंत्री ( ग्राम विकास ) यांचे निवेदन

जिल्हा परिषद, कोल्हापूर अंतर्गत चंदगड तालुक्यामध्ये एकूण १६ धनगरवाडे असून त्यापैकी २ धनगरवाडयांना जोडणारे रस्ते, रस्ते विकास योजना २००१-२०२१ मध्ये समाविष्ठ आहेत. उर्वरित धनगरवाडे हे आठमाही कच्च्या रस्त्यांनी जोडलेले आहेत. तसेच, सदर रस्त्यांच्या लांबीमध्ये वनविभागाची हद्द येत असल्याने वनविभागाकडून जमिन हस्तांतर केल्यानंतर सदर रस्ते रस्ते विकास योजना मध्ये समाविष्ठ करणे शक्य आहे. सद्यस्थितीत ग्रामीण मार्ग क्रमांक १०५ बुजवडे ते धनगरवाडा या रस्त्यावर जिल्हा वार्षिक योजनेंतर्गत तसेच, ग्रामीण मार्ग क्रमांक २८१ वरती सार्वजनिक बांधकाम विभागाअंतर्गत ५०५४ मार्ग व पुल या लेखाशिर्षातून काम मंजूर असून काम प्रगतीत आहे.

तसेच, तालुक्यातील सर्व धनगर वाड्यांचे विद्युतीकरण करण्यात आले आहे.

चंदगड मतदारसंघात प्रधानमंत्री ग्राम सडक योजनेंतर्गत टप्पा-३ मध्ये रु.४०.६६ कोटी रक्कमेची ११ कामे मंजूर असून मुख्यमंत्री ग्राम सडक योजनेंतर्गत टप्पा-१ व २ मध्ये एकूण रु.१४५.६६ कोटी रक्कमेची ३४ कामे मंजूर आहेत. चंदगड तालुक्यात मागील ३ वर्षात जिल्हा स्तरीय जिल्हा वार्षिक योजना ३०५४ व ५०५४ मधून तसेच, राज्यस्तरीय मा.लोकप्रतिनिधींनी गावांतर्गत सुचविलेली कामे (२५१५ १२३८) व रस्ते व पुल दुरुस्ती परिरक्षण कार्यक्रम (३०५४-२४१९) या योजनांमधून निधी मंजूर झालेला आहे.

चंदगड तालुक्यात जिल्हा परिषद मालकीच्या रस्त्याची लांबी ५४५.५२५ कि.मी. आहे. त्यातील इतर जिल्हा मार्ग व ग्रामीण मार्गाची ४३७.८०९ कि.मी. लांबी सुस्थितीत असून १०७.७१६ कि.मी. अपृष्ठांकीत/ मुरमी रस्ते आहे.

या धनगरवाडयांवरील शाळांमध्ये तसेच तालुक्यामधील सर्व शाळांमध्ये विदयार्थ्यांच्या सुरक्षिततेसाठी १००% सी.सी.टी.व्ही. बसविण्यात आले असुन सदर शाळेमध्ये शिक्षण घेत असलेल्या विदयार्थ्यांना मोफत गणवेश, पुस्तके, शालेय पोषण आहार इ. सोई सुविधा पुरविण्यात येत आहे. तसेच शालेय शिक्षण विभागाकडील सर्व योजनांचे लाभ विदयार्थ्यांना दिले आहेत.

कोल्हापूर जिल्हा परिषद अंतर्गत चंदगड तालुक्यामध्ये १९९ जि.प.शाळा प्राथमिक शाळा असुन ६१ अनुदानित माध्यमिक व २४ विना अनुदानित शाळा आहेत. तसेच चंदगड तालुक्यामध्ये एकुण जिल्हा परिषद संचलीत एकूण ४१४ शाळा इमारतींमध्ये ८४३ वर्ग खोल्या उपलब्ध आहेत. तसेच चंदगड तालुक्यामधील दोन शाळा प्रधानमंत्री श्री शाळा आहेत. तसेच विदया मंदिर जंगमहटटी या शाळेची डॉ. बाबासाहेब आंबेडकर आदर्श शाळा या योजनेअंतर्गत निवड झाली आहे. तसेच शिक्षण विभागांस जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत सन २०२४-२०२५ शाळा दुरूस्तीकरीता रु.९५.०० लक्ष व नवीन वर्ग खोल्याचे बांधकाम करणेकरीता रु. ८०.०० लक्ष निधी मंजूर करण्यात आलेला आहे.

जलजीवन मिशन अंतर्गत चंदगड विधानसभा मतदारसंघात एकूण २९१ कामे मंजूर असून २४१ कामे प्रगतीपथावर व ५० कामे पूर्ण आहेत.

सद्यस्थितीत कोल्हापूर जिल्ह्यामध्ये एक शासकीय वैद्यकीय महाविद्यालय कार्यरत आहे. तसेच नविन शासकीय बीएस्सी (नर्सिंग), होमिओपॅथी, आयुर्वेद आणि योग व निसर्गोपचार पदवी महाविद्यालये सुरू करण्यास सन २०२४ मध्ये मान्यता देण्यात आली आहे.

राजर्षी छत्रपती शाहू महाराज शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या शेंडापार्क येथील आवारात ११०० खाटांचे रुग्णालय प्रस्तावित करण्यात आले असून यामध्ये ६०० खाटांचे सामान्य रुग्णालय, २५० खाटांचे अतिविशेषोपचार रुग्णालय व २५० खाटांचे कर्करोग रुग्णालय प्रस्तावित करण्यात आले असून सद्यस्थितीमध्ये याचे बांधकाम सुरु आहे.

जिल्हा शल्यचिकित्सक कोल्हापूर यांचे अधिनस्त चंदगड येथे ३० खाटांचे ग्रामीण रुग्णालय कार्यरत आहे. तसेच सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत पाटणे फाटा (हलकर्णी एम आय डी सी) येथे २० खाटांचे ट्रामा केअर युनिट व ५० खाटांचे उपजिल्हा रुग्णालय मंजूर करण्यात आलेले आहे. सदर रुग्णालयांना शासन स्तरावरुन प्रशासकीय मंजूरी मिळाली असून पुढील कार्यवाही सुरु आहे.

तसेच, चंदगड तालुक्यात क्रीडा संकुलासाठी रु.११८.८२ लक्ष रक्कमेच्या कामास मंजूरी दिली असून सदर काम प्रगतीत आहे.

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून चंदगड तालुक्यात हलकर्णी औद्योगिक क्षेत्राची स्थापना केली आहे. त्यामध्ये लहान मोठे असे एकूण २८३ औद्योगिक भूखंड आरेखित केलेले असून त्याचे क्षेत्र १०८.८१ हेक्टर इतके आहे. एकूण आरेखित भूखंडापैकी २०६ औद्योगिक भूखंडाचे वाटप केलेले असून वाटपाचे क्षेत्र ७१.३२ हेक्टर इतके आहे.

उच्च शिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखाली कोल्हापूर जिल्ह्यात एकूण ५ शासकीय महाविद्यालये,संस्था,वस्तीगृहे कार्यरत आहेत.

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांच्या कार्यकक्षेत एकूण २३७ अशासकीय अनुदानित/कायम विनाअनुदानित महाविद्यालये कार्यरत असून त्यापैकी ३ अशासकीय अनुदानित व २ अशासकीय कायम विनाअनुदानित महाविद्यालये चंदगड तालुक्यात सुरु आहे.

उपरोक्त वस्तुस्थिती पाहता चंदगड मतदारसंघात आवश्यक सोयी-सुविधा उपलब्ध करुन दिल्या आहेत, हे स्पष्ट होते.

---

साठवणूक केल्याने महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत सदर उद्योगाची रु. १.०० लक्ष रुपये इतकी बँक हमी जप्त करण्यात आली आहे.

जिल्हा आरोग्य अधिकारी, पालघर यांच्याकडून प्राप्त अहवालानुसार प्राथमिक आरोग्य केंद्र, तारापूर परिसरामध्ये रुग्ण संखेच्या प्रमाणात वाढ झालेली आढळून आली नाही. तसेच कृषि विभागाकडून प्राप्त पाहणी अहवालानुसार शेतजमीनीचे नुकसान झाल्याचे आढळून आले नाही.

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत राष्ट्रीय जल गुणवत्ता अभियानांतर्गत केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाने नेमून दिलेल्या ठिकाणचे पाण्याचे नमुने दरमहा संकलित करण्यात येतात. याबाबतचे पृथ:करण अहवाल महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या संकेतस्थळावर अवलोकनार्थ उपलब्ध आहेत. उक्त पृथ:करण अहवालाचे अवलोकन केले असता समुद्राच्या पाण्याची गुणवत्ता खालावल्याचे दिसून येत नाही.

***********

## महाराष्ट्र विधानसभा

## सन २०२५ चे प्रथम (अर्थसंकल्पिय) अधिवेशन

**श्री. श्री. विलास सुकूर तरे, मा. विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम, १०५ अन्वये उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना क्र. २३४४ पुढीलप्रमाणे आहे -**

**"पालघर जिल्ह्यात बोईसर तारापूर एम.आय.डी.सी.मधील सडेकर इन्व्हायरो इंजिनिअरिंग प्रा.लि.या कंपनी उद्योगाची उभारणी सन २०२१ते२२ या कालावधीत उभारणी करण्यातआली मात्र या कंपनीने अल्पावधीतच आपलेसांडपाणी प्रक्रिया न करताच नाल्यात,खाडीत तसेच समुद्रात सोडल्याने जलसृष्टीचा नष्ट होत असून येथील लोकांच्या जीवनमान मध्ये विपरीत परिणाम होतअसून कर्करोग, फुफफुसावर देखील परिणाम होत असून श्वसनाचे आजार होत असणे, कंपनीतील रासायनिक सांडपाणी शेतीत सोडल्याने या परिसरातील मोठ्या प्रमाणात शेती नष्ट होण्याच्या मार्गावर असल्याचे बाब माहे फेब्रुवारी २०२५ च्या शेवटच्या आठवड्यात निदर्शनास येणे,त्यामुळे येथील शेतकरी मोठ्या आर्थिक समस्यात आलेला असणे,या कंपनीने प्रदुषण नियमाचे सर्वनियम पायदळी तुडविण्याचे निदर्शनास येत असणे, यासंदर्भात मा.जिल्हाधिकारी यांनी कंपनीला भेट देऊन या कंपनीचे सविस्तर पाहणी केली असता मोठ्या प्रमाणात रासायनिक पाणी सर्वत्र सोडत असल्याने शेती लाल झालेले असल्याचे त्यांच्या निदर्शनास आल्यावर त्यांनी तहसीलदार यांना पंचनामा करण्याचे आदेश दिलेले असणे, त्यानुसार महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने तात्काळ कारवाई करण्याची आवश्यकता असतानाही त्यावर कोणतीच कारवाई करण्यात येत नसल्याने शेतकरी व सर्वसामान्य नागरिक नाराजी व्यक्त करीत असणे, तसेच महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ आणि महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने संयुक्त कारवाई करून सदर कंपनी कंपनीला मोठ्या प्रमाणात दंड आकारून सांडपाण्याची योग्य विल्हेवाट लावण्यासाठी स्वतंत्र यंत्रणा उभीकरून महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या सर्वनियमांची काटेकोर अंमलबजावणी करून या परिसरातील शेतकरी आणि मानवांना व प्राण्यांना कोणत्याही प्रकारचे प्रदूषण मिश्रित पाण्यामुळे होणाऱ्या सर्व उपाययोजना करण्याचीआवश्यकता निर्माण झालेलेअसणे यावर शासनाने करावयाचे कार्यवाही व उपाययोजना.."**

---

### मा. मंत्री (पर्यावरण व वातावरणीय बदल) यांचे निवेदन

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, तारापूर या औद्योगिक वसाहतीमध्ये मोठे, मध्यम व लहान प्रकारचे रासायनिक, औषध निर्मिती, किटकनाशक निर्मिती व कापड यांवर प्रक्रिया करणारे उद्योग कार्यरत आहेत. सदर औद्योगिक परीसरात एकूण ४४४ उद्योग औद्योगिक सांडपाणी निर्माण करतात त्यापैकी १०३ उद्योगांमार्फत शून्य निष्कासन यंत्रणा बसविण्यात आली असून उर्वरीत एकूण ३४१ उद्योगांपैकी मोठ्या व मध्यम स्वरुपाच्या उद्योगांमार्फत त्यांच्या उत्पादन प्रक्रियेत निर्माण होणाऱ्या सांडपाण्यावर प्रक्रिया करण्यासाठी प्रथम, व्दितीय व काही उद्योगांमार्फत तृतीय स्वरुपाची प्रक्रिया यंत्रणा कार्यान्वित करण्यात आली आहे. उर्वरीत लघु उद्योगांमार्फत त्यांच्याकडून निर्माण होणाऱ्या औद्योगिक सांडपाण्यावर प्रक्रिया करणेकरिता प्राथमिक स्वरुपाची सांडपाणी प्रक्रिया संयत्रणा उभारण्यात आली आहे.

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, तारापूर येथील सर्व उद्योगांकडून प्रक्रियाकृत सांडपाणी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या भुयारी गटारीद्वारे तीन वेगवेगळ्या ठिकाणी असणाऱ्या सम्पमध्ये गोळा केले जाते. सदर प्रक्रियाकृत सांडपाणी पुढील प्रकियेकरिता गुरुत्वाकर्षण वाहीणीद्वारे नवीन सामुहिक सांडपाणी प्रक्रिया केंद्रात सोडण्यात येते.

सामुहिक सांडपाणी प्रक्रिया केंद्रामध्ये रासायनिक उद्योगामधून निर्माण होणाऱ्या सांडपाण्याचे विक स्ट्रिम व हाय सी.ओ.डी./टी.डी.एस. स्ट्रिम या दोन भागांमध्ये वर्गीकरण करण्यात येते. रासायनिक उद्योगामधून निर्माण होणाऱ्या विक स्ट्रिममधील सांडपाण्यावर उद्योगांमध्येच प्रक्रिया करण्यात येते व हाय

सी.ओ.डी./टी.डी.एस स्ट्रिममधील सांडपाण्यावर अद्यावत स्वरुपाच्या प्रक्रिया यंत्रणेव्दारे प्रक्रिया केली जाते. मोठ्या उद्योगांमार्फत हाय सी.ओ.डी./टी.डी.एस स्ट्रिमवर अद्यावत स्वरुपाच्या प्रक्रिया यंत्रणेव्दारे प्रक्रिया करण्याकरीता संयत्रणा बसविण्यात आली आहे. उर्वरित उद्योगांमार्फत तारापूर औद्योगिक वसाहतीमधील उद्योगांच्या संघटना, टी.ई.पी.एस, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ व महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ यांच्या सहमतीने हाय सी.ओ.डी./टी.डी.एस स्ट्रिमवर अद्ययावत स्वरुपाच्या प्रक्रिया करण्याकरीता मे. सडेकर इनव्हिरो इंजिनिअर्स प्रा. लि., या उद्योगास सामुहिक सांडपाणी प्रक्रिया संयत्रणेचाच एक भाग म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

मे. सडेकर इनव्हिरो इंजिनिअर्स प्रा. लि., हा उद्योग प्रदूषण नियंत्रण सयंत्रणेचाच एक भाग म्हणून कार्यरत असून त्यांचे एकूण १२६ इतके उद्योग सभासद आहेत. सभासद उद्योगांमधून निर्माण होणाऱ्या हाय सी.ओ.डी./टी.डी.एस स्ट्रिममधील औद्योगिक सांडपाण्यावर मे. सडेकर इनव्हिरो इंजिनिअर्स प्रा. लि. यांच्याकडून प्रक्रिया करण्यात येते. मे. सडेकर इनव्हिरो इंजिनिअर्स प्रा. लि., या उद्योगास जल (प्रदूषण प्रतिबंध व नियंत्रण) अधिनियम, १९७४ हवा (प्रदूषण प्रतिबंध व नियंत्रण) अधिनियम, १९८१ व घातक आणि इतर कचरा (व्यवस्थापन आणि सीमापलिकडील संचलन) दुरुस्तीचे नियम, २०१६ तसेच तद्नंतरच्या सुधारणांतर्गत नमूद अटी व शर्तीनुसार महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत संमतीपत्र प्रदान करण्यात आले आहे.

मे. सडेकर इनव्हिरो इंजिनिअर्स प्रा. लि., या उद्योगामधून निर्माण होणारे औद्योगिक सांडपाणी (कन्डेनसेट) पुढील प्रकियेसाठी सामुहिक औद्योगिक सांडपाणी प्रक्रिया केंद्रात पाठविण्यात येते. तथापि, सदर उद्योगाच्या दुरुस्ती व देखभालीचे काम चालू असल्याने प्लॉट क्र. एएम-२९ येथे हाय सी.ओ.डी./टी.डी.एस औद्योगिक सांडपाणी साठवणूकीसाठी परवानगी देण्याबाबतचे पत्र दि. ०४.१२.२०२४ रोजी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे प्राप्त झाले होते.

सदरहू उद्योगामार्फत विना परवाना औद्योगिक सांडपाण्याची साठवणूक करीत असल्याचे वृत्त स्थानिक वृत्तपत्रामध्ये प्रकाशित झाले होते तसेच सदर उद्योगाबाबत काही स्थानिक नागरीकांकडून प्राप्त तक्रारींच्या अनुषंगाने मे. एनीवॉटर प्रोसेसर असोसिएशन , प्लॉट क्र. डी-८/१ येथे दि. ०५.१२.२०२४ रोजी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत व दि. १७.१२.२०२४ रोजी जिल्हाधिकारी, पालघर, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, व महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ व संबंधित तक्रारदार यांचे समवेत स्थळ पाहणी केली असता पाहणी दरम्यान मे. सडेकर इनव्हिरो इंजिनिअर्स प्रा. लि. यांनी प्लॉट क्र. डी-८/१ येथे मे. एनीवॉटर प्रोसेसर असोसिएशन दि. २७.११.२०२४ ते दि.०२.१२.२०२४ या कालावधीत साधारणपणे ७५० घनमिटर इतके हाय सी.ओ.डी./टी.डी.एस औद्योगिक सांडपाणी प्रस्तावित सांडपाणी प्रक्रिया केंद्राच्या टाक्यांमध्ये विनापरवाना साठवणूक केल्याचे व साठवणूक टाकीच्या बाजुला मोकळ्या जमिनीवर सांडलेल्या सांडपाण्यामुळे सदरच्या ठिकाणी माती लाल रंगाची झाल्याचे आढळून आले होते.

त्यानुषंगाने महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ व उपविभागीय अधिकारी यांच्या आदेशांनुसार मे. एनीवॉटर प्रोसेसर असोसिएशन, प्लॉट क्र. डी-८/१, एम आय डी सी, तारापूर येथे साठवणूक केलेले हाय सी.ओ.डी./टी.डी.एस औद्योगिक सांडपाणी मे. तारापूर इनव्हायरोमेंट प्रोटेक्शन सोसायटी, प्लॉट क्र. ए एम-२९, एम आय डी सी, तारापूर येथील सामुहिक औद्योगिक सांडपाणी प्रक्रिया केंद्राच्या इक्वलायझेशन टाकीमध्ये स्थलांतरीत करुन तद्नंतर त्याची पुन्हा टँकरने वाहतुक करुन सदर सांडपाण्यावर मे.सडेकर इनव्हिरो इंजिनिअर्स प्रा. लि., प्लॉट क्र. ई-१३३, ओ-२३ (पार्ट-१) येथे स्थित उद्योगामध्ये प्रक्रिया करण्याचे आदेश देण्यात आले होते. सदर प्रकरणी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत मे. सडेकर इनव्हिरो इंजिनिअर्स प्रा. लि. यांची वैयक्तिक सुनावणी घेऊन दि.२७.१२.२०२४ रोजी अंतरीम आदेश बजावण्यात आले आहेत. तसेच उक्त उद्योगाने दि. २७.११.२०२४ ते ०२.१२.२०२४ या ५ दिवसाच्या कालावधीत विनापरवाना मे. एनीवॉटर प्रोसेसर असोसिएशन, प्लॉट क्र. डी-८/१, म. औ. वि. महामंडळ, तारापूर येथे सांडपाण्याची

पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग. लक्षवेधी सूचना क्र. १०७७

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२५ चे पहिले (अर्थसंकल्प) अधिवेशन

सर्वश्री. भास्कर जाधव, सुधीर मुनगंटीवार, राजु तोडसाम, अॅड. श्रीजया चव्हाण, श्री. जितेश अंतापुरकर, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सुचना क्र. १०७७ पुढीलप्रमाणे आहे:-

"ऑक्टोबर व नोव्हेंबर २०२४ या दोन महिन्यांपासून मुंबईच्या हवेतील प्रदुषणाच्या पातळीत वाढ होऊन त्याचा दुष्परिणाम नागरिकांच्या आरोग्यावर होत असणे, वाढते प्रदुषण नियंत्रीत ठेवण्यासाठी केंद्र प्रदुषण नियंत्रणाने आपल्या राष्ट्रीय कार्यक्रमांतर्गत २०२४ सालापर्यंत प्रदुषणकारी घटकांचे प्रमाण ४० टक्क्यांनी कमी करण्याचा उद्देश ठेवला असणे, मुंबई महानगर परिसरात जवळपास ११ हजारांहून अधिक महाकाय बांधकाम प्रकल्प सुरु असणे, तसेच मुंबईत ५० हजारांहून अधिक बेकऱ्या असून त्या पारंपारिक पद्धतीने चालविल्या जात असून त्यात इंधनासाठी लाकूड, फर्निचर, पुठ्ठे यांसारख्या इंधनाचा वापर करणे, त्यातुन निर्माण होणारा धूर जाण्यासाठी त्यांना धुरांडेही नसल्याने तो धूर थेट हवेत सोडणे, त्याप्रमाणे मुंबई महापालिका प्रशासनाकडून सकाळी रस्ते झाडले जाणे परंतु रस्ते झाडण्याच्या चुकीच्या पद्धतीमुळे प्रदुषणात भर पडत असल्याने वरील घटकांचा विचार करता २०२५ अखेर पर्यंत प्रदुषण कमी करण्याचे लक्ष्य साध्य करणे शक्य नसल्याची कबूली महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाने दिली असणे, हवेतील वाढणारे प्रदुषण नियंत्रित होत नसल्याने नागरिकांमध्ये आरोग्याचे प्रश्न निर्माण व्हायला लागले असून, त्यांच्या मनात भिती निर्माण होणे, प्रशासनाच्या हलगर्जीपणामुळे प्रशासनाबाबत चीड व संतापाची भावना निर्माण झाली असणे, वाढते प्रदुषण कमी करण्याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना"

.....................................................................................................................

## मा. मंत्री (पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग) यांचे निवेदन.

सर्वसाधारणपणे पावसाळयामध्ये हवेतील प्रदूषणकांची पातळी सर्वात कमी व हिवाळयात सर्वाधिक असते. पावसाळयात पावसाच्या पाण्याबरोबर मिसळल्याने व समुद्रावरुन येणाऱ्या वेगवान नेऋत्व मोसमी वाऱ्यामुळे हवेतील धुलीकणांचा निचरा होतो. हिवाळयात कमी तापमानामुळे व वाऱ्याची गती कमी असल्याने जमिनीलगतची प्रदुषके ही उंचावरील हवेत मिसळल्याचे प्रमाण कमी होते. त्यामुळे तयार होणाऱ्या प्रदूषकांचा निचरा न झाल्याने मुंबई, मुंबई उपनगरे, नवी मुंबई, ठाणे व मुंबई महानगर परीसरातील हवेतील प्रदूषणात वाढ होते.

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळातर्फे राष्ट्रीय वातावरणीय हवेची गुणवत्ता तपासणी उपक्रम/ राज्य वातावरणीय हवेची गुणवत्ता तपासणी उपक्रम राज्यामध्ये राबविण्यात येत असून मंडळामार्फत वातावरणीय हवा गुणवत्ता तपासणी संयंत्रणेची (CAAQMS) यंत्रणा उभी केली आहे. त्यापैकी मुंबई व मुंबई उपनगरे परीसरातील हवेची गुणवत्ता तपासण्याकरीता मंडळाकडून १४ ठिकाणी सतत हवा गुणवत्तता तपासणी केंद्रे उभारलेली आहेत. सदर यंत्रणेमधून प्राप्त होणारी आकडेवारी मंडळाच्या व केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या संकेतस्थळावर प्रकाशित केली जाते. तसेच मुंबई शहरामध्ये बृहन्मुंबई महानगरपालिकेने -५ व नवी मुंबई महानगरपालिकेने १ ठिकाणी व भारतीय उष्णदेशीय मौसम विज्ञान संस्था भारतीय उष्णकटिबंधीय हवामानशास्त्र संस्था (IITM SAFAR) यांनी १० ठिकाणी सतत हवा गुणवत्ता तपासणी केंद्रे उभारलेली आहेत.

सतत हवा तपासणी केंद्रांच्या (CAAQMS) प्राप्त पृथ्थ:करण अहवालानुसार, केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या मानकाबरोबर तुलना केली असता सर्वसाधारणपणे हवा प्रदूषकांची पातळी हिवाळयामध्ये ठराविक दिवशी ठराविक ठिकाणी वाढल्याचे दिसून येते. सन २०१९-२०२४ या कालावधीमधील हवा गुणवत्ता निर्देशकांबाबतच्या प्राप्त माहितीनुसार सन २०१९ ते सन २०२४ च्या दरम्यान पीएम २.५ प्रदुषकामध्ये वाढ झाल्याचे आढळुन येत नाही.

केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळ सन २०११ ते २०१५ या कालावधीतील भारतामधील २२ राज्यातील ९४ शहरांमधील हवेची गुणवत्ता प्रदूषित झाली असल्याचे प्रसिध्द केले असून यामध्ये महाराष्ट्र राज्यातील १८ शहरांमधील वातावरणातील हवेची गुणवत्ता प्रदूषित झाल्याचे प्रसिध्द करण्यात आले होते. त्याअनुषंगाने अध्यक्ष, केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळ यांनी दि.०१/०७/२०१६ अन्वये महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांना प्रदूषण रोखण्यासाठी व हवेची गुणवत्ता सुधारण्यासाठी उपाययोजना करण्याबाबत निर्देश दिले होते.

राष्ट्रीय स्वच्छ हवा कार्यक्रम (NCAP) महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाने राष्ट्रीय शुध्द हवा कार्यक्रमार्तंगत तयार केलेल्या मुंबई शहराच्या कृती आराखड्यास मान्यता मिळाली असून सदरील कृती आराखडयानुसार पीएम २.५ व पीएम १० हे घटक सन २०२४ पर्यंत २० % ते ३० % व सन २०२६ पर्यंत ४० % कमी करण्याबाबतचे उदिष्ट असून त्याची अंमलबजावणी बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत सुरू आहे.

मुंबई शहरातील हवेचा दर्जा माहे ऑक्टोबर व नोव्हेंबर २०२३ मध्ये हवा गुणवत्ता निर्देशांकनुसार काही प्रमाणात धोकादायक पातळीपर्यंत खालावल्यामुळे मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी Suo Motu Public Interest Litigation No. ३/२०२३ मध्ये हवेचे प्रदूषण रोखण्यासाठी विविध उपाययोजना करण्याबाबत संबंधित विभागांना आदेश दिलेले आहेत. मा. उच्च न्यायालयाने सदर याचिकेमध्ये एक तज्ञ समिती नेमली असून सदर समितीने परिस्थितीचे निरीक्षण करून अहवाल सादर करण्याबाबत आदेश दिले असून सदर समितीने ०७ वेळा सर्व भागधारकांबरोबर बैठका घेऊन मा. उच्च न्यायालयास महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, शहरी स्थानिक संस्था, परिवहन विभाग आणि समितीच्या शिफारशींवर आधारित केलेल्या कार्यवाहीचा समावेश असलेला अहवाल सादर केला आहे. मा. उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार, मा. आयुक्त, बृहन्मुंबई महापालिका यांच्या अध्यक्षतेखाली दि.०५/०२/२०२४ रोजी समन्वय समिती गठीत केलेली असून सदर समन्वय समितीच्या ०५ बैठकांचे आयोजन करण्यात आले होते.

**मुंबई महानगर व परिसरातील हवा प्रदूषण कमी करण्याबाबत महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने केलेल्या कार्यवाही बाबतचा तपशील खालीलप्रमाणे :-**

- मुंबई महानगर परिसरातील महापालिका आयुक्त व मुख्य अधिकारी, नगरपरिषद यांना दि.१२/१२/२०२३ व दि.०५/०२/२०२४ रोजी बांधकाम व पाडकामामधून निर्माण होणाऱ्या राडारोडयाची शास्त्रोक्त पद्धतीने विल्हेवाट लावण्याबाबत निर्देश दिलेले आहेत.
- महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने, परिवहन आयुक्त यांना दि.१३/१०/२०२३ व दि.२१/१२/२०२४ रोजी पुन:श्च शहरात धावणाऱ्या अवजड वाहनांमधुन उत्सर्जित होणाऱ्या प्रदूषकांची नियमित तपासणी करुन PUC जारी करण्याबाबत तसेच, बांधकाम व पाडकामामधुन निर्माण होणाऱ्या राडयारोडयाची वाहतूक करणारी वाहने ही अच्छादित असावीत याबाबत खात्री करण्याकरीता मोहिम राबविण्याकरीता निर्देशित केले होते. तसेच, बांधकाम साहित्य किंवा बांधकाम व पाडकामामधुन निर्माण होणाऱ्या राडारोडा साहित्य वाहून नेणाऱ्या वाहनांमध्ये ट्रॅकिंग सिस्टीम बसवलेली आढळुन न आल्यास, अशी वाहने जप्त करण्याबाबत आदेशित करण्यात आले होते.
- मुंबई महानगर परिसरातील महापालिका आयुक्त व मुख्य अधिकारी, नगरपरिषद यांना दि.१३/०२/२०२४ रोजी बेकरी उद्योग आणि हॉटेल / रेस्टॉरंट / ढाब्यांमधील तंदूरसाठी स्वच्छ इंधन वापरण्याबाबत निर्देश दिलेले असून याबाबत कार्यशाळेचे आयोजन केले होते. सदर कार्यशाळेच्या अनुषंगाने बृहन्मुंबई महानगर पालिकेच्या क्षेत्रातील कार्यरत २७८ बेकरी उद्योगांना मंडळामार्फत लाकूड व कोळसा इंधन म्हणून वापरत असल्यामुळे दि.०७/०१/२०२५ रोजी कारणे दाखवा नोटीस जारी करण्यात आली आहे.
- मुंबई महानगर क्षेत्रामध्ये कार्यरत असलेल्या रेडीमिक्स कॉंक्रिट प्लांट्स, स्टोन क्रशर, हॉटमिक्स प्लांट्स व हवा प्रदूषणकारी उद्योगांची आढावा बैठक घेऊन सर्व भागधारकांना हवा प्रदूषण होऊ नये, याकरीता सुचित करण्यात आले होते.
- महाराष्ट्र राज्यामध्ये क्लीन कन्स्ट्रक्शन टूलकिट तयार करण्याकरिता क्रेडाई नॅशनल, नॅशनल रिअल इस्टेट डेव्हलोपमेंट कॉंसिल, MSRDC, PWD, सिडको, इत्यादी भागधारकांची बैठक दि.०८/११/२०२४ रोजी घेण्यात आलेली आहे. मुंबई महानगर व परिसरात कार्यरत असणाऱ्या आरएमसी उद्योगांबाबत सुधारीत नियमावली दि.२७/११/२०२४ रोजी प्रसिद्ध करण्यात आलेली आहे.
- सर्व विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी, पोलिस आयुक्त, पोलिस अधीक्षक (SPs), महापालिका आयुक्त / प्रमुख अधिकारी आणि परिवहन आयुक्त यांना दि.०२/१२/२०२४ रोजी "ग्रेडेड रिस्पॉन्स ॲक्शन प्लॅन "(GRAP) च्या स्टेज-IV/III (मध्यम ते खराब / अत्यंत खराब हवेची गुणवत्ता अंतर्गत) कार्यवाही लागू करण्याबाबत कळविले आहे. मुंबई महानगर परिसरातील महापालिका आयुक्त व मुख्य अधिकारी, नगरपरिषद यांना दि.०७/०२/२०२५ रोजी, बेकरी उद्योगांना दि.०९/०७/२०२५ पर्यंत लाकूड व कोळसा हे इंधन म्हणून वापरणे बंद करून हरित इंधनाचा वापर करण्याबाबत निर्देश दिलेले आहेत.
- मुंबई महानगर परिसरातील महापालिका आयुक्त व मुख्य अधिकारी, नगरपरिषद यांना दि.०७/०२/२०२५ रोजी त्यांच्या कार्यक्षेत्रामध्ये सुरु असलेल्या सर्व बांधकाम सुरु असलेल्या ठिकाणी प्रदूषण निर्देशक बसवणे बंधनकारक करण्याबाबत सूचित केले आहे.
- दि.०८/०२/२०२५ रोजी मुंबई व परिसरातील वृत्तपत्रांमध्ये लाकूड व कोळसा इंधन म्हणून वापरणाऱ्या बेकरी उद्योगांनी दि.०९/०७/२०२५पूर्वी सी.एन.जी., गॅस, हरित इंधन इ. वापर करणे आवश्यक असल्याबाबत जाहीर सूचना देण्यात आलेली आहे.
- मुंबई महानगर क्षेत्रातील १९१ अतिप्रदूषणकारी उद्योगांचे प्रदूषण लेखा परीक्षण (Pollution Audit) केले आहे. मुंबई महानगर क्षेत्रातील सर्व लाल संवर्गातील उद्योगांन महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने स्वयं-लेखापरीक्षण

अहवाल (Self Audit Report) करण्याकरिता निर्देशित केले असून स्वयं लेखा परिक्षण अहवाल परिक्षणाचे व प्रदूषण लेखा परीक्षणाचे (Pollution Audit) कामकाज प्रगतीपथावर आहे.

- मा. उच्च न्यायालयाने दि.०९/०१/२०२५ रोजी दिलेल्या आदेशानुसार शासनाने (गृह विभाग) दि.२२/०१/२०२५ रोजीच्या शासन निर्णयानुसार मुंबई महानगर क्षेत्रामध्ये पेट्रोल व डिझेलवर चालणाऱ्या वाहनांवर निर्बंध घालून फक्त सीएनजी व इल्केट्रीक वाहनांनाच परवानगी देण्याबाबत राज्य शासनाद्वारे परिपूर्ण अभ्यास करण्याकरीता समिती स्थापन करण्यात आलेली आहे.

**बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या वतीने राबविण्यात येणारी दीर्घकालीन धोरणे व उपाययोजना बाबत खालीलप्रमाणे :-**

- रस्त्यावरील धूळ आटोक्यात आणण्यासाठी ५ हजार लि. क्षमतेचे ६७ टँकर्स व ९ हजार लि. क्षमतेचे ३९ टँकर्स दररोज कार्यरत आहेत.धूळ नियंत्रणासाठी मिस्टिंग यंत्रे, पाण्याचे स्प्रिंकलर, यांत्रिक स्वछता यंत्रे, जेटिंग पाण्याच्याटँकरसह उपलब्ध करण्यात आले आहेत.
- महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या (एमपीसीबी) सूचनेनुसार, लाकूड/कोळसा आधारित एकूण ३५६ पावभट्ट्यांना (Bakery) सहा महिन्याच्या आत स्वच्छ इंधनावर (Clean Fuel) रूपांतरित करण्यासाठी पाठपुरावा करण्यात येत असून प्रदूषणकारी १०२ बेकरी बंद करण्याच्या दृष्टीने कायदेशीर कारवाई करण्यात येत आहे. बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या लाकूड-आधारित ४१ स्मशानभूमी पीएनजी / विद्युत यासारख्या स्वच्छ इंधनावर रूपांतरित करण्यात आल्या असून, उर्वरितवर कार्यवाही सुरु आहे.
- सार्वजनिक वाहतूक सेवा अधिक पर्यावरणस्नेही बनविण्यासाठी 'बेस्ट' उपक्रमासाठी २ हजार १०० सिंगल डेकर आणि २०० डबल डेकर इलेक्ट्रिक बस खरेदी करण्यात येत असून आतापर्यंत ३२४ सिंगल डेकर व ५० डबल डेकर इलेक्ट्रिक बसेस उपलब्ध झाल्या आहेत.
- बांधकामाच्या राडारोड्यावर शास्त्रोक्त पद्धतीने प्रक्रिया करण्याकामी बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून कोकणीपाडा दहिसर आणि शीळ फाटा, कल्याण तेथे प्रत्येकी ६०० मेट्रिक टन प्रती दिन क्षमतेचे प्रकल्प दि.०४/११/२०२४ पासून कार्यान्वित करण्यात आले आहेत.
- वायू प्रदूषणासंबंधी तक्रारी नोंदविण्यासाठी फेब्रुवारी, २०२३ पासून 'मुंबई एअर ऍप' नागरिकांना उपलब्ध करून देण्यात आली असून. नोव्हेंबर, २०२३ ते जानेवारी, २०२५ या कालावधीत उघड्यावर कचरा जाळण्याच्या ४३३ घटनांवर दंडात्मक कार्यवाही करण्यात आली आहे.
- वायू प्रदूषणाचे स्रोत ओळखून उत्सर्जन सूची अद्ययावत करण्यासाठी डिसेंबर,२०२४ मध्ये 'ऑटोमोटिव्ह रिसर्च असोशिएशन ऑफ इंडिया' (एआरएआय) यांची नियुक्ती करण्यात आली आहे.
- बांधकाम प्रकल्पांद्वारे होणारे प्रदूषण कमी करण्यासाठी २८ मुद्यांची सविस्तर मार्गदर्शक सूचना दि.२५/१०/२०२३ रोजी व सुधारीत सूचना दि.१५/१०/२०२४ रोजी निर्गमित करण्यात आली आहे. दि.०१/१०/२०२४ ते ३१/०१/२०२५ या कालावधीत नियमांचे पालन न करणाऱ्या सुमारे २२३७ बांधकामांना 'कारणे दाखवा नोटीस' तसेच, १२३५ ठिकाणी 'काम थांबवण्याची नोटीस' देण्यात आली असून सदर कार्यवाही सातत्याने सुरू आहे.
- राष्ट्रीय शुध्द हवा प्रकल्पामध्ये (NCAP) रू.९.५ कोटी तसेच १५ व्या वित्त आयोगाकडून बृहन्मुंबई महानगरपालिकेला आतापर्यंत रू.६२० कोटी (२०२२-२३ पर्यंत) इतका निधी प्राप्त झाला असून त्याद्वारे महानगरपालिकेने २३०० इलेक्ट्रिक बसेस घेण्यात येत आहेत. ५ ठिकाणी "स्वयंचलित वातावरणीय वायु गुणवत्ता सर्वेक्षण केंद्रे" (Continuous Ambient Air Quality Monitoring Stations - CAAQMS) स्थापन करण्यात आलेली आहेत. सार्वजनिक आरोग्य खाते, बृहन्मुंबई महानगरपालिका यांचेकडून प्राप्त अहवालानुसार श्वसन विकार, दमा, खोकला, इ. आजाराच्या रुग्णसंख्येत लक्षणीय वाढ झाल्याचे आढळून येत नाही.

******

## महाराष्ट्र विधानसभा
## सन २०२५ चे पहिले (अर्थसंकल्प) अधिवेशन

श्री. अतुल भातखळकर, श्रीमती मनिषा चौधरी, श्री. योगेश सागर, वि.स.स., यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्र. ५ पुढीलप्रमाणे आहे:-

"मुंबई शहरातील इमारतींचे बांधकाम, रस्त्यावरून वाहून नेले जाणारे डेब्रिज, वाहनांमुळे उडणारी धूळ यामुळे दिवसेंदिवस वायू प्रदूषण वाढत असल्याचे माहे डिसेंबर २०२४ मध्ये निदर्शनास येणे, त्यामुळे, वायू प्रदूषणाच्या पातळीवर नियंत्रण ठेवण्यासाठी ठोस उपाययोजना करण्याची गरज असणे, तसेच, इलेक्ट्रिक वाहनांचा वापर वाढण्याबाबत तसेच धूळ शोषण यंत्र बसवण्याची गरज असणे, त्यामध्ये, वाढणारे प्रदूषण रोखण्यासाठी धूळ शोषण यंत्र, ई-बस सेवा अशा विविध उपाययोजना करण्याकरिता ठोस रकमेची तरतूद करण्याची गरज असणे, तसेच वातावरणीय बदल आराखड्याची अंमलबजावणी करण्याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

..............................................................................................................................................

### मा. मंत्री (पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग) यांचे निवेदन.

सर्वसाधारणपणे पावसाळयामध्ये हवेतील प्रदूषणकांची पातळी सर्वात कमी व हिवाळयात (ऑक्टोबर ते फेब्रुवारी) सर्वाधिक असते पावसाळयात पावसाच्या पाण्याबरोबर मिसळल्याने व समुद्रावरून येणाऱ्या वेगवान नेऋत्व मोसमी वाऱ्यामुळे हवेतील धुलीकणांचा निचरा होतो. हिवाळयात कमी तापमानामुळे व वाऱ्याची गती कमी असल्याने जमीनीलगतची प्रदुषके ही उंचावरील हवेत मिसळल्याचे प्रमाण कमी होते त्यामुळे तयार होणाऱ्या प्रदूषकांचा निचरा न झाल्याने मुंबई, मुंबई उपनगरे, नवी मुंबई, ठाणे व मुंबई महानगर परीसरातील हवेतील प्रदूषणात वाढ होते.

मुंबई शहरातील हवेचा दर्जा माहे ऑक्टोबर व नोव्हेंबर २०२३ मध्ये हवा गुणवत्ता निर्देशांकनुसार काही प्रमाणात धोकादायक पातळीपर्यंत खालावल्यामुळे मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी Suo Motu Public Interest Litigation No. ३/२०२३ मध्ये हवेचे प्रदूषण रोखण्यासाठी विविध उपाययोजना करण्याबाबत संबंधित विभागांना दि.३१/१०/२०२३, दि.०६/११/२०२३, दि.१०/११/२०२३, दि.११/१२/२०२३, दि.०६/०२/२०२४, दि.१८/०३/२०२४, दि.२०/०६/२०२४, दि.२०/१२/२०२४ व दि.०९/०१/२०२५ रोजी आदेश दिलेले आहेत. मा. उच्च न्यायालयाने सदर याचिकेमध्ये एक तज्ञ समिती नेमली असून सदर समितीने परिस्थितीचे निरीक्षण करून अहवाल सादर करण्याबाबत आदेश दिले आहेत. त्यानुसार, सदर समितीने ०७ वेळा सर्व भागधारकांबरोबर बैठका घेऊन मा. उच्च न्यायालयास महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, शहरी स्थानिक संस्था, परिवहन विभाग आणि समितीच्या शिफारशींवर आधारित केलेल्या कार्यवाहीचा समावेश असलेला अहवाल सादर केला आहे.

मा. उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार, मा. आयुक्त, बृहन्मुंबई महापालिका यांच्या अध्यक्षतेखाली दि.०५/०२/२०२४ रोजी समन्वय समिती गठीत केलेली असून सदर समन्वय समितीच्या ०५ बैठकांचे आयोजन करण्यात आले होते.

**मुंबई महानगर व परिसरातील हवा प्रदूषण कमी करण्याबाबत महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने केलेल्या कार्यवाही बाबतचा तपशील खालीलप्रमाणे :-**

- मुंबई महानगर परिसरातील महापालिका आयुक्त व मुख्य अधिकारी, नगरपरिषद यांना दि.१२/१२/२०२३ व दि.०५/०२/२०२४ रोजी बांधकाम व पाडकामामधून निर्माण होणाऱ्या राडारोडयाची शास्त्रोक्त पद्धतीने विल्हेवाट लावण्याबाबत निर्देश दिलेले आहेत.
- महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने, परिवहन आयुक्त यांना दि.१३/१०/२०२३ व दि.२१/१२/२०२४ रोजी पुन:श्च शहरात धावणाऱ्या अवजड वाहनांमधुन उर्त्सजित होणाऱ्या प्रदूषकांची नियमित तपासणी करुन PUC जारी करण्याबाबत तसेच, बांधकाम व पाडकामामधुन निर्माण होणाऱ्या राडयारोडयाची वाहतूक करणारी वाहने ही अच्छादित असावीत याबाबत खात्री करण्याकरीता मोहिम राबविण्याकरीता निर्देशित केले होते. तसेच, बांधकाम साहित्य किंवा बांधकाम व पाडकामामधुन निर्माण होणाऱ्या राडारोडा साहित्य वाहून

नेणाऱ्या वाहनांमध्ये ट्रॅकिंग सिस्टीम बसवलेली आढळुन न आल्यास, अशी वाहने जप्त करण्याबाबत आदेशित करण्यात आले होते.

- मुंबई महानगर परिसरातील महापालिका आयुक्त व मुख्य अधिकारी, नगरपरिषद यांना दि.१३/०२/२०२४ रोजी बेकरी उद्योग आणि हॉटेल / रेस्टॉरंट / ढाब्यांमधील तंदूरसाठी स्वच्छ इंधन वापरण्याबाबत निर्देश दिलेले असून याबाबत कार्यशाळेचे आयोजन केले होते. सदर कार्यशाळेच्या अनुषंगाने बृहन्मुंबई महानगर पालिकेच्या क्षेत्रातील कार्यरत २७८ बेकरी उद्योगांना मंडळामार्फत लाकूड व कोळसा इंधन म्हणून वापरत असल्यामुळे दि.०७/०१/२०२५ रोजी कारणे दाखवा नोटीस जारी करण्यात आली आहे.
- मुंबई महानगर क्षेत्रामध्ये कार्यरत असलेल्या रेडीमिक्स कॉंक्रिट प्लांट्स, स्टोन क्रशर, हॉटमिक्स प्लांट्स व हवा प्रदूषणकारी उद्योगांची आढावा बैठक घेऊन सर्व भागधारकांना हवा प्रदूषण होऊ नये, याकरीता सुचित करण्यात आले होते.
- महाराष्ट्र राज्यामध्ये क्लीन कन्स्ट्रक्शन टूलकिट तयार करण्याकरिता क्रेडाई नॅशनल, नॅशनल रिअल इस्टेट डेव्हलोपमेंट कॉंसिल, MSRDC, PWD, सिडको, इत्यादी भागधारकांची बैठक दि.०८/११/२०२४ रोजी घेण्यात आलेली आहे. मुंबई महानगर व परिसरात कार्यरत असणाऱ्या आरएमसी उद्योगांबाबत सुधारीत नियमावली दि.२७/११/२०२४ रोजी प्रसिद्ध करण्यात आलेली आहे.
- सर्व विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी, पोलिस आयुक्त, पोलिस अधीक्षक (SPs), महापालिका आयुक्त / प्रमुख अधिकारी आणि परिवहन आयुक्त यांना दि.०२/१२/२०२४ रोजी "ग्रेडेड रिस्पॉन्स अ‍ॅक्शन प्लॅन" (GRAP) च्या स्टेज-IV/III (मध्यम ते खराब / अत्यंत खराब हवेची गुणवत्ता अंतर्गत) कार्यवाही लागू करण्याबाबत कळविले आहे. मुंबई महानगर परिसरातील महापालिका आयुक्त व मुख्य अधिकारी, नगरपरिषद यांना दि.०७/०२/२०२५ रोजी, बेकरी उद्योगांना दि.०९/०७/२०२५ पर्यंत लाकूड व कोळसा हे इंधन म्हणून वापरणे बंद करून हरित इंधनाचा वापर करण्याबाबत निर्देश दिलेले आहेत.
- मुंबई महानगर परिसरातील महापालिका आयुक्त व मुख्य अधिकारी, नगरपरिषद यांना दि.०७/०२/२०२५ रोजी त्यांच्या कार्यक्षेत्रामध्ये सुरु असलेल्या सर्व बांधकाम सुरु असलेल्या ठिकाणी प्रदूषण निर्देशक बसवणे बंधनकारक करण्याबाबत सूचित केले आहे.
- दि.०८/०२/२०२५ रोजी मुंबई व परिसरातील वृत्तपत्रांमध्ये लाकूड व कोळसा इंधन म्हणून वापरणाऱ्या बेकरी उद्योगांनी दि.०९/०७/२०२५पूर्वी सी.एन.जी., गॅस, हरित इंधन इ. वापर करणे आवश्यक असल्याबाबत जाहीर सूचना देण्यात आलेली आहे.
- मुंबई महानगर क्षेत्रातील १९१ अतिप्रदूषणकारी उद्योगांचे प्रदूषण लेखा परीक्षण (Pollution Audit) केले आहे. मुंबई महानगर क्षेत्रातील सर्व लाल संवर्गातील उद्योगांन महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने स्वयं-लेखापरीक्षण अहवाल (Self Audit Report) करण्याकरिता निर्देशित केले असून स्वयं लेखा परिक्षण अहवाल परिक्षणाचे व प्रदूषण लेखा परीक्षणाचे (Pollution Audit) कामकाज प्रगतीपथावर आहे.
- मा. उच्च न्यायालयाने दि.०९/०१/२०२५ रोजी दिलेल्या आदेशानुसार शासनाने (गृह विभाग) दि.२२/०१/२०२५ रोजीच्या शासन निर्णयानुसार मुंबई महानगर क्षेत्रामध्ये पेट्रोल व डिझेलवर चालणाऱ्या वाहनांवर निर्बंध घालून फक्त सीएनजी व इलेक्ट्रीक वाहनांनाच परवानगी देण्याबाबत राज्य शासनाद्वारे परिपूर्ण अभ्यास करण्याकरीता समिती स्थापन करण्यात आलेली आहे.

**बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या वतीने राबविण्यात येणारी दीर्घकालीन धोरणे व उपाययोजना बाबत खालीलप्रमाणे :-**

- रस्त्यावरील धूळ आटोक्यात आणण्यासाठी ५ हजार लि. क्षमतेचे 67 टँकर्स व ९ हजार लि. क्षमतेचे ३९ टँकर्स दररोज कार्यरत आहेत.धूळ नियंत्रणासाठी मिस्टिंग यंत्रे, पाण्याचे स्प्रिंकलर, यांत्रिक स्वछता यंत्रे, जेटिंग पाण्याच्याटँकरसह उपलब्ध करण्यात आले आहेत.
- महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या (एमपीसीबी) सूचनेनुसार, लाकूड/कोळसा आधारित एकूण ३५६ पावभट्ट्यांना (Bakery) सहा महिन्याच्या आत स्वच्छ इंधनावर (Clean Fuel) रूपांतरित करण्यासाठी पाठपुरावा करण्यात येत असून प्रदूषणकारी १०२ बेकरी बंद करण्याच्या दृष्टीने कायदेशीर कारवाई करण्यात येत आहे. बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या लाकूड-आधारित ४१ स्मशानभूमी पीएनजी / विद्युत यासारख्या स्वच्छ इंधनावर रूपांतरित करण्यात आल्या असून, उर्वरितवर कार्यवाही सुरु आहे.

- सार्वजनिक वाहतूक सेवा अधिक पर्यावरणस्नेही बनविण्यासाठी 'बेस्ट' उपक्रमासाठी २ हजार १०० सिंगल डेकर आणि २०० डबल डेकर इलेक्ट्रिक बस खरेदी करण्यात येत असून आतापर्यंत ३२४ सिंगल डेकर व ५० डबल डेकर इलेक्ट्रिक बसेस उपलब्ध झाल्या आहेत.
- बांधकामाच्या राडारोड्यावर शास्त्रोक्त पद्धतीने प्रक्रिया करण्याकामी बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून कोकणीपाडा दहिसर आणि शीळ फाटा, कल्याण तेथे प्रत्येकी ६०० मेट्रिक टन प्रती दिन क्षमतेचे प्रकल्प दि.०४/११/२०२४ पासून कार्यान्वित करण्यात आले आहेत.
- वायू प्रदूषणासंबंधी तक्रारी नोंदविण्यासाठी फेब्रुवारी, २०२३ पासून 'मुंबई एअर ॲप' नागरिकांना उपलब्ध करून देण्यात आली असून. नोव्हेंबर, २०२३ ते जानेवारी, २०२५ या कालावधीत उघड्यावर कचरा जाळण्याच्या ४३३ घटनांवर दंडात्मक कार्यवाही करण्यात आली आहे.
- वायू प्रदूषणाचे स्रोत ओळखून उत्सर्जन सूची अद्ययावत करण्यासाठी डिसेंबर, २०२४ मध्ये 'ऑटोमोटिव्ह रिसर्च असोशिएशन ऑफ इंडिया' (एआरएआय) यांची नियुक्ती करण्यात आली आहे.
- बांधकाम प्रकल्पांद्वारे होणारे प्रदूषण कमी करण्यासाठी २८ मुद्यांची सविस्तर मार्गदर्शक सूचना दि.२५/१०/२०२३ रोजी व सुधारीत सूचना दि.१५/१०/२०२४ रोजी निर्गमित करण्यात आली आहे. दि.०१/१०/२०२४ ते ३१/०१/२०२५ या कालावधीत नियमांचे पालन न करणाऱ्या सुमारे २२३७ बांधकामांना 'कारणे दाखवा नोटीस' तसेच, १२३५ ठिकाणी 'काम थांबवण्याची नोटीस' देण्यात आली असून सदर कार्यवाही सातत्याने सुरू आहे.
- राष्ट्रीय शुध्द हवा प्रकल्पामध्ये (NCAP) ९.५ कोटी तसेच १५ व्या वित्त आयोगाकडून बृहन्मुंबई महानगरपालिकेला आतापर्यंत रू.६२० कोटी (२०२२-२३ पर्यंत) इतका निधी प्राप्त झाला असून त्याद्वारे महानगरपालिकेने २३०० इलेक्ट्रिक बसेस घेण्यात येत आहेत. ५ ठिकाणी "स्वयंचलित वातावरणीय वायु गुणवत्ता सर्वेक्षण केंद्रे" (Continuous Ambient Air Quality Monitoring Stations - CAAQMS) स्थापन करण्यात आलेली आहेत. सार्वजनिक आरोग्य खाते, बृहन्मुंबई महानगरपालिका यांचेकडून प्राप्त अहवालानुसार श्वसन विकार, दमा, खोकला, इ. आजाराच्या रुग्णसंख्येत लक्षणीय वाढ झाल्याचे आढळून येत नाही.

******

महाराष्ट्र विधानसभा

सन- २०२५ चे प्रथम (अर्थसंकल्प) अधिवेशन

लक्षवेधी सूचना क्र. २३४५

श्री .विलास तरे, मा .विधानसभा सदस्य यांनी उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना क्र.२३४५ पुढील प्रमाणे आहे:-

"पालघर जिल्ह्यातील तारापूर औद्योगिक क्षेत्रामध्ये महाराष्ट्र शासनाने औद्योगिक विकासाच्या उद्दिष्टाने अनेक उद्योगांना भूखंड उपलब्ध करून दिलेले असणे, तथापि, उक्त औद्योगिक क्षेत्रातील जे. प्लॉट मधील जे.जे-९६, जे.जे-१६५, जे.जे-१७६, जे.जे-१८५ व १८६, जे.जे-२०३, जे.जे-२२३, जे.जे-२२३/१, जे.जे-२३४ या भुखंडावर काही संस्थांनी भूखंडांचा मुळ उद्देश बाजूला ठेवून त्यांचा इतर व्यावसायिक वापर केलेला असणे, तसेच सदरहू भूखंडधारकांनी चुकीची कागदपत्रे सादर करून हे भूखंड प्राप्त केलेले असणे, यामुळे या क्षेत्रातील औद्योगिक प्रगतीची संधी वाया जात असून स्थानिक पातळीवर अपेक्षित रोजगार निर्मिती होत नसणे, याबाबत काही स्थानिक नागरिकांनी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या अधिकारी व कर्मचारी यांचेकडे तक्रारी केल्यानंतर त्यांनी भूखंडाचा गैरवापर केल्याप्रकरणी मंडळाकडे दंडाच्या स्वरुपातील रक्कम भरण्याबाबत कळविल्यानंतर व्यावसायिकांनी विभागाच्या अधिकाऱ्यांशी बेकायदेशीररित्या तडजोड करुन काही कमी स्वरुपाची रक्कम दंड स्वरुपात जमा केलेली असणे, त्यामुळे शासनाच्या महसूलाचे मोठ्या प्रमाणात झालेले नुकसान, तसेच उक्त व्यावसायिकांनी महाराष्ट्र प्रदूषण महामंडळाच्या नियमांचे देखील उल्लंघन केलेले असणे, तद्नुषंगाने स्थानिक नागरिकांनी तक्रारी करूनही व्यावसायिकांचे संबंधित अधिकारी व कर्मचारी यांचेशी आर्थिक संगनमत असल्याने कारवाई करण्यास होत असलेले दुर्लक्ष, त्यामुळे नागरिकांमध्ये शासनाप्रती निर्माण झालेली असंतोषाची भावना, त्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

मा. मंत्री (उद्योग) यांचे निवेदन

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने सन १९७४ साली १०३९.३३ हे. आर इतक्या क्षेत्रफळावर तारापूर औद्योगिक क्षेत्राची स्थापना केली आहे. या औद्योगिक क्षेत्रामध्ये औद्योगिक, व्यापारी, निवासी व पीएपी इ. वापराकरिता एकूण २२२४ इतके भुखंड विकसित केले आहेत या औद्योगिक क्षेत्रामध्ये प्रामुख्याने जे. एस. डब्ल्यु (जिदांल), बॉम्बे रेयॉन, कॅम्लीन, लुपिन, इप्का, आरती ड्रग्ज, आरती इंडस्ट्रीज, सॅरेक्स, विराज प्रोफाईल्स, सियाराम, अमुल, वाडीलाल, टाटा, युपीएल, मंधाना, डी-डेकोर इ. कारखाने आहेत. तारापूर औद्योगिक क्षेत्रामध्ये पाणीपुरवठा, रस्ते, सांडपाणी जलनिःसारण, अग्निशमन केंद्र इ. पायाभुत संविधा उद्योगांना उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. त्यानुसार पाणीपुरवठा योजना रू. ८४.८ कोटी सांडपाणी जलनिःसारण रू. १५८.०० कोटी, रस्ते व लाईट रू. १८१.३१ कोटी अग्निशमन केंद्र रू. ३.६ कोटी अशी एकूण रू. ४२७८ कोटी इतकी रक्कम खर्च करण्यात आली आहे व त्याची प्रतिपूर्ती पाणीपुरवठा बिलातून वसूल करण्यात येते.

मऔवि महामंडळाच्या औद्योगिक क्षेत्रातील भूखंड वाटपाबाबत मागणी अर्ज मऔवि महामंडळाच्या तांत्रिक सल्लागार, नियोजन विभाग, पर्यावरण विभाग व संबंधित विभागाकडून कागदपत्राची तपासणी करुन त्यांनी शिफारस केल्यानंतर भूखंड वाटप समितीच्या मान्यतेने भूखंड वाटप करण्यात येते.

म.औ.वि. महामंडळाच्या प्रचलित धोरणानुसार प्रत्येक औद्योगिक क्षेत्रामध्ये DCR प्रमाणे ५ टक्के क्षेत्र व्यापारी प्रयोजनासाठी अनुज्ञेय आहे. त्यानुसार तारापूर औद्योगिक क्षेत्रामध्ये ३६.६० हेक्टर आर क्षेत्र व्यापारी प्रयोजनासाठी अनुज्ञेय असून ५.५७ हेक्ट्रर आर क्षेत्र (०.८ टक्के) व्यापारी प्रयोजनासाठी वाटप करण्यात आले

आहे. म.औ.वि. महामंडळाने औद्योगिक क्षेत्रातील इमारतीतील क्षेत्र पोटभाडयाने देणेबाबत दि.१९/१०/२००९, दि. २६/५/२०१०, दि.१७/११/२०१४ च्या परिपत्रकाद्वारे मार्गदर्शक तत्वे निर्गमित केलेली आहे. तसेच भूखंडाचे औद्योगिक ते व्यापारी रुपांतर करणेबाबत परिपत्रक दि. २४/२/२०२५ नुसार मार्गदर्शक तत्वे निर्गमित केली आहेत. तसेच विनापरवानगी भूखंड वापरातील बदलाबाबत दंडाची रक्कम आकारण्याबाबत मऔवि महामंडळाचे धोरण आहे. सदर परिपत्रकातील निर्देशानुसार तारापूर औद्योगिक क्षेत्रातील ज्या भूखंडधारकांनी म.औ.वि. महामंडळाची परवानगी न घेता औद्योगिक भूखंडावर व्यापारी वापर सुरु केला आहे अशा एकूण ८ भूखंडधारकांना नोटीसा बजावण्यांत आल्या आहेत.

सदर नोटीसीच्या अनुषंगाने म.औ.वि. महामंडळाकडून खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात आली आहे:-

- म.औ.वि. महामंडळाने अनाधिकृत व्यापारी वापराची दंडात्मक रक्कम रुपये ८१,७३,९१९/- वसुल केली आहे.
- दंडात्मक रक्कम भरणा केल्यानंतर भूखंड क्रमांक जे-१७६ चे धारक यांनी अनाधिकृत व्यापारी वापर बंद केला आहे.
- भूखंड क्रमांक जे-२०३ आणि जे-२२३ यांनी म.औ.वि. महामंडळाकडे औद्योगिक ते व्यापारी वापरात बदल करणेबाबत प्रस्ताव सादर केला असून त्यापैकी जे-२०३ चे धारक यांचा प्रस्ताव म.औ.वि. महामंडळाने मान्य केला असून त्यासाठी रुपये ८,०६,१७,६००/- इतकी रक्कम भरणेचे मागणी पत्र दि. २८/०५/२०२५ रोजी निर्गमित करण्यात आले आहे. तसेच भूखंड जे-२२३ चे भूखंडधारक यांचा औद्योगिक भूखंडावरुन व्यापारी रुपांतरणाबाबतच्या प्रस्तावावर कार्यवाही सुरु आहे.

म.औ.वि. महामंडळाने अनाधिकृत व्यापारी वापर करणाऱ्या भूखंडधारकास नोटीस बजावल्यानंतर रु.८१,७३,९१९/- इतका महसूल प्राप्त झाला असून रक्कम रुपये १,४२,०२,४२१/- भरणा करणेसाठी नोटीस बजावण्यात आली आहे. तसेच भूखंड क्रमांक जे-२०३ यांचे विनंतीनुसारसदर भूखंड व्यापारी प्रयोजनामध्ये रुपांतरणास महामंडळाने परवानगी दिली असून त्यासाठीचे शुल्क रु. ८,०६,१७,६००/- भरणा करणेसाठी दि. २८/२/२०२५ रोजी मागणी पत्र निर्गमित करण्यात आले असून, भूखंड क्रमांक जे-२२३ यांचा औद्योगिक ते व्यापारी रुपांतरणासाठीच्या प्रस्तावावर म.औ.वि. महामंडळाच्या धोरणानुसार कार्यवाही सुरु आहे. भूखंड क्रमांक जे-१७६ यांनी अनाधिकृत पोटभाडयाची रक्कम भरणा केली नसल्याने म.औ.वि. महामंडळासोबत केलेल्या करारनामामधील अटी व शर्तीचा भंग केल्याने सदर करार रद्द करणेबाबतची नोटीस निर्गमित करण्यात आली आहे. सदर भूखंडाचे धारक यांनी भूखंडावरील अनाधिकृत व्यापारी वापर बंद केला आहे.

१. मऔवि महामंडळाने दि. २४/२/२०२५ रोजीच्या परिपत्रकाद्वारे औद्योगिक ते व्यापारी भूखंडाचे रुपांतरणासाठी सुधारित मार्गदर्शक तत्वे निर्गमित केले असून पूर्वीच्या १.५ पट वरुन २.० पट दरातील फरक वसुलीबाबत निर्णय घेतलेला आहे. यामुळे महामंडळास भूखंडाचे रुपांतरणामधून मोठया प्रमाणात महसुल प्राप्त होणार आहे.
२. मऔवि महामंडळाने नोटीसेस बजावल्या-नंतर व्याजपारी पोटभाडयाबाबतची रक्कलम भूखंड क्रमांक जे-९६, जे-१६५, जे-२०३, जे-२२३ आणि जे-२३४ यांनी भरणा केलेली आहे.
३. भूखंड क्रमांक जे १७६ चे धारक यांनी अनाधिकृत व्यापारी वापर बंद केला आहे.

भूखंड क्र. जे.जे-९६, जे.जे-१६५, जे.जे-१७६, जे.जे-१८५ व १८६, जे.जे-२०३, जे.जे-२२३, जे.जे-२२३/१, जे.जे-२३४ भूखंडाचा काही भाग ते व्यापारी प्रयोजनासाठी वापरत असल्याने त्यांना कारणे दाखला नोटीस निर्गमित करण्याल आली व त्यानुसार भूखंडधारक यांचेकडून इतकी रक्कम वसुल करण्यात आली आहे.

*************************

/६

साठवणूक केल्याने महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत सदर उद्योगाची रु. १.०० लक्ष रुपये इतकी बँक हमी जप्त करण्यात आली आहे.

जिल्हा आरोग्य अधिकारी, पालघर यांच्याकडून प्राप्त अहवालानुसार प्राथमिक आरोग्य केंद्र, तारापूर परिसरामध्ये रुग्ण संखेच्या प्रमाणात वाढ झालेली आढळून आली नाही. तसेच कृषि विभागाकडून प्राप्त पाहणी अहवालानुसार शेतजमीनीचे नुकसान झाल्याचे आढळून आले नाही.

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत राष्ट्रीय जल गुणवत्ता अभियानांतर्गत केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाने नेमून दिलेल्या ठिकाणचे पाण्याचे नमुने दरमहा संकलित करण्यात येतात. याबाबतचे पृथ:करण अहवाल महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या संकेतस्थळावर अवलोकनार्थ उपलब्ध आहेत. उक्त पृथ:करण अहवालाचे अवलोकन केले असता समुद्राच्या पाण्याची गुणवत्ता खालावल्याचे दिसून येत नाही.

***********

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२५ चे प्रथम (अर्थसंकल्पिय) अधिवेशन

**श्री. श्री. विलास सुकूर तरे, मा. विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम, १०५ अन्वये उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना क्र. २३४४ पुढीलप्रमाणे आहे –**

**"पालघर जिल्ह्यात बोईसर तारापूर एम.आय.डी.सी.मधील सडेकर इन्व्हायरो इंजिनिअरिंग प्रा.लि.या कंपनी उद्योगाची उभारणी सन २०२१तेरर या कालावधीत उभारणी करण्यातआली मात्र या कंपनीने अल्पावधीतच आपलेसांडपाणी प्रक्रिया न करताच नाल्यात,खाडीत तसेच समुद्रात सोडल्याने जलसृष्टीचा नष्ट होत असून येथील लोकांच्या जीवनमान मध्ये विपरीत परिणाम होतअसून कर्करोग, फुफ्फुसावर देखील परिणाम होत असून श्वसनाचे आजार होत असणे, कंपनीतील रासायनिक सांडपाणी शेतीत सोडल्याने या परिसरातील मोठ्या प्रमाणात शेती नष्ट होण्याच्या मार्गावर असल्याचे बाब माहे फेब्रुवारी २०२५ च्या शेवटच्या आठवड्यात निदर्शनास येणे,त्यामुळे येथील शेतकरी मोठ्या आर्थिक समस्यात आलेला असणे,या कंपनीने प्रदूषण नियमाचे सर्वनियम पायदळी तुडविण्याचे निदर्शनास येत असणे, यासंदर्भात मा.जिल्हाधिकारी यांनी कंपनीला भेट देऊन या कंपनीचे सविस्तर पाहणी केली असता मोठ्या प्रमाणात रासायनिक पाणी सर्वत्र सोडत असल्याने शेती लाल झालेले असल्याचे त्यांच्या निदर्शनास आल्यावर त्यांनी तहसीलदार यांना पंचनामा करण्याचे आदेश दिलेले असणे, त्यानुसार महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने तात्काळ कारवाई करण्याची आवश्यकता असतानाही त्यावर कोणतीच कारवाई करण्यात येत नसल्याने शेतकरी व सर्वसामान्य नागरिक नाराजी व्यक्त करीत असणे, तसेच महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ आणि महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने संयुक्त कारवाई करून सदर कंपनी कंपनीला मोठ्या प्रमाणात दंड आकारून सांडपाण्याची योग्य विल्हेवाट लावण्यासाठी स्वतंत्र यंत्रणा उभीकरून महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या सर्वनियमांची काटेकोर अंमलबजावणी करून या परिसरातील शेतकरी आणि मानवांना व प्राण्यांना कोणत्याही प्रकारचे प्रदूषण मिश्रित पाण्यामुळे होणाऱ्या सर्व उपाययोजना करण्याचीआवश्यकता निर्माण झालेलेअसणे यावर शासनाने करावयाचे कार्यवाही व उपाययोजना.."**

---

**<u>मा. मंत्री (पर्यावरण व वातावरणीय बदल) यांचे निवेदन</u>**

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, तारापूर या औद्योगिक वसाहतीमध्ये मोठे, मध्यम व लहान प्रकारचे रासायनिक, औषध निर्मिती, किटकनाशक निर्मिती व कापड यांवर प्रक्रिया करणारे उद्योग कार्यरत आहेत. सदर औद्योगिक परीसरात एकूण ४४४ उद्योग औद्योगिक सांडपाणी निर्माण करतात त्यापैकी १०३ उद्योगांमार्फत शून्य निष्कासन यंत्रणा बसविण्यात आली असून उर्वरीत एकूण ३४१ उद्योगांपैकी मोठ्या व मध्यम स्वरुपाच्या उद्योगांमार्फत त्यांच्या उत्पादन प्रक्रियेत निर्माण होणाऱ्या सांडपाण्यावर प्रक्रिया करण्यासाठी प्रथम, व्दितीय व काही उद्योगांमार्फत तृतीय स्वरुपाची प्रक्रिया यंत्रणा कार्यान्वित करण्यात आली आहे. उर्वरीत लघु उद्योगांमार्फत त्यांच्याकडून निर्माण होणाऱ्या औद्योगिक सांडपाण्यावर प्रक्रिया करणेकरिता प्राथमिक स्वरुपाची सांडपाणी प्रक्रिया संयत्रणा उभारण्यात आली आहे.

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, तारापूर येथील सर्व उद्योगांकडून प्रक्रियाकृत सांडपाणी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या भुयारी गटारीद्वारे तीन वेगवेगळ्या ठिकाणी असणाऱ्या सम्पमध्ये गोळा केले जाते. सदर प्रक्रियाकृत सांडपाणी पुढील प्रकियेकरिता गुरुत्वाकर्षण वाहीणीद्वारे नवीन सामुहिक सांडपाणी प्रक्रिया केंद्रात सोडण्यात येते.

सामुहिक सांडपाणी प्रक्रिया केंद्रामध्ये रासायनिक उद्योगामधून निर्माण होणाऱ्या सांडपाण्याचे विक स्ट्रिम व हाय सी.ओ.डी./टी.डी.एस. स्ट्रिम या दोन भागांमध्ये वर्गीकरण करण्यात येते. रासायनिक उद्योगामधून निर्माण होणाऱ्या विक स्ट्रिममधील सांडपाण्यावर उद्योगांमध्येच प्रक्रिया करण्यात येते व हाय

सी.ओ.डी./टी.डी.एस स्ट्रिममधील सांडपाण्यावर अद्यावत स्वरुपाच्या प्रक्रिया यंत्रणेव्दारे प्रक्रिया केली जाते. मोठ्या उद्योगांमार्फत हाय सी.ओ.डी./टी.डी.एस स्ट्रिमवर अद्यावत स्वरुपाच्या प्रक्रिया यंत्रणेव्दारे प्रक्रिया करण्याकरीता संयत्रणा बसविण्यात आली आहे. उर्वरित उद्योगांमार्फत तारापूर औद्योगिक वसाहतीमधील उद्योगांच्या संघटना, टी.ई.पी.एस, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ व महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ यांच्या सहमतीने हाय सी.ओ.डी./टी.डी.एस स्ट्रिमवर अद्ययावत स्वरुपाच्या प्रक्रिया करण्याकरीता मे. सडेकर इनव्हिरो इंजिनिअर्स प्रा. लि., या उद्योगास सामुहिक सांडपाणी प्रक्रिया संयत्रणेचाच एक भाग म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

मे. सडेकर इनव्हिरो इंजिनिअर्स प्रा. लि., हा उद्योग प्रदूषण नियंत्रण सयंत्रणेचाच एक भाग म्हणून कार्यरत असून त्यांचे एकूण १२६ इतके उद्योग सभासद आहेत. सभासद उद्योगांमधून निर्माण होणाऱ्या हाय सी.ओ.डी./टी.डी.एस स्ट्रिममधील औद्योगिक सांडपाण्यावर मे. सडेकर इनव्हिरो इंजिनिअर्स प्रा. लि. यांच्याकडून प्रक्रिया करण्यात येते. मे. सडेकर इनव्हिरो इंजिनिअर्स प्रा. लि., या उद्योगास जल (प्रदूषण प्रतिबंध व नियंत्रण) अधिनियम, १९७४ हवा (प्रदूषण प्रतिबंध व नियंत्रण) अधिनियम, १९८१ व घातक आणि इतर कचरा (व्यवस्थापन आणि सीमापलिकडील संचलन) दुरुस्तीचे नियम, २०१६ तसेच तद्नंतरच्या सुधारणांतर्गत नमूद अटी व शर्तीनुसार महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत संमतीपत्र प्रदान करण्यात आले आहे.

मे. सडेकर इनव्हिरो इंजिनिअर्स प्रा. लि., या उद्योगामधून निर्माण होणारे औद्योगिक सांडपाणी (कन्डेनसेट) पुढील प्रकियेसाठी सामुहिक औद्योगिक सांडपाणी प्रक्रिया केंद्रात पाठविण्यात येते. तथापि, सदर उद्योगाच्या दुरुस्ती व देखभालीचे काम चालू असल्याने प्लॉट क्र. एएम-२९ येथे हाय सी.ओ.डी./टी.डी.एस औद्योगिक सांडपाणी साठवणूकीसाठी परवानगी देण्याबाबतचे पत्र दि. ०४.१२.२०२४ रोजी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे प्राप्त झाले होते.

सदरहू उद्योगामार्फत विना परवाना औद्योगिक सांडपाण्याची साठवणूक करीत असल्याचे वृत्त स्थानिक वृत्तपत्रामध्ये प्रकाशित झाले होते तसेच सदर उद्योगाबाबत काही स्थानिक नागरीकांकडून प्राप्त तक्रारींच्या अनुषंगाने मे. एनीवॉटर प्रोसेसर असोसिएशन , प्लॉट क्र. डी-८/१ येथे दि. ०५.१२.२०२४ रोजी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत व दि. १७.१२.२०२४ रोजी जिल्हाधिकारी, पालघर, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, व महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ व संबंधित तक्रारदार यांचे समवेत स्थळ पाहणी केली असता पाहणी दरम्यान मे. सडेकर इनव्हिरो इंजिनिअर्स प्रा. लि. यांनी प्लॉट क्र. डी-८/१ येथे मे. एनीवॉटर प्रोसेसर असोसिएशन दि. २७.११.२०२४ ते दि.०२.१२.२०२४ या कालावधीत साधारणपणे ७५० घनमिटर इतके हाय सी.ओ.डी./टी.डी.एस औद्योगिक सांडपाणी प्रस्तावित सांडपाणी प्रक्रिया केंद्राच्या टाक्यांमध्ये विनापरवाना साठवणूक केल्याचे व साठवणूक टाकीच्या बाजुला मोकळ्या जमिनीवर सांडलेल्या सांडपाण्यामुळे सदरच्या ठिकाणी माती लाल रंगाची झाल्याचे आढळून आले होते.

त्यानुषंगाने महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ व उपविभागीय अधिकारी यांच्या आदेशांनुसार मे. एनीवॉटर प्रोसेसर असोसिएशन, प्लॉट क्र. डी-८/१, एम आय डी सी, तारापूर येथे साठवणूक केलेले हाय सी.ओ.डी./टी.डी.एस औद्योगिक सांडपाणी मे. तारापूर इनव्हायरोमेंट प्रोटेक्शन सोसायटी, प्लॉट क्र. ए एम-२९, एम आय डी सी, तारापूर येथील सामुहिक औद्योगिक सांडपाणी प्रक्रिया केंद्राच्या इक्वलायझेशन टाकीमध्ये स्थलांतरीत करुन तद्नंतर त्याची पुन्हा टँकरने वाहतुक करुन सदर सांडपाण्यावर मे.सडेकर इनव्हिरो इंजिनिअर्स प्रा. लि., प्लॉट क्र. ई-१३३, ओ-२३ (पार्ट-१) येथे स्थित उद्योगामध्ये प्रक्रिया करण्याचे आदेश देण्यात आले होते. सदर प्रकरणी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत मे. सडेकर इनव्हिरो इंजिनिअर्स प्रा. लि. यांची वैयक्तिक सुनावणी घेऊन दि.२७.१२.२०२४ रोजी अंतरीम आदेश बजावण्यात आले आहेत. तसेच उक्त उद्योगाने दि. २७.११.२०२४ ते ०२.१२.२०२४ या ५ दिवसाच्या कालावधीत विनापरवाना मे. एनीवॉटर प्रोसेसर असोसिएशन, प्लॉट क्र. डी-८/१, म. औ. वि. महामंडळ, तारापूर येथे सांडपाण्याची

1. पहिली बैठक दि.04/12/2023 - योजनेचा जूना विकासक मे. विझार्ड कन्स्ट्रंक्शन यांचे प्रतिनिधी हजर होते. जून्या विकासकाने त्यांचे म्हणणे मांडण्याकरीता १५ दिवसांची वेळ समितीकडे मागितली.

2. दुसरी बैठक दि.29/01/2024 - वितीय संस्थेने मे. विझार्ड कन्स्ट्रक्शन व बीलीफ रियल्टर्स या दोघांमध्ये निधीच्या वापराबाबत काय संबंध आहे याची कागदपत्रांसह तपशीलवार माहितीसह स्पष्टीकरण सादर करण्याच्या सूचना समितीने दिल्या. सदर बैठकीत मे. विझार्ड कन्स्ट्रक्शन यांच्याकडून कोणतेही म्हणणे समितीस प्राप्त झाले नाही.

3. तिसरी बैठक दि.13/02/2024 - सदर बैठकीमध्ये वितीय संस्थेने सादर केलेल्या कागदपत्रांची तपासणी करण्याच्या सूचना समितीने दिल्या.

4. चौथी बैठक दि.12/03/2024 - सदर बैठकीमध्ये वितीय संस्थेने सादर केलेल्या कागदपत्रांची तपासणी करून वितीय संस्थेकडून याबाबत अधिक माहिती सादर करण्याच्या सूचना समितीने दिल्या.

5. पाचवी बैठक दि.16/04/2024 - वितीय संस्थेने याबाबत अधिक माहिती सादर केली नसल्याने सदर झोपडपट्टी पुनर्वसन योजनेचा प्रस्ताव अभय योजनेमधून वगळण्याचे ठरले.

   तथापि, जे.सी. फ्लॉवर्स असेट रीकन्स्ट्रक्शन प्रायवेट लिमीटेड यांनी समितीने मागणी केलेली सर्व माहिती दि. १७/०९/२०२४ रोजीच्या पत्रान्वये सादर करून सदर योजने करीता नवीन विकासकाची नियुक्ती करण्याची विनंती समितीस केली होती.

6. सहावी बैठक दि. 24/09.2024 - सदर बैठकीमध्ये झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाचे वितीय सल्लागार यांनी मे. विझार्ड कन्स्ट्रक्शन व बीलीफ रियल्टर्स या दोघांमध्ये registered mortgage deed झाले असल्याचे नमूद केले. समितीला आर्थिक गुन्हे शाखेकडे (EOW) करण्यात आलेल्या काही तक्रारींबाबत माहिती देण्यात आली आणि पुढील कार्यवाही करण्यापूर्वी EOW कडून सद्यस्थितीचा अहवाल प्राप्त करण्याचे ठरले. सदर बैठकीकरीता याजनेचे जुने विकासक मे. विझार्ड कन्स्ट्रक्शन यांना बोलाविण्यात आले होते. तथापी मे. विझार्ड कन्स्ट्रक्शन किंवा त्यांचे प्रतिनिधी सदर बैठकीला उपस्थित नव्हते.

7. सातवी बैठक दि. 07/10/2024 - सदर बैठकीमध्ये EOW कडून प्राप्त झालेल्या माहितीप्रमाणे वितीय संस्थेविरोधात दखलपात्र गुन्हा निष्पन्न होत नसल्याने प्राथमिक चौकशी बंद करण्यात आली आहे. त्यामुळे वितीय संस्थेने सादर केलेल्या प्रस्तावाप्रमाणे नित्यांनद नगर गृहनिर्माण संस्थेची रखडलेल्या झोपडपट्टी पूनर्वसन योजना ही नवीन विकासकामार्फत राबविण्याबाबत समितीने शासनास शिफारस केली आहे.

सदर बैठकीमध्ये समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपुप्रा, मुंबई यांना नित्यांनद नगर गृहनिर्माण संस्थेची रखडलेल्या झोपडपट्टी पूनर्वसन योजनेच्या विकासकासंदर्भात महाराष्ट्र झोपडपट्टी (सू.नि. व पू.) अधिनियम, १९७१ च्या कलम १३(२) अन्वये विहित केलेली कार्यवाही अवलंबून जुन्या विकासकाला बदलण्याची कार्यवाही करण्याची शिफारस समितीने केली. १३(२) च्या कार्यवाहीमध्ये जर जून्या विकासकाला काढून टाकण्याचे आदेश मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपुप्रा, मुंबई यांनी दिल्यास

नविन विकासकाची नियुक्ती करण्यात यावी अशी शिफारस समितीने शासनास केली. समितीने केलेल्या शिफारशीनूसार सदर योजना राबविण्याकरीता नविन विकासकाची नियुक्ती करण्याबाबत महाराष्ट्र झोपडपट्टी (सू.नि. व पू.) अधिनियम, १९७१ च्या कलम ३K अन्वये मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपुप्रा, मुंबई यांना दि.११/१०/२०२४ रोजी शासनाने निर्देश दिले.

अभय योजनेंतर्गत प्राप्त झालेल्या नित्यांनद नगर गृहनिर्माण संस्थेची रखडलेल्या झोपडपट्टी पूनर्वसन योजनेसंदर्भात झालेल्या समितीच्या बैठकीकरीता सदर योजनेचा जूना विकासक मे. विझार्ड कन्स्ट्रक्शन यांना उपस्थित राहण्याच्या सूचना देण्यात आल्या होत्या. तसेच, समितीने केलेल्या शिफारशीनूसार मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपुप्रा, मुंबई यांच्या मार्फत महाराष्ट्र झोपडपट्टी (सू.नि. व पू.) अधिनियम, १९७१ च्या कलम १३(२) अन्वये करण्यात आलेल्या कार्यवाही मध्ये जून्या विकासकाला सुनावणीकरीता उपस्थित राहण्याबाबत सूचना देऊन त्यांचे म्हणणे मांडण्याची संधी दिली होती. तथापि, सदर सुनावणीस देखील मे. विझार्ड कन्स्ट्रक्शन किंवा त्यांचे प्रतिनिधी हजर नव्हते. त्यामूळे मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपुप्रा, मुंबई यांनी कलम १३(२) अन्वये दि. १०/०१/२०२५ रोजी आदेश पारीत करून मे. विझार्ड कन्स्ट्रक्शन यांची नियुक्ती रद्द केली.

नवीन विकासकाने दि.१६.०१.२०२५ रोजीच्या पत्रासोबत सदर योजनेमध्ये टप्या टप्याने निष्काषित करावयाचा झोपड्यांबाबत बारचार्ट झो.पु.प्रा. कडे सादर केला असून त्यानुसार प्रथम टप्यामध्ये म्हणजेच पुनर्वसन इमारतीचे बांधकाम सुरू करण्यापूर्वी एकूण १०० झोपड्यांचे निष्कासन प्रस्तावित केले आहे. त्याअनुषंगाने प्राधिकरणाच्या परिपत्रक क्र २१० विचारात घेता, प्रस्तावित निष्काशन करावयाच्या झोपडपट्टी धारकांच्या दोन वर्षाच्या आगाऊ भाडेपोटी रक्कम रूपये ९,६०,००,०००/- चा डी. डी. क्र.०४६८५० व त्या पुढील एक वर्षाच्या भाड्यापोटी रक्कम रु.४,८०,००,०००/- चा पुढील दिनांकाचा धनादेश क्र.४८६११० प्राधिकरणाकडे जमा केला आहे. तसेच, त्यांच्या वास्तुविशारदामार्फत विषयांकित झोपुप्रा योजनेच्या सुधारीत आशयपत्राकरीता प्राधिकरणाकडे अर्ज दाखल केला असून त्यावर कार्यवाही सूरु आहे.

वर नमूद केल्याप्रमाणे नित्यांनद नगर गृहनिर्माण संस्था ही झोपू योजना गेले २५ वर्ष रखडलेली असून झोपडीधारक मुलभूत सुविधांपासून वंचित असल्यामूळे शासनाने अभय योजनेच्या माध्यमातून केवळ झोपडीधारकांचे पुनर्वसन करण्याच्या उद्देशाने अशा रखडलेल्या झोपडपट्टी पुनर्वसन योजना पूर्ण करण्यासाठी वित्तीय संस्थेने सूचविलेल्या विकासकाची नियुक्ती केली आहे. यामध्ये कोणताही गैरप्रकार झालेला नाही.

अभय योजनेंतर्गत एकूण २३ योजना मार्गी लागलेल्या आहेत. सदर योजनांमधून अंदाजे २७७९३ पुनर्वसन सदनिकांचे बांधकाम पूर्ण होणार आहेत. या योजनेंतर्गत जवळपास रू.१२३ कोटी एवढे प्रलंबित भाडे अदा करण्यात आलेले आहे.

*************************

**सन २०२५ चे प्रथम (अर्थसंकल्पीय) अधिवेशन**

**श्री. रईस शेख, मा. विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्र.१६६० पुढीलप्रमाणे आहे :-**

"झोपडपट्टी पुनर्विकास प्रकल्पात काही प्रकल्प रखडलेले असणे, त्या प्रकल्पांसाठी वित्तीय संस्थांकडून कर्ज घेण्यात आलेले असणे, कर्जाची रक्कम त्या प्रकल्पासाठी खर्च करण्यात आलेली असेल तर अशा प्रकल्पांना अभय योजनेत समाविष्ट करुन घेण्यात येणे, तसेच रखडलेला प्रकल्प विकसित करायची संधीही संबंधित वित्तीय संस्थेच्या मान्यतेने नवीन विकासकाला देण्याचे धोरण शासनाने राबविले असणे, सदर अभय योजनेच्या संदर्भातील अर्जाच्या सुनावण्या ह्या गृहनिर्माण विभागाचे सचिवांच्या अध्यक्षतेत स्थापन झालेल्या समिती समोर होत असणे, बांद्रा रिक्लेमेशन येथील नित्यानंदनगर सहकारी गृहनिर्माण संस्था, H.W वॉर्ड येथील या झोपडपट्टीच्या पुनर्विकासाच्या संदर्भातील असाच एक प्रस्ताव या समिती समोर आलेला असणे, सदर अर्जासंदर्भात समिती समोर सुनावणी झालेली असणे व गृहनिर्माण विभागाचे अपर मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या सुनावणीत सदर अर्ज फेटाळण्यात आलेला असणे, अर्जदारांनी कोणत्याही प्रकारचे पुरावे न दिल्यामुळे सदरहू अर्ज फेटाळण्यात आलेला असणे, त्यामुळे सदर प्रस्ताव अभय योजनेत समाविष्ट करण्यात आलेला नसणे, परंतु त्यानंतर अचानक समोरच्या पक्षाला कोणत्याही प्रकारची संधी न देता, परत या प्रकरणात सुनावणी घेण्यात आली असणे, वास्तविक कायद्यात अशा कोणत्याही प्रकारची तरतूद नसताना सुनावणी घेण्यात आली असणे, फेरसुनावणी होत आहे याबाबतची संबंधित पक्षकारांना कल्पना न देता एकतर्फी निर्णय घेऊन अभय योजना (ॲमनेस्टी) दिनांक ११/१०/२०२४ रोजी मान्य केली असणे, यामध्ये उघडपणे नैसर्गिक न्याय तत्वांचे उल्लंघन करण्यात आले असणे, सदर बाब ही शासन धोरण व कायद्याच्या तरतुदींच्या विरुध्द असल्याने यामध्ये मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार झाला असल्याचे सकृतदर्शनी दिसून येत असणे, अपर मुख्य सचिव, गृहनिर्माण विभाग व या समिती मधील इतर अधिकाऱ्यांवर असे बेकायदेशीर कृत्य केल्याप्रकरणी कठोर कारवाई करण्याची मागणी होत असून नागरिकांमध्ये संताप व्यक्त होत असणे, या प्रकरणी सखोल चौकशी करुन संबंधित दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रीया."

---

**मा. उप मुख्यमंत्री (गृहनिर्माण) यांचे निवेदन**

झोपडपट्टीमुक्त मुंबई आणि पर्यायाने झोपडपट्टीमुक्त महाराष्ट्र करण्याच्या उदात्त हेतूने शासन झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबवित आहे. कोरोनासारख्या जागतिक महामारीमुळे खाजगी विकासकांची आर्थिक स्थिती कमकुवत झाल्याने बहुतांश झोपडपट्टी पुनर्वसन योजना रखडल्याचे निदर्शनास आले आहे. झोपडीधारकांचे भाडे थकल्याने तसेच योजना रखडत असल्याने झोपडीधारकांचे पुनर्वसन वेळेत होत नाही. त्यामुळे झोपडीधारकांमध्ये असंतोषाचे वातावरण निर्माण होत आहे. अशा रखडलेल्या योजना विकासकांना विविध शुल्कांमध्ये सवलत देऊनही कार्यान्वित होत नसल्याचे निदर्शनास आले आहे. सबब, शासनाने दि.२५.०५.२०२२ रोजीच्या शासन निर्णयान्वये रखडलेल्या झोपडपट्टी पुनर्वसन योजना

पूर्ण करण्यासाठी अभय योजना राबवून झोपडपट्टी पुनर्वसन योजना पूर्ण करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

सदर शासन निर्णयानुसार ज्या वित्तीय संस्थांनी (RBI, SEBI, NHB मान्यताप्राप्त) झोपडपट्टी पुनर्वसन योजनेच्या अंमलबजावणीसाठी निधी उपलब्ध करुन दिला आहे, अशा संबंधित वित्तीय संस्थांची सदर योजनेच्या आशयपत्रामध्ये संयुक्त विकासक (Co-Developer) / ऋणदाता (Lender) म्हणून नोंद घेण्यात येईल, तसेच त्यांनी नेमलेल्या / प्राधिकृत केलेल्या सक्षम विकासकामार्फत योजनेची अंमलबजावणी करण्यास मान्यता देण्यात येईल, असा निर्णय घेण्यात आला.

अभय योजनेंतर्गत वित्तीय संस्थेकडून प्राप्त झालेल्या प्रस्तावाची छाननी करून झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने सादर केलेल्या प्रस्तावांवर निर्णय घेणे, वित्तीय संस्था / त्यांनी प्राधिकृत केलेल्या सक्षम संस्थेस रखडलेली योजना पूर्ण करण्यास मंजुरी देण्याच्या अनुषंगाने निर्णय घेण्यासाठी दि.१२.०७.२०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये अपर मुख्य सचिव (गृहनिर्माण) यांच्या अध्यक्षतेखाली चार सदस्यीय समिती गठीत करण्यात आलेली आहे.

विकासक मे. स्लम रिहॅबीलीटेशन सोयायटीकडून सादर केलेला नित्यांनद नगर गृहनिर्माण संस्थेची झोपू योजनेचा प्रस्ताव सन २००१ मध्ये झोपुप्रा, मुंबई यांनी स्वीकृत केला होता. सदर योजनेमध्ये कोणतीही प्रगती झाली नसल्याने विकासक मे. स्लम रिहॅबीलीटेशन सोयायटी यांची नियुक्ती दि.२०/०३/२०१४ रोजी रद्द करण्यात आली. तद्नंतर सदर योजना राबविण्याकरीता दि.१२/०१/२०१५ रोजी मे. विझार्ड कन्स्ट्रक्शन यांना LOI दिला होता. तथापी सदर याजनेमध्ये मे. विझार्ड कन्स्ट्रक्शन यांनी कोणतीच कामे केलेली नाही. त्यामुळे सदर योजनेमध्ये गेल्या २५ वर्षात कोणतीही प्रगती दिसून आलेली नाही. त्यामुळे सदर योजनेतील झोपडीधारकांच्या पुनर्वसनाचा प्रश्न अधांतरी होता. त्यामुळे सदर योजना जलद गतीने पूर्ण करून तेथील झोपडीधारकांचे लवकरात लवकर पूनर्वसन करण्यासाठी अभय योजनेंतर्गत नविन विकासकाची नियुक्ती करण्याबाबत जे.सी. फ्लॉवर्स असेट रीकन्स्ट्रक्शन प्रायवेट लिमीटेड या वित्तीय संस्थेने व्हिलेज वांद्रे, बांद्रा रिक्लेमेशन प्रोजेक्ट, एच/डब्ल्यू वॉर्ड, मुंबई येथील न.भू.क्र. ए ७९१ या भूभागावरील नित्यांनद नगर गृहनिर्माण संस्थेची रखडलेल्या झोपडपट्टी पूनर्वसन योजनेचा प्रस्ताव उपरोक्त समितीपूढे चर्चेसाठी सादर केला.

अभय योजनेंतर्गत वित्तीय संस्थेकडून योजना सादर करतांना समितीकडून प्रश्नावली स्वरूपात माहिती मागविण्यात आली होती. यामध्ये प्रामुख्याने प्रलंबित झो.पू. योजनेची माहिती, झो.पू. योजनेला/विकासकाला ज्या वित्तीय संस्थेने कर्ज दिले आहे त्या वित्तीय संस्थेची माहिती, वित्तीय संस्थेव्दारे ज्या नवीन विकासकाची नियुक्ती करण्याबाबत प्रस्ताव आहे त्या विकासकाची माहिती तसेच सदर झो.पू. योजनेचा विकासक व संबंधीत वित्तीय संस्था यांच्यामध्ये कर्ज थकबाकी संदर्भात काही कायदेशीर नोटीस बजावण्यात आली असल्यास त्याबाबतची माहिती इ. माहितीचा समावेश होता. वित्तीय संस्थेकडून प्राप्त झालेल्या माहितीची तपासणी व छाननी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणामार्फत करण्यात आली. झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने प्राप्त प्रस्तावांची तपासणी केल्यानंतर अभय योजनेसाठी पात्र असलेले प्रस्ताव सर्व माहिती व अभिप्रायासह समितीपूढे सादर केले. झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणामार्फत प्राप्त प्रस्तावांवर चर्चा करण्यासाठी समितीच्या झालेल्या विविध बैठका व सदर बैठकींमध्ये झालेले निर्णय पुढीलप्रमाणे:-

महाराष्ट्रात सन २०२४-२५ मध्ये एकूण ७३,६१० थ्रीफेज वितरण रोहित्रे नादुरुस्त झाले असून त्यापैकी ७३,५४२ रोहित्रे बदलण्यात आली आहेत. उर्वरित ६८ वितरण रोहित्रे हे १ ते ३ दिवसात नादुरुस्त झालेली असून ते बदलविण्याचे काम प्रगतीपथावर आहे. नादुरुस्त रोहित्रे तातडीने दुरुस्त करण्यासाठी महावितरण मार्फत विभाग निहाय एकुण २९३२ रोहित्र दुरुस्त करणाऱ्या एजन्सी नियुक्ती करण्यात आलेल्या आहेत. रोहित्र नादुरुस्त झाल्यास ते सुमारे १ ते ३ दिवसांच्या कालावधीत बदलण्यात येणार आहेत.

वितरण रोहित्रे बदलण्यासाठी महावितरणच्या विभागीय भांडारात दुरुस्त केलेल्या १०,९९४ थ्री फेज वितरण रोहित्रांचा साठा उपलब्ध आहे. तसेच, नादुरुस्त वितरण रोहित्रे वेळेत बदलण्यासाठी एकुण २५,०६३ थ्री फेज वितरण रोहित्रे चक्राकार पध्दतीने उपलब्ध आहेत. महावितरणच्या निरंतर वीज योजनेअंतर्गत ग्राहकांना अखंडीत व दर्जेदार वीज पुरवठा देण्याकरीता १५ वर्षापेक्षा जास्त जुने विद्युत रोहित्रे बदलविणे, विदयुत रोहित्रांचे ऑईल बदलविणे, आणि पूर्ण क्षमतेएवढी पातळी करणे ही कामे करण्यात येत आहेत. निरंतर वीज योजनेअंतर्गत सन २०२४-२५ मध्ये एकुण ३३५० वितरण रोहित्रे देण्यात आलेली आहेत. तसेच सोलापूर मंडळ कार्यालयास निरंतर वीज योजनेअंतर्गत सन २०२४-२५ मध्ये १०० केव्हीए क्षमतेची एकुण २०० वितरण रोहित्रे देण्यात आलेली आहेत.

**********

# महाराष्ट्र विधानसभा

## सन २०२५ चे पहिले (अर्थसंकल्पीय) अधिवेशन

### मा. श्री. उत्तमराव जानकर, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्र.१६४१ पुढील प्रमाणे आहे.

"राज्यातील ग्रामीण भागात अनेक शेतकऱ्यांना शेतातील विंधनविहिरी (बोअर) सातशे ते आठशे फूट खोल असल्याने अशा ठिकाणी सोलार पंप व्यवस्थित काम करत नसणे, पाण्याअभावी शेती पिकांचे नुकसान होत असणे, शेतीपंपांसाठी नवीन कनेक्शन बंद असून सोलार पंप शेतकऱ्यांना बंधनकारक केले जात असणे, ग्रामीण भागात अनेक शेतकऱ्यांना शेतातील विंधनविहिरी (बोअर) सातशे ते आठशे फूट खोल आहेत आणि अशा सोलार पंप व्यवस्थित काम करत नसल्याची बाब विचारात घेऊन निकषांच्या अधीन राहून शेतकऱ्यांना नवीन कनेक्शन देण्याचे धोरण स्वीकारावे, अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी महावितरणकडे केली असणे, तसेच शेतकऱ्यांना उच्च दाबाने व अखंडित विद्युत पुरवठा करण्याबरोबरच रोहित्र वेळेवर दुरुस्त करुन देणे, विद्युत उपकेंद्रांची क्षमता वाढ करण्याचे काम लवकरात लवकर पूर्ण करणे, मंजूर नवीन उपकेंद्राचे काम तातडीने सुरु करणे आणि फिडर सेपरेशनची कामे प्राधान्याने पूर्ण करणे, विद्युत उपकेंद्रांची तातडीने क्षमता वाढ करणे, एडीबी योजनेअंतर्गत ६३ केव्ही क्षमतेच्या रोहित्रांची क्षमता वाढवून १०० केव्ही करुन सदरील योजना कार्यान्वित करणे, महावितरणच्या निरंतर योजनेंतर्गत दोनशे रोहित्र उपलब्ध करुन देणे आदी मागण्यांही स्थानिक लोकप्रतिनिधींनी महावितरणकडे केल्या असणे, सदरहू मागण्या शेतकऱ्यांच्या दृष्टीने अत्यंत महत्वाच्या सदरहू मागण्या तातडीने पूर्ण करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना"

### मा.मुख्यमंत्री तथा मंत्री (ऊर्जा) यांचे निवेदन

राज्य शासनाने शेतकऱ्यांना दिवसा सिंचनाची सोय उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने "मागेल त्याला सौर कृषीपंप" ही पर्यावरण पुरक योजना सुरु केली आहे व शेतक-यांना या योजनेचा लाभ घेण्यास प्रोत्साहीत करण्यात येत आहे. सद्यःस्थितीत राज्यात "मागेल त्याला सौर कृषी पंप" व "पी.एम कुसुम घटक ब" योजना राबविण्यात येत असून एकूण १०,०५,००० सौर कृषीपंप आस्थापित करण्यात येणार आहेत.

पी.एम – कुसुम घटक ब योजनेअंतर्गत जलदगतीने सौर कृषीपंप आस्थापित करण्याकरीता महाराष्ट्र राज्यात महाऊर्जा (MEDA) व महावितरणद्वारे अंमलबजावणी करण्यात येत आहे. राज्यात पी.एम. कुसुम घटक ब योजनेअंतर्गत एकूण ५,०५,००० पैकी दि. १२.०३.२०२५ पर्यंत एकूण ३,५४,५७४ सौर कृषीपंप आस्थापित करण्यात आलेले आहेत. सौर पंप आस्थापित करण्यात महाराष्ट्र राज्य देशात अव्वल आहे. या योजनेची अत्यंत वेगाने अंमलबजावणी संपूर्ण राज्यात सुरू आहे. सन २०१५ ते २०२३ पर्यंत राज्यात एकूण १,८९,८२० सौर पंप आस्थापित करण्यात आलेले आहेत. परंतू, मागील एक वर्षात राज्यात एकूण २,७२,४२२ सौर पंप आस्थापित करण्यात आलेले आहेत.

मागेल त्याला सौर कृषी पंप योजनेअंतर्गत राज्य शासनाने पुढील ५ वर्षांसाठी ५ लक्ष पारेषण विरहीत सौर कृषी पंप आस्थापित करण्यास मंजुरी दिली आहे. शेतकऱ्याकडे उपलब्ध असलेल्या जमीनीच्या क्षेत्रानुसार त्याला अनुदानावर मिळणाऱ्या पंपाची क्षमता ठरते. यामध्ये २.५ एकर पर्यंत भूधारणा असेल तर ३ एच पी क्षमतेचा, २.५१ ते ५ एकर भूधारणा असेल तर ५ एच पी क्षमतेचा व ५ एकर पेक्षा जास्त भूधारणा असेल तर ७.५ एचपी क्षमतेचा सौर कृषीपंप अनुदान तत्वावर शेतकऱ्याला मिळतो. त्याचबरोबर मागेल त्याला सौर कृषीपंप योजनेअंतर्गत ७.५ एचपी पारेषण विरहित सौर पंपाकरिता पात्र असलेले लाभार्थी हे १० एचपी च्या सौर पंपासाठी मागणी करु शकतात परंतु शासकीय अनुदान हे ७.५

एचपी सौर पंप पर्यंत मर्यादित असल्याने त्यासाठी येणारा उर्वरित खर्च हा शेतक-यास स्वखर्चाने करावयाचा आहे. यासंबंधीचे परिपत्रक महावितरणमार्फत दि.०४.०२.२०२५ रोजी प्रसिद्ध केले आहे.

तसेच, अल्पभूधारक शेतकऱ्याला २.५ एकरापर्यंत ३ एचपी पंप मिळत असल्याने अशा शेतकऱ्याला जर पाण्याची पातळी जास्त खोल असेल तर भुधारणे नुसार मिळणाऱ्या ३ एचपी पंपासोबत अतिरिक्त रक्कम भरुन दुसरा ३ एचपीचा सोलर पंप "बूस्टर पंप" म्हणून घेता येईल व अधिक खोलीवरील पाणी सोईनुसार उपसता येईल. सद्यपरिस्थितीत, एक पंप अनुदानाद्वारे व दुसऱ्या बूस्टर पंपाची किमत शेतकऱ्याने संबंधित पुरवठादार कंत्राटदारास अदा करावी लागेल असा निर्णय घेण्यात आला आहे. त्यासंबंधीचे परिपत्रक महावितरणमार्फत दि. १७.१२.२०२४ रोजी प्रसिद्ध केले आहे.

ट्युबवेल अथवा नदीवरून पाणी उपसा करण्यासंदर्भात राज्यात काही ठिकाणी प्रायोगिक तत्त्वावर कार्यवाही केलेली आहे. यामध्ये, कोल्हापूर जिल्ह्यात बोअरमध्ये ५१० फूट खोल अंतरावर ७.५ एच.पी क्षमतेची मोटर बसवून, शेजारी असणाऱ्या शेतजमीनीवर ७.५ किलोवॅट क्षमतेचे सोलर पॅनल बसविण्यात आले. तसेच, लातूर जिल्ह्यात ६५० फूट खोलीच्या बोअर वेलमध्ये १० HP सबमर्सिबल मोटर पंप बसवून, सदर सौर मोटरपंप सेटची यशस्वी चाचणी घेण्यात आली असून, ६ नोझलचे स्प्रिंकलर यावर चालविण्यात आले आहेत. या दोन्ही ठिकाणी योग्य त्या दाबाने पाण्याचा विसर्ग होत आहे.

उच्चदाब व अखंडीत विद्युत पुरवठा करीता प्रतिबंधात्मक दुरुस्ती तसेच बिघाड दुरुस्ती योजनेअंतर्गत उपकरणांची दुरुस्ती व देखभाल करण्यात येते तसेच जीर्ण झालेले पोल अथवा कंडक्टर बदलणे, अर्थिंग संदर्भातील कामे, रोहित्रांची केबल आणि किटकॅट बदलणे इ. कामे केली जातात. महावितरणने देखभाल व दुरुस्तीकरीता ९५४२ सुचिबद्ध कंत्राटदारांची नेमणूक केलेली आहे. महावितरणमार्फत देखभाल व दुरुस्तीसाठी सन २०२३-२४ मध्ये रु.१७५६.१४ कोटीपैकी रु.१६७४.४५ कोटी इतकी तर सन २०२४-२५ मध्ये रु.१७१७.२५ कोटी इतक्या रकमेची तरतुद करण्यात आली आहे.

जिल्हा स्तरावर उपलब्ध कृषी आकस्मिकता निधी व महावितरणच्या अंतर्गत स्रोतामधून देण्यात आलेल्या निधी अंतर्गत ११६ नवीन उपकेंद्र, ९४ अतिरिक्त पॉवर ट्रान्सफॉर्मर व २५ पॉवर ट्रान्सफॉर्मर क्षमतावाढ अश्या एकूण २३५ उपकेंद्राच्या कामांना मंजूरी देण्यात आली. सदर निधी अंतर्गत मंजूर ११६ नवीन उपकेंद्रांपैकी ६८ उपकेंद्र कार्यान्वित करण्यात आले व उर्वरित ४८ उपकेंद्राची कामे प्रगतीपथावर आहेत. तसेच, मंजूर ९४ अतिरिक्त पॉवर ट्रान्सफॉर्मर पैकी १० अतिरिक्त पॉवर ट्रान्सफॉर्मर कार्यान्वित करण्यात आले व उर्वरित ०४ अतिरिक्त पॉवर ट्रान्सफॉर्मरची कामे प्रगतीपथावर आहेत. सदर निधी अंतर्गत मंजूर २५ पॉवर ट्रान्सफॉर्मर क्षमतावाढ पैकी २२ पॉवर ट्रान्सफॉर्मर कार्यान्वित करण्यात आले असून, उर्वरित ०३ पॉवर ट्रान्सफॉर्मर क्षमतावाढीचे कामे प्रगतीपथावर आहेत.

विद्युत उपकेंद्रांचे क्षमता वाढ करण्याकरिता सुधारित वितरण क्षेत्र योजनेअंतर्गत (RDSS) मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० (MSKVY २.०) शी निगडीत प्रणाली बळकटीकरण व प्रणाली बळकटीकरण एआयआयबी (AIIB) या योजनेअंतर्गत अनुक्रमे ४२१ व १३० उपकेंद्रामध्ये क्षमतावाढ, तसेच अनुक्रमे १५३ व १०७ असे एकूण २६० नवीन उपकेंद्रे उभारणीचा समावेश करण्यात आला आहे. उपरोक्त दोन्ही योजनेच्या कामांचे एकूण २६ कार्यादेश देण्यात आले असून, सदरहू कामे पूर्ण करण्याचा कालावधी १८ महिन्यांचा असून माहे मार्च २०२६ पर्यंत सदरची कामे पूर्ण करण्याचे योजिले आहे. सद्यस्थितीत सदरची क्षमतावाढ व नवीन उपकेंद्रांची कामे प्रगतीपथावर आहेत. तसेच, सुधारित वितरण क्षेत्र योजनेअंतर्गत (RDSS) ४,४९६ फीडर सेपरेशनची (वाहिनी विलगीकरणाची) कामे मंजूर असून त्यापैकी १२८४ फीडर सेपरेशनची कामे पूर्ण झाली असून १६०१ फीडर सेपरेशनची कामे प्रगतीपथावर आहेत. तसेच प्रणाली बळकटीकरण योजनेअंतर्गत एडीबी (ADB) फंडेड या प्रस्तावित योजनेअंतर्गत ६३ केव्हीए रोहित्रांची क्षमता वाढवून १०० केव्हीए या घटकाअंतर्गत एकूण १००९८ रोहित्रांची क्षमतावाढ करण्याचे कामे प्रस्तावित करण्यात आले असून सदरची कामे योजनेस मंजूरी प्राप्त झाल्यानंतर निधीच्या उपलब्धतेनुसार व तांत्रिक सुसाध्यतेच्या अनुषंगाने हाती घेण्यात येतील.

नवी मुंबई पोलीस आयुक्तालय कार्यक्षेत्रातील सागरी/खाडी भागात बोटींद्वारे दिवसा व रात्री सतर्कतेने सागरी गस्त करण्यात येते. गस्ती दरम्यान मासेमारी बोटी/ प्रवाशी बोटी, बार्ज, टग त्यावरील व्यक्ती व साहित्य यांची कसून तपासणी करण्यात येते. तसेच संवेदनशील लॅन्डींग पॉईंटचे ठिकाणी दिवसा व रात्री पोलीस अंमलदार नेमण्यात येतात. सदर अंमलदार हे लॅन्डींग पॉईन्ट येथे सतर्क राहून येणा-या जाणा-या बोटी/वाहने/ व्यक्तींची कसून तपासणी करतात.

जिल्हा स्तरीय सागरी सुरक्षा समन्वय समिती मासिक आढावा बैठक नवी मुंबई पोलीस आयुक्त कार्यालयात आयोजित करण्यात येते. सदर बैठकीस सर्व सागरी घटक उदा. भारतीय तटरक्षक दल, नौदल, सीआयएसएफ, एमएमबी, कस्टम, मत्स्यविभाग, वनविभाग, ओएनजीसी, जेएनपीए, सार्वजनिक बांधकाम विभाग, सिडको व हवामान खाते, सर्व सागरी खाडी किनारी पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी यांचेसह बैठकीचे आयोजन करण्यात येवून सदर बैठकीत सागरी सुरक्षेविषयी माहितीची देवाण-घेवाण करून सागरी सुरक्षा अधिक बळकट करण्याच्या दृष्टीने निर्णय घेतले जातात.

सागरी सुरक्षा अधिक बळकट करण्यासाठी लक्षकेंद्रीत अभियान (Focused Coastal Security Exercise), सी-विजिल २४ अभियान, सागर कवच अभियान, ऑपरेशन सजग/विशेष सजग, ऑपरेशन ट्रिगर व संयुक्त सागरी गस्त असे अभियान राबविण्यात येत आहेत.

राज्यात अंमली पदार्थाची तस्करी करणाऱ्यांविरुद्ध/ जवळ बाळगणाऱ्यांविरुद्ध/ सेवानार्थीविरुद्ध एन.डी.पी.एस. कायदा १९८५ अन्वये कारवाई करण्यात येते. राज्यात सन २०२४ मध्ये अंमली पदार्थ कायद्यांतर्गत सेवनार्थीच्या विरुद्ध १५८७३ गुन्हे दाखल असून १४२३० आरोपींना अटक करण्यात आलेली आहे तसेच अंमली पदार्थ ताब्यात बाळगणे/वाहतुक करणे संदर्भात एकूण २७३८ गुन्हे दाखल झालेले असून ३६२७ आरोपींना अटक करण्यात आलेली आहे व एकूण रू. ४२४०.९० कोटी किंमतीचे अंमली पदार्थ जप्त करण्यात आलेले आहेत.

**अंमली पदार्थ तस्करी तसेच विक्रीवर आळा घालण्यासाठी शासन खालील प्रमाणे उपाययोजना करते.**

- राज्यात अंमली पदार्थ तस्करांविरुद्ध विशेष मोहीमा, ड्रग्ज मुक्त अभियान, शाळा व महाविद्यालयांमध्ये जनजागृती कार्यक्रम तसेच वाहन रॅली व पथनाट्ये आयोजनाद्वारे अंमली पदार्थ सेवन व विक्री न करण्याबाबत जनजागृती करण्यात येते.

- राज्यात अंमली पदार्थांच्या व्यापारास व प्रसारास आळा घालण्यासाठी सर्व पोलीस घटकामध्ये स्वतंत्र "अंमली पदार्थ विरोधी कक्ष" स्थापन केलेले आहेत.
- विशेष पोलीस महानिरीक्षक, दहशतवाद विरोधी पथक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना अंमली पदार्थांबाबतचे "समन्वय अधिकारी" म्हणून शासन निर्णय दि.०६.०१.२००७ अन्वये घोषित करण्यात आले आहे. तसेच केंद्र शासनाच्या दि.२५.०५.२०२२ च्या आदेशान्वये नार्कोकोऑर्डीनेशन यंत्रणेची पुनर्रचना करण्यात आली असून त्यानुसार दि.३१.०८.२०२३ च्या शासन निर्णयाने "अंमली पदार्थ विरोधी टास्क फोर्स " (ANTF) ची स्थापना करण्यात आली आहे.
- अंमली पदार्थावर आळा घालण्यासाठी राज्यस्तरीय नार्कोकोऑर्डीनेशन समिती व जिल्हा स्तरावर जिल्हास्तरीय नार्कोकोऑर्डीनेशन समितीची स्थापना करण्यात आली असून सदर समित्यांकडून अंमली पदार्थावर आळा घालण्याबाबत वेळोवेळी आढावा घेतला जातो.
- जागतिक अंमली पदार्थ विरोधी दिना निमित्त दरवर्षी २६ जून पासून १५ दिवस अंमली पदार्थ विरोधी पंधरवडा अभियान राबविले जाते. सदर कालावधीत अंमली पदार्थ विरोधी कक्ष, स्थानिक पोलीस ठाणे तसेच अशासकीय संस्था मार्फत त्यांच्या कार्यक्षेत्रातील शाळा, महाविद्यालय, रेल्वे स्थानक, महत्वाचे चौकांमध्ये अंमली पदार्थ विरोधी पोस्टर्स,बॅनर्स तसेच पथनाट्यद्वारे जनजागृती केली जाते.

**********

## महाराष्ट्र विधानसभा
## सन २०२५ चे प्रथम अधिवेशन

श्री.महेश शिंदे वि.स.स यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सुचना क्र.२५५० पुढीलप्रमाणे आहे:-

" मुंबई एनसीबीने दि.३१ जानेवारी, २०२५ रोजी नवी मुंबईत छापा टाकून सुमारे २०० कोटी रुपयांचे ड्रग्ज जप्त करणे, या प्रकरणी चार जणांना अटक करण्यात येणे, यापूर्वीही सातत्याने नवी मुंबईत भाजीपाल्याच्या ट्रकमध्ये सुध्दा अशा पध्दतीचे ड्रग्जचे साठे सापडणे, तसेच एपीएमसी मार्केटच्या परिसरामधल्या कुरिअर कंपन्यामध्येही ड्रग्ज सापडणे, आतापर्यंत केलेल्या तपासात हे सिंडिकेट परदेशातील एका गटाकडून चालविले जात असल्याचेही निष्पन्न होणे, त्याचबरोबर जप्त करण्यात आलेली काही औषधे अमेरिकेतून मुंबईत कुरिअर, लहान मालवाहू सेवा व मानवी वाहकांच्या माध्यमातून भारतात आणि परदेशातील अनेक रिसिव्हर्सना पाठविण्यात येणे, या प्रकरणात सहभागी असलेले लोक एकमेकांना पूर्णपणे अनोळखी असल्याचेही तपासात समोर आले असून हे लोक अंमली पदार्थाची तस्करी करण्यासाठी दररोज संवाद साधण्याकरिता खोटया नावाचा वापर करणे, या अंमली तस्करीमध्ये राजकीय आणि पोलिसांचा हस्तक्षेप असल्याशिवाय होऊ शकत नसल्याचा सर्वसामान्य नागरिकांमध्ये निर्माण झालेले संशयाचे वातावरण, मुंबई शहराला समुद्रकिनारा असल्यामुळे बोटीच्या माध्यमातून किंवा जहाजाच्या माध्यमातून प्रचंड मोठया प्रमाणात अंमल पदार्थाची ने-आण होत असल्याने अशा ठिकाणी पोलिस यंत्रणेमार्फत विशेष मोहिम वा उपाययोजना करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

---

## मा.मुख्यमंत्री यांचे निवेदन

अंमली पदार्थाची तस्करी करणाऱ्या व्यक्तींविरूद्ध एन.डी.पी.एस. कायदा १९८५ अन्वये कारवाई करण्यात येते. मुंबई शहरामध्ये अंमली पदार्थ विरोधी कक्ष, स्थानिक पोलीस ठाणे व गुन्हे प्रकटीकरण शाखेचे १ ते १२ युनिट यांच्यामार्फत अंमली पदार्थ जवळ बाळगणाऱ्या विरूद्ध कारवाई करण्यात येते. तसेच स्थानिक पोलीस ठाणे स्तरावर अंमली पदार्थाचे सेवन करणारे सेवनार्थी व्यक्तींविरुद्ध कारवाई करण्यात येते.

मुंबई शहरातील सागरी किना-यावरील ० ते १२ नॉटीकल माईल ही हद्द संबधीत पोलीस ठाणे, १२ ते २०० नॉटीकल माईल येलोगेट पोलीस ठाणे (भारताचा पश्चिम

किनारा), २०० नॉटीकल माईलच्या पुढे आंतरराष्ट्रीय हद्द-कोलकता पोलीस ठाणे (भारताचा पुर्व -किनारा) अशी हद्द कार्यक्षेत्र आहे. तसेच समुद्र किनारा मार्गावर इतर केंद्रीय एजन्सीस, कस्टम विभाग, नेव्ही, कोस्ट गार्ड, केंद्र सरकारचे NCB, काईम युनिट व पोलीस हे कारवाई करतात.

मुंबई शहरातील समुद्रकिनारा हद्दीवर सागरी पोलीस ठाणे मार्फत गस्त करुन अवैध कारवाईवर कारवाई केली जाते. तसेच बृहन्मुंबई पोलीस आयुक्तालयातील समुद्र किनाऱ्यावर पोलीस ठाणे व सागरी पोलीस ठाणे तसेच मुख्य आंतरराष्ट्रीय प्रवेश ठिकाणी केंद्रीय एजन्सीस काम करतात. त्यांचेकडून आगमन-निर्गमन प्रवाशांची तपासणी करण्यात येते.

पोलीस आयुक्तालय नवी मुंबई या घटकातील परिमंडळ १, वाशी मधील सीबीडी पोलीस ठाणेकडील प्राप्त माहिती अहवालानुसार दि. ३१ जानेवारी २०२५ रोजी मुंबई एनसीबीने नवी मुंबईत छापा टाकून सुमारे २०० कोटी रूपयाचे ड्रग्ज जप्त केले बाबत मुंबई एनसीबीने सीबीडी पोलीस ठाणेस लेखी अथवा तोंडी कळविले नसल्याने सीबीडी पोलीस ठाणे डायरीमध्ये /अभिलेखावर नोंद नाही. सदर छाप्याकरीता सीबीडी पोलीस ठाणेकडून पोलीस बंदोबस्त पुरविला नाही.

नवी मुंबई पोलीस आयुक्तालय क्षेत्रात भाजीपाल्याच्या ट्रकमध्ये, एपीएमसी मार्केटच्या परिसरामधल्या कुरीअर कंपन्यामध्येही ड्रग्स सापडलेले नाही. अंमली पदार्थांमधील दाखल गुन्ह्यांमध्ये सिंडीकेट परदेशातील एका गटाकडून चालविले जात असल्याचे निष्पन्न झालेले नाही. अंमली पदार्थ प्रकरणात सहभागी असलेले आरोपी एकमेकांना पुर्णपणे अनोळखी असल्याचेही तपासात समोर आले असून लोक अंमली पदार्थाची तस्करी करण्यासाठी संवाद साधण्याकरीता खोट्या नावाचा वापर करून झांगी ॲप, स्नॅपचॅट, व्हॉटॲप या ॲपचा वापर करत असतात. तसेच सदर अंमली - पदार्थ गुन्ह्यांमध्ये राजकीय आणि पोलीसांचा हस्तक्षेप बाबत निष्पन्न झालेली नाहीत.

नवी मुंबई पोलीसांनी दिनांक ०८ जानेवारी २०२५ रोजी महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री यांच्या हस्ते नशामुक्त अभियान कार्यक्रम राबवून शाळा महाविदयालयातील एकुण १२०० विद्यार्थ्यांची अंमली पदार्थाच्या अनुषंगाने जनजागृती करण्यात आली आहे. तसेच नागरिकामध्ये जनजागृती होण्याकरीता शहरामध्ये ठिकठिकाणी बॅनर, होल्डींग, डिजीटल बॅनर लावून नागरिकांमध्ये जनजागृती करण्यात आली तसेच शाळा, कॉलेज महाविदयालय, सोसायटी इत्यादी ठिकाणी जावून नागरिकांमध्ये अंमली पदार्थाबाबत जनजागृती करण्यात येते. तसेच नागरिकांच्या मदतीकरीता ८८२८११२११२ हेल्पलाईन नबंर सुरू करण्यात आला.

लक्षवेधी सुचना क्र.२३६६

## महाराष्ट्र विधानसभा
## सन २०२५ चे प्रथम अधिवेशन

सर्वश्री.कैलास घाडगे पाटील,अमित विलासराव देशमुख,नानाभाऊ पटोले,संजय मेश्राम वि.स.स यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सुचना क्र.२३६६ पुढीलप्रमाणे आहे:-

"धाराशिव जिल्हयातील तुळजापूर येथे मागील ३ वर्षापासून ड्रग्ज विक्री ची टोळी कर्यरत असणे, सोलापूर, मुंबई स्थानिक ड्रग्ज पेडलरच्या माध्यमातून "एम.डी. ड्रग्स" ची धाराशिव जिल्हयातील परांडा व तुळजापुर तालुक्यात मोठया प्रमाणात "एम.डी. ड्रग्स"ची वाहतुक व विक्री होत असणे, धाराशिव जिल्हयातील विशेषत: तरुण वर्ग या आमली पदार्थाच्या आहारी गेलेला असल्याने त्यांच्या आरोग्यावर घातक परीणाम होत असणे, तुळजापूर ड्रग्ज तपासात मुंबई व सोलापूर येथील ड्रग्ज पेडलर चे संबंध उघड होणे, परंतु हे दोन्ही कनेक्शन वेगवेगळी असल्याने स्वतंत्र गुन्हा नोंद करून याची निष्पक्ष चौकशी, तपास होणे गरजेचे असताना तपासात काही ठिकाणी पोलीस तपासात हस्तक्षेप होत असणे, ही बाब पोलीस निरीक्षक यांनी मान्य करणे, परिणामी गुन्ह्याचे स्वरूप मोठे असल्याने नार्कोटिक्स कंट्रोल ब्युरोकडे (एनसीबी) मार्फत तपास करण्याबाबत तातडीची कार्यवाही व प्रतिक्रिया."

---

## मा.मुख्यमंत्री यांचे निवेदन

धाराशिव जिल्ह्यातील तुळजापूर तालुक्यात मागील ३ वर्षापासून ड्रग्ज विक्रीच्या अनुषंगाने गुन्हे दाखल नाहीत. परंतु, सन २०२५ मध्ये दि.१५.०२.२०२५ रोजी, अंदाजे रु. २,२५,०००/-किंमतीचा ४५ ग्रॅम एम.डी. (मेफेड्रॉन) हा अंमली पदार्थ स्व:ताच्या फायद्याकरीता बेकायदेशीररित्या जवळ बाळगून वाहतूक करीत असताना आढळून आल्याने तुळजापूर तालुक्यातील तामलवाडी पोलीस स्टेशन येथे गु.र.क्र. २२/२०२५ एन.डी.पी.एस. कायदा कलम ८(क),२१(ब),२९ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. उपरोक्त गुन्ह्यातील मुख्य एम.डी. ड्रग्ज पुरवठादार हे मुंबईतील

असून २ आरोपींना अटक करण्यात आली आहे. तसेच सदर गुन्ह्यात आत्तापर्यंत १० आरोपींना अटक करण्यात आली असून गुन्ह्याचा पुढील तपास सुरू आहे.

धाराशिव जिल्ह्यातील परांडा तालुक्यात सन २०२४ मध्ये दि.१९.०१.२०२४ रोजी अंदाजे रु.१६,०००/- किंमतीचा ८.३३ ग्रॅम एम.डी. (मेफेड्रॉन) हा अंमली पदार्थ बेकायदेशीररित्या विक्री करण्याच्या हेतुने जवळ बाळगल्याने एका व्यक्तीवर पोलीस स्टेशन परांडा येथे गु.र.क्र.१०/२०२४ एन.डी.पी.एस. कायदा कलम ८(क),२२(ब) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तसेच सदर गुन्ह्यात २ आरोपींना अटक करण्यात आले आहे. सद्यस्थितीत आरोपी जामिनावर आहेत.

राज्यात अंमली पदार्थाची तस्करी करणाऱ्यांविरुध्द/जवळ बाळगणाऱ्यांविरुध्द/सेवनार्थीविरुध्द एनडीपीएस कायदा १९८५ अन्वये कारवाई करण्यात येते. राज्यात सन २०२४ मध्ये अंमली पदार्थ कायद्यांतर्गत सेवनार्थीच्या विरुद्ध १५८७३ गुन्हे दाखल असून १४२३० आरोपींना अटक करण्यात आलेली आहे तसेच अंमली पदार्थ ताब्यात बाळगणे/वाहतुक करणे संदर्भात एकूण २७३८ गुन्हे दाखल झालेले असून ३६२७ आरोपींना अटक करण्यात आलेली आहे व एकूण रू. ४२४०.९० कोटी किंमतीचे अंमली पदार्थ जप्त करण्यात आलेले आहेत.

**अंमली पदार्थ तस्करी तसेच विक्रीवर आळा घालण्यासाठी शासन खालील प्रमाणे उपययोजना करते.**

- राज्यात अंमली पदार्थ तस्करांविरुद्ध विशेष मोहीमा, ड्रग्ज मुक्त अभियान, शाळा व महाविद्यालयांमध्ये जनजागृती कार्यक्रम तसेच वाहन रॅली व पथनाट्ये आयोजनाद्वारे अंमली पदार्थ सेवन व विक्री न करण्याबाबत जनजागृती करण्यात येते.
- राज्यात अंमली पदार्थांच्या व्यापारास व प्रसारास आळा घालण्यासाठी सर्व पोलीस घटकामध्ये स्वतंत्र अंमली पदार्थ विरोधी कक्ष स्थापन केलेले आहेत.
- विशेष पोलीस महानिरिक्षक, दहशतवाद विरोधी पथक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना अंमली पदार्थांबाबतचे "समन्वय अधिकारी" म्हणून शासन निर्णय दि.०६.०१.२००७ अन्वये घोषित करण्यात आले आहे. तसेच केंद्र शासनाच्या दि.२५.०५.२०२२ च्या आदेशान्वये नार्कोकोऑर्डीनेशन यंत्रणेची पुनः रचना

करण्यात आली असुन त्यानुसार **दि. ३१.०८.२०२३** च्या शासन निर्णयाने अंमली पदार्थ विरोधी टास्क फोर्स (ANTF) **ची स्थापना करण्यात** आली आहे.

- अंमली पदार्थावर आळा घाल**ण्यासाठी राज्यस्तरीय** नार्कोकोऑर्डीनेशन समिती व जिल्हा स्तरावर जिल्हा**स्तरीय नार्कोकोऑर्डी**नेशन समितीची स्थापना करण्यात आली असून **सदर समित्यांकडून** अंमली पदार्थावर आळा घालण्याबाबत वेळोवेळी **आढावा घेतला जातो.**
- जागतिक अंमली पदार्थ **विरोधी दिना निमित्त दरवर्षी** २६ जून पासून १५ दिवस अंमली पदार्थ विरोधी **पंधरवडा अभियान राबविले** जाते. सदर कालावधीत अंमली पदार्थ विरोधी कक्ष, **स्थानिक पोलीस ठाणे** तसेच अशासकीय संस्था मार्फत त्यांच्या कार्यक्षेत्राती**ल शाळा, महाविद्यालय**, रेल्वे स्थानक, महत्वाचे चौकांमध्ये अंमली पदार्थ विरोधी **पोस्टर्स ,बॅनर्स तसेच** पथनाट्यद्वारे जनजागृती केली जाते.

*******

लक्षवेधी सूचना क्रमांक २३३५

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२५ चे प्रथम (अर्थसंकल्पीय) अधिवेशन

मा.श्री.सिध्दार्थ खरात, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्र. २३३५ पुढीलप्रमाणे आहे.

"राज्यातील सर्व सेवाविषयक बाबींचे नियमन सामान्य प्रशासन विभागाकडून करण्यात येणे, या विभागाच्या अखत्यारित असलेल्या मंत्रालयीन संवर्गाच्या विशेषता कक्ष अधिकारी, अवर सचिव, उपसचिव व सहसचिव संवर्गाच्या सेवाविषयक बाबी अंतर्गत सेवा जेष्ठता याद्यांमध्ये कामकाज हाताळणा-या अधिका-यांची जाणीवपूर्वक मोठ्या प्रमाणात अनियमितता/त्रुटी ठेवून पदाचा गैरवापर करणे, कक्ष अधिकारी संवर्गाची नियमानुसार जेष्ठता सूची प्रसिध्द करण्यासाठी सरळसेवा अधिका-यांना न्यायालयात जावे लागणे, सरळसेवा कक्ष अधिकारी यांनी महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई येथे मुळ अर्ज क्र.५१३/१९९७ मध्ये याचिका दाखल केलेली असणे, त्यानंतर महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई यांनी दिलेल्या आदेशाविरोधात मा.उच्च न्यायालयाने १९८६ पासून सरळसेवेच्या कोट्यावरील पदावर दिलेल्या पदोन्नत्या अभावित ठरविण्यात येऊन त्यानुसार जेष्ठता सूच्या बनविण्यात आदेश दिलेले असणे, सदर आदेशाविरुध्द पदोन्नत अधिका-यांची सन २०१८ मध्ये मा.सर्वोच्च न्यायालयात विशेष अनुमती याचिका दाखल केलेली असणे, परंतु सदर याचिका मा.सर्वोच्च न्यायालयाने फेटाळून लावणे, मा.सर्वोच्च न्यायालयाकडून याचिका फेटाळण्यात आल्यानंतरही मा.उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशाची अंमलबजावणी गेल्या सात वर्षापासून अद्यापपर्यंत पूर्ण झालेली नसणे, शासनाने उक्त प्रकरणी तातडीने चौकशी करुन मा. उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार सह सचिव ज्येष्ठता यादी अंतिम करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने केलेली कार्यवाही वा उपाययोजना"

<u>मा.मुख्यमंत्री यांनी करावयाचे निवेदन</u>

सरळसेवा कक्ष अधिकारी तसेच पदोन्नत कक्ष अधिकारी यांनी मंत्रालयीन कक्ष अधिकारी संवर्गाच्या सन १९८६ ते २००० या कालावधीतील दिनांक १ जानेवारी रोजीच्या सेवाज्येष्ठतेबाबत मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे विविध याचिका दाखल करण्यात आल्या होत्या. मा. उच्च न्यायालयाने यावर एकत्रितरित्या दि.०६.०८.२०१८ रोजी निर्णय दिला आहे. या निर्णयाविरोधात पदोन्नत कक्ष अधिकाऱ्यांनी मा.सर्वोच्च न्यायालयात विशेष अनुमती याचिका (SLP) क्र.२५१८१/२०१८ दाखल केली होती. तथापि, मा.उच्च न्यायालयाच्या दि.०६.०८.२०१८ रोजीच्या आदेशास अनुसरुन मंत्रालयीन कक्ष अधिकारी संवर्गाच्या दि.०१.०१.१९८६ ते दि.०१.०१.२०१७ या कालावधीच्या ज्येष्ठतासूच्या पुनर्विलोकित करण्यात आल्या आहेत. मा. उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार, कक्ष अधिकारी संवर्गाच्या ज्येष्ठतासूच्या सुधारित झाल्यामुळे परिणामस्वरूप अवर सचिव व उप सचिव संवर्गाच्या ज्येष्ठतासूच्यादेखील सुधारित करून अंतिम करण्यात आलेल्या आहेत. दि.३१.०८.२०१६ पूर्वी सह सचिव व उप सचिव हा एकच संवर्ग होता. दि.०४.०५.२०१६ रोजीच्या अधिसूचनेन्वये सह सचिव हा नवीन संवर्ग तयार करण्यात आला. त्यास अनुसरून सदर संवर्गाच्या, सन २०१६-१७ ते सन २०२२-२३ या कालावधीच्या निवडसूच्या तयार करण्यात येऊन दि.०१.०१.२०१७ ते दि.०१.०१.२०२३ या कालावधीतील वर्षनिहाय तात्पुरत्या ज्येष्ठतासूच्या प्रसिध्द करण्यात आल्या असून, त्या अंतिम करण्याची कार्यवाही शासन स्तरावर सुरू आहे.

******************

**श्री.सिध्दार्थ खरात, मा. विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम-१०५ अन्वये, "मंत्रालयीन विभागातील सरळसेवा कक्ष अधिकाऱ्यांनी मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे तसेच मा.सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार सन १९८६ पासून सरळसेवेच्या कोट्यावरील पदावर दिलेल्या पदोन्नत्या अभावित करून त्यानुसार ज्येष्ठतासूच्या तयार करणे तसेच सह सचिव संवर्गाच्या ज्येष्ठतायादी अंतिम करण्याबाबत" उपस्थित केलेल्या लक्षवेधी सूचनेच्या अनुषंगाने पूरक टिप्पणी.**

शासन निर्णय दि.०५.०२.१९८६ अन्वये मंत्रालयीन विभागातील कक्ष अधिकारी हा संवर्ग दि.०१.०१.१९८६ पासून तत्पूर्वीच्या सहायक सचिव, वर्ग-१ व अधिक्षक वर्ग-२ या दोन संवर्गाचे एकत्रीकरण करुन अस्तित्वात आला आहे. उपरोक्त दि.१७.०५.१९८९ च्या अधिसूचनेद्वारे कक्ष अधिकारी पदाचे सेवा प्रवेश नियम विहित करण्यात आले आहेत तसेच दि.११.०३.१९९१ व दि.०६.०४.१९९२ च्या अधिसूचनेद्वारे अनुक्रमे कक्ष अधिकाऱ्यांच्या पदावरील पदोन्नतीकरीता निवडयादी (तयार करणे, परिरक्षण करणे आणि पुनर्विलोकन करणे) नियम, १९९१ व कक्ष अधिकारी (ज्येष्ठतेचे विनियमन) नियम, १९९२ विहीत करण्यात आले आहेत. कक्ष अधिकारी पदाचे सेवाप्रवेश नियम, निवडयादी तयार करण्याचे नियम व ज्येष्ठतेचे विनियमन हे नियम दि.१ जानेवारी, १९८६ पासून अंमलात आले आहेत.

२. सरळसेवा कक्ष अधिकारी तसेच पदोन्नत कक्ष अधिकारी यांनी मंत्रालयीन कक्ष अधिकारी संवर्गाच्या १९८६ ते २००० या कालावधीतील दिनांक १ जानेवारी रोजीच्या सेवाज्येष्ठतेबाबत मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे रिट याचिका क. २९८६/२०००, २९८२/२०००, ४९५८/२००३ आणि ३३७४/२०११ दाखल केल्या होत्या. मा. उच्च न्यायालयाने खालील निर्णय देऊन दि.०६.०८.२०१८ रोजीच्या आदेशाव्दारे सदर याचिका एकत्रितरित्या निकाली काढल्या आहेत.

'In the light of the conclusion reached by us above, after coming into force of the rules with effect from 1/1/1986 the promotions of the departmental promotes in the vacancies meant for direct recruits has to be regards as fortuitous, W.P. No. 4958/2003 filed by promotes will have to be rejected. Consequently W.P. No. 4958/2003 is dismissed'.

३. मा.उच्च न्यायालयाने दि.०६.०८.२०१८ रोजी दिलेल्या आदेशाविरूध्द पदोन्नत अधिकाऱ्यांकडून मा. सर्वोच्च न्यायालयात विशेष अनुमती याचिका (SLP) क्र.२५१८१/२०१८ दाखल करण्यात आली.

४. या प्रकरणी दि.०१.१०.२०१८ रोजी झालेल्या सुनावणीत मा. सर्वोच्च न्यायालयाने, मा. उच्च न्यायालयाच्या दि.०६.०८.२०१८ च्या आदेशास स्थगिती दिली नाही. त्यामुळे कक्ष अधिकारी संवर्गाच्या दिनांक ०१.०१.१९८६ ते ०१.०१.२०१६ या कालावधीतील दि.१ जानेवारी रोजीच्या सुधारित तात्पुरत्या ज्येष्ठतासूच्या दि.२०.०५.२०२१ रोजी व अंतिम ज्येष्ठतासूच्या दि.०३.०२.२०२३ रोजी प्रसिध्द करण्यात आल्या आहेत.

५.	मा. उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार, कक्ष अधिकारी संवर्गाच्या ज्येष्ठतासूच्या सुधारित झाल्यामुळे परिणामस्वरूप पदोन्नती साखळीतील अवर सचिव व उप सचिव संवर्गाच्या ज्येष्ठतासूच्यादेखील सुधारित करून अंतिम करण्यात आलेल्या आहेत. दि.३१.०८.२०१६ पूर्वी सह सचिव व उप सचिव हा एकच संवर्ग होता. दि.०४.०५.२०१६ रोजीच्या अधिसूचनेन्वये सह सचिव हा नवीन संवर्ग तयार करण्यात आला. त्यास अनुसरून सदर संवर्गाच्या, सन २०१६-१७ ते सन २०२२-२३ या कालावधीच्या निवडसूच्या तयार करण्यात येऊन दि.०१.०१.२०१७ ते दि.०१.०१.२०२३ या कालावधीतील वर्षनिहाय तात्पुरत्या ज्येष्ठतासूच्या हरकती /सूचना मागविण्यासाठी दि.२७.०५.२०२४ रोजी प्रसिध्द करण्यात आल्या असून, त्या अंतिम करण्याची कार्यवाही शासन स्तरावर सुरू आहे.

६.	तसेच, मा.उच्च न्यायालयाच्या दि.०६.०८.२०१८ रोजीच्या निर्णयाविरूद्ध मा.सर्वोच्च न्यायालयामध्ये दाखल केलेल्या विशेष अनुमती याचिका क्र.२५१८१/२०१८ वर दि.२९.०१.२०२५ रोजी झालेल्या सुनावणीमध्ये, याचिका दाखल केलेले सर्व वादी सेवानिवृत्त झाले असल्याने, सदर याचिका निकाली काढण्यात आलेली आहे.

******************

## महाराष्ट्र विधानसभा

## सन २०२५ चे पहिले (अर्थसंकल्पीय) अधिवेशन

मा.श्री.नारायण कुचे, श्री.प्रकाश सोळंके, श्री.सुनिल प्रभु, सिध्दार्थ खरात, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम-१०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्र.१६९६ पुढीलप्रमाणे आहे :-

"महाराष्ट्र शासनाने जालना जिल्ह्यात खरपुडी येथे नवीन सिडको प्रकल्प राबवण्याचा निर्णय घेतला असणे, सदर प्रकल्पाची संकल्पना सन २०१८ मध्ये सिडकोने मांडली असणे, त्यानंतर प्रकल्पाची व्यवहार्यता तपासण्यासाठी Ernst & Young या आंतरराष्ट्रीय संस्थेची नियुक्ती करण्यात आली असल्याचे निदर्शनास आलेअसणे, उक्त संस्थेने दि. १० जानेवारी २०२० रोजी सादर केलेल्या अहवालात हा प्रकल्प आर्थिकदृष्ट्या व्यवहार्य नाही, असे स्पष्ट सांगितले असणे, त्यानंतर शासनाकडून या प्रकल्पाच्या पुनरावलोकनास सुरुवात झाली असणे, तद्नंतर सन २०२३ मध्ये KPMG या संस्थेच्या नव्या अहवालाच्या आधारे सन २०२४ मध्ये प्रकल्पास अंतिम मान्यता देण्यात आली असणे, सदरहू बाब लक्षात घेता एखादा प्रकल्प पूर्वी व्यवहार्य नसल्याचे स्पष्ट झाल्यानंतर काही वर्षांत तो अचानक व्यवहार्य कसा ठरतो? नवीन अहवाल आणि पूर्वीच्या अहवालातील तफावत काय आहे हे माहिती नसणे, त्यासाठी शासनाने पारदर्शकपणे स्पष्ट करणे गरजेचे असताना त्याकडे जाणीवपुर्वक दुर्लक्ष करण्यात आलेले असणे, सदरहू प्रकल्प सुरु होण्याच्या पुर्वीच काही व्यवसायकांचे संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांशी आर्थिक हितसंबंध असल्यामुळे सदरहू प्रकल्पाचा आराखडा त्यांना उपलब्ध करुन देण्यात येऊन गैरव्यवहार झाला असल्यामुळे जालना जिल्ह्यात खरपुडी येथे नवीन सिडको प्रकल्प राबविण्यात आलेल्या प्रकल्पाची चौकशी होऊन भूसंपादन प्रक्रियेला स्थगिती देण्यात यावी अशी मागणी जनतेतून करण्यात आली असने, परिणामी शासनाने तातडीने करावयाची कारवाई किंवा उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया".

---

## मा.उपमुख्यमंत्री (नगर विकास) यांचे निवेदन

मौजे नागेवाडी व दरेगांव येथे सिडकोचा नवीन प्रकल्प प्रस्तावित होता परंतु सदर प्रकल्प औद्योगिक वसाहतीच्या प्रदुषणाच्या कारणाने दि.११.०१.२०१७ रोजी रद्द झाल्यानंतर जालना परिघस्त क्षेत्रातील अन्य जागांची पाहणी करुन मौजे खरपुडी येथे प्रकल्प राबविण्यास सिडको संचालक मंडळाने ठराव क्र.११९९९ दि.२३.०२.२०१८ अन्वये तत्वत: मंजूरी दिली. तद्नंतर संचालक मंडळाचा ठराव क्र. १२०९२, दि.१२.१०.२०१८ अन्वये मौजे खरपुडी येथे ३०१.२३ हे.आर क्षेत्रासाठी सिडकोची नियुक्ती करण्यासंदर्भातील सिडकोच्या प्रस्तावाच्या अनुषंगाने राज्य शासनाने दि.१४.०२.२०१९ रोजी सिडको महामंडळाची महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम ४०(१बी) अन्वये "विशेष नियोजन प्राधिकरण" म्हणून नियुक्ती केली.

सदर प्रकल्पाच्या प्रकल्पक्षेत्रातील भूधारकांना २२.५% भूखंड वाटप अथवा टी.पी.एस. योजनेनुसार प्रकल्प विकसीत करण्यासाठी भूधारकांकडून संमती/विकल्प मागविण्यात आले होते. तथापि, बहुतांश भूधारकांनी २२.५% अथवा टी.पी.एस. योजनेचे विकल्प नाकारुन भूसंपादन अधिनियमानुसार मोबदला मिळावा अशी मागणी केली. तद्नंतर सिडको संचालक मंडळाच्या ठराव क्र.१२१५८, दि.१८.०२.२०१९ नुसार रुपये १८८७.४७/- कोटी एवढया प्रकल्प खर्चास मान्यता देण्यात आली तसेच सदर प्रकल्प क्षेत्रातील जमिनी

दि.१२.०५.२०१५ रोजीच्या शासन निर्णयानुसार जिल्हाधिकारी,जालना यांचे अध्यक्षतेखालील समितीद्वारे थेट खरेदीने घेण्यास तसेच थेट खरेदीस भूधारकांनी संमती न दिल्यास भूसंपादन अधिनियम, २०१३ नुसार जमीन संपादन करण्यास मान्यता देण्यात आली.

दरम्यान, तत्कालीन मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखालील दि.३१.०७.२०१९ रोजीच्या बैठकीत जालना खरपुडी प्रकल्पाची आर्थिक सुसहयता पडताळणी करण्याचे निर्देश देण्यात आले. त्यानुसार सिडको संचालक मंडळाचा ठराव क्र.१२२२७, दि.२०.०८.२०१९ नुसार "E & Y" या सल्लागार संस्थेची नियुक्ती करण्यात आली. सदर संस्थेने जालना खरपुडी प्रकल्पासाठी मार्केट डिमांड असेसमेंट आणि व्यवहार्यता मुल्यांकन अभ्यास करुन अहवाल सादर केला. सदरचा अहवाल सिडको संचालक मंडळाचा ठराव क्र.१२२८८, दि.१०.०१.२०२० अन्वये स्विकारण्यात आला. सदर अहवालानुसार प्रकल्प आर्थिकदृष्टया सुसहय नसल्याने सदर प्रकल्प निरधिसूचित (Denotify) करण्याचा प्रस्ताव शासनास सादर करण्याची शिफारस करण्यात आली. त्यानुषंगाने दि.०९.०७.२०२० रोजीच्या अधिसूचनेद्वारे शासनाने जालना खरपुडी प्रकल्प निरधिसूचित (De notify) केला.

तदनंतर, जालना खरपुडी येथील प्रकल्प पुन्हा सुरु करणेबाबत मा.श्री कैलास गोरंटयाल, वि.स.स., श्री.नारायण कुचे, वि.स.स. तसेच मा. संदिपान भुमरे, तत्कालीन मंत्री (रोहयो, यांनी तत्कालीन मुख्यमंत्री महोदयांकडे विनंती केली होती. तसेच तत्कालीन मुख्यमंत्री महोदयांकडे केंद्रीय राज्यमंत्री (रेल्वे), अतिरिक्त मुख्य सचिव (नवि-१), व्यवस्थापकीय संचालक,सिडको यांची संयुक्त बैठक दि.२९.०८.२०२२ रोजी झाली होती. सदर बैठकीतील सूचनानुसार जिल्हाधिकारी, जालना व जालना महानगरपालिका यांचे अभिप्राय प्राप्त करुन मुख्य प्रशासक (नवीन शहरे) यांचेमार्फत दि.१९.१२.२०२२ रोजी शासनास प्रस्ताव सादर करण्यात आला. त्यानुसार सदर प्रकल्प पुन्हा राबविण्याचा झाल्यास शासनाच्या मान्यतेअंती जालना खरपुडी येथील प्रकल्पाच्या सुसहयतेबाबत नव्याने त्रयस्थ यंत्रणेकडून अहवाल प्राप्त करुन संचालक मंडळाच्या मान्यतेने निर्णय घेण्यात येईल असे कळविण्यात आले. सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने शासनाने दि.०७.०२.२०२३ रोजी मौजे खरपुडी येथील क्षेत्र " जालना खरपुडी नवनगर" म्हणुन अधिसूचित करुन सदर अधिसूचित क्षेत्रासाठी महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम,१९६६ च्या कलम ११३ अन्वये सिडकोकडून प्रथमत: सदर क्षेत्रासाठीच्या "आर्थिक व्यवहार्यता अहवालाच्या" (Financial Feasibility Report) सापेक्ष सिडको महामंडळाची " जालना खरपुडी नवनगर विकास प्राधिकरण " म्हणुन नियुक्ती केली.

त्यानुषंगाने सिडको संचालक मंडळाच्या ठराव क्र.१२६६७, दि.०४.०३.२०२२ नुसार प्रकल्पाचा आर्थिक व्यवहार्यता अहवाल तयार करण्यासाठी दि.२७.०४.२०२३ रोजी मे. के.पी.एम.जी. या संस्थेची नियुक्ती करण्यात आली. सदर संस्थेने दिनांक २६.१२.२०२३ रोजी सदर प्रकल्पाचा आर्थिक व्यवहार्यता अहवाल सिडकोस सादर केला. सदरच्या अहवालास सिडको संचालक मंडळाने ठराव क्र.१२८४०, दि.१०.०१.२०२४ अन्वये मान्यता दिल्यानंतर दि.३१.०१.२०२४ रोजी अहवालातील शिफारशीनुसार प्रस्ताव शासनाच्या मान्यतेसाठी सादर करण्यात आला. संचालक मंडळाची मान्यता व उक्त संस्थेच्या शिफारशी विचारात घेऊन शासनाने दि.२३.०२.२०२४ रोजी सदर प्रकल्प २४७ हे. इतक्या मर्यादित क्षेत्रात राबविण्यास, प्रादेशिक विकास योजनेनुसार रहिवास प्रभागाअंतर्गत येणाऱ्या जमिनीचे संपादन करण्याकरिता १.३ इतका गुणांक आणि हरित प्रभागातील जमिनीच्या संपादनाकरिता लागु नियम/ नियमावली प्रमाणे गुणांक निश्चित करण्यास व प्रकल्प क्षेत्रातील जमिनीचे संपादन जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत थेट खरेदी पध्दतीने करण्यास मान्यता दिली.

सिडकोमार्फत थेट खरेदी प्रस्ताव दि.२०.०६.२०२४ रोजी जिल्हाधिकारी, जालना यांचेकडे सादर करण्यात आला. त्यानुसार भूधाकरकांकडून प्राप्त संमती/विकल्प नुसार सदर प्रकल्पातील २४७ हे.आर अधिसूचित क्षेत्रातील जमीनीपैकी १९२ भूधारकांनी २२६ हे. जमीनीकरीता संमती दिली आहे त्यातील प्रथम टप्प्यात ६१ खातेदारांचे एकूण १२०.७४५ हे.आर जमिनीच्या संयुक्त मोजणीची कार्यवाही पूर्ण झाली आहे. जिल्हाधिकारी, जालना यांच्या अध्यक्षतेखालील जिल्हास्तरीय समितीने दि.२४.०९.२०२४ प्रकल्पातील जमीनीचे गटनिहाय दर निश्चित केले आहेत. सदर प्रकल्पाच्या अधिसूचित क्षेत्राच्या थेट खरेदीने जमीन संपादनासाठी आणि अनुषंगिक खर्चाकरिता अंदाजित रु.९०६.४० कोटी खर्च येणार असून त्यास सिडको संचालक मंडळाने ठराव क्र.१३०१०, दि.०४.१२.२०२४ अन्वये मान्यता दिली आहे. यापैकी २६ भूधारकांसोबत अंदाजित ७३ हे. क्षेत्राचे खरेदीखत करण्यात आले असून रु.३०९.७९ कोटी खर्च करण्यात आला आहे. उर्वरित क्षेत्राच्या थेट खरेदीकरिता संयुक्त मोजणीची कार्यवाही, जिल्हाधिकारी स्तरिय समितीने दर ठरविणे, प्राप्त संमतीनुसार खरेदीखत करणे व इतर अनुषंगिक कार्यवाही सिडको स्तरावरुन करण्यात येत आहे.

***

## महाराष्ट्र विधानसभा
## सन २०२५ चे अर्थसंकल्पीय अधिवेशन

**लक्षवेधी सूचना क्र .२०८४**

**श्री. संजय पुराम, श्री. विनोद अग्रवाल, श्री. विजय रहांगडाले, श्री. राजकुमार बडोले, सर्व मा.वि.स.स**

""गोंदिया जिल्हा हा अतिदुर्गम, आदिवासीबहूल आणि नक्षलप्रभावति असून या जिल्हयात शेतकऱ्यांना सिंचनासाठी व जनावरांना पण्यिाच्या पाण्यासाठी मोठी ज्वलंत समस्या निर्माण झाली असणे, दरवर्षी पाटबंधारे विभागाकडून सर्वेक्षण करुन शेतकऱ्यांना सिंचनासाठी चक्राकार पध्दतीने पाणी सोडले जात असणे, परंतु मोजक्या शेतकऱ्यांनाच पाणी मिळत असणे, त्यामुळे दरवर्षी जिल्हा प्रशासनाला यासाठी मोठी कसरत करावी लागत असणे, गोंदिया जिल्ह्यातील आमगांव विधानसभा क्षेत्रातील अतिसंवेदनशील तालुक्यांमध्ये कुवाढास प्रकल्प, तावागड, काशिनाला, गेडाम, नकटया प्रकल्प असे २५ ते ५० एकरात असलेल्या सिंचन प्रकल्पाची कामे निधीअभावी प्रलंबित असणे, या प्रकल्पांची कामे प्रलंबित असल्यामुळे पाणी साठविण्यासाठी अडचण निर्माण होणे, या क्षेत्रातील पुजारीटोला, कालीसराड, शिरपूरबांध, कोठीटोला धरण, बेवारटोला प्रकल्पांची दुरुस्तीची कामे विस्कळीत होणे, सालेकसा तालुक्यातील १३ गावांची सिंचनक्षमता असलेल्या मानगड मध्यम प्रकल्पाला अंदाजे ५० वर्षापेक्षा जास्त कालावधी झाला असून या प्रकल्पाच्या दुरुस्तीसाठी २४.४८ कोटीचा प्रस्ताव शासनाकडे मंजूरीसाठी असणे, याच तालुक्यातील ५० हेक्टर सिंचनक्षमता असलेल्या पिपरीया लघू प्रकल्पास ४८ वर्षापेक्षा जास्त कालावधी झाला असून या प्रकल्पाची विशेष दुरुस्ती करणे आवश्यक असणे, या प्रकल्पांच्या कामांना तातडीने मंजूरी दिल्यास शेतकरी सुजलाम, सुफलाम होईल आणि दरवर्षी शेतकऱ्यांना पाणी देण्यासाठी जिल्हा प्रशासनाला कसरत करावी लागणार नाही, यासाठी शासनाने तातडीने करावयाची उपाययोजना व कार्यवाही.""

---

**श्री.गिरीष गीता दत्तात्रय महाजन**

**मा.मंत्री (जलसंपदा) (विदर्भ, तापी व कोकण खोरे विकास महामंडळ) यांचे निवेदन**

गोंदिया जिल्ह्यातील ७० सिंचन प्रकल्पांतर्गत एकुण निर्मित सिंचन क्षमता ९२,१२३ हे. असून मागील ५ वर्षातील सरासरी प्रत्यक्ष सिंचन ७६,१३७ हे. इतके आहे. आमगांव विधानसभा क्षेत्रातील अतिसंवेदनशील तालुक्यांमधील कुवाढास प्रकल्प, तावागड, काशिनाला, गेडाम, बाघ प्रकल्पांतर्गत पुजारीटोला, कालीसराड, शिरपूरबांध व सालेकसा तालुक्यात मानागड मध्यम प्रकल्प तसेच पिपरीया लघु प्रकल्प आहेत.

**कुवाढास प्रकल्प-**

कुवाढास नाला प्रकल्प प्रस्तावित असून प्रकल्पाची कामे निधी अभावी प्रलंबित नाही. कुवाढास नाला प्रकल्प, ता. सालेकसा, जि. गोंदिया हा नवाटोला गावाजवळ बाघ नदीची शाखा असलेल्या कुवाढास नाल्यावर प्रस्तावित आहे. या प्रकल्पामुळे १९ गावातील जवळपास ३,७५३ हे. क्षेत्रास सिंचनाचा लाभ मिळणार आहे. सदर प्रकल्पाच्या बुडीत क्षेत्रासाठी २३३.३५ हे. वन जमिनीची आवश्यकता भासणार आहे.

आर्थिक व तांत्रिक बाबींचा तुलनात्मक अभ्यास करुन द्वारांचा आकार, MWL, येणारा विसर्ग यांस मा. मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग, नागपूर यांनी मान्यता प्रदान केली आहे व माती धरण काटछेदाचे संकल्पन प्राप्त झाले आहे. मा. विभागीय कृषी सहसंचालक, नागपूर विभाग, नागपूर यांनी नवीन पिक पध्दतीस मान्यता देण्यात आली आहे. या नवीन पीक पध्दतीचा समावेश सुधारीत सविस्तर प्रकल्प अहवालात करण्यात येत आहे. शासनाच्या नवीन धोरणानुसार सदर प्रकल्पाचे सिंचन बंद नलिका वितरण प्रणालीद्वारे करण्याचे प्रस्तावित आहे. अद्यावत संकल्पन व रेखाचित्रे यांची सक्षम स्तरावर मान्यता घेऊन सुधारीत सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करणे सुरु आहे.

**काशीनाला –**

साठवण तलाव पांढरी काशीनाला, ता. सालेकसा, जि. गोंदिया प्रकल्पाचे काम अपूर्ण असून सदर योजनेचे सांडव्याकरिता शेतकऱ्यांचा विरोध असल्याने त्याऐवजी सेन्ट्रल ओगी वियर (VNIT, नागपूर द्वारा संकल्पित) प्रस्तावित करण्यात आलेले असून त्याआधारावर प्रकल्पाकरीता रू. ४८९.३४ लक्ष किंमतीची सुधारीत प्रशासकीय मान्यता घेण्याची कार्यवाही प्रगतीपथावर आहे.

**गेडाम तलाव-**

(गेडाम तलाव) पुराडा लघु सिंचन तलाव, ता. देवरी, जि. गोंदिया अंतर्गत येत असून सदर तलाव हा जिल्हा परिषद मालकीचा आहे. या लघु सिंचन तलावाचे बांधकाम सन १९७३ मध्ये करण्यात आले. सदर तलावाची सिंचन क्षमता १०० हे. असून साठवण क्षमता ३५० टी.सी.एम. आहे.

प्रकल्पाच्या दुरूस्तीचे काम जिल्हा नियोजन विकास समितीच्या वार्षिक योजनेमध्ये समाविष्ट करुन पूर्ण करण्याचे नियोजित आहे.

**बाघ प्रकल्पांतर्गत पुजारीटोला, कालीसराड, शिरपूरबांध-**

बाघ इटियाडोह पाटबंधारे विभाग, गोंदिया अंतर्गत गोंदिया जिल्ह्यातील बाघ आंतरराज्यीय (पुजारीटोला उन्नेयी बंधारा, कालीसराड प्रकल्प) प्रकल्प समुहातून महाराष्ट्र व मध्यप्रदेश राज्यातील शेतीला सिंचन करण्यात येते.

जलसंपदा विभाग, शासन निर्णय क्रमांक-प्रमाप्र/२०१८/(प्र.क्र.४०५/२०१८)/सिं.व्य.(कामे), दिनांक १३/९/२०१९ अन्वये विशेष दुरुस्ती अंतर्गत बाघ डावा मुख्य कालवा सा.क्र. ०.०० ते ६०.०० कि. मी. या कामास रु. १३३.०० कोटीस प्रशासकीय मान्यता प्राप्त असून रु. ९५.७० कोटीचे ५ कामे प्रगतिपथावर आहे. ज्यामध्ये निवडक अस्तरीकरण, बांधकाम दुरुस्ती इत्यादी कामे अंर्तभुत असून मातीकाम यांत्रिकी विभागामार्फत करण्यात येत आहे. सन २०२४-२०२५ मध्ये आत्तापर्यंत रु. १३.३५ कोटी खर्च झालेला आहे. सन २०२५-२०२६ मध्ये रु.२५.०० कोटी तरतुद उपलब्ध आहे.

बाघ इटियाडोह पाटबंधारे विभाग, गोंदिया अंतर्गत गोंदिया जिल्ह्यातील बाघ प्रकल्पात पुजारीटोला उन्नेयी बंधारा, कालीसराड व शिरपूर धरण मोडते. हा महाराष्ट्र व मध्यप्रदेशचा आंतरराज्यीय प्रकल्प आहे. जलसंपदा विभाग, शासन निर्णय क्रमांक-प्रमाप्र-२०२३/(प्र.क.१३७/२०२३)/सिं.व्य.(कामे), दिनांक २०/०९/२०२४ अन्वये धरण सुरक्षितता अंतर्गत रु.४.५६ कोटीचे प्रशासकीय मान्यता प्राप्त असून सुधारीत दरसुची प्रमाणे क्षेत्रीय स्तरावर अंदाजपत्रक तयार करण्याचे काम प्रगतिपथावर आहे.

**बेवारटोला प्रकल्प -**

बेवारटोला लघु प्रकल्पाची धरणाची घळभरणी सन २०१५ मध्ये झाली असून धरणाचे काम १०० टक्के पुर्ण झाले आहे. उजवा व डावा मुख्य कालव्याचे काम पुर्ण झाले असून ९९५ हे. सिंचन क्षमता निर्मित झाली आहे. डाव्या मुख्य कालव्यावरील कोपालगढ वितरीकाचे काम प्रगतीपथावर असून टोयागोंदि लघु कालवा व चांदसुरज लघु कालव्याची कामे निविदा प्रक्रियेत आहे. सदर प्रकल्प सन २०२६ च्या जून पर्यंत पुर्ण करण्याचे नियोजित आहे.

**मानागड मध्यम प्रकल्प -**

मानागड प्रकल्पाचे बांधकाम पूर्ण होऊन ५० वर्षापेक्षा जास्त कालावधी लोटलेला असल्यामुळे व वितरण प्रणालीतील जुनी बांधकामे दगडाची (U.C.R. Mesonary) असल्यामुळे कालव्याची वहन क्षमता कमी झाल्यामुळे व वितरण प्रणालीतील दगडी जीर्ण बांधकामामधून मोठ्या प्रमाणात पाण्याची गळती होत असल्यामुळे प्रकल्पाच्या सिंचनाचे पाणी पुच्छ भागात पोहचत नाही. या करिता मानगड मध्यम प्रकल्पाचे विशेष दुरुस्तीचे प्रस्तावास मान्यता देण्याची कार्यवाही प्रगतीपथावर आहे.

**पिपरिया लघु प्रकल्प -**

पिपरिया लघु प्रकल्प सालेकसा तालुक्यातील टेंभूटोला गावाजवळ सन १९७६ मध्ये बांधण्यात आलेला असून सदर प्रकल्पाचे लाभक्षेत्र ४२५ हेक्टर आहे. सदर प्रकल्प पूर्ण होऊन जवळपास ५० वर्ष कालावधी पूर्ण होत आहे.

क्षतिग्रस्त मातीकाम, कालव्यातील गाळ व क्षतिग्रस्त बांधकामामुळे कालव्याच्या पुच्छ भागातील जवळपास ५० हेक्टर क्षेत्रास सिंचन करण्यात मोठ्या प्रमाणात अडचण येत असल्यामुळे प्रकल्पाची विशेष दुरुस्ती होणे आवश्यक आहे. याकरिता अंदाजे रु. २.५० ते रु. ३.०० कोटी खर्च अपेक्षित आहे व याबाबतचे विशेष दुरुस्तीचे अंदाजपत्रक तयार करण्याची कार्यवाही क्षेत्रिय स्तरावर प्रगतिपथावर आहे.

**********

लक्षवेधी सूचना क्र-२२८६

महाराष्ट्र विधानसभा
सन २०२५ चे प्रथम (अर्थसंकल्प) अधिवेशन

मा.श्री. अभिमन्यु पवार, विधानसभा सदस्य महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये खालीलप्रमाणे लक्षवेधी सूचना उपस्थित केलेली आहे-

"महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० अन्वये नोंदणीकृत संघीय सहकारी संस्थाच्या संचालक मंडळ निवडणूकीसाठी सदरील संघीय संस्थेच्या सभासद संस्थांना मतदानाचा अधिकार असणे, उक्त अधिनियमातील कलम २७ (३) मध्ये ज्या संस्थेने आपल्या निधीचा कोणताही भाग, संघीय संस्थेच्या भागामध्ये (शेअर्समध्ये) गुंतविला असेल त्यासंस्थेस, त्या संघीय संस्थेच्या कामकाजामध्ये आपल्यावतीने मत देण्यासाठी आपल्या सदस्यापैकी कोणत्याही एका सदस्याची नेमणूक करता येईल अशी तरतूद असणे, बाजार समित्यांच्या निवडणूकीमध्ये बाजार समितीच्या कार्यक्षेत्रातील कृषि पतसंस्थेच्या सर्व संचालकांना व ग्रामपंचायत सदस्यांना मतदानाचा अधिकार असणे, सहकारातील इतर संघीय संस्थेच्या निवडणूकीसाठी सभासद संस्थांच्या संचालक मंडळात प्रतिनिधीचा ठरावासाठी संचालक मंडळात मतभेत निर्माण होत असणे, मोठ्या प्रमाणात भांडण तंटे व आर्थिक उलाढाल ठरावासाठी होत असल्याचे दिसून येणे, राखीव प्रवर्गातील व महिला प्रवर्गातील प्रतिनिधी ठराव दिले जात नसणे, सर्व घटकातील प्रतिनिधिना मतदानाची संधी मिळावी यासाठी महाराष्ट्र कृषि उत्पन्न बाजार समिती निवडणूक नियम २०१७ मधील तरतुदी प्रमाणे संघीय सहकारी संस्थाच्या संचालक मंडळ निवडणूकीसाठी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम २७ (३) व महाराष्ट्र सहकारी संस्था निवडणूक नियम २०१४ चे नियम १० (२) मध्ये सुधारणा करुन सभासद संस्थांच्या सर्व संचालकांना मतदानाचा अधिकार देणेबाबतची तरतुद करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

---

मा. मंत्री (सहकार) यांचे निवेदन

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० च्या कलम २७ मध्ये सदस्यांच्या मतदानाच्या अधिकाराची तरतुद आहे. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० च्या कलम २७ (१) मध्ये "पोटकलमे (२) ते (७) दोन्ही धरुन, यात अन्यथा तरतूद केलेली असेल त्या व्यतिरिक्त कोणत्याही संस्थेच्या सदस्यास, तिच्या कामकाजात एका पेक्षा अधिक मत असणार नाही आणि तिने मत देण्याच्या प्रत्येक अधिकाराचा व्यक्तिशः वापर केला पाहिजे आणि त्याचा बदली व्यक्तीद्वारे वापर करता येणार नाही " अशी तरतूद आहे.

तसेच संघीय संस्थेच्या बाबत महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० च्या कलम २७ (३) मध्ये "ज्या संस्थेने आपल्या निधीचा कोणताही भाग, संघीय संस्थेच्या भागांमध्ये (शेअर्समध्ये) गुंतविला असल्यास त्या संस्थेस, त्या संघीय संस्थेच्या कामकाजामध्ये आपल्या वतीने मत देण्यासाठी आपल्या सदस्यांपैकी कोणत्याही एका सदस्याची नेमणूक करता येईल व त्याप्रमाणे अशा सदस्यास आपल्या संस्थेच्या वतीने मत देण्याचा अधिकार राहील. परंतु, संघीय संस्थेच्या कोणत्याही नवीन सदस्य संस्थेने आपल्या निधीचा कोणताही भाग अशा संघीय संस्थेच्या भागांमध्ये

शेटा H/1430 (800-3-25)

(शेअर्समध्ये) गुंतविल्याच्या दिनांकापासून तीन वर्षांचा कालावधी पूर्ण झाल्यानंतर ती त्या संघीय संस्थेच्या कामकाजामध्ये मत देण्यास पात्र असेल " अशी तरतूद आहे.

त्यानुसार, महाराष्ट्र सहकारी संस्था (समितीची निवडणूक) नियम २०१४ चे नियम ९ मध्ये संस्था अथवा संस्था व व्यक्ती सभासद असलेल्या सहकारी संस्थांची तात्पुरती मतदार यादी करणेबाबत तरतूद करण्यात आली आहे. तसेच, महाराष्ट्र सहकारी संस्था (समितीची निवडणूक) नियम २०१४ चे नियम १० मध्ये संस्था किंवा संस्था आणि व्यक्ती सभासद असलेल्या सहकारी संस्थांच्या तात्पुरत्या मतदार यादीत समाविष्ट करावयाचा तपशील स्पष्ट करण्यात आला आहे.

महाराष्ट्र कृषि उत्पन्न खरेदी- विक्री (विकास व विनियमन) अधिनियम, १९६३ च्या कलम १३ मध्ये बाजार समित्यांच्या रचनेबाबत तरतूद करण्यात आलेली आहे. यामधील पोटकलम (१) नुसार " पोटकलम (२) च्या उपबंधाच्या अधीन प्रत्येक बाजार समितीस पुढील सदस्य असतील;-

अ) बाजार क्षेत्रात राहणारे जे राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाने, आवश्यकता भासल्यास, जिल्हाधिकाऱ्याच्या किंवा, यथास्थितीत जिल्हा उपनिबंधकाच्या मदतीने याबाबतीत, वेळोवेळी विर्निदिष्ट केलेल्या दिनांकास एकवीस वर्षाहून कमी वयाचे नसतील असे खालील विर्निदिष्ट केल्याप्रमाणे पंधरा शेतकरी,

१. बाजार क्षेत्रात कार्य करणाऱ्या कृषि पतसंस्था व बहुउद्देशिय सहकारी संस्था (महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० आणि त्याखाली केलेले नियम यांच्या अर्थातंर्गत असलेल्या) ज्या त्यांच्या सदस्यांना पीककर्ज संवितरीत करतात त्यांच्या व्यवस्थापन समितीच्या सदस्यांकडून अकरा सदस्य.

२. बाजार क्षेत्रात कार्य करणाऱ्या ग्रामपंचायतीच्या सदस्यांकडून चार सदस्य निवडून देण्यात येतील.

त्यानुसार, महाराष्ट्र कृषि उत्पन्न बाजार समित्या (समितीची निवडणूक) नियम २०१७ चे नियम ६ मध्ये कृषि उत्पन्न बाजार समित्यांच्या निवडणूकीसाठी मतदार यादी तयार करणेबाबत कार्यपध्दती स्पष्ट करण्यात आलेली आहे. यातील पोटनियम (१) नुसार कृषि पतसंस्थांच्या आणि बहुउद्देशिय सहकारी संस्थांच्या सदस्यांची सूची जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था यांच्याकडून तयार व सादर करण्यात येते. तसेच, बाजार समितीची मुदत संपण्याच्या १८० दिवसापूर्वी किंवा विर्निदिष्ट करण्यात येईल अशा मुदतीत बाजार क्षेत्रात असणाऱ्या अनुसूचित जातीचे, अनुसूचित जमातीचे सदस्य स्पष्टपणे दर्शविणाऱ्या ग्रामपंचायतीच्या सदस्यांची सूची, गटविकास अधिकारी यांच्याकडून तयार व सादर करण्यात येते.

उपरोक्त नमूद तरतुदींनुसार, राज्यातील सहकारी संस्थांच्या निवडणूका महाराष्ट्र सहकारी संस्था (समितीची निवडणूक) नियम २०१४ नुसार व कृषि उत्पन्न बाजार समित्यांच्या निवडणूका महाराष्ट्र कृषि उत्पन्न बाजार समित्या (समितीची निवडणूक) नियम २०१७ नुसार राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे मार्फत पार पाडल्या जातात.

सहकारातील इतर संघीय संस्थेच्या निवडणुकीसाठी सभासद संस्थांच्या संचालक मंडळात प्रतिनिधीचा ठरावासाठी संचालक मंडळात मतभेद निर्माण होत असणे, मोठ्या प्रमाणात भांडण तंटे व आर्थिक उलाढाल ठरावासाठी होत असल्याचे दिसून येणे, राखीव प्रवर्गातील व महिला

प्रवर्गातील प्रतिनिधी ठराव दिले जात नसणे या बाबी लेखी स्वरुपात प्राधिकरणाच्या निदर्शनास आलेल्या नाहीत.

बाजार समित्यांची व सहकारी संस्थांची स्थापना दोन भिन्न अधिनियमांद्वारे करण्यात येत असून, संबंधित कायदे व नियमांनुसार त्यांचे नियंत्रण केले जाते.

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० च्या कलम २(९) मध्ये "सभासद" ही व्याख्या नमूद करण्यात आली असून प्रकरण ३ मध्ये सभासदांचे अधिकार व जबाबदाऱ्यांची तरतूद करण्यात आली आहे. सहकारी संस्थेच्या प्रत्येक सभासदाने उपविधीतील तरतुदीनुसार भाग धारण करण्याची तरतूद आहे.

कलम २७ मधील तरतूदीनुसार कोणत्याही सभासदास संस्थेच्या कामकाजात एकापेक्षा जास्त मत देण्याचा अधिकार नाही. राज्यात सध्या कार्यरत असलेल्या संघीय संस्था तसेच शिखर संस्थांच्या सभासद असलेल्या संस्थांच्या वतीने मतदानाचा हक्क बजावण्यासाठी अशा संस्थेच्या संचालक मंडळाच्या ठरावाव्दारे संस्थेच्या सभासदांपैकी केवळ एक प्रतिनिधी पाठविला जातो. संघीय संस्थेच्या सभासद असलेल्या सहकारी संस्थांच्या संचालकांची संख्या विभिन्न आहे (११ ते २१). अशा परिस्थितीत सभासद संस्थेच्या वतीने बाजार समित्यांप्रमाणे संस्थेच्या सर्व संचालकांना मतदानाचा अधिकार द्यावयाचा झाल्यास सहकार कायद्यातील कलम २७ मधील तरतुदीचे (एका सभासदास एक मत) अनुपालन होणार नाही. ही बाब विचारात घेता मा. सदस्यांनी सुचविल्याप्रमाणे सहकार कायद्याच्या कलम २७(३) तसेच महाराष्ट्र सहकारी संस्था (समितीची निवडणूक) नियम २०१४ मधील नियम १०(२) मध्ये सुधारणा करुन सभासद संस्थेच्या सर्व संचालकांना मतदानाचा अधिकार देणे सुसंगत होणार नाही.

******

## महाराष्ट्र विधानसभा, सन २०२५ चे प्रथम (अर्थसंकल्पीय) अधिवेशन

### लक्षवेधी सूचना क्र.२३०२

**मा. श्री. शिवाजी पाटील, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्र. २३०२ खालीलप्रमाणे आहे.**

"कोल्हापूर जिल्ह्यातील चंदगड मतदारसंघ हा कर्नाटक व गोवा राज्याच्यासीमेस लागून आहे.हा मतदारसंघ महाराष्ट्राचे कर्नाटक राज्याकडे जातानाचे शेवटचे टोक आहे.आजपर्यंत हा मतदारसंघ विकासापासून वंचित असणे,येथेसामाजिक,शैक्षणिक,आरोग्य,रस्ते,वीज,पाणी आणि शेती तसेच इतर अनेक समस्या आहेत.१)स्वातंत्र्य काळापासून आजही येथील धनगरवाडे सर्व पायाभूत सुविधांपासून वंचित असून नारस्त्यांची सोय,ना वाहतूकसुविधा, नाआरोग्याची सुविधा,नाशिक्षणाची सोय अशा परिस्थितीत येथे लोक राहत असून येथे सुविधा होणे आवश्यक असणे.२)सदरमतदारसंघास लागूनचकर्नाटक राज्याचा सीमाभाग असून कर्नाटक सरकारने बेळगाव हा भाग कर्नाटक राज्याची उपराजधानी बनवून विकसित करून येथील मेडिकल हब हे संपूर्ण देशात व परदेशात नावाजलेले असल्याने त्याठिकाणी सर्व पायाभूत सोयीसुविधांसह शैक्षणिक,आरोग्य,रस्ते,उद्योग व इतर सर्व सोयीसुविधा निर्माण करून बेळगावचा भाग विकसित करणे,त्याचधर्तीवर महाराष्ट्रशासनाने हा मतदारसंघ शैक्षणिक,सामाजिक,आरोग्य,रस्ते,वीज व उद्योग इत्यादीबाबतीत विकसित करण्याची आवशक्यता, मेडिकल हब देखील चंदगड मतदारसंघात करावे. जेणेकरून नागरिकांना इथेच सर्वसोयीसुविधा उपलब्ध होतील.येथेच शिक्षणाची व रोजगाराची संधी उपलब्ध होण्याची शक्यता नाकारता येत नसणे.३)चंदगड मतदारसंघामध्ये शासनाने शासकीय उच्चशिक्षण संस्था, शासकीय मेडिकल कॉलेज,शासकीय मोठे हॉस्पिटल,स्पोर्ट्स ॲकाडमी व इतर शासकीय संस्था याभागात स्थापन करून येथील युवक वर्गास शिक्षणासाठी चालना देण्याची आवशक्यता,कर्नाटक व गोवा राज्याच्या धर्तीवर चंदगड मतदार संघात शैक्षणिक,सामाजिक,आरोग्य,रस्ते,वीज व उद्योग इत्यादी सर्व सोयीसुविधा विकसित करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

#### मा. मंत्री ( ग्राम विकास ) यांचे निवेदन

जिल्हा परिषद, कोल्हापूर अंतर्गत चंदगड तालुक्यामध्ये एकूण १६ धनगरवाडे असून त्यापैकी २ धनगरवाडयांना जोडणारे रस्ते, रस्ते विकास योजना २००१-२०२१ मध्ये समाविष्ठ आहेत. उर्वरित धनगरवाडे हे आठमाही कच्च्या रस्त्यांनी जोडलेले आहेत. तसेच, सदर रस्त्यांच्या लांबीमध्ये वनविभागाची हद्द येत असल्याने वनविभागाकडून जमिन हस्तांतर केल्यानंतर सदर रस्ते रस्ते विकास योजना मध्ये समाविष्ठ करणे शक्य आहे. सद्यस्थितीत ग्रामीण मार्ग क्रमांक १०५ बुजवडे ते धनगरवाडा या रस्त्यावर जिल्हा वार्षिक योजनेंतर्गत तसेच, ग्रामीण मार्ग क्रमांक २८१ वरती सार्वजनिक बांधकाम विभागाअंतर्गत ५०५४ मार्ग व पुल या लेखाशिर्षातून काम मंजूर असून काम प्रगतीत आहे.

तसेच, तालुक्यातील सर्व धनगर वाड्यांचे विद्युतीकरण करण्यात आले आहे.

चंदगड मतदारसंघात प्रधानमंत्री ग्राम सडक योजनेंतर्गत टप्पा-३ मध्ये रु.४०.६६ कोटी रक्कमेची ११ कामे मंजूर असून मुख्यमंत्री ग्राम सडक योजनेंतर्गत टप्पा-१ व २ मध्ये एकूण रु.१४५.६६ कोटी रक्कमेची ३४ कामे मंजूर आहेत. चंदगड तालुक्यात मागील ३ वर्षात जिल्हा स्तरीय जिल्हा वार्षिक योजना ३०५४ व ५०५४ मधून तसेच, राज्यस्तरीय मा.लोकप्रतिनिधींनी गावांतर्गत सुचविलेली कामे (२५१५ १२३८) व रस्ते व पुल दुरुस्ती परिरक्षण कार्यक्रम (३०५४-२४१९) या योजनांमधून निधी मंजूर झालेला आहे.

चंदगड तालुक्यात जिल्हा परिषद मालकीच्या रस्त्याची लांबी ५४५.५२५ कि.मी. आहे. त्यातील इतर जिल्हा मार्ग व ग्रामीण मार्गाची ४३७.८०९ कि.मी. लांबी सुस्थितीत असून १०७.७१६ कि.मी. अपृष्ठांकीत/ मुरमी रस्ते आहे.

या धनगरवाडयांवरील शाळांमध्ये तसेच तालुक्यामधील सर्व शाळांमध्ये विदयार्थ्यांच्या सुरक्षिततेसाठी १००% सी.सी.टी.व्ही. बसविण्यात आले असुन सदर शाळेमध्ये शिक्षण घेत असलेल्या विदयार्थ्यांना मोफत गणवेश, पुस्तके, शालेय पोषण आहार इ. सोई सुविधा पुरविण्यात येत आहे. तसेच शालेय शिक्षण विभागाकडील सर्व योजनांचे लाभ विदयार्थ्यांना दिले आहेत.

कोल्हापूर जिल्हा परिषद अंतर्गत चंदगड तालुक्यामध्ये १९९ जि.प.शाळा प्राथमिक शाळा असुन ६१ अनुदानित माध्यमिक व २४ विना अनुदानित शाळा आहेत. तसेच चंदगड तालुक्यामध्ये एकुण जिल्हा परिषद संचलीत एकूण ४१४ शाळा इमारतींमध्ये ८४३ वर्ग खोल्या उपलब्ध आहेत. तसेच चंदगड तालुक्यामधील दोन शाळा प्रधानमंत्री श्री शाळा आहेत. तसेच विदया मंदिर जंगमहटटी या शाळेची डॉ. बाबासाहेब आंबेडकर आदर्श शाळा या योजनेअंतर्गत निवड झाली आहे. तसेच शिक्षण विभागांस जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत सन २०२४-२०२५ शाळा दुरूस्तीकरीता रु.९५.०० लक्ष व नवीन वर्ग खोल्याचे बांधकाम करणेकरीता रु. ८०.०० लक्ष निधी मंजूर करण्यात आलेला आहे.

जलजीवन मिशन अंतर्गत चंदगड विधानसभा मतदारसंघात एकूण २९१ कामे मंजूर असून २४१ कामे प्रगतीपथावर व ५० कामे पूर्ण आहेत.

सद्यस्थितीत कोल्हापूर जिल्ह्यामध्ये एक शासकीय वैद्यकीय महाविद्यालय कार्यरत आहे. तसेच नविन शासकीय बीएस्सी (नर्सिंग), होमिओपॅथी, आयुर्वेद आणि योग व निसर्गोपचार पदवी महाविद्यालये सुरू करण्यास सन २०२४ मध्ये मान्यता देण्यात आली आहे.

राजर्षी छत्रपती शाहू महाराज शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या शेंडापार्क येथील आवारात ११०० खाटांचे रुग्णालय प्रस्तावित करण्यात आले असून यामध्ये ६०० खाटांचे सामान्य रुग्णालय, २५० खाटांचे अतिविशेषोपचार रुग्णालय व २५० खाटांचे कर्करोग रुग्णालय प्रस्तावित करण्यात आले असून सद्यस्थितीमध्ये याचे बांधकाम सुरु आहे.

जिल्हा शल्यचिकित्सक कोल्हापूर यांचे अधिनस्त चंदगड येथे ३० खाटांचे ग्रामीण रुग्णालय कार्यरत आहे. तसेच सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत पाटणे फाटा (हलकर्णी एम आय डी सी) येथे २० खाटांचे ट्रामा केअर युनिट व ५० खाटांचे उपजिल्हा रुग्णालय मंजूर करण्यात आलेले आहे. सदर रुग्णालयांना शासन स्तरावरुन प्रशासकीय मंजूरी मिळाली असून पुढील कार्यवाही सुरु आहे.

तसेच, चंदगड तालुक्यात क्रीडा संकुलासाठी रु.११८.८२ लक्ष रक्कमेच्या कामास मंजूरी दिली असून सदर काम प्रगतीत आहे.

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून चंदगड तालुक्यात हलकर्णी औद्योगिक क्षेत्राची स्थापना केली आहे. त्यामध्ये लहान मोठे असे एकूण २८३ औद्योगिक भूखंड आरेखित केलेले असून त्याचे क्षेत्र १०८.८१ हेक्टर इतके आहे. एकूण आरेखित भूखंडापैकी २०६ औद्योगिक भूखंडाचे वाटप केलेले असून वाटपाचे क्षेत्र ७१.३२ हेक्टर इतके आहे.

उच्च शिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखाली कोल्हापूर जिल्ह्यात एकूण ५ शासकीय महाविद्यालये,संस्था,वस्तीगृहे कार्यरत आहेत.

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांच्या कार्यकक्षेत एकूण २३७ अशासकीय अनुदानित/कायम विनाअनुदानित महाविद्यालये कार्यरत असून त्यापैकी ३ अशासकीय अनुदानित व २ अशासकीय कायम विनाअनुदानित महाविद्यालये चंदगड तालुक्यात सुरु आहे.

उपरोक्त वस्तुस्थिती पाहता चंदगड मतदारसंघात आवश्यक सोयी-सुविधा उपलब्ध करुन दिल्या आहेत, हे स्पष्ट होते.

---

महाराष्ट्र विधानसभा **लक्षवेधी सूचना क्रमांक-२२४४**

**सन २०२५ चे प्रथम (अर्थसंकल्पीय) अधिवेशन**

श्री.रईस शेख, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र.२२४४ पुढीलप्रमाणे आहे:-

" राज्यात शासनाकडून सन १९९४ मध्ये विशेष मागास प्रवर्गासाठी २% स्वतंत्र आरक्षण व १२ विविध सवलती जाहीर करण्यात आलेल्या असणे, विशेष मागास प्रवर्गासाठी २% स्वतंत्र आरक्षण देण्याबाबत मा.उच्च न्यायालयाची कोणतीही हरकत नसणे, मात्र ३० वर्षांनंतरही त्याची अंमलबजावणी योग्य पध्दतीने न झाल्याने समाजाची शैक्षणिक, आर्थिक व सामाजिक प्रगती थांबली असणे, तसेच विणकरांच्या अनेक प्रलंबित मागण्या असल्याचे निदर्शनास आलेल्या असणे, याबाबत अनेक आंदोलने करण्यात येऊनही कोणताही ठोस निर्णय न होणे, यामुळे समाजील अनेक घटकातील नागरीकांमध्ये शासनाबदल प्रचंड नाराजीची व चिडीची भावना निर्माण झालेली असणे, उक्त समाजाच्या वैद्यकीय, अभियांत्रिकी व उच्च शिक्षणात २% स्वतंत्र आरक्षण लागू करणे, राज्यात १० आश्रमशाळा सुरू करणे, २% राजकीय आरक्षण लागू करणे, जात पडताळणी प्रमाणपत्र तात्काळ मिळणे, राज्य योजनांसाठी एस.बी.सी.व केंद्र योजनांसाठी ओ.बी.सी.प्रमाणपत्र देणे, स्वतंत्र आर्थिक महामंडळ स्थापन करणे, राज्यात एस.बी.सी.विद्यार्थ्यांसाठी स्वतंत्र वसतीगृह सुरू करणे, शासकीय व निमशासकीय सेवेत पदोन्नती देणे, विणकर आर्थिक महामंडळावर विणकरांची नियुक्ती करून काम तत्काळ सुरू करण्याबाबतच्या प्रलंबित मागण्यापूर्ण करण्याबाबत विशेष मागास प्रवर्ग (एस.बी.सी.)अन्याय निवारण कृती समिती, महाराष्ट्र राष्ट्रीय विणकर सेवा संघ, महाराष्ट्र यांच्या वतीने पुणे येथील संचालक बहुजन कल्याण विभागाच्या कार्यालयासमोर साखळी उपोषण व धरणे आंदोलन करण्यात येणार असल्याने त्यांच्या प्रमुख मागण्या मान्य करुन समाजातील सर्व घटकातील लोकांना न्याय मिळवून देण्याबाबत मा.मुख्यमंत्री यांना भिवंडी (पूर्व) चे लोकप्रतिनिधीं यांनी दिनांक १० मार्च, २०२५ रोजी निवदेना द्वारे मागणी केलेली असणे, याबाबत शासनाकडून उक्त मागण्या त्वरीतमान्य करण्याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपयायोजना. "

---

**मा.मंत्री (इतर मागास बहुजन कल्याण) यांचे निवेदन**

विशेष मागास प्रवर्गास सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक ८ डिसेंबर १९९४ रोजीच्या शासन निर्णयान्वये, शासकीय सेवेतील नियुक्ती, पदोन्नती आणि शैक्षणिक संस्थेमधील प्रवेशामध्ये ०२ टक्के आरक्षण विहीत करण्यात आले आहे. विशेष मागास प्रवर्गासाठी विहीत करण्यात आलेल्या ०२ टक्के आरक्षणाविरोधात मा.उच्च न्यायालयात जनहित याचिका (PIL१९१२४/२०२१) दाखल केली आहे. सदर प्रकरण अद्याप न्यायप्रविष्ठ असून, मा.उच्च न्यायालयाने कोणतेही निर्देश दिले नाहीत.

सद्य:स्थितीत शासकीय सेवेतील सरळसेवा भरतीमध्ये विशेष मागास प्रवर्गास ०२ टक्के आरक्षण देण्यात येत आहे.

मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी दिनांक ०४.०८.२०१७ रोजीच्या न्यायनिर्देशान्वये, पदोन्नतीतील आरक्षण रद्द केले आहे. मा.उच्च न्यायालय, मुंबई यांच्या सदर न्यायनिर्देशाविरोधात राज्य शासनाने मा.सर्वोच्च न्यायालयात विशेष अनुमती याचिका क्रमांक-२८३०६/२०१७ दाखल केली असून, सद्य:स्थितीत सदर प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे. त्यामुळे सेवाजेष्ठतेनुसार पदोन्नती देण्यात येत आहे.

मोटा H/00 75 (800-5-25)

शैक्षणिक संस्थेमध्ये विशेष मागास प्रवर्गाच्या ०२ टक्के आरक्षण विरोधात मा.उच्च न्यायालयात रिट याचिका क्र.१३१८/१९९५ दाखल केली आहे. सदर याचिकेवर मा.उच्च न्यायालयाने दिनांक १९.०७.१९९५ रोजी अंतरिम आदेश दिले आहेत. सदर आदेशाच्या अनुषंगाने सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या दिनांक २४.१०.१९९५ च्या शासन परिपत्रकानुसार वैद्यकिय शिक्षण आणि तंत्र शिक्षण अभ्यासक्रमात विशेष मागास प्रवर्गास एकत्रितपणे इतर मागास वर्गाच्या आरक्षणामधून प्रवेश देण्यात येत आहे. विशेष मागास प्रवर्गातील ०२ टक्के विद्यार्थ्यांना प्रवेश प्राप्त झाले नसल्यास, प्रवेश फेरीअंती इतर मागासवर्गासाठी रिक्त असणाऱ्या जागांमधून सर्वप्रथम विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात येतो.

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या दिनांक ७ डिसेंबर,१९९४ रोजीच्या शासन निर्णयानुसार विशेष मागास प्रवर्गाच्या शैक्षणिक प्रगतीसाठी बारा विशेष सवलती घोषित करण्यात आल्या आहेत. इतर मागास बहुजन कल्याण विभागामार्फत विशेष मागास प्रवर्गाच्या विद्यार्थ्यांकरीता खालील विशेष सवलती देण्यात येत आहेत:-

१) मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शिक्षण फी आणि परीक्षा फी प्रदान.
२) माध्यमिक शाळेतील मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीचे प्रदान.
३) शालान्त परिक्षोत्तर शिष्यवृत्ती योजना.
४) औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमधून शिकणाऱ्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांना विद्यावेतनाचे प्रदान.
५) सैनिक शाळांतून शिक्षण घेणाऱ्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांना निर्वाह भत्त्याचे प्रदान.
६) शासकीय वसतीगृहात प्रवेशाची सवलत.
७) व्यावसायिक अभ्यासक्रम शिकविणाऱ्या संस्थांशी संलग्न वसतीगृहात राहणाऱ्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांना निर्वाह भत्ता.

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या दिनांक ३१ मे, २००६ रोजीच्या शासन निर्णयानुसार विमुक्त जाती व भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग व ऊसतोड कामगारांच्या मुलांसाठी नवीन प्राथमिक व माध्यमिक आश्रमशाळा मंजुर न करण्याचा शासनाने धोरणात्मक निर्णय घेतलेला आहे. सद्य:स्थितीत विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी ०४ आश्रमशाळा सुरु आहेत.

स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ तसेच महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ अन्वये, नागरीकांचा मागासवर्ग यांच्यासाठी जागा राखून ठेवल्या असून, नागरीकांचा मागासवर्ग या संज्ञेमध्ये इतर मागासवर्ग आणि विमुक्त जाती व भटक्या जमाती या प्रवर्गाचा समावेश आहे. इतर मागासवर्ग आणि विशेष मागास प्रवर्गास एकत्रितपणे इतर मागासवर्गाच्या आरक्षणामधून जागा राखून ठेवण्यात येत आहेत.

विशेष मागास प्रवर्गातील व्यक्तींना जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या दिनांक ०१ सप्टेंबर, २०१२ च्या अधिसूचनेन्वये करण्यात येते. मा.सर्वोच्च न्यायालयाच्या दिनांक ०२ सप्टेंबर, १९९४ रोजीच्या न्यायनिर्देशानुसार जातपडताळणी करण्याकरीता मानीव दिनांकाचे राज्यातील मूळ अधिवासाचे पुरावे सादर करणे बंधनकारक आहे. विशेष मागास प्रवर्गाकरीता "दिनांक १३ ऑक्टोबर, १९६७" असा मानीव दिनांक विहित करण्यात आलेला आहे. जात पडताळणी समितीस अर्ज प्राप्त झाल्यानंतर अर्ज आणि त्यासोबत पुरविण्यात आलेली माहिती सर्व

बाबतीत परिपूर्ण आहे याची खातरजमा झाल्यानंतर दिनांक ०१ सप्टेंबर, २०१२ च्या अधिसूचनेतील नियम १८(५) प्रमाणे तीन महिन्यांच्या अवधीत आणि अपवादात्मक परिस्थितीत जास्तीच्या दोन महिन्यांच्या कालावधीत जात वैधता प्रमाणपत्र देण्यात येते.

विशेष मागास प्रवर्गामध्ये ०६ मुख्य जातींच्या ५६ तत्सम जाती/उपजाती असून, यापैकी ०८ जाती केंद्र शासनाच्या इतर मागास वर्गाच्या यादीत समाविष्ठ नाहीत. विणकर व्यवसायाशी संबंधीत विशेष मागास प्रवर्गामध्ये २२ जातींचा समावेश असून, यापैकी १८ जाती केंद्र शासनाच्या इतर मागास वर्गाच्या यादीत समाविष्ठ आहे. या १८ जातींना केंद्र योजनासाठी इतर मागासवर्ग प्रमाणपत्र अनुज्ञेय आहे. विणकर व्यवसायाशी संबंधीत हडगर, लिंगायत कोष्टी, लिंगायत देवांग व लिंगायत साळी या जातींचा समावेश केंद्र शासनाच्या इतर मागास वर्गाच्या यादीत समाविष्ठ नाही. सबब, या जातींना केंद्र योजनासाठी इतर मागासवर्ग प्रमाणपत्र अनुज्ञेय नाही. केंद्र शासनाच्या इतर मागास वर्गाच्या यादीत समाविष्ठ करण्याकरीता महाराष्ट्र राज्य मागासवर्ग आयोगाकडून प्रस्ताव मागविण्यात आला आहे.

वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळांतर्गत विणकर समाजासाठी "विणकर समाज आर्थिक विकास महामंडळ " या उपकंपनीची स्थापना करण्यास दिनांक ०४ मार्च, २०२५ रोजीच्या शासन निर्णयान्वये मान्यता दिली आहे. सदर महामंडळाची कंपनी कायदा, २०१३ अंतर्गत नोंदणी करण्याबाबतची कार्यवाही करण्यात येईल. महामंडळाची नोंदणी झाल्यानंतर संचालक मंडळावर नियुक्त्या करण्याबाबतची कार्यवाही करण्यात येईल.

राज्यात विमुक्त जाती व भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्गातील १०० विद्यार्थ्यांकरिता ३६ जिल्ह्यांच्या ठिकाणी मुला-मुलींसाठी प्रत्येकी ०१ या प्रमाणे ७२ वसतीगृहे सुरु करण्यास मान्यता दिली आहे. माहे ऑगस्ट, २०२४ ते माहे नोव्हेंबर, २०२४ या कालावधीत एकूण ५४ वसतीगृहे कार्यान्वीत करण्यात आली आहेत. सदर वसतीगृहात विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांकरीता एकूण ०६ टक्के आरक्षण अनुज्ञेय आहे.

श्री.रईस शेख, विधानसभा सदस्य यांचे दिनांक ९ मार्च, २०२५ रोजीचे निवेदन मा.मुख्यमंत्री सचिवालयास दिनांक १८ मार्च, २०२५ रोजी प्राप्त झाले आहे.

**************